# अभंग-भारत

४

卐

वा. शि. कोल्हटकर

मूल्य ७॥ रुपये

डॉ. अन्नपूर्णाबाई द. मराठे

रा. ठाणे यांचेकडून

सप्रेम भेट

20/6/53

आषाढी एकादशी

ॐ

चैतन्य ग्रंथ-माला, पुष्प १३ वें

# अभंग - भारत

( महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ )

## खंड ४ था

## १२ शांतिपर्व



ग्रंथकार


कीर्तनवाचस्पति वासुदेव शिवराम कोल्हटकर
संस्थापक— धर्मचैतन्य संस्था, पुणें २


☆


शके १८७५ ) मूल्य ७॥ रुपये ( महाशिवरात्रि.

प्रकाशक :
**वासुदेव शिवराम कोल्हटकर**
धर्मचैतन्य संस्था, सदाशिव पेठ,
पुणें २.

सर्व हक्क ग्रंथकर्त्यांचे स्वाधीन

मुद्रक :
**हरि महादेव गद्रे**
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार, पुणें २.

सादर समर्पण—

श्रीअदिति—वामनचरणीं—



सुमाता सत्पुत्र अदिती-वामना । घ्याहो या वंदना अतिप्रेमें ॥ १ ॥
कलियुगीं तुम्हीं तारक जनांसी । ऐसें भागवतीं कथिलें स्पष्ट ॥ २ ॥
वास्तव प्रार्थितों जोडूनियां कर । शांतिपर्वकार्य सिद्धीसी न्या ॥ ३ ॥
धर्मराज्य येणें होवो प्रस्थापित । करितां ग्रंथाभ्यास शांति लाभो ॥४॥
धर्मावीण शांति न लाभे कदापि । निवेदिलें तेंचि शांतिपर्वीं ॥ ५ ॥
ग्रंथें या लाभोत सुमाता सुपुत्र । होवो हा पुनीत देश तेणें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे 'वाराणसी क्षेत्रीं' । 'अदिति-वामनासी' ग्रंथार्पण ॥७॥

श्री

# प्रास्ताविक निवेदन

— ॐ नमो भगवते वासुदेवाय —

अखिल जगतीतलाच्या ज्ञानभांडारांतील मोठ्यांतमोठ्या ज्ञानभांडारापैकीं **शांतिपर्व** हें एक अपूर्व ज्ञानभांडार आहे. भगवान् गोपालकृष्णांना निजधामाला जातांना उद्धवाजवळ या शांतिपर्वाचा गौरवानें उल्लेख केल्यावांचून राहवलें नाहीं. या एकाच गोष्टीनें शांतिपर्वाची महति ज्ञात्यांस पटल्यावांचून रहाणार नाहीं. श्रीमद्भागवताच्या एकादशस्कंधांत १९ व्या अध्यायामध्यें भगवान् श्रीकृष्ण उद्धवाच्या प्रश्नास उत्तर देतांना म्हणाले—

**तानहं तेऽभिधास्यामि देवव्रतमुखात् श्रुतान् ॥**
**ज्ञानवैराग्यविज्ञानश्रद्धाभक्त्युपबृंहितान् ॥**

उद्धवा, निष्ठेनें धर्माचार करणाऱ्या भीष्माच्या मुखानें ऐकलेले, ज्ञान, वैराग्य, स्वानुभव, श्रद्धा आणि भक्ति या सर्वांचे आश्रयभूत असे ते धर्म मी तुला सांगतों.

निजधामाला जातांना आपल्या परमप्रिय भक्ताला परम कल्याणकारक ठेव म्हणून दिलेल्या ज्ञानभांडारांत साक्षात् भगवंतांनीं शांतिपर्वाचा असा गौरव केला आहे; यावरूनच त्याची श्रेष्ठता सुज्ञांना निराळी सांगण्याचें कारण नाहीं.

राजधर्मपर्व, आपद्धर्मपर्व आणि मोक्षधर्मपर्व अशीं शांतिपर्वांत तीन उपपर्वें आहेत. आपद्धर्माच्या चोरवाटा असलेल्या राजधर्माच्या भक्कम तटबंदींत भीष्मपितामहांनीं मोक्षधर्माचें परम पावन आणि भव्य मंदिर उभारिलें आहे. या रूपानें त्यांनीं बद्ध, मुमुक्षु, साधक आणि सिद्ध या

सर्वांची अखंड क्षुधा शमविणारें हें शाश्वतचें ज्ञानामृतांचें अन्नसत्रच घातलें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. राजधर्मपर्व ही भारताची शाश्वतची घटनाच आहे. या घटनेचा अभ्यास केल्यावांचून कोणीहि, केव्हांहि आणि कितीहि घटनासमित्या नेमल्या तरी भारताची खरी घटना घडणें शक्य नाहीं. हा केवळ भावनेचा प्रश्न नसून प्रत्यक्ष व्यवहाराचा आणि शास्त्रीय प्रश्न आहे. शांतिपर्वातील राजधर्मपर्वाचा सखोल अभ्यास करणाराच्या हें सहज ध्यानीं आल्यावांचून रहाणार नाहीं.

राजधर्मपर्व हें राजशासनशास्त्राच्या सिद्धान्तांचें माहेरच आहे. त्यामुळें प्रास्ताविक निवेदनांत त्याचें सविस्तर वर्णन करणें शक्य नाहीं. परंतु सत्ता-धुंदीनें सत्ताधीश ज्या ठिकाणीं नेमका चुकतो ती एकच जागा दाखवून पुढें जातों. राजशाही असो किंवा लोकशाही असो; कोणत्याही पद्धतीचें राज्ययंत्र असलें तरी तें चालविणारा मनुष्यप्राणि हा जोंपर्यंत विकाराधीन असेल—खरा मननशील मानव झालेला नसेल—तोंपर्यंत तो स्वार्थानें आपलें स्थान टिकविण्यासाठीं सूक्तासूक्त मार्गांचा अवलंब केल्यावांचून रहाणें शक्यच नाहीं. अशी स्थिति झाली म्हणजे तो जनतेच्या दौर्बल्याचा दुरुपयोग करूं लागतो, किंवा जनता दुर्बल कशी बनेल हेंच पाहूं लागतो. परंतु जनता दुर्बल झाली म्हणजे आपल्यापुढें तिचें कांहीं चालणार नाहीं ही समजूत भारतकारांच्या मतें साफ चुकीची आहे. यासंबंधीं उतथ्यमुनि मांधात्याला म्हणतात—

अभंग

**दुर्बलांचें सौख्य तेंचि नृपाळाचें । दुःख बाधे त्यांचें रायाप्रति ॥१॥**
**मुनि, सर्प तेंवी दुर्बलांची दृष्टि । दुःसह या लोकीं वाटे मज ॥ २ ॥**
**दुर्बलशापानें दग्ध होतां वंश । अंकुरही तेथ न फुटे कदा ॥ ३ ॥**
**दुर्बलता हेंचि जाणें महाबल । करील निर्मूल सकलैश्वर्या ॥ ४ ॥**

अभंग–भारत शांतिपर्व अ. ९१

अशाप्रकारें दुर्बलांचें जें दुःख तेंच आपुलें दुःख किंवा मरणच असें यथार्थत्वानें समजणारी राजसत्ताच लोकहितकारी होऊं शकेल, असा भार-

ताचा परम सिद्धान्त आहे. अशा राजसत्तेमुळेंच 'न मे स्तेनो जनपदे' असें आत्मविश्वासानें म्हणण्याचा अधिकार प्राप्त होतो.

शास्त्रीय सिद्धान्त कितीहि श्रेष्ठप्रतीचे म्हणजे बिनचुक असले तरी व्यवहारामध्यें प्रत्येक गोष्ट सापवाद असते. अपवाद म्हणजेच आपद्धर्म. आपद्धर्म हे आपद्धर्मच राहिले पाहिजेत. ते केव्हांहि नित्यधर्म समजले जातां कामा नये. हा महान् सिद्धान्त ध्यानांत येण्यासाठीं आपद्धर्मांचें ज्ञान असणें अत्यंत अवश्य आहे. याकरितांच "आपद्धर्मपर्वाची" योजना आहे. अशाप्रकारें आपद्धर्म हे अत्यंत महत्त्वाचे आहेत.

मोक्षमार्ग तर सर्वच हालचालींचें मूळ आहे. सर्व सद्गुणांची ती जननीच आहे. व्यवहार निर्मल असावा असें सर्वांसच वाटतें. पण निर्मल व्यवहार म्हणजे काय आणि तो तसा कां असावा याचें मूळ 'मोक्षधर्म' वांचून ध्यानांत येणें शक्य नाहीं. "प्राप्तंप्राप्तमुपासीत हृदये नापराजिता" म्हणजे प्राप्त परिस्थिति अपराजितचित्तानें सोसावी हा मोक्षधर्मांतील एक रामबाण उपाय आहे. पण त्याचें मर्म कळल्यावांचून त्याचा आचार व्यवहार्य कसा व्हावा, तें मर्म मोक्षधर्माच्या अभ्यासकाला करतलामलकवत् सुस्पष्ट होतें.

प्रथमदर्शनीं मोक्षधर्माचा व्यवहारांत काय उपयोग असेंहि मनाला वाटल्यावांचून रहात नाहीं. परंतु बारकाईनें विचार केला म्हणजे तो फार मोठा गैरसमज असल्याचेंच प्रत्ययाला येतें. किंबहुना मोक्षधर्मावांचून सुफल व्यवहारच होणें शक्य नाहीं. कारण व्यवहार हा एक प्रवास आहे असें मानल्यास कोठें जावयाचें तें निश्चित झाल्यावांचून प्रवास सफल होणार कसा ? मनुष्याचेंच नव्हे तर प्राणिमात्राचें अंतिमसाध्य म्हणजेच मोक्ष. हा मोक्ष प्राप्त करून देणारा जो धर्म तो मोक्षधर्म. या दृष्टीनें जीवाची प्रत्येक क्रिया ही मोक्षाला अपकारक तरी किंवा उपकारक तरी अशीच व्हावयाची. म्हणजे जी क्रिया मोक्ष जवळ आणील ती उपकारक आणि मोक्ष दूर नेईल ती अपकारक हें उघड आहे.

माणसाची प्रत्येक क्रिया ही परिणामकारक असते, मग तो परिणाम अपकारक असो वा उपकारक असो. अर्थात् अपकार किंवा उपकार हा एखाद्या तात्कालिक क्षुद्र लाभ-हानीवरून ठरविणें जरी उथळ बुद्धीला

इष्ट वाटलें तरी दूरदृष्टीला तें पटणार नाहीं. 'दीर्घदर्शी' म्हणजे पुढील प्रसंग ओळखून आधींच सावध होणारा, 'प्रसंगावधानी' म्हणजे आयत्या-वेळीं प्रसंग ओळखून त्यांतून पार पडणारा आणि 'दीर्घसूत्री' म्हणजे सद्यःसुखाच्या मागें लागून भावी संकटांकडे दुर्लक्ष करणारा. अशा तीन प्रकारच्या लोकांत दीर्घसूत्री हा आत्मघातच करून घेत असतो.

असे सद्यःसुखलोलुप, शास्त्रीपंडित असले तरीहि ते हेत्वाभास निर्माण करून विषयलंपटताच पसरवितात. अशा लोकांपासून फारच सावध रहावें लागतें. मोक्षधर्मपर्वांत या सर्व गोष्टींचा विस्तारानें विचार केलेला आहे.

महाभारत हें स्वर्गाप्रमाणें आनंदकारक असून 'श्रीमद्भगवद्गीता' हा तेथील कल्पवृक्ष आहे, आणि शांतिपर्व हें त्या स्वर्गांतील नंदनवनच आहे. तेथें "कामधेनूंचीं खिल्लारें आणि चिंतामणींचीं धवलागारें" ओतप्रोत भरलेलीं आहेत. श्रीमद्भगवद्गीता ही संक्षेपानें सर्व ज्ञानभांडार असल्यामुळें त्याचा विस्तार पहावयाचा असें जर वाटत असेल तर शांतिपर्वच पाहिलें पाहिजे. कारण अर्जुनाला युद्ध करण्यापूर्वीं विषाद होऊन राज्य नकोसें झालें होतें, आणि धर्माला युद्ध झाल्यानंतर मिळालेलें निष्कंटक राज्यहि विषादानेंच नकोसें वाटूं लागलेलें होतें. गीतेनें तशा त्या मनःस्थितींतील अर्जुनास जसें कर्तव्योन्मुख केलें; तसेंच शांतिपर्वानेंहि विषण्ण धर्मराजाला कर्तव्योन्मुखच केलेलें आहे. अशा दृष्टीनें गीतेचा आणि शांतिपर्वाचा उपक्रमोपसंहार एकच आहे.

अभंग-भारताच्या यापुढील म्हणजे शेवटच्या ५ व्या खंडांत '**अनुगीता-पर्व**' येणार आहे. त्यांत गीतेचा विस्तार प्रत्यक्ष भगवंतांच्या तोंडून झालेला आहे. परंतु 'शांतिपर्व' हा सर्व गीतातत्त्वांचा विस्तार आहे. ज्याच्या प्रेमानें भगवंतानें आपली शस्त्र न धरण्याची प्रतिज्ञा मोडली त्या सत्यव्रत भीष्मांच्या तोंडून आपल्यासमोर धर्मराजाला भगवंतांनीं हा बोध करविला आहे. आपापल्या दृष्टिकोणांतून या **भीष्मगीते**चा कोणी कांहींहि अर्थ केला तरी **प्राचीनपद्धतीचा मोक्षानुकूल चातुर्वर्ण्य व्यवहार हाच शांतिपर्वास स्पष्टपणें अभिप्रेत आहे, हें सांप्रतकालीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.**

## जनतेची दिशाभूल

आपल्या प्राचीन ग्रंथांपैकीं कोणत्याहि ग्रंथाचा नीट अभ्यास केला म्हणजे त्याचे ओढाताणीचे अर्थ करूनहि आधुनिकांना पाहिजे असलेला 'सव्रगोलंकार' त्यांतून निघणें शक्य नाहीं. हें जाणून आतां कांहीं धूर्त पंडितंमन्यांनीं आणि सुशिक्षित (?) सुधारकांनीं वैदिकांवर भ्याडपणानें छुपे हल्ले चढविण्याचा दृढसंकल्प केल्याचें स्पष्ट दिसत आहे. आपले विचार प्रथम ज्ञात्यांच्यापुडें मांडून ते साधार आणि सप्रमाण ठरले म्हणजे मग ते लोकांत रूढ करावे अशी आपली परंपरा आहे. पण स्वकपोलकल्पित विचारांना आधार आणि प्रमाणें कशीं सांपडणार? म्हणून अशा कांहीं धूर्तांनीं आपली शुद्धपद्धति सोडून सोप्या आणि सुटसुटीतपणाच्या गोंडस नांवाखालीं आपले विचार, परस्पर सामान्य जनांपुढें मांडून त्यांच्यांतच ते रूढ करण्याचा घातकी खटाटोप आरंभिला आहे. त्यामुळें अशास्त्रीय आचारहि रूढ झाले म्हणजे 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी' या न्यायाचा अवलंब करून आपले हेतु सिद्धीस नेण्याचा त्यांचा अमंगल हेतु आहे. या घातकी प्रयत्नांस वेळींच आळा न बसेल तर धार्मिकांना आपला शास्त्रीय मार्ग टिकविण्यास आणि आक्रमिण्यास अधिकाधिक विघ्नें येतील आणि सामान्य जनता दिवसेंदिवस अधिकाधिक दुर्बल, विघटित आणि अज्ञ होत जाऊन शेवटीं पूर्ण अधःपतित होईल. यासाठीं अशा सुधारकांपासून व पंडितप्रवरांपासून सर्वांनींच वेळेवर सावध राहिलें पाहिजे.

शांतिपर्वाचा अभ्यास या दृष्टीनेंहि राष्ट्राच्या अत्यंत उपयोगी पडेल. याचा पूर्ण अभ्यास करून त्याचा सर्वत्र प्रचार झाला तर भ्रांत मनःस्थिति ताळ्यावर येऊन भारताचें संपूर्ण वैभव अभिवृद्धि पावेल यांत तिळमात्र शंका नाहीं.

## गुह्य निवेदन

सज्जनहो, तुम्हीं शांतिपर्वाची खरी योग्यता केवळ व्यावहारिक लाभानें मोजूंच नका! अंतःकरणाच्या निर्मल भावाचें माप स्थूल मापानें कसें मोजतां येणार? दया, क्षमा, शांति अशा सोज्वळ मनोवृत्ति कधीं कोठें विकत का मिळणार आहेत? आणि तशा त्या मिळत नाहींत म्हणून त्यांना किंमत

नाहीं असें का आहे? तशा सद्भावना कितीहि पैसा ओतला तरी त्या कोठें पैशानें मिळण्यासारख्या नाहींत; म्हणूनच त्या अमोल आहेत. एखाद्या उद्योगपतीनें आपल्या पुत्राला कोट्यवधि रुपये राखून ठेवले तरी त्या मुलाच्या अंतःकरणांत जर कांहीं सद्भावना–सद्गुण–निर्माण केल्या नसतील तर त्या कोट्यवधि रुपयांचा चुराडा होण्यास कितीसा वेळ लागणार आहे? म्हणूनच कोणत्याहि व्यावहारिक लाभासाठीं ईश्वरभावनेसारख्या सोज्वळ भावनेचा नाश करून राष्ट्राचा उद्धार होणार नाहीं.

ईश्वरभावना ही सर्व सद्गुणांची खाण आहे. ती नसेल तर शौर्य, धैर्य, पराक्रमादि सर्व सद्गुण हिरण्यकशिपूप्रमाणें आत्मविघातकच होतात. आणि ती असेल तर ध्रुवप्रल्हादाप्रमाणें केवळ त्याच एका तारकशक्तीमुळें सर्व सद्गुण आपल्या चरणीं लोळण घेतात. म्हणूनच कोणत्याहि लोकेषणेच्या मार्गें न धांवतां केवळ आंतरिक निर्मलतेसाठीं शांतिपर्वाचा निष्ठेनें अभ्यास करा व अल्पावधींतच आपली ऐहिक व पारलौकिक उन्नति किती झपाट्यानें होत आहे याचा प्रत्यय घ्या! अशा या प्रासादिक ग्रंथांचें सामर्थ्य अतर्क्य असून सज्जनांना ती एक देणगीच आहे. याहून अधिक काय लिहूं? अनुभव घ्या आणि मला कळवा, एवढेंच यासंबंधीं सज्जन वाचकांना विनवितों, आणि हे प्रत्ययाचे बोल आहेत एवढेंच नम्रपणानें पण आत्मविश्वासानें सुचवितों.

## नर-नारायणांचा प्रसाद

शांतिपर्वासारख्या या दिव्य ग्रंथाचे आणि विशेषतः त्यांतील मोक्षधर्मपर्वाचे अभंग भगवच्चरणांसन्निधच व्हावेत या संकल्पपूर्वक सद्भावनेनें मोक्षधर्मपर्वावरील अभंगांची रचना **श्रीक्षेत्र बद्रीनारायण** येथें भगवती अलकनंदेच्या पुण्यतीरावर श्रीनरनारायणांच्या जगत्पावन पुण्यचरणांच्या सान्निधच सुरू झाली आणि १८ दिवस तेथें राहून श्रींचा प्रसाद घेऊनच पुढील अभंग पूर्ण झाले. याकामीं श्रीनरनारायणांच्या चरणीं घडलेला लाभ अलौकिक आहे, एवढेंच लिहितां येण्यासारखें आहे. त्याचा साक्षात् अनुभव मी प्रत्यक्ष घेत असून शांतिपर्वाभ्यासानें तो कोणाहि ईश्वरनिष्ठास लाभेल असा भरवंसा आहे. हें गहनगूढ काय लिहितां? असें कोणी म्हणेल.

परंतु जें आहे तें तसेंच लिहिलें आहे. अनुभवानें त्याची साक्षच पटण्यासारखी आहे. मग गहन काय आणि गूढ काय ? तात्पर्य शांतिपर्वानें इह आणि पर या दोन्ही गोष्टी निश्चयानें साध्य होतील असा या ग्रंथाचा स्वयंभु अधिकार आहे.

हा ग्रंथ अत्यंत विस्तृत असल्यामुळें मुळांत अनेक ठिकाणीं पुनरुक्ति आहे. अभंगांत तशी पुनरुक्ति शक्यतों टाळली आहे. पुढें पुढें कांहीं ठिकाणीं जेथें पूर्वीं येऊन गेलेला विषयच पुनः आला आहे, तेथें तर तो पुष्कळसा किंवा क्वचित्प्रसंगीं सर्वच गाळावा लागला आहे. क्वचित् कोठें संक्षेप करतांना अतिसंक्षेपहि आढळणारच नाहीं असें नाहीं. अशा वेळीं ग्रंथविस्तार लक्षांत घेऊन वाचक क्षमा करतील असा भरंवसा आहे. एकंदरींत हा ग्रंथ वाचकांच्या हातीं देतांना मनाला एक प्रकारची कृतार्थता वाटत आहे. हा चतुर्थ खंड धर्मचैतन्य संस्थेच्या अधिष्ठात्र्या **श्रीआदिति-वामनचरणीं** अर्पण करून तो अत्यानंदानें वाचकांच्या हातीं दिला जात आहे. यानंतर तृतीय खंडाच्या प्रकाशनाचा वृत्तांत आणि या खंडास झालेलें साह्य याचा उल्लेख करणें अवश्य आहे.

## दिल्ली येथें तृतीय खंडाचें प्रकाशन

आजचें दिल्ली नगर हें हास्तिनापूर नसून तें पांडवांची राजधानी जें इंद्रप्रस्थ नगर तेंच होय. हास्तिनापूर हें दिल्लीपासून कांहीं अंतरावर होतें. त्याचे अवशेष अद्यापिहि तेथें आहेत.

अभंग–भारताच्या तृतीय खंडांत सर्व युद्धपर्वें आलीं असून **अभंग-गीता** ही त्यांतच आली आहे, म्हणून **अभंग-गीता** प्रत्यक्ष कुरुक्षेत्रांत एकदां संपूर्ण गाऊन धर्मराजाच्या त्या पुण्यनगरींतच या खंडाचें प्रकाशन करण्याचें योजिलें. या कामीं दिल्ली येथील महाराष्ट्रीय स्नेहसंवर्धक समाजानें आम्हांस मनापासून साह्य केलें. तेथील महाराष्ट्र भवनांत हा प्रकाशन समारंभ शके १८७३ फाल्गुन व. ४ शनिवार दि. १५ मार्च १९५२ या दिवशीं परमपूज्य श्रोत्रीय ब्रह्मनिष्ठ श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्री १००८ स्वामी **नृसिंहगिरिजी महाराज** यांचे अध्यक्षतेखालीं मंगलवाद्यांच्या मंजुळ आवाजांत सुरू होऊन श्रीकृपेनें अपूर्व रीतीनें पार पडला. त्यावेळीं माझ्या

मुंबईच्या श्रोत्यांतर्फे मुद्दाम **सोन्याचीं १८ फुलें घेऊन** श्री. **दत्तात्रेय कृष्ण फडके** हें सहकुटुंब आयत्यावेळीं समारंभास उपस्थित झाले आणि योग्यवेळीं मोठ्या समारंभानें त्यांनीं अभंग-भारत ग्रंथावर सुवर्णपुष्पें वाहिलीं. दिल्ली येथीस सौभाग्यशालिनी महाराष्ट्रीय भगिनींनींहि या ग्रंथास अत्यंत आदरानें सुवर्णपुष्पें वाहिलीं. त्यावेळचें छायाचित्र पुढें दिलें आहे. त्याचप्रमाणें भारताच्या आरतीचाहि सोहाळा अपूर्व असाच झाला. या दिल्लींतील कार्यक्रमांत अनेकांप्रमाणेंच श्री. व्यं. शि. रानडे, श्री. र. बा. परांजपे, व श्री. पुरुषोत्तमराव ओक यांचें आम्हांस हार्दिक साह्य लाभलें. दिल्ली येथें अशा प्रकारचा मंगल समारंभ मंडळांत क्वचितच झाला असेल असें तेथील सर्व लोक बोलत होते. नंतर म. स्ने. सं. समाजाच्या वतीनें महावस्त्र अर्पण करून 'अभंग-भारतकार' या नात्यानें माझा सत्कारहि करण्यांत आला.

## चतुर्थ खंडाचे साह्यकर्ते

या खंडास रु. २५ व त्यावरील रक्कम देणारांचीं नांवें:—

१०१ रु. श्री. गोपाळ नारायण रानडे (मुंबई), १०१ रु. सौ. सावित्रीबाई गोविंद अभ्यंकर (मुंबई), १०१ रु. श्रीमती ताराबाई रानडे (पुणें), ३१ रु. श्रीमती पार्वतीबाई गोडबोले (विलेपार्ले), ३१ रु. श्री. रघुनाथ भास्कर गोगटे, ठाणें (भगिनी कै. गोदूताई यांचे स्मरणार्थ), २५ रु. श्रीमती सोनूबाई मारुतीराव तनपुरे, ठाणें (कै. मारुतीराव शिवराम तनपुरे यांचे स्मरणार्थ), २५ रु. श्री. डॉ. मा. पु. जोशी (पुणें), २५ रु. 'क्ष'.

## पांचवा खंड

भगवान् गोपालकृष्णाच्या कृपेनें एवढ्या मोठ्या महासागराचें काव्यांत ग्रथन आणि तेंहि छापून प्रसिद्ध करणें हें काम किती अवघड असेल हें ज्ञात्यांस सहज समजण्यासारखें आहे. आतां या कार्याचा एक पंचमांश भागच शिल्लक राहिला आहे. तो पुढील वर्षीं पूर्ण करण्याचा मानस आहे. ईश्वरीकृपेनें तोहि संकल्पाप्रमाणें पार पडेलच. पुढील खंडांत संपूर्ण अनुशासनपर्व येणार असून शांतिपर्वाप्रमाणें अनुशासनपर्वहि महत्वाचें आहे. तसेंच 'अनुगीता' ही याच खंडांत येणार आहे. अनुगीतेकडे गीताभ्यासकांचें जावें तितकें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. पण तो विषय अभ्यासकाला

दुर्लक्ष करण्यासारखा नाहीं. इतकेंच नव्हे तर गीतेंतील कित्येक विषयांवर अनुगीतेंत लख्ख प्रकाश टाकला गेला आहे. असो.

पुढील वर्षी पांचवा खंड प्रसिद्ध झाला म्हणजे अभंग-भारताचे सर्व भाग वाचकांस अर्पण केल्याचें समाधान लाभेल. मागील चारहि भागां-प्रमाणें पुढील पांचव्या भागाकरितांहि ग्राहक उत्कंठेनें वाट पहात आहेत. आजपर्यंतच्या ४ खंडांच्या पूर्वग्राहकांस एक दिवसहि न चुकतां ठरलेल्या पुण्यदिवशींच ग्रंथ प्रसिद्ध होत गेल्याचें प्रत्यक्ष ज्ञात आहेच. पुढील खंडहि तसाच नियोजित दिवशींच प्रकाशित होईल असें नम्रपणें सुचवितों.

शेवटीं या शांतिपर्वाचे सहाय्यक आणि पूर्वग्राहक यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों. तसेंच या खंडाची हस्तलिखित मुद्रणप्रत करणें, तीं तपासणें, मुद्रितें तपासणें इत्यादि कामांत ज्यांनीं मला आपुलकीनें साह्य केलें त्या सर्वांचें मीं मनःपूर्वक शुभ चिंतितों. त्याचप्रमाणें या भागांतील चित्रें काढणारे उदयो-न्मुख चित्रकार रा. सदाशिव आपटे यांचे आणि त्यांचे ठसे करून देणारे पुण्यांतील प्रख्यात ब्लॉक मेकर श्री. ग. शि. मोघे यांचेहि आभार मानितों.

शेवटीं या शांतिपर्वाच्या छपाईचें काम सुबक आणि वक्तशीर करून दिल्याबद्दल येथील 'जनवाणी' मुद्रणालयाच्या व्यवस्थापक आणि कामगार-बंधूंचाही गौरवानें उल्लेख करून पुढील कार्यासाठीं भगवत्स्मरणपूर्वक हें प्रास्ताविक पुरें करितों.

आपला नम्र,

धर्मचैतन्य संस्था,
सदाशिव पेठ, पुणें २.

बा. शि. कोल्हटकर

# विषयानुक्रमणिका

## १२ शांतिपर्व

### राजधर्मपर्व १

**अध्याय १ ते ५** युधिष्ठिराचें नारदकृत सांत्वन, त्याचा कर्णाविषयीं विलाप, कर्णरथचक्र पृथ्वीनें कां गिळिलें, कर्णशापवृत्त, त्यास ब्रह्मास्त्राची प्राप्ति आणि परशुरामाचा शाप, दुर्योधनकृत कलिंगाधिपकन्याहरण, कर्ण-पराक्रम, कर्णास मालिनी नगरीची प्राप्ति आणि कर्णवधाचीं कारणें. **अध्याय ६–७** युधिष्ठिराचा शोक आणि त्याचा स्त्रीजातीस शाप, युधिष्ठि-राचा पश्चात्ताप, दुर्योधनादिकांच्या दुष्कृत्यांची स्मृति आणि सर्व परिवार त्यागपूर्वक वनवासगमनेच्छा. **अध्याय ८** अर्जुनोक्त धनाची महती. **अध्याय ९** धर्माचें निवृत्तिपर भाषण. **अध्याय १०** भीमकृत धर्मोपहास आणि संन्यासग्रहणानें धर्मव्यतिक्रमकथन. **अध्याय ११** अर्जुनकथित इंद्र-आणि ऋषि यांचा संवाद. **अध्याय १२** नकुलकथित गृहस्थधर्माची श्रेष्ठता. **अध्याय १३** सहदेवाचें भाषण. **अध्याय १४** द्रौपदीकृत समारोप, द्रौपदी-कृत राज्योपभोग हाच क्षत्रियाचा धर्म असें प्रतिपादन. **अध्याय १५** अर्जु नोक्त शासनदंडाचें महत्वप्रतिपादन. **अध्याय १६** भीमाचें स्फूर्तिपद भाषण. **अध्याय १७** युधिष्ठिरकथित नैराश्याची महती. **अध्याय १८** पार्थ-कथित जनकपत्नीचें भाषण. **अध्याय १९** धर्मकथित त्यागाचें महत्व. **अध्याय २०-२१** धर्मास देवस्थानऋषींचा उपदेश आणि मुनिकथित इंद्रबृह-

स्पतिसंवाद. **अध्याय २२** अर्जुनकृत दैवाची अनुल्लंघनीयता. **अध्याय २३** व्यासकथित गृहस्थाश्रमप्रशंसा आणि शंख-लिखितवृत्त. **अध्याय २४** व्यास-कथित राजधर्म आणि हयग्रीवकथा. **अध्याय २५** व्यास–धर्मसंवाद. **अध्याय २६** धर्मार्जुनसंवाद. **अध्याय २७** व्यासधर्मसंवाद. **अध्याय २८** अश्म–जनकसंवाद. **अध्याय २९–३१** श्रीकृष्णाचा धर्मास उपदेश, ( या अध्यायांतील, स्वर्णष्ठीवी आदि कथा द्रोणपर्वांत आल्या आहेत ) **अध्याय ३२** व्यासकथित प्रजापालनाचें महत्व. **अ. ३३–३७** शोकाकुल युधिष्ठिरास अश्वमेध करण्याविषयीं व्यासांचा उपदेश, व्यासोक्त कार्याकार्यकथन, पाप-प्रायश्चित्तनिरूपण, भक्ष्याभक्ष्य आणि पात्रापात्रविचार आणि व्यासाज्ञेनें भीष्मांकडून राजधर्म ऐकून घेण्यासाठीं धर्मराजाचें परिवारासह हस्तिना-पुरीं गमन. **अध्याय ३८–४०** चार्वाककृत युधिष्ठिरनिंदा, विप्रहुंकारानें चार्वाकाचा नाश, श्रीकृष्णकथित चार्वाकाचें पूर्ववृत्त, कृष्णहस्तें धर्मास राज्याभिषेक. **अध्याय ४१** युधिष्ठिरद्वारा राजकार्याची वांटणी आणि मंत्रीयोजना. **अध्याय ४२–४५** ज्ञातीजनांचें और्ध्वदेहिक, अनाथ स्त्रियांचें प्रतिपालन, श्रीकृष्णस्तुति, दुर्योधनादिकांच्या मंदिरांत भीमादिकांचा निवास, युधिष्ठिराची कर्तव्यदक्षता, त्याचें श्रीकृष्णाकडे गमन आणि श्रीकृष्णस्तुति. **अध्याय ४६** भीष्ममुखानें सर्वधर्मश्रवणाविषयीं श्रीकृष्णाचें धर्मास प्रोत्सा-हन, आणि युधिष्ठिराच्या प्रार्थनेवरून त्याच्याबरोबर भीष्मांकडे जाण्यासाठीं रथ जोड अशी कृष्णानें दारुकास केलेली आज्ञा. **अध्याय ४७** भीष्मकृत श्रीकृष्णस्तुति ( भीष्मस्तवराज ). **अध्याय ४८-४९** कृष्ण-युधिष्ठिरादिकांचें कुरुक्षेत्रीं गमन, धर्मप्रश्नानें श्रीकृष्णाकडून त्याला परशुरामचरित्रकथन. **अध्याय ५०–५१** कृष्णकृत भीष्मप्रशंसा आणि युधिष्ठिराला धर्मोपदेश करण्याविषयीं भीष्मांना प्रेरणा. **अध्याय ५२–५३** वैक्लव्यामुळें भीष्मांची असमर्थता, कृष्णाकडून त्यांस सामर्थ्यप्रदान, सायंकाळीं धर्माचें स्वमंदिरीं प्रयाण, दुसरे दिवशीं प्रातःकाळीं कृष्णयुधिष्ठिरांचें भीष्मांकडे पुनरागमन. **अध्याय ५४** नारदाचें धर्मास आणि कृष्णाचें भीष्मांस प्रोत्साहन. **अध्याय ५५–५८** युधिष्ठिरानेंच आपणांस प्रश्न करावे अशी भीष्मांची इच्छा, युधि-ष्ठिरप्रश्न, भीष्मांकडून युधिष्ठिरास राजधर्मकथन, सायंकाळीं कृष्णादिकांचें स्वस्थानीं गमन. **अध्याय ५९** भीष्मांकडून युधिष्ठिराला राजोत्पत्ति आणि

राजधर्मांचें कथन. **अध्याय ६०** भीष्मोक्त चातुर्वर्ण्यधर्मकथन. **अध्याय ६१** भीष्मोक्त आश्रमधर्मकथन. **अध्याय ६२** ब्राह्मणधर्मकथन. **अध्याय ६३** ब्राह्मणांचे त्याज्यधर्म आणि क्षत्रियधर्मकथन. **अध्याय ६४–६५** क्षात्रधर्म-श्रेष्ठत्वकथन, आणि इंद्र-मांधातृसंवाद. **अध्याय ६६** वर्णाश्रमधर्मकथन. **अध्याय ६७** सराजक व अराजक स्थितीचे गुणदोष. **अध्याय ६८** बृहस्पतिकृत राजधर्मवर्णन. **अध्याय ६९–७१** राजनीति आणि तिचे ३६ प्रकार, युधिष्ठिराच्या राजधर्मविषयक प्रश्नास उत्तर. **अध्याय ७२–७५** ब्राह्मणांची श्रेष्ठता, वर्णधर्म, पुरोहितवर्णन, ऐल–कश्यपसंवाद, मुचकुंदचरित्र आणि युधिष्ठिराला राज्य स्वीकारण्याविषयीं उपदेश. **अध्याय ७६** ब्राह्मणांचीं निषिद्ध कर्में व राजधर्म. **अध्याय ७७** केकयराजोपाख्यान. **अध्याय ७८** आपद्धर्म. **अध्याय ७९** ऋत्विजांचीं लक्षणें. **अध्याय ८०** मित्रामित्रलक्षणें. **अध्याय ८१** श्रीकृष्णाची नाजुक गृहस्थिती आणि त्यास नारदांचें उत्तर. **अध्याय ८२** अमात्यपरीक्षणार्थ कालकवृक्षीयोपाख्यान. **अध्याय ८३** मंत्र्यादिकांचीं लक्षणें. **अध्याय ८४** सामाचें महत्व. **अध्याय ८५** अमात्य आणि सेनापति यांचीं लक्षणें व दूताविषयींचा धर्म. **अध्याय ८६** नगरें आणि नगरव्यवस्था. **अध्याय ८७** राष्ट्रसंरक्षण आणि वैश्याचें महत्व, **अध्याय ८८** करग्रहणप्रकार आणि धनवंतांची महती. **अध्याय ८९–९१** (उतथ्य-गीता) राजधर्मकथन, उतथ्य-मांधातृसंवाद. **अध्याय ९२-९४** (वामदेवगीता) धार्मिक राजाचें वर्तन, राजाचें वर्तन, राजधर्म. **अध्याय ९५-९६** विजयेच्छु राजाचें वर्तन. **अध्याय ९७** युद्धांतील प्राणिहत्या व संग्राममरण. **अध्याय ९८** रणयज्ञफलप्राप्ति. **अध्याय ९९** जनककृत वीरप्रोत्साहन आणि वीरवृत्ति. **अध्याय १००** उत्साहप्रद वीराचें वर्तन. **अध्याय १०१** योध्यांचीं लक्षणें. **अध्याय १०२** विजयचिन्हें आणि सामादिकांचें महत्व. **अध्याय १०३** शत्रूशीं कसें वागावें त्याचें कथन. **अध्याय १०४–१०६** ( कालकवृक्षीयोपाख्यान ) ऐश्वर्याची अस्थिरता, ऐश्वर्यभ्रष्ट राजाचें वर्तन, विदेहाधिपतीस ऐश्वर्यलाभ. **अध्याय १०७** वीरसमुदायाविषयींचें वर्तन. **अध्याय १०८** माता, पिता आणि गुरु यांचें माहात्म्य. **अध्याय १०९** सत्यासत्यविवेक. **अध्याय ११०** संकट मुक्तीचे उपाय. **अध्याय १११** व्याघ्र–गोमायुसंवादरूपानें राजसेवकांचे स्वभाव. **अध्याय ११२** ( उष्ट्रग्रीवोपाख्यान ) आलस्य-

दोष. **अध्याय ११३** विनयाचें महत्व. **अध्याय ११४** ज्ञात्याचें मूढाशीं वर्तन. **अध्याय ११५** राजाच्या सहाय्यकांची पात्रापात्रता. **अध्याय ११६ –११९** श्वानदृष्टान्तानें राजभृत्यांविषयींचा बोध. **अध्याय १२०** राजधर्मसारकथन. **अध्याय १२१–१२२** दंडाचें स्वरूप आणि दंडोत्पति. **अध्याय १२३** धर्मार्थकामविचार. **अध्याय १२४** शीलाचें महत्व व त्याच्या प्राप्तीचा मार्ग. **अध्याय १२५–१२८** ( ऋषभगीता ) आशेचें स्वरूप, सुमित्राची मृगया, त्याचा मुनींस प्रश्न, तनुवीरद्युम्नसंवादकथन, अंतीं सुमित्राचा आशात्याग. **अध्याय १२९** ऋणमुक्ति आणि सद्गतिलाभोपाय. **अध्याय १३०** आपत्कालीं द्रव्यसंपादनाचे उपाय.

---

## आपद्धर्मपर्व २

**अध्याय १३१** विपत्कालीं राजाचें वर्तन. **अध्याय १३२** विपत्काळीं विप्रांचें वर्तन. **अध्याय १३३** कोशसंग्रह, आणि राजाचें प्रजेशीं व दस्युलोकांशीं वर्तन. **अध्याय १३४** बलप्रशंसा. **अध्याय १३५** (कायव्यचरित) दस्यूंसही सद्गति. **अध्याय १३६** राजानें कोशवृद्धि कशी करावी. **अध्याय १३७** मत्स्योपाख्यान. **अध्याय १३८** मार्जारमूषकचरित्रानें मित्रवैरीवर्तनकथन. **अध्याय १३९** ( ब्रह्मदत्त आणि पूजनी यांचा संवाद ) राजानें कोणावरही विश्वास ठेऊं नये. **अध्याय १४०** भरद्वाज–शत्रुंजयसंवादरूपानें आपद्धर्मकथन. **अध्याय १४१** विश्वामित्र–चांडाळसंवादद्वारा आपत्कालीन भक्ष्याभक्ष्य विचार. **अध्याय १४२** धर्मनिर्णयास बुद्धि आणि शास्त्र यांचा उपयोग. **अध्याय १४३–१४९** ( कपोतव्याधसंवाद ) शरणागताचें रक्षण, अतिथिसेवा, व्याधाची उपरति, कपोत–कपोतीचें बलिदान व स्वर्गगमन, आणि व्याधाचें स्वर्गगमन. **अध्याय १५०–१५२** इंद्रोत आणि जनमेजय यांचा संवाद आणि जनमेजयाचा पापनाश. **अध्याय १५३** गृध्रजंबूकविवाद आणि कुमाराचें पुनरुज्जीवन. **अध्याय १५४–१५७** ( शाल्मलीवृक्षाची कथा ) मूर्खानें बलाढ्याशीं वैर करूं नये. **अध्याय १५८** पापाचें मूळ आणि शिष्टाचें लक्षण. **अध्याय १५९** अज्ञानमाहात्म्य आणि

अतिलोभ हेंच अज्ञान. **अध्याय १६०** दम आणि दमप्रशंसा. **अध्याय १६१** तपःप्रशंसा. **अध्याय १६२** सत्यप्रशंसा. **अध्याय १६३** लोभादिनिरूपण. **अध्याय १६४** नृशंस ( क्रूर ) धर्म. **अध्याय १६५** आपत्कालीं द्रव्यार्जन. पापें आणि प्रायश्चित्तें. **अध्याय १६६** खड्गोत्पत्तिकथन. **अध्याय १६७** ( षड्जगीता ) चतुर्विधपुरुषार्थनिरूपण. **अध्याय १६८–१७३** मैत्रीस योग्यायोग्य कोण ? एका कृतघ्नाची विस्तृत कथा.

---

## मोक्षधर्मपर्व ३

**अध्याय १७४** ब्राह्मण आणि सेनजित् यांचा संवाद, पिंगलोपाख्यानकथन. **अध्याय १७५** (पितापुत्रसंवाद) काळाची भीषणता. **अध्याय १७६** (शंपाकगीता) सर्वत्यागकथन. **अध्याय १७७** ( मंकीगीता ) विरक्तिमहात्म्य. **अध्याय १७८** ( बोध्यगीता ) त्यागनैराश्यादि वर्णन. **अध्याय १७९** अजगरवृत्तिप्रशंसा. **अध्याय १८०** (काश्यप–शृगालसंवाद) ज्ञानाची महति. **अध्याय १८१** पूर्वकर्मप्राधान्य. **अध्याय १८२–१९२** (भृगु–भरद्वाजसंवाद) भूतोत्पत्ति, शरीराचें पांचभौतिकत्व, जठराग्नि आणि प्राणवायु, जीवाच्या अस्तित्वाविषयीं शंका व समाधान, चातुर्वर्ण्यविभाग, ब्राह्मणलक्षण, सत्यासत्यविचार, दानहोमादिकांचें फल, आश्रमधर्मकथन. **अध्याय १९३** सदाचारवर्णन. **अध्याय १९४** त्रिगुणवर्णन. **अध्याय १९५** चतुर्विध ध्यानयोगकथन. **अध्याय १९६–२००** (जापकोपाख्यान) जपाचें फल. **अध्याय २०१–२०६** ( मनुबृहस्पतिसंवाद ) कर्मनिरूपण, तत्वनिरूपण आत्म्याचें अस्तित्व, मोक्षवर्णन, आत्मप्राप्तीचा व ब्रह्मप्राप्तीचा उपाय. **अध्याय २०७** जगदुत्पत्ति. **अध्याय २०८** प्रजापति, देवता आणि ऋषि. **अध्याय २०९** वराहावतारवर्णन. **अध्याय २१०** अध्यात्मविचार. **अध्याय २११** कर्मप्रवृत्तिकारणनिरूपण. **अध्याय २१२** प्रवृत्तित्याग आणि निवृत्तिस्वीकार. **अध्याय २१३–२१४** गर्भवासादिनिवृत्त्यर्थ इंद्रियनिग्रह व त्याचे उपाय. **अध्याय २१५** ब्रह्मप्राप्तीचे उपाय. **अध्याय २१६** निद्रात्यागाची आवश्यकता आणि स्वप्नदशादि निरूपण. **अध्याय २१७** प्रवृत्ति–निवृत्तिकथन, शरीर व

मानसतप आणि तृष्णात्याग. **अध्याय २१८–२१९** (पंचशिखजनकसंवाद) आत्मनिरूपण, नास्तिकमतखंडन, पुनर्जन्म आणि परलोकसिद्धि, परब्रह्म-स्थिति. **अध्याय २२०** दमप्रशंसा. **अध्याय २२१** अहिंसादि सदाचार. **अध्याय २२२** (इंद्रप्रल्हादसंवाद) कर्मकर्तृत्व. **अध्याय २२३–२२४** कालाचें अतर्क्य सामर्थ्य. **अध्याय २२५** (इंद्र–लक्ष्मीसंवाद) लक्ष्मीचें चांचल्य. **अध्याय २२६–२२७** (इंद्र-नमुचिसंवाद) संकटांतहि चित्तस्वास्थ्यविचार. **अध्याय २२८** उत्कर्षापकर्षांचीं कारणें. **अध्याय २२९** ब्रह्मपदप्राप्तीचीं साधनें. **अध्याय २३०** सर्वगुणसंपन्न नारदवर्णन. **अध्याय २३१** कालगणना. **अध्याय २३२** सृष्ट्युत्पत्तिविचार. **अध्याय २३३** प्रलयविचार. **अध्याय २३४ २३५** ब्राह्मणांचीं कर्तव्यें आणि संसारसागराचें वर्णन. **अध्याय २३६** सांख्ययोगवर्णन. **२३७** संसारतारकउपाय, आणि शून्यवादादींचें खंडन. **अध्याय २३८** सांख्यसिद्धान्त आणि युगधर्म. **अध्याय २३९** आत्मस्वरूपवर्णन. **अध्याय २४०** योगाचें वर्णन. **अध्याय २४१** ज्ञान-कर्माचें पृथक फल. **अध्याय २४२–२४५** ब्रह्मचर्यादि आश्रमधर्म. **अध्याय २४६–२४७** संक्षेपानें आणि विस्तारानें अध्यात्मकथन. **अध्याय २४८ २४९** मन आणि बुद्धि यांचें स्वरूप आणि ज्ञान्यांची गति. **अध्याय २५०** सर्वश्रेष्ठ धर्म. **अध्याय २५१** ज्ञानी पुरुषाचें वर्णन. **अध्याय २५२–२५३** संक्षिप्त अध्यात्म आणि सूक्ष्मस्वरूपविचार. **अध्याय २५४** इच्छावृक्ष आणि देहनगरी. **अध्याय २५५** पंचमहाभूतें आणि बुद्धीचे गुण. **अध्याय २५६–२५८** मृत्यूची उत्पत्ति आणि वृत्तान्त. **अध्याय २५९** धर्माचें स्वरूप. **अध्याय २६०** धर्मसंबंधीं युधिष्ठिराचे आक्षेप **अध्याय २६१–२६३** (तुलाधारजाजलीकथा) अहिंसाप्रतिपादन आणि यज्ञरहस्यकथन. **अध्याय २६४** श्रद्धाप्रशंसा. **अध्याय २६५** (विचख्नुगीता) हिंसेचें अपरिहार्यत्व. **अध्याय २६६** (चिरकारीकथा) माता–पितरांची योग्यता. **अध्याय २६७** (द्युमत्सेन सत्यवानसंवाद) अहिंसेनें प्रजारक्षण कसें करावें. **अध्याय २६८–२७०** (कपिल स्युमरश्मिसंवाद) श्रेष्ठ आश्रमकथन, सदाचारलक्षण, वेदप्रामाण्य-महति. **अध्याय २७१** (कुंडधारोपाख्यान) तपाचें महत्व. **अध्याय २७२** हिंस्त्रयज्ञनिंदा. **अध्याय २७३–२७४** युधिष्ठिराचे मोक्षविषयक प्रश्न आणि त्याचें उत्तर. **अध्याय २७५** देवल–नारदसंवाद, विश्वोत्पत्तिकथन. **अध्याय**

२७६ ( मांडव्य-जनकसंवाद ) तृष्णाक्षयमहति. **अध्याय २७७** ( पिता-पुत्रसंवाद ) ही मोक्षधर्मपर्वातील दुसऱ्या अध्यायाची पुनरुक्ति आहे. **अध्याय २७८** ( हारीतगीता ) मोक्षसाधनवर्णन. **अध्याय २७९-२८२** शुक्र-वृत्रासुरसंवादकथन आणि वृत्रासुराचें वृत्त. **अध्याय २८३** ज्वरोत्पत्ति. **अध्याय २८४** दक्षकृत महादेवस्तुति. **अध्याय २८५** आत्मानात्मबोध. **अध्याय २८६** ( नारद-समंगसंवाद ) दुःख व मृत्युभय टाळण्याचे उपाय. **अध्याय २८७** ( गालव-नारद संवाद ) शास्त्रमर्यादा. **अध्याय २८८** ( सगर-अरिष्टनेमिसंवाद ) मुक्तलक्षणें. **अध्याय २८९** शुकाचार्यांची कथा. **अध्याय २९०-२९८** ( पराशरगीता ) पापपुण्यविचार, दानवर्णन, वृत्तिविचार, काम-क्रोधनियमन, गृहस्थाचें तप, भिन्नगोत्रें आणि संकरजाती, विशेषधर्म आणि सामान्यधर्म, गतिवर्णन, पराशरगीतासमाप्ति. **अध्याय २९९** ( हंसगीता ) सत्य, दमादींचें वर्णन. **अध्याय ३००** योगवर्णन. **अध्याय ३०१** सांख्यवर्णन. **अध्याय ३०२-३०८** ( वसिष्ठ-कराल-जनकसंवाद ) क्षराक्षर विचार, जीवाचें अज्ञान व त्याचें फल, मायानिवृत्ति योग व सांख्यवर्णन, विद्या व अविद्यालक्षण, क्षराक्षरभेद, विशिष्ट ज्ञानोदय, बुद्ध, अबुद्ध आणि गुणनिधि यांचें वर्णन. **अध्याय ३०९** श्रेयोवर्णन. **अध्याय ३१०-३१८** ( याज्ञवल्क्य-जनकसंवाद ) अष्टविध सृष्टि, कालगणना, जगत्संहार, अध्यात्म, अधिभूत व अधिदैव, प्रकृतीचें स्वर्गादि कर्तृत्व, प्रकृति-पुरुषभेद, योगवर्णन, समाधिस्थाचीं लक्षणें, हठयोग्यांच्या गति, मृत्युचिन्हें, याज्ञवल्क्यजनकसंवादसमाप्ति. **अध्याय ३१९** ( पंचशिखजनक संवाद ) निवृत्ति मार्गानें जन्म-मरणमुक्ति. **अध्याय ३२०** ( सुलभा जनक संवाद ) गृहस्थाश्रमांतच परमपदाची प्राप्ति, मोक्षतत्वविवेक आणि स्थूल-सूक्ष्मदेहांतील संन्यास. **अध्याय ३२१** व्यासांचा शुकाचार्यांस उपदेश, जग आणि परब्रह्म यांचें स्वरूप, नारायणाचें स्वरूप, **अध्याय ३२२** गुरुजनांची सेवा तपश्चर्या आणि दान यांचीं फलें. **अध्याय ३२३** व्यासांचें पुत्रप्राप्त्यर्थ तप. **अध्याय ३२४-३३३** ( शुकाख्यान. ) शुकजन्म, त्याचें ज्ञानप्राप्त्यर्थ जनकाकडे गमन, जनकाचा उपदेश, शुकाचें व्यासांकडे पुनरागमन, वेद शिकविण्यास पात्र कोण ? व्यासकृत वायुवर्णन, नारदांचा शुकास उपदेश, शुकाचा कर्तव्यनिश्चय, त्याची योगधारणा व सिद्धि, शुकाख्यानसमाप्ति.

**अध्याय ३३४-३४६** ( नारायण-नारदसंवाद ) श्वेतद्वीपवर्णन, उपरिचराचें आचरण, पंचरात्रमाहात्म्य, नारायणमाहात्म्य, वसुशाप, नारायणनामस्तोत्र, नारायणांचा उपदेश, नारायणाचें यज्ञ कर्तृत्व आणि यज्ञ भोक्तृत्व, नारायण नामव्युत्पत्ति, श्वेतद्वीपवृत्तांत, नरनारायणांचें नारदाशीं भाषण, पिंडमाहात्म्य आणि नारायणप्रशंसा. **अध्याय ३४७** हयग्रीववर्णन **अध्याय ३४८** सात्वत धर्म. **अध्याय ३४९** सांख्यादि मार्ग आणि व्यासांचें पूर्वजन्म **अध्याय ३५०** ब्रह्मरुद्रसंवाद. **अध्याय ३५१** नारायणमाहात्म्यवर्णन. **अध्याय ३५२-३६५** उञ्छवृत्त्युपाख्यान.

---

राष्ट्रीय कीर्तनकार श्री. वा. शि. कोल्हटकर यांचें

# राष्ट्रीय संग्राह्य वाङ्मय

**कीर्तन मंदाकिनी**—तरंग ४ १-२-०

**चैतन्य ग्रंथमाला**—

१ महाराणा-प्रताप ( उत्कृष्ट चरित्र ) १-४-०

२ राम गीत सुधा (गद्यपद्यात्मक रामायण, भाग १ ला) २-०-०

३ राम गित सुधा ( ,, ,, भाग २ रा ) ३-०-०

४ रूपनगरची राजकुमारी ( चरित्र आणि गीतें ) शिल्लक नाहीं ०-८-०

५ सम्राट् सुभाष (आवृत्ति २ री) ,, ,, ०-१०-०

६ सुलभ कीर्तन-संग्रह ०-८-०

७ धर्मचैतन्य शिक्षण ( पुस्तक १ लें ) आवृत्ति ४ थी ०-८-०

८ धर्मचैतन्य शिक्षण ( पुस्तक २ रें ) १-८-०

९ विदुराची अभंग-नीति ०-८-०

१० अभंग-गीता ( गीतेचें अभंगमय रूपांतर ) ०-८-०

११ अभंग-भारत ( खंड १ ला ) ५-०-०

१२ ,, ,, ( खंड २ रा ) ७-८-०

१३ ,, ,, ( खंड ३ रा ) ७-८-०

१४ ,, ,, ( खंड ४ था ) ७-८-०

१५ पुढील ५ वा खंड शके १८७६ मधें प्रसिद्ध होईल. ७-८-०

पत्ता—**व्यवस्थापक, धर्मचैतन्य संस्था,**
सदाशिव पेठ, पुणें २.

अभंग–भारत खंड ३ रा प्रकाशन समारंभ, दिल्ली.



(१) अभंग–गायन व (२) ग्रंथास सुवर्णपुष्प–समर्पण.



ग्रंथकर्त्यांचा सत्कार.

— ॐ नमो भगवते वासुदेवाय —

# अभंग-भारत

( महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ )

## १२ शांतिपर्व

### राजधर्मपर्व १

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ १ ॥

अध्याय १ ला अभंग १ ला

नर-नारायण व्यास सरस्वती । वंदूनि कार्यासी आरंभीन ॥ १ ॥
वैशंपायनाची पुण्यमयी वाणी । ऐकेल तो जनीं भाग्यवंत ॥ २ ॥
पंडुनंदन तैं विदुर, धृतराष्ट्र । स्त्रियाहि समस्त भारतांच्या ॥ ३ ॥
आप्तांतें तर्पूनि वीर एक मास । राहिले शुध्यर्थ कुरुक्षेत्रीं ॥ ४ ॥
कृतोदक धर्मा ब्रह्मर्षिसत्तम । भेटती येऊन महाभाग ॥ ५ ॥
व्यास, नारदादि गृहस्थ, स्नातक । जाहले सत्कृत समस्तहि ॥ ६ ॥
नारद त्यावेळीं बोलले धर्मासी । राया, भाग्यराशी विक्रमी तूं ॥ ७ ॥
कृष्णाच्या प्रसादें लाभला विजय । आतां शोक लव असेना कीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे नम्र युधिष्ठिर । देई प्रत्युत्तर ऐका काय ॥ ९ ॥

२

कृष्णकृपा तेंवी विप्रांचा प्रसाद । भीमासवें पार्थपराक्रम ॥ १ ॥
जिंकिली त्या योगें अवनीही परी । दुःखचि अंतरीं सर्वकाल ॥ २ ॥
ज्ञातिक्षय तेंवी सर्वपुत्रनाश । टोंची अंतरास सर्वकाल ॥ ३ ॥
विजयही पराजय हा जाहला । काय सुभद्रेला कथिल कृष्ण ॥ ४ ॥
अन्यही हृदयीं शल्य सले माझ्या । वृत्तांत कर्णाचा ऐकूनियां ॥ ५ ॥
तर्पणसमयीं कथिला मातेनें । व्याकुळ दुःखानें जाहलों तें ॥ ६ ॥
कुंतीसम त्याचे पाहतां चरण । साशंकित मन होई बहु ॥ ७ ॥
पाहतां तयासी क्रोध शांत होई । येईनाचि कांहीं परी ध्यानीं ॥ ८ ॥
ग्रासिलें भूमीनें कैसें रथचक्र । वृत्तांत समग्र निवेदावा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ज्ञात्यांलागीं धर्म । करीतसे प्रश्न ऐसा प्रेमें ॥ १० ॥

इतिश्री वासुदेवकृत अभंग-भारतान्तर्गत शांतिपर्वांतील
राजधर्मपर्वाचा १ ला अध्याय समाप्त

अध्याय २ रा

३

वदती नारद धर्मासी । कथितों वृत्तांत तुजसी ॥ १ ॥
कैसा स्वर्ग क्षात्रधर्में । दावियेलें तेंचि कर्णें ॥ २ ॥
हेतु देवांचा हा गूढ । कर्ण-दुर्योधनसख्य ॥ ३ ॥
स्वभावेंचि द्वेष्टा होई । पार्थबल ध्यानीं येई ॥ ४ ॥
मागे द्रोणासी ब्रह्मास्त्र । म्हणती तुज हें अशक्य ॥ ५ ॥
विप्र, क्षत्रिय व्रतस्थ । ब्रह्मास्त्रासी तेचि योग्य ॥ ६ ॥
ऐकूनि तें भार्गवासी । कर्ण जाऊनियां वंदी ॥ ७ ॥
मिथ्याचि मी म्हणे विप्र । देवा, माझें भृगुकुल ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कर्णा । देई भार्गव अनुज्ञा ॥ ९ ॥

४

अस्त्रविद्येमाजी नैपुण्य पावला । देवादिकां झाला प्रिय कर्ण ॥ १ ॥
पुढती एकदां असतां बेसावध । विप्रधेनुवत्स वधिलें कर्णें ॥ २ ॥
पाहूनि तें विप्र होऊनियां क्रुद्ध । देई घोर शाप कर्णाप्रति ॥ ३ ॥
वधार्ह तूं दुष्टा करिसी ज्याची स्पर्धा । तयासवें युद्धा सिद्ध होतां-॥४॥

ग्रासील अधमा, भूमी रथचक्र । तदा शिरच्छेद जाण तुझा ॥ ५ ॥
संतोषार्थ करीं तया बहु दान । विप्राचें वचन अटळ परी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कर्ण भयाभीत । गेला आश्रमांत तयोत्तरीं ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांतिपर्वांतील राजधर्मपर्वाचा २ रा अध्याय समाप्त

अध्याय ३ रा

५

मुनि म्हणे राया, बाहुवीर्य, प्रेम । इंद्रियदमन, शुश्रूषा ते ॥ १ ॥
पाहूनि भार्गव संतुष्ट चित्तेंसी । ब्रह्मास्त्र कर्णासी अर्पीतसे ॥ २ ॥
पुढती एकोदनीं कर्णाङ्कीं मस्तक । ठेऊनि निद्रिस्थ परशुराम ॥ ३ ॥
अलर्कनामें तैं घोर कृमि एक । फोडूनियां अंक रुधिर काढी ॥ ४ ॥
परी गुरुनिद्रा न भंगो म्हणूनि । राही उपेक्षूनि कर्ण शांत ॥ ५ ॥
साहूनि वेदना राहियेला स्वस्थ । करी रुधिरस्पर्श भार्गवासी ॥ ६ ॥
सहजाचि तदा जागृति तयासी । पाहूनि अशुचि झालों म्हणे ॥ ७ ॥
कर्णा, काय ऐसें करितोसि कर्म । वृत्त निवेदन कर्ण करी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भार्गवें देखिला । कृमि, तदा गेला प्राण त्याचा ॥ ९ ॥

६

विस्मयांत तया विस्मय जाहला । राक्षस देखिला गगनीं एक ॥ १ ॥
जोडूनियां कर भार्गवासी बोले । मज उद्धरिलें विप्रश्रेष्ठा ॥ २ ॥
जाहलों मी मुक्त करितों प्रणाम । असावें कल्याण सदा तव ॥ ३ ॥
राम म्हणे दैत्या, कोण तूं कां एथें । दैत्य म्हणे मातें दंश नाम ॥ ४ ॥
हरिलें मी पूर्वी भृगूच्या पत्नीसी । शापें त्याच्या ऐसी कृमिदशा ॥
उःशाप मागतां मुनि म्हणे राम । तारक तो जाण तुजप्रति ॥ ६ ॥
शापमुक्त आजि जाहलों म्हणूनि । राक्षस निघूनि जाई सौख्यें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे क्रुद्ध परशुराम । साशंक होऊन वदला ऐका ॥ ८ ॥

७

मूढा, हें विप्रासी असह्याचि दुःख । सांगें आतां स्पष्ट असशी कोण ॥
कंपित तैं कर्ण जोडूनियां कर । बोले सूतपुत्र जाणें मज ॥ २ ॥
अस्त्रलोभें ऐसा झाला अपराध । गुरूचेंचि गोत्र शिष्याप्रति ॥ ३ ॥
पितृभाव त्याचा मानूनि कथिलें । बोलूनि घातलें लोटांगण ॥ ४ ॥

परी क्रुद्ध राम बोलला तयासी । होईल विस्मृति काळ येतां ॥ ५ ॥
अन्य वेळीं कोणी तुजसम योद्धा । नसे जाई आतां सत्यभ्रष्टा ॥ ६ ॥
ऐकूनि तें कर्ण वंदूनि विप्रासी । गेला स्वस्थानासी हृष्टचित्तें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दुर्योधनाप्रति । सांगे ब्रह्मास्त्राची प्राप्ति मज ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ३ रा अध्याय समाप्त

अध्याय ४ था ८

पुढती एकेवेळीं कालिंगाधिपती । स्वयंवर योजी स्वकन्येचें ॥ १ ॥
शिशुपाल जरासंधादि नृपाळ । जाहले एकत्र तयास्थानीं ॥ २ ॥
मालाधारी कन्या दुर्योधनाप्रति । लंघूनि पुढती जाऊं लागे ॥ ३ ॥
तदा दुर्योधन हरूनि तिजसी । बैसे रथामाजी महाधैर्यें ॥ ४ ॥
अंगावरी वीर धांवतां असंख्य । निवारी तयांस कर्ण तदा ॥ ५ ॥
कर्णपराक्रमें सकळ घायाळ । होई पळापळ रणामाजी ॥ ६ ॥
कर्णसंरक्षित दुर्योधन हर्षें । हस्तिनापुरातें सौख्यें जाई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीष्म, द्रोण, कर्ण । आधार हा जाण धार्तराष्ट्रा ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ४ था अध्याय समाप्त

अध्याय ५ वा ९

पुढती आव्हान देई जरासंध । झालें घोर युद्ध तयावेळीं ॥ १ ॥
पराक्रम त्याचा पाही जरासंध । करूनियां सख्य संतोषला ॥ २ ॥
मालिनीनगर अर्पूनि तोषवी । चंपापुरीं जाई कर्ण सौख्यें ॥ ३ ॥
सहज कवच-कुंडलें इंद्रानें । हरिलीं, विप्रानें शापियेलें ॥ ४ ॥
रामाचा तो शाप कुंतीचें वचन । समई दारुण तेजोभंग ॥ ५ ॥
ब्रह्मसुत म्हणे धर्मा, हीं कारणें । कर्णवध तेणें सहज होई ॥ ६ ॥
यास्तव नृपाळा, न करीं तूं शोक । होणारें ब्रह्मयास न टळे कदा ॥७॥
वासुदेव म्हणे नारदाची वाणी । यापरी ऐकूनि धर्म दुःखी ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ५ वा अध्याय समाप्त

अध्याय ६ वा १०

देवर्षीचें वाक्य ऐकूनि राजर्षि । शोकाकुल चित्तीं होई बहु ॥ १ ॥

कुंती म्हणे बाळा, शोक न करावा । लोभ न बांधवावरी धरीं ॥ २॥
स्वप्नामाजी तेंवी प्रत्यक्ष सूर्यानें । मज कथीयेलें वहुत राया ॥ ३ ॥
कालवश अंतीं जाणूनि, उपेक्षा । केली शोक ऐसा न करीं बाळा ॥४॥
धर्म म्हणे माते, तुझा गूढमंत्र । करितो संत्रस्त मजलागीं ॥ ५ ॥
अद्यप्रभृति या स्त्रियांसी अशक्य । होवो मंत्र गुप्त संरक्षणें ॥ ६ ॥
मृत पुत्र-पौत्र स्मरूनियां धर्म । जाहला उद्विग्न मनामाजी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अग्नि धूमयुक्त । तैसा खिन्न चित्त होई धर्म ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ६ वा अध्याय समाप्त

अध्याय ७ वा

११

शोकव्याप्त धर्म बोले अर्जुनासी । भैक्ष्यचि आम्हांसी सौख्यद तें ॥१॥
ज्ञातिनिर्वंशें या पावलों दुर्गति । वीर ते यद्यपि स्वर्गी गेले ॥ २ ॥
धिक्कार आमुच्या असो क्षात्रकर्मा । राज्यलोभ आम्हां भोंवला हा ॥
पाहूनि हा नाश त्रैलोक्याचें राज्य । लाभतांहि सौख्य अशक्याचि ॥
आचरूनि तप व्रत उपोषणें । इच्छिती संतानें सौख्यास्तव ॥ ५ ॥
परी या संहारें केला आशाभंग । गांधारी धृतराष्ट्र मूळ याचें ॥ ६ ॥
अभिलाष, दैन्य, क्रोध तें आनंद । विषयांचा छंद धरितां होती ॥७॥
वासुदेव म्हणे आसक्त नरासी । कदा सौख्यप्राप्ती घडेचिना ॥ ८ ॥

१२

दुर्योधनाचें हें शाठ्य । बाधा करी जगतास ॥ १ ॥
कपटें त्या उभयांसी । लेशाही न सौख्यप्राप्ति ॥ २ ॥
होतां उत्कर्ष आमुचा । व्यर्थ दुःख त्याच्या चित्ता ॥ ३ ॥
ऐकिला न पुण्यबोध । लोभवश झाला वृद्ध ॥ ४ ॥
अंतीं परिणाम ऐसा । नाश जाहला उभयांचा ॥ ५ ॥
विजयलाभें शमला क्रोध । आतां असह्य हा शोक ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्म । वदे ऐसा शोकमग्न ॥ ७ ॥

१३

पार्था, पापनाश होई सत्कर्मानें । अनुतापें दानें कथनें तेंवी ॥ १ ॥
संन्यास कीं तप अथवा तीर्थाटन । शास्त्राचें चिंतन साधनें हीं ॥२॥

संन्यासेंचि मुक्ति ऐसें श्रुतिवाक्य । पार्था, मी निरोप घेतों आतां ॥३॥
परिवारामाजी यथासाङ्ग धर्म । न घडे जाणून वनीं जातों ॥ ४ ॥
मोक्षसाधन तें ज्ञान तेणें नरा । आधार अंतरा श्रुतिवाक्य ॥ ५ ॥
पार्था, सर्वत्यागें जातों मी वनांत । घेंई उपभोग साम्राज्याचा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि अर्जुन । बोलला वचन काय ऐका ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ७ वा अध्याय समाप्त

अध्याय ८ वा

१४

पार्थ म्हणे राया, अमानुष कर्म । शत्रु निर्दलनें राज्यलाभ ॥ १ ॥
क्षत्रियांचा धर्म आचरूनि, व्यर्थ । कां आतां विरक्त होसी राया ॥२॥
क्रोधें नृपाळांचा वध कां केलासी । विवेक त्यागिसी आतां कैसा॥३॥
अप्रसिद्ध, दीन, परिवारहीन । वैभवा त्यागून भैक्ष्य वरीं ॥ ४ ॥
भाग्यवंता, तुज नसेचि तें योग्य । धर्म-अर्थ-त्याग मूढत्व हें ॥ ५ ॥
तुजवीण मत्त होतील दुर्जन । अधिकचि जाण पाप तेणें ॥ ६ ॥
दारिद्र्यधिक्कार केला नहुषानें । मुनि दारिद्र्यानें ग्रस्त सदा ॥ ७ ॥
सकल धर्माचें मूळ एक द्रव्य । म्हणे वासुदेव पुढती ऐका ॥ ८ ॥

१५

हरण करितां कोणी धन । हरिला तेणें म्हणती धर्म ॥ १ ॥
धनहीन तो पातकी । मानूनि त्या अवलोकिती ॥ २ ॥
राया, दारिद्र्य तें पाप । त्याची प्रशंसा ते व्यर्थ ॥ ३ ॥
पापी, दरिद्रि यांमाजी । भेद न दिसे मजसी ॥ ४ ॥
गिरीपासूनि सरिता । कर्ममार्ग तैं धनाचा ॥ ५ ॥
धर्म, काम, स्वर्गप्राप्ति । द्रव्याधीनचि या लोकीं ॥ ६ ॥
द्रव्यहीन सकल क्रिया । त्वरित पावती विलया ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे द्रव्य । म्हणती सौख्य एकमेव ॥ ८ ॥

१६

द्रव्यवंता मित्र, द्रव्यवंता आप्त । सकल पुरुषार्थ द्रव्याधीन ॥ १ ॥
पांडित्य, पौरुष तेंही द्रव्यवंता । द्रव्यावीण हाता न ये कांहीं ॥ २ ॥
गजावीण नोहे गजाचें बंधन । तैसें धनाधीन धन जनीं ॥ ३ ॥

द्रव्यवंतालागीं कुलीनता येई । धर्मवृद्धी नाहीं द्रव्याविण ॥ ४ ॥
निर्धनासी इहपरही न साधे । कृश तोचि ज्याचें द्रव्य क्षीण ॥ ५ ॥
संपादूनि ज्ञान द्रव्यही जोडावें । पुण्य आचरावें म्हणती वेद ॥ ६ ॥
देवादिक तेही गेले याचि पंथें । धर्म क्षत्रियांतें हाचि थोर ॥ ७ ॥
सिंधूपासूनियां सर्वत्र जें जल । तैसें राजकुल द्रव्याधार ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मार्ग हा विस्तीर्ण । लाभे न त्यागून पार्थ म्हणे ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ८ वा अध्याय समाप्त

अध्याय ९ वा

१७

धर्म म्हणे पार्था, एकाग्रचित्तेंसी । ऐकतां तुजसी रुचेल हें ॥ १ ॥
ग्राम्य सुखत्यागें साधूंचाचि मार्ग । स्वीकारूनि तप आचरीन ॥ २ ॥
कंदमुळें तेंवी वल्कलें अजिनें । तापस वृत्तीनें राहीन मी ॥ ३ ॥
साहूनियां द्वंद्वें होईन मी कृश । ऐकेन तो शब्द पशु-पक्ष्यांचा ॥ ४ ॥
हृदयहारी तो सुगंध वेलींचा । दर्शनें मुनींच्या आनंदेन ॥ ५ ॥
पक्वापक्व अन्नें करीन निर्वाह । भूतांचें अप्रिय त्याज्य सदा ॥ ६ ॥
एकांतीं राहूनि करीत चिंतन । नित्य तोषवीन पितर देवां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे करूनि मुंडन । स्वीकारीन वन धर्म म्हणे ॥ ८ ॥

१८

होऊन संन्यासी तरुतळीं वास । करीन, मी हर्ष शोकहीन ॥ १ ॥
तुल्य निंदास्तुति, अंध, बधिर, मूक । नित्य निरपेक्ष राहीन मी ॥ २ ॥
निर्वाहाची चिंता नसे मजलागीं । दैवाधीन जगीं अन्नवस्त्र ॥ ३ ॥
इष्टानिष्ट किंवा अत्यल्प विपुल । अन्न जें लाभेल सेवीन तें ॥ ४ ॥
भोजनादि विधि आटोपेल जेथें । जाईन भिक्षेतें तयास्थानीं ॥ ५ ॥
एक, दोन, पांच, सातचि गृहांत । लाभे तेणें तृप्त होईन मी ॥ ६ ॥
जीवित मरण मानूनि मी सम । द्वेष, अभिनंदन त्याज्य मज ॥ ७ ॥
छेदितां हस्त कीं चंदन चर्चितां । राखीन शांतता सर्वकाळ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐका हीं लक्षणें । केवळ चिंतनें लाभ घडे ॥ ९ ॥

१९

अभ्युदयइच्छा सर्वथा त्यागीन । स्वाभाविक कर्म घडो कांहीं ॥ १ ॥

आंतरिक क्रिया ठेवीन स्वाधीन । पातकक्षालन जेणें घडे ॥२॥
सर्वसंगयुक्त सर्वदा स्वतंत्र । करीन संचार वायूसम ॥३ ॥
रागलोभत्यागें अक्षय्य संतोष । अज्ञानें हें पाप घडलें थोर ॥ ४ ॥
अपार संसारीं जन्म मृत्यु जरा । त्यागावीण नरा सौख्य कैचें ॥ ५ ॥
देव ऋषि जरी पावती पतन । वैभवाचे यत्न व्यर्थ न कीं ॥ ६ ॥
क्षुद्र लाभास्तव सामदानादिक । आचरिती नृप सर्वकाळ ॥ ७ ॥
महद्भाग्यें आजी ज्ञान हें जाहलें । अमृतचि आलें सहज करीं ॥८॥
आतां तरी नित्य अचल तें स्थान । संपादूनि जन्ममरण टळो ॥९॥
वासुदेव म्हणे देहाचें सार्थक । करावया सिद्ध धर्म होई ॥ १० ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ९ वा अध्याय समाप्त

## अध्याय १० वा

२०

भीम म्हणे राया, घोंकूनियां वेद । जैंवी मतिमंद विप्र कोणी ॥ १ ॥
अर्थज्ञानशून्य जडभाव धरी । बुद्धि नष्ट झाली तैसी तव ॥२॥
आलस्योंचि जया राजधर्मद्वेष । विजयें तयास काय लाभ ॥ ३ ॥
दया, क्षमा, नित्य कारुण्य न कोणा । तुजवीण अन्या नृपालागीं॥४॥
निश्चय हा तुझा कळता जरी आम्हां । तरी सिद्ध रणा न होतोंचि ॥५॥
भैक्ष्य स्वीकारूनि कंठितां आयुष्य । ऐसा हा अनर्थ घडताचि ना॥६॥
स्थावर-जंगम प्राणाचें हें भक्ष्य । मानिताति नित्य श्रेष्ठ ज्ञाते ॥७॥
राज्यविघातकां वधावें हा धर्म । जाणूनि हें कर्म घडलें थोर ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीमाची हे मति । ऐकावी पुढती दक्षतेनें ॥ ९ ॥

२१

राजा, न्याय्यप्राप्त राज्य । घेईं तयाचा उपभोग ॥ १ ॥
कूप खणतां खणतां पंक । लिप्त होतां सर्वांगास ॥ २ ॥
जलावीण त्यागूनियां । जावें तैसीचि हे क्रिया ॥ ३ ॥
मधु महायत्नसाध्य । संपादावा करूनि कष्ट ॥ ४ ॥
परी प्राशिल्यावांचूनि । जावा प्राण जैं निघूनि ॥ ५ ॥
अथवा वधूनि शत्रूसी । आत्मवध व्हावा अंतीं ॥ ६ ॥
क्षुधितासी मधुर अन्न । लाभतांचि यावें विघ्न ॥ ७ ॥

तैसी आमुची हे गति । दोष आमुच्याचि माथीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीम । करी स्पष्ट निवेदन ॥ ९ ॥

२२

ज्येष्ठ बंधुभावें मानियेलें तुज । परी नेता क्लीव लाभला हा ॥ १ ॥
सर्वसमर्थहि असूनियां आम्हीं । ऐशापरी जनीं दीन झालों ॥ २ ॥
इतरेजनांनीं काय घ्यावा बोध । राया, हें सहज ध्यानीं आणीं ॥ ३ ॥
वृद्ध आपद्ग्रस्त वरिती संन्यास । शूर क्षत्रियास योग्य न तो ॥ ४ ॥
क्षत्रियचि जरी क्षात्रधर्मनिंदा । करितां विधाता कां न दोषी ॥ ५ ॥
केवळ संन्यास मुक्तीचें कारण । मानिती निर्धन बुद्धिमंद ॥ ६ ॥
हरिण वराह पाहिले न मुक्त । तेंवी गिरिश्रेष्ठ केवळ जड ॥ ७ ॥
परिवारशून्य एकाकी विहार । मृत्यूचेंचि द्वार जाण वन ॥ ८ ॥
आत्मपोषणीं ते रत मत्स्य, वृक्ष । कदाही न मोक्ष परी तयां ॥ ९ ॥
राया, अवलोकीं विश्व कर्मरत । नसे कर्मभ्रष्ट मुक्त कोणी ॥ १० ॥
वासुदेव म्हणे भीमाचा आशय । निजधर्मीं जय सर्वकाळ ॥ ११ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १० वा अध्याय समाप्त

अध्याय ११ वा

२३

पुनरपि पार्थ बोले धर्माप्रति । मुनिपुत्रां पक्षी बोध करी ॥ १ ॥
कुलीन अजातश्मश्रु[1] विप्रसुत । संन्यासचि श्रेष्ठ म्हणती कोणी ॥ २ ॥
त्यागूनियां गेले मातापितरांसी । पक्षीरूपें त्यांसी इंद्र भेटे ॥ ३ ॥
विघसाशी तोचि धन्य म्हणे पक्षी । वाटे त्या मूढांसी स्तवितो आम्हां
पक्षी म्हणे तुम्हीं उच्छिष्ट भक्षक । रजोगुणव्याप्त महापापी ॥ ५ ॥
मुनि म्हणती हा सर्वश्रेष्ठ धर्म । मानितों याहून श्रेष्ठ काय ॥ ६ ॥
पक्षी म्हणे हित कथीन मी जरी । शंका न अंतरीं तुम्हालागीं ॥ ७ ॥
पक्ष्यालागीं मुनि बोलती सर्वज्ञा । योग्य मार्ग आम्हां दावीं श्रेष्ठा ॥८॥
पक्षी म्हणे धेनु पशूंमाजी श्रेष्ठ । कांचनचिश्रेष्ठ लोहांमाजी ॥ ९ ॥
मानवांत विप्र वरिष्ठ तो जाणा । वेदोक्त सत्कर्मा आचरी जो ॥ १० ॥
वासुदेव म्हणे इंद्र मुनींप्रति । कर्माची महति कथन करी ॥ ११ ॥

---

१ मिशा न फुटलेले

२४

पक्षी म्हणे देवयान, पितृयान । ब्रह्ममार्ग जाण श्रेष्ठ पंथ ॥ १ ॥
उपासना ऐशा त्रिविध या लोकीं । अविरोधें त्यांसी गुरुशुश्रूषा ॥ २ ॥
ऐसें हे दुष्कर आचरी जो कर्म । तोचि जगीं धन्य कर्मरत ॥ ३ ॥
वेदाविहित हा आश्रम वरिष्ट । आधार गृहस्थ सर्वांलागीं ॥ ४ ॥
मूर्तिमंत तप गृहस्थआश्रम । भुक्तशेष अन्न विघस तोचि ॥ ५ ॥
स्वधर्मानिष्ठ ते गुरु सकलांचे । कैंवी गृहस्थातें न कळे वर्णू ॥ ६ ॥
निःशंक निर्द्वंद्व वंद्य देवादिकां । वास नित्य त्यांचा स्वर्गामाजी ॥ ७ ॥
गृहस्थाचा ऐसा महिमा ऐकूनि । आग्रह त्यजूनि विप्र गेले ॥ ८ ॥
गृहस्थआश्रमें पावले ते सौख्य । नृपा, करीं राज्य तूंही तैंवी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे पार्थ धर्माप्रति । विनवी ऐशा रीति तयावेळीं ॥ १० ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ११ वा अध्याय समाप्त

अध्याय १२ वा

२५

विशालवक्ष तो आरक्त वदन । नकुल भाषण करी ज्ञानी ॥ १ ॥
विशाखयूप त्या क्षेत्रीं महाराजा । प्रत्यय देवांच्या सत्कर्मांचा ॥ २ ॥
अग्निस्थापनार्थ स्थंडिलें त्या स्थानीं । तेणें येई ध्यानीं कर्मप्रीति ॥३॥
वृष्टिद्वारा अन्न देती जे सकळां । विधि त्या पितरां मान्य बहु ॥ ४ ॥
वेदोक्त विधीचा करिती जे त्याग । जाण ते नास्तिक महा दोषी ॥५॥
कर्मत्यागें देवयान पंथ नष्ट । न लाभेचि स्वर्ग तया नरा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वेदसिद्धांतज्ञ । गृहस्थ आश्रम म्हणती श्रेष्ठ ॥ ७ ॥

२६

गृहस्थाश्रमींचें त्यागूनियां सुख । वरिती संन्यास तामस ते ॥ १ ॥
अनिकेत, भिक्षु, अयाचक, योगी । वृक्षाश्रित, त्यागी तोचि राया ॥२॥
हर्ष, शोक, मुख्य पैशुन्य न ज्यासी । तयाही विप्रासी म्हणती त्यागी ॥
सकल आश्रम तुळितां गृहस्थ । आश्रमचि श्रेष्ठ निश्चय हा ॥ ४ ॥
इहपर येणें साध्य सकलांसी ॥ जाणें तोचि त्यागी राजश्रेष्ठा ॥ ५ ॥
जाणूनि हें ज्ञाते वरिती हा पंथ । व्यर्थ काननांत जाती मूढ ॥ ६ ॥
काननीं स्मरण होतां कामिनीचें । तत्काळ तयातें यमपाश ॥ ७ ॥

अभिमानशून्य श्रेष्ठ तो गृहस्थ । अभिमानें कष्ट सकळांसी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शम, दम, धैर्य । पावित्र्यादि प्रिय धर्म श्रेष्ठां ॥ ९ ॥

२७

गृहस्थासी प्राप्त एथेंचि त्रिवर्ग । यज्ञार्थचि जग निर्मी ब्रह्मा ॥ १ ॥
राया, हा गृहस्थ नित्य यज्ञमय । पापाचें वास्तव्य अयज्ञांत ॥ २ ॥
अध्ययन, ज्ञान, मानसिक यज्ञ । आचरितां पुण्य गृहस्थांसी ॥ ३ ॥
सदक्षिणयज्ञ त्यागूनि कां राया । प्रलाप हे वायां काढितोसी ॥ ४ ॥
राजसूय अश्वमेधादि अनेक । आचरीं पुण्यद यज्ञ राया ॥ ५ ॥
अनवधानानें तस्कर प्रजेसी । लुटितां रायासी दोष बहु ॥ ६ ॥
राजकलि आम्हीं होऊं अयज्ञानें । ऐशा संन्यासानें काय लाभ ॥ ७ ॥
अंतर्बाह्य त्यागें सिद्ध होई त्याग । दोषयुक्तमार्ग राया, तव ॥ ८ ॥
राजधर्मवेत्ता महाप्राज्ञ कोण । करील दारुण शोक ऐसा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे नकुल रायासी । म्हणे अवनीसी संरक्षावें ॥ १० ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १२ वा अध्याय समाप्त

अध्याय १३ वा

२८

सहदेव म्हणे राया । बाह्य त्याग जाई वायां ॥ १ ॥
वासनेचा घडतां त्याग । जवळी येई मोक्षमार्ग ॥ २ ॥
परित्यक्तही वासना । कदा ग्रासील कळेना ॥ ३ ॥
अतिचंचल हें मन । साधकासी फसवी जाण ॥ ४ ॥
बाह्य त्यागाचा आनंद । न घडो वैरियांसी नित्य ॥ ५ ॥
नित्य निर्वासनचित्तें । आम्हीं संरक्षूं अवनीतें ॥ ६ ॥
'मम' हाचि साक्षात् यम । ब्रह्म प्रत्यक्ष 'न मम' ॥ ७ ॥
वसती एका ठाईं दोन्हीं । जाणील तो धन्य जनीं ॥ ८ ॥
गुप्तरूपें करूनि वास । झुंजविती ते प्राण्यास ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे बोध । तारक हा सकलां नित्य ॥ १० ॥

२९

नित्य जीवाचें या अनित्य शरीर । संहारितां घोर पाप काय ॥ १ ॥
शरीरासवें या प्राणाची उत्पत्ति । नाशही तयासी तयासवें ॥ २ ॥

प्राणनाशें कर्ममार्गेंही निष्फळ । जीवित विफल प्राप्तत्यागें ॥ ३ ॥
साम्राज्याधिपाति वनामाजी जातां । मोक्षश्री न हाता येई त्याच्या ॥४॥
राहूनियां वनीं जया द्रव्यासक्ति । मृत्युमुखीं त्याची वसती जाणा ॥५॥
अंतर्बाह्य एक नारायणरूप । पाहीं, भयमुक्त तोचि सदा ॥ ६ ॥
पिता, माता, गुरु, सर्वस्व तूं माझें । बोललों हें दुःखें क्षमा करीं ॥७॥
कथिलें तयाचा तूंचि घे निर्णय । कथी वासुदेव सहदेवोक्ति ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १३ वा अध्याय समाप्त

अध्याय १४ वा ३०

भ्रात्यांचें हें ऐसें ऐकूनि वचन । न बोलेचि धर्म कांहीं एक ॥ १ ॥
तयावेळीं साध्वी श्रेष्ठकुलोत्पन्ना । कमललोचना कृष्णा बोले ॥ २ ॥
संहारूनि शत्रु करितां महायज्ञ । क्लेश हे दारुण विसरूं सर्व ॥ ३ ॥
राया, द्वैतवनीं बांधवांसी ऐसें । वदलासी त्याचें स्मरण करीं ॥ ४ ॥
धन, मान, राज्य न रुचे क्लीबासी । त्यागूनि तयासी पुत्र जाती ॥ ५ ॥
दंडावीण जनीं क्षत्रिय शोभेना । प्रजा दंडाविना अस्वाधीन ॥ ६ ॥
दंडावीण नसे भूमीचें पालन । सौख्य दंडावीण नसे जनीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राजधर्माधीन । सकलहि धर्म जगामाजी ॥ ८ ॥

३१

सर्वभूतमैत्री दान, अध्ययन । तपादिक धर्म श्रेष्ठ विप्रा ॥ १ ॥
दुर्जनसंहार सज्जनरक्षण । समरीं अपलायन धर्म वीरां ॥ २ ॥
क्षमा, क्रोध, दानादान, भयाभय । निग्रहानुग्रह वसती जेथें ॥ ३ ॥
उभयहि जाणें समयानुरूप । धर्मज्ञ तो श्रेष्ठ राया, जनीं ॥ ४ ॥
श्रुत, दान, इज्या, याचना कीं साम । राज्याचें साधन नसे तप ॥ ५ ॥
साक्षात्संगरांत संहारूनि वैरी । जिंकिली धरित्री राजश्रेष्ठा ॥ ६ ॥
जंबु-क्रौंच-शाकद्वीपा वसुंधरा । लंघूनि सागरा मेळविली ॥ ७
वासुदेव म्हणे द्रौपदीची वाणी । असोंद्यावी ध्यानीं सर्वकाळ ॥ ८ ॥

३२

याज्ञसेनी म्हणे धर्मा । सुखवीं विक्रमी बांधवां ॥ १ ॥
सासूबाई त्या सर्वज्ञ । वदल्या भाग्यवंत धर्म ॥ २ ॥

सुख देईल सकळां । आठवीं त्या मातृबोला ॥ ३ ॥
सुखास्तवचि त्या रणीं । वधिले असंख्य नरमणी ॥ ४ ॥
मोहमग्न होतां राव । प्रयत्न ते व्यर्थ सर्व ॥ ५ ॥
ऐसा नेता ज्यांचा भ्रांत । भ्रांत वीर ते समस्त ॥ ६ ॥
धूप, अंजन, नस्यादि । करूनि येवो तुज शुद्धि ॥ ७ ॥
वीर नसते हे भ्रांत । तरी बांधूनियां तुज ॥ ८ ॥
राज्य करिते आनंदानें । कथितें हें खिन्नमनें ॥ ९ ॥
पूर्वपूर्व थोर राजे । गेले जाई त्याचि मार्गें ॥ १० ॥
वासुदेव म्हणे कृष्णा । विनवी राज्य करीं धर्मा ॥ ११ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १४ वा अध्याय समाप्त

## अध्याय १५ वा

३३

घेऊनि अनुज्ञा पुनरपि पार्थ । बोलला रायास धैर्यवंत ॥ १ ॥
प्रजाशासन हा करीं एक दंड । संरक्षण दंड करीं एक ॥ २ ॥
सकल निद्रिस्थ असतां तो जागे । दंडचि हा ज्ञाते म्हणती धर्म ॥ ३ ॥
धर्म, अर्थ, काम संरक्षी हा दंड । त्रिवर्ग हा दंडरूप जाण ॥ ४ ॥
धनधान्य रक्षी दंडचि या लोकीं । स्वीकारीं ते शक्ति सुखवीं लोकां ॥५॥
राजदंड कोणा, कोणा यमदंड । कोणा परलोक भयद वाटे ॥ ६ ॥
परस्पर भय अथवा कोणासी । रक्षी पुण्यमार्गीं जनीं सदा ॥ ७ ॥
भयावीण जनीं नसे सत्प्रवृत्ति । जगीं दंडशक्ति उद्धारक ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दंडशक्तीवीण । करितील भक्षण परस्परां ॥ ९ ॥

३४

दमन दंडनें नाम त्यासी दंड । विप्र वाचादंड वीरां भुजा ॥ १ ॥
दानदंड वैश्य शूद्र दंडहीन । सेवामय जाण शासन त्यां ॥ २ ॥
मोहमग्न जनां लावूनि मर्यादा । संरक्षी जगता तोचि दंड ॥ ३ ॥
शाम, लोहिताक्ष दंड जैं उद्यत । नियंताही दक्ष, सौख्य तेथें ॥ ४ ॥
ब्रह्मचारी, गृही, भिक्षु, वानप्रस्थ । स्वस्वकर्मीं रत दंडभयें ॥ ५ ॥
यज्ञदानादिकां दंडचि कारण । यश कीर्ति धन दंडें लाभे ॥ ६ ॥

दुर्जनांचा शास्ता तोचि वंद्य होई । इंद्र, अग्नि पाहीं सकल ऐसे ॥७॥
वासुदेव म्हणे पहा मत्स्यघाती । अपार संपत्ती पावे जनीं ॥ ८ ॥

३५

अहिंसक कोणी नाहींचि याजनीं । जीवांसी भक्षूनि वसती जीव ॥१॥
मूषकां नकुल, मार्जार नकुलां । तया श्वान, तयां व्यालमृग[1] ॥ २ ॥
मानव भक्षिती सकलांसी राया । ऐसे जीवजीवां भक्षिताती ॥ ३ ॥
दैवाधीन ऐसे सकलहि प्राणी । तेणें खिन्न मनीं नसे ज्ञाता ॥ ४ ॥
सूक्ष्म सूक्ष्मतर सूक्ष्मतम जीव । नांदती सर्वत्र महाराजा ॥ ५ ॥
छिन्नभिन्न होती लवतां नेत्रपातें । राया, विश्व ऐसें जीवमय ॥ ६ ॥
यास्तव अहिंसा शक्य नसे कोणा । जाणूनि स्वधर्मा सिद्ध होई ॥७॥
वासुदेव म्हणे पार्थाचें भाषण । देऊनियां ध्यान पुढती ऐका ॥ ८ ॥

३६

हिंसामय यज्ञें घडे स्वर्गप्राप्ती । दंडावीण लोकीं सर्व नाश ॥ १ ॥
मात्स्यन्यायें जन नष्ट दंडाविण । ब्रह्मयाचें वचन सत्य असे ॥ २ ॥
फूत्कारेंचि अग्नि होई प्रफुल्लित । सुष्ट, दुष्ट, भेद दंडदानीं ॥ ३ ॥
भेदज्ञानें जन मर्यादा पाळिती । नास्तिकहि होती दंडें रुजु ॥ ४ ॥
शुचिर्भूत जन दुर्लभ या लोकीं । दंड करी शुद्धि सकलांची ॥ ५ ॥
वर्णाश्रमधर्म, धर्म, अर्थ, नीति । संरक्षित होती दंडबळें ॥ ६ ॥
दंडहीन दिशा सकलहि शून्य । विवाहबंधन रुचतें न हें ॥ ७ ॥
पशु, पक्षी, बाल, वृद्धादि सकल । होते उत्शृंखल दंडावीण ॥ ८ ॥
विद्या, कला, धन दंडाधीन सर्व । सांगे वासुदेव अर्जुनोक्त ॥ ९ ॥

३७

कूटपाप कीं वंचना । जेथ दंड तो वसेना ॥ १ ॥
राज्य लाभो कवण्यारीति । शंका नच येवो चित्तीं ॥ २ ॥
घेई त्याचा उपभोग । नित्य करीं यज्ञयाग ॥ ३ ॥
धर्म लोकव्यवहारार्थ । कथियेला हा विस्तृत ॥ ४ ॥
परी न करितां विचार । अहिंसा ही होई घोर ॥ ५ ॥
सर्व सद्गुण वा दोष । नसती कोण्याही वस्तूंत ॥ ६ ॥

---

१ व्याघ्र

जनीं गुणदोषयुक्त । जाणावी हे वस्तुजात ॥ ७ ॥
दुष्टजर्जर संसारीं । नित्य सत्कर्मासी वरीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । ऐसें विनवी धर्मास ॥ ९ ॥

३८

नित्य प्रजेचें रक्षण । घडो स्वधर्मपालन ॥ १ ॥
न्यायप्रवृत्त तूं होईं । परंपरा अचल ठेवीं ॥ २ ॥
होईं यज्ञदानप्रिय । करीं शत्रूंचा संहार ॥ ३ ॥
वधितां आततताई कोणी । लवही न दोष मानीं ॥ ४ ॥
सज्ज वैरियाचा नाश । करितां नसे वधदोष ॥ ५ ॥
निःसंशय पाप हिंसा । परी न घडो आत्महिंसा ॥ ६ ॥
व्यर्थ उद्युक्त परघाता । नाश योग्यचि तयाचा ॥ ७ ॥
त्यागूनियां सदन एक । अन्य सदननिवास ॥ ८ ॥
तैसोंचि हें देहांतर । राया, चिंतीं निरंतर ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । पार्थ निवेदी कसोटी ॥ १० ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १५ वा अध्याय समाप्त

## अध्याय १६ वा

३९

भीम म्हणे धर्मा, सर्वज्ञ तूं परी । तोले न व्यवहारीं ज्ञान तव ॥ १ ॥
आजवरी बहु आंवरिलें चित्त । वदतों तें ऐक परी दुःखें ॥ २ ॥
अकालीं हा तव मोह नाडी आम्हां । ऐकूनि वचना घेईं आतां ॥ ३ ॥
शारीरमानस व्याधि हे द्विविध । एकामुळें एक उद्भवती ॥ ४ ॥
पूर्वदुःखें शोकमग्ना अन्य दुःख । तेणें द्विगुणित दुःख होई ॥ ५ ॥
कफ, वात, पित्त दोष शरीराचे । तीन मानस ते सत्वादिक ॥ ६ ॥
दोष साम्यें व्याधि निरास जाणावा । हर्षानें जिंकावा शोक जनीं ॥ ७ ॥
दुःखी सुख चिंती सुखें दुःखस्मृति । अतीत तूं होसी तयांहूनि ॥८॥
ऐसें असूनियां होसी शोकमग्न । दुर्दैवाचि जाण वाटे तेणें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भीम महादुःखें । बोलला धर्मातें ऐका काय ॥ १० ॥

४०

आठवीं तें राया, पांचाळीचें दुःख । ओढियेलें वस्त्र सभेमाजी ॥ १ ॥

वल्कलधारण,जटासुरपीडा । विसरसी कैसा कीचकासी ॥ २ ॥
दुष्ट जयद्रथपीडा ते स्मरावी । विसरसी कैवी सकल दुःखें ॥ ३ ॥
दारुण हें राया, महाघोर युद्ध । शस्त्रास्त्ररहित जिंकीं आतां ॥ ४ ॥
मानस हें युद्ध जिंकूनियां राया, । कृतार्थ हे काया होवो तव ॥ ५ ॥
सृष्ट्युत्पत्तिक्रम जाणूनियां नृपा । वडिलार्जित राज्या संरक्षावें ॥ ६ ॥
द्रौपदीच्या पुण्यें लाभलें हें भाग्य । करीं अश्वमेध यथाविधि ॥ ७ ॥
कृष्णादिक आम्हीं जाण तुझे दास । वासुदेव चित्त हर्ष पावे ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १६ वा अध्याय समाप्त

अध्याय १७ वा

४१

धर्म म्हणे पार्था, राज्यभोगइच्छा । अंतरीं शिरतां पाप होई ॥ १ ॥
असंतोष, मद, अशांति, प्रमाद । राग, वलोद्वेग मोह तेंवी ॥ २ ॥
अभिमानादि हीं मूर्तिमंत पापें । तेणें राज्येच्छा हे वरिसी मनीं ॥ ३ ॥
तोडूनि हे पाश होई निरामिष । तेणें शांतचित्त सौख्य भोगीं ॥ ४ ॥
उदर एकचि असे सम्राटासी । अपेक्षा राज्याची कासयासी ॥ ५ ॥
भोगें इच्छापूर्ति न घडे कल्पांतीं । अग्नि इंधनेंसी न शमे कदा ॥ ६ ॥
सुज्ञ तो सर्वदा अल्पाहारें तृप्त । जिंकीं उदरस्थ अग्नीलागीं ॥ ७ ॥
निर्जित भूमीनें जिंकिलें त्वच्छ्रेय । निरिच्छ, निर्बल तोचि सुखी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे योगक्षेमचिंता । राष्ट्राची, तो एका भार व्यर्थ ॥ ९ ॥

४२

स्वार्थास्तव व्याघ्र संहारी अनेकां । त्यावरी जीविका करिती बहु ॥ १ ॥
नृपाहूनि श्रेष्ठ तुल्याश्मकांचन । निराश निर्मम होई बंधो ॥ २ ॥
तेणें शोकहीन स्थान तें पावसी । निरामिष तेचि मुक्त जनीं ॥ ३ ॥
कर्म तें आभिष त्यागितांचि सौख्य । वदला जनक पुरा हेंचि ॥ ४ ॥
अनंत वैभव मज अनासक्ता । मिथिला दग्ध होतां न ढळे शांती ॥
अज्ञातज्ञापनें कर्तव्य निश्चय । योजिते सोपाय तेचि बुद्धि ॥ ६ ॥
शुद्धचित्त ब्रह्मरूप भववैद्य । वचनें संतुष्ट तोचि भला ॥ ७ ॥
उत्पत्ति विस्तार विलयही ब्रह्मीं । पाही तोचि ज्ञानी ब्रह्मरूप ॥ ८ ॥

विद्यां-बुद्धि-तेज-तपहीनाप्रति । कदा ब्रह्मस्थिति प्राप्त नोहे ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे बुद्धि निर्विकार । एकचि आधार सकळ सौख्या ॥१०॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १७ वा अध्याय समाप्त

अध्याय १८ वा

४३

वाक्शल्यपीडित बोले तदा पार्थ । राणी जें जनकास वदली पूर्वी ॥
त्यागूनियां राज्य अवलंबितां भैक्ष्य । एकांतीं नृपास वदली राणी २ ॥
सत्यप्रतिज्ञ हे नृपा, प्रतिज्ञेचा । करिसी कां ऐसा न कळे भंग ॥ ३ ॥
कापालीवृत्ति हे कां रे अवलंबीसी । गृहस्थधर्माची अवज्ञा हे ॥ ४ ॥
कर्मत्यागें तुझ्या अतिथि, पितर । देवताहि दूर निघूनि जाती ॥ ५ ॥
तेणेंचि संन्यास घेसी तूं नृपाळा । आधारचि झाला आधेय हा ॥ ६ ॥
सर्वसमर्थ तूं दीन श्वानासम । माता पुत्रहीन तेणें आजि ॥ ७ ॥
सकळ आश्रित तेंवी धर्मपत्नी । यांप्रति त्यागूनि सद्गति न ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे यथाविधि धर्म । करील कल्याण सकलांचें ॥ ९ ॥

४४

पवित्र विशाल प्रपा तूं जनांची । याचना हे आजि करिसी केंवी ॥१॥
कर्महीन राजा क्रव्याद कीं कृमि । आनंद भक्षूनि मानितील ॥ २ ॥
नृपाळा, तैसेंही श्रेय न तुजसी । लाभे स्वकर्मासी त्यागूनियां ॥ ३ ॥
मुष्टिधान्यास्तव त्यजिसी हें सर्व । सकलाचें काय मोल हेंचि ॥ ४ ॥
संबंध न माझा मानिसी तूं आतां । परी वरीं राज्या मजसाठीं ॥ ५ ॥
याचकाहूनि तूं होई श्रेष्ठ दाता । याचक सर्वदा भ्रष्ट होई ॥ ६ ॥
दाताचि जीवन असंख्य यतींचें । रायासीच ऐसें दान शक्य ॥ ७ ॥
तोचि जरी होई याचक या लोकीं । आधार साधूंसी कोण तरी ॥८॥
केवळ याचक नव्हे तो संन्यासी । अनासक्त चित्तीं तोचि मुक्त ॥९॥
वासुदेव म्हणे कठीण कठीण । संन्यासाचें वर्म सुलभ नसे ॥ १० ॥

४५

काषाय वसन मस्तकमुंडन । बाह्य परी मन विषयासक्त ॥ १ ॥
पाशबद्ध ऐसे संन्यास वरिती । परी उदरार्थी केवळ जे ॥ २ ॥

राग-द्वेषहीन संन्यासी ते खरे । वापुडीं इतरें दीनवाणीं ॥ ३ ॥
यास्तव नृपाळा, जटाधारी, नग्न । अर्पूनियां दान तोषवावे ॥ ४ ॥
गुरुसेवा अग्निहोत्र तेंवी दम । अर्पीतसे दान तोचि श्रेष्ठ ॥ ५ ॥
पार्थ म्हणे ऐसें कथिलें जनका । अनावर ऐसा मोह जनीं ॥ ६ ॥
यास्तव नरेंद्रा, निर्मोह तूं होई । दानधर्मीं देई स्फूर्ति आम्हां ॥ ७ ॥
अक्रूरत्वें करूं प्रजेचें पालन । अतिथि संतर्पण गुरुसेवा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ प्रार्थी धर्मा । साह्य हो ब्रह्मण्या आम्हां राया ॥९॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १८ वा अध्याय समाप्त

४६

अध्याय १९ वा

धर्म म्हणे बंधो, शास्त्रें परापर । जाणतों साचार उभयही मी ॥ १ ॥
कर्म कर्मत्याग कथिला वेदानें । जाणतों मी वर्मे सकळ त्यांचीं ॥२॥
केवळ तूं वीरा अस्त्रज्ञ या लोकीं । शास्त्रार्थ नेणसी तत्वरूप ॥ ३ ॥
तत्वदर्शी ऐसा दोष मज कोणी । न देतील ध्यानीं असो नित्य ॥४॥
भ्रातृप्रेमें वीरा वदसी तें योग्य । परी हें अज्ञात शास्त्र तुज ॥ ५ ॥
तप-दान दोन्ही विहित साधनें । देशकालमानें श्रेष्ठत्व त्यां ॥ ६ ॥
परी एकमेव द्रव्यासीचि श्रेष्ठ । मानिसी तें मत अयोग्यचि ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अर्थाचें गौणत्व । कथी धर्मराज ऐका आतां ॥ ८ ॥

४७

तपः स्वाध्याय निरत । दिसती या जनीं धार्मिक ॥ १ ॥
ऋषि आचरूनि तपा । जाती सनातन लोका ॥ २ ॥
कोणी वानप्रस्थाश्रमी । निर्वैरेंचि स्वर्गगामी ॥ ३ ॥
विषयनिग्रहेंचि कोणी । माया तम निवारूनि- ॥ ४ ॥
तया उत्तर पथानें । संपादिती पुण्यस्थानें ॥ ५ ॥
उज्वल जो पितृमार्ग । क्रियाशीलांचा तो चांग ॥ ६ ॥
न टळे जन्म-मरण त्यांसी । पुढती पुण्यलोकप्राप्ति ॥ ७ ॥
मुमुक्षूंचा मार्ग थोर । वर्णवे न तो साचार ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे योग । मानी श्रेष्ठ धर्मराज ॥ ९ ॥

१ त्याग

४८

श्रेष्ठ योग परी मर्म न कळे तयाचें ॥
सारासार निर्णय याचा शोध घेति ज्ञाते ॥ १ ॥
शोधूनि शोधूनि अंतीं निर्णय तयांचा ॥
वेदान्त सिद्धान्त श्रेष्ठ एकमेव साचा ॥ २ ॥
सारहीन कदलीस्तंभासम अन्य शास्त्रें ॥
स्पष्ट निर्णय तयांचा घेतां प्रत्ययातें ॥ ३ ॥
म्हणताती कोणी इच्छा द्वेषयुक्त आत्मा ॥
शरीरांत वास करी अदृश्य सर्वात्मा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सूक्ष्म अनिर्देश्य ब्रह्म ॥
अहंममत्यागें लाभे अद्वितीय पूर्ण ॥ ५ ॥

४९

आत्मज्ञान तेंचि सौख्य । व्यर्थ वर्णिसी द्रव्यास ॥ १ ॥
द्रव्य अनर्थाचें मूळ । मान्य करिती हें सकळ ॥ २ ॥
पंडितहि हेतुमंत । पूर्व संस्कार ज्यां दृढ ॥ ३ ॥
आत्मा अमान्य जयांसी । केंवी समजे त्या मूढांसी ॥ ४ ॥
वावदूक अनृतभाषी । वदती बहु सभेमाजी ॥ ५ ॥
बहुश्रुत ते संचार । करिती प्रलापी सर्वत्र ॥ ६ ॥
न कळे लौकिक जयांसी । परीक्षा न त्यां ज्ञात्यांची ॥ ७ ॥
महाज्ञानी परम धीर । जनीं असती थोर थोर ॥ ८ ॥
ब्रह्मप्राप्ति ती तपानें । शब्दज्ञान सद्बुद्धीनें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे सौख्य । संन्यासें हें धर्ममत ॥ १० ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १९ वा अध्याय समाप्त

## अध्याय २० वा

५०

ऐकूनि हे महातप देवस्थान । बोलला वचन युक्तियुक्त ॥ १ ॥
धर्मा, अर्जुनाचा भाव घेई ध्यानीं । जिंकिली अवनी धर्ममार्गें ॥ २ ॥
योग्य न तियेचा त्याग तुजप्रति । जाण चतुष्पदी निःश्रेणी हे ॥ ३ ॥
आश्रमस्वरूपा यथानुक्रमें ती । अवलंबूनि जगीं धन्य व्हावें ॥ ४ ॥

स्वाध्याय तैं ज्ञान कर्म, तप, यज्ञ । ऐसे भिन्न भिन्न यज्ञ जनीं ॥ ५ ॥
यज्ञास्तव धनइच्छा न करावी । वाचा ध्यानीं घ्यावी श्रेष्ठांची हे ॥६॥
पात्रापात्रबोधविरहित ज्ञानें । क्षीण होती पुण्यें सकलही ॥ ७॥
यज्ञार्थीचि जनीं सकलहि अर्थ । शिव तैं मरुत्त श्रेष्ठ यज्ञें ॥ ८ ॥
इंद्राहूनि श्रेष्ठ यज्ञें हरिश्चंद्र । शोकहीन नर यज्ञें होई ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे यज्ञार्थेचि द्रव्य । योजी तया भवबाधा नसे ॥ १० ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा २० वा अध्याय समाप्त

## अध्याय २१ वा

५१

देवस्थान म्हणे धर्मा, देवेंद्रासी । वदला बृहस्पति तेंचि ऐकें ॥ १ ॥
संतोष जाणावा सर्व सौख्यदायी । संतोषेंचि होई समाधान ॥ २ ॥
संतोषापरता अन्य लाभ नसे । श्रेष्ठतम असे तोचि एक ॥ ३ ॥
कूर्मांगांसम जो सकल कामहर्ता । प्रसन्न परमात्मा तयावरी ॥ ४ ॥
तया निर्भयाचें भय न कोणासी । कामजयें त्यासी साक्षात्कार ॥५॥
मन-काया-वाचा-कर्में द्रोह कांक्षा । नसे तोचि साचा ब्रह्मरूप ॥६ ॥
कर्मफलरूपी परमात्मदर्शन । लाभे तैं तें कर्म आचरितां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्वकर्ममहिमान । कथी देवस्थान धर्माप्रति ॥ ८ ॥

५२

यत्न साम किंवा उभय प्रशंसा । यज्ञ कीं संन्यासा स्तविती कोणी ॥१॥
दान प्रतिग्रह वर्णिती वा कोणी । सर्वत्यागें ध्यानीं रमती अन्य ॥२॥
वध, भेद, छेदें राज्य संपादन । प्रजा परिपालन श्रेष्ठ कोणा ॥ ३ ॥
एकांतचि रुचे अथवा कोणासी । साधनें ज्ञात्यांचीं ऐसीं बहू ॥४॥
वासुदेव म्हणे सकलांचें सार । कथी मुनीश्वर ऐका भावें ॥ ५ ॥

५३

भूताद्रोहजन्य तोचि श्रेष्ठधर्म । सज्जनांसी मान्य सर्वकाल ॥ १ ॥
सत्य अद्रोह तैं संविभाग दया । दम निजभार्यामात्ररत ॥ २ ॥
लोकलाज, मृदु भाव अचापल । धर्म हे अतुल मनुमान्य ॥ ३ ॥
युधिष्ठिरा ऐसे धर्म हे रक्षावे । दक्ष सदा व्हावें प्रजाकार्यीं ॥ ४ ॥
अनासक्त चित्तें क्षात्रधर्मीरत । प्रिया-प्रियतुल्य जयाप्रति ॥ ५ ॥

असाधुनिग्रह साधुसंरक्षण । स्वधर्मपालन सर्वकाल ॥ ६ ॥
धर्ममार्गीं स्थापी नित्य जो प्रजेसी । तत्वज्ञ जो भक्षी विघसान्न ॥७॥
इहपर लाभ होई तयाप्रति । रक्षी गोविप्रांसी दक्षत्वें त्या ॥ ८ ॥
रुद्रादित्य तेंवी राजर्षीसमूह । याचि मार्गें नित्य श्रेष्ठ लोकीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे मुनि देवस्थान । क्षत्रियांचा धर्म वर्णी ऐसा ॥ १० ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा २१ वा अध्याय समाप्त

अध्याय २२ वा ५४

पुनरपि पार्थ विनवी धर्मासी । करूं नको चित्तीं शोक ऐसा ॥ १ ॥
संग्रामीं मरण महायज्ञासम । क्षत्रियांचा धर्म श्रेष्ठ हाचि ॥ २ ॥
तप त्यागादि तो ब्राह्मणांचा धर्म । न करी कल्याण क्षत्रियांचें ॥३॥
राया, क्षत्रिय हे जाण विप्रोद्भव । क्षात्रधर्मँ श्रेय विप्रां तेणें ॥ ४ ॥
सारासारज्ञ तूं क्षत्रियवरिष्ठ । क्षत्रियांचें चित्त वज्रासम ॥ ५ ॥
दुराचाररत बांधवांचा वध । करूनि इंद्रास इंद्रत्व हें ॥ ६ ॥
त्यागूनि यास्तव शोक, करीं यज्ञ । रणांत मरून अमर शत्रु ॥ ७ ॥
दुर्लंघ्यचि नित्य जाण दैवगति । योजना तयाची घडतें तैसें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वारंवार पार्थ । विनवी धर्मास राज्य करीं ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा २२ वा अध्याय समाप्त

अध्याय २३ वा ५५

मूकचि पाहोनि धर्माप्रति व्यास । वदती पार्थोक्त सत्य राया ॥ १ ॥
गृहस्थधर्म हा जाण सर्वाधार । संन्यास न थोर तुजप्रति ॥ २ ॥
प्रजा रक्षणादि क्षत्रियांचे धर्म । दंडेंचि कल्याण क्षत्रियांचें ॥ ३ ॥
अप्रवासी विप्र, राव अविरोद्धा । सर्प जैं मूषका कालभक्ष्य ॥ ४ ॥
दंडधारणेंचि राजर्षि सुद्युम्न । जोडी श्रेष्ठ स्थान विख्यात हें ५ ॥
धर्म म्हणे प्रभो, वृत्त सुद्युम्नाचें । ऐकवूनि मातें तोष द्यावा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे महामुनि व्यास । कथिती वृत्तांत श्रवण करा ॥ ७ ॥

५६

सुविख्यात शंखलिखित बांधव । बाहुदेचें तीर शोभविती ॥ १ ॥
आश्रम तयांचे पुष्पफलयुक्त । पातला लिखित शंखाश्रमीं ॥ २ ॥

तयावेळीं शंख नव्हता आश्रमीं । लिखित त्या स्थळीं भक्षी फळें ॥ ३ ॥
इतुक्यांत शंख येऊनियां पुशी । अर्पिलीं तुजसी फळें कोणी ॥ ४ ॥
लिखित, शंखासी म्हणे बंधुराया । तोडिलीं या ठाया फळें मीचि ॥ ५ ॥
क्रुद्ध शंख तदा बोलला हें चौर्य । कथूनि नृपास शिक्षा भोगीं ॥ ६ ॥
ऐकूनि लिखित सुद्युम्न नृपासी । भेटतां तयासी सन्मानी तो ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे लिखितवृत्तांत । ऐकूनि नृपास नवल वाटे ॥ ८ ॥

५७

राव म्हणे मुने, प्रमाण मी जरी । अनुमती तरी माझी तुज ॥ १ ॥
धर्मज्ञा, पवित्रा, तव हा अपराध । नव्हे शिक्षायोग्य मजसी वाटे ॥ २ ॥
यास्तव ईप्सित मागें कांहीं अन्य । लिखित शासन करीं म्हणे ॥ ३ ॥
आग्रहें मुनीच्या केला करच्छेद । लिखित शंखास भेटे तदा ॥ ४ ॥
म्हणे मज बंधो, क्षमा करीं आतां । शंख म्हणे ताता क्रोध नसे ॥ ५ ॥
परी अधर्माचें घडावें क्षालन । जा करीं तर्पण आतां सौख्यें ॥ ६ ॥
तर्पणार्थ पाहीं बाहुदेचें तीर । तोंचि येती कर कमलासम ॥ ७ ॥
लिखित येवोनि दावी शंखाप्रति । तपश्चर्या माझी शंख म्हणे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि लिखित । प्रश्न बांधवास करी ऐका ॥ ९ ॥

५८

शंख म्हणे बंधो, न धरावी शंका । हा दैवी शक्तीचा खेळ मानीं ॥ १ ॥
मुनि म्हणे बंधो, ऐसी जरी शक्ति । पूर्वींच विमुक्ति घडती तरी ॥ २ ॥
शंख म्हणे बंधो, शासनाधिकार । नृपाचाचि थोर ध्यानीं घेईं ॥ ३ ॥
शास्य शास्ता तेणें उद्धरूनि जाई । स्वधर्माचा पाहीं मार्ग ऐसा ॥ ४ ॥
धर्माप्रति व्यास कथिती क्षात्रधर्म । प्रजेचें पालन श्रेष्ठ असे ॥ ५ ॥
मुंडन न धर्म दंडचि वरिष्ठ । धर्म नृपाळास राजश्रेष्ठा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अधिकार जैसा । धर्म तया तैसा हितकारी ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा २३ वा अध्याय समाप्त

अध्याय २४ वा

५९

पुनरपि व्यास बोलले धर्मासी । इच्छा बांधवांची पूर्ण होवो ॥ १ ॥
राज्य करीं बापा ययाती समान । कंठिलें जीवन क्लेशमय ॥ २ ॥

देवता पितर अतीथींच्या ऋणा । फेडीं कुरुनंदना यज्ञकर्में ॥३॥
सर्वमेध तैंवी धर्मा, अश्वमेध । करितां पुण्यलोक पावसील ॥ ४ ॥
बांधवही तुझे आचरोत यज्ञ । हो कीर्तिसंपन्न ऐशारीति ॥ ५ ॥
विजयी क्षत्रिया कर्म हितप्रद । बोलती जें श्रेष्ठ कथितों ऐकें ॥ ६ ॥
शास्त्रज्ञानें देशकाल जो प्रतीक्षी । दोष तयाप्रति नसे कांहीं ॥ ७ ॥
षष्ठांशाकरें जो न करी पालन । चतुर्थांश जाण पाप तया ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे समदृष्टि राजा । पिताचि प्रजेचा पुण्यवंत ॥ ९ ॥

६०

कांतिमंता, काम क्रोधासी जिंकूनि । दक्ष निजकर्मी तेंचि श्रेष्ठ ॥१॥
दैवविरोधें कीं सिद्धि न लाभतां । धर्मातिक्रमाचा दोष नसे ॥ २ ॥
तांतडीनें किंवा चिंतूनि उपाय । शत्रूचा निग्रह करणें योग्य ॥ ३ ॥
पापिष्ठांचा संग न घडो प्रजेसी । आचारवंतांसी सन्मानावें ॥ ४ ॥
विप्र, वैश्यादिक रक्षावे सर्वदा । योजीं बहुश्रुतां धर्मकाजीं ॥ ५ ॥
गुणवंत तेही योजावे अनेक । एकाचा विश्वास अयोग्य तो ॥ ६ ॥
दैव मानुष कीं विघ्न प्रजेप्रति । पाप नृपाळासी सर्व त्याचें ॥ ७ ॥
दुर्विनीत, अरक्षिता, स्तब्ध, मानी । 'दुर्दान्त' तो जनीं असूयक ॥
वासुदेव म्हणे राजधर्मसार । कथिती मुनीश्वर धर्मालागीं ॥ ९ ॥

६१

सुमंत्रित कीं सुनीत । साह्य जया गुणवंत ॥ १ ॥
सिद्धासिद्धही तें कर्म । रायाप्रति दोषहीन ॥ २ ॥
न्याय्य युद्धामाजी राव । पडला रणीं हयग्रीव ॥ ३ ॥
यूप, धनु, ज्या रशना । स्रुक-स्रुवा ते खड्ग बाणा ॥ ४ ॥
आज्य रुधिर, वेदि रथ । अग्निपथामाजी क्रोध ॥ ५ ॥
सैन्य तैंचि ऋत्विज जाणा । हवन करी शत्रुप्राणां ॥ ६ ॥
ऐसा याज्ञिक स्वर्गांत । हयग्रीव आनंदांत ॥ ७ ॥
स्वधर्मात प्राणार्पण । करूनि जाहला तो धन्य ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पुण्य- । लाभे पाळितां स्वधर्म ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा २४ वा अध्याय समाप्त

---

१ त्या पापी राजाला 'दुर्दान्त' असें म्हणतात

अध्याय २५ वा

६२

धर्म म्हणे मज न रुचे साम्राज्य । स्त्रिया असंख्यात शोकमग्न ॥१॥
अगणित वीर मृत्युपंथें गेले । वैधव्यचि आलें ललनांप्रति ॥ २ ॥
ऐकूनि तयांचा विलाप चित्तासी । कैंवी लाभे शांति न कळे कांहीं ॥
यज्ञ, दान, तप, बुद्धि शास्त्राभ्यास । सर्व असमर्थ कालहीन ॥ ४ ॥
अनुकूल काल येतां महामूढा । लाभेल संपदा तेणें वळें ॥ ५ ॥
शिल्प, दिव्यौषधि अथवा महायंत्र । राया कालतंत्र फल त्यांचें ॥६॥
जन्म, मृत्यु, लाभालाभ, सूर्यचंद्र । तैसाचि सागर कालाधीन ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धनधान्यवृद्धि । सकल हे सृष्टि कालाधीन ॥ ८ ॥

६३

राया, कालपक कर्मं फलप्राप्ति । कालचि या लोकीं संहारक ॥ १ ॥
वध्य-वधक हा केवळ संकेत । उत्पत्ति विनाश कालाधीन ॥ २ ॥
मर्त्य मानवांचा पाहूनि विनाश । स्वधर्मी जो दक्ष तोचि धन्य ॥३॥
राया, मूढासम दुःख शोकमग्न । होऊनि स्वधर्म त्यागिसी कां ॥४॥
देहही आपुला काळाचें भातुकें । अथवा अवनी हे सकळांची ॥ ५ ॥
सहस्रावधि तीं शोकमग्न स्थानें । न पीडिती ज्ञानें सज्जनांसी ॥ ६ ॥
प्रियाप्रिय, सुखदुःखें, कालपक । गांठिती जीवास काळ येतां ॥ ७ ॥
वासुदव म्हणे जगाचा स्वभाव । दुःखरूप सर्व अज्ञान्यासी ॥ ८ ॥

६४

आशाव्यग्र चित्तीं दुःखाची उत्पत्ति । दुःखाचिया अंतीं सुखलाभ ॥१॥
पाठशिवणीचा खेळ त्या दोघांचा । नसेचि नित्यता कोणा एका॥२॥
शाश्वत सुखार्थ त्यागावीं ते दोन्हीं । जन्म एकांतूनि दुजियाचा ॥३॥
शोक, संताप वा होती जेणें श्रम । एकांगहि[1] जाण त्यजावें तें ॥ ४ ॥
प्राप्त प्रियाप्रिय तैंवीं सुखदुःखें । अपराजितचित्तें भोगावीं तीं ॥ ५ ॥
यत्किंचित जरी पुत्रदार प्रीति । का कस्य केनेति कथं[2] कळे ॥ ६ ॥
महामूढ किंवा धर्मा, महाज्ञानी । भोगिताती जनीं परम सौख्य ॥७॥
मध्यम ते नित्य भोगिताती क्लेश । वासुदेव सत्य सत्य म्हणे ॥ ८ ॥

१ एक अवयव असला तरी. २ कोणती, कोणाची आणि कशामुळें हें कसें कळेल

६५

सुखदुःखज्ञ तो सेनजित धीर । नृपाळ उद्गार काढी ऐसे ॥ १ ॥
तृष्णासंगति ते दुःखासी कारण । तेणें सौख्य जाण कदा नोहे ॥
दुःखांतूनि दुःख अखंड प्रवाह । कदाही न क्षय तयालागीं ॥ ३ ॥
सुख दुःखलाभ हाचि अभ्युदय । कालाधीन सर्व जाण राया ॥ ४ ॥
हर्ष-शोक तेणें कदा न ज्ञात्यासी । दीक्षा क्षत्रियासी धर्मयुद्ध ॥ ५ ॥
स्वीकारूनि दंड प्रजेचें पालन । योग हाचि जाण तयांलागीं ॥ ६ ॥
सदाक्षिण यज्ञ क्षत्रियां संन्यास । पावन तयांस सत्कर्मं हीं ॥ ७ ॥
स्वकर्मात दक्ष अहंभावशून्य । यज्ञप्रिय जाण स्वर्ग तया ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे महामुनि व्यास । कथिती धर्मास श्रेष्ठ धर्म ॥ ९ ॥

६६

संपादूनि जय राष्ट्राचें पालन । करी महायज्ञ धन्य तोचि ॥ १ ॥
वेदशास्त्रज्ञ जो कुशल दंडधारी । संस्थापित करी वर्णाश्रम ॥ २ ॥
देव देवताही जयाचें सत्कर्म । वर्णिती तो धन्य राजश्रेष्ठ ॥ ३ ॥
पौरजानपदां सर्वदा जो मान्य । तो राजसत्तम युधिष्ठिरा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे स्वधर्मरक्षक । प्रजेचा उत्कर्ष तोचि करी ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा २५ वा अध्याय समाप्त

अध्याय २६ वा

६७

धर्म तयावेळीं बोलला पार्थासी । द्रव्यचि म्हणसी श्रेष्ठतम ॥ १ ॥
परी अध्ययन, तप, सदाचार । ज्ञानादि उद्धारकारक तीं ॥ २ ॥
कर्ममार्गाहूनि ज्ञानमार्ग श्रेष्ठ । संतोष वरिष्ठ साधन तें ॥ ३ ॥
राजश्रेष्ठ पुरा बोलला ययाति । तेंचि तुजप्रति कथितों ऐकें ॥ ४ ॥
इच्छाद्वेषशून्य निर्भय जो सदा । तोचि ब्रह्मपदा प्राप्त होई ॥ ५ ॥
अंतर्बाह्य शुद्ध तोचि ब्रह्मरूप । नम्र अनासक्त मोहहीन ॥ ६ ॥
धर्मव्रत कोणी इच्छिताती धन । धनेच्छा विहीन तोचि सुखी ॥ ७ ॥
द्रव्य द्रव्याधीन धर्मही सदोष । आशावंता त्याज्य न सुटे तेंही ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे द्रव्यासक्ति जनीं । सौजन्याची हानी करी नित्य ॥ ९ ॥

६८

द्रव्य अद्रोहत्व परस्पर वैरी । अद्रोहचि तारी साधकातें ॥ १ ॥
शोकभयहीन स्वार्थें होऊनियां । अल्पास्तव वायां द्रोह करी ॥ २ ॥
भ्रूणहत्त्यादोष दुर्लक्षूनि ऐसा । अंतरीं धनाशा धरी बहु ॥ ३ ॥
ऐशा पापियाचे भृत्य होती दुष्ट । करितांही संतुष्ट अंतीं भय ॥ ४ ॥
निर्धनासी कोण काय दोष देई । पाशमुक्त राही सदा सौख्यें ॥ ५ ॥
देवांचेंही धन इच्छिती धनिक । यज्ञगाथा ख्यात जनीं ऐकें ॥ ६ ॥
धन तें धनिक यज्ञार्थ निर्मिले । तुच्छता पावले यज्ञहीन ॥ ७ ॥
यज्ञार्थ जें धन तेंचि हितप्रद । वेंचितां कामार्थ अप्रशस्त ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐका यज्ञगाथा । जेणें सार्थकता धनिकां येई ॥ ९ ॥

६९

कुंतिपुत्रा, स्वार्थें धनी वेंची धन । यज्ञार्थचि जाण अर्पी धाता ॥१॥
अस्थिराचि धन सर्वदा मानूनि । यज्ञ दान कर्मीं योजावें तें ॥ २ ॥
भोग विनाशहि त्याज्यचि धनाचा । दानचि यज्ञाचा मार्ग श्रेष्ठ ॥३॥
संचय न करी सत्कार्यनिरत । संचयें न लाभ मानी ज्ञाता ॥ ४ ॥
धर्मभ्रष्टांसी जे अर्पिताती दान । निरय त्यां जाण वर्ष शत ॥ ५ ॥
पात्रापात्रतेचा व्युत्क्रम न होवो । दानाचें हें राहो पथ्य ध्यानीं ॥६॥
कुपात्रीं जें दान सत्पात्रीं अदान । अतिक्रम जाण द्रव्याचा तो ॥७॥
वासुदेव म्हणे दानशक्ति थोर । योजावी विचार करूनियां ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा २६ वा अध्याय समाप्त

अध्याय २७ वा

७०

युधिष्ठिर म्हणे सौभद्रादि पुत्र । द्रुपद विराट पुत्रांसवें ॥ १ ॥
तैसाचि असंख्य क्षत्रियांचा वध । जाहला रणांत राज्यास्तव ॥२॥
वंशोच्छेदक मी ऐसा महादोषी । शोक हा मजसी न सोडीचि ॥ ३ ॥
अंकावरी ज्याच्या खेळलों लोळलों । हाय केंवी झालों क्रूर त्यासी ॥४॥
भार्गवासी जेणें संग्राम मांडिला । रणी तो पाडिला पितामह ॥ ५ ॥
पितृघाती तैसा गुरुचाही घात । कथूनि मिथ्या शब्द हाय गेला॥६॥
ज्येष्ठ बांधव तो महा धनुर्धर । हाय सूर्यपुत्र वधिला केंवी ॥ ७ ॥

कुलक्षयकारी ऐसा मी पतित । अन्नोदकत्याग करिन आतां ॥ ८ ॥
विप्रश्रेष्ठ मज अनुज्ञा देऊनि । जावोत स्वस्थानीं आनंदानें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे मरणाच्या द्वारीं । वैसतां निवारी मुनि व्यास ॥१०॥

७१

मुनि म्हणे धर्मराजा । शोक न करावा ऐसा ॥ १ ॥
पुनरुक्ति स्वीकारूनि । कथितों तें घेई ध्यानीं ॥ २ ॥
वियोगान्त ते संयोग । जैसे सलिलांत बुद्बुद ॥ ३ ॥
असंख्यात येती जाती । नाहीं तयांसी गणती ॥ ४
अंतीं संचयाचा क्षय । चढतां पतन हा निश्चय ॥५॥
मरण न टळे कोणासी । व्यर्थ शोक कासयासी ॥ ६ ॥
पयोमुख विषकुंभ । आलस्य हा जाण नित्य ॥ ७ ॥
होती प्रारंभींचि क्लेश । दक्षतेनें अंतीं सौख्य ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे व्यास । स्तविती कर्तव्यदक्षास ॥ ९ ॥

७२

ऐश्वर्य उत्कर्ष असत्कर्मीं लज्जा । कीर्ति, धृति दक्ष्या प्राप्त होती॥१॥
आलस्यें न लाभ घडेचि सर्वथा । ज्ञाता हें सर्वदा ध्यानीं धरी ॥२॥
सुखदुःख, मित्र-शत्रूच्या न हातीं। अर्थलाभ शक्ति प्रजेसी न ॥ ३ ॥
द्रव्याधीन सौख्य भ्रमचि हा जनीं । संतोषा वांचूनि सौख्य नसे॥४॥
विधात्यानें क्षात्रकुळांत निर्मिलें । जाण तेंचि भलें कर्म तुज ॥ ५ ॥
संन्यासाधिकार नसे तुजलागीं । स्वस्वकर्मे जगीं सिद्धि लाभे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे जैसा अधिकार । तैसाचि आचार सौख्यदाई ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा २७ वा अध्याय समाप्त

## अध्याय २८ वा

७३

महामुनिव्यास, जनकासी अश्म । कथी तेंचि ज्ञान निवेदिती ॥ १ ॥
द्रव्य, बांधव ते विनाश पावतां । मार्ग कल्याणाचा जनक पुसी ॥२॥
अश्म म्हणे राया, जन्मला जो प्राणी। तयाच्या मागूनि सुखदुःखें॥
तत्तद्भोगकाळीं बुद्धीचा अपहार । होऊनियां नर मोह पावे ॥ ४ ॥
चित्तविक्षेप कीं अनिष्टाची प्राप्ति । मानस दुःखाची उत्पत्ति ते ॥५॥

नसें मी सामान्य, कुलीन कीं सिद्ध। ऐशा भ्रमें नाश करूनि घेई ॥६॥
पितृधन क्षीण होतां अपहार-। बुद्धी अनिवार होऊं लागे ॥ ७ ॥
ऐसा अमर्याद वर्ततां विनाश। व्याधें जें मृगास तेंवी घडे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे अनिष्टाची प्राप्ति। चित्त विभ्रम कीं दुःखमूळ ॥९॥

७४

जरा, मृत्यु, वृक, भक्षिती जीवासी। राव, रंक चित्तीं नसे त्यांच्या ॥
सम्राटही कोणी असो महाबळी। जरा मृत्यु टाळी ऐसा नसे ॥ २ ॥
प्राप्त सुखदुःख भोगणेंचि प्राप्त। असो बालवृद्ध अथवा युवा ॥ ३ ॥
प्रियवियोग कीं अप्रियसंयोग। जन्म मृत्यु भोग लाभ, हानि ॥ ४ ॥
पुष्प, फल, रुचि, गंध, रूपासम। जगीं कालाधीन सुखदुःख ॥ ५ ॥
आसन, शयन, उत्थान कीं यान। पान तें भोजन घडवी काळ॥६॥
वासुदेव म्हणे सकल वैषम्य। नित्य कालाधीन जगामाजी ॥ ७ ॥

७५

आयुरारोग्य कीं वीर्य। दैवाधीन सकलैश्वर्य ॥ १ ॥
वहुत पुत्र दरिद्र्यासी। धनिक पुत्रहीन लोकीं ॥ २ ॥
दरिद्रीचि दीर्घायुषि। धनिका त्वरित काळ भक्षी ॥ ३ ॥
संपन्नासी न पचे अन्न। काष्ठें पचवी धनहीन ॥ ४ ॥
होतां जनीं इष्टलाभ। दुरात्मा तो करी पाप ॥ ५ ॥
मृगया, मीनाक्षी कीं मद्य। द्यूतादिक जनीं निंद्य ॥ ६ ॥
परी आसक्त या कर्मीं। वहुश्रुत तेही जनीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे काळ-। शक्ति जगीं हे प्रवल ॥ ८ ॥

७६

चंद्रसूर्य आकाशादि पंचभूतें। दिनरजनीतें निर्मी काळ ॥ १ ॥
शीतउष्णासम सुखदुःखप्राप्ति। कालाधीन लोकीं जाणें राया ॥२॥
मंत्र औषधी वा जप तप होम। न करी रक्षण काळ येतां ॥ ३ ॥
सागरांत काष्ठ भेटे काष्ठाप्रति। वियुक्त मागुती क्षणीं होय ॥ ४ ॥
भूतसमागम तैसाचि जाणावा। वियोगें न व्हावा शोक सुज्ञा ॥५॥
देवेंद्र कीं दीन अनाथ या लोकीं। समानचि लेखी काल तयां ॥ ६ ॥
मातापितरादि जीवासी असंख्य। परी न संबंध कवणाचा ही ॥७॥

अनित्य संसारीं चक्रनेमिक्रम । मार्गीं बहुत जन भेटती हे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वृक्षावरी पक्षी । तैसेचि या लोकीं इष्टमित्र ॥ ९ ॥

७७

शास्त्रगम्य एक जाणावा परलोक । न दिसे प्रत्यक्ष कोणाप्रति ॥१॥
वैभवेच्छु वेदमार्ग न सांडिती । दृढश्रद्धा त्यांची शास्त्रावरी ॥ २ ॥
देवपितृकर्म कर्तव्य ज्ञात्याचें । नित्य त्रिवर्गातें संरक्षावें ॥ ३ ॥
कालसिंधु जरा-मृत्युग्राहयुक्त । करील वा गट्ट अवघें विश्व ॥४॥
आयुर्वेदाभ्यासी तेही सपरिवार । मरणाचें द्वार गांठिताती ॥ ५ ॥
गेला क्षण कोणा न लाभे फिरूनि । यज्ञदानधर्मी असूनि रत ॥ ६ ॥
देह जीवासी वा जीव देहाप्रति । भेटो परी अंतीं पुनर्जन्म ॥ ७ ॥
पुत्रदारादिक ऐसे वारंवार । परी न शरीर तेंही नित्य ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे अनित्य संसार । जाणूनियां स्थिर तेंचि शोधूं ॥ ९ ॥

७८

पिता, पितामह न भेटती कोणा । वंशजही त्यांना भेटती ना ॥ १ ॥
स्वर्ग, नरक वा कोणा न प्रत्यक्ष । शास्त्रचक्षु मात्र अवलोकिती ॥२॥
यास्तव नृपाळा, शास्त्राभ्यास करीं । ऋणमुक्ति वरीं सत्कर्मानें ॥ ३ ॥
वर्णाश्रमधर्मे इहपरलाभ । हाचि श्रेष्ठ मार्ग शास्त्रसिद्ध ॥ ४ ॥
द्रव्यार्जनें यज्ञ आचरी जो नृप । कीर्ति अलौकिक होई त्याची ॥५॥
विवेकयुक्त हें बोले अश्ममुनि । जनक ऐकूनि शोकमुक्त ॥ ६ ॥
धर्मा,तूंही शोकत्यागें हो उत्साही । जिंकिली जी मही उपभोगीं ती ॥
वासुदेव म्हणे व्यासांचें वचन । ऐकूनियां धर्म स्वस्थ राही ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा २८ वा अध्याय समाप्त

## अध्याय २९ ते ३१ वा

७९

ऐशापरी बोध ऐकूनीहि धर्म । न पावेचि शम शोकाकुल ॥ १ ॥
तयावेळीं पार्थ म्हणे यदुनाथा । करीं बोध आतां तूंचि यासी ॥२॥
ऐकूनियां प्रेमें बोले यदुवीर । पुण्यलोकीं वीर गेले धर्मा ॥ ३ ॥
वीरोचित जयां लाभली सद्गति । शोक कासयासी करिसी त्यांचा
षोडशराज्ञिक कथा श्रीहरीनें । कथिली प्रेमानें सविस्तर ॥ ५ ॥

द्रोणपर्वामाजी सर्व ते काथिली । म्हणोनी वर्णिली नाहीं येथें ॥ ६ ॥
'स्वर्णष्ठीवी' वृत्त कथूनि सकळ । धर्मासी गोपाळ बोध करी ॥७॥
वासुदेव म्हणे शोकार्णवामाजी । संतरण लोकीं सुलभ नसे ॥ ८ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा २९ ते ३१ अध्याय समाप्त

अध्याय ३२ वा

८०

शोकस्तब्ध धर्मालागीं । वदले व्यास महायोगी ॥ १ ॥
धर्मा, राजीवलोचना । करीं प्रजासंरक्षणा ॥ २ ॥
क्षत्रियांचा हाचि धर्म । धर्म धार्मिकां प्रमाण ॥ ३ ॥
वडिलार्जित सिंहासनीं । बसूनि रत हो स्वधर्मीं ॥ ४ ॥
नित्य धर्म ब्राह्मणांचा । तप, सिद्धांत वेदांचा ॥ ५ ॥
तया संपूर्ण धर्मातें । क्षत्रियानें संरक्षावें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे व्यास । कथिती ऐका सद्धर्मास ॥ ७ ॥

८१

विषयासक्त धर्मआज्ञा जो भंगिता । धरूनियां हस्ता दंडावें त्या ॥१॥
भृत्य तपस्वी वा पुत्रादिक अन्य । म्हणती अप्रमाण प्रमाणा जे ॥२॥
मोहग्रस्ता तयां पाप्यांसी दंडावें । अथवा वधावें सर्वोपायें ॥ ३ ॥
विपरीत याच्या वर्तेल जो नृप । प्राप्त महापाप तयालागीं ॥ ४ ॥
धर्मनाश होतां रक्षी न तयासी । तो धर्मघातकी धर्मघ्नाचे ॥ ५ ॥
ऐशा धर्मघ्नासी वधूनि स्वधर्म । आचरूनि खिन्न होऊं नको ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दुष्टनिर्दलन । दान, संरक्षण राजधर्म ॥ ७ ॥

८२

धर्म म्हणे तपोधना, त्वद्वचनीं । लवही न मनीं शंका माझ्या ॥ १ ॥
धर्मज्ञवरिष्ठा, धर्म मूर्तिमंत । जाणसी प्रत्यक्ष तूंचि एक ॥ २ ॥
परी वधिले जे न वधावें तयां । राज्यार्थ हे काया दग्ध तेणें ॥ ३ ॥
म्हणती मुनि धर्मा, कर्ता जनीं ईश । अथवा मनुष्य, स्वभाव तैं ॥४॥
स्वकर्मजन्यही फल लाभे जनीं । कथितो व्यासवाणी वासुदेव ॥ ५ ॥

८३

ईश्वर प्रेरित कार्याकार्यीं धर्मा । दोष त्याचा कोणा मनुजा नसे ॥१॥

वनच्छेदपाप परशुदंडासी । लागे न कदापि कर्ता दोषी ॥ २ ॥
ईश्वरनियुक्त कर्माचें तें पाप । लागे न नरास युधिष्ठिरा ॥ ३ ॥
कर्तृत्व नराचें मानितांही तुज । दोष न या शुभ धर्म्य कार्यें ॥ ४ ॥
स्वभाववादासी अवलंबिसी जरी । शुभाशुभ तरी कांहींचि न ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐका कर्मजन्य । पापाचें निदान व्यासोक्त तें ॥ ६ ॥

८४

धर्मानेंचि पाप-पुण्याचा निर्णय । शास्त्रगम्य मात्र धर्म जनीं ॥ १ ॥
ऐशा शास्त्रमार्गें चिंतितांही तुज । दोष लवमात्र नसे धर्मा ॥ २ ॥
शासनसमर्यी शुभाशुभ कर्मे । घडती, तयांचें फलही लाभे ॥ ३ ॥
मानिसी हें जरी अशुभकर्मं तरी । त्यजूनि आंवरीं शोक राया ॥ ४ ॥
सदोषहि धर्म आचरितां पुण्य । नव्होचि शोभन देहत्याग ॥ ५ ॥
दोषाचि ज्या कर्मीं प्रायश्चित्त तया । नष्ट होतां काया तें न घडे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे प्रायश्चित्ताविण । त्यागितांचि प्राण क्लेश बहु ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ३२ वा अध्याय समाप्त

अध्याय ३३ वा

८५

धर्म म्हणे मुने, वधिले मी आप्त । नृपाळ असंख्य सोमप[1] ते ॥ १ ॥
पति-पुत्रहीना हाय त्या ललना । त्यागितील प्राणा माझ्यामुळें ॥२॥
स्त्रीवधपातक तेणें मजप्रति । आम्हां नरकप्राप्ति पातकें त्या ॥ ३ ॥
उग्रतपें देह त्यागूं या कारणें । असतां निवेदावें प्रायश्चित्त ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे धर्म पापशंकी । विनवी व्यासांसी ऐशापरी ॥ ५ ॥

८६

व्यास बोलती राजेंद्रा । शोक न करावा भद्रा ॥ १ ॥
क्षात्रधर्म परिपालन । नव्हे नव्हे हा अधर्म ॥ २ ॥
नियामक काल मुख्य । प्राणी केवळ निमित्त ॥ ३ ॥
कर्मबंधें बद्ध तोही । कर्मासम फल देई ॥ ४ ॥

---

१ यज्ञांत सोमपान करणारे

पराधीन यंत्रासम । भूतें कालपराधीन ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शोक । करणें वास्तव अयोग्य ॥ ६ ॥

८७

असत्यभूत त्या पापाचा संबंध । मानूनियां खेद वाटे जरी ॥ १ ॥
धर्मराजा, तरी प्रायश्चित्त करीं । वधिले दैत्य पूर्वी विप्रांसवें ॥ २ ॥
शालावृक विप्र अठ्ठयायशीं सहस्र । वेदपारंगत दैत्यां साह्य ॥ ३ ॥
तयां सकलांसी वधिलें देवांनीं । वध्याचि त्या मानीं आधार्मिकां ॥४॥
एक किंवा एक कुलनाशें वंश । अथवा संरक्षित राष्ट्र यदा ॥ ५ ॥
तदा त्या कर्मानें बाध न धर्मासी । धर्म अधर्मचि समयीं होई ॥६॥
वासुदेव म्हणे धर्मही अधर्म । तारतम्यें जाण समयीं होई ॥ ७ ॥

८८

शास्त्रज्ञ तूं धर्मा, आंवरीं चित्तासी । रुचला मार्ग हाचि पूर्वी देवां ॥१॥
कदा न तुजसी जाण अधोगति । धीर बांधवांसी देई आतां ॥ २ ॥
पापकर्मे घडे संस्कारही तोचि । निर्लज्जत्वें तेंचि पुढती करी ॥ ३ ॥
जाणावें तें पाप पावलें पूर्णत्व । तया प्रायश्चित्त न करी शुद्ध ॥ ४ ॥
कुलीन तूं धर्मा, पश्चात्तापदग्ध । असतां अपराध शत्रूचाचि ॥ ५ ॥
राया, पापासी या अश्वमेधयज्ञ । प्रायश्चित्त जाण कथिलें शास्त्रीं ॥६॥
वासुदेव म्हणे अश्वमेधशत । करूनियां इंद्र शतक्रतु ॥ ७ ॥

८९

अश्वमेधपुण्यें इंद्र पापमुक्त । होऊनियां सौख्य स्वर्गी भोगी ॥ १ ॥
निष्पापा, विक्रमें पावलासी जय । शत्रुपराजय घडला शौर्यें ॥ २ ।
बंधु, पुत्र आतां स्थापीं राज्यावरी । बाल वा उदरीं गर्भस्थित ॥३॥
पुत्रहीन कोणी असतां कन्येसी । राज्यावरी स्थापीं आनंदानें ॥ ४ ॥
स्त्रिया ऐशा मार्गें त्यजितील शोक । इंद्रासम सौख्य पुढती भोगी ।
मृत्युपराधीन मोहित जे झाले । नाश ते पावले स्वकर्मेंचि ॥ ६ ॥
कुंतिपुत्रा, आतां त्यजूनियां शोक । इहपर सौख्य भोगीं सुखें ॥ ७॥
वासुदेव म्हणे धार्मिका धर्मासी । महर्षी बोधिती पुढती ऐका ॥ ८॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा २२ वा अध्याय समाप्त

अध्याय ३४ था ९०

युधिष्ठिरप्रश्नें निवेदिती व्यास । त्यागितां विहित, करितां त्याज्य- ॥
प्रायश्चित्तार्ह तो कपटाचरणी । निद्रा सायंकाळीं ब्रह्मचाऱ्या ॥ २ ॥
सूर्योदयोत्तर होई जो उत्थित । कुनखी, शामदंत ब्रह्मचारी ॥ ३ ॥
ज्येष्ठबंधूपूर्वी करी जो विवाह । अनुक्रमबाह्य कन्या वरी ॥ ४ ॥
ब्रह्महत्या करी ज्येष्ठ बंधु ज्याचा । उपपति किंवा व्रतभ्रष्ट ॥ ५ ॥
त्रैवर्णिकहत्त्या अपात्रींचें दान । पात्रीं अप्रदान ग्रामघाती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मांसविक्रयी जो । वेदविक्रयी तो अग्नित्यागी ॥ ७ ॥

९१

करी गुरुस्त्रीचा वध । पूर्व पूर्व बहु निंद्य ॥ १ ॥
पशुवध करिती वृथा । अनृतेंचि उपजीविका ॥ २ ॥
तैसे अगारदाहक । करिती गुरुप्रतिबंध ॥ ३ ॥
प्रतिज्ञेसी उल्लंघिती । राया, सर्वहि ते दोषी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐका । लोक-वेदबाह्य कृत्यां ॥ ५ ॥

९२

स्वधर्माचा त्याग परधर्माचरण । अयाज्य याजन, रसविक्रय ॥ १ ॥
अभक्ष्य तें भक्षी त्यागी शरणागतां । पोषी न स्वभृत्यां वधी पशु ॥
सामर्थ्य असूनि न करी संस्कार । द्रव्याचा अपहार विप्राच्याही ॥३॥
आवश्यक तेंही न करी जो दान । अदक्षिण यज्ञ अकार्यें हीं ॥ ४ ॥
पित्यासी कलह, गुरुस्त्रीगमन । स्वपत्नीसेवन समर्यीही न ॥ ५ ॥
प्रायश्चित्तार्ह हीं कथियेलीं कर्में । अपवाद सुखानें ऐकें आतां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्माप्रति व्यास । निवेदिती तेंच पुढती ऐका ॥ ७ ॥

९३

वेदज्ञही शस्त्र घेऊनि धांवतां । तयासी वधितां दोष नसे ॥ १ ॥
वेदप्रामाण्येंचि कथितों हा धर्म । स्पष्ट हें वचन वेदाचेंचि ॥ २ ॥

---

१ ज्येष्ठ कन्येच्या विवाहापूर्वी कनिष्ठेचा स्वीकार करणारा व त्यानंतर ज्येष्ठेचा स्वीकार करणारा हे दोघेही.

क्रोधचि त्यावेळीं वधितो क्रोधासी । तेणें कर्त्यालागीं दोष नसे ॥३॥
अज्ञानें अथवा प्राणरक्षणार्थ । मद्यपि जो त्यास प्रायश्चित्त ॥ ४ ॥
गुरूस्तव जरी गुरुस्त्री सेवन । उद्दालकासम निर्दोषचि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे गुरूस्तव चौर्य । अनिंद्यचि होय विपत्काळीं ॥ ६ ॥

९४

परोपकारार्थ चोरितांहि अन्न । न घेतां आपण दोष नसे ॥ १ ॥
स्वपरप्राणार्थ, गुर्वर्थ, स्त्रियांसी । विवाहीं मिथ्योक्ति निर्दोष ते ॥२॥
स्वप्नीं वीर्यपातें आज्यहोमें मुक्त । संन्यासी पतित ज्येष्ठ बंधु-॥ ३ ॥
असतां, तयापूर्वी करितां विवाह । कर्म तें दोषार्ह मानूं नये ॥ ४ ॥
याचितां न दोष परस्त्रीगमनें । अपात्रीं अज्ञानें दान देतां ॥ ५ ॥
सत्कार्य अज्ञानें जरी असत्कृत । न लागेचि दोष तया कर्मी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे व्यभिचारिणीसी । वागवितां दासीसम शुद्धि ॥ ७ ॥

९५

लोक द्वयोपकारक । सोम जाणूनियां देख ॥ १ ॥
करितां विक्रय तयाचा । दोष नये निज माथां ॥ २ ॥
असमर्थ सेवकासी । त्याजितां धनी न तो दोषी ॥ ३ ॥
धेनूस्तव वनदाहें । दोष लव अंगीं न ये ॥ ४ ॥
कथिले अपवाद आतां । राया, ऐकें प्रायश्चित्तां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मुनि । वदती धर्मास्तव ज्ञानी ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ३४ वा अध्याय समाप्त

## अध्याय ३५ वा

९६

तप कर्म दानें नर पापमुक्त । पुनः न प्रवृत्त होई जरी ॥ १ ॥
घेऊनि नरोटी मागूनियां भिक्षा । सेवावें एकदां मात्र अन्न ॥ २ ॥
ब्रह्मचर्यें सदा उत्सुक सत्कर्मा । राहूनि स्वकर्मा प्रकाशावें ॥ ३ ॥
द्वादशवत्सर त्यजूनि असूया । करी भूमिशय्या पश्चात्तापें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसा जो ब्रह्मघ्न । पापमुक्ति जाण तयालागीं ॥ ५ ॥

९७

ज्ञात्याच्या शस्त्राचें अथवा लक्ष्य व्हावें । अग्नींत होमावें देहासी कीं ॥

अधोमुखें वेद उच्चारूनि मूक । जावें वा, तीर्थास शतयोजनें ॥२॥
सर्वस्व विप्रासी अर्पावें सुखानें । कृच्छ्र चांद्रायणें करितां लाभ ॥३॥
अश्वमेध यज्ञ विप्रार्थ कीं प्राण । अर्पितां ब्रह्मघ्न मुक्त होई ॥ ४ ॥
मद्यप्यानें तप्त प्राशूनियां मद्य । अथवा देहदग्ध करूनि घ्यावा ॥ ५ ॥
मेरूप्रपात कीं केदारारोहण । मुक्त करी जाण मद्यप्यासी ॥ ६ ॥
भूमिदान किंवा बृहस्पतीस्तव । म्हणे वासुदेव यज्ञें शुद्धि ॥ ७ ॥

९८

तप्तलोहस्त्रीसेवन । घडतां गुरुपत्नीगमन ॥ १ ॥
अथवा जननेंद्रियच्छेद । करूनि व्हावा प्राणत्याग ॥ २ ॥
निराहारें वर्ष एक । स्त्रिया होती पापमुक्त ॥ ३ ॥
महाव्रतें सर्वार्पणें । समरीं गुर्वर्थ मरणें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे त्याची । होई पापविनिर्मुक्ति ॥ ५ ॥

९९

असत्यभाषी कीं गुरुप्रतिबंधि । शरण जातां त्यासी पापमुक्त ॥ १ ॥
ब्रह्मचर्यनाशें षण्मासगोचर्म । पांघरितां जाण दोषमुक्त ॥ २ ॥
द्रव्यापहारें तें द्रव्य देतां मुक्ति । द्वादश कृच्छ्रें तीं वांधवानें-॥ ३॥
होतां जेष्ठबंधुविवाह करावीं । विवाह त्यापूर्वी घडतां जाण ॥ ४ ॥
धारणें,पारणें करितां त्याची कांता । होतसे विशुद्धा विधियुक्त ॥५॥
वासुदेव म्हणे भस्मानें भाजन । रजें तेंवी जाण शुद्ध स्त्रिया ॥ ६ ॥

१००

शूद्रोच्छिष्ट तेंवी आघ्रात धेनूनें । भ्रष्ट गंडूषानें कांस्यपात्र ॥ १ ॥
दश घर्षणें तें पावतसे शुद्धि । चतुष्पाद जगीं धर्म विप्रा ॥ २ ॥
एकेकांश न्यून क्षत्रिय वैश्यांसी । तैसाचि शूद्रासी एकपाद ॥ ३ ॥
पशुपक्षीवध अथवा वनच्छेद । भक्षूनि त्रिरात्र केवळ वायु ॥ ४ ॥
दोष निवेदनें तया दोषमुक्ति । वासुदेव कथी पुढती ऐका ॥ ५ ॥

१०१

आर्द्रवस्त्रें भस्मशयन षण्मास । करितां गळे दोष अगम्याचा ॥ १ ॥
पश्चिम प्रदेशीं अल्पाहारयुक्त । गायत्रीचा जप आचरावा ॥ २ ॥
हिंसा, राग, द्वेष, मान, अपमान । विशेष भाषण त्यागूनियां ॥ ३ ॥
ऐसिया कर्मानें सर्वपापमुक्ति । निवेदी व्यासोक्ति वासुदेव ॥ ४ ॥

१०२

उत्तिष्ठित सदा असावें दिनभरी । निद्रा घ्यावी रात्रीं नभाखालीं ॥
दिवारात्रीं स्नान त्रिकाळ करावें । भाषण वर्जावें पतितादिकां ॥ २ ॥
अज्ञातकृत तीं यापरी पातकें । नासूनियां लाभे शुद्धि विप्रा ॥ ३ ॥
भूतसाक्षिकां त्या सकल कर्माचें । मरणोत्तर लाभे फल जीवा ॥४॥
आधिक्य जयाचें फल लाभे तेंचि । यास्तव दानादि आचरावें ॥५॥
वासुदेव म्हणे तपादि सत्कर्म । करितां वाढे पुण्य, पापक्षय ॥ ६ ॥

१०३

महापापांवीण सकल पातकें । योग्य प्रायश्चित्तें नष्ट होती ॥ १ ॥
भक्ष्याभक्ष्य वाच्यावाच्यही तीं ज्ञानें । घडतां पापकर्में अधिक दोष ॥
जाणूनि तैसेंचि घेतां प्रायश्चित्त । दोषविनिर्मुक्त होई प्राणी ॥ ३ ॥
श्रद्धाळु आस्तिक मात्र शुद्धि पावे । अश्रद्ध त्यजावे नास्तिक ते ॥४॥
इहपरसौख्यास्तव शिष्टाचार । आचरिती थोर मार्गचि तो ॥ ५ ॥
प्राणरक्षणार्थ अथवा क्षात्रधर्में । घडलें त्या कर्में दोषी न तूं ॥ ६ ॥
खेद वाटे तरी घेईं प्रायश्चित्त । शोकें परी व्यर्थ न घडो नाश ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे चिंतूनियां धर्म । बोलला वचन व्यासांप्रति ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ३५ वा अध्याय समाप्त

अध्याय ३६ वा

१०४

भक्ष्याभक्ष्य देय पात्रापात्र ताता । निवेदीं तें आतां धर्म बोले ॥ १ ॥
कथिताती सिद्ध-मनूंचा संवाद । ऐकावा जो व्यास कथिती प्रेमें ॥२॥
मुनीलागीं याचि प्रश्नाचें उत्तर । दिधलें साचार स्वायंभुवें ॥ ३ ॥
स्पष्टपणें जेथें नसेल उल्लेख । प्रायश्चित्त तेथ कथितों ऐका ॥ ४ ॥
जप होम उपोषण आत्मज्ञान । उपाय हे धन्य आचरी जो ॥ ५ ॥
व्रतधारी ऐसे जयास्थानीं लोक । अथवा पवित्र स्थानीं वास ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वास पुण्यतीर्थीं । करितां पापाची शुद्धि होई ॥ ७ ॥

१०५

पर्वतनिवास सुवर्णप्राशन । रत्नजळीं स्नान तेंवी घृत ॥ १ ॥

---

१ पतित स्त्री शूद्रांशीं

देवता ज्या स्थानीं त्या स्थानीं गमन। घडतां होती जन दोषमुक्त ॥२॥
ज्ञात्यांचा अवमान कदाही गर्वानें । करूं नये सुज्ञें कदाकाळीं ॥ ३ ॥
घडतां त्रिरात्र तप्तकृच्छ्रें शुद्धि । हेंचि गर्विष्ठासी प्रायश्चित्त ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे दीर्घायुष्यास्तव । ऐसा हा उपाय आचरावा ॥ ५ ॥

१०६

अदत्तग्रहण, दान, अध्ययन, । तप, सत्य, यज्ञ, अक्रोध तैं ॥ १ ॥
अहिंसा, हीं ऐसीं धर्माचीं लक्षणें । अधर्महीं जाणें समयीं हाचि ॥२॥
स्तेय, असत्य तैं हिंसाही प्रसंगीं । अधर्मही जगीं होती धर्म ॥ ३ ॥
लौकिक वैदिक कर्माचे या दोन । श्रेयस्कर जाण पंथ जनीं ॥ ४ ॥
प्रवृत्ति-निवृत्ति समयानुरूपा । तारीतसे लोकां तारतम्यें ॥ ५ ॥
अप्रवृत्तालागीं लाभे अमर्त्यत्व । कर्मै तैं मर्त्यत्व प्राप्त होई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शुभ कर्मै शुभ । अशुभें अशुभ फलप्राप्ति ॥ ७ ॥

१०७

दैवशास्त्रयोगें संरक्षणार्थ कीं । अथवा प्राणदासी रक्षावया ॥ १ ॥
अशुभही कर्म आचारितां शुभ । शुभही अशुभ समयीं घडे ॥ २ ॥
संदेहबुद्धीनें अथवा स्वार्थानें । आचरितां घेणें प्रायश्चित्त ॥ ३ ॥
क्रोध-मोहादिकीं घडतील जे दोष । हविष्यान्न जप कारितां जाती ॥४॥
दंडत्यागें एकरात्र उपोषण । करितां दोषहीन होई राव ॥ ५ ॥
पुरोहितें तीन रात्री आचरावें । वासुदेव भावें कथन करी ॥ ६ ॥

१०८

शोकमग्न जो कीं आत्मघाता सिद्ध। त्रिरात्रोपवास करितां शुद्धि ॥१॥
जाति, वर्ण, ग्राम, कुलधर्मत्यागी। धर्मचि तयासी नसे कांहीं ॥ २॥
यास्तव नव्हे ते कथिती तो धर्म। संदेहींचें वर्म कथितों ऐकें ॥ ३ ॥
वेदशास्त्रवेत्ते दश ते संयमी । धर्मशास्त्रज्ञानी विप्र तीन ॥ ४ ॥
वदतील तोचि निर्णय धर्माचा। संदेहीं मनूचा निर्णय हा ॥ ५ ॥
अभक्ष्य विप्रांनीं कदा भक्षूं नये। तैंवी प्राशूं नये त्याज्य दुग्ध ॥ ६॥
वासुदेव म्हणे अभक्ष्यभक्षण । अपेयाचें पान करितां दोष ॥ ७ ॥

---

१ मेंढी, अजा, अश्वी, गर्दभी, उष्ट्री, दहा दिवसांतील धेनु, मानुषी व हरिणी

१०९

क्षयवृद्धियुक्त अन्न न भक्षावें। वर्ज्य तें जाणावें सकल भक्ष्य ॥ १ ॥
राजअन्नें होई तेजाचें हरण। हरितें शूद्रान्न ब्रह्मतेज ॥ २ ॥
सुवर्णकार तें पति-पुत्रहीना। सेवितां त्या अन्ना आयुर्नाश ॥ ३ ॥
विष्टाचि ते जाणा वार्धुषिक[1] अन्न। तेंवी गणिकान्न शुक्रचि तें ॥ ४ ॥
तैसेंचि जे नर जारसहवासी। अथवा स्त्रीजितांसी तोचि दोष ॥५॥
वासुदेव म्हणे बहुविध ऐसीं। ग्रंथांत मनूचीं निंद्य अन्नें ॥ ६ ॥

११०

शास्त्रोक्तचि अन्न गृहस्थें सेवावें। संन्यासी मानावें आपणासी ॥ १ ॥
ऐसा प्रियदारायुक्त जो गृहस्थ। पुण्य लाभे त्यास निश्चयानें ॥ २ ॥
कीर्तिस्तव किंवा उपकारकर्त्यासी। दान भयानें कीं देऊं नये ॥ ३ ॥
नृत्यगीतासक्ता अथवा हासकां। उन्मत्त प्रमत्तां देऊं नये ॥ ४ ॥
तस्कर, निंदक, मूढ तें विवर्ण। ऐसीयांसी दान करूं नये ॥ ५ ॥
दुर्जन, वामन तेंवी अंगहीन। तेंवी कुलहीन असंस्कृतां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वेदशास्त्रहीन। अपात्रचि दानग्रहणासी ते ॥ ७ ॥

१११

अयोग्यदत्त कीं अयोग्यगृहीत। दानें त्या अनर्थ उभयांतेंही ॥ १ ॥
खदिरकाष्ट कीं पाषाणसंगति। बुडवी नरासी सागरांत ॥ २ ॥
तैसाचि अयोग्य दाता गृहीताही। विनष्टचि होई मनु म्हणे ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे चारित्र्यविहीन। अध्ययनहीन याचक तें ॥ ४ ॥

११२

पय जेंवी श्वानचर्मकोशामाजी। नरकपालींचि उदक जेंवी ॥ १ ॥
चारित्र्यविहीन तेंवी जाणा ज्ञान। स्थानदोषें हीन, त्याज्यचि तें ॥२॥
वेदहीनही जो संतुष्ट अंतरीं। तेंवी निर्मत्सरी शास्त्रहीन ॥ ३ ॥
व्रतहीन दीनाप्रतिही दयेनें। अर्पितां त्या दानें पुण्यलाभ ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे जाणूनियां दान। करील त्या पुण्य तारतम्यें ॥ ५ ॥

११३

केवळ दयेनें आर्त दीनांप्रति। अर्पितां न त्यासी म्हणती दान ॥ १ ॥

[1] व्याजावर जगणारा.

वेदशास्त्रहीन विप्रही अपात्र । जाणावा अयोग्य दानासी तो ॥ २ ॥
काष्ठमय हत्ती चर्ममय मृग । अनधीत विप्र नांवाचा तैं ॥ ३ ॥
षंढ जैं स्त्रियांसी, धेनु धेनूप्रति । पंखहीन पक्षी तैसाचि तो ॥ ४ ॥
शून्यधान्य किंवा निर्जल जैं कूप । रक्षेमाजी हुतद्रव्य जेंवी ॥ ५ ॥
अपात्रींचें दान जाणावें तैसेंचि । हव्य कव्य नाशी सुगति न त्या॥६॥
वासुदेव म्हणे तया देवद्वेष्ट्या लाभ न स्वर्गाचा कदाकाळीं ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ३६ वा अध्याय समाप्त

## अध्याय ३७ वा

११४

धर्म म्हणे राजधर्म चातुर्वर्ण्य । ऐकवावें पूर्ण मजलागीं ॥ १ ॥
द्विजश्रेष्ठा, आपद्धर्मही कथावा । मज कां न व्हावा बोधें मोद ॥ २ ॥
धर्ममार्गें कैंवी पृथ्वीचें पालन । करावें, अज्ञान निवारावें ॥ ३ ॥
धर्माचार तेंवी राज्य परस्पर । विरुद्ध साचार दिसती मज ॥ ४ ॥
मुनीश्वरा, तेणें अनिवार मोह । म्हणे वासुदेव वदला धर्म ॥ ५ ॥

११५

वैशंपायन तैं जनमेजयाप्रति । वदले नारदांसी ज्ञानिश्रेष्ठां- ॥ १ ॥
अवलोकूनियां तयावेळीं व्यास । बोलले धर्मास भीष्मां भेटें ॥ २ ॥
सर्वधर्मज्ञ तो भागीरथीपुत्र । संशयनिवृत्त करील तुज ॥ ३ ॥
इंद्रादींचें जया प्रत्यक्ष दर्शन । जयासी प्रसन्न गुरु शुक्र ॥ ४ ॥
च्यवन, वसिष्ठ वेदपुराणांचे । धर्मा, ज्या वीराचे असती गुरु ॥ ५ ॥
ज्येष्ठ ब्रह्मपुत्र कुमार जयाचा । श्रेष्ठ ज्ञानदाता महाज्ञानी ॥ ६ ॥
यतिधर्म जया म्हणे वासुदेव । मुनि मार्कंडेय कथिती सर्व ॥ ७ ॥

११६

अस्त्रगुरु ज्याचे इंद्र, परशुराम । स्वाधीन मरण असूनि नर ॥ १ ॥
अनपत्याही ज्या लाभेल स्वर्लोक । ज्याचे सभासद सकल ऋषि ॥ २ ॥
कांहींचि ज्या ज्ञान नसे अविदित । सर्वज्ञ तो तुज करिल बोध ॥ ३ ॥
सूक्ष्म धर्मतत्व ज्ञाता तो धर्मज्ञ । जाईल त्यजून त्वरित देह ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे व्यासोक्ति ऐकून । वदला काय धर्म पुढती ऐका ॥ ५ ॥

११७

रोमहर्षण हा करूनि विनाश । अन्यायें भीष्मांस वधिलें जेणें ॥ १ ॥
तयासीच कैसे प्रश्न हे ज्ञानाचे । मुनीश्वरा, सांगें विचारावे ॥ २ ॥
तदा सर्वलोकहितार्थ श्रीकृष्ण । बोलला वचन धर्माप्रति ॥ ३ ॥
नृपश्रेष्ठा, ऐकें व्यासोक्ति, पृथ्वीतें । पाळूनि जनांतें सौख्य देईं ॥४॥
ग्रीष्मांतीं पर्जन्या प्रार्थिती जें जन । प्रार्थिती तें जाण बंधु तुज ॥५॥
अवशिष्ट राजे तैसी सर्व प्रजा । प्रार्थी महाराजा राज्य करीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि कृष्णोक्ति । धर्म कर्तव्यासी सिद्ध होई ॥ ७ ॥

११८

महाज्ञाता धर्मराज । जैसा नक्षत्रांत चंद्र ॥ १ ॥
तैसा शोभला त्या वेळीं । बहुत राजे भोंवतालीं ॥ २ ॥
अग्रभागीं धृतराष्ट्र । मागें शोभे कुंतीपुत्र ॥ ३ ॥
ऐसा नगरांत प्रवेशे । पूजी विप्रां देवतांतें ॥ ४ ॥
पुढती दिव्य वस्त्रयुक्त । दिव्यमंत्रें अभिमांत्रित ॥ ५ ॥
ऐशा दिव्यरथामाजी । वृषभ षोडश जयासी ॥ ६ ॥
जोडीयेले शुभ्रवर्ण । चढला तयावरी धर्म ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कैसी । शब्दें वर्णावी शोभा ती ॥ ८ ॥

११९

स्तवन जयाचें करिती बंदीजन । रश्मि धरी भीम महाबळी ॥ १ ॥
शुभ्रवर्ण छत्र तारकासंयुक्त । धरी वीर पार्थ धर्मावरी ॥ २ ॥
नकुळ-सहदेव चामरें ढाळिती । बंधु ते भासती पंचभूतें ॥ ३ ॥
मागोमाग शुभ्रवर्ण रथामाजी । युयुत्सु एकाकी धार्तराष्ट्र ॥ ४ ॥
तयाच्या मागूनि श्रीकृष्णमुरारी । शोभे धनुर्धारी सात्यकी त ॥५॥
अग्रभागीं अंध गांधारीसमेत । शोभे पालखींत पुढती स्त्रिया ॥ ६ ॥
कुंती द्रौपदीही वाहनीं शोभती । स्यंदन पदाति मागें त्यांच्या ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसें अलौकिक । नृपाळाचें देख अभियान तें ॥ ८ ॥

---

१ मिरवणूक

१२०

शृंगारिलें बहु नगर जनांनीं । झांकिले पुष्पांनीं सकल मार्ग ॥ १ ॥
माला पताकाही शोभती सर्वत्र । मार्ग सुगंधित उदकें सिक्त ॥ २ ॥
सर्वत्र कोंदला सुगंध धूपाचा । जागजागीं शोभा केली बहु ॥ ३ ॥
सुगंधित चूर्णें मंडित भवन । पुष्पें माला जाण बहुविध ॥ ४ ॥
ऐशा नगरामाजी सहपरिवार । प्रवेशे नृपाळ बंधूंसवें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे हस्तिनापुराची । अलौकिक ऐसी शोभा तदा ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ३७ वा अध्याय समाप्त

अध्याय ३८ वा

१२१

नगरप्रवेश पंडुतनयाचा । पाहूनियां लोकां हर्ष बहु ॥ १ ॥
सहस्रावधि ते जन हर्षोत्फुल्ल । चत्वरीं सकल नारीनर ॥ २ ॥
वर्धमान सिंधु जैंवी चंद्रोदयीं । तैसी त्या समयीं नगरी शोभे ॥ ३ ॥
रत्नमंदिरें तीं सकळ स्त्रियांनीं । शोभलीं फुलूनि जैसे वृक्ष ॥ ४ ॥
सव्रीडचि स्त्रिया स्तविती पांडवां । प्रशंसिती आर्या द्रौपदीतें ॥५॥
वासुदेव म्हणे स्त्रियांचे हे शब्द । करिताती व्याप्त सकल पुर ॥ ६ ॥

१२२

मंदिरासमीप येई युधिष्ठिर । गौरविती सर्व लोक तया ॥ १ ॥
शत्रुनिषूदना, विजयी तूं दैवें । धर्ममार्गें शौर्यें जाहलासी ॥ २ ॥
शताब्दें तूं आतां पृथ्वीचें पालन । करीं आचरून स्वधर्मातें ॥ ३ ॥
घेऊनियां ऐसे विप्रआशीर्वाद । नृपमंदिरांत शिरला राव ॥ ४ ॥
देवतादर्शन पूजन करूनि । पुनरपि येऊनि विप्रां वंदी ॥ ५ ॥
अमूल्य रत्नांनीं तयां तोषविलें । वेदघोष आले कर्णीं तदा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्मजयजयकार । भरूनि अंबर जाई तेणें ॥ ७ ॥

१२३

राजमंदिरीं त्या येतां ते सकळ । जाहलें नवल एक ऐका ॥ १ ॥
वेषधारी यति रुद्राक्षी त्रिदंडी । न घेतां अनुमती उठूनि वदे ॥२॥
मजवरी भार टाकूनि हे विप्र । मन्मुखें साचार वदती ऐकें ॥ ३ ॥
राजा धर्मा, असो धिक्कार तुजसी । तूं ज्ञातिघातकी दुष्ट राव ॥४॥

ज्ञातिवधपापें घडेल न काय । घात हाय हाय गुरूंचाही ॥ ५ ॥
मरणचि आतां श्रेयस्कर तुज । राहूनि जिवंत काय लाभ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसी त्या दुष्टाची । वाणी ऐकतांचि विप्र दुःखी ॥७॥

१२४

जणु अवमानित विप्र दुःखी झाले । लज्जायुक्त झाले स्तब्ध तदा
खिन्नचित्तें बोले तयांप्रति धर्म । ज्ञाते हो प्रसन्न व्हावें मज ॥ २ ॥
शरणागताचा धिक्कार न ऐसा । मान्य होई श्रेष्ठां कदाकाळीं ॥ ३ ॥
उच्चस्वरें तदा बोलले ब्राह्मण । नव्हेचि वचन आमुचें हें ॥ ४ ॥
पुढती विप्रांसी तपोबळें ज्ञान । दैत्य दुर्योधनसखा ऐसें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विप्र ते धर्मासी । ऐका जें बोलती पुण्यवंत ॥ ६ ॥

१२५

धर्मा, चार्वाक हा दुर्योधनसखा । वेष संन्यासाचा जरी यातें ॥ १ ॥
इच्छूनि तयाचें हित ऐसें वदे । शब्द न आमुचे वदला तो जे ॥ २ ॥
व्यर्थ ऐसें भय न धरीं मनांत । कल्याणचि नित्य होवो तव ॥ ३ ॥
बोलूनियां ऐसें हुंकार करूनि । वधिलें विप्रांनीं चार्वाकातें ॥ ४ ॥
केवळ हुंकारें वध त्याचा होतां । पडे वृक्ष जैसा वज्राघातें ॥ ५ ॥
सत्कारी त्यावेळीं धर्म विप्रांप्रति । आशीर्वाद देती विप्र धर्मा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विप्र ते स्वस्थानीं । आनंदें निघूनि पुढती गेले ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ३८ वा अध्याय समाप्त

अध्याय ३९ वा

१२६

विप्रगमनोत्तर कृष्ण म्हणे धर्मा । पूजीं तूं ब्राह्मणां सर्वकाल ॥ १ ॥
साक्षात् भूमिदेव समजें तूं यांसी । वंद्य हे मजसी कुंतिपुत्रा ॥ २ ॥
केवळ वाग्विषें करितील हे दग्ध । होतां हृष्टचित्त वर देती ॥ ३ ॥
कृतयुगीं पुरा बदरीवनांत । आचरी चार्वाक तप बहु ॥ ४ ॥
तुष्ट होतां ब्रह्मा निर्भयता मागे । ब्रह्मदेव सांगे तदा तया ॥ ५ ॥
अवमान जरी करिसी विप्रांचा । नाशकाळ साचा तोचि तव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे चार्वाकाचें वृत्त । निवेदी अच्युत धर्माप्रत ॥ ७ ॥

१२७

ऐकूनि तो वर हर्षला चार्वाक । देवादिकां दुःख देई बहु ॥ १ ॥
विधात्यासी देव पुशितां तो त्यांसी । म्हणे हा विप्रांसी अवमानील ॥
दुर्योधनसख्य बाधेल चार्वाका । घडली तेचि वाचा सत्य आजि॥३॥
भाषणें तयाच्या करूं नको खेद । स्वधर्मीचि वध घडला असे ॥ ४ ॥
शत्रुवधें करीं प्रजेचें रक्षण । पूजावे ब्राह्मण सर्वकाळ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पूर्ववृत्त ऐसें । कृष्ण चार्वाकाचें कथिता झाला ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ३९ वा अध्याय समाप्त

अध्याय ४० वा

१२८

शोकतापहीन तयावेळीं धर्म । आनंदित मन होऊनियां ॥ १ ॥
पूर्वाभिमुख तो सुवर्णआसनीं । बैसला येऊनि नम्रभावें ॥ २ ॥
अभिमुख त्याच्या सात्यकी श्रीकृष्ण । शोभविती स्थान कनकमय ॥
सभोंवतीं कुंती भीमार्जुनादिक । विदुर धृतराष्ट्र धौम्यासवें ॥ ४ ॥
गांधारी युयुत्सु तैसाचि संजय । बैसताती सर्व शुभासनीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सर्वतोभद्रादि । स्पर्शी शुभवस्तूंसी युधिष्ठिर ॥ ६ ॥

१२९

धौम्यद्वारा तदा सकल प्रजाजन । अहेर अर्पून भेट घेती ॥ १ ॥
सुवर्ण, रत्नें तैं अभिषेकपात्रें । समिधा मधु घृतें स्त्रुवादिक ॥ २ ॥
सुवर्ण-मृत्तिकाकुंभ उदकपूर्ण । शंखादि पावन वस्तु बहु ॥ ३ ॥
कृष्णाज्ञेनें धौम्य धर्मराजाप्रति । स्थानीं बैसविती शुभ वेळीं ॥ ४ ॥
याज्ञसेनीसवें सुआसनीं धर्म । बैसतांचि धौम्य हविती द्रव्यें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पाहूनि तें कृष्ण । हर्षित होऊन उठला स्वयें ॥ ६ ॥

१३०

सुपूजित शंख घेऊनि करांत । केला अभिषेक हृषीकेशें ॥ १ ॥
धृतराष्ट्रासवें अमात्य सकळ । वर्षिताती जल धर्मावरी ॥ २ ॥
कृष्णानुज्ञात तैं बंधूसवें राजा । अमृतचि ज्याचा मुखचंद्र ॥ ३ ॥
पणव आनक दुंदुभींचा नाद । कोंदूनियां नभ जाई तदा ॥ ४ ॥
धर्मानुसारी ते उपचार धर्म । प्रेमें स्वीकारून पूजी श्रेष्ठां ॥ ५ ॥

वासुदेव म्हणे स्वस्तिमंत्रें विप्र । देती आशीर्वाद धर्माप्रति ॥ ६ ॥

१३१

निष्क सहस्र दक्षिणा । अर्पी धर्म तें ब्राह्मणां ॥ १ ॥
वेदशास्त्रज्ञ संयमा । शीलवंत वदले वाणी ॥ २ ॥
होवो कल्याण सर्वदा । धर्मा, विजय होवो तुझा ॥ ३ ॥
सुदैवें हा अभ्युदय । विक्रमें हें सिद्ध कार्य ॥ ४ ॥
भाग्यें वांचलाती रणीं । असो आतां उत्तरकर्मी ॥ ५ ॥
धर्मा, त्वरित होई रत । ऐकूनि तें राव हृष्ट ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्म । धाला राज्य स्वीकारून ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ४० वा अध्याय समाप्त

अध्याय ४१ वा

१३२

देशकालोचित आपुलें स्तवन । ऐकानयां धर्म वदला जनां ॥ १ ॥
तथ्यातथ्यही जे वर्णियेले गुण । अनुग्रहपूर्ण मानितों मी ॥ २ ॥
निर्मत्सर तुम्हीं वर्णितां आम्हांसी । कृपा हे विप्रांची आम्हांवरी ॥३॥
हितास्तव माना धृतराष्ट्रआज्ञा । दैवतचि आम्हां पितृव्य हा ॥ ४ ॥
याच्यास्तवचि मी वांचलों या रणीं । ज्ञातीसी वधूनि ऐशापरी ॥५॥
माझ्यासवें माना हाचि जगत्स्वामी । अतन्द्रितचि मी सेवीन या ॥
वासुदेव म्हणे यापरी बोलून । बोळविले जन युधिष्ठिरें ॥ ७ ॥

१३३

यावराज्य भीमा अर्पूनि पुढती । विदुरासी मंत्री योजी राव ॥ १ ॥
निर्णय तें मंत्र षाड्गुण्याचतन । काय निवेदून तयाप्रति ॥ २ ॥
कृताकृत, परिज्ञान, आयव्यय । कार्यी या संजय योजियेला ॥ ३ ॥
वेतन, अन्न त सैन्यपरिमिति । कार्यं सैनिकांचीं नकुळालागीं ॥ ४ ॥
परचक्ररोध, दुष्टावमर्दन । पार्थाप्रति धर्म कार्य सांगे ॥ ५ ॥
विप्रदेवकाजीं धौम्यांप्रति योजी । सहदेव रक्षी नित्य धर्मा ॥ ६ ॥
युयुत्सु, संजय तैसाचि विदुर । अंधासव राष्ट्र सेविताती ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे योग्याची योजना । योग्य कार्यी जाणा तेंचि यश ॥८॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ४१ वा अध्याय समाप्त

अध्याय ४२ वा १३४

उदारधी धर्म करी श्राद्धकर्में । रत्नादिक दानें मृतांस्तव ॥ १ ॥
पुत्र, द्रोण, कर्ण, धृष्टद्युम्नादिक । रावही अनेक साह्यकर्ते ॥ २ ॥
पडले जे रणीं त्यांचें और्ध्वकर्म । प्रेमें आचरून दानें देई ॥ ३ ॥
प्रपा, सभास्थानें तैसेचि तडाग । निर्मिले स्मरणार्थ असहायांच्या ॥४॥
पति-पुत्रहीन स्त्रियांचें रक्षण । वृद्धांचा सन्मान प्रेमें करी ॥ ५ ॥
दीन, अंध तेंवी निर्धन रक्षिले । आनंदित केले अवघे जन ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसा शत्रुहीन । ऋणमुक्त धन्य धर्मराजा ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वांचा ४२ वा अध्याय समाप्त

अध्याय ४३ वा १३५

महाज्ञानी पुण्यवंत युधिष्ठिर । जोडूनियां कर वदला कृष्णा ॥ १ ॥
देवा, त्वत्प्रसादें, नयें बुद्धिबलें । विक्रमें लाभलें राज्य मातें ॥ २ ॥
कमलाक्षा, तुज नमितों वारंवार । म्हणती परात्पर विप्र तुज ॥ ३ ॥
विश्वकर्मन् विश्वसंभव विश्वात्मन् । नमस्ते महात्मन् विष्णो, जिष्णो
बहुवेळां येसी, अदितीउदरीं । त्रियुगनामधारी तूंचि एक ॥ ५ ॥
त्रिनेत्र तूं रुद्र प्रभु तूंचि विष्णु । वासुदेव वर्णू केंवी म्हणे ॥ ६ ॥

१३६

शत्रुतापसह शरीरांत जीव । सेनापति, गुह, अविनाशी तूं ॥ १ ॥
पदभ्रष्ट तूंचि करिसी शत्रूसी । विप्र क्षत्रियादि सकल तूंचि ॥ २ ॥
परिव्राजकादि तूंचि श्रेष्ठ मूर्ति । यज्ञ तूं इंद्रादि सकळ देव ॥ ३ ॥
स्वर्गीतूनि तूंचि अवतीर्ण होसी । सम्राट्ट विराटादि तूंचि सर्व ॥४॥
प्रभुत्वसंपन्न, ध्रुव तूं वामन । कालचक्र, सूक्ष्म विभु तूंचि ॥ ५ ॥
लक्ष्मीचें निधान कमल तूं देवा । उत्पत्ति, प्रलया विश्वयोने ॥ ६ ॥
चक्रशार्ङ्गधरा कृष्णा घे वंदन । ऐकूनि स्तवन कृष्ण तोषे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कमलनयन । करी अभिनंदन नृपाळाचें ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वांचा ४३ वा अध्याय समाप्त

अध्याय ४४ वा १३७

निरोप धर्मानें देतां मंत्रिजन । गांठिती सदन आपुलालें ॥ १ ॥
भीम पराक्रमी भीमप्रमुखांसी । बोलला नृपति तयावेळीं ॥ २ ॥
तया घोररणीं जाहलांती श्रांत । तैसेचि ते कष्ट वनवासींचे ॥ ३ ॥
यास्तव सुखानें आतां विजयसौख्य । भोगूनि चित्तास हर्ष वाटो ॥
चित्तस्वास्थ्य तैंवी विश्रांति लाभतां । उदयीक आमुचा पुनर्योग॥५॥
वासुदेव म्हणे कार्यसिद्धिक्षण । लाभे धन्यधन्य तोचि जनीं ॥ ६ ॥

१३८

दुर्योधनगृह शोभविलें भीमें । दासदासी रत्नें विविध जेथें ॥ १ ॥
सुवर्णतोरण दुःशासनगृह । शोभवी विजय नृपाज्ञेनें ॥ २ ॥
दुर्मर्षण दुर्मुखांचिया भवनीं । माद्रीतनयांनीं वास केला ॥ ३ ॥
अर्जुनमंदिरीं सात्यकि श्रीकृष्ण । आनंदें शयन करिते झाले ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अन्यदिनीं सर्व । जाहले एकत्र धर्मगृहीं ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ४४ वा अध्याय समाप्त

अध्याय ४५ वा १३९

राज्य प्राप्त होतां विनयें तैं नयें । चातुर्वर्ण्य स्वयें स्थापी राजा ॥१॥
सहस्र स्नातकां अर्पी बहु निष्क । अतिथि सेवक तुष्ट करी ॥ २ ॥
दीनजनां तैंवी तार्किकां तोषवी । धौम्यांप्रति देइ धेनु धन ॥ ३ ॥
विदुराचा तैंवी केला बहुमान । आश्रितांहि धन वांटियेलें ॥ ४ ॥
अंध गांधारी तैं विदुरासी राज्य । अर्पूनियां सौख्य भोगी धर्म ॥५॥
वासुदेव म्हणे सर्वत्र यापरी । धर्मराज करी शांत जनां ॥ ६ ॥

१४०

पुढती जोडूनि कर धर्मराज । भेटला कृष्णास नम्रभावें ॥ १ ॥
रत्नखचित जो शोभला पर्यंकीं । नीलमेघ कांति शोभे बहु ॥ २ ॥
दिव्य अलंकारभूषित शरीर । झळके पीतांबर कनकासम ॥ ३ ॥
सुवर्णभूषित इंद्रनीलापरी । अपूर्व शोभली दिव्यकांति ॥ ४ ॥
उदयाद्रीवरी सहस्र किरण । वक्षस्थलीं रत्न तैसें शोभे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे उपमा न तया । त्रैलोक्यीं माधवा अन्य कांती ॥ ६ ॥

१ गांधारीनें

१४१

मानवस्वरूपी विष्णूसी त्या धर्मे । सस्मितवदन वदला वाणी ॥ १ ॥
बुद्धिमंतांमाजी वरिष्ठा श्रीकृष्णा । स्वस्थता त्वन्मना लाभली कीं ॥
सुखनिद्रालाभ जाहला कीं तुज । यश त्रैलोक्यांत पसरे तव ॥ ३ ॥
त्वत्प्रसादें आम्हां विजयकीर्तिलाभ । स्वधर्माचा भंग घडला नाहीं ४
वासुदेव म्हणे ऐकतां तें कृष्ण । स्थिर ध्यानमग्न तदा होई ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ४५ वा अध्याय समाप्त

अध्याय ४६ वा १४२

धर्म म्हणे कृष्णा अमितविक्रमा । आश्चर्यनिधना कोणा ध्यासी ॥ १ ॥
विश्वाधारा, क्षेम असे कीं विश्वाचें । चतुर्थ मार्ग तें वरिसी ध्यान॥२
देहत्रयालागीं लंघूनि गेलासी । विस्मय मानसीं वाटे मज ॥ ३ ॥
शरीरस्थ पंचकर्मा वायुलीन । इंद्रियें विलीन मनामाजी ॥ ४ ॥
वाणी मनाचाही महत्तत्त्वीं लय । सर्वांचा विलय जीवामाजी ॥ ५ ॥
काष्ठपाषाणसा निश्चेष्ट तूं देवा । निवातस्थ व्हावा दीपचि कीं ॥६॥
आद्यंतशून्या तूं शरणागतत्राता । निवेदीं ध्यानाचा हेतु ऐशा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सुहास्यवदन । बोलला श्रीकृष्ण भान येतां ॥ ८ ॥

१४३

शरतल्पीं साक्षात् अग्नीसम भीष्म । करितो चिंतन धर्मा, माझें ॥१॥
ज्ञाता विक्रमी तो त्रैलोक्यविजयी । ध्यातां मन जाई तयापाशीं ॥२॥
वसिष्ठमुनींनीं पढाविलें ज्यासी । भार्गवशिष्यासी त्याचि ध्यातों ॥३॥
चंद्रविहीना ते शर्वरी ज्यापरी । होईल धरित्री तयावीण ॥ ४ ॥
यास्तव जाऊनि वंदीं तयाप्रति । जें जें तुझ्या चित्तीं विचारीं तें॥५॥
चातुर्विद्या चातुर्होत्र राजधर्म । तैसे वर्णाश्रम जाणूनि घे ॥ ६ ॥
ज्ञानसूर्याचा त्या जगीं होतां अस्त । ज्ञानाचाही लोप जाण राया ॥७॥
वासुदेव म्हणे धर्मासी यापरी । प्रेरणा श्रीहरी करी प्रेमें ॥ ८ ॥

---

१ जागृदादि अवस्थात्रयभिन्न

१४४

धर्म म्हणे कृष्णा, भीष्माचें महात्म्य। विप्रवाक्यें जाण ऐकिलें जें॥१॥
तोंचि हे माधवा, कथिसी मजप्रति। लवहीन चित्तीं शंका माझ्या॥२॥
उत्तरायणाचा प्रारंभ न देवा। तोंचि हे केशवा भेटूं भीष्मा॥ ३॥
जगद्रूपें क्षर अक्षर ब्रह्मत्वें। क्षराक्षररूपें उभय तव॥४॥
ऐशा हे अच्युता, दर्शन भीष्मासी। देईं हेचि माझी इच्छा असे॥५॥
वासुदेव म्हणे मान्य तें कृष्णासी। शैब्य-सुग्रीवेंसी सजला रथ॥६॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ४६ वा अध्याय समाप्त

अध्याय ४७ वा

१४५

(भीष्मस्तवराज)

जनमेजयप्रश्नें वैशंपायनांनीं। कथिलें जें जनीं तेंचि ऐका॥ १॥
प्रपितामहांनीं स्वशरीरत्याग। करितां जो योग अवलंबिला॥ २॥
घुसले शरीरीं बाण तेचि कर। तळपे भास्कर भीष्म ऐसा॥ ३॥
ईश्वरध्यानांत चित्त झालें लीन। भोंवती मुनिगण व्यासादिक॥ ४॥
शरतल्पस्थित भीष्म ऐशापरी। चिंतिती श्रीहरी मनामाजी॥ ५॥
वासुदेव म्हणे पद्मनाभ कृष्णा। जोडूनि करांना स्तविती प्रेमें॥ ६॥

१४६

संक्षेप विस्तारें कृष्णसंतोषार्थ। उच्चारीन शब्द जे जे आतां॥ १॥
संतुष्ट त्यायोगें होवो पुरुषोत्तम। शुद्ध ससाधन तोचि एक॥ २॥
अनादि अनंता देवादिक कोणी। जाणती न जनीं विष्णुविण॥ ३॥
अविनाशी अतींद्रियाचा त्या बोध। विष्णूचि सानंद सकलां करीं॥
सूत्रस्थित रत्नांसम जेथ भूतें। विराजती त्यांतें लयही जेथ॥५॥
कार्यकारणाची गुंफण हीं विश्वें। पटचि जाणावे जयावरी॥ ६॥
अनंतावयव अनंतकिरीट। श्रेष्ठाहूनि श्रेष्ठ अणुचा अणु॥ ७॥
वासुदेव म्हणे तया अव्ययासी। भीष्म प्रार्थिताती न कळे कैंवी॥८॥

१४७

वासुदेव संकर्षण। अनिरुद्ध तैं प्रद्युम्न॥ १॥
ऐशा श्रेष्ठ नामें ज्यासी। नित्य सज्जन स्तविती॥ २॥

स्वस्वधर्म सुअनुष्ठित । लीन होतसे जयांत ॥ ३ ॥
सर्वज्ञ त्या सर्वात्म्यासी । शरण असें मी विनयेंसी ॥ ४ ॥
अरणीप्रदीप्त अग्नीतें । माता प्रगटवी तैं ज्यातें ॥ ५ ॥
विप्र, वेद, यज्ञास्तव । भेदातीत तो अव्यय ॥ ६ ॥
इंद्रवायुहूनि बल । तेज जयाचें अतुल ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । म्हणे आधार श्रीकृष्ण ॥ ८ ॥

१४८

पुरुष त्या पुरा कल्पीं संबोधिती । युगारंभीं ज्यासी म्हणती ब्रह्म ॥
संहारकत्वें ज्या म्हणती संकर्षण । तया मी शरण सर्वभावें ॥ २ ॥
एक असूनि जो सर्व हें नटला । त्या कल्पद्रुमाला नमन असो ॥ ३ ॥
प्रळयकाळीं जो आश्रय विश्वातें । जळचरांसी तें उदक जेंवी ॥ ४ ॥
सर्व दुःखांचें जो एक दिव्यौषध । आराधिती दैत्यदेवादि त्या ॥ ५ ॥
संहारकवलसंपन्न प्रभूसी । परब्रह्मसाक्षी म्हणती ज्ञाते ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे द्वादश आदित्य । अदितीचे पुत्र तोचि झाला ॥ ७ ॥

१४९

शुक्लपक्षीं देवां, पितरां कृष्णांत । तोषवी चंद्रास तया वंदूं ॥ १ ॥
ज्ञानातीता तया ज्ञेयरूपाप्रति । वंदूं वेदरूपी नारायणा ॥ २ ॥
यज्ञरूपा तया माझा नमस्कार । देव हंसाकार नमन तया ॥ ३ ॥
स्वरव्यंजनादि अक्षरात्मकासी । शेषशयनासी नमस्कार ॥ ४ ॥
यज्ञ होम स्तोत्र हंस वागादिक । वीर्य निद्रारूप पमारत्मा जो ॥५॥
धर्ममार्ग प्रवर्तक जो सत्यात्मा । वंद्य तो परमात्मा वासुदेवा ॥ ६ ॥

१५०

पृथक् पृथक् धर्में उपासना ज्याची । करिती धर्मात्म्यासी नमन तया
कामनामयचि जीवासी जो निर्मी । कामरूपासी मी वंदितों त्या ॥२॥
अव्यक्त जें मुनि व्यक्तांत शोधिती । तया क्षेत्रात्म्यासी नमस्कार ॥३॥
सांख्यात्मा योगात्मा वंदितों मोक्षात्मा । घोरात्मा मायात्मा वंदितों मी

---

१ देवकी

योगनिद्रात्मा जो तैसाचि पद्मात्मा । तोयात्मा हेत्वात्मा नमितों प्रेमें ॥
इष्टानिष्ट द्रष्टा साक्षी जो तो वंद्य । वंद्य अकुंठित कार्यात्मा तो ॥६॥
वासुदेव म्हणे क्रौर्यात्मा वाय्वात्मा । वंद्य तो कालात्मा वर्णात्माही ॥

१५१

लोकात्मा विश्वात्मा गोप्तात्मा प्राणात्मा । पाकात्मा दृप्तात्मा वंदन त्या
सुक्षात्मा वीर्यात्मा मोहात्मा ज्ञानात्मा । दिव्यात्मा ब्रह्मात्मा नमन तयां
रुद्रात्मा उग्रात्मा शांतात्मा सर्वात्मा । नमितों विश्वकर्मा भूतातीत
सर्वांतर्यामी तैं सर्वातीत देवा । नमस्कार घ्यावा प्रेमें माझा ॥ ४ ॥
अगोचर सर्वकाळ तुझें रूप । परी प्रत्ययास येई माझ्या ॥ ५ ॥
कारण त्वद्रूप असे सनातन । ब्रह्मांड व्यापून उरलासी तूं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे त्रैलोक्यव्यापका । दर्शन भाविकां प्रेमें देसी ॥ ७ ॥

१५२

दिशा तुझे बाहु, सूर्य चंद्र नेत्र । वीर्यस्थानीं शुक्र वास करी ॥ १ ॥
आवह प्रवहादिक मार्ग सप्त । वायूचे ते व्याप्त तुझ्यारूपें ॥ २ ॥
अतसीकुसुमासम तुझी कांति । झळके हे किती पीतवस्त्रा ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे भवभयभंग । वंदितां गोविंद सहज होई ॥ ४ ॥

१५३

दशाश्वमेधांचें लाभतसे पुण्य । एकही प्रणाम करितां कृष्णा ॥ १ ॥
यज्ञपुण्यक्षीण होतां जन्म येई । पुनर्जन्म नाहीं कृष्णभक्तां ॥ २ ॥
हवनें जेंवी आज्य होई अग्निरूप । तेंवी कृष्णभक्त कृष्णरूप ॥ ३ ॥
रात्रंदिन जया ध्यास श्रीहरीचा । कृष्णमय त्यांचा देह होई ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे उठतां निद्रेंतूनि । धन्य ध्यानीं मनीं कृष्ण जया ॥ ५ ॥

१५४

कवच जो भक्तां होई नरकामाजी । भवसिंधुमाजी नौकाचि जो ॥१॥
नमस्कार प्रेमें तया विष्णुप्रति । ब्रह्मज्ञ मुनींसी आधार जो ॥ २ ॥
गोब्राह्मणांचा कृष्ण हितकर्ता । जगद्धित कर्ता गोविंद तो ॥ ३ ॥
वारंवार तया देवासी नमन । करितों जोडून हात दोन्ही ॥ ४ ॥
संसारारण्यांत प्राण्यासी पाथेय । औषध वा दिव्य हरिनाम ॥ ५ ॥
अक्षरद्वय तें दुःखशोकहारी । वासुदेव करी स्मरण नित्य ॥ ६ ॥

१५५

विष्णुमय सत्य, विष्णुमय जग । सर्वंचि हें चांग विष्णुमय ॥ १ ॥
यास्तव पापाचा नाश माझ्या होवो । सद्भक्ताचें पाहो हित विष्णु ॥
विद्या तप योनि अयोनि विष्णूसी । स्तविलें प्रेमेंसी यथामति ॥ ३ ॥
वाग्यज्ञानें आराधित या श्रीकृष्ण । होवो सुप्रसन्न मजवरी ॥ ४ ॥
कृष्णचि हा परब्रह्म कृष्ण तप । कृष्णचि दैवत श्रेष्ठ माझें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सर्वदा सर्वंचि । सर्वत्र कृष्णाचि दिसो मज ॥ ६ ॥

१५६

मुनि म्हणे राया, पुढती नमोनमः । ऐकूं येती जनां होचि शब्द ॥१॥
पुढती तोही शब्द न येई मुखानें । सद्गद दुःखानें अवघे होती ॥ २ ॥
तोंचि कृष्णार्जुन धर्म सात्यकीही । रथांत वैसती त्वरायुक्त ॥ ३ ॥
रथचक्रघोषें निनादलें नभ । प्रशंसी गोविंद भीष्मांप्रति ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे धेनुवत्सभेटी । होतांचि दुग्धासी काय तोटा ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ४७ वा अध्याय समाप्त

अध्याय ४८ वा १५७

सुरापान स्थान क्षेत्र तें मृत्यूचें । लंघूनि प्रेतांतें जाती वीर ॥ १ ॥
पंच ऱ्हद दावी कृष्ण तें धर्मासी । भार्गव ज्या देशीं पितरां तर्पी ॥२॥
धर्म म्हणे कृष्णा पुनः पुनः कैंवी । निःक्षत्रिय केली अवनी रागें ॥३॥
सकारण वृत्त सर्व तें निवेदीं । शंका चित्ताप्रति बहुत माझ्या ॥४॥
वासुदेव म्हणे वृत्त तें सकल । निवेदी गोपाळ धर्माप्रति ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ४८ वा अध्याय समाप्त

अध्याय ४९ वा १५८

कृष्ण म्हणे धर्मा, परशुरामवृत्त । देऊनियां चित्त ऐकें आतां ॥ १ ॥
जन्हुपुत्र अज, बलाकाश्व त्याचा । पुढती धर्मज्ञाता कुशिक जाण ॥
उग्रतपें तया पावला देवेंद्र । गाधिनामें पुत्र स्वयें होई ॥ ३ ॥
सत्यवती कन्या दिधली ऋचीकातें । त्या भृगुपुत्रातें गाधिनृपें ॥४॥
शुचिर्भूत कांतेप्रति ऋचीकानें । चरु सामर्थ्यानें दिधले दोन ॥ ५ ॥

एक मातेप्रति कांतेप्रति एक । जेणें उद्धारक पुत्र होती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दयाळु ऋचीक । पुढती तपास गेला वनीं ॥ ७ ॥

१५९

त्याचिं वेळीं कांतेसवें राव गाधी । येई त्या स्थानासी यात्रामिषें ॥१॥
सत्यवती कथी वृत्त तें मातेसी । पतिदत्त अर्पी चरु दोन ॥ २ ॥
अज्ञानें मातेनें चरु पालटूनि । इतिहास जनीं पालटिला ॥ ३ ॥
पुढती बोलले मुनि कांतेप्रति । पुत्र क्रूर क्रोधी येणें तुज ॥ ४ ॥
ब्रह्मज्ञ तपस्वी सुत तो मातेचा । पालटला कैसा चरु सांगें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्वस्वधर्मतेज । पावतां व्यत्यास अधर्म तो ॥ ६ ॥

१६०

प्रार्थूनि पतीसी म्हणे सत्यवती । पुत्र शांतमूर्ति व्हावा मज ॥ १ ॥
अटळचि तरी पौत्र होवो तैसा । तथास्तु मुनींचा शब्द तदा ॥ २ ॥
कृष्ण म्हणे धर्मा, पुढती ऋचीकास । जमदग्नि पुत्रलाभ झाला ॥३॥
गाधीलागीं विप्रतुल्य होई पुत्र । नाम विश्वामित्र तयालागीं ॥ ४ ॥
जमदग्नीप्रति पुढती पुत्र राम । तेजाचें निधान उग्रकर्मा ॥ ५ ॥
गंधमादनीं तो आराधी शिवातें । अस्त्रांसवें लाभे परशु दिव्य ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तेणें ख्यातनाम । होई परशुराम जगामाजी ॥ ७ ॥

१६१

हैहयकुळीं तैं कृतवीर्यपुत्र । अर्जुन विख्यात दत्तभक्त ॥ १ ॥
दत्तप्रसादें तो सहस्र करांनीं । जिंकूनि अवनी धन्य झाला ॥ २ ॥
सप्तद्वीपा भूमि अर्पिली विप्रांतें । भक्षिण्या अग्नीतें प्रांत देई ॥ ३ ॥
वसिष्ठ मुनींचा आश्रम त्या स्थानीं । जाळूनियां अग्नि पुढती गेला ॥४॥
राम सर्व हस्त छेदील अर्जुना । मुनि तैं वचना वदले क्रोधें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे राव शूर दाता । दुर्लक्षी त्या वचा तया वेळीं ॥ ६ ॥

१६२

बलाढ्य तयाचे पुत्र मुनिशापें । उन्मत्त क्रूरत्वें वर्तताती ॥ १ ॥
उन्मादें एकदां जमदग्न्याश्रमीं । दंगल उडवूनि हरिलें वत्स ॥ २ ॥
त्या वत्सनिमित्तें झालें घोर युद्ध । होई बाहुच्छेद नृपाळाचा ॥ ३॥
ऐसें निज वत्स आणिलें रामानें । पुढती दैवानें खेळ केला ॥ ४ ॥

पुष्पसमिधार्थ राम वनीं जातां । अर्जुनपुत्रांचा काळ आला ॥ ५ ॥
उन्मत्त ते क्रूर आश्रमीं जाऊनि । छेदूनि जमदग्निशिर गेले ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पितृवध होतां । अनावर क्रोधा चढला राम ॥ ७ ॥

१६३

निःक्षत्रिय पृथ्वी करीन हे ऐसी । प्रतिज्ञा रामाची घोर होई ॥ १ ॥
घेऊनि परशु क्रोधानें निघाला । अर्जुनाचा केला सर्वनाश ॥ २ ॥
क्षत्रियमांसाचा कर्दम करूनि । दयाळु निघूनि वनीं गेला ॥ ३ ॥
सहस्राब्द ऐसा राहिला वनांत । ययातियज्ञांत जमले मुनि ॥ ४ ॥
विश्वामित्र पौत्र परावसु तेथें । वदला रामातें धिक्कारूनि ॥ ५ ॥
क्षत्रियभयानें गेलासि पळूनि । क्षत्रिय या स्थानीं नसती काय? ॥६॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां क्रोधें । पूर्वी संरक्षिले वधिले तेही ॥ ७ ॥

१६४

ऐसे वधूनि क्षत्रीय । पूर्ण प्रतिज्ञ भार्गव ॥ १ ॥
अश्वमेध यज्ञामाजी । भूमि अर्पी कश्यपांसी ॥ २ ॥
क्षत्रियांच्या रक्षणार्थ । वदले रामासी कश्यप ॥ ३ ॥
पृथ्वी जाहली हे माझी । वास न करीं या स्थलासी ॥ ४ ॥
तदा शूर्पारक देश । अर्पी सिंधु भार्गवास ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे राम । गेला तेथ त्यजूनि स्थान ॥ ६ ॥

१६५

भूमि ते विप्रांच्या स्वाधीन करूनि । कश्यप काननीं निघून गेले ॥१॥
राजा न राहिला तदा अवनीवरी । स्वच्छंद विहारी वैश्य शूद्र ॥२॥
भ्रष्टवितीं श्रेष्ठ श्रेष्ठ विप्रस्त्रिया । सबल दुर्बलां पीडा देती ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे विप्रांसी अधिकार । नव्हता लवमात्र तया वेळीं ॥४॥

१६६

ऐसा जाहला अनर्थ । उरला नाहीं संरक्षक ॥ १ ॥
पृथ्वी रसातळीं जातां । कश्यपांसी पडली चिंता ॥ २ ॥
केलें उरूनें रक्षण । ऊर्वी तेणें पडलें नाम ॥ ३ ॥
पृथ्वीदेवीनें मुनींसी । प्रार्थूनियां रक्षणासी ॥ ४ ॥

राजा घेतला मागूनि । लपले क्षत्रिय जे वनीं ॥ ५ ॥
सागरीं वा अन्य रूपें । रक्षितील तेचि मातें ॥ ६ ॥
तदा कश्यपें आणूनि । अर्पियेली त्यां अवनी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वृत्त । सांगे कृष्ण हें धर्मास ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ४९ वा अध्याय समाप्त

अध्याय ५० वा

१६७

धर्म म्हणे कृष्णा, धन्य परशुराम । धन्यचि हें स्थान पुण्यवंत ॥१॥
न्याय्य कृत्य ऐसें विप्रहस्तें जेथें । जाहलें तेथींचे लोक धन्य ॥ २ ॥
संभाषण ऐसें होतां होतां दोघे । पाहूनि भीष्मांतें तुष्ट झाले ॥ ३ ॥
ओघवती तीरीं शरासनीं भीष्म । पाहूनियां कृष्ण वदला दुःखें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पांडव सकळ । जाहले व्याकुळ तयावेळीं ॥ ५ ॥

१६८

कृष्ण म्हणे भीष्मां, असशी कीं शांत । शारीरिक दुःख बलवत्तर ॥१॥
कंटकही होई शरीरीं असह्य । रोमरोमीं शर घुसले तुझ्या ॥ २ ॥
परी सर्वज्ञ तूं सर्वशास्त्रवेत्ता । मुनि ऊर्ध्वरेता भासलासी ॥ ३ ॥
तुझ्याविण अन्य आजवरी कोणी । नाहीं शरासनीं पडला ऐसा ॥४॥
एकाचि रथीं तूं बैसूनि त्रैलोक्य जिंकिसील दैत्य-देवांसवें ॥ ५ ॥
निर्मिसील प्रतिसृष्टिही स्वपुण्यें । काय पुण्यस्थानें अशक्य तीं ॥६॥
वासुदेव म्हणे श्रीकृष्ण भगवान । बोलला वचन पुढती ऐका ॥ ७ ॥

१६९

भीष्मा, अलौकिक तुझी हे योग्यता । युधिष्ठिरदुःखा हरण करीं ॥१॥
उपदेशूनियां सकलही धर्म । करीं दुःखहीन पांडवांसी ॥ २ ॥
चातुर्वर्ण्य इतिहास पुराणेंही । जाणसी तूं पाहीं धर्मशास्त्र ॥ ३ ॥
सर्वही संशयछेत्ता तुझ्यावीण । जगामाजी अन्य कोणी नसे ॥ ४ ॥
संशयनिरासें करीं शोकहीन । धर्मासी कथून श्रेष्ठ ज्ञान ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कृष्णाची हे उक्ति । ज्ञाते बोधार्थचि जन्म घेती ॥६॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ५० वा अध्याय समाप्त

अध्याय ५१ वा

१७०

किंचित् उचलूनि मुख जोडी कर । भीष्म नमस्कार कृष्णा करी ॥
म्हणे हे विश्वेशा, भाषणें या तव । विश्वव्यापी पाय जाणिले हे ॥
सनातन तुझें रूप आलें ध्यानीं । शरण तुजसी मीं श्रेयास्तव ॥ ३ ॥
कृष्ण म्हणे नरश्रेष्ठा मत्स्वरूप । दाविलें तूं सत्य भक्त माझा ॥ ४ ॥
ऋजुत्वविहीन अशान्त जो भक्त । दावीं न तयास रूप मीं हें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भीष्मासी श्रीकृष्ण । म्हणे पुण्यक्षण जवळी आला ॥

१७१

उरले भीष्मा, त्रिंशद्दिन । वहुत कार्य घे साधून ॥ १ ॥
सूर्य वळतां उत्तरेसी । तुज लाभेल सद्गति ॥ २ ॥
मग कैसा ज्ञानलाभ । म्हणूनि आलों त्वत्सन्निध ॥ ३ ॥
शोकग्रस्त ज्ञान ज्याचें । बोध करीं त्या धर्मातें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे शोक । आच्छादितो सर्व बोध ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ५१ वा अध्याय समाप्त

अध्याय ५२ वा

१७२

भीष्म म्हणे देवा इंद्रासी स्वर्गाचें । वर्णन कथावें काय अन्यें ॥ १ ॥
काय तुझ्यापुढें बृहस्पतीवाणि । गलितगात्र मी केंवी बोलूं ॥ २ ॥
गुरूच्या समक्ष शिष्याचे प्रलाप । तैसाचि उद्योग बोलतां मी ॥३॥
शास्त्राचें तूं शास्त्र देवा, धर्माप्रति । श्रेयातें निवेदीं तूंचि प्रभो ॥४॥
वासुदेव म्हणे भीष्म मागे क्षमा । म्हणे नारायणा नुरलें त्राण ॥५॥

१७३

ऐकूनि भीष्मांचें वचन श्रीकृष्ण । जाहला प्रसन्न भीष्मावरी ॥ १ ॥
म्हणे गाङ्गेया, हा स्वीकारावा वर । नाहीं बाधणार क्लेश तुज ॥२॥
क्षुधा-तृषा तेंही न बाधो तुजसी । नित्य ज्ञानस्फूर्ति हृदयीं होवो ॥३॥
क्षीणता न येवो कदाही बुद्धीसी । सत्वाची अभिवृद्धि होवो सदा ॥
दिव्यदृष्टिलाभें अज्ञात तुजसी । न राहो कांहींचि विश्वामाजी ॥५॥
निर्मल उदकीं मत्स्यासम सर्व । होवो भवार्णव ज्ञात तुज ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे होतां ईशकृपा । आनंदासी तोटा काय जनीं ॥ ७ ॥

१७४

व्यासादिक कृष्णस्तवन करिती । होई पुष्पवृष्टि कृष्णावरी ॥ १ ॥
दिव्य वाद्यनाद अप्सरांचें नृत्य । शीतल सुगंध सुटला वायु ॥ २ ॥
सहस्र किरणें आंवरूनि अर्क । पश्चिम क्षितिज दग्ध करी ॥ ३ ॥
ऐसा भास होतां सर्वही उठले । भीष्मासी वंदिलें अत्यादरें ॥ ४ ॥
उदयीक भेटूं बोलूनियां ऐसें । गेले स्वस्थळातें सर्व मुनि ॥ ५ ॥
रथारूढ वीर होऊनि नगरीं । सिंह जे गव्हरीं शिरले तेंवी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे आतां ज्ञानवृष्टि । करील राजर्षि ज्ञानमेघ ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ५२ वा अध्याय समाप्त

अध्याय ५३ वा १७५

अर्धप्रहर रात्रीसी । उठूनियां हृषीकेशी ॥ १ ॥
ब्रह्मचिंतन करूनि । पुढती स्नान आटोपूनि ॥ २ ॥
जपे कांहीं गुप्तमंत्र । दानें तोषविले विप्र ॥ ३ ॥
धाडी धर्मासी निरोप । झाले पंडुपुत्र सिद्ध ॥ ४ ॥
बैसूनियां रथामाजी । निघती भीष्माच्या भेटीसी ॥ ५ ॥
कृष्णासवें येती रणीं । दुःख भीष्मासी पाहूनि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वीर । शरतल्पीं होता स्थिर ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ५३ वा अध्याय समाप्त

अध्याय ५४ वा १७६

देव, ऋषि, मुनि सर्वही भीष्मासी । पाहूनियां दुःखी होती बहु ॥१॥
तदा नारदोक्ति घेऊनियां ध्यानीं । पुशी कुशलवाणी कृष्ण भीष्मा ॥
कृष्णाप्रति भीष्म म्हणती तुझा वर । जाहला सफल कृतार्थ मी ॥
तूंचि परी धर्मा बोधिसी न कां रे । कृष्ण म्हणे वा रे, ऐकें हेतु ॥४॥
अलौकिक कीर्ति लाभावी तुजसी । हेंचि इच्छा माझी भक्तश्रेष्ठा ॥
बोध तुझा वेदासम मान्य होवो । आचरील पावो तोचि मुक्ति ॥६॥
आश्चर्यकारक सद्‌गुणेंसी कीर्ति । लाभतसे लोकीं तदनुरूप ॥ ७ ॥
जन्मादारभ्य न लवही पातक । घडलें तूंचि बोध करण्यायोग्य ॥८॥



कृष्णासवें येती रणीं । दुःख भीष्मांसी पाहूनि ॥
वासुदेव म्हणे वीर । शरतल्पीं होता स्थिर ॥ राजधर्मपर्व अ. ५३

वासुदेव म्हणे कृष्ण कथी भीष्मा । निर्वेदीं सद्धर्मा पृच्छक हा ॥९॥
इतिश्री वासुदेवकृत शांति॰ राजधर्मपर्वाचा ५४ वा अध्याय समाप्त

अध्याय ५५ वा १७७

भीष्म म्हणे देवा, कथीन मी धर्मे । त्वत्प्रसादें मन स्थिर माझें ॥१॥
परी धर्मात्म्या या धर्मानेंचि प्रश्न । करावे हा जाण हेतु माझा ॥२॥
जन्म गुणकर्मे आनंद ज्ञात्यांसी । जयाच्या, मजसी तोचि पुसो ॥३॥
संकटींही ज्याच्या चित्ता न संभ्रम । तोचि मज प्रश्न करो धर्म ॥
कृष्ण म्हणे भीष्मा लज्जित पांडव । वधिलें म्हणे आर्द्य आप्तांप्रति ॥
भीष्म तयावेळीं म्हणती कृष्णासी । धर्म्येचि हे कृति पांडवांची॥६॥
आचारभ्रष्ट कीं लुब्ध किंवा पापी । गुरु आप्त होती वध्याचि ते ॥७॥
वासुदेव म्हणे भीष्मांचें वचन । आव्हानितां रण योग्य वीरा ॥ ८ ॥

१७८

भीष्मवचनें या धर्म । येई विनम्र होऊन ॥ १ ॥
पूज्यभावें चरण धरी । होई सद्गद अंतरीं ॥ २ ॥
प्रेमें मस्तकावघ्राण । करिती भीष्म अभिनंदून ॥ ३ ॥
म्हणती राया, बैस एथें । प्रेमें प्रश्न करीं मातें ॥ ४ ॥
धर्मा, कुरुकुलश्रेष्ठा । लवही भय नसो चित्ता ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । प्रेमें देती अभयपूर्ण ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति॰ राजधर्मपर्वाचा ५५ वा अध्याय समाप्त

अध्याय ५६ वा १७९

वैशंपायन तो जनमेजयाप्रति । म्हणे धर्म वंदी श्रीकृष्णातें ॥ १ ॥
तेंवी भीष्मांप्रति करूनि नमन । घेई अनुमोदन वृद्धांचेंही ॥ २ ॥
नम्रभावें राव पुढती करी प्रश्न । वाटे राजधर्म भार वहु ॥ ३ ॥
मुख्य लोकाधार मूळ त्रिवर्गाचें । मोक्षही विराजे राजधर्मे ॥ ४ ॥
अश्वातें लगाम, अंकुश कीं गजा । राजधर्म तैसा जनांलागीं ॥ ५ ॥
जयाच्या अज्ञानें मर्यादा भंगती । गति वा दुर्गति राजधर्मे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे स्तवूनि भीष्मांसी । राजधर्म पुशी धर्मराज ॥ ७ ॥

१८०

भीष्म म्हणे पूज्य धर्म तेंवी कृष्ण । तो जगत्कारण वंदीतसे ॥ १ ॥
वंदूनियां तेंवी सर्व ब्राह्मणांसी । शाश्वत धर्मासी कथितों ऐकें ॥२॥
पुशिशील तें तें सर्व निवेदीन । व्रतस्थ राहून श्रवण करीं ॥ ३ ॥
देवविप्रार्चन हाचि मुख्य धर्म । ऋणमुक्ति पूर्ण होई तेणें ॥ ४ ॥
देवता, विप्रांची करील जो सेवा । मान्य तो गणावा जगामाजी॥५॥
उत्साहें प्रयत्न करावा नृपानें । दैवोद्योग जाणें समानाचि ॥ ६ ॥
तथापि प्रयत्न श्रेष्ठ मी मानितों । आलस्येंचि येतो दैवा दोष ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीष्मोक्ति ते ऐसी । न भीतां विघ्नांसी व्हावा यत्न ॥

१८१

कार्यसिद्धि जाणे धर्मा, सत्यानेंचि । इहपर तेंचि सौख्यदाई ॥ १ ॥
ऋषींसम सत्य नृपाळाचें धन । विश्वासकारण तेंचि एक ॥ २ ॥
सद्‌गुणीं, सद्‌वृत्त संयमी सदय । तेंवी जितेंद्रिय धर्मनिष्ठ ॥ ३ ॥
प्रसन्नवदनीं दानशूर राजा । द्रव्यहीन कदा न होई तो ॥ ४ ॥
रुजुता, स्वच्छिद्र–स्वकृत्य गोपन । तेंवी अन्वेषण परछिद्रांचें ॥ ५ ॥
मंत्रगोपनीं ते रुजुता त्यजावी । राजनीति ध्यावी ध्यानीं ऐसी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सौम्य-उग्रभावें । नृपानें वर्तावें समयापरी ॥ ७ ॥

१८२

धर्मा, ब्राह्मणांसी न घडो शासन । जाणें परब्रह्म तयांलागीं ॥ १ ॥
मनूचें वचन सदा असो ध्यानीं । क्षत्रिय, तें अग्नि पाषाणही ॥ २ ॥
विप्र जल तेंवी मृत्तिका विरोधें । पावती नाशातें निश्चयानें ॥ ३ ॥
यास्तव विप्रांचा सर्वदा सत्कार । करीं, यज्ञ, वेद रक्षिते ते ॥ ४ ॥
लोकत्रयनाशकारकां बांधून । शिक्षा व्हावी धर्म ऐसा असे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धर्मविध्वंसक । ज्ञाताही शिक्षेस पात्र असे ॥ ६ ॥

१८३

रक्षील जो धर्म तोचि धर्मवेत्ता । धर्मघ्नासी शिक्षा करितां धर्म ॥१
परी धर्मराजा, विप्रानें हे दोष । करितां तयास वधूं नये ॥ २ ॥
अन्यदेशीं तया नेऊनि सोडावें । अन्याय क्षमावे सर्व त्याचे ॥ ३ ॥
ब्रह्महत्या तेंवी गुरुस्त्रीगमन । भ्रूणहत्या जाण राजद्रोह ॥ ४ ॥

करितां विप्रासी देशांतरवास । देहदंड योग्य नसे तया ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भीष्मांचें हें वाक्य । न येई ध्यानांत परी सत्य ॥ ६ ॥

१८४

धर्मा, पुरुषसंचय । सर्वश्रेष्ठ जाणें द्रव्य ॥ १ ॥
दुर्गषट्कामाजीं श्रेष्ठ । धर्मा, जाणें नरदुर्ग ॥ २ ॥
धर्मा, व्हावें दयावंत । तेंवी सदा सत्यनिष्ठ ॥ ३ ॥
परी सहनशील गज । होऊं नये राया, नित्य ॥ ४ ॥
वासंतिक सूर्यासम । व्हावें नृपा मृदु तीक्ष्ण ॥ ५ ॥
प्रत्यक्षानुमान शास्त्रें । नित्य स्वपर परीक्षावे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे राजा । व्हावा निर्व्यसनीं सदा ॥ ७ ॥

१८५

स्वेच्छा, पतिइच्छा वर्जूनि ज्यापरी । गर्भचि सांभाळी गर्भिणी ते ॥
तेंवी स्वपरभाव दुर्लक्षूनि नित्य । साधावें जनहित धर्ममार्गें ॥ २ ॥
कदा न त्यजावें धैर्य नृपाळानें । निर्भीड असावें शिक्षा देतां ॥ ३ ॥
ऐशा नृपाळासी भय न कोणाचें । न करी थट्टेतें सेवकांसी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अतिसंघट्टनें । अधःपात जाणें नृपाळाचा ॥ ५ ॥

१८६

सेवकांसी अति संघट्टनें राजा । अवमान सदा करूनि घेई ॥ १ ॥
मर्यादोल्लंघन तेंवी प्रतारणा । समानता मना येई त्यांच्या ॥ २ ॥
अंतःपुरीं दृष्टि, मिथ्या अधिकार । दावूनि सर्वत्र पीडा देती ॥ ३ ॥
वाहनीं नृपाच्या वैसतीं तोऱ्यानें । मंत्रभेद तेणें क्रमप्राप्त ॥ ४ ॥
बाहुलें करींचें मानिती नृपासी । बहुविध ऐसी कृति घडे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्वस्वमर्यादेतें । त्यजील तयातें शिक्षा योग्य ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ५६ वा अध्याय समाप्त

## अध्याय ५७ वा

१८७

पितामह म्हणे धर्मा, उद्योगांत । सदा व्हावें रत नृपाळानें ॥ १ ॥
बिलस्थमूषका, भक्षी जेंवी सर्प । अविरोद्धा नृप तैसा जाणें ॥ २ ॥
अप्रवासी विप्र तैसाचि जाणावा । ग्रासिते उभयां नरां भूमि ॥ ३ ॥

नृपाळ अमात्य तैंवी हितकर्ता । दुर्ग, राष्ट्र, कोशा सैन्यातें कीं ॥४॥
विरोधी जो त्याचा वधचि करावा । गुरु आप्त किंवा असो कोणी ॥
असमंजा पुत्र सगरें त्यागिला । पीडी जो प्रजेला सर्वकाळ ॥ ६ ॥
श्वेतकेतूतेंही त्यागी उद्दालक । मिथ्याचारी पुत्र जाणूनियां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे प्रजानुरंजन । नृपाळाचा धर्म ऋजुता सत्य ॥ ८ ॥

१८८

परवित्तहिंसा घडूं नये कदा । सत्पात्रीं वित्ताचा व्यय व्हावा ॥ १ ॥
दंडावे दुर्जन, मर्यादारक्षण । सिद्धान्तांचें ज्ञान शुद्ध जया ॥ २ ॥
पुरुषार्थनिरत मंत्रादिक गुप्त । राजयपदा पात्र तोचि एक ॥ ३ ॥
वर्णधर्मरक्षा करावी नृपानें । संकर न तेणें होऊं द्यावा ॥ ४ ॥
कोणावरी त्याचा विश्वास नसावा । विवेक राखावा विश्वासतां ॥
षाड्गुण्यचिंतन चारप्रपालन । शत्रुभेदज्ञान जयालागीं ॥ ६ ॥
नियमनीं यम, संग्रहीं कुबेर । वासुदेव थोर म्हणे तोचि ॥ ७ ॥

१८९

बलाबल जाणें शत्रूचें जो दक्ष । आश्रय जो नित्य निराश्रितां ॥ १ ॥
सुखी जनांचाही घेई परामर्श । सदा हास्यमुख वदतां कोणा ॥ २ ॥
वृद्धांची शुश्रूषा जिंकी जो आलस्या । पराजित ज्याचा अतिलोभ ॥
ज्ञात्यांचा व्यवहार नित्य अवलोकी । सेवेनें जो चित्तीं तोष पावे ॥
वेषभूषा नित्य असावी प्रसन्न । सज्जनांचें धन न कदा घ्यावें ॥ ५ ॥
असज्जनद्रव्य ग्रहण करावें । दुर्लक्ष न व्हावें ऐशा कर्मी ॥ ६ ॥
वश्यात्मा जो सिद्धसैन्य सर्वकाळ । भोक्ता, शुद्धाचार पात्रीं दाता ॥
वासुदेव म्हणे वैभवसंपन्न । साह्यकर्ते जाण असती ज्ञाते ॥ ८ ॥

१९०

शूर भक्त असंहार्य[1] ते कुलीन । तैंवी रोगहीन, शिष्ट, मान्य ॥ १ ॥
अनवमानी जे विद्वान् लोकवेत्ते । परलोकीं ज्यांचें लक्ष असे ॥ २ ॥
धर्मनिष्ठ स्थिर पर्वतासमान । चांचल्यविहीन मति ज्यांची ॥ ३ ॥
शिष्टसंमतांसी ऐशा व्हावें सख्य । छत्र, आज्ञा, सौख्य हेंचि जयां
वासुदेव म्हणे अन्य सर्व सौख्य । प्रजेस्तव नृप त्याज्य मानी ॥५

१ शत्रूकडून न फसणारे.

१९१

प्रत्यक्षाप्रत्यक्ष समान वर्तन । कदा तया खिन्न नलगे होणें ॥ १ ॥
सर्वाभिशंकी जो सर्वस्वापहारी । कुटिला, पंजरीं स्वजन लोटी ॥२॥
लोकानुरंजनीं रत, शुचिर्भूत । जरी शत्रुव्यात सत्तावंत ॥ ३ ॥
क्रोध व्यसनहीन सौम्यदंड यमी । हिमालय जनीं विश्वासार्ह ॥ ४ ॥
सुलभदर्शन, ज्ञाता, दाता, गुणी । लोकप्रिय जनीं होई नृप ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आरंभिल्या कार्जीं । यशस्वी तो जगीं श्रेष्ठ राव ॥ ६॥

१९२

प्रजा पितृगृहीं पुत्रासम नांदे । निर्भय आनंदें सर्वकाळ ॥ १ ॥
सद्वर्तनें चौर्यभय नसे जेथ । नृपाळ तो श्रेष्ठ, प्रगटधन ॥ २ ॥
स्वकर्मनिरत, नसती देहासक्त । दंड-ज्यां संमत, अपीडक ॥ ३ ॥
आज्ञाधारक तैं दाते जन जेथ । नृपाळ वरिष्ठ तोचि धन्य ॥ ४ ॥
दंभ, अनृत तैं माया न मत्सर । धर्म तेथें स्थिर सनातन ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सत्कारी ज्ञात्यासी । वरी सत्पथासी तोचि राजा ॥६॥

१९३

चार, मंत्रि ज्याचे सर्वदा संतृप्त । असतां कार्यरत, योग्य तोचि ॥
भार्गवोक्ति नित्य असावी हे ध्यानीं । 'संपादावा जनीं प्रथम राजा ॥
पुढती भार्या, धन, संपादावें क्रमें । व्यर्थ रायाविणें सकलैश्वर्य ॥३॥
राज्यकर्त्यालागीं प्रजाहिताविण । तात्पर्य न अन्य धर्म लोकीं ॥ ४ ॥
राजधर्मी मनुवाक्य ध्यानीं असो । आचार्य वक्ता जो असेचिना ॥५॥
अध्ययनहीन ऋत्विज तैसाचि । रक्षी न प्रजेसी नृपाळ जो ॥ ६ ॥
अप्रियभाषणी कांता, ग्रामप्रिय- । गोप, तैं नापित वनकामी ॥ ७ ॥
षट्क हें त्यजावें भग्ननाव जैसी । सिंधूतारणासी असमर्थ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे नृपाळासी दिव्य । अमृत हें होय भीष्मवच ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ५७ वा अध्याय समाप्त

अध्याय ५८ वा

१९४

पितामह म्हणे धर्मा, विशालाक्ष । इंद्र, मनु, शुक्र, भारद्वाज ॥ १ ॥
गौरीशिरा, राजधर्माचे प्रणेते । विप्रहितकर्ते ब्रह्मवादी ॥ २ ॥

प्रशंसिती सर्व प्रजापालन ते । धर्मसाधनांतें कथितां ऐकें ॥ ३ ॥
गुप्त प्रगटही चार नियोजावे । अमात्सर्यं व्हावें योग्य दान ॥ ४ ॥
भलत्याचि मार्गे वसवूं नये कर । सहवासीं थोर असूं द्यावे ॥ ५ ॥
ऋजु वक्रमार्गे शत्रुपक्षीं भेद । शौर्य, दाक्ष्य, सत्य, प्रजाहित ॥ ६ ॥
जीर्ण मंदिरांचा उद्धार, व्यवस्था । करावी द्विविधा[1] करणें दंड ॥७॥
वासुदेव म्हणे कुलीनपोषण । वस्तुसंग्रहण राजकार्य ॥ ८ ॥

१९५

ज्ञातीजनसेवा सैन्यासी संतोष । वृद्धिंगत कोष करणें नित्य ॥ १ ॥
संकटीं न खेद, नगररक्षण । रक्षकांवरी न विश्वासावें ॥ २ ॥
शत्रुवश जे जे निजनगरांत । तयांमाजी भेद करणें योग्य ॥ ३ ॥
शत्रुमित्र मध्यस्थही निरीक्षावे । ऐक्य न घडावें सेवकांचें ॥ ४ ॥
विश्वास न बहु धरावा सेवकीं । स्वयें संरक्षावी राजधानी ॥ ५ ॥
प्रसंगीं स्वशत्रूतेंही धीर द्यावा । अवमान न व्हावा अरिचा व्यर्थ ॥
वासुदेव म्हणे नीतिधर्मयुक्त । असों द्यावें वृत्त नृपाळाचें ॥ ७ ॥

१९६

दुर्वर्तनी जन त्यागावे सर्वदा । कार्यासक्त सदा, प्रभुनें व्हावें ॥ १ ॥
राजधर्ममूळ कथी बृहस्पति । असावी ते उक्ति नित्य ध्यानीं ॥ २ ॥
“ उत्थानेंचि लाभ देवां अमृताचा । तेंवी असुरांचा वधही तो ॥३॥
श्रेष्ठत्व इंद्रासी उद्योगेंचि प्राप्त । वाग्वीर ते दास उद्योग्याचे ॥ ४ ॥
सुबुद्धही यत्नहीन नृपाळासी । निर्विष सर्पाची अवस्था ते ” ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे बृहस्पतिवाणी । धारितां हे ध्यानीं स्फूर्तिलाभ ॥ ६ ॥

१९७

दुर्बलही शत्रु लेखूं नये तुच्छ । विष, अग्नि, अल्प नाशकारी ॥ १ ॥
एकांगयुक्तही दुर्गाश्रितनृप । पीडील समर्थ नृपातेंही ॥ २ ॥
सहेतुक दोषाचारप्रायाश्चित । घेऊनि ऋजुत्व अवलंबावें ॥ ३ ॥
धर्मकृत्यें व्हावीं लोकसंग्रहार्थ । क्रूरां राज्यतंत्र सांवरेना ॥ ४ ॥
सौम्यातेंही राज्यभार तो न तोले । आमिष जाणावें सकलांचें हें ॥

१ देहदंड आणि द्रव्यदंड

आर्जव तैं मिश्र वर्तनें हें साधे । विपत्तीही साजे निजधर्मीं ॥ ६ ॥
राजधर्मलेश कथिला हा धर्मा । शंका जे त्वन्मना पुशीं अन्य ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे संक्षिप्त हा धर्म । आचरितां धन्य तोहि करी ॥ ८ ॥

१९८

कृष्णासवें तदा सकलही मुनि । साधु साधु वाणी उच्चारिती ॥ १ ॥
वंदूनि भीष्मांसी धर्म म्हणे ताता । उदईक आतां करीन प्रश्न ॥ २ ॥
सूर्यास्तसमयीं बोलूनियां ऐसें । वंदिती विप्रांतें धर्मादिक ॥ ३ ॥
रथारूढ होऊनियां हर्षद्वती । नदीतीरीं, येती अत्यानंदें ॥ ४ ॥
स्नानसंध्यादिक कर्म आचरूनि । जाती निजस्थानीं गजपुरीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे गांगेयवचन । गंगौघ पावन करी जगा ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ५८ वा अध्याय समाप्त

अध्याय ५९ वा

१९९

प्रातःकाळीं अन्यदिनीं । नित्यकर्म आचरूनि ॥ १ ॥
बैसूनियां भव्यरथीं । वीर गेले कुरुक्षेत्रीं ॥ २ ॥
वंदूनियां भीष्मांप्रति । कुशल पुसूनि तयांसी ॥ ३ ॥
धर्म म्हणे पितामहा । राजा शब्द केंवी झाला ॥ ४ ॥
सर्व मानव समान । असतां तयासी कां मान ॥ ५ ॥
देवासम सर्व जग । त्याचा इच्छी अनुग्रह ॥ ६ ॥
त्याचें कारण कथावें । महत्वाचें तें असावें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । कथिती सकल वर्तमान ॥ ८ ॥

२००

कृतयुगामाजी राज्य झालें केंवी । निवेदितों घेईं ध्यानीं सर्व ॥ १ ॥
पुरा राज्य, राजा नव्हती शिक्षाही । शिक्षार्हही पाहीं नव्हतें कोणी
स्वधर्मपालनें एकमेकां सर्व । रक्षिती अपूर्व सामर्थ्यानें ॥ ३ ॥
पुढती ते निष्ठा जनीं न राहिली । मोहित जाहली मती त्यांची ॥ ४ ॥
मोहें ज्ञानलोप होतां धर्मनाश । बळावला लोभ सहज तेणें ॥ ५ ॥
कामानें पुढती न कळे कार्याकार्य । भक्ष्याभक्ष्य सर्व सुटती सीमा ॥
वासुदेव म्हणे मर्यादा वेदांची । सुटतांचि अंतीं सर्वनाश ॥ ७ ॥

२०१

ऐशापरी वेद-धर्मही लोपतां । विबुधांच्या चित्ता भय वाटे ॥ १ ॥
हीनसत्वदेव ब्रह्मयासी प्रार्थिती । यज्ञयाग लोकीं न घडे धर्म ॥ २ ॥
तेणें ईश्वरत्व सत्य संकल्पादि । राही न आम्हांसी वल कांहीं ॥ ३ ॥
वेदधर्मे यज्ञ करितां पर्जन्य । वर्षितो शक्ति न उरली आतां ॥ ४ ॥
वेदनाशें धर्मनाश तेणें आम्हीं । नसों नराहूनि बलवंत ॥ ५ ॥
ऐकूनियां ब्रह्मा म्हणे न धरा भीति । वासुदेव वंदी ब्रह्मदेवा ॥ ६ ॥

२०२

बोलूनियां लक्ष अध्यायसंयुक्त । निर्मियेला ग्रंथ ब्रह्मदेवें ॥ १ ॥
कर्मकांड, ज्ञानकांड, कृषि, पण्य । तैंवी राजधर्म कथिला सर्व ॥ २ ॥
चतुर्विध तेथ कथिले पुरुषार्थ । उपाय समस्त इष्टानिष्ट ॥ ३ ॥
अग्निद गरद प्रतिरूपकारी । योजूनियां अरिनिवारण ॥ ४ ॥
विविध यंत्रांच्या कथियेल्या कृति । वशीकरणादि कथिलें कर्म ॥५॥
जाति कुलधर्म तेही कथियेले । ऐसें सांठविलें सकल ज्ञान ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दंडनीतिग्रंथ । वर्णनें चित्तास नवल वाटे ॥ ७ ॥

२०३

जयायोगें नित्य प्रजा धर्मरत । राहील ते मार्ग निवेदूनि ॥ १ ॥
आनंदित ब्रह्मा बोलला देवांसी । अर्पिलें तुम्हांसी नवनीत हें ॥ २ ॥
साक्षात्सरस्वती ग्रंथ हा जाणावा । त्रिवर्ग स्थापावा हाचि हेतु॥३॥
दंडसहाय्यें हा रक्षील लोकांसी । निग्रहानुग्रहेंसी प्रसिद्धि या ॥ ४ ॥
पुरुषार्थदायी शास्त्रें याचि दंड । तेणें नाम ‘ दंडनीति ’ ऐसें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शास्त्र हें प्रसिद्ध । रुचलें शिवास प्रथम लोकीं ॥ ६ ॥

२०४

‘ वैशालाक्षनीति ’ नामें संक्षेपानें । पुढती शिवानें कथिलें हेंचि ॥१॥
‘ बाहुदंतक ’ तो त्याचाही संक्षेप । करी शचीनाथ पुढती प्रेमें ॥ २ ॥
संक्षेप पुढती करी बृहस्पति । पुढती शुक्राची कृपा होई ॥ ३ ॥
संक्षेपातिसंक्षेप हा ऐशापरी । लोकोद्धार करी ग्रंथराज ॥ ४ ॥

१ प्रतिबिंब घेणारे ( फोटोग्राफ़र ! )

पुढती ‘ विरजा ’ ‘ कीर्तिमाना ’ दिक । निर्मियेले पुत्र श्रीविष्णूनें ॥
पुढती ‘ सुनीथ ’ नामें मृत्युकन्या । सुविख्यात वेना जन्म देई ॥६॥
वासुदेव म्हणे रागद्वेषी वेन । वधिती ब्रह्मज्ञ स्वतेजानें ॥ ७ ॥

२०५

उजव्या अंकातें मंथितां निषाद । म्लेच्छादींचा तात पुरुष होई ॥१॥
सव्य बाहु मंथितांचि इंद्रासम । शस्त्र-शास्त्रपूर्ण पुत्र होई ॥ २ ॥
जोडूनि तो कर विनवी मुनींसी । धर्म-अर्थ माझी बुद्धि जाणे ॥ ३ ॥
पुरुषार्थयुक्त कथा कांहीं सेवा । संशय नसावा मनीं कांहीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां मुनि । वदले तें ध्यानीं धरणें योग्य ॥ ५ ॥

२०६

नित्य धर्म जेथें कार्या त्याचि करीं । समदृष्टि वरीं सर्वकाल ॥ १ ॥
काम-क्रोध-लोभ-मोहा झुगारूनि । रमणें शासनीं दुर्जनांच्या ॥ २ ॥
रक्षीन मी वेद ब्रह्म तैं ब्राह्मण । तेंवी शास्त्राधीन वर्तन मी ॥ ३ ॥
काया-वाचा-मनें करीं हे प्रतिज्ञा । वंदी तैं मुनींना वेनपुत्र ॥ ४ ॥
ऋषि मुनि देव सहाय्यक होती । स्वीकारी धरित्री ‘ पृथु ’ तदा ॥
घालवूनि पृथु वैषम्य भूमीचें । रची पाषाणांतें एक्या ठाईं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तेचि गिरिश्रेष्ठ । केला अभिषेक पुढती तया ॥ ७ ॥

२०७

भूमि पर्वतादि अर्पिती त्या धन । करितां तो चिंतन अश्व गज ॥१॥
आधिव्याधि जरा दुर्भिक्ष संपलें । सकलही गेलें विलया भय ॥ २ ॥
सर्प चोर तेंवी नराचें नरासी । भय न कोणासी प्रेमवृद्धि ॥ ३ ॥
सागर गिरीहि नृपा मार्ग देती । पृथ्वी धान्यरूपी दुग्ध अर्पी ॥ ४ ॥
धर्मनिष्ठ केलें सर्वही प्रजेसी । रंजनें तयासी म्हणती राजा ॥ ५ ॥
क्षत तें संकट निवारिलें सर्व । तेणें त्या क्षत्रिय ऐसी संज्ञा ॥ ६ ॥
पृथूची ते पृथ्वी ऐसा जया मान । राज्य त्या भगवान स्वयें अर्पी ॥
वासुदेव म्हणे प्रत्यक्ष देवता । ऐसा नृपाळाचा अधिकार ॥ ८ ॥

२०८

राजधर्मैं नित्य व्हावीं शुभकर्मैं । कर्तव्य जाणावें नृपाळाचें ॥ १ ॥

ऐशा दैवीगुणयुक्ताच्या स्वाधीन । व्हावे कां न जन चिंतीं मनीं ॥२॥
तदा पद्म एक ललाटीं विष्णूच्या । उद्भवलें पद्मा प्रगटे तेथें ॥ ३ ॥
जाणावी ते धर्मपत्नी तिचा पुत्र । अर्थचि सर्वत्र विख्यात जो ॥४॥
क्षीणपुण्यें स्वर्ग त्यागूनि जे येती । तेचि या जगतीं होती नृप ॥५॥
शुभकर्में तेचि मान्य होती जनां । वैशालाक्ष ज्ञाना जाणूनियां ॥ ६ ॥
यास्तवाचि देवसदृश नृपाळ । कथिलें सकळ भीष्म म्हणे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धर्मराजप्रश्न । ऐकावे देऊन ध्यान आतां ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ५९ वा अध्याय समाप्त

## अध्याय ६० वा

२०९

धर्म म्हणे वर्ण-आश्रम कथावे । अभिवृद्धि पावे केंवी राष्ट्र ॥ १ ॥
अभ्युदय केंवी होई नृपाळाचा । तेंवी सेवकांचा जनांचाही ॥ २ ॥
मंत्री, पुरोहित त्याज्य ग्राह्य कोण । संकटीं रक्षण करणें केंवी ॥३॥
पितामह म्हणे धर्मतत्त्व कृष्ण । वंदूनि तैं विप्र कथितों ऐकें ॥४॥
अक्रोध सत्य तैं संविभाग[1] क्षमा । करावी, अंगना इतरां त्याज्य ॥
ऋजुत्व तैं शौच भृत्यांचें भरण । अद्रोह हे धर्म सकलांसम ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विप्रादींचे आतां । धर्म निवेदिता होई भीष्म ॥ ७ ॥

२१०

इंद्रियदमन स्वाध्याय हे मुख्य । विप्रधर्म देख युधिष्ठिरा ॥ १ ॥
विकर्मविन्मुख स्वकर्मनिरत । शांत ज्ञानतृप्त दिसतां विप्र ॥ २ ॥
विवाह तयाचा करावा पुत्रार्थ । षट्कर्मनिरत व्हावें तेणें ॥ ३ ॥
वेदाध्ययनेंचि तया कृतार्थता इच्छेवरी त्याच्या अन्य कर्मं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे देवता विप्राची । एक आदित्यचि तेजोमय ॥ ५ ॥

२११

क्षत्रियांचा धर्म ऐक आतां धर्मा । यजनाध्ययनासवें दान ॥ १ ॥
याचना तयानें न करावी कोठें । प्रजापालन तें व्हावें नित्य ॥ २ ॥
उद्युक्त असावें तस्करवधार्थ । पराक्रम नित्य समरीं व्हावा ॥ ३ ॥
ऐशा कर्मनिष्ठां लाभे श्रेष्ठगति । संग्राम वीरासी श्रेष्ठ धर्म ॥ ४ ॥

१ मिळकतींत इतराचा भाग वांटून देणें.

देहदुःखभयें संग्राम त्यागून । पळूं नये जाण क्षत्रियानें ॥ ५ ॥
संपादित धन रक्षणाचे मार्ग । अध्ययन देख यज्ञदान ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे युद्धावीण अन्य । नसे श्रेष्ठ धर्म क्षत्रियासी ॥ ७ ॥

२१२

स्वस्वधर्म प्रतिपालनीं निरत । करावें प्रजेस नृपाळानें ॥ १ ॥
स्वास्थ्यसंरक्षक कार्यें सकळही । धर्मानेंचि व्हावीं नृपाळाचीं ॥ २ ॥
प्रजपालनेंचि तया कृतार्थता । अन्य कर्मीं आस्था असो नसो ॥३॥
वासुदेव कथी पितामहवाणी । नृपाळासी जनीं इंद्रदेव ॥ ४ ॥

२१३

वैश्य वरिष्ठही त्रिकर्मीं निरत । शुचिमार्गें प्राप्त द्रव्य ज्याचें ॥ १ ॥
पित्यासम तेणें पाळावें पशूंसी । याविण तयासी दुष्कर्मचि ॥ २ ॥
पशुसंरक्षणें वैश्या सौख्यलाभ । अर्पी ब्रह्मदेव पशु तया ॥ ३ ॥
ब्राह्मण क्षत्रियां ब्रह्मा अर्पी प्रजा । सप्तमांश त्याचा व्यापारांत ॥ ४ ॥
मूल्यवान पण्यीं त्याचा शोडषांश । घ्यावा सप्तमांश धान्यपण्यीं ॥
पशूंचें पालन वैश्यांचेंचि कर्म । अन्यानें तें कर्म करूं नये ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे व्यवसायसंकर । न घडावा थोर कटाक्ष हा ॥ ७ ॥

२१४

सेवाचि शूद्रासी सौख्याचें साधन । संपादितां धन दोष तया ॥ १ ॥
पापीजन द्रव्यसंचयें स्ववश । करूनि श्रेष्ठांस पीडा देई ॥ २ ॥
यास्तव धार्मिक शूद्रासीच आज्ञा । संचयाची अन्या नसो कदा ॥३॥
शूद्राचें पोषण करावें सर्वांनीं । स्ववस्तु अर्पूनि सकल जीर्ण ॥ ४ ॥
धर्मधन त्यांचें तेंचि म्हणती भीष्म । करोत रक्षण सकल त्यांचें ॥
अनपत्य शूद्रा पिंडही अर्पावा । रक्षावें दुर्बला त्रिवर्णानीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शूद्रधर्म थोर । विपर्यास नर करिती बहु ॥ ७ ॥

२१५

स्वामित्याग शूद्रें करूं नये कदा । सांभाळावें सदा संकटीं त्या ॥
अमंत्रक पाक यज्ञही शूद्रानें । करावे न तेणें दोष तया ॥ २ ॥
त्रैवर्णिक यज्ञा साह्य होई शूद्र । तेणें यज्ञफल लाभे तया ॥ ३ ॥

अमंत्रक यज्ञीं 'पैजवन' शूद्रें । लक्ष पूर्णपात्रें दिधलें धान्य ॥ ४ ॥
सर्व यज्ञाहूनि श्रद्धायज्ञ श्रेष्ठ । श्रद्धा हें पवित्र दैवतांचें ॥ ५ ॥
परस्परां श्रेष्ठ दैवत ब्राह्मण । भार्यात्वें ग्रहण सकलांचें त्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सर्व वर्ण ऐसे । म्हणती विप्रांचे, पितामह ॥ ७ ॥

२१६

देवांचेही देव कथिती तेंचि हित । जाण सर्वश्रेष्ठ विप्र जनीं ॥ १ ॥
ऋक् यजुः सामांचें यथाक्रम ज्ञान । देवचि त्रिवर्ण वेदज्ञानें ॥ २ ॥
वेदाधिकार तो नसोचि शूद्रासी । देवता तयासी प्रजापति ॥ ३ ॥
श्रद्धायज्ञ सर्व वर्णांसी विहित । ब्राह्मण दैवत असामान्य ॥ ४ ॥
अकारापासूनि वेदत्रय जैंवी । त्रैवर्णिक तेंवी ब्राह्मणाचे ॥ ५ ॥
श्रद्धावंत ज्ञाता विप्राचि यज्ञाचा । अधिकारी साचा जाण धर्मा ॥६॥
श्रद्धायज्ञ सर्व वर्णांसी विहित । व्हावें शुचिर्भूत मानवांनीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे यज्ञासम अन्य । त्रैलोक्यांत पुण्य नसे कांहीं ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ६० वा अध्याय समाप्त

अध्याय ६१ वा

२१७

ब्रह्मचर्य गार्हस्थ्य तैं वानप्रस्थ । संन्यास वरिष्ठ आश्रम हे ॥ १ ॥
उपनयनानें ब्राह्मणत्वप्राप्ति । होतां ते वेदादि अभ्यासावे ॥ २ ॥
पुढती गृहस्थधर्म आचरावा । वानप्रस्थ व्हावा पुढती धर्म ॥ ३ ॥
पुढती संन्यासें येई कृतार्थता । ब्रह्मचाऱ्याही हा वरणें योग्य ॥ ४ ॥
निरिच्छ निर्द्वंद्व असावा संन्यासी । सर्वत्र समदृष्टि विषयत्यागी ॥
ब्रह्मबोधें तया येई कृतार्थता । सत्शील गृहस्था तोचि लाभ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे स्वदारसंतुष्ट । असावा गृहस्थ ऋतुगामी ॥ ७ ॥

२१८

धूर्त कुटिल नसावा । मिताहार तेणें घ्यावा ॥ १ ॥
कृतज्ञता, सत्य, क्षमा । मृदुभाव दया जाणा ॥ २ ॥
ईशप्रेम अन्नदान । थोरआज्ञाप्रतिपालन ॥ ३ ॥
तेंवी श्रौतकर्माचार । गृहस्थाचा हा आचार ॥ ४ ॥

---

२५६ मुठी म्हणजे १ पूर्णपात्र.

नारायणगीत हेंचि । गृहस्थांसी प्रतिपादी ॥ ५ ॥
न घडे वासनांचा क्षय । पडतांही हा स्थूल देह ॥ ६ ॥
मोक्षवासनेनें मुक्ति । वासुदेवा इच्छा तेचि ॥ ७ ॥

२१९

ब्रह्मचारी सदा असावा एकाकी । शुश्रूषा जपादि करितां सेवा ॥१॥
एकाचि आचार्य सेवावा तयानें । सदा व्रती तेणें असणें योग्य ॥२॥
पंकतुल्य मल धारण करावा । संयमी असावा ब्रह्मचारी ॥ ३ ॥
स्वाध्याय स्वकर्म शुश्रूषा गुरूची । वंदन गुरूसी करणें नित्य ॥ ४ ॥
स्वकर्मावांचूनि अन्यकर्मत्याग । निग्रहानुग्रह त्याज्य तया ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दुष्टांचा संसर्ग । ब्राह्मचाऱ्या योग्य नव्हे कदा ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ६१ वा अध्याय समाप्त

अध्याय ६२ वा

२२०

धर्म म्हणे ताता, शुभ सुखावह । विपुल पुण्यलाभ घडे जेणें ॥ १ ॥
परपीडाहीन तैंवी लोकमान्य । सुलभ जे धर्म कथावे ते ॥ २ ॥
पितामह म्हणे आश्रमविहित । चारीही विप्रास इतरांसी न ॥ ३ ॥
इतरांचीं कर्में आचरितां विप्र । होई इहपर दुःखभागी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे श्वान वृकासम । अशास्त्रीय कर्म करितां विप्र ॥ ५ ॥

२२१

षट्कर्मनिरत वर्णाश्रमनिष्ठ । गुप्त जो सत्कृत्य राखी सदा ॥ १ ॥
तपस्वी, निरिच्छ, कृतार्थ तैं दाता । अविनाशी पदा पावे विप्र ॥२॥
जेथ ज्याकाळीं ज्या स्थितींत जें कर्म । आचरी धरून उद्देश जो ॥
तेंचि श्रेष्ठ ऐसें मानितो मानव । कारण संस्कार तैसेचि त्या ॥ ४ ॥
पूर्वकर्में कालप्रेरणा ज्या जैसी । कर्में होती तैसीं उच्च नीच ॥ ५ ॥
पूर्वार्जित कर्में भोगेंचि संपती । कर्माधीन बुद्धि मानवाची ॥ ६ ॥
स्वतंत्रही जीव इच्छापराधीन । होऊनियां कर्म तेंचि करी ॥ ७ ॥
इच्छेविरुद्धही विधिनिषेधांतें । आचरी तयातें कृतार्थता ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शास्त्रपराधीन । संतोषें जो धन्य तोचि जगीं ॥ ९ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ६२ वा अध्याय समाप्त

अध्याय ६३ वा

२२२

प्रत्यंचाकर्षण, शत्रुनिवर्हण । पशूचें पालन कृषि वाणिज्य ॥ १ ॥
द्रव्यार्थ शुश्रूषा निषिद्धाचि विप्रा । स्वकर्म गृहस्था उद्धारक ॥ २ ॥
कुमार्गसेवन परस्त्रीगमन । कुसीदाचरण त्याज्य विप्रा ॥ ३ ॥
दुराचारी, धर्मभ्रष्ट, वृषलीपती । सेवा जो नृपाची करी विप्र ॥ ४ ॥
वेदाध्ययन तो करो वा न करो । शूद्रचि साचार जाणावें त्या ॥५॥
वासुदेव म्हणे विप्राधिकाराचें । द्रव्यादि तयातें अर्पू नये ॥ ६ ॥

२२३

अधार्मिक विप्रा विप्र न गणावें । सत्शील असावे विप्र जनीं ॥ १ ॥
धार्मिकही जन अधर्म्यआश्रय । करिती, तदा होय धर्महानि ॥ २ ॥
विश्वेश तयांतें कदाही न इच्छी । तेणें मानवाची सर्व हानि ॥ ३ ॥
चातुर्वर्ण्य, वेद, धर्म, लौकिकही । संपूनियां जाई स्थैर्यभाव ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे चतुराश्रमांचे । निवेदी धर्मातें धर्म भीष्म ॥ ५ ॥

२२४

शुश्रूषेनें जनीं होऊनि कृतार्थ । श्रवणें वेदान्तज्ञान जया ॥ १ ॥
आचारनिष्ठ जो अधिकारी शूद्र । शमदमयुक्त संन्यास त्या ॥ २ ॥
स्वस्वकर्में शम दम सिद्ध होतां । अधिकार त्यागाचा सर्व वर्णां ॥३॥
विप्राविण अन्या काम्यचि संन्यास । विक्षेपकारक कर्मत्यागें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे आश्रमसंन्यास । विहित विप्रांस इतरां काम्य ॥ ५ ॥

२२५

क्षत्रियासी बाहुबळें सर्वसिद्धि । राजाधीन जगीं सर्वधर्म ॥ १ ॥
पाउलें ज्यापरी सर्वही प्राण्यांचीं । गजाचिया पदीं सामावती ॥२॥
सर्वप्रकारें तैं सर्वही धर्मांचा । समावेश साचा राजधर्मीं ॥ ३ ॥
आचारही अल्प फलही अल्पचि । इतर धर्मांची स्थिति ऐसी ॥४॥
श्रेष्ठ आचार तैं कल्याणस्वरूप । एकमेव क्षात्रधर्म जनीं ॥ ५ ॥
सर्वधर्मांमाजी मुख्य राजधर्म । राजधर्माधीन इतर धर्म ॥ ६ ॥

१ व्याजबट्टा

धर्मांमाजी धर्म दानचि वरिष्ठ । राजासीचि श्रेष्ठ दान शक्य ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राजधर्मनाशें । रक्षण वेदांचें न घडे कदा ॥ ८ ॥

२२६

सर्वज्ञानमूळ वेदनाश होतां । सर्वही धर्मांचा नाश होई ॥ १ ॥
दीक्षा विद्या सर्व राजधर्माश्रित । राजधर्माश्रित सकल कांहीं ॥ २ ॥
प्राकृताच्या हस्तें वध होई ज्याचा । विनाश तयाच्या सत्कर्मासी ॥
राजधर्महीन तेंवी सर्वधर्म । व्यर्थचि ते जाण श्रम मात्र ॥ ४ ॥
राजधर्मावीण चोरादिक भय । धार्मिकांसी होय सर्वकाल ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसा राजधर्म । तेणें तदधीन सर्व सौख्य ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ६३ वा अध्याय समाप्त

अध्याय ६४ वा

२२७

यदि क्षात्रधर्म सुस्थित असेल । कामना होतील तरिच पूर्ण ॥ १ ॥
तेणें निर्वासनपद प्राप्त होई । सकलांसी येई कृतार्थता ॥ २ ॥
इतर धर्मांचें फल अप्रत्यक्ष । तेणेंचि व्यत्यास करिती मूढ ॥ ३ ॥
विरोधाभासाचीं शोधूनि वचनें । ग्रासिती अज्ञानें जनांलागीं ॥ ४ ॥
अज्ञ, मूढ, धर्मतत्व न जाणितां । विपर्यास ऐसा करिती बहु ॥५॥
वासुदेव म्हणे प्रत्यक्ष फलद । धर्म सर्वश्रेष्ठ क्षत्रियांचा ॥ ६ ॥

२२८

पितामह म्हणे पूर्वकालीं विश्व । जाहलें आक्रांत दानवांनीं ॥ १ ॥
मांधाता या नामें तदा धर्मनिष्ठ । नृप श्रीविष्णूंस भेटूं इच्छी ॥ २ ॥
इंद्ररूपें विष्णु तयासी भेटतां । संवाद तयांचा घडला ऐका ॥ ३ ॥
इंद्र म्हणे विष्णुदर्शन दुर्लभ । धर्मिष्ठा तूं माग अन्य कांहीं ॥ ४ ॥
मांधाता तयासी म्हणे मी संतृप्त । क्षात्रधर्मे, लोभ दर्शनाचा ॥ ५ ॥
आदिदेवोद्भव धर्माचें पालन । घडे केंवी ज्ञान तेंचि नसे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विष्णु इंद्रासवें । निवेदी ज्ञान तें ऐका आतां ॥ ७ ॥

२२९

सैन्यहीना धर्मनिष्ठातेंही कदा । स्वपर उत्कर्षा करितां नये ॥ १ ॥
होऊं शके राव धर्मपारंगत । तैसाचि अन्यास करी धन्य ॥ २ ॥

आदिदेवें क्षात्रधर्मोचि प्रथम । निर्मिला संपूर्ण पुढती धर्म ॥ ३ ॥
तदंगभूत ते लीन क्षात्रधर्मी । यास्तव तो जनीं सर्वश्रेष्ठ ॥ ४ ॥
संहारिले दैत्य विष्णूनें या धर्मे । वांचलीं सत्कर्मे तयायोगें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे क्षात्रधर्मे वृद्धि । सकल धर्मांची विघ्नें येतां ॥ ६ ॥

२३०

भूतदया, स्वार्थत्याग, संरक्षण । तेंवी आर्तत्राण राजधर्मे ॥ १ ॥
कामक्रोधयुक्त मर्यादाविहीन । स्वभावें हे जन सर्वकाल ॥ २ ॥
राजभयेंचि ते पाळिती मर्यादा । राजधर्म ऐसा स्तविती ज्ञाते॥ ३ ॥
पुत्रांसम नृप करिती पालन । तेणेंचि हे जन वसती सौख्यें ॥ ४ ॥
शाश्वत हा राजधर्म आचरूनि । लीन परब्रह्मीं होती राजे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे क्षात्रधर्म ऐसा । उद्धारक लोकां नृपासवें ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ६४ वा अध्याय समाप्त

अध्याय ६५ वा

२३१

इंद्र म्हणे ऐसा श्रेष्ठ क्षात्रधर्म । मर्यादापालन करूनि घेई ॥ १ ॥
अर्थलोलुप ते पशुचि केवळ । उद्धरी नृपाळ ऐसीयांही ॥ २ ॥
विप्र जे स्वधर्मच्युत कर्महीन । कदाही सन्मान न घडो त्यांचा ॥३॥
कर्मेचि धर्मांची करी अभिवृद्धि । विश्वासघातकी कर्मभ्रष्ट ॥ ४ ॥
सर्व वर्ण ऐसे होतां धर्मभ्रष्ट । समुद्धर्ता त्यांस क्षत्रियाचि ॥ ५ ॥
यास्तव वीरांचा वरिष्ठ हा धर्म । सुस्पष्ट वचन देवेंद्राचें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मांधाता इंद्रासी । प्रश्न करी तोचि पुढती ऐका ॥७॥

२३२

देवदेवा, शक, चीन, यवनादि । कैंवी धर्ममार्गी रमती सांगें ॥ १ ॥
इंद्र म्हणे दश धर्म ते सामान्य । दस्यूंतेंही जाण उद्धरिती ॥ २ ॥
दंडनीतियुक्त राजधर्मनाशें । दुष्कर्म जनांचें वृद्धि पावे ॥ ३ ॥
भिक्षु तैं असंख्य धर्मचिन्हधारी । होती विविधाचारी पुढती बहु ॥४॥
सनातनधर्मविश्वासविहीन । उन्मार्गाक्रमण करितील ते ॥ ५ ॥
दुरात्म्यांसी ऐशा राजदंडें स्थिर । करितां अचल धर्ममार्ग ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नृपाळ वरिष्ठ । म्हणती मूर्तिमंत देव तया ॥ ७ ॥

२३३

देवही नृपातें सदा सन्मानिती । सद्धर्मीं जयाची नित्य प्रीति ॥ १ ॥
सत्कर्मप्रवृत्ति निवृत्ति दुष्कर्मी । नृपाविण जनीं घडेना हें ॥ २ ॥
यास्तव ब्रह्मचानें क्षत्रिय निर्मिले । स्थैर्य तेणें आलें सत्कर्मासी ॥३॥
सद्धर्मांचें फल जाणें जो नृपाळ । धर्माचा आधार पूज्य तोचि ॥४॥
वासुदेव म्हणे धर्मावीण राज्य । नरकपालीं आज्यभक्षण तें ॥ ५ ॥

२३४

पितामह म्हणे बोलूनियां ऐसें । प्रभु स्वस्थळातें निघूनि जाई ॥ १ ॥
धर्मा, राजधर्म ऐसा पुरातन । उल्लंघील कोण ज्ञाता तया ॥ २ ॥
अन्यायें प्रवृत्ति अन्यायें निवृत्ति । ऐसे अंध जगीं नष्ट होती ॥ ३ ॥
यास्तव नृपाळा, आज्ञा हे अनादि । पाळूनियां भोगीं सकल सौख्य ॥
वासुदेव म्हणे राजधर्मज्ञान । करील कल्याण आचरितां ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ६५ वा अध्याय समाप्त

अध्याय ६६ वा

२३५

धर्मप्रश्नें भीष्म विस्तारपूर्वक । आश्रमधर्मास निवेदिती ॥ १ ॥
पितामह म्हणे ज्ञाता तूंही धर्मा । ऐकें निवेदना करितों परी ॥ २ ॥
सर्व आश्रमांचें फल राजधर्मीं । सम सर्वाश्रमीं ब्रह्मचर्य ॥ ३ ॥
दक्षिणाप्रदानें पूज्यांचें पूजन । नृपाचा आश्रम प्रथम श्रेष्ठ ॥ ४ ॥
ज्ञानदान तेवीं निग्रहानुग्रह । गार्हस्थ्य तें होय क्षत्रियाचें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ज्ञातिमित्रोद्धारें । श्रेष्ठ आश्रमाचें फल नृपा ॥ ६ ॥

२३६

धार्मिकरक्षण पंचमहायज्ञ । वानप्रस्थ जाण क्षत्रियाचा ॥ १ ॥
स्वराष्ट्ररक्षण वेदांचा अभ्यास । आश्रम संन्यास क्षत्रियाचा ॥ २ ।
संग्रामीं विजय अथवा प्राणान्त । संन्यास वरिष्ठ क्षत्रियाचा ॥ ३ ॥
बालवृद्धांसी जो दया करी सदा । कुलशीलवंतां मान देई ॥ ४ ॥
आर्त जो शरण तयाचें रक्षण । सर्वाश्रमपुण्य करितां लाभे ॥ ५ ॥
देशकुलधर्म संरक्षी सर्वांचे । सर्व आश्रमांचें फल तया ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे रक्षी जो तयातें । पुण्य स्वधर्माचें इतरा पाप ॥ ६ ।

२३७

नावाडी तो सत्वगुण रज्जु धर्म । नौका राजधर्म दान वायु ॥ १ ॥
धर्मसागरीं हे नृपाळासी नौका । तारक बालका युधिष्ठिरा ॥ २ ॥
निरिच्छपणें जो पालन प्रजेचें । करी वेदज्ञाचें पुण्य तया ॥ ३ ॥
वनीं आश्रमीं वा राहूनि जें पुण्य । त्याहूनि शतगुण राजधर्मँ ॥ ४ ॥
सनातन ऐशा धर्मं एकाग्रता । लाभूनि योगाचा सुलभ मार्ग ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्मज्ञानें मुक्ति । लाभे रायाप्रति राजधर्मँ ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ६६ वा अध्याय समाप्त

अध्याय ६७ वा

२३८

पितामहालागीं प्रश्न करी धर्म । राष्ट्राचें उत्तम कृत्य सांगा ॥ १ ॥
कथिती तयासी भीष्मपितामह । राष्ट्राचें कर्तव्य करणें राजा ॥ २ ॥
दौर्बल्य त्या येई नसतां नियंता । शत्रु ऐशा राष्ट्रा जिंकिताती ॥ ३ ॥
अराजक राष्ट्रीं धर्मही न नांदे । भक्षिताती स्वार्थं परस्परां ॥ ४ ॥

२३९

स्वीकारितां राजा, इंद्राचा संतोष । इंद्रासम नृप श्रुति म्हणे ॥ १ ॥
अराजक राष्ट्रीं करूं नये वास । कथिती धर्मास स्पष्ट भीष्म ॥ २ ॥
अग्नीही न सेवी हविर्द्रव्यें तेथ । शरण जाणें प्राप्त स्वारी होतां ॥३॥
अराजकाहूनि निंद्य नसे कांहीं । बलवंत होई क्रुद्ध जरी ॥ ४ ॥
निर्मूलही करी अराजक राष्ट्र । जाणूनि हें तत्व नम्र व्हावें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे राष्ट्र अराजक । होतां उत्कर्षास विघ्नें बहु ॥ ६ ॥

२४०

दुर्दुहा धेनूसी क्लेश बहु होती । क्लेश सुदुहेसी असतीचिना ॥ १ ॥
अतप्तचि काष्ट होई जें प्रणत । कोण तया ताप देई सांगा ॥ २ ॥
त्याहूनिही नम्र स्वयें जे तयासी । वांकवावें ऐसी इच्छा कोणा ? ॥
तात्पर्य बलाढ्य तोचि जाणा इंद्र । होऊनि विनम्र हित साधा ॥४॥
वासुदेव कथी भीष्मांचें वचन । नृपाळ योजून सौख्य पावा ॥ ५ ॥

१ धर्ममर्यादा

२४१

धन-दाराहीन अराजकामाजी । परद्रव्यासक्ति दुष्टांप्रति ॥ १ ॥
परी तयाचेंही होतां निर्मूलन । इच्छी संरक्षण तोहि लोकीं ॥ २ ॥
कारण दुष्टातें भेटे अन्य दुष्ट । तयातेंही कष्ट देती अन्य ॥ ३ ॥
ऐसी अपहारपरंपरा वाढे । अदास दास्यातें पावे तेथ ॥ ४ ॥
बलात्कारें होई हरण स्त्रियांचें । यास्तव नृपातें निर्मी ब्रह्मा ॥ ५ ॥
वासुदेव कथी पितामहवाणी । मात्स्यन्याय जनीं राजाविणें ॥ ६ ॥

२४२

दुर्बल मत्स्यासी प्रबल तो भक्षी । तैसी अराजकीं स्थिति होई ॥१॥
अनुभवें ऐशा जाहला दंडक । वाक्शूर परुष दंड ज्यांचा ॥ २ ॥
परस्वापहारी जे पारजायिक । त्याज्य अधार्मिक जन मानूं ॥ ३ ॥
विश्वासार्थ सर्ववर्णांसी समान । करूनि नियम राहियेले ॥ ४ ॥
समत्वेंही ऐशा सौख्य न जनांसी । प्रार्थिती ब्रह्मयासी अंतीं सर्व ॥
वासुदेव म्हणे अनुभवें नर । न होई चतुर मूढचि तो ॥ ६ ॥

२४३

ब्रह्मदेवाप्रति प्रार्थिती सकळ । आम्हांसी नृपाळ देई देवा ॥ १ ॥
पूजार्ह तो आम्हां होवो सकलांसी । सद्धर्मे आम्हांसी प्रतिपाळी जो
ब्रह्मदेव तदा बोलतां मनूसी । अंतरींची भीति कथी मनु ॥ ३ ॥
पापकर्मभय वाटतें मजसी । त्यांतही प्रवृत्ति असन्मार्गी ॥ ४ ॥
ऐशा जनांवरी चालविणें राज्य । दुस्तर अत्यंत पापचि तें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संस्कार सद्बुद्धि । नष्ट होतां लोकीं अनाचार ॥ ६ ॥

२४४

मनुवचन ऐकूनि । वदले जन त्यांलागूनि ॥ १ ॥
कर्ता भोगील पातक । शासितां न तुजसी दोष ॥ २ ॥
प्रतिपंचाशतांमाजी । पशु एक रायाप्रति ॥ ३ ॥
तेंवी पन्नासावा भाग । सुवर्णाचा अर्पू तुज ॥ ४ ॥
दशमांश तेंवी धान्य । अर्पू शस्त्रास्त्रेंही जाण ॥ ५ ॥
सुस्वरूप कन्येस्तव । वाद पडतां अर्पू तुज ॥ ६ ॥
देव देवेंद्रासी जैसे । तुज मानितील ज्ञाते ॥ ७ ॥

सैन्य-कोशलाभें ऐसा । करीं सांभाळ आमुचा ॥ ८ ॥
तेणें प्रजा करी धर्म । चतुर्थांश तेंही पुण्य ॥ ९ ॥
तुझा असो जयजयकार । करी शत्रूंचा संहार ॥ १० ॥
वासुदेव म्हणे ऐसी । करिती प्रार्थना मनूची ॥ ११ ॥

२४५

ऐकूनि तें मनु भानु जैं तेजस्वी । सेनेसवें हांकी स्यंदनातें ॥ १ ॥
आदर तयाचा राखूनियां जन । स्वधर्मपालन करिती सुखें ॥ २ ॥
वृष्टिकारी मेघासम मनुवीर । सर्वत्र संचार करी वेगें ॥ ३ ॥
पापप्रवृत्तांसी ताळ्यावरी आणी । संतोषले मनीं अवघे जन ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अधिकारभेद । मोडूनि, समत्व अन्याय तो ॥ ५ ॥

२४६

कल्याणार्थ लोकीं यास्तव नृपाळ । प्रजा स्वीकारील तेचि धन्य ॥१॥
गुरूसम लोकीं नृपाळ सन्मान्य । वंदितां स्वजन नमिती सर्व ॥२॥
स्वजनचि ज्याचा करिती अवमान । सन्मानील कोण तयाप्रति॥३॥
यास्तव नृपाचा छत्र वाहनादि । अर्पूनि राखिती ज्ञाते मान ॥ ४ ॥
प्रजेनें यापरी सन्मानावा राजा । कृतज्ञ प्रजेचा असो राव ॥ ५ ॥
सुहास्यवदन मधुर भाषण । प्रजेवरी प्रेम असो त्याचें ॥ ६ ॥
संपत्तींत भाग मानूनि सर्वांचा । जितेंद्रिय साचा राव तोचि ॥ ७ ॥
दुर्लभ न व्हावी भेट त्याची कोणा । भेटतां तो जनां संतोषवो ॥८॥
वासुदेव म्हणे नृपाळाचें ऐसें । महत्त्व धर्मातें कथिती भीष्म ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ६७ वा अध्याय समाप्त

अध्याय ६८ वा

२४७

धर्म म्हणे भीष्मपितामहालागीं । विप्रही नृपासी वंदिती कां ॥ १ ॥
कथिती त्या भीष्म बृहस्पतीप्रति । वसुमना करी हाचि प्रश्न ॥ २ ॥
प्रजाहितदक्ष वंदूनि गुरूतें । कर्तव्य रायाचें कथा म्हणे ॥ ३ ॥
वृद्धि-क्षय कैंवी होतसे भूतांचा । अव्यय सुख त्यां कैंवी लाभे ॥४॥
वासुदेव म्हणे बृहस्पति तदा । संशय नृपाचा छेदीतसे ॥ ५ ॥

२४८

बृहस्पति म्हणे महाबुद्धिमंता । धर्माधार राजा प्रजेप्रति ॥ १ ॥
परस्पर हिंसा टळे राजभयें । मर्यादित राहे प्रजा दंडें ॥ २ ॥
अंधकार जैंवी चंद्रसूर्यावीण । अल्पोदकीं मीन स्वैर पक्षी ॥ ३ ॥
नष्ट होती तैंवी राजावीण प्रजा । गोपहीन जैसा पशुवृंद ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे भलेपण लोकीं । रायावीण पुष्टि पावेचिना ॥ ५ ॥

२४९

स्वामित्व कोठेंही कोणा दुर्बलांचें । जगीं न नांदतें रायावीण ॥ १ ॥
द्रव्य दारा पुत्र माझें ऐसा शब्द । या जनीं अशक्य रायावीण ॥ २ ॥
शस्त्रप्रहारचि रायावीण नित्य । पावते धार्मिक अवनीवरी ॥ ३ ॥
मातापिता वृद्ध आचार्य अतिथि । गुरु त्रस्त होती नसतां राव ॥४॥
वधही तयांचा करितील जन । जरी न शासन नृपाळाचें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वध, बंध, क्लेश । नित्य धनवंतास नसतां राव ॥६॥

२५०

अकाल मृत्यु तैं दस्युग्रस्त जन । नरकपतन सकलांप्रति ॥ १ ॥
योनिदोष कृषि-वाणिज्यही नसे । वेदधर्मनाशें दुःखी जन ॥ २ ॥
दक्षिणासंयुक्त यज्ञ विवाहही । समाज न राही नसतां राजा ॥ ३ ॥
धेनूसी आसक्त वृषही न होती । दधिमंथनही न घडे कोठें ॥ ४ ॥
गौळवाडे तैंवी सकलही जन । होऊनि उद्विग्न नष्ट होती ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे क्षणीं सर्वनाश । पालक जनांस नसतां जाण ॥ ६ ॥

२५१

निर्भय सत्राचा आरंभ न घडे । सविधि यज्ञातें न करी कोणी ॥१॥
वेदाध्ययनही न घडे विप्रांचें । विद्याव्रतही तें न घडे कोठें ॥ २ ॥
धर्मप्रशंसा न होती राजावीण । हत विप्रजन अवघे तेथ ॥ ३ ॥
हातोहात नेते तस्कर लुटूनि । यद्यपि अवनी राजहीन ॥ ४ ॥
अन्याय्यप्रवृद्धि वर्णांचा संकर । दुष्काळ सर्वत्र नसतां राजा ॥५॥
झांकितां जें द्वार गृहीं सुखनिद्रा । निर्भयता नरा नृपाळें तैं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सर्वोत्कर्ष राजा । राजावीण प्रजा निराधार ॥ ७ ॥

२५२

सालंकृत स्त्रिया निर्भय एकाकी । मार्गी संचरती असतां रात्र ॥ १ ॥
परस्पर प्रेम नांदे प्रजेमाजी । धर्ममार्गी प्रीति राजधर्मे ॥ २ ॥
यथाधिकार ते यज्ञ राजधर्मे । घडती श्रद्धेनें सर्ववर्णी ॥ ३ ॥
वार्तामूल लोक वेदें संरक्षित । व्यवस्था ते सर्व रक्षी राजा ॥४॥
धुरंधर राजा स्वबळें रक्षक । असतां जनांस सौख्य लाभे ॥ ५ ॥
भावें भाव, नाश अभावें जयाच्या । नराची त्या पूजा न करी कोण
ऐशा नृपावरी दृढभाव ज्याचा । इह-परलोका जिंकील तो ॥
अनिष्ट नृपाचें चिंती त्याचा नाश । कथी व्यासबोध वासुदेव ॥

२५३

मानव मानूनि नृपाचा अवमान । करूं नये जाण कदाकाळीं ॥ १ ॥
महादेवता ते नरदेहधारी । जाणावें अंतरीं सर्वकाळ ॥ २ ॥
दग्ध करी पापें तदा तो पावक । चारचक्षु लोकपाल भानु ॥ ३ ॥
अंतक दुष्टांचा करी यदा नाश । निग्रहानुग्रह करितां यम ॥ ४ ॥
अपकारें करी धनाचा अपहार । उपकारें कुबेर अर्पी धन ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐशा पंच संज्ञा । नृपाप्रति जाणा देती सुज्ञ ॥ ६ ॥

२५४

नृपाचा विरोध न करावा कदा । विरोधें आपदा येती बहु ॥ १ ॥
वायुसखा अग्नि सर्व करी भस्म । क्रोध तैसा जाण नृपाळाचा ॥ २ ॥
राजसंरक्षित वस्तुअभिलाष । मृत्यु मूर्तिमंत तोचि असे ॥ ३ ॥
यंत्रस्पर्शें जैवी विनाश मृगाचा । तैवी नाश साचा राजस्वानें ॥४॥
आत्मस्वासमाचि राजस्व रक्षावें । बुद्धिमंतें ध्यावें नित्य ध्यानीं ॥५॥
राजस्वापहारें नरकपतन । वासुदेव ध्यान द्यावें म्हणे ॥ ६ ॥

२५५

राजा, भोज, सम्राट्, विराटादि शब्दें । स्तविती तयातें सेवावेंचि ॥
यास्तव मेधावी स्मृतिमंत दक्ष । आश्रय नृपास मानी निज ॥ २ ॥
कृतज्ञ कुलीन बुद्धिवंत दक्ष । तैवी धर्मनिष्ठ मंत्री असो ॥ ३ ॥
प्रज्ञावंत दृढभक्त तैं धर्मज्ञ । श्रेष्ठ कार्यमग्न शूर यमी ॥ ४ ॥
नृपाळानें ऐसे जन संरक्षावे । वासुदेव व्हावें म्हणे ज्ञानी ॥ ५ ॥

२५६

प्रगल्भ नरासी करीतसे प्रज्ञा । संकुचित जनां करी राव ॥ १ ॥
वक्रदृष्टि त्याची होतां नसे स्वास्थ्य । अनुकूलत्वें सौख्य सकलां लाभे
प्रजाहृदय तैं श्रेष्ठगति राजा । तैसीच प्रतिष्ठा श्रेष्ठ सौख्य ॥ ३ ॥
आश्रयें तयाच्या इहपर सौख्य । लाभे मानवास निश्चयानें ॥ ४ ॥
दम, सत्य तेंवी सौहृद सेवूनि । पाळी जो अवनी करूनि यज्ञ ॥५॥
अमरपद त्या नृपासी लाभतें । वसुमना ऐके गुरुवच ॥ ६ ॥
राज्यकारभार करी राव तैसा । ऐकवी त्या बोधा वासुदेव ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ६८ वा अध्याय समाप्त

अध्याय ६९ वा

२५७

अवशिष्ट राजधर्म कथा ऐसें । विनवी भीष्मांतें धर्मराज ॥ १ ॥
जनपदरक्षा, शत्रुपराजय । योजावे ते चार केंवी कथा ॥ २ ॥
सकल जन तैं सेवक, स्त्री, पुत्र । घ्यावे विश्वासांत केंवी नृपें? ॥३॥
निवेदिती भीष्म देऊनियां चित्त । ऐकावा समस्त राजधर्म ॥ ४ ॥
प्रथम आपणा आपण जिंकावें । पुढती जिंकावें वैरीयासी ॥ ५ ॥
इंद्रियाधीन जो स्वयेंचि आपण । शत्रूचें दमन अशक्य त्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे इंद्रियविजेता । राव जो अरीचा तोचि अरि ॥ ७ ॥

२५८

दुर्ग, सीमा, प्रान्त, नगर उपवन । तैसेंच उद्यान चतुष्पथ ॥ १ ॥
पुरीं नगरींही अंतःपुरीं तेंवी । योजना करावी पदार्तींची ॥ २ ॥
बधिर, अंध तैं कुरूप सुबुद्ध । तैसे परीक्षक, धूर्त, दक्ष ॥ ३ ॥
क्षुधादि सहिष्णु व्हावे गुप्त दूत । पुत्र तैं अमात्य परीक्षावे ॥ ४ ॥
सर्वत्र योजावे गुप्तपणें दूत । नसोत ते ज्ञात एकमेकां ॥ ५ ॥
आपण[1], विहार, समाज तैं सभा । सकलप्रदेशां योजावे त्यां ॥ ६ ॥
तैसेचि पराचे शोधावे ते दूत । याचि मार्गें हित नृपाळाचें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे चार चक्षु राजा । जाणावें अंध त्या दूतांविण ॥ ८ ॥

१ बाजार

२५९

स्वयें बलहीन ऐसा । बोध नृपाळासी यदा ॥ १ ॥
तदा करूनियां मंत्र । संधि व्हावा बलवंतास ॥ २ ॥
दैन्य राखूनियां गुप्त । संधि घडूं द्यावा शीघ्र ॥ ३ ॥
संयमीं जे गुणवंत । साधु महोत्साहयुक्त ॥ ४ ॥
संधि करावा तयांसी । धर्में रक्षावें प्रजेसी ॥ ५ ॥
स्वयें आपुला विनाश । पाहूनियां स्ववैऱ्यांस ॥ ६ ॥
जनद्वेष्ट्यांही वधावें । वासुदेव कथी भावें ॥ ७ ॥

२६०

अपकार किंवा उपकाराक्षम । उपेक्षा जाणून व्हावी त्याची ॥ १ ॥
रक्षणादि सर्व सिद्धता करूनि । आक्रमणालागीं प्रवर्तावें ॥ २ ॥
उत्साह आनंद धरूनि अंतरीं । मूढ वैऱ्यावरी चाल व्हावी ॥ ३ ॥
अविवेकी असहाय अन्याप्रति । युद्ध जो आरंभी असावध ॥ ४ ॥
ऐशावरी होतां आक्रमण, जय । कथी वासुदेव राजनीति ॥ ५ ॥

२६१

दुर्बलही जरी करील न संधि । वसूनि त्या राज्यीं पीडावें त्या ॥१॥
शस्त्र, अग्नि, विष, मादक द्रव्यांनीं । विविध मार्गांनीं पीडा द्यावी ॥
राज्यांत कलह माजवावे यत्नें । भेद चातुर्यानें करणें योग्य ॥ ३ ॥
बुद्धिमंतें युद्ध वर्जावें सर्वदा । साम दान भेदा अवलंबावें ॥ ४ ॥
सामादिकीं लाभ घडेल तेणेंचि । असो द्यावी तुष्टि पंडितानें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे युद्धाचा परिणाम । अनिश्चित जाण सर्वकाळ ॥ ६ ॥

२६२

प्रजारक्षणार्थ षष्ठांशचि कर । घेउनि, निर्भय करणें प्रजा ॥ १ ॥
मत्तप्रमत्तादि जे पीडाकारक । दंडार्ह ते लोक हितास्तव ॥ २ ॥
पुत्रपौत्रांसम संरक्षावी प्रजा । परी अपराध्या शिक्षा योग्य ॥ ३ ॥
न्यायदानास्तव नियोजावे ज्ञाते । प्रतिष्ठा राज्यातें न्यायासम ॥ ४ ॥
आकर, लवण स्थान, तेंवी पण्य । सन्मंत्री योजून संरक्षावे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे नद्या तेंवी गज । संरक्षावें आप्ततुल्य जनीं ॥ ६ ॥

२६३

योग्य दंडधारी रायाचें कल्याण । व्हावा तो वेदज्ञ तपस्वीही ॥१॥
दान-यज्ञशील नृप असो सदा । सद्‌गुण हे जातां सर्वनाश ॥ २ ॥
अन्य आक्रमणें पीडा बहु होतां । आश्रय दुर्गाचा करणें योग्य ॥३॥
सामादि योजूनि रक्षावे स्वजन । गुप्तस्थळीं जन जाऊं द्यावे ॥ ४ ॥
धना बलवंतां देऊनियां धैर्य । संरक्षी तो राव श्रेष्ठ जनीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विविध उपाय । साधूनियां कार्य सिद्ध व्हावें ॥ ६ ॥

२६४

तोडूनि कणसें आक्रमावा पंथ । होतां तें अशक्य अग्नि द्यावा ॥ १ ॥
भेदें वा स्वबळें शत्रुसस्यनाश । उदकांचे बांध करणें नष्ट ॥ २ ॥
अथवा सविष उदक करावें । कार्यार्थ जोडावें अरिसी सख्य ॥ ३ ॥
क्षणभरी मित्रकार्य दुर्लक्षूनि । कंटकें वेधूनि कंटकातें ॥ ४ ॥
रक्षावा स्वदेश ऐसी राजनीति । वासुदेव चित्तीं मोद पावे ॥ ५ ॥

२६५

आश्रयाचीं स्थानें करावीं विनष्ट । छेदावे अश्वत्थरहित वृक्ष ॥ १ ॥
उच्चस्थानें तेंवी प्रहारार्थ छिद्रें । खंदक असावे सभोंवार ॥ २ ॥
उदकसंयुक्त झष-नक्राकुल । चोरवाटा थोर संरक्षित ॥ ३ ॥
सानथोर द्वारें योजावीं यंत्रांनीं । तैशाचि शतघ्नी इष्ट स्थळीं ॥ ४ ॥
काष्ठसंग्रहही करावा बहुत । जागोजागीं कूप उदकास्तव ॥ ५ ॥
असतील कूप त्या स्थळीं पूर्वींचे । उदक तयांचें करणें शुद्ध ॥ ६ ॥
तृणाच्छन्न वेश्मे प्रलेपावीं पंकें । कथी व्यासोक्तीतें वासुदेव ॥ ७ ॥

२६६

तृण चैत्रमासीं संरक्षावें यत्नें । पाक दक्षतेनें व्हावा रात्रौ ॥ १ ॥
अग्निहोत्रावीण ग्रीष्मकाळीं अग्नि । राखूं नये कोणी दंडक हा ॥ २ ॥
सूतिकागृहीं वा लोहारशाळेंत । आग्नि संरक्षित असों द्यावा ॥ ३ ॥
यावीण जो दिवा[1] पेटवील अग्नि । दंड त्यालागूनि उद्‌घोषावे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे यापरी रक्षण । करावें योजून उपायांतें ॥ ५ ॥

१ दिवसा

२६७

भिक्षुक चाक्रिकं, क्लीव, कुशीलवं । उन्मत्त ते बाह्य हांकलावे ॥ १ ॥
चत्वर तीर्थं तीं सभासदनंही । संरक्षावीं पाहीं दूतद्वारा ॥ २ ॥
राजपथ, प्रपा, बाजारही थोर । निमावे साचार नृपाळानें ॥ ३ ॥
भांडार आयुधें अश्व-गजशाला । निवास सेनेचा, गुप्तमार्ग ॥ ४ ॥
प्रमदावनेंही कैसींही परातें । न दिसावीं ऐसें व्हावें दक्ष ॥ ५ ॥
परपीडायुक्त नृपानें सर्वदा । मधु तैल वसा घृतादिक ॥ ६ ॥
औषधी धनाचा संचय करावा । बोध वासुदेवा, मोददायी ॥ ७ ॥

२६८

ज्वालाग्राही तृणें तेंवी विषबाण । संग्रहावीं जाण सकल शस्त्रें ॥१॥
फल मूलौषधि, विष-शल्यरोग- । कृत्या निवारक असों द्याव्या ॥२॥
नट नर्तक तैं मल्लही मायावी । येणें शोभवावी राजधानी ॥ ३ ॥
सकल जनांतें हर्षित करावें । शंकित ते व्हावे स्ववश सर्व ॥ ४ ॥
अकारण क्रोधें पीडितां कोणासी । धन-दानादिकीं सन्मानावें ॥ ५ ॥
आत्मामात्य कोश, दंड, मित्र, प्रजा । नगर हीं राजा सप्त रक्ष्य ॥
वासुदेव म्हणे राजधर्म श्रेष्ठ । करी मृत्युलोक स्वर्गासम ॥ ७ ॥

२६९

संधि विग्रहही यान तें आसन । द्वैधीभाव जाण समाश्रय ॥ १ ॥
षाड्गुण्य हें, क्षय, स्थान, तेंवी वृद्धि । त्रिवर्ग बोलती सामान्य हे ॥
परम त्रिवर्ग धर्म, अर्थ, काम । समय जाणून सेवावे ते ॥ ३ ॥
बृहस्पतिवच ऐकें धर्मराजा । इहपर राजा धर्मे पावे ॥ ४ ॥
तप यज्ञ सर्व प्रजापालनांत- । नृपाचें, धर्मज्ञ असो राजा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रजेचें पालन । हाचि श्रेष्ठ धर्म नृपाळाचा ॥ ६ ॥

२७०

निवेदिती भीष्म दंडनीतिज्ञानें । प्रजेसवें जाणें राव सुखी ॥ १ ॥
कैंवी तें कथितों सिद्ध युक्तिवाक्यें । मर्यादा प्रजेतें घाली राव ॥ २ ॥
वर्णमर्यादांनीं जन ते निर्भय- । होऊनि, कर्तव्य आचरिती ॥ ३ ॥

---

१ गाडी हांकणारे, २ नट किंवा कसाई, ३ चवाठे, ४ पाणपोई.

ऐशा मार्गें स्थैर्य लाभतें जनांसी । एकमेव हाचि सौख्यमार्ग ॥ ४ ॥
राजाधीन काल, कालाधीन किंवा । राव तो जाणावा ऐसी शंका- ॥
न धरावी मनीं निश्चय हा जाण । कालासी कारण राव असे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सिद्धान्त हा थोर । जाणतांचि सर्व उमगे मार्ग ॥७॥

२७१

पूर्णपणें सम्यग्‌दंडनीति राजा । आचरील यदा कृतयुग तें ॥ १ ॥
केवळ धर्मचि विराजे त्या काळीं । अधर्माची टाळी न वाजेचि ॥ २ ॥
सर्व वर्णांप्रति आवडे स्वधर्म । धर्मे योगक्षेम सकलांचाही ॥ ३ ॥
वेदोक्त सद्‌गुण उत्कर्ष पावती । निरामय होती सकल ऋतु ॥ ४ ॥
मन स्वर वर्ण प्रसन्न नरांचे, । रोगी अल्पायु ते नसती कोणी ॥ ५ ॥
वैधव्य न येई कोणाही न दैन्य । कृषिकर्मावीण धान्यवृद्धि ॥ ६ ॥
कंद, मूळ, फळें, ओषधि सवीर्य । म्हणे वासुदेव सत्ययुगीं ॥ ७ ॥

२७२

चतुर्थांश दंडनीति ते त्यागितां । युग तदा त्रेता वर्ते जनीं ॥ १ ॥
कृषिकर्मे धान्य ओषधि लाभती । द्वापर धर्मासी त्यजितां अर्ध ॥२॥
कष्टेंही ते भूमि देई अर्ध फल । अनुक्रमें वळ क्षीण ऐसें ॥ ३ ॥
दंडनीतित्याग करी यदा राजा । क्लेशद कलीचा प्रभाव तैं ॥ ४ ॥
शोधितांही धर्म गवसे न तेथ । स्वधर्मचलित सकल वर्ण ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शूद्र भिक्षावृत्ति । विप्र आचरिती सेवाधर्म ॥ ६ ॥

२७३

योगक्षेमनाश वर्णांचा संकर । वैदिक आचार विगुण[1] होई ॥ १ ॥
रोगाभिवृद्धीचि सर्व ऋतूंमाजी । मानवाची शक्ति ऱ्हास पावे ॥ २ ॥
स्त्रियांसी वैधव्य निर्दयता लोकीं । तेंवी अनावृष्टि सर्वकाल ॥ ३ ॥
क्वचित्‌काळीं वृष्टि होऊनिया धान्यें । पाहूनि जनांतें हर्ष होई ॥ ४ ॥
दंडनीतित्याग करी जैं नृपाळ । रस तैं सकळ क्षीण होती ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अनुभव ऐसा । येऊनिही कैसा न रुचे बोध ॥६॥

२७४

कृतत्रेता द्वापरांचा । कर्ता नृपाळचि साचा ॥ १ ॥

---

१ निष्फल

कलियुगाचेंही तोचि । एकमेव कारण जगीं ॥ २ ॥
निर्मील तो युग जैसें । अंतीं तया फल तैसें ॥ ३ ॥
राजा कलिकाल कर्ता । धनी पापाचा सर्वदा ॥ ४ ॥
सकल प्रजा पापलिप्त । नरक भोगी तो शाश्वत ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । इहपर नाश त्याचा ॥ ६ ॥

२७५

निवेदिती भीष्म राजा, दंडनीति । आचरी तयासी सकल लाभ ॥
प्राप्त होई तया अप्राप्त जें तेंही । रक्षणही होई संप्राप्ताचें ॥ २ ॥
मातापित्यासम दंडनीति ऐसी । सर्वभावें रक्षी सकलांप्रति ॥ ३ ॥
यास्तव नृपाळें राजनीतिज्ञान । संपादूनि जन संरक्षावे ॥ ४ ॥
धर्मा, इहपर पावसी तूं येणें । स्वर्गही जिंकावे याचि मार्गें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐका राजधर्म । जाणूनियां मर्म हित साधा ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ६९ वा अध्याय समाप्त

अध्याय ७० वा

२७६

धर्म म्हणे ताता, इहपर कैंवी । नृपाळासी होई प्राप्त सांगा ॥ १ ॥
निवेदिती भीष्म छत्तीस सद्‌गुण । तितुकेंचि जाण धर्मभेद ॥ २ ॥
रागद्वेषहीन स्वस्वधर्माचार । नास्तिक्यांगिकार स्नेह नसो ॥ ३ ॥
नैष्ठुर्यें न कदा व्हावें धनार्जन । धर्मार्थ रक्षून कामपूर्ति ॥ ४ ॥
दैन्यविरहित प्रिय संभाषण । शौर्य प्रौढीहीन संपादावें ॥ ५ ॥
दाता असूनियां अपात्रीं न देणें । दया न त्यागिणें प्रागल्भ्येंही ॥ ६ ॥
अनार्यासी मैत्री, कलह बंधूसी । दूत विरोध्यासी योजूं नये ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पीडेवीण कार्य । साधावें अपूर्व सद्‌गुण हा ॥ ८ ॥

२७७

हेतु न कथावा असत्यवाद्यासी । स्वगुण स्वयेंचि कथूं नये ॥ १ ॥
द्रव्यापहार न करावा साधूचा । आश्रय खलाचा विघातक ॥ २ ॥
निरपराध्यासी कदा दंडूं नये । प्रगट बोलूं नये गुप्त मंत्र[2] ॥ ३ ॥
लोभ्याप्रति दान, वैऱ्यासी विश्वास । कदा हितप्रद होत नसे ॥ ४ ॥

१ दीर्घकाल. २ मसलत.

ईर्षारहितचि व्हावें, गुप्तदार । अनृणि साचार शुचि व्हावें ॥ ५ ॥
नातिस्त्रीसेवन नाहित भोजन । सन्मान्यांसी मान गुरुसेवा ॥ ६ ॥
दंभविरहित ईश्वराची पूजा । न्याय्य संपत्तीचा अभिलाष ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे नृपाचे हे धर्म । पाळील तो धन्य सामान्यही ॥ ८ ॥

२७८

अनासक्तचि ते संपदा भोगावी । समयज्ञता व्हावी दक्षातेंही ॥ १ ॥
शत्रुमोचनार्थ नसो आश्वासन । कोणा संरक्षून निंदू नये ॥ २ ॥
अज्ञानें प्रहार शत्रुवधें शोक । अकस्मात क्रोध करूं नये ॥ ३ ॥
वैऱ्यातें सौजन्य कदा न दावावें । राया, हें धरावें नित्य ध्यानीं ॥४॥
युधिष्ठिरा, यदि इच्छिसी कल्याण । आचरीं नियम हेचि तरी ॥५॥
इहपर सौख्य होई या नियमें । सदा नृपाळानें घ्यावें ध्यानीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भीष्मोक्ति ऐकून । त्याचि पंथें धर्म राज्य करी ॥ ७॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ७० वा अध्याय समाप्त

अध्याय ७१ वा

२७९

धर्म म्हणे कथा कैशा मार्गें जातां । नसे आधिबाधा अधर्मही ॥ १ ॥
निवेदिती भीष्म संक्षेपें तुजसी । राजधर्माप्रति कथितों ऐकें ॥ २ ॥
शाश्वत ते धर्म राया, असंख्यात । यास्तव संक्षेप करणें प्राप्त ॥३॥
धार्मिक वेदज्ञ देवपूजारत । व्रती गृहागत सन्मानावे ॥ ४ ॥
सन्मानूनि विप्रां वंदावें प्रथम । सन्मार्गेंचि धन संपादावें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विकारें न धर्म । नर किंवा धन लाभे कोणा ॥ ६ ॥

२८०

धनसंपादन कार्यामाजी राया । अयोग्य जाणावा मूढ, लोभी ॥ १ ॥
बुद्धिमंत तैंवी अलोभी जो नर । जाणावा साचार योग्य तेथें ॥ २ ॥
धनाधिकारी तो अविवेकी होतां । प्रजेलागीं पीडा करी बहु ॥ ३ ॥
षष्ठांश तो कर दंड अपराधें । कर व्यापाऱ्यांतें रक्षणार्थ ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐशामार्गें धन । संपादूनि जन कार्य व्हावें ॥ ५ ॥

१ स्त्रियांचें रक्षण केलें आहे ज्यानें असा.

२८१

आवश्यक धान्य रक्षूनि प्रजेचें । रक्षावे सर्वांचे योगक्षेम ॥ १ ॥
संरक्षक दाता धार्मिक न जरी । नृपाळ न तरी जनप्रिय ॥ २ ॥
राया, लोभवश होऊनि कदाही । अन्यायें न व्हावी वैभवेच्छा ॥३॥
उल्लंघितां शास्त्र धर्मार्थ अध्रुव । होतां अर्थपर उभयनाश ॥ ४ ॥
अस्थानींचि वित्त नष्ट होई त्याचें । आत्मघात लागे करणें अंतीं ॥५॥
अशास्त्रीय करें छळी जो प्रजेसी । छेदी तो कांसाचि दुग्धास्तव॥६॥
वासुदेव म्हणे सेवेनेंचि दुग्ध । पालनेंचि सौख्य तेंवी नृपा ॥ ७ ॥

२८२

रावसंरक्षित धरणी, धन-धान्य । अर्पी मातेसम सकलांतें ॥ १ ॥
अङ्गारकारकासम नच होई । मालाकार होई धर्मराजा ॥ २ ॥
तेणें चिरकाल भोगिसील राज्य । अतिलोभें नाश निश्चयानें ॥ ३ ॥
परचक्रें धनविनाशासमर्थी । सामें धन घेई अविप्रांचें ॥ ४ ॥
विप्रधनावरी न करावा लोभ । रक्षूनि तयास द्यावें धन ॥ ५ ॥
परिणामीं हित होई ऐशा मार्गें । निवारण ऐसें सकलार्थीचें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे आधिनिवारक । मार्ग हा अचुक कथिला ऐसा ॥ ७ ॥

२८३

प्रजारक्षण नृपाचा । सर्वश्रेष्ठ धर्म साचा ॥ १ ॥
पालनें जो करी दया । म्हणती धार्मिक त्या राया ॥ २ ॥
भयें राजा एक दिन । करी यद्यपि अधर्म ॥ ३ ॥
सहस्राब्द त्याचें पाप । भोगणें त्या होई प्राप्त ॥ ४ ॥
धर्में संरक्षितां दिन । दशसहस्राब्द पुण्य ॥ ५ ॥
भोगी स्वर्गांत तो राव । स्वधर्माचा हा प्रभाव ॥ ६ ॥
क्षण एक धर्मराज्यें । सकलाश्रम पुण्य लाभे ॥ ७ ॥
धर्मा, यास्तव तूं धर्में । करीं पालन प्रजेचें ॥ ८ ॥
तेणें होसील तूं धन्य । वासुदेवा तत्व मान्य ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ७१ वा अध्याय समाप्त

अध्याय ७२ वा

२८४

सज्जनरक्षण दुष्टनिवर्तन । योग्य तोचि जाण पौरोहित्या ॥ १ ॥
पुरूरवापुत्र ऐल-वायु यांचा । संवाद पूर्वीचा ऐकें धर्मा ॥ २ ॥
कोणापासूनि हे ऐल म्हणे वर्ण । श्रेष्ठ कां ब्राह्मण निवेदा तें ॥ ३ ॥
मुखापासूनि ते विप्र, म्हणे वायु । क्षत्रियांसी बाहु उगमस्थान ॥४॥
ऊरु तो वैश्यांचा उगम जाणावा । शूद्र निर्मियेला सेवेस्तव ॥ ५ ॥
चरण तयाच्या उगमाचें स्थान । ब्रह्मदेव जाण ऐसा मूळ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अवयवांसम । विभागले धर्म वर्णांचे त्या ॥ ७ ॥

२८५

जन्मतांचि विप्र धर्मकोषगोप्ता । अधिकार त्याचा सर्वश्रेष्ठ ॥ १ ॥
सर्वही भूतांचा जाणें तो ईश्वर । राजा दंडधर क्षत्रिय तो ॥ २ ॥
धन-धान्यें करी भरण तो वैश्य । परिचर्या शूद्र करो त्यांची ॥ ३ ॥
निवेदी कर्तव्यें यापरी विरंची । ऐल वायूप्रति करी प्रश्न ॥ ४ ॥
म्हणे निवेदावें पृथ्वी हे कोणाची । विप्रां-क्षत्रियांची अथवा सांगें ॥
ज्येष्ठ अभिजन[1] यास्तव ब्राह्मण । स्वामी ऐसें जन म्हणती सर्व ॥६॥
अभावें पतीच्या देवरस्वीकार । तैसे ते क्षत्रिय भूमिस्वामी ॥७॥
वासुदेव म्हणे वायु ऐशापरी । निवेदन करी तत्व ऐला ॥ ८ ॥

२८६

धर्मा, इच्छा जरी पुण्यें स्वर्गप्राप्ति । जिंकितांचि अर्पी विप्रां भूमि ॥
सद्‌वृत्त वैदिक धर्मज्ञ तपस्वी । विप्र तो निर्लोभी दानयोग्य ॥ २ ॥
सन्मार्गी नृपासी लावील जो विप्र । राजपुरोहित समजें तोचि ॥३॥
राव पुण्याचा तो होई अंशभागी । राजाही तो जगीं धन्य होई ॥४॥
यज्ञ, दान, तपा, कारण नृपाळ । रावचि केवळ सकलाधार ॥ ५ ॥
प्राण अर्पूनियां प्रजेतें संरक्षी । इंद्रादिक तोचि देव राजा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धार्मिक नृपति । सकलैश्वर्य भोगी प्रजेसवें ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ७२ वा अध्याय समाप्त

१ प्रथम उत्पत्तीमुळें ज्येष्ठ कुळ

अध्याय ७३ वा

२८७

धर्माप्रति भीष्म कथिती प्रेमानें । गहनता जाणें धर्मार्थांची ॥ १ ॥
राव ऐसा शीघ्र ज्ञाता पुरोहित । योजूनि प्रजेस सौख्य देई ॥ २ ॥
धार्मिक मंत्रज्ञ राजपुरोहित । राजाही तैसाच जया देशीं ॥ ३ ॥
सर्वप्रकारें त्या प्रजेचें कल्याण । तपस्व्यासमान उभय जेथें ॥ ४ ॥
ब्राह्मण क्षत्रिय यदा एकरूप । होताती सुहृद् एकमेकां ॥ ५ ॥
सन्मानें तयांच्या सौख्य पावे प्रजा । असंमानें त्यांच्या विनाशचि ॥
वासुदेव म्हणे विप्र क्षत्रियचि । सर्वेही वर्णांसी मूळ जाणा ॥ ७ ॥

२८८

ऐल-कश्यपांचा संवाद ऐकावा । विषय हा घ्यावा सकल ध्यानीं ॥
ऐल प्रश्नाप्रति उत्तर मुनींचें । विप्र क्षत्रियातें त्यागिती जें ॥ २ ॥
दस्यूहत प्रजा पावते विनष्ट । क्षत्रिय विप्रांस न मानितां ॥ ३ ॥
ज्ञानमंथन तें दधिमंथनही । निर्मूलची होई परंपरा ॥ ४ ॥
संकर ज्ञाति कीं दस्यूंसम विप्र । सुप्रजारहित क्षीण होती ॥ ५ ॥
विप्र, क्षत्रिय ते परस्पराधार । श्रेष्ठ हे विचार वासुदेवा ॥ ६ ॥

२८९

साह्य ब्राह्मण क्षत्रिय । जरी एकमेकां होय ॥ १ ॥
तरी प्रतिष्ठा उभयां । ऐसा सिद्धान्त जाणावा ॥ २ ॥
सुटतां संधि हा प्राचीन । किंकर्तव्यमूढ जन ॥ ३ ॥
सागरांत जैंवी नौका । पार गांठीनाचि कदा ॥ ४ ॥
तैसी होई जनस्थिति । प्रजा नष्ट होई अंतीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विप्र । क्षत्रियांचें व्हावें ऐक्य ॥ ६ ॥

२९०

संरक्षित ब्रह्मवृक्ष मधु हेम । वर्षतसे जाण सर्वकाळ ॥ १ ॥
असंरक्षित तो अश्रुपाप वर्षे । जेणें सकलांतें नित्य दुःख ॥ २ ॥
दस्यूहत यदा ब्रह्मचारी, विप्र । वेदांचा आश्रय त्यागिताती ॥ ३ ॥
अनावृष्टि तदा करीतसे इंद्र । आपत्तीचि नित्य तयावेळीं ॥ ४ ॥
विप्रस्त्रीघातक सन्मान जैं पावे । शंकित न भयें नृपाळाच्या ॥ ५ ॥

तदा नृपाळासी महाभय जाणा । पापी जैं अधर्मा वाढविती ॥ ६ ॥
साधू असाधूंतें रुद्र तदा नष्ट- । करी, रुद्रवृत्त पुशी ऐल ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐलप्रश्नाप्रति । उत्तर कथिती कश्यप तैं ॥ ८ ॥

२९१

आत्माचि हा रुद्र स्वपरदेहाचा । नाश करी साचा पापाचारें ॥ १ ॥
रुद्र तो उत्पातवायूसम असे । मेघदेवतेचें रूप तया ॥ २ ॥
ऐल म्हणे वायू असूनि आकाशीं । भिन्नत्व तयासी सहज दिसे ॥३॥
तैसा रुद्र देहीं न दिसेची भिन्न । तेणें द्वेष-कामवद्ध जीव ॥ ४ ॥
प्रयोजन मग काय त्या रुद्राचें । कश्यप ऐलातें म्हणे अग्नि ॥ ५ ॥
जाळितां गृहासी ग्राम होई दग्ध । तेंवी हृदयस्थ सकलां मोही ॥६॥
वासुदेव म्हणे मोहें पाप पुण्य । बाधक तें जाण सकलांप्रति ॥ ७ ॥

२९२

ऐल म्हणे यदि पुण्यवंत पापी । दंडार्हचि होती उभयही ते ॥ १ ॥
सत्कर्मीचि तरी कासया करावें । तेंवी न करावें दुष्कर्म कां ॥ २ ॥
कश्यप बोलती संसर्ग पाप्यांचा । नसतां न बाधा दंडाचीही ॥ ३ ॥
परी शुष्ककाष्ठासवें आर्द्र काष्ट । पाप्याचा संसर्ग सुजना तेंवी ॥४॥
यास्तव पाप्याचा संसर्ग त्यागणें । वासुदेव म्हणे तेंचि हित ॥ ५ ॥

२९३

सज्जन दुर्जना आधार पृथ्वीचा । प्रकाश सूर्याचा वायु जल- ॥ १ ॥
समानत्वें कैंवी वागती तयांसी । कश्यप ऐलासी कथिती ऐकें ॥२॥
ऐला, परलोकीं लाभे कर्मफल । पुण्यानें उज्वल लोक लाभे ॥ ३ ॥
अप्रकाश नित्य दुःख शोक जेथें । दुष्कर्मानें लाभे नरक ऐसा ॥ ४ ॥
विप्रा क्षत्रियांचा भेद होतां एथें । पापें सकलांतें दुःख होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सर्वज्ञ विप्रासी । यास्तवचि मंत्री योजी नृप ॥ ६ ॥

२९४

राया, पुरोहित योजावा प्रथम । संरक्षित धर्म होई तेणें ॥ १ ॥
श्रेष्ठत्वेंचि विप्र क्षत्रियासी वंद्य । प्रथम विदित केलें तेंचि ॥ २ ॥
बलवंत नृपें अग्रभोक्त्या तया । सन्मानें अर्पाव्या श्रेष्ठ वस्तु ॥ ३ ॥
विप्रतेजसंरक्षिताचि क्षत्रिय । रक्षिती निर्भय विप्रांप्रति ॥ ४ ॥

यास्तव क्षत्रियां पूज्य सदा विप्र । नृपाचें कर्तव्य हेंचि असे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे परस्पर ऐसे । विप्र क्षत्रिय ते उपकारक ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ७३ वा अध्याय समाप्त

अध्याय ७४ वा

२९५

भीष्म म्हणे योगक्षेम तो राष्ट्राचा । स्वाधीन नृपाच्या सर्वकाळ॥१॥
पुरोहिताकरीं त्याचा योगक्षेम । सर्वदा हें मर्म ध्यानीं असो ॥ २ ॥
अदृष्टभय तें ब्रह्मतेजें नष्ट । बाहुबलें दृष्टभय नासे ॥ ३ ॥
जया राज्यीं तेथें सौख्य नांदे सदा । मुचकुंद धनदा हेंचि कथी॥४॥
यक्षनाथावरी गेला मुचकुंद । संपूर्ण पृथ्वीस जिंकूनियां ॥ ५ ॥
सेनानाश तदा करितांचि यक्ष । पुरोहित तप करिती बहु ॥ ६ ॥
वसिष्ठतपानें राक्षसांचा नाश । वासुदेव वृत्त पुढती कथी ॥ ७ ॥

२९६

कुबेर तैं बोले मुचकुंदाप्रति । पुरा बहुताचि झाले नृप ॥ १ ॥
तुजहूनि थोर थोर परी कोणी । मजप्रति रणीं भिडला नाहीं ॥ २ ॥
अहंभाव तरी दाखवीं सामर्थ्य । बोले मुचकुंद तयाप्रति ॥ ३ ॥
तप मंत्रबल विप्रांचें धनदा । अस्त्र बाहु सदा क्षत्रियांचें ॥ ४ ॥
परस्पर ऐक्यें चाले राज्ययंत्र । आचरितों शास्त्र निंदिसी कां ॥५॥
वासुदेव म्हणे तदा वैश्रवण । बोलला वचन ऐका काय ॥ ६ ॥

२९७

ईशाज्ञेनेंचि मी अर्पितों राज्यातें । हरितों क्षणार्धें आज्ञेनेंचि ॥ १ ॥
जा सुखें पृथ्वीचें करावें शासन । मुचकुंद भाषण वदला ऐका ॥२॥
भवद्दत्त राज्य नको मजलागीं । विश्वास या चापीं असे माझा ॥३॥
पाहूनि नृपाची क्षत्रधर्मनिष्ठा । विस्मय धनदा वाटे बहु ॥ ४ ॥
निवेदिती भीष्म ब्रह्मपूर्व ऐसा । विजयीचि राजा सर्वकाल ॥ ५ ॥
पवित्र सर्वदा असावें विप्रानें । सशस्त्र वीरानें असणें सदा ॥ ६ ॥
जें जें कांहीं जगीं, लाभे त्या उभयां । वासुदेव तयां उभयां स्तवी ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ७४ वा अध्याय समाप्त

अध्याय ७५ वा

२९८

प्रजेची उन्नति पुण्यलोकप्राप्ति । घडे कैंवी तोंचि पुशी धर्मे ॥ १ ॥
निवेदिती भीष्म आचरी जें राजा । अनुसरे प्रजा आनंदें तें ॥ २ ॥
सज्जनसन्मान यास्तव राजानें । करूनि धर्मातें अनुसरावें ॥ ३ ॥
उद्यतदंडचि असावें सर्वदा । संहार दस्यूंचा व्हावा नित्य ॥ ४ ॥
केवळ स्वेच्छेनें क्षमावें न कोणा । ऐशा मार्गें जनां धर्म रुचे ॥ ५ ॥
चतुर्थांश प्रजापुण्य रायाप्रति । पापेंही जनांचीं लाभती त्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पापार्ध खलांचा । मस्तकीं रायाच्या राज्यामाजी ॥

२९९

तस्करपीडित जनांचें तें धन । द्यावें कोषांतून स्वयें नृपें ॥ १ ॥
ब्रह्मस्वासमान सर्वांची संपत्ति । संरक्ष्या नृपासी सर्वदा ते ॥ २ ॥
ब्रह्मस्वरक्षणें कृतकृत्य राजा । प्रसादें तयांच्या सर्वकाल ॥ ३ ॥
शरण पर्जन्या सकलही प्राणी । वृक्षसन्निधानीं द्विज जैंवी ॥ ४ ॥
सर्वार्थसाधक नृपासी तें जन । आश्रय मानून भजती सदा ॥ ५ ॥
परी कामी, लोभी, निर्दय नृपाळ । म्हणे करी छळ वासुदेव ॥ ६ ॥

३००

पितामहाप्रति बोले धर्मराज । सुखार्थ मी राज्य इच्छींचिना ॥ १ ॥
धर्मार्थचि राज्य इच्छिलें, तो धर्म- । गेला, आतां वन स्वीकारीन ॥
न्यस्त दण्ड तेथें आराधीन धर्मा । मुनींच्या जीवना स्वीकारूनि ॥
बोलती तैं भीष्म दयामय धर्मा । नसे राजधर्मा दया योग्य ॥ ४ ॥
केवळ दयेनें न होई रक्षण । मानिती दुर्जन दौर्बल्य तें ॥ ५ ॥
अति सौजन्य कीं अति धार्मिकत्व । मृदुता क्लीबत्व मानितील ॥ ६ ॥
पूर्व क्षत्रियांचा आचरीं तूं धर्म । इच्छिसी तो धर्म नव्हे तव ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विप्रधर्म, वीरा । वीरधर्म, विप्रा संकटाचि ॥ ८ ॥

३०१

केवळ भावनावशत्वें दयेचा । स्वीकार नृपाचा धर्म नव्हे ॥ १ ॥
पाण्डु-कुंतीनेंही ऐसें न इच्छिलें । धर्मा, जें रुचलें तुजसी अद्य ॥
शौर्य, बल, सत्य इच्छिलें पित्यानें । माहात्म्य कुंतीनें अपेक्षिलें ॥

अपेक्षिलें तेंवी औदार्य तियेनें । स्वाहा स्वधा जाणें देवतांनीं ॥ ४ ॥
देव पितरही दान अध्ययन । यज्ञचि ते जाण इच्छितातीं ॥ ५ ॥
धर्म अधर्म ते असोत कांहींही । त्यास्तवचि पाहीं जन्म तव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ध्रुवकार्यरत । ध्रुवचि ते श्रेष्ठ अवसन्नही ॥ ७ ॥

३०२

दक्षपणें भार अश्वही वाहती । स्वकर्मेंचि सिद्धि तुजही राया ॥ १ ॥
धर्मा, ब्रह्मचारी गृही वा कोणीही । केवळ न जाई शुद्ध मार्गे ॥ २ ॥
यास्तव तें सार भूयिष्ठ अल्पही । स्वकर्मचि पाहीं हितप्रद ॥ ३ ॥
अकर्माहूनि तें सदोषचि जाण । श्रेष्ठ निजकर्म इतर पाप ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे प्रकृति परवश । जन स्वधर्मास दोष देई ॥ ५ ॥

३०३

कुलीन धर्मज्ञ उत्कर्ष पावती । जया राज्यामाजी निश्चयानें ॥ १ ॥
योगक्षेम त्याचा कुशलाकारणें । जाणावा नियमें निश्चय हा ॥ २ ॥
दानें बलें किंवा मधुर भाषणें । आकर्षावीं मनें नृपाळानें ॥ ३ ॥
सर्वदा संतुष्ट जया स्थळीं ज्ञाते । मूर्तिमंत त्यातें म्हणती धर्म ॥४॥
वासुदेव म्हणे ज्ञात्यांचें रक्षण । जाणावें कल्याण सकलांचें तें ॥५॥

३०४

धर्म म्हणे ताता, साधन स्वर्गद । तदुद्भूत मोद तोही कथीं ॥ १ ॥
स्वर्गाहूनि श्रेष्ठ ऐश्वर्य कोणतें । निवेदावें मातें तेंही ताता ॥ २ ॥
निवेदिती भीष्म करी भीतत्राण । निश्चयें तो जाण स्वर्गगामी ॥३॥
धर्मा, सर्वप्रिय तूंचि कुरूमाजी । राजा हो प्रतिपाळीं सुजना तूंचि
पर्जन्य कीं स्वादुफलयुक्त वृक्ष । आधार भूतांस होई तैसा ॥ ५ ॥
गुणवंत तृप्त जाहलियावरी । भोजन जो करी नरश्रेष्ठ ॥ ६ ॥
आधार तयासी मानिती सकळ । लाभो तो नृपाळ वासुदेवा ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ७५ वा अध्याय समाप्त

अध्याय ७६ वा

३०५

स्वकर्मासक्त कीं विकर्मनिरत । विप्रांचें वैशिष्ट्य मज सांगा ॥ १ ॥
कथितातीं भीष्म समदर्शी ज्ञाते । प्रत्यक्ष ब्रह्म ते विप्र जाणें ॥ २ ॥

वेदज्ञ स्वकर्मनिष्ठ ते भूदेव । इतर कदर्थ ब्रह्मबंधु ॥ ३ ॥
विहित कर्म जे नाचरिती विप्र । जाणावे ते शूद्रसम लोकीं ॥ ४ ॥
अश्रोत्रिय अनाहिताग्नि जे कोणी । ब्राह्मण असूनि विचरती ॥ ५ ॥
तयांसी धार्मिक नृपानें वेठीसी । धरावें करही योजावा त्यां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे श्रेष्ठांचें कर्तव्य । श्रेष्ठचि हा काय धर्मदोष ॥ ७ ॥

३०६

आव्हायक देवलक तैं नाक्षत्र । तो ग्रामयाजक सिंधूल्लंघी ॥ १ ॥
ब्राह्मण चांडाळ जाणावे हे पंच । निवेदितें शास्त्र स्पष्टपणें ॥ २ ॥
ऋत्विक् पुरोहित, वार्तावह, दूत । मंत्री ऐसे विप्र क्षत्रियसम ॥ ३ ॥
अश्वगजारोही रथी कीं पदाति। वैश्यासम शास्त्रीं कथिले विप्र ॥४॥
ऐशा हीन विप्रांपासूनि नृपानें । सुखें कर घ्यावे वेदाज्ञा हे ॥ ५ ॥
विकर्मकारी जे विप्र त्यांचें धन । विप्रेतरांसम नृपाचेंचि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शास्त्राचा दंडक । अधार्मिक विप्र तयांसी हा ॥ ७ ॥

३०७

अनाचारी विप्रां दंडावें नृपानें । करही सौख्यानें घ्यावे त्यांचे ॥ १ ॥
राज्यीं ज्या ब्राह्मण होतील तस्कर । जाणावा तो थोर राजदोष ॥
जीविकेस्तवचि स्नातकाचें चौर्य । सांभाळो नृपाळ तरी तया ॥३॥
भरणेंही जरी चौर्य न त्यागितां । सबांधव त्याचा करणें त्याग ॥४॥
वासुदेव म्हणे ऐसीया विप्रासी । स्वदेशाबाहेरी घालवावें ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ७६ वा अध्याय समाप्त

अध्याय ७७ वा

३०८

कवण्या धनाचा अधिकारी राजा । कैसी उपजीविका नृपाळाची ॥
धर्माच्या या प्रश्ना उत्तर भीष्मांचें । ऐका आतां साचें दक्षपणें ॥२॥
कुकर्मी विप्र तैं विप्रेतरधन । रायाचेंचि जाण धर्मराजा ॥ ३ ॥
दुर्वृत्त विप्राची कोणीही उपेक्षा । करूं नये राजा, कदाकाळीं ॥ ४ ॥

---

१ धर्माधिकारी, २ पुजारी, ३ ज्योतिषी ४ ग्रामजोशी ५ समुद्रापार जाणारा.

अपेक्षिलें तेंवी औदार्य तियेनें । स्वाहा स्वधा जाणें देवतांनीं ॥ ४ ॥
देव पितरही दान अध्ययन । यज्ञचि ते जाण इच्छितातीं ॥ ५ ॥
धर्म अधर्म ते असोत कांहींही । त्यास्तवचि पाहीं जन्म तव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ध्रुवकार्यरत । ध्रुवचि ते श्रेष्ठ अवसन्नही ॥ ७ ॥

३०२

दक्षपणें भार अश्वही वाहती । स्वकर्मेंचि सिद्धि तुजही राया ॥ १ ॥
धर्मा, ब्रह्मचारी गृही वा कोणीही । केवळ न जाई शुद्ध मार्गं ॥ २ ॥
यास्तव तें सार भूयिष्ट अल्पही । स्वकर्मचि पाहीं हितप्रद ॥ ३ ॥
अकर्माहूनि तें सदोषचि जाण । श्रेष्ठ निजकर्म इतर पाप ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे प्रकृति परवश । जन स्वधर्मास दोष देई ॥ ५ ॥

३०३

कुलीन धर्मज्ञ उत्कर्ष पावती । जया राज्यामाजी निश्चयानें ॥ १ ॥
योगक्षेम त्याचा कुशलाकारणें । जाणावा नियमें निश्चय हा ॥ २ ॥
दानें वलें किंवा मधुर भाषणें । आकर्षावीं मनें नृपाळानें ॥ ३ ॥
सर्वदा संतुष्ट जया स्थळीं ज्ञाते । मूर्तिमंत त्यातें म्हणती धर्म ॥४॥
वासुदेव म्हणे ज्ञात्यांचें रक्षण । जाणावें कल्याण सकलांचें तें ॥५॥

३०४

धर्म म्हणे ताता, साधन स्वर्गद । तदुद्भूत मोद तोही कथीं ॥ १ ॥
स्वर्गाहूनि श्रेष्ठ ऐश्वर्य कोणतें । निवेदावें मातें तेंही ताता ॥ २ ॥
निवेदिती भीष्म करी भीतत्राण । निश्चयें तो जाण स्वर्गगामी ॥३॥
धर्मा, सर्वप्रिय तूंचि कुरूमाजी । राजा हो प्रतिपाळीं सुजना तूंचि
पर्जन्य कीं स्वादुफलयुक्त वृक्ष । आधार भूतांस होई तैसा ॥ ५ ॥
गुणवंत तृप्त जाहलियावरी । भोजन जो करी नरश्रेष्ठ ॥ ६ ॥
आधार तयासी मानिती सकळ । लाभो तो नृपाळ वासुदेवा ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ७५ वा अध्याय समाप्त

अध्याय ७६ वा

३०५

स्वकर्मासक्त कीं विकर्मनिरत । विप्रांचें वैशिष्ट्य मज सांगा ॥ १ ॥
कथितातीं भीष्म समदर्शी ज्ञाते । प्रत्यक्ष ब्रह्म ते विप्र जाणें ॥ २ ॥

वेदज्ञ स्वकर्मनिष्ठ ते भूदेव । इतर कदर्थ ब्रह्मबंधु ॥ ३ ॥
विहित कर्म जे नाचरिती विप्र । जाणावे ते शूद्रसम लोकीं ॥ ४ ॥
अश्रोत्रिय अनाहिताग्नि जे कोणी । ब्राह्मण असूनि विचरती ॥ ५ ॥
तयांसी धार्मिक नृपानें वेठीसी । धरावें करही योजावा त्यां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे श्रेष्ठांचें कर्तव्य । श्रेष्ठचि हा काय धर्मदोष ॥ ७ ॥

३०६

आव्हायक[1] देवलक[2] तैं नाक्षत्र[3] । तो ग्रामयाजक[4] सिंधूल्लंघी[5] ॥ १ ॥
ब्राह्मण चांडाळ जाणावे हे पंच । निवेदितें शास्त्र स्पष्टपणें ॥ २ ॥
ऋत्विक् पुरोहित, वार्तावह, दूत । मंत्री ऐसे विप्र क्षत्रियसम ॥ ३ ॥
अश्वगजारोही रथी कीं पदाति । वैश्यासम शास्त्रीं कथिले विप्र ॥४॥
ऐशा हीन विप्रांपासूनि नृपानें । सुखें कर घ्यावे वेदाज्ञा हे ॥ ५ ॥
विकर्मकारी जे विप्र त्यांचें धन । विप्रेतरांसम नृपाचेंचि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शास्त्राचा दंडक । अधार्मिक विप्र तयांसी हा ॥ ७ ॥

३०७

अनाचारी विप्रां दंडावें नृपानें । करही सौख्यानें घ्यावे त्यांचे ॥ १ ॥
राज्यीं ज्या ब्राह्मण होतील तस्कर । जाणावा तो थोर राजदोष ॥
जीविकेस्तवचि स्नातकाचें चौर्य । सांभाळो नृपाळ तरी तया ॥३॥
भरणेंही जरी चौर्य न त्यागितां । सबांधव त्याचा करणें त्याग ॥४॥
वासुदेव म्हणे ऐसीया विप्रासी । स्वदेशाबाहेरी घालवावें ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ७६ वा अध्याय समाप्त

अध्याय ७७ वा ३०८

कवण्या धनाचा अधिकारी राजा । कैसी उपजीविका नृपाळाची ॥
धर्माच्या या प्रश्ना उत्तर भीष्मांचें । ऐका आतां साचें दक्षपणें ॥२॥
कुकर्मी विप्र तैं विप्रेतरधन । रायाचेंचि जाण धर्मराजा ॥ ३ ॥
दुर्वृत्त विप्राची कोणीही उपेक्षा । करूं नये राजा, कदाकाळीं ॥ ४ ॥

१ धर्माधिकारी, २ पुजारी, ३ ज्योतिषी ४ ग्रामजोशी ५ समुद्रापार जाणारा.

कैकेयराजासी राक्षसें वनांत । हरिलें जो दक्ष निजधर्मी ॥ ५ ॥
तदा राक्षसासी वदला जें राव । म्हणे वासुदेव ऐका तेंचि ॥ ६ ॥

३०९

राज्यांत न माझ्या तस्कर न भ्याड । मद्यपि तें विप्र निरग्निक ॥१॥
यास्तव न स्पर्श करीं मजप्रति । सरें परताचि राव म्हणे ॥ २ ॥
व्रतहीन तेंवी अविद्वान विप्र । नसे मद्राज्यांत यज्ञहीन ॥ ३ ॥
माझ्या राज्यीं विप्र षट्कर्मनिरत । सन्मानित शांत सत्यवादी ॥ ४ ॥
यास्तव राक्षसा, जवळी न येई । वासुदेव गाई पुढती ऐका ॥ ५ ॥

३१०

क्षत्रियही माझे दाते, न याचक । यजिती, रक्षक ब्राह्मणांचे ॥ १ ॥
पलायन तयां ठाउकें न रणीं । परता होई झणीं हे राक्षसा ॥ २ ॥
निष्कपट कृषिगोरक्ष्य वाणिज्य । स्वीकारिती वैश्य माझ्या राज्यीं ॥
सत्यव्रत क्रियावंत तेंवी दक्ष । नित्य प्रामाणिक संविभागी ॥ ४ ॥
शौच तैं सौहृद संपन्न ते दैत्या । स्पर्शों न परता होई म्हणे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कैकेय राक्षसा । अधिकार शूद्रांचा कथन करी ॥ ६ ॥

३११

स्वकर्मनिरत असूयारहित । विप्रादि वर्णास सेविती जे ॥ १ ॥
आर्त, दीन, वृद्ध, स्त्रियांसी रक्षितों । कुलधर्म पाळितों कुलाचार ॥
तपस्वी जनांसी प्रेमें सांभाळितों । भोजन घालितों सकलां आधीं ॥
परस्त्रीसी स्पर्श न करीं सर्वथा । स्वतंत्र न क्रीडा करितों कदा ॥
ब्रह्मचार्‍यावीण भिक्षा न मागती । ते अब्रह्मचारी नसती भिक्षु ॥
ऋत्विजां वांचूनि यज्ञ न मद्राज्यीं । राक्षसा, मजसी स्पर्शू नको ॥
वासुदेव म्हणे कैकेय तो धन्य । प्रजाही ते धन्य नृपाची त्या ॥ ७ ॥

३१२

वेदवृद्ध तपस्व्यांचा अवमान । स्वप्नींही न जाण केला कदा ॥ १ ॥
राष्ट्र जैं निद्रिस्थ जागृत मी तदा । पुरोहित माझा ज्ञाता, दक्ष ॥२॥
दानें विद्या सत्य विप्रसेवेनें कीं । सदा अर्थप्राप्ति इच्छितों मी ॥ ३ ॥
शुश्रूषेनें मज सान्निध्य गुरूंचें । मज राक्षसांचें भय नसे ॥ ४ ॥



कैकेयराजासी राक्षसें वनांत । हरिलें जो दक्ष निजधर्मी ॥
तदा राक्षसासी वदला जें राव । म्हणे वासुदेव ऐका तेंचि ॥ राजधर्मपर्व अ. ७७

विधवा, कपटी, निंध, विप्र चोर । पापकर्मा नर न मद्राज्यीं ॥ ५ ॥
अयाज्ययाजक नसेचि राक्षसा । वासुदेव राजा म्हणे धन्य ॥ ६ ॥

३१३

शस्त्रनिर्भिन्न न ऐसें द्वयंगुळही । नसेचि मद्देहीं धर्मयुद्धें ॥ १ ॥
यज्ञ-गोब्राह्मण रक्षणार्थ नित्य । इच्छीतसे मज सकल प्रजा ॥ २ ॥
राक्षसा यास्तव सन्निध न येई । आधार लवही नसे तुज ॥ ३ ॥
कैकेयासी तदा राक्षस बोलला । आधार तुजला नित्य धर्म ॥ ४ ॥
यास्तव सदनीं जाई तूं सुखानें । जातों आनंदानें स्वस्थळीं मी ॥५॥
धेनु-ब्राह्मणांतें रक्षिती तयांतें । अग्नि राक्षसांचें भय नसे ॥ ६ ॥
अग्रगामी विप्र ब्रह्मबल ज्यांचें । अतिथिप्रिय ते स्वर्गजेते ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कैकेय-राक्षस । संवाद नृपास मार्गदर्शी ॥ ८ ॥

३१४

निवेदिती भीष्म धर्मा, तूं यास्तव । विप्रांचा सांभाळ करीं नित्य॥१॥
संरक्षित तेचि रक्षिती रक्षका । आशीर्वाद त्यांचा हितकारी ॥ २ ॥
विकर्मनिरत विप्र ते नृपानें । योजावे प्रयत्नें निजकर्मीं ॥ ३ ॥
ऐशा मार्गें नित्य कल्याण नृपाचें । इहपर लाभे सौख्य तया ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे विप्रांचें रक्षण । करील कल्याण मानवाचें ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ७७ वा अध्याय समाप्त

अध्याय ७८ वा ३१५

धर्म म्हणे आपत्काळीं क्षात्रवृत्ति । धर्म्य ते विप्रांसी कथिली ताता॥
परी वैश्यवृत्ति इष्ट वा अनिष्ट । विप्रांसी तें स्पष्ट निवेदावें ॥ २ ॥
निवेदिती भीष्म कृषिगोरक्षण । आपत्काळीं धर्म्य विप्रांप्रति ॥ ३ ॥
कथितों करावा विक्रय कशाचा । सुरा, लवण कदा विकूं नये ॥४॥
तिल, अश्व, धेनु, वृषभ तैसेचि । मधु पक्कान्नहि वर्ज्य जाणें ॥ ५ ॥
आमान्न देऊनि पक्कान्न त्या इष्ट । पक्कान्नें न इष्ट आमान्न त्या ॥ ६ ॥
घेई हें, हें देतों ऐशा संतोषानें । व्यवहार जाणे हितप्रद ॥ ७ ॥
बलात्कारें इष्ट नसे व्यवहार । वासुदेव शास्त्रवचन सांगे ॥ ८ ॥

३१६

धर्म म्हणे धर्मभ्रष्ट सर्वजन । शस्त्रसंग्रहण करिती यदा ॥ १ ॥
तदा दुर्बलत्व येतां क्षत्रियांसी । आधार नृपासी कोण सांगा ॥ २ ॥
अद्रोह, दम तैं दान, तप, यज्ञ । निवेदिती भीष्म क्षेममार्ग ॥ ३ ॥
वेदबलशाली विप्रचि इंद्राचें । बल वाढवितें जाण धर्मा ॥ ४ ॥
यास्तव विप्र ते नृपासी आश्रय । समुत्थाना साह्य तेचि तया ॥ ५॥
विजयी नृपाळ यदा कार्यदक्ष । तदा स्वाभाविक वर्णाश्रम ॥ ६ ॥
उच्छृंखल दस्यु करितां संकर । सकलां तैं शस्त्र धरणें योग्य ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्वस्वधर्माचार । करावा सुस्थिर हाचि धर्म ॥ ८॥

३१७

युधिष्ठिर म्हणे यदा विप्रांप्रति । क्षत्रिय पीडिती परोपरी ॥ १ ॥
तदा ब्राह्मणांचा त्राता कोण सांगा । कथिती तैं मार्गा भीष्म ऐका
तप, ब्रह्मचर्य, शस्त्र, बल किंवा । माया वा अमाया स्वीकारूनि॥३॥
रक्षण आपुलें करावें विप्रांनीं । क्षत्रियां शासूनि बहु यत्नें ॥ ४ ॥
ब्राह्मणाचि असे क्षत्रियाचें मूळ । यास्तवचि बळ न चले मुळीं ॥५॥
अग्नि उदकासी, विप्र क्षत्रियासी । पाषाण लोहासी उत्पादक ॥६॥
आघात तयांचा मूळावरी होतां । निश्चयें तयांचा नाश तेथें ॥ ७॥
वासुदेव म्हणे जाणूनि हें मर्म । परस्पर प्रेम वृद्धि पावो ॥ ८ ॥

३१८

ब्रह्मबल मृदु, क्षत्रिय दुर्बल । होतां जरी छळ ब्राह्मणांचा ॥ १ ॥
विप्ररक्षणार्थ धांवेल जो कोणी । पुण्यवंत जनीं तोचि एक ॥ २ ॥
विप्ररक्षणार्थ शस्त्रधारणाचा । अधिकार साचा सकलांप्रति ॥ ३ ॥
यज्ञाध्ययन तैं विविधव्रतांचें । पुण्य ब्राह्मणांतें संरक्षितां ॥ ४ ॥
मनु म्हणे प्राणत्याग विप्रांस्तव । करिती तयांस नमन असो ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धर्मयुद्धहत । होऊनि निष्पाप स्वर्ग भोगी ॥ ६ ॥

३१९

धर्म तो अधर्म अधर्मचि धर्म । पाहूनि परिणाम होत असे ॥ १ ॥
देशकालोचित कर्में धर्माधर्म । धर्मा व्यतिक्रम पावताती ॥ २ ॥
क्रूर-पापकर्में ब्राह्मण क्षत्रिय । पावले विजय तेंवी पुण्य ॥ ३ ॥

आत्मत्राण, वर्णदोष, दस्युहत्या। प्रसंगीं या शस्त्रा वारिती विप्र ॥४॥
वासुदेव म्हणे ऐशावेळीं दोष। नाहींचि विप्रांस शस्त्र घेतां ॥ ५ ॥

३२०

ताता, अधार्मिक दस्युनिर्दलन। करितां कोणी अन्य विप्र, शूद्र ॥१॥
सन्मान्य तो स्वामी मानावा न वा कीं। निवेदीं मजसी धर्म म्हणे ॥
निवेदिती भीष्म संकटसागरीं। पैलपार करी निजराष्ट्रा ॥ ३ ॥
शूद्रही कोणी तो सन्मान्यचि जनीं। संकटीं रक्षूनि पाळील जो ॥४॥
अभय अनाथां देईल जो तोचि। बांधव तयांसी सन्मानार्ह ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सन्मान गुणांचा। अथवा कार्याचा जातीचा न ॥६॥

३२१

भार जो न वाही काय तो वृषभ। देई जे न दुग्ध काय धेनु ॥ १ ॥
वंध्या कांता प्रजारक्षाहीन राव। व्यर्थचि न काय संज्ञा त्यांची ॥
काष्ठाचा तो हत्ती चर्माचा कीं मृग। मानव कीं भ्याड उखर भूमी
अनधीत विप्र तैसाचि जाणावा। मेघ कीं गणावा वृष्टीहीन ॥ ४ ॥
प्रजापालन जो करीना कीं राव। व्यर्थ तया नांव नृपाळ हें ॥ ५ ॥
सज्जनरक्षण दुष्टांचें दमन। करी तोचि जाण राजा योग्य ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धारणसमर्थ। जो कोणी तो योग्य राज्यपदा ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ७८ वा अध्याय समाप्त

अध्याय ७९ वा ३२२

पुरोहितकर्म स्वभाव सद्गुण। नम्रभावें धर्म पुशी भीष्मा ॥ १ ॥
धर्माप्रति भीष्म बोलती मीमांसा। वेदज्ञ रायाचा सदाचार ॥ २ ॥
शांति-पुष्टिकर्में रक्षावा सर्वदा। सुस्वभावी सदा असणें तेणें ॥ ३॥
सौहृद राखावें परस्परांमाजी। सरळ सत्यवादी अकुसीद[1] ॥ ४ ॥
तितिक्षा अद्रोह निरभिमानही। असावे त्या ठाईं शम दम ॥ ५ ॥
बुद्धिमंत निष्ठावंत तैं धर्मात्मा। कुलीन तृप्तात्मा व्हावें तेणें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सन्मान्य तो पूज्य। ब्रह्मासना योग्य पुरोहित ॥ ७ ॥

१ व्याज बट्टा न करणारा.

३२३

धर्म म्हणे ताता, सर्वदक्षिणेचें । वचन शास्त्राचें भयप्रद ॥ १ ॥
तारतम्य नाहीं शक्तीचें त्या ठाईं । श्रद्धा कैंवी राही मग तेथें ॥ २ ॥
निवेदिती भीष्म धर्मा, वेदावज्ञा । माया शाठ्य कोणा तारक न ॥
दक्षिणा ते असे नृपाळा यज्ञांग । दक्षिणाविरहित यज्ञ व्यर्थ ॥ ४ ॥
पूर्णपात्रही ते महा दक्षिणाचि । शाठ्यहीनताचि ध्यानीं असो ॥ ५ ॥
तात्पर्य सश्रद्ध होऊनियां यज्ञ । सकलांनीं जाण आचरावा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे यज्ञाहूनि तप । कथिती ज्ञानिश्रेष्ठ परिसा तेंचि ॥ ७ ॥

३२४

दया, घृणा, सत्य, अहिंसा तें दम । हेंचि तप जाण शोषण न ॥ १ ॥
वेदअप्रामाण्य शास्त्राज्ञालंघन । अव्यवस्था जाण विनाशक ॥ २ ॥
बाह्य यज्ञासम आंतर यज्ञही । जाणती ते पाहीं परम ज्ञाते ॥ ३ ॥
वक्रता तो मृत्यु सरलता ब्रह्म । तात्पर्य हें जाण एकमेव ॥ ४ ॥
इतर सर्वही जाणावे प्रलाप । वासुदेव स्पष्ट सार कथी ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ७९ वा अध्याय समाप्त

अध्याय ८० वा

३२५

अल्पही सत्कार्य दुष्कर एकासी । राज्य अशक्यचि एका नृपा ॥ १ ॥
धर्म म्हणे ताता, यास्तव कथावें । सचिव योजावे कैंवी नृपें ॥ २ ॥
विश्वासार्ह कोण अविश्वासार्हही । नृपालागीं पाहीं कथावें तें ॥ ३ ॥
कथिताती भीष्म चतुर्विध मित्र । जाणावे रायास युधिष्ठिरा ॥ ४ ॥
सहार्थ, भजमान, सहज, कृत्रिम । प्रकार हे जाण चतुर्विध ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे लक्षणें तयांचीं । आतां संक्षेपेंचि ध्यानीं घ्यावीं ॥ ६ ॥

३२६

शत्रुनिवारून लाभ तो वांटून । घेऊं म्हणती जाण सहार्थ ते ॥ १ ॥
परंपरेचे ते भजमान मित्र । माता, स्त्री, सहजमित्र जाण ॥ २ ॥
निष्कपट धर्मरत तो कृत्रिम । नृपा जें रुचे न न वदावें तें ॥ ३ ॥
विजयी नृपाळ धर्माधर्में जाती । राखावा गुप्तचि मार्ग त्यांचा ॥ ४ ॥
भजमान तेंवी सहज ते श्रेष्ठ । क्वचित्कार्यीं योग्य शंका घेणें ॥ ५ ॥

सहार्थ कृत्रिम नित्य शंकायोग्य । सर्वदाचि दक्ष व्हावें नृपें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे व्हावें नित्य दक्ष । मित्ररक्षणार्थ चुकतां नाश ॥ ७ ॥

३२७

प्रमादें राजाचा पराभव होई । साधुत्व तें येई असाधूतें ॥ १ ॥
साधूही भासती दारुण तयातें । मित्रत्व अरीतें, कोपें मित्र ॥ ३ ॥
चांचल्य जयातें त्याचा न विश्वास । महत्कार्य भाग स्वयें व्हावा ॥
समान विश्वास ठेवितां सर्वांसी । हानि धर्मार्थांची निश्चयानें ॥ ४ ॥
तैसा अविश्वास जरी सर्वत्रचि । सुखद मृत्यूचि तयाहूनि ॥ ५ ॥
अत्यंत विश्वास अपमृत्युमूळ । आपत्तींसी बल विश्वासेंचि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विश्वास जयाचा । तदधीन आशा जीविताची ॥ ७ ॥

३२८

तारतम्य सदा असावें विश्वासीं । कोण कदा किती विश्वासार्ह ॥१॥
जाणावें हें मर्म नृपाळा, नीतीचें । स्वनाशें जयातें राज्यपद ॥ २ ॥
शत्रूचि तो ऐसें मानिताती सुज्ञ । सदा सांभाळून असणें तेथें ॥३॥
दुष्टपणें जल अडवी स्वक्षेत्रीं । पावतां तें वृद्धि छेदी सेतु ॥ ४ ॥
ऐशा दुर्जनासी अमित्र गणावें । दक्षत्वें वर्तावें सदा तेथें ॥५॥
उत्तम तो मित्र वासुदेव म्हणे । अतृप्त वृद्धीनें, क्षयें दुःखी ॥ ६ ॥

३२९

मित्रनाशें नाश करूनि घेईल । जयाचें अचल प्रेम ऐसें ॥ १ ॥
पित्यासम त्याचा सांभाळ करावा । आत्मवत्साधावा तदुत्कर्ष ॥२॥
दुष्कर्मांपासूनि वांचवी जो सदा । अपुण्यें सर्वदा धाक ज्यातें ॥ ३ ॥
उत्तम तो मित्र जाणें पुण्यवंत । वैरी जो मित्रास स्ववैरी तो ॥ ४ ॥
व्यसनाचें भय उत्कर्षें न मद । उत्तम तो मित्र ध्यानीं असो ॥ ५ ॥
रूप वर्ण स्वर तितिक्षा अनसूया । अभिमान जया स्वकुळाचा ॥६॥
सर्वश्रेष्ठ मित्र जाणावें तयासी । वासुदेव त्यासी मानी ईश ॥ ७ ॥

३३०

मेधा-स्मृतिवंत दक्ष दयावंत । अपकारप्रवृत्त नव्हे कदा ॥ १ ॥
मानावमानही समान जयातें । सेवकाही त्यातें सन्मानावें ॥ २ ॥
विश्वास ठेवावा पित्यासम तेथें । दुर्लभचि ऐसे मित्र जगीं ॥३॥

एक कार्य दोघे करितां मतभेद । होईल हें नित्य ध्यानीं असो ॥४॥
कीर्तिवंत नीतिमर्यादा पालक । समर्थासी द्वेष न करीचि जो ॥५॥
अनर्थकारक वर्तन श्रेष्ठासी । न करी कदापि मतिमंत ॥ ६ ॥
काम-भय लोभें त्यागी न जो धर्म । मितभाषी जाण निजमित्र ॥७॥
वासुदेव म्हणे सन्मित्र ज्या ऐसे । वर्णावें तयाचें भाग्य काय ॥ ८ ॥

३३१

कुलीन सत्शील सहिष्णु निपुण । कार्याकार्यज्ञान जयाप्रति ॥ १ ॥
वढाई न जया, शौर्य तैं विद्वत्ता । राजा, असो ऐसा मंत्री तव ॥२॥
सन्मान्य जे संविभक्त सुसहाय । सेवक ते आर्य योग्य राया ॥ ३ ॥
आयव्ययाधिप योजितां तयांसी । कल्याणाची वृद्धि निश्चयानें ॥४॥
स्पर्धेनें एकान्तीं कार्य ते साधिती । विचारणा त्यांची नकळे कोणा ॥
वासुदेव म्हणे पात्रता नराची । अल्पानुभवेंचि ध्यानीं येई ॥ ६ ॥

३३२

राया, मृत्यूसम भय स्वज्ञातीचें । उत्कर्ष ज्ञातीतें न सहे जनीं ॥१॥
सरल मृदु जो उदार सलज्ज । सत्यवक्त्या रक्ष्य[1] मानी ज्ञाती ॥ २ ॥
ज्ञातिहीनाप्रति कदाही न सौख्य । त्याचा पराजय करिती शत्रु ॥३॥
तिरस्कृतालागीं आधार ज्ञातीचा । अभिमान ज्ञातीचा ज्ञातीसीच ॥
व्यक्तिअवमानें ज्ञाति पावे दुःख । कथी इष्टानिष्ट वासुदेव ॥ ५ ॥

३३३

शतही सद्गुणं निजबांधवाचे । दुर्गुणचि ऐसे मानी कोणी ॥ १ ॥
स्वयेंचि सद्गुणी मानी तयाहूनि । ऐसेंही या जनीं प्रत्यया ये ॥ २ ॥
ज्ञातिहीन कदा न करी अनुग्रह । अथवा तो नम्र नसे कोठें ॥ ३ ॥
साधु असाधूही ऐसे ज्ञातीमाजी । सर्वत्र वर्तती ध्यानीं असो ॥ ४ ॥
सावध सर्वदा असावें यास्तव । म्हणे वासुदेव उदयेच्छूनें ॥ ५ ॥

३३४

सन्मान पूजनक्रिया सद्भाषणें । तोषवावीं मनें स्वज्ञातीचीं ॥ १ ॥
वरि वरि नित्य दावावा विश्वास । सावधानचित्त ठेऊनियां ॥ २ ॥
गुणदोषाचें न करावें कथन । वर्तनें या जाण सौख्यलाभ ॥ ३ ॥

१ रक्षणयोग्य

अरि, मित्र तैंवी उदासहि त्यातें । बाधती न ऐसें वर्तन ज्या ॥ ४॥
वासुदेव म्हणे यशस्वी जनांची । सहज हे कृति ध्यानीं घ्यावी ॥५॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ८० वा अध्याय समाप्त

अध्याय ८१ वा ३३५

धर्म म्हणे ऐसी नीति न जाणतां । मित्रही शत्रुत्वा प्राप्त होई ॥ १ ॥
यास्तव सकल शत्रु-मित्रवश । होती ऐसा मार्ग निवेदावा ॥ २ ॥
कथिताती भीष्म कृष्ण-नारदांचा । संवाद दे चित्ता कथितों तुज ॥
नारदा, शत्रूसी मंत्र न कथावा । तैसाचि त्यजावा मूढ मित्र ॥ ४ ॥
असंयमी मित्र पंडितही त्याज्य । योग्य तूं यास्तव कथितों कांहीं ॥
वासुदेव म्हणे कृष्ण नारदासी । कथूनि स्वस्थिति करिती प्रश्न ॥६॥

३३६

ज्ञातिसंपादित वस्तूंचा अर्धांश । न घेईंचि देख कररूपें ॥ १ ॥
स्वोपार्जित द्रव्यें भोगितों अर्धचि । तथापि दुरुक्ति साहितों मी ॥२॥
अग्निकामी जेंवी अरणीतें मंथी । ज्ञाति दे अशांति तेंवी मज ॥ ३ ॥
बळिरामबळें, सौकुमार्यें गद । प्रद्युम्न उन्मत्त रूपगर्वें ॥ ४ ॥
यास्तव नारदा सदा मी असहाय । कथी वासुदेव पुढती ऐका ॥ ५ ॥

३३७

वृष्णि-अंधकही अन्य भाग्यवंत । आपणा समर्थ मानिताती ॥ १ ॥
होऊं ज्या विरुद्ध आम्हीं तो विनष्ट । होऊं साह्य ज्यास तोचि सुखी
आहुक-अक्रुर दोघेहि विचित्र । अनुकूल प्रतिकूल नसोत ते ॥ ३ ॥
परस्पर त्यांचा सर्वदा कलह । प्रमुख यादववीर परी ॥ ४ ॥
जुगाऱ्यांची माता तैंवी मी तयांसी । नारदा, सदाचि वागतसें ॥५॥
एकाचा विजय इच्छितों सर्वदा । न इच्छीं अन्याचा पराजय ॥६॥
यास्तव नारदा, कल्याणाचा मार्ग । ज्ञातीसवें मज कांहीं कथीं ॥७॥
वासुदेव म्हणे कृष्णाची हे स्थिति । काय सामान्याची गति तेथें ॥

३३८

मुनि म्हणे कृष्णा, अंतर्बाह्य ऐसीं । द्विविध या जगीं व्यसनें जाण ॥
स्वकृत अथवा होती अन्यकृत । आप्त ज्ञातीकृत अथवा बाह्य ॥२॥

कृष्णा, ज्ञातिकृत संकट हें जाणें । अक्रूरासी जाणें सकल साह्य ॥३॥
उग्रसेनासी तूं अर्पिलेंसी राज्य । हेतु त्वन्मनांत असो कांहीं ॥४॥
स्वयें संपादूनि अर्पिलेंसी अन्या । तयाच्याचि आतां स्वाधीन तें ॥
अशक्यचि आतां घेणें तें फिरून । होईल कारण, कलहें नाशा ॥६॥
वासुदेव म्हणे अति मृदुशस्त्र । एकचि त्या मार्ग कथिती मुनि ॥७॥

३३९

कृष्ण म्हणे मृदुमार्ग तो कथावा । निवेदी केशवा मुनि ऐका ॥१॥
सहिष्णुता, सत्य, आर्जव, मार्दव । तेंवी यथाशक्य अन्नदान ॥२॥
सन्मान्यांची पूजा मार्ग हा जाणावा । टाळील अपायां ज्ञातिजन्य ॥
कटुशब्दें क्रुद्ध होऊं नये कदा । भार त्या कार्याचा सहन होई ॥४॥
समस्थळीं भारवाही तो सामान्य । वृष असामान्य दुर्ग लंघी ॥५॥
भेदें संघनाश संघप्रमुख तूं । नाश नको योजूं यादवांचा ॥६॥
वासुदेव म्हणे संयमी सुबुद्ध । जया स्वार्थत्याग तोचि नेता ॥७॥

३४०

धन्यता सत्कीर्ति दीर्घायुष्य लाभे । स्वपक्षवैभवें यदुनाथा ॥१॥
यास्तव साधेल ज्ञातीचा उत्कर्ष । ऐसेंचि सत्कृत्य आचरावें ॥२॥
सकल शास्त्रांचें ज्ञान तुज देवा । आदर्श तूं जीवां सान-थोरां ॥३॥
आकत हे तुझ्या सकल यादव । ऋषि-मुनि देव सकल तेंवी ॥४॥
तुझ्याचियोगें हें यादवांचें भाग्य । होऊं नये भेद ज्ञातीमाजी ॥५॥
वासुदव म्हणे नारदासी हरी । बोलवी यापरी जनांस्तव ॥६॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ८१ वा अध्याय समाप्त

अध्याय ८२ वा

३४१

उत्तम हे वृत्ति निवेदिली धर्मा । ऐकावी मध्यमा आतां राया ॥१॥
कोशवृद्धि कोणी करी त्या रक्षावें । एकान्तीं ऐकावें चौर्यवृत्त ॥२॥
अमात्यांपासूनि रक्षावें तयासी । लोभी ते वधिती अमात्य त्या ॥३॥
विरोधक होती एक ते लोभानें । वधिती क्रौर्यानें निवेदका ॥४॥
कोसलपतीसी कालकवृक्षीयें । कथिलें ऐकावें काय पुरा ॥५॥
वासुदेव म्हणे स्वार्थीजनवृत्त । ऐकूनियां दक्ष व्हावें सदा ॥६॥

३४२

क्षेमदर्शी नामें कोसलाधिपति । असतां एक ऋषि तयादेशीं ॥ १ ॥
पंजरीं घेऊनि काक एक हिंडे । म्हणे या विद्येचें ज्ञान जोडा ॥ २ ॥
त्रिकालज्ञ तुम्ही व्हाल निश्चयानें । दुष्कृत्यें तो जाणे अमात्यांचीं ॥
ऐसा एका काळीं राजदर्शनार्थ । येई सदनांत नृपाळाच्या ॥ ४ ॥
मंदिरीं येतांचि कृत्यें अमात्यांचीं । द्रव्यापहाराचीं निवेदिलीं ॥ ५ ॥
अमुक समयीं अमुक साह्यानें । ऐसीं ऐसीं कर्में घडलीं म्हणे ॥ ६ ॥
ऐकूनि तें राजदूत मनीं भ्याले । काकातें वधिलें निजतां मुनि ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अन्यदिनीं विप्र । पाही शरविद्ध काकाप्रति ॥ ८ ॥

३४३

मुनि तदा बोले नृपा, दे अभय । कथितों तें सर्व ध्यानीं घेई ॥ १ ॥
हितार्थ सद्भावें कथील जो वृत्त । अपहार दुष्ट करिती ऐसे ॥ २ ॥
जाणूनि त्या मित्र रक्षावें सर्वथा । राव तैं प्रतिज्ञा करी तैसी ॥ ३ ॥
म्हणे स्वहितार्थ सर्व मी ऐकेन । शंका लवही न धरीं मनीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐकोनि हितोक्ति । आचरी जो तोचि भाग्यवंत ॥ ५ ॥

३४४

मुनि म्हणे राया, दुर्जन सज्जन । कथावें जाणून त्वद्राज्यींचे ॥ १ ॥
यास्तव पातलों, नृपाळाची सेवा । अगतिक जीवां प्राप्त असे ॥ २ ॥
एरव्हीं तें पाप राव तोचि सर्प । मित्र त्या अमित्र तेही बहु ॥ ३ ॥
राजसेवकां त्या सकलांची भीति । राजाही तयांसी भयरूप ॥ ४ ॥
सर्वत्र दक्षता सेवका अशक्य । जाणूनि प्रमाद परि न व्हावा ॥ ५ ॥
प्रमादें नृपाळ होऊनियां क्रुद्ध । जाळील प्रदीप्त अग्नीसम ॥ ६ ॥
सविष कराल दंष्ट्रायुक्त नाग । सेवावा तैं राजसेवा जाणें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे मृत्यूशींच खेळ । जाणूनि नृपाळसेवा व्हावी ॥ ८ ॥

३४५

दुर्वचन दुःखभाव । तैसे शरीराविर्भाव ॥ १ ॥
बसणें, उठणें, सर्व क्रिया । दक्षपणेंचि कराव्या ॥ २ ॥
ऐसा रायाचा संतोष । सकल पुरवी मनोरथ ॥ ३ ॥
कोपतां तो अग्नीसम । दग्ध करी म्हणे यम ॥ ४ ॥

राया, कल्याण पुढती । बोधें करीन घे चित्तीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मुनि- । वचन, पुढती घ्या ऐकूनि ॥ ६ ॥

३४६

राया, काकाचेंही केलें कोणी वैर । अपहारतत्पर दुर्जनांनीं ॥ २ ॥
स्वहित साधाया त्वन्मित्रांचें सख्य । साधूनियां नाश करितील हे ॥
यास्तव नृपाळा, दुर्जनभीतीनें । जातों आनंदानें अन्य स्थळीं ॥ ३ ॥
हिमाचलगुहेसमचि हें स्थान । दुर्लभ कठिण लाभतांही ॥ ४ ॥
अंधारांत दीप, नौका सागरांत । नृपवनीं मार्ग नसे परी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अदक्ष नृपातें । राज्य, रौरवाचें स्थानचि तें ॥ ६ ॥

३४७

राजा, तव राज्य अंधकारमय । माझी गोष्ट काय, तुजही भय ॥१॥
वास्तव्य एथींचें अशुभचि सदा । सत्कर्म दुष्कृत्या तुल्यभाव ॥ २ ॥
न्याय्यचि दुष्कर्म होतां शिक्षारूप । सत्कर्मींही वध परी एथें ॥ ३ ॥
सीता नामें नदी बुडवी नौकेतें । तैसी स्थिति एथें सज्जनांची ॥ ४ ॥
प्राणिवधार्थ हें पसरिलें जाळें । अनुभवा आलें ऐसें माझ्या ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अव्यवस्था जेथ । प्रत्यक्ष तें राज्य यमलोक ॥ ६ ॥

३४८

राया, विषयुक्त मधुरान्न तुज । लाभलें हें राज्य ध्यानीं धरीं ॥ १ ॥
मधुप्रपातचि जाण तूं नृपाळा । दुर्जनांचा घाला तुझ्यावरी ॥ २ ॥
विषसर्पयुक्त कूप तूं भाससी । अथवा हंसचि गृध्राकुल ॥ ३ ॥
महावृक्षावरी वाढतांचि तृण । वृक्षासी जाळून स्वयें जळे ॥ ४ ॥
तैसीच अवस्था तव अमात्यांची । प्रतारक तेचि होती तव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्वार्थी जे कृतघ्न । भोगिती दारुण दुःख अंतीं ॥ ६ ॥

३४९

अंतःसर्पागारीं वास्तव्य ज्यापरी । जार वीरगृहीं भयग्रस्त ॥ १ ॥
दक्षपणें तेंवी राहिलों मी एथ । अवलोकनार्थ तुम्हांप्रति ॥ २ ॥
संयमी कीं नृप तैसाचि परिवार । सेवकांसी प्रिय राव कीं न ॥३॥
राजा-प्रजा एकमेकांप्रति प्रिय । असे कीं, यास्तव आलों एथें ॥ ४ ॥
क्षुधितासी अन्न तेंवी तूं मजसी । राया, आवडसी एकलाचि ॥ ५ ॥

तृषाहीनां जल तैसे हे अमात्य । मजसी अप्रिय जाणे नृपा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे व्यत्यास गुणांचा । भासतो स्वार्थांधा सर्वकाल ॥७॥

३५०

तव हितकर्ता हाचि माझा दोष । केलें न अनिष्ट कांहीं त्यांचें ॥ १ ॥
ऐसेंही असूनि करिती ममद्वेष । करणें स्थानत्याग इष्ट तेणें ॥ २ ॥
राव म्हणे मुने, जाऊं नको राहें । हांकीन द्वेष्ट्यांतें सदनांतूनि ॥ ३ ॥
विपुलोपचारें सन्मानीन तुज । कल्याणाचा मार्ग दावीं मातें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे नृपोक्ति ऐकूनि । दावी तया मुनि योग्य मार्ग ॥ ५ ॥

३५१

काकवधदोषी एकेकासी राया । दुर्बल या ठाया करणें योग्य ॥ १ ॥
अपराध सिद्ध होतां एकेकासी । वधावें पुढती यथाक्रम ॥ २ ॥
दोष बहूतांचा असतां एकाचि । दोषज्ञा वधिती क्रूरपणें ॥ ३ ॥
विप्र आम्ही मृदु कृपाळु, सर्वांचें । कल्याणचि साचें इच्छितसों ॥
'कालकवृक्षीय' मम नाम राजा । मित्र त्वत्पित्याचा जाणें मज ॥५॥
राज्यांत संकटें पाहूनियां तव । त्यागूनी विषय केलें तप ॥ ६ ॥
राया, शुद्धस्नेहें वदें हो सावध । स्वार्थी हे अमात्य जाणूनियां ॥ ७ ॥
ऐकूनि तें राव योजी त्या अमात्य । सार्वभौम राज्य करी सौख्यें ॥
वासुदेव म्हणे निवेदिती भीष्म । धर्मासी हें ज्ञान प्रेमभावें ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ८२ वा अध्याय समाप्त

अध्याय ८३ वा ३५२

धर्म म्हणे ताता, सभासद मित्र । सहपरिचारक अमात्यही ॥ १ ॥
कथावें, असावें कैंवी मजप्रति । ऐका जें निवेदी पितामह ॥ २ ॥
लोकलज्जायुक्त संयमी सरल । तैंवी सत्यप्रिय न्यायज्ञाते ॥ ३ ॥
सभासद ऐसे असावे नृपाळा । सौख्यद जनांला होतील ते ॥ ४ ॥
शूर जे सन्निध, शास्त्रज्ञ तैं विप्र । सर्वदा संतुष्ट कार्योत्सुक ॥ ५ ॥
सर्वदा ऐशांचें नृपा, घ्यावें साह्य । कथी वासुदेव पुढती ऐका ॥६॥

३५३

नित्य सन्मानित कुलीन स्वशक्ति । न राखी प्रसंगीं गुप्त कदा ॥१॥

प्रसन्न वा रुष्ट पीडित ताडित । कुलीन स्वपक्ष सोडीचिना ॥ २॥
सुदेशज, प्राज्ञ, कुलीन, सुरूप । प्रौढ बहुश्रुत अनुरक्त जे ॥ ३ ॥
योजावे यापरी राया, परिचारक । इतर संकटांत त्यजिती स्वार्थी ॥
भावज्ञ, सदय, सदाचारयुक्त । कुलीन जे तेच मंत्री व्हावे ॥ ५ ॥
द्रव्य, बहुमान, अधिकारादिकीं । तुष्ट ज्यां मानिसी स्वार्थीचि ते ॥
वासुदेव म्हणे अकुलीन स्वार्थी। सुखाचा इच्छिती वांटा मात्र ॥७॥

३५४

सामर्याद, ज्ञाते, सद्वृत्त, अक्षुद्र । प्रार्थिती जे तुज न त्यजीं तयां ॥
निंद्य, मंदबुद्धि असमयवेत्ते । भ्रष्टप्रतिज्ञ ते दूर करीं ॥ २ ॥
समाज त्यागूनि इच्छूं नये एक । परी प्रमुखार्थ गण त्याज्य ॥ ३ ॥
विक्रमचि असे कल्याणलक्षण । राया, तारतम्य ध्यानीं घ्यावें ॥ ४ ॥
कीर्तिशील, सत्यप्रतिज्ञ धार्मिक। जो बळिवंतास न करी स्पर्धा ॥५॥
अमानी सन्मान्य जितात्मा तैं क्षान्त । मंत्री परीक्षित व्हावा राया ॥
वासुदेव म्हणे सद्गुणांचा निधि । तोचि मंत्रिपदीं योग्य असे ॥ ७ ॥

३५५

कुलीन, कृतज्ञ, संततिसंपन्न । शूर आत्मवान सहनशील ॥ १ ॥
सत्यप्रियता हीं कल्याणलक्षणें । शत्रूही या गुणें मित्र होती ॥ २ ॥
कल्याणेच्छु नृप परीक्षूनि ऐसे । नर योजावे ते मंत्रिपदीं ॥ ३ ॥
स्वदेशज, विश्वासार्ह तैं कुलीन । निर्लोभी जे पूर्ण निष्ठावंत ॥ ४ ॥
ऐशा संबंधित परीक्षितां करीं । परीक्षा करावी अमात्यांची ॥ ५ ॥
सत्कुळ, सज्जाति वेदमार्गस्थित । गर्वहीन तेच मंत्री व्हावे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विनयी सद्वृत्त । अधिकारस्थित मंत्री व्हावे ॥ ७ ॥

३५६

कायिक, वाचिक तैंवी मानसिक । अथवा संमिश्र कपटहीन ॥ १ ॥
पर्याप्तवचन प्रतिपत्तिकुशल । ज्ञाते देशकाल कर्तव्यांचे ॥ २ ॥
हीनतेजासंगें न कळे कर्तव्य । अन्याही संशयग्रस्त करी ॥ ३ ॥

---

१ त्रिविध वा द्विविध, २ अवश्य ती माहिती देण्यास समर्थ, ३ उपाय शोधण्यांत कुशल.

श्रुतहीना गुप्तकार्य तें घडेना । अंधचि तो जाणा कुलहीन ॥ ४ ॥
अल्पही कार्यानें गोंधळूनि जाई । अस्थैर्यें ज्ञाताही उपायज्ञ ॥ ५ ॥
शास्त्रबुद्धि तैंवी सूक्ष्मबुद्धिहीन । वैशिष्ट्य जाणे न स्वीकृताचें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अनुरक्तावीण । विश्वास ठेऊन लाभ नसे ॥ ७ ॥

३५७

वायुकृत छिद्रें प्रवेशूनि अग्नि । वृक्षांसी जाळूनि भस्म करी ॥ १ ॥
अननुरक्त तैं मंत्री अन्यसाह्य । घेवूनियां घाव घाली मर्मी ॥ २ ॥
पदच्युत करी करी शब्दाघात । प्रसन्नही द्वेष होई पुनः ॥ ३ ॥
अनुरक्तचि हें सकलही साही । यास्तव तो होई मंत्री योग्य ॥ ४ ॥
विरक्त मंत्र्याचा क्रोध वज्रासम । सद्गुणीही जाण कुटिल त्याज्य ॥
अमित्रसंबद्ध प्रजेचा अवमान । करील तो जाण वैऱ्यासम ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गुप्त विचारांची । योग्यता मूढांसी नसे कदा ॥ ७ ॥

३५८

अविद्वान्, अशुचि, गर्विष्ट, कोपिष्ट । आत्मश्लाघी, लुब्ध शत्रुसेवी॥
गुप्तकार्यी ऐसे नर ते अयोग्य । तैंवो आगन्तुक सद्गुणीही ॥ २ ॥
अन्यायेंचि रुष्ट पिता ज्याचा पूर्वी । त्याज्य गुप्तकार्यी अधिकारीही॥
अल्पही ज्यावरी लोकापवाद तो । सद्गुणीही होतो मित्र वर्ज्य ॥
देशबंधु कृतप्रज्ञ जो मेधावी । ज्ञाता सर्वकार्यी शुद्ध सदा ॥ ५॥
गुप्तकार्यामाजी योग्य तो जाणावा । ज्ञाताही असावा विज्ञाताचि ॥
भावज्ञ जो आत्मसम सुनिर्मळ । तोचि गुप्तकार्ययोग्य जाणे ॥ ७॥
संतुष्ट जो पापद्वेष्टा, समयज्ञ । सामर्थ्यसंपन्न सामप्रिय ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सत्कर्मे जनांसी । विश्वासार्ह तोचि मंत्रि श्रेष्ठ ॥ ९ ॥

३५९

नीतिशास्त्रज्ञ जो शूर तैंवी ज्ञाता । गुप्तकार्यी राजा, आवश्यक ॥
सद्गुणसंपन्न ऐसे तीन तरी । असों द्यावे मंत्री निजराष्ट्रीं ॥ २ ॥
आपपर छिद्रें शोधावीं तयांनीं । शत्रुछिद्रें ध्यानीं घ्यावीं नित्य ॥३॥
आत्मछिद्र कदा करूं नये परा । जिंकावें अरीला छिद्रज्ञानें ॥ ४ ॥
कूर्मांगांसमचि रक्षावीं निजांगें । संधी न शत्रूतें द्यावी कदा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मंत्र्यांनीं आपुले । गुप्तचि राखावे सदा मंत्र ॥ ६ ॥

३६०

गुप्तमंत्र हेंचि शरीर नृपाचें । नृपाचीं त्या अंगें इतर जन ॥ १ ॥
राज्यवृक्षाचें या मूळ गुप्तदूत । सार गुप्तमंत्र ध्यानीं असो ॥ २ ॥
वृत्यर्थेचि कोणी पांघरिती गुण । स्वार्थ तो जाणून दक्ष व्हावें ॥ ३ ॥
तिघांचे विचार ऐकूनियां अंतीं । ज्ञात्यासी स्वमति निवेदावी ॥४॥
निर्णय परी न लागतां त्या ठाईं । त्रैविद्यज्ञा पाहीं विचारावें ॥ ५ ॥
विप्राचा त्या व्हावा निर्णय अंतिम । मंत्रस्थळीं हीनदेही नसो ॥ ६ ॥
संरक्षितस्थळीं शब्द-अंगदोष । करूनियां वर्ज्य मंत्र व्हावा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे गुप्तमंत्र ऐसा । आधार राजाचा सर्वकाळ ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ८३ वा अध्याय समाप्त

अध्याय ८४ वा ३६१

निवेदिती भीष्म इतिहास प्राचीन । गुरूसवें जाण इंद्र वदे ॥ १ ॥
सर्वसंग्रही तें वर्तन कथावें । हितप्रद व्हावें सकलांप्रति ॥ २ ॥
बृहस्पतीलागीं प्रश्न करी इंद्र । साम हें उत्तर गुरु देई ॥ ३ ॥
सर्वदा जो त्रस्तमुद्रा तेंवी मौनी । तिरस्कार जनीं होई त्याचा ॥ ४ ॥
स्मितवदनें जो नित्य पूर्वभाषी । प्रसन्न त्या होती लोक सदा ॥ ५ ॥
दानासवें साम व्यंजन जाणावें । त्यावीण जाणावें अळणी अन्न ॥
द्रव्य घेऊनिही मधुर बोलतां । सकलांच्या चित्ता मोद वाटे ॥ ७ ॥
दंड इच्छितांही सामचि योजावा । उद्वेग टाळावा चातुर्यानें ॥ ८ ॥
मोहक उत्कृष्ट भाषणावांचून । उपाय न अन्य सौख्यदाई ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे निवेदिती भीष्म । धर्मा, इंद्रासम तूंही वागें ॥ १० ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ८४ वा अध्याय समाप्त

अध्याय ८५ वा ३६२

धर्म म्हणे कैंवी पालन प्रजेचें । करितां रायातें कीर्तिलाभ ॥ १ ॥
उत्तर त्या देती भीष्म न्यायशुद्ध । तेंवी शुचि वृत्त यशदायी ॥ २ ॥
धर्म म्हणे व्हावा व्यवहार कोठें । स्वरूप तयाचें कथन करा ॥ ३ ॥
सद्‌गुण एकत्र नांदती न सर्व । ऐसा अनुभव येई जनीं ॥ ४ ॥

निवेदिती भीष्म म्हणसी तें सत्य । सद्‌गुणआधिक्य गवसे यत्नें ॥
वासुदेव म्हणे सद्‌गुण बाहुल्य । या जगीं दुर्मीळ सर्वदाचि ॥ ६ ॥

३६३

ज्ञाते, प्रौढ, शुचिर्भूत । चार नियोजावे विप्र ॥ १ ॥
शूर शस्त्रधारी आठ । एकविंशति धनिक ॥ २ ॥
सदाचारी शुचिर्भूत । मंत्री योजीं तीन शूद्र ॥ ३ ॥
वय ज्याचें पंचाशत । पौराणिक ज्ञाता सूत ॥ ४ ॥
सप्त व्यसनविमुक्त । असावा तो देई चित्त ॥ ५ ॥
अष्टमंत्र्यांचा निर्णय । घ्यावा येतां महत्कार्य ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । वचन ऐकावें भीष्मांचें ॥ ७ ॥

३६४

गुप्तपणें द्रव्य न घ्यावें कोणाचें । कार्योपघात तें नियमें करी ॥ १ ॥
तेणें उभयांचा नाश होई अंतीं । श्येनभयें पक्षी तैसे जनां ॥ २ ॥
विदीर्ण नौका तैं विभागूनि जाई । प्रजा अन्य ठाईं तेंवी राजा ॥ ३ ॥
अन्याय्य वर्तनें भय नृपाळासी । तेंवी अधिकाऱ्यासी तेंचि फळ ॥
दीन अनाथांचा पालक नृपाळ । साक्षीचि आधार न्यायदाना ॥ ५ ॥
न मिळतां साक्षी दिव्यादि योजना । करूनियां जनां न्याय द्यावा ॥
वासुदेव म्हणे पात्रतेनुरूप । निवेदिती दंड पितामह ॥ ७ ॥

३६५

अपराधासम योग्य असे दंड । व्हावा द्रव्यदंड धनवंतासी ॥ १ ॥
निर्धनासी शिक्षा व्हावी बंधनाची । शस्त्रदंड योजीं दुर्वृत्तातें ॥ २ ॥
मधुर भाषण अथवा द्रव्यदान । करूनि सज्जन संरक्षावे ॥ ३ ॥
राजवधेच्छु कीं अगारदाहक । संकरकारक अथवा चोर ॥ ४ ॥
क्रूरपणें ऐशा दुर्जनांचा वध । करावा न पाप ऐशा मार्गें ॥ ५ ॥
अपराधी एक अन्याप्रति दंड । कदापि न योग्य नृपाळा हें ॥ ६ ॥
शोधार्थ आप्तांसी बंधन करावें । कार्य होतां व्हावे मुक्त तेही ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राजधर्मे पुण्य । कल्पना ते जाण, पापकारी ॥ ८ ॥

३६६

परदूत कदा वधूं नये नृपें । प्रेषक कथी तें वदे दूत ॥ १ ॥

वधितां दूतासी पितरांसी पाप । भ्रूणहत्त्यागत प्राप्त होई ॥ २ ॥
संततिसंपन्न कुलीन तैं वक्ता । दक्ष मधुरवचा उच्चारी जो ॥ ३ ॥
यथोक्तवादी तैं स्मृतिमंत सप्त- । गुण हे दूतास आवश्यक ॥ ४ ॥
द्वारपाळ तैंवी शिरोरक्षकही । असावा तो पाहीं याचपरी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे याहूनि अधिक । व्हावा गुणवंत सेनापति ॥ ६ ॥

३६७

धर्मशास्त्रार्थ तत्वज्ञ । संधि-विग्रहांचें ज्ञान ॥ १ ॥
धृति मतिमंत तैंवी । रहस्य जो गुप्त ठेवी ॥ २ ॥
लोकलज्जा सत्वयुक्त । व्हावा कुलीन अमात्य ॥ ३ ॥
व्यूहरचना तैं यंत्रें । जाणे तत्त्व आयुधांचें ॥ ४ ॥
शूर साही शीतातप । परछिद्रांचा शोधक ॥ ५ ॥
ऐसा व्हावा सेनापति । नृप विश्वासार्ह जगीं- ॥ ६ ॥
व्हावा, परी कोणावरी । पूर्ण विश्वास न धरी ॥ ७ ॥
ऐसा असावा नृपाळ । सद्‌गुण तो त्याचा थोर ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । वचनें संतोषला धर्म ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ८५ वा अध्याय समाप्त

अध्याय ८६ वा ३६८

पुराकृत किंवा पुर स्वनिर्मित । वसावें कीदृश नगरीं तया ॥ १ ॥
निवेदिती भीष्म षड्‌दुर्गसंयुक्त । वास्तव्यासी योग्य नगर जाणें ॥
उखरप्रदेश, दुर्ग, महीदुर्ग । गिरी नरदुर्ग मृद्‌दुर्गतो ॥ ३ ॥
वनदुर्गाचि तो अंतिम जाणावा । संग्रह करावा धान्यादींचा ॥ ४ ॥
तट खंदकेंसी युक्त गज, अश्व । तैंवी रथव्याप्त नगर योग्य ॥ ५ ॥
संग्रहालयें तैं दक्ष धर्मशील । बलवंत वास्तव्य असणें योग्य ॥ ६ ॥
चौक, हाटयुक्त, व्यापारीं प्रसिद्ध । निर्भय प्रशान्त नगर व्हावें ॥७॥
वासुदेव म्हणे गीतवाद्यध्वनि । असावा त्या स्थानीं रम्यगृहीं ॥ ८ ॥

३६९

शूर द्रव्यवंत वास्तव्य असावें । वेदघोषें जावें भरूनि स्थान ॥ १ ॥
सभा, उत्सव तैं देवतांची पूजा । नित्य नगरीं त्या असणें योग्य ॥

पुरीं ऐशा सैन्य अमात्य अनुरक्त । असती ज्या राजास वसण तथ॥
कोश सैन्य मित्र व्यवहारसमृद्धि । नित्य त्या पुरींची करणें नृपें ॥
स्वनगर राष्ट्रदोष निवारावे । नित्य द्रव्य, शस्त्रें, वाढवावीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे न्यूनता त्या ठायीं । कांहींचि न पाहीं होऊं द्यावी ॥

३७०

काष्ट, लोह, तुषा, शृंगें, अस्थि, वेळू । ज्वालाग्राही वस्तु संग्रहाव्या
धान्य तें औषधि बाण चर्मादिक । वाद्यें महानाद संग्रहावीं ॥ २ ॥
थोर जलाशय कूपही रक्षावे । वृक्ष सांभाळावे क्षीरयुक्त ॥ ३ ॥
आचार्य, ऋत्विज तेंवी धनुर्धर । वैद्य कारागीर ज्योतिषीही ॥ ४ ॥
सन्मान ऐशांचा प्रयत्नें करावा । सत्कर्मीं योजावा योग्य तोचि ॥५॥
वासुदेव म्हणे पुण्यवंत राव । तोचि जनीं देव सौख्यदाता ॥ ६ ॥

३७१

धार्मिक पूजावे निग्रहावे दुष्ट । योजावें प्रजेस वर्णधर्मीं ॥ १ ॥
समीपस्थ किंवा दूरस्थही जन । नित्य परीक्षून दूतद्वारा ॥ २ ॥
योग्य तें वर्तन आचरावें नृपें । धार्मिक प्रजेतें करणें यत्नें ॥ ३ ॥
विशेषें करूनि चार, मंत्र, कोश । दंड हे स्वयेंच निरीक्षावे ॥ ४ ॥
शत्रु-मित्र तेंवी उदासीन कृति । हेरूनि योग्य ती करणें क्रिया ॥५॥
योग्यांचा सन्मान दान यज्ञादिक । करावें प्रजेस पीडूं नये ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्मासीं विरुद्ध । नृपाळानें कृत्य करूं नये ॥ ७ ॥

३७२

दीन अनाथ कीं विधवा तैं वृद्ध । सांभाळावें नित्य नृपाळानें ॥ १ ॥
आश्रमस्थ जनां अन्नवस्त्र द्यावें । वृत्त निवेदावें तपस्व्यांतें ॥ २ ॥
सर्वदा तयांसी विनम्र असावें । नित्य साह्य व्हावें तपोधनां ॥ ३ ॥
विश्वासार्ह तेचि जाणूनि सदैव । तयांपाशीं ठेव राहो द्यावी ॥ ४ ॥
स्वपर राष्ट्रींचे तपस्वी शोधूनि । मित्रता जोडूनि ठेवीं त्यांसी ॥ ५ ॥
संकटांत तेचि जाणूनि आधार । करावा सत्कार नित्य त्यांचा ॥६॥
वासुदेव म्हणे धर्मप्रश्नांप्रति । उत्तरें भीष्मांचीं ऐशापरी ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ८६ वा अध्याय समाप्त

अध्याय ८७ वा

३७३

राष्ट्रसंरक्षण स्वाधीनत्व त्याचें । धर्म म्हणे मातें निवेदावें ॥ १ ॥
निवेदिती भीष्म ग्रामाचा अधिप । योजावा प्रत्येक ग्रामामाजी ॥२॥
दशविंशति तैं शतसहस्राहि । ग्रामांचे अधिकारी आवश्यक ॥ ३ ॥
स्वस्वक्षेत्रस्थांचे दोष वरिष्ठांसी । निवेदूनि शुद्धि करणें योग्य ॥४॥
तत्तत्प्रांतपति रक्षावा त्या प्रांतें । शताधिपतीतें ग्राम द्यावा ॥ ५ ॥
वैभवसंपन्न तया ग्रामावरी । वरिष्ठाधिकारी लक्ष ठेवो ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सहस्राधिपति । घेऊनि करादि सौख्य पावो ॥ ७ ॥

३७४

अधिकार तया असावा युद्धाचा । वरिष्ठ तयाचा सचिव असो॥१॥
नक्षत्रांत शशिसमचि वा अन्य । मंत्र्यासी नेमून कार्य व्हावें ॥ २ ॥
मंत्र्याचें त्या भय असावें सर्वांसी । दूत साह्य त्यासी असणें योग्य
दुष्ट स्वार्थी शठ अधिपांपासूनि । प्रजासंरक्षणीं दक्ष व्हावें ॥ ४ ॥
क्रयविक्रयादि पाहूनियां व्यर्थ । कर योजीं योग्य वैश्यांवरी ॥ ५ ॥
शिल्पकारांचीही पाहूनि योग्यता । करग्रहणाचा मार्ग वरीं ॥ ६ ॥
सर्व प्रजेवरी अल्प बहु कर । योजावे साचार न्याय्यमार्गें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे प्रजेचा विनाश । न होई ऐसेच कर योग्य ॥ ८ ॥

३७५

प्राप्ति प्रयत्नांच्या तारतम्यज्ञानें । योजावे नृपानें सकल कर ॥ १ ॥
विचार न ऐसा होतां मानवाची । प्रयत्नप्रवृत्ति मावळेल ॥ २ ॥
आपपराचा न मूलोच्छेद व्हावा । मार्ग निरोधावा लोभीयांचा ॥३॥
खादाड नृपाचा प्रजा करी द्वेष । प्रजाद्वेषें सौख्य न लाभेचि ॥ ४ ॥
प्रजा वत्स ऐसें मानूनि राष्ट्रातें । दोहितां नृपाचें हित साधे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वत्सातें न दुग्ध । लाभतां तयास शक्ति नुरे ॥ ६ ॥

३७६

संरक्षूनि प्रजा करी अनुग्रह । नृपाचाही होय सांभाळ त्या ॥ १ ॥
आपत्कालास्तव व्याजें द्यावें धन । भांडारींही धन संरक्षावें ॥ २ ॥
क्वचित्काळीं फूस देऊनि तस्करां । आपुला दरारा वाढवावा ॥ ३ ॥

आपुलें महत्व दावूनि प्रजेसी । जोडावे करादि आनंदानें ॥ ४ ॥
अपहार दुष्ट करितील ऐसें । दावूनि जनांतें, द्रव्य घ्यावें ॥ ५ ॥
संकटीं वृषभासम घ्यावा भार । लोभ द्रव्यावर न ठेवितां ॥ ६ ॥
बोलूनियां ऐसे सौम्य मृदु शब्द । संपादावें द्रव्य विक्रमार्थ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे हितार्थ कपट । योजी जरी नृप इष्टचि तें ॥ ८ ॥

३७७

तटबंदी भृत्यभरण तें व्यय । संग्रामाचें भय योगक्षेम ॥ १ ॥
चिंतूनि योजावे वैश्यांवरी कर । वैश्य वनचर संरक्षावे ॥ २ ॥
मृदु शब्द द्रव्य अर्पूनि प्रसंगीं । रक्षावें वैश्यांसी नृपाळानें ॥ ३ ॥
स्वद्रव्य विभागी जाणूनि तयांसी । सर्वदा प्रेमेंचि वागवावें ॥ ४ ॥
राष्ट्राभिवृद्धि ते दयावंत वैश्य । कृषिकर्म नित्य करिती तेचि ॥ ५ ॥
अप्रमादें तयां रक्षावें नृपानें । राष्ट्राचें तें जाणें नृपा, भाग्य ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वैश्य तेंचि धन । धन तोंचि धर्म, धर्मं मोक्ष ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ८७ वा अध्याय समाप्त

अध्याय ८८ वा

३७८

समर्थ नृपासी द्रव्यसंग्रहेच्छा । होतां मार्ग त्याचा निवेदावा ॥ १ ॥
भीष्म तैं धर्मासी म्हणती मकरंद । सेविताती भृंग पुष्पांतूनि ॥ २ ॥
तेंवी प्रजेप्रती पीडिल्यावांचूनि । नृपाळानें जनीं कर घ्यावे ॥ ३ ॥
अथवा वत्सासी राखोनियां दुग्ध । काढिती, तैसाच कर घ्यावा ॥
जळूका रुधिर शोषितां कळेना । वाघीण पिलांना उचली दंतें ॥५॥
वासुदेव म्हणे तेंवी पीडाहीन । कर संपादून सुखवो राजा ॥ ६ ॥

३७९

सुप्तजनपाद तीक्ष्णदंतें जेंवी । अपीडनें खाई मूषक तो ॥ १ ॥
तेंवी नृपाळानें पीडक न होतां । द्रव्योत्पादनाचा वरणें मार्ग ॥ २ ॥
सावधानतेनें यथाक्रम कर । वाढवावे भार तोले ऐसे ॥ ३ ॥
वाहनाचा भार हळु हळु जेंवी । वाढवावा तेंवी व्यवहार हा ॥ ४ ॥

सकृत्पाशबद्ध होतां यथाकाल । लादावें सकल ओझें तेथें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे रक्षण प्रजेचें । ध्येय हें नृपाचें असणें योग्य ॥ ६ ॥

३८०

उपाय सर्वांसी योजणें अशक्य । करावें संतुष्ट मुख्य मुख्यां ॥ १ ॥
भेद सांत्वनेंसी पुढती सकलां । जिंकावें नृपाळा, चातुर्यानें ॥ २ ॥
अकालीं अयोग्य योजूं नये कर । अनिष्ट साचार मायामार्ग ॥ ३ ॥
योग्याचि उपायें अश्व होती वश । चुकतां तो पंथ क्रुद्ध होती ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अयोग्य उपायें । प्रक्षोभचि पाहें प्रजेचा तें ॥ ५ ॥

३८१

मद्यपानगृहें, वेश्या तैं जुगारी । विट, दुराचारी संयमावे ॥ १ ॥
मोकाट ते होतां नाडिती प्रजेतें । कल्याण नृपाचें जिच्या हातीं ॥
विपत्तीवांचूनि कोणी कांहीं कोठें । मागूं नये ऐसें कथी मनु ॥ ३ ॥
वागूनि तैसेंचि आपुली जीविका । चालवी ते प्रजा सकल सुखी ॥
त्यागूनियां यत्न याचनाचि जरी । करिती जन तरी सर्वनाश ॥ ५ ॥
असूनि सामर्थ्य दुर्लक्षितां नृप । भोगी चतुर्थांश पाप त्याचें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे प्रजापाप नृपा । यास्तवचि दुष्टां निग्रहावें ॥ ७ ॥

३८२

कामासक्तालागीं अकार्य न कांहीं । अनुकूल दावी शास्त्रही तो ॥१॥
निराधाराचि जो विपत्तींत याची । दयेनें तयासी द्या न भयें ॥ ॥ २ ॥
याचक तस्कर नसोत त्वद्राजीं । अर्पी याचकांसी अविवेकी तो ॥
याचकवृत्तीचा परिपोष करी । अनहित करी राष्ट्राचें तो ॥ ४ ॥
ऐसे जन तुझ्या राज्यांत नसावे । प्राण्यांचें पहावें हित सदा ॥५॥
वासुदेव म्हणे दया आळसासी । पोषक न व्हावी कदाकाळीं ॥ ६ ॥

३८३

अयोग्य धन जे मागती जनांसी । शिक्षा तयांप्रति करणें योग्य ॥१॥
कृषि-गोरक्षणा द्यावें प्रोत्साहन । पीडित ते जन होतां हानि ॥ २ ॥
अन्नवस्त्रादिकें धनिकांचा मान । राखावा भाषण वदूनि मृदु ॥ ३ ॥
'प्रजेसवें आम्हांवरी अनुग्रह । करावा' विनय धरूनि वदें ॥ ४ ॥
कारण धनिक भूषण राष्ट्राचें । वशिंड वृषाचें जैशापरी ॥ ५ ॥

सत्य-सरलत्वें दंड-द्रव्यशक्ति । मित्र भूमि यांसी पावशील ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मित्र आणि कोश । सत्य सरलत्व राज्याधार ॥७॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ८८ वा अध्याय समाप्त

अध्याय ८९ वा

३८४

वृक्ष वनस्पति फलदा ज्या त्यांचा । छेद् नच राजा, होऊं द्यावा ॥
फलमूलांवरी विप्रांचा अधिकार । ऐसें कथी शास्त्र धर्मराजा ॥२॥
दुर्लक्षित ही जी संपदा विप्राची । हरण कोणीही करूं नये ॥ ३ ॥
जीविका न होतां राज्य त्यागी जरी । सांभाळीं त्या तरी द्रव्यदानें ॥
ऐकेन जरी तो, विप्र संसदेंत । विनवावें त्यास परोपरी ॥ ५ ॥
तात्पर्य तयाचे हेतु पुरवोनि । राज्यांत ठेऊनि घ्यावें यत्नें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सज्जनसहवास । दाखवी सुपंथ एकमेव ॥ ७ ॥

३८५

कृषि-गोरक्षण वाणिज्य ऐहिक- । साधनें, स्वर्गद विहित कर्म ॥१॥
यास्तव वेदाचे विरोधक चोर । वध्य ते साचार जाण राया ॥ २ ॥
याचि कार्यास्तव ब्रह्मयानें क्षत्रिय । निर्मिले हें ध्येय ध्यानीं असो॥३॥
जिंकूनि शत्रूसी संरक्षीं प्रजेतें । यज्ञ, युद्धही तें धर्मास्तव ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पाल्यांचें पालन । करी तोचि धन्य राजश्रेष्ठ ॥५॥

३८६

लोकहितास्तव नृपाळानें नित्य । युद्धास्तव सिद्ध असणें योग्य ॥
तैसेंचि त्यास्तव असूनि मानव । सेवा घेणें योग्य तया तेणें ॥ २ ॥
स्वकीयांपासूनि रक्षावें परांसी । तेंवी स्वकीयांसी संरक्षावें ॥ ३ ॥
परांपासूनिही परांतें रक्षावें । स्वकीय रक्षावे स्वकीयेंसी ॥ ४ ॥
ऐसें सर्वांप्रति सर्वदा रक्षूनि । आपणा रक्षूनि अवनी रक्षीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सर्वाधार आत्मा । निवेदिती धर्मा पितामह ॥ ६ ॥

३८७

छिद्र व्यसनही जाणावें आपुलें । अवशिष्ट राहिले वैरी कोण ॥ १ ॥
होईल कोणतें कर्म दोषावह । चिंतावें सदैव भाग्येच्छूनें ॥ २ ॥
गतदिनींचिया कृत्या स्तवितातीं । अथवा निंदिती चिंतावें तें ॥ ३ ॥

गुप्तदूत भूमंडळीं पाठवूनि । निंदा स्तुति ध्यानीं घ्यावी निज ॥४॥
ज्ञाते शूर त्वदाश्रितही जे निंदा । करिती ते राजा सत्कारार्ह ॥५॥
कारण सर्वांसी सर्वचि न रुचे । अरिमित्रादींते सर्वांलागीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नित्य तारतम्य । राखूनि वर्तन करणें योग्य ॥ ७ ॥

३८८

धर्म म्हणे ताता, तुल्यबल, गुण । असूनिही जन कदा कोणी ॥१॥
वैशिष्ट्य पावूनि प्रबल कां होती । केंवी नियोजिती कार्यीं अन्यां ॥
निवेदिती भीष्म अचरांसी चर । अदंष्ट्रां सदंष्ट्र भक्षिताती ॥ ३ ॥
तैंसे सावध ते बेसावधांप्रति । गृध्रसे भक्षिती युधिष्ठिरा ॥ ४ ॥
व्यापाऱ्यांसी करपीडा न कीं राष्ट्रीं । सुखेंचि काननीं विचारती कीं
कंटाळूनि कृषिकर्मालागीं कृषि । त्यागूनि राज्यासी जाती न कीं ॥
ऐहिक दानेंचि पितर पशुपक्षी । सुखें नांदताती नरश्रेष्ठा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धर्माप्रति भीष्म । निवेदिती धर्म पुढती हाचि ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ८९ वा अध्याय समाप्त

अध्याय ९० वा ३८९

धर्मा, आंगिरस-उतथ्यानें धर्म । कथियेले जाण मांधात्यासी ॥ १ ॥
निवेदितों सर्व ते मी तुजप्रति । सप्रेम कथिती भीष्म ऐसें ॥ २ ॥
मांधात्यासी म्हणे उतथ्य तो ज्ञानी । धर्मास्तव जनीं राव असे ॥
यथेच्छ वर्तनास्तव तो नसेचि । पालन हें त्यासी मुख्य कार्य ॥४॥
धर्मपालक जो राजा तोचि देव । नरकातें जाय अधार्मिक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धर्म भूताधार । पाळी जो साचार तोचि राजा ॥६॥

३९०

धर्मस्वरूप तो राजा । धर्म आधार लक्ष्मीचा ॥ १ ॥
दुष्ट निवारणाविण । नृपा निंदिती सज्जन ॥ २ ॥
धर्म नसे या राज्यांत । ऐसें बोलताती संत ॥ ३ ॥
धार्मिकांची कार्यसिद्धि । ऐसा अनुभव लोकीं ॥ ४ ॥
धर्म मंगलकारक । तेणें पाळिताती लोक ॥ ५ ॥
होतां धर्माचा उच्छेद । सकलांसी भय प्राप्त ॥ ६ ॥

अमुक माझें ऐसें कोण । वदूं शके धर्माविण ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दुष्ट- । निवारण, नित्य इष्ट ॥ ८ ॥

३९१

भार्या, पशु, क्षेत्र सदय नराही । पापी यदा होई उच्छृंखल ॥ १ ॥
स्वधा स्वाहाकार अर्चन देवांचें । अतिथिपूजेतें स्थान नुरे ॥ २ ॥
वेदाध्ययन वा व्रत-यज्ञही न । करिती ब्राह्मण अधर्मानें ॥ ३ ॥
वृद्धांसम सर्व प्रजा ते विव्हळ । खल उच्छृंखल यदा होती ॥ ४ ॥
इहपराहित चिंतूनि ऋषींनीं । योजियेलें जनीं नृपाळासी ॥ ५ ॥
नरश्रेष्ठ ऐसा धर्मासी आधार । नाम त्या साचार राजा ऐसें ॥६॥
वासुदेव म्हणे धर्मलय जेथें । वृषल तयातें म्हणती बुध ॥ ७ ॥

३९२

धर्म तोचि वृष अलंभाव त्याचा- । करी, वृषलत्वा पावेल तो ॥ १ ॥
यास्तव धर्माचा उच्छेद न व्हावा । धर्मेंचि वैभवा चढती जन ॥
धर्म-हास होतां जनांचा विनाश । धर्माचा यास्तव न घडो लोप ॥
आचरी श्रद्धेनें तया अर्पी धन । धर्म ऐसें नाम यास्तवचि ॥ ४ ॥
दुष्कर्ममर्यादा दावी हा जनांसी । निर्मी ब्रह्मा यासी उत्कर्षार्थ ॥ ५ ॥
प्रजानुग्रहार्थ यास्तव धर्माचा । प्रसार सर्वदा करणें योग्य ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे श्रेष्ठतर ऐसा । धर्मचि जनांचा उद्धारक ॥ ७ ॥

३९३

धर्मेंचि पालन करी तो नृपाळ । त्याज्य ते विकार काम-क्रोध ॥१॥
श्रेयस्कर एक धर्माचें नृपासी । योनि ते धर्माची विप्र वंद्य ॥ २ ॥
विप्रमनोरथ न करितां पूर्ण । नृपाळासी जाण भय सदा ॥ ३ ॥
विप्रशब्दें बळि पावला विनाश । पुढती पश्चात्ताप तयाप्रति ॥ ४ ॥
अधर्मापासूनि लक्ष्मीसी जो पुत्र । तोचि नामें दर्प ख्यात जनीं ॥५॥
नाशिलें अनेकां दर्पानें नृपाळा । दर्प नच व्हावा कदा कोणा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जयासी न दर्प । तोचि जाणा नृप इतर दास ॥ ७ ॥

३९४

मत्त, प्रमत्त तैं पाखंडी त्यजावे । सर्वदा राखावें दूर तयां ॥ १ ॥
निग्रह जयाचा केला तो अमात्य । परस्त्रीसंबंध त्याज्य सदा ॥ २ ॥

पर्वत, दुर्गम स्थळें, गज, अश्व । न व्हावें दुर्लक्ष भुजंगींही ॥ ३ ॥
संबंधही त्यांचा येऊं नये रात्रीं । ठेवावें हें चित्तीं सर्वकाल ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अदान तैं दंभ । अभिमान क्रोध व्यर्थचि हे ॥ ५ ॥

३९५

अविज्ञात वंध्या, स्वैरिणी, परस्त्री । कन्याही ते तैसी संगा त्याज्य ॥
संकरें प्रवेशे कुळीं पापी दैत्य । कुलसंरक्षक होवो नृप ॥ २ ॥
क्लीव, अंगहीन, अविवेकी दोषी । संकरें संतति होत असे ॥ ३ ॥
प्रमादशील हे क्षत्रिय वा, जेव्हां । संकटासी तेव्हां ऊत येई ॥ ४ ॥
ग्रीष्मीं शैत्य, शीतकाळीं तें नसेचि । अवृष्टि, अतिवृष्टि, व्याधि बहु ॥
घोर ग्रहबाधा उत्पातही होती । प्रजानाशें अंतीं राजनाश ॥ ६ ॥
एकाप्रति दोघे दोघांसी अनेक । लुटिती तो दोष नृपाळाचा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कुमारिका भ्रष्ट । होती राजदोष जाणावा तो ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ९० वा अध्याय समाप्त

अध्याय ९१ वा

३९६

मांधात्यासी मुनि उतथ्य बोलती । मेघ कालवर्षी, योग्य राजा ॥१॥
ऐसा योग येतां सौख्य पावे प्रजा । सद्धर्मेंचि ऐसा योग येई ॥ २ ॥
संरक्षूनि रंग मलापहरण । करीना तो जाण रजक व्यर्थ ॥ ३ ॥
वर्णधर्मत्यागें अन्यकर्मीं रत । जाणावा तैसाच व्यर्थ नर ॥ ४ ॥
रक्षूनि सद्गुण निवारी जो दोष । प्रजाहितदक्ष तोचि राजा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वृद्धिकारी छेद । करील जो तोच कुशल माळी ॥६॥

३९७

कृत, त्रेतादिक नृपाळाच्या हातीं । यास्तव तयासी युग संज्ञा ॥ १ ॥
प्रमादशील तो नृपाळचि जरी । सर्वत्रचि तरी तेंचि घडे ॥ २ ॥
अधर्मे नृपाच्या प्रजेचा संहार । धार्मिक नृपाळ रक्षी प्रजा ॥ ३ ॥
अधर्मे तयाच्या शोक सकलांसी । त्राता दुर्बलांसी नुरे कोणी ॥ ४ ॥
दुर्बलांचें सौख्य तेंचि नृपाळाचें । दुःख बाधे त्यांचें रायाप्रति ॥ ५ ॥
मुनि, सर्प, तैंवी दुर्बलांची दृष्टि । दुःसह या लोकीं वाटे मज ॥ ६ ॥
दृष्टिपथीं त्यांच्या येई न तूं राया । बोध वासुदेवा तारक हा ॥ ७ ॥

३९८

दुर्बल दृष्टीनें सबांधवनाश । जाणावें हें सत्य नृपश्रेष्ठा ॥ १ ॥
दुर्बलशापानें दग्ध होतां वंश । अंकुरही तेथ न फुटे कदा ॥ २ ॥
दुर्बलता हेंचि जाणें महाबल । करील निर्मूल सकलैश्वर्या ॥ ३ ॥
अवमान पीडा साहूं नये त्याची । साहितां नृपासी नियमें नाश ॥
संकटींही राजा, दुर्बलांचे कर । न घेई साचार स्वहित तेणें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दुर्बल ते अग्नि । जाळितील क्षणीं आधाराही ॥ ६ ॥

३९९

व्यर्थ आरोपें जे रोदन करिती । तयांचे जाळिती अश्रु नृपा ॥ १ ॥
पुत्रपौत्र तरी भोगिती तें पाप । यथाकाल बीज उगवे तेंवी ॥ २ ॥
दुर्बलासी त्राता नसे ज्या राष्ट्रांत । दंड दैवकृत होई तेथें ॥ ३ ॥
यत्नशीलांतेंही भिक्षेचा प्रसंग । येई ऐसें राज्य नष्ट होई ॥ ४ ॥
बहु अधिकारी अन्याय करिती । तदा नृपाळासी पाप लागे ॥ ५ ॥
कोण्याही निमित्तें, दैन्यें जे याचिती । हरणें ते संपत्ति क्रौर्यचि तें ॥
वासुदेव म्हणे तारतम्याविण । विधिप्रतिपालन अन्याय्यचि ॥ ७ ॥

४००

जन्मला वाढला झाला भूताश्रय । छेदितां तो होय बहुतां दुःख ॥
महावृक्षाची ते दशा होई जैसी । तैसीच राजाची अवस्था ते ॥ २ ॥
नृपाचे सद्गुण गाऊनि सत्क्रिया । करितां कोणी राया, उत्कर्षचि ॥
धर्मभ्रमें परी घडतां अधर्म । होई पुण्यक्षीण पापवृद्धि ॥ ४ ॥
सज्जनांत दुष्ट हिंडतां निर्भय । आगमन होय कलिचें तेथें ॥ ५ ॥
परी दुर्जनांसी शासन नृपाचें । वैभव राष्ट्राचें वृद्धि करी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अमात्य जो योजी । चिंतूनि, तयाची वृद्धि सदा ॥७॥

४०१

सत्कृत्य, सदुक्ति, पाहूनि सन्मान । करी तया धर्म घडे बहु ॥ १ ॥
संविभागें भोगी मंत्र्यां नावमानी । उन्मत्तांलागूनि शिक्षा करी ॥२॥
काया-वाचा-मनें संरक्षी प्रजेसी । पुत्रही अपराधी क्षमीचि ना ॥ ३॥
शरणागताचें पुत्रवत्पालन । धार्मिक तो जाण राजश्रेष्ठ ॥ ४ ॥

सश्रद्ध होऊनि दक्षिणासंयुक्त । करावे बहुत यज्ञ तेणें॥ ५ ॥
दीन अनाथांचे अश्रुपरिमार्जन । म्हणे राजधर्म वासुदेव ॥ ६ ॥

४०२

मित्रोत्कर्ष तेंवी विनाश शत्रूंचा । मान सज्जनांचा राखी सदा ॥१॥
सत्याचें पालन तेंवी भूमिदान । पोष्यांचें रक्षण अतिथिपूजा ॥ २ ॥
निग्रहानुग्रह इहपरत्रींचे । जया त्या नृपातें पुण्यलाभ ॥ ३ ॥
नियंता नृपाळ धार्मिकांचा ईश । संयमी तो नित्य वृद्धि पावे ॥ ४ ॥
असंयम होई निःपात तयाचा । सन्मान ज्ञात्यांचा करणे तेणें ॥ ५ ॥
यमासम भेदभावासी त्यजून । करी नियमन श्रेष्ठ राव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे इंद्राचि नृपाळ । धर्म जें बोलेल तोचि होई ॥ ७ ॥

४०३

क्षमा ज्ञान तेंवी संयम मनन । सत्कर्म दुष्कर्म सकलांचें ॥ १ ॥
सकलांचे ध्यावे विचार ध्यानांत । अभ्यास हा नित्य करणें नृपा
मधुर भाषणें संरक्षावे जन । अदक्षा स्वधर्म न पाळवे ॥ ३ ॥
महाभारचि हा जाणावा राज्याचा । साह्य तो धार्मिका इतरासी न
सुयोग्य अमात्य योजूनि प्रजेतें । तेंवी तपस्व्यांतें संरक्षावें ॥ ५ ॥
स्वदेशीं वा परदेशामाजी कदा । त्याग स्वधर्माचा होऊं नये ॥ ६ ॥
यास्तव संपूर्ण स्वधर्माचें ज्ञान । संपादावें जाण नृपाळानें ॥ ७ ॥
अर्थकामाहूनि धर्मचि हा श्रेष्ठ । इहपर सौख्य स्वधर्मेंचि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे नृपानें स्वधर्म । पाळितांचि जन सकल सुखी ॥ ९ ॥

४०४

सन्मानें स्त्रीपुत्र त्यागूनिहीं जन । साह्य होती जाण मानवातें ॥ १ ॥
भूतसंग्रह तें दान मधुवाणी । दाक्ष्य शौच जनीं भूतिप्रद ॥ २ ॥
सदा दक्ष आत्म-परछिद्रदर्शी । जयाचें परासी न कळे छिद्र ॥ ३ ॥
परछिद्र पाहूनियां करी चाल । वागले सकळ देव ऐसें ॥ ४ ॥
ऐकूनि मांधाता वागूनि तैसाचि । इहपरलोकीं सौख्य पावे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे उतथ्याची गीता । ऐकेल त्या नृपा सकलैश्वर्य ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ११ वा अध्याय समाप्त

अध्याय १२ वा ४०५

धर्मप्रवृत्त तें धर्ममार्गेच्छूनें । कवण्या पंथें जावें निवेदा तें ॥ १ ॥
धर्मराज ऐसें पुशितां त्या भीष्म । इतिहास कथन करिती एक ॥
वामदेवा पुशी वसुमना राव । कथी वामदेव ऐकें तेंचि ॥ ३ ॥
राया, धर्माहूनि श्रेष्ठ नसे कांहीं । अधर्में जो जाई नाश त्याचा ॥४॥
असत्पापिष्ट ज्या सचिव तो वध्य । पावतो विनाश परिवारेंसी ॥५॥
वासुदेव म्हणे स्वैर, शास्त्रद्वेष्टा । पावेल विनाशा सम्राटही ॥ ६ ॥

४०६

सरिताप्रवाहें सागर समृद्ध । सत्कर्में तैं नृप वृद्धि पावे ॥ १ ॥
धर्म-अर्थ-काम-बुद्धि-मित्रपूर्ण । सदा मी असें न समजो नृप ॥ २ ॥
धर्मादिकांवरी जगाचे व्यवहार । यश कीर्ति थोर लाभे तेणें ॥ ३ ॥
धर्मसंरंभी जो धर्मार्थचिंतक । शाश्वत महत्व तया लाभे ॥ ४ ॥
अदाता, न कोठें स्नेह जयाप्रति । त्यजी राजनीति साहसी जो ॥ ५ ॥
निर्बुद्धा जया न पाप्याची परीक्षा । ऐसा मूढ राजा नरका जाई ॥
वासुदेव म्हणे दुष्कर्में दुष्कीर्ति । जाणूनि विवेकी कर्म करी ॥ ७ ॥

४०७

मानद जो दाता सौम्य लोकप्रिय । संकटीं त्या साह्य सकल होती ॥
धर्मबोधक ज्या गुरु नसे कोणी । प्रश्नही जाऊनि न करी कोणा ॥
केवळ सुखार्थ द्रव्यार्जनीं रत । कदाही शाश्वत सौख्य न त्या ॥३॥
धर्ममार्गीं सदा गुरूच्या आधीन । अर्थावलोकन स्वयें करी ॥ ४ ॥
लाभप्रसंगींही धर्मातें महत्व । देई तया नित्य सौख्य लाभे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वामदेवबोध । देऊनियां चित्त पुढती ऐका ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १२ वा अध्याय समाप्त

अध्याय १३ वा ४०८

दुर्बळांमाजी जो अधर्मप्रचार । करी, तेंचि कार्य अनुयायांचें ॥ १ ॥
उपजीविकेसी चालविती नित्य । राज्यीं त्या अनर्थ होती बहु ॥ २ ॥

---

१ स्वैरेनें धर्माचरण करणारा

अविनीत तेथें सर्व प्रजा होई । विनाशचि पाहीं सहज तेणें ॥ ३ ॥
स्वस्थतेच्या काळीं मानिती त्या जन । परी संकटीं न क्षमिती कोणी
शास्त्रपराङ्मुख क्रूरकर्मा नृप । तत्काळ विनष्ट होत असे ॥ ५ ॥
जित वा अजितपरंपरा नष्ट । करील तो भ्रष्ट स्वधर्मेसी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे देशकुळाचार । वळेंचि साचार बुडवूं नये ॥ ७ ॥

४०९

सन्मान्य नृपासी धरितां संगरीं । द्वेषें तिरस्कारी मूढचि तो ॥ १ ॥
अनुकूलकालीं भोगी सर्व सौख्य । संकटीं जें योग्य तेंचि करी ॥२॥
वर्ते ऐसा तोचि होई लोकप्रिय । वृद्धीसी वैभव पावे त्याचें ॥ ३ ॥
अप्रियकर्त्यांचें प्रियचि करावें । मित्रता तो पावे सत्वरीच ॥ ४ ॥
वर्जूनि असत्य, जनांचें जें प्रिय । करी सुज्ञ राव न याचितां ॥ ५ ॥
कोण्याही कारणें धर्म न त्यजावा । म्हणे सिद्धान्त हा वासुदेव ॥६॥

४१०

विचारितां प्रश्न कदा न लाजावें । वालिश न द्यावें उत्तर त्या ॥ १ ॥
कवणाही काजीं करूं नये त्वरा । मत्सर अंतरा न शिवो कदा ॥२॥
शत्रूही स्ववश होई ऐशा मार्गें । समत्व चित्ताचें गमवूं नये ॥ ३ ॥
अर्थव्यसनींही प्रजाहितें सौख्य । मानूनि स्वदुःख विसरे ज्ञाता ॥४॥
सद्गुणेंचि प्रिय करी जो प्रजेचें । वैभव तयातें त्यागीचिना ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अभिमानी भक्त । व्हावे आश्रयास नृपाळाच्या ॥६॥

४११

स्वाधीन इंद्रिय अनुगंता शुचि । समर्थानुरक्तासी महत्पद ॥ १ ॥
तैसाचि जो दक्ष असूनि सद्गुणी । द्रव्याचिया कर्मीं योजावें त्या ॥
इंद्रियलोलुप, मूढ, लुब्ध, शठ । अनुदार, घातुक दुराचारी ॥ ३ ॥
द्यूत, मद्य, स्त्रिया, मृगयेंत मग्न । अधिकारी जाण असूं नये ॥ ४ ॥
स्वरक्षणक्षम असूनि इतरां । रक्षी त्याच्या घरा न त्यजी लक्ष्मी ॥
गुप्तहेरद्वारा अन्य नृपाळांचें । चरित्र जो ऐके श्रेष्ठत्व त्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बलवंतवैर । करूनि मी दूर समजूं नये ॥ ७ ॥

४१२

श्येनासम झेंप घेऊनियां वैरी । क्रूरत्वें संहारी अचानक ॥ १ ॥

दृढभूल तेंवी दोषहीन चित्त । नृपें बलाबल चिंतूनियां ॥ २ ॥
बलहीनांवरी चालूनियां जावें । राज्य वाढवावें ऐशारीति ॥ ३ ॥
स्वधर्मं प्रजेचें पालन करूनि । धर्मास्तव रणीं वरणें मृत्यु ॥ ४ ॥
अशाश्वत सर्व शाश्वत न कांहीं । ज्ञाता दक्ष राही स्वधर्मांत ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धर्ममार्ग नित्य । सांभाळूनि सौख्य सकलां द्यावें ॥

४१३

प्रजापालन तें न्याय धर्मयुद्ध । योग्यकाळीं मंत्र धर्मरक्षा ॥ १ ॥
पंचांगें राजाचीं राष्ट्रसंवर्धक । जयाचीं हीं गुप्त श्रेष्ठत्व त्या ॥ २ ॥
एकासी हें सर्व शक्य न म्हणूनि । योग्य निवडूनि योजीं मंत्री ॥ ३ ॥
हिताचें वचन ऐकूनि स्वमत । त्यागी तोचि श्रेष्ठपद पावे ॥ ४ ॥
प्रतिकूलत्वें जो ऐके न मित्राचें । ऐके खिन्नचित्तें अरिचें तेंचि ॥ ५ ॥
जिताजिताचेही सद्गुण न घेई । वासुदेव पाही भ्रष्ट तया ॥ ६ ॥

४१४

त्यागूनि उत्तमां अधमांतें सेवी । संकटीं तो होई दीन दुःखी ॥ १ ॥
सद्गुणी आप्तांचा द्वेषें तिरस्कार । करी तया घोर मरण येई ॥ २ ॥
प्रिय गुणवंतां राखी जो संतुष्ट । नित्य कीर्तिवंत नांदे सौख्यें ॥ ३ ॥
अकालीं करादि घेऊं नये कदा । अति हर्ष शोकां करूं नये ॥ ४ ॥
आरोग्य कर्मांत सदा व्हावें दक्ष । मित्र भयग्रस्त ध्यानीं घ्यावे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ताटस्थ्यमर्यादा । मोडी कोण त्याचा शोध घ्यावा ॥

४१५

दुर्बलांवरी न ठेवावा विश्वास । गृध्रासम झेंप घेतील ते ॥ १ ॥
गुणवंताचाही करी कोणी द्वेष । यास्तव विश्वास नसो कोठें ॥ २ ॥
नहुषपुत्र जो ययाति तयानें । ख्यात जनीं केलें रहस्य हें ॥ ३ ॥
सर्वत्र सावध राहील जो राव । म्हणे वासुदेव विजय तया ॥ ४ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ९३ वा अध्याय समाप्त

अध्याय ९४ वा

४१६

सामचि नृपाळा, युद्धाहूनि श्रेष्ठ । कथी वामदेव वसुमनातें ॥ १ ॥
सामर्थ्यविहीनें इच्छूं नये कांहीं । लाभ नच होई असामर्थ्यें ॥ २ ॥

अनुकूल जया प्रजा अमात्यादि । चतुर शत्रूसी जिंकण्या जे ॥ ३ ॥
अल्प सैन्येंही तो संपादी विजय । प्रजाचि ऐश्वर्यमूळ नृपा ॥ ४ ॥
सामर्थ्य जाणूनि आक्रमणइच्छा । धरितां शत्रूचा मोड होई ॥५॥
ऐश्वर्ययुक्त जो दक्ष दयावंत । राष्ट्रसंरक्षक वृद्धि पावे ॥ ६ ॥
सज्जनासी शठ, परशूविभिन्न- । छिन्नवनासम नृपाळ तो ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे व्हावा शत्रुनाश । परी जिंकी क्रोध शत्रु न त्या ॥ ८ ॥

४१७

सज्जननिंद्य तें करूं नये सुज्ञें । विशुद्ध जें मनें करणें तेंचि ॥ १ ॥
सत्कर्मीं निमग्न होऊनि जो राही । अवमान पाहीं न घडे त्याचा ॥
पश्चात्तापही न घडे तयाप्रति । इहपर जिंकी तोचि एक ॥ ३ ॥
निवेदिती भीष्म वामदेवगीता । बोध हा पाळितां सौख्यलाभ ॥४ ॥
वासुदेव म्हणे धर्माज्ञापालन । ऐश्वर्यसाधन एकमेव ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ९४ वा अध्याय समाप्त

अध्याय ९५ वा

४१८

धर्म म्हणे कैसी विजयेच्छु राव । प्राप्त होतां जय वागे सांगा ॥ १ ॥
निवेदिती भीष्म जित राष्ट्रामाजी । कथावें व्हा राजी मजवरी ॥ २ ॥
ऐकती न जन तरी सर्व यत्नें । निग्रहाचि जाणें योग्य त्यांचा ॥ ३ ॥
निःशस्त्र क्षत्रिय पाहूनि निकृष्ट । तोही धरी शस्त्र तयावरी ॥ ४ ॥
धर्म म्हणे ताता, क्षत्रिय क्षत्रिया । पीडितां कथावा मार्ग काय ॥
वासुदेव म्हणे स्वकीयासी युद्ध । होई जरी प्राप्त सुज्ञा खेद ॥ ६ ॥

४१९

कथिताती भीष्म धर्मा, ऐशावेळीं । एकाकी तो तरी व्हावें एक ॥
निःशस्त्रा निःशस्त्र सशस्त्रासी शस्त्र । कपटासी कपट करणें योग्य॥
धर्मयुद्ध जरी करितां तयानें । त्याचिमार्गें जाणें हितप्रद ॥ ३ ॥
विपन्ना चिकित्सा करूनियां गुण । येतांचि सोडून द्यावें सुखें ॥ ४ ॥
धर्मा, धर्ममार्ग निश्चयें हिताचा । मार्ग कापट्याचा निंद्यचि तो ॥५॥
वासुदेव म्हणे सुजना सौजन्य । दुर्जनासी वाममार्ग प्राप्त ॥ ६ ॥

४२०

धर्ममार्गें जातां मरण हिताचें । जयही कुमार्गें निंद्याचि तो॥ १ ॥
सद्यःफल जरी न येई अधर्मो । परी अंतीं धर्मो, सकल नाश ॥ २ ॥
दुष्कर्मोपार्जित द्रव्यें मोद मूढा । उत्कर्ष पापाचा पुढती होई ॥ ३ ॥
पुढती अश्रद्ध होऊनि विनाश । पावे हा सिद्धान्त न टळे कोणा ॥
वासुदेव म्हणे पाप-पुण्यफल । न मिळे तत्काळ न टळे परी ॥५॥

४२१

ऐसा अश्रद्ध तो पापी । अमर मानी आपणासी ॥ १ ॥
सर्वकाळ बुधल्यासम । राही गर्वानें फुगून ॥ २ ॥
नदीतीरस्थ वृक्षसा । परी पुढती नाश त्याचा ॥ ३ ॥
महापुरामाजी पाहीं । समूळ तो वाहूनि जाई ॥ ४ ॥
छिन्नभिन्न कुंभासम । पुढती लेखिती त्या जन ॥ ५ ॥
यास्तवाचि विजय धन । धर्मे इच्छिती सज्जन ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्म । नित्य सुखाचें साधन ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ९५ वा अध्याय समाप्त

अध्याय ९६ वा

४२२

अधर्मे उत्कर्ष इच्छूं नये कदा । अभिमानी त्याचा नसे कोणी ॥ १ ॥
अनित्य पातित्यकारी तो विजय । अवनहीनत्व पावे तेणें ॥ २ ॥
छिन्नत्राण तेंवी तुझा मी जो म्हणे । त्यागूनि शस्त्रातें कर जोडी ॥
धरावें तयासी परी न वधावें । तत्त्व ध्यानीं घ्यावें शूरानें हें ॥ ४ ॥
वर्ष एक त्यासी निवेदूनि साम । पुढती पुत्रासम मानावें त्या ॥ ५ ॥
आहृत कन्येतें संवत्सर एक । विवाहाची गोष्ट बोलूं नये ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अविचारें हृत । द्रव्य ज्याचें त्यास अब्दें द्यावें ॥ ७ ॥

४२३

वधार्हाचें धन सत्कर्मीं वेंचावें । दुग्ध वृष, द्यावे ब्राह्मणासी ॥ १ ॥
अथवा क्षमावें पश्चात्तापदग्धा । रायासीच राजा युद्ध करो ॥ २ ॥
भिडतांही सेना, सामास्तव विप्र । पुढती येतां युद्ध करूं नये ॥ ३ ॥
उच्छृंखल कोणी न मानितां तयां । शूरांनीं करावा त्याग त्याचा ॥

बलात्कारें क्षुब्ध जाहले तयांसी । सन्मान धनेंसी तोषवावें ॥ ५ ॥
राष्ट्रस्थित जितां जेत्यानें कदापि । हरूनि द्रव्यादि दुखवूं नये ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसे दुर्जन । समय साधून करिती घात ॥ ७ ॥

४२४

सर्वथा उच्छेद करूं नये कदा । शाठ्यें विजयाचा मार्ग नको ॥ १ ॥
अल्पही धनानें निर्दोष जीवन । कंठावें हें जाण इच्छा सुज्ञा ॥ २ ॥
अमात्य आचार्य प्रजा अनुकूल । ऐश्वर्य सकल तया लाभे ॥ ३ ॥
व्यवहारज्ञ तो मान्यांसी सन्मानी । मान्य हेंचि जनीं इंद्रातेंही ॥ ४ ॥
प्रतर्दनादींनीं विविध प्रकारें । शत्रूसी जिंकिलें मान्य मज ॥ ५ ॥
सर्व श्रेष्ठ जरी विजय हें सत्य । परी मायालब्ध विजय नसो ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सज्जन ते सदा । कपट दंभाचा करिती त्याग ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ९६ वा अध्याय समाप्त

अध्याय ९७ वा ४२५

धर्म म्हणे ताता, क्षात्रधर्माहून । पापयुक्त धर्म अन्य नसे ॥ १ ॥
सूक्तासूक्तमार्गें थोराचाही वध । करणें आवश्यक नृपाळासी ॥ २ ॥
केंवी पापमुक्ति होई नृपाळाची । पुण्यलोकप्राप्ति केंवी तया ॥ ३ ॥
निवेदिती भीष्म दुष्टनिर्बर्हण । सज्जनपालन दान, यज्ञें ॥ ४ ॥
पापमुक्त होई धर्मा, अवनीपति । पीडा सन्नृपाची उत्कर्षार्थ ॥ ५ ॥
तृणोत्पाटन जें धान्यवृद्धीस्तव । तैसेंचि हें कार्य भूपाळाचें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे प्रजेचा उत्कर्ष । होतां पापमुक्त नृपश्रेष्ठ ॥ ७ ॥

४२६

अपहार, वध, चौर्य, क्लेशादिक । निवारूनि सौख्य सकलां देणें ॥
ऐसें निर्भयत्व जयाच्या प्रजेसी । सर्व यज्ञ त्यासी घडले जाण ॥ २ ॥
विप्र-धर्मकार्यास्तव जो संग्रामीं । लढे तोचि जनीं यज्ञ त्याचा ॥ ३ ॥
संग्रामीं त्या शस्त्रप्रहार जितुके । लाभती तितुके पुण्यलोक ॥ ४ ॥
रुधिरप्रवाह वाहे जो तयाचा । धूतपाप साचा तेणें नृप ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धर्मयुद्धामाजी । दुःखें तीं नृपाची तपोवृद्धि ॥ ६ ॥

४२७

अपेक्षावें जल पर्जन्यापासून । तेंवी संरक्षण नृपाळेंसी ॥ १ ॥
धार्मिक भीरूतें रक्षावें शूरानें । पाप पलायनें वीराप्रति ॥ २ ॥
आकारें समही विषम अंतरीं । पळती संगरीं भ्याड जन ॥ ३ ॥
स्वर्गेच्छेनें अन्य लेखूनियां तुच्छ । लढतां प्राणांस तेचि धन्य ॥
काष्ठलोष्टें किंवा कटाग्नीनें त्याचा । प्राण घ्यावा ऐसा क्षात्रधर्म ॥
कफमूत्रत्यागें शय्येवरी प्राण । सोडावा हा धर्म क्षत्रिया न ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शस्त्राघातावीण । निंद्यचि मरण क्षत्रियासी ॥ ७ ॥

४२८

शय्येवरी वीर पडतां आक्रोश । करील रणांत मरणास्तव ॥ १ ॥
शय्यामरण तें क्लेशदायी तया । शस्त्राघात व्हावा हेंचि इच्छी ॥ २ ॥
विजयेच्छा क्रोध संचरूनि अंगीं । दंग रणरंगीं बेभान जो ॥ ३ ॥
शस्त्राघात होतां कळती न त्यातें । पाठ न कोणातें रणीं दावी ॥४॥
प्राणरक्षणार्थ दैन्य न स्वीकारी । चढे स्वर्गावरी तोचि वीर ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे देहाचा विसर । जया तोचि थोर निजकर्मी ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ९७ वा अध्याय समाप्त

अध्याय ९८ वा

४२९

धर्म म्हणे ताता, रणांगणीं देह । ठेविती तयांस कवण गति ॥ १ ॥
निवेदिती भीष्म संवाद पूर्वींचा । अंबरीष-इंद्रामाजी झाला ॥ २ ॥
पुत्र नाभागाचा राजा पुण्यवंत । स्वर्गीं सचिवास अवलोकी तो ॥
दिव्य विमानस्थ तेंवी सेनापति । चालला पुढती ऐसें पाही ॥ ४ ॥
तदा देवेंद्रासी म्हणे मी दयाळा । स्वधर्म पाळिला परम प्रेमें ॥ ५ ॥
यज्ञ, दान तेंवी प्रजेचें पालन । धर्मास्तव रण आरंभिलें ॥ ६ ॥
सेनापति माझा सुदेव सामान्य । पावे मजहून केंवी सौख्य ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे निवेदी तें इंद्र । संग्रामचि श्रेष्ठ यज्ञ वीरा ॥ ८ ॥

---

१ गवताच्या जळक्या तट्ट्याशीं बांधून दिलेला अग्नी.

४३०

युद्धसामग्री ते सामग्री यज्ञाची । मानी युद्ध तोचि महायज्ञ ॥ १ ॥
उत्कृष्ट योध्यासी वधी जो शौर्यानें । वधी विक्रमानें सेनापति ॥२॥
वैकुंठलोक तो पावे त्या पुण्यानें । शोक न करणें तन्मृत्यूचा ॥३॥
पिंडोदक दान स्नान अशौचहि । करणें इष्ट नाहीं तयास्तव ॥ ४ ॥
स्वागतार्थ त्याच्या धांवती अप्सरा । सर्वधर्म वीरा मरतां रणीं ॥
वृद्ध, बाल, स्त्रीचा करूं नये वध । न घडो आघात पृष्ठभागीं ॥ ६ ॥
तृण धरूनि जो पातला शरण । तयासी मरण देऊं नये ॥ ७ ॥
रणांगणीं वीर वधिले बहुत । तेणेंचि मी इंद्र अंबरीषा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे युद्ध मरणाची । महती हे ऐसी कळली नृपा ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ९८ वा अध्याय समाप्त

अध्याय ९९ वा ४३१

धर्मराजाप्रति निवेदिती भीष्म । जनक-प्रतर्दन युद्धवृत्त ॥ १ ॥
युद्धप्रसंगीं त्या निज सैनिकांसी । प्रत्यक्ष स्वर्गचि जनक दावी ॥ २ ॥
योगबळें पुण्यलोक वीरांप्रति । दावूनियां स्फूर्ति देई राव ॥ ३ ॥
रणांगणीं मृत्यु येतां ऐसे लोक । लाभती हे शब्द ऐकूनियां ॥ ४ ॥
अत्यंत शौर्यानें झुंजले ते वीर । विजयाची माळ कंठीं पडे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संग्रामीं यास्तव । अग्रभागीं शौर्य दावी वीर ॥ ६ ॥

४३२

गजांमाजी रथ अश्व त्या मागुती । सकवच पदाति तयांमध्यें ॥ १ ॥
व्यूहरचना ते करील जो ऐसी । विजय तयासी निश्चयानें ॥ २ ॥
संग्रामप्रसंगें वीर इच्छी स्वर्ग । मकरासम क्षुब्ध सेनासिंधु- ॥ ३ ॥
करावा, वीरानें त्रस्तां धीर द्यावा । अधिक न व्हावा पाठलाग ॥४॥
निराश होऊनि पलायित जन । लढतां उलटून कठिण वेळ ॥५॥
वासुदेव म्हणे दयाही यापरी । आपुलेंचि करी संरक्षण ॥ ६ ॥

४३३

स्थावर जंगमां व्याघ्रादिकां मृग । तृषितां उदक भ्याड शूरां ॥ १ ॥
अन्नचि या जनीं, भ्याड शूरभेद । सम हस्तपाद असतां होई ॥ २ ॥

अंतीं भ्याड येती शूरासी शरण । यास्तव सन्मान्य शूर जगीं ॥ ३ ॥
शूराहूनि श्रेष्ठ त्रैलोक्यांत नसे । आधार सर्वांतें एक शूर ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पालक रक्षक । सद्‌गुणवर्धक एक शूर ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ९९ वा अध्याय समाप्त

अध्याय १०० वा

४३४

किंचित् धर्मपीडा करूनिही वीर । सेनेसी उत्साह भरिती कैंवी ॥१॥
पितामह भीष्मां, कथावें तें मज । बोले धर्मराज नम्रपणें ॥ २ ॥
निवेदिती भीष्म सत्यें धर्मस्थैर्य । मरणनिश्चय करूनि किंवा ॥ ३ ॥
शिष्टाचारें कोणी, कोणी राजभयें । स्थैर्य धर्मासी ये म्हणती ऐसें ॥
धर्मार्थसाधक सद्यः फलदाई । उपाय मीं पाहीं कथितों आतां ॥५॥
अमर्याद चोर धर्मार्थघातक । उपाय वेदोक्त तयां ऐकें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सर्वकार्यसिद्धि । होई मार्ग तोचि कथिती भीष्म ॥७॥

४३५

ऋजु वक्रमार्ग जाणावे उभय । वक्र ते केवळ प्रतिकारार्थ ॥ १ ॥
भेदभावें सेवा करिती ते वैरी । पीडा तयां द्यावी वैऱ्यासम ॥ २ ॥
गज, धेनु, वृष, अजगर, शल्य । शस्त्रास्त्रें विविध नियोजावीं ॥ ३ ॥
कृतनिश्चयाचे असावे रणधीर । चैत्र, मार्गशीर्ष, समरा मास ॥ ४ ॥
किंवा यदा वैरी असेल संकटीं । पीडा देतां त्यासी विजयलाभ ॥
वासुदेव म्हणे निपुण हेरांसी । योजूनि साधिती कार्य ज्ञाते ॥ ६ ॥

४३६

वनवासी दूत असावे वनांत । मृगासम मार्ग दाविती ते ॥ १ ॥
कुलवंत वीर योजावे पुढती । आवास जलेंसी दुर्ग व्हावा ॥ २ ॥
आवासाहूनि तें अरण्यचि श्रेष्ठ । रक्षणार्थ मार्ग तेथें बहु ॥ ३ ॥
दुर्गासन्निधचि सैन्यतळ व्हावा । आपुला रक्षावा सैन्यभार ॥ ४ ॥
आक्रमण व्हावें शत्रूवरी नीट । मार्ग हेचि मुख्य व्यसनीं वीरां ॥५॥
वासुदेव म्हणे दक्षिणाभिमुख । होऊनि सुस्थित करणें युद्ध ॥ ६ ॥

१ मैदान

४३७

दुर्जया, हे शत्रु यापरी जिंकावे । दिशेसी पाहावे वायु, शुक्र ॥ १ ॥
तैसाचि तो सूर्य जया दिशेप्रति । पूर्व पूर्व होती अधिक श्रेष्ठ ॥ २ ॥
अमर्याद लोष्ट कर्दमविहीन । अश्वांप्रति स्थान असणें योग्य ॥ ३ ॥
पंकगर्तहीन रथाप्रति योग्य । गजांप्रति योग्य स्थान ऐका ॥ ४ ॥
नीच द्रुम, तृण विशाल, ज्या ठाई । जलयुक्त पाहीं स्थान तयां ॥
दुर्ग, तृण, वेणु, वेत्र समाकुल । स्थान पायदळ योग्य असे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पदाति बहुल । सेना ते सबल म्हणती ज्ञाते ॥ ७ ॥

४३८

रथ, अश्व, सेना, सुदिनीं योजावी । योग्य प्रावृट्काळीं गजादि ते ॥
ऐसे सैन्यगुण तैंवी देशकाल । पाहूनियां बळ उपयोजावें ॥ २ ॥
मुहूर्त पाहूनि विप्राशीर्वाद ते । घेऊनि युद्धातें निघतां जय ॥ ३ ॥
निद्रिस्थ, तृषित, श्रांत तैं प्रकीर्ण । वर्जावे ते जाण प्रहारासी ॥४॥
प्रयाण, चलन, मोक्ष[१], खान, पान । वर्ज काल जाण शस्त्राघाता ॥५॥
वासुदेव म्हणे वृद्ध, मृत, क्षीण । त्रस्त जे शरण अवध्य ते ॥ ६ ॥

४३९

कार्यान्तरास्तव करिती संचार । तृणादिक भार वाहती जे ॥ १ ॥
परंपरागत जे द्वाररक्षक । ऐशां शस्त्राघात करूं नये ॥ २ ॥
कुशल जे सैन्यभेद संस्थापनीं । आत्मसम जनीं वागवावे ॥ ३ ॥
दश-शताधिप योजावे सैन्यांत । सहस्राधिपत्य शूरा द्यावें ॥ ४ ॥
संदेह विजयीं असे जैं आपणा । कोणीही तैं कोणा त्यागूं नये ॥ ५ ॥
सकल प्रमुखां निवेदावें ऐसें । भय जया वाटे तेणें जावें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे करी पलायन । स्व-पर तो जाण विनाशक ॥ ७ ॥

४४०

प्रमुखांचा वध पाहती सुखानें । कदाही न जाणें विजय तयां ॥ १ ॥
पलायितांप्रति निंदिती सर्वत्र । दुःख मरणप्राय तयांलागीं ॥ २ ॥
दंतओष्ठभग्नत्यक्तसर्वशस्त्र । हीनावस्था निज अरिसी येवो ॥ ३ ॥
अधम जे रणीं करिती पलायन । केवळ गणन योग्यचि ते ॥ ४ ॥

१ बाण सोडतांना

सालंकृत वीर विजयी तयांचा । पाठलाग साचा करिती हर्षे ॥ ५ ॥
मरणाहूनि तें पराभवदुःख । विजयाचि एक सौख्यकारी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भ्याडांचें मरण । वरिती संग्राम तेचि वीर ॥ ७ ॥

४४१

संग्राममरणें सद्‌गति ज्यां वाटे । प्रतिज्ञावद्ध ते घुसती रणीं ॥ १ ॥
खड्‌गचर्मधारी योजावे पुढती । शकट ते पृष्ठीं मध्यें स्त्रिया ॥ २ ॥
प्रमुख वृद्धांनीं द्यावें प्रोत्साहन । वीरांच्या मागून इतर जावे ॥ ३ ॥
भीरूंतेंही स्फूर्ति भरावी प्रयत्नें । संख्याबल तेणें अरिसी दिसे ॥ ४ ॥
अल्पसेनेसवें भिडावें प्रथम । पुढती इच्छेसम करणें वाढ ॥ ५ ॥
सूचिमुखव्यूह योजावा अल्पांनीं । वासुदेव ध्यानीं घ्यावें म्हणे ॥ ६ ॥

४४२

उत्कर्षापकर्ष सत्य वा असत्य । असतांही नित्य गर्जावेंचि ॥ १ ॥
पराभूत शत्रु, स्वसैन्याविजय । सैन्य आम्हां नव साह्या आलें ॥ २ ॥
प्रबल प्रहार करा आतां नेटें । स्फूर्ति ऐशा शब्दें येई वीरां ॥ ३ ॥
गर्जना करूनि सैन्य तैं शत्रूसी । प्रहार वेगेंसी करी यत्नें ॥ ४ ॥
सिंहनाद भेरी मृदंग पणव । वाजवावे थोर तयावेळीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे उत्साहें उत्साह- । वृद्धि पावे नित्य सिद्धांत हा ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १०० वा अध्याय समाप्त

अध्याय १०१ वा

४४३

धर्म म्हणे कैंवीं आचार, शूराचा- । स्वभाव, शस्त्रास्त्रां निवेदावें ॥
निवेदिती भीष्म देशकुलाचार । पाहूनियां कार्य द्यावें तया ॥ २ ॥
वाहन शस्त्राचा सराव ज्या जैसा । उत्कर्ष तयाचा त्याचि मार्गें ॥ ३ ॥
गांधार ते सिंधु सौवीरदेशस्थ । इंटें[1] व्याघ्रनखधारी वीर ॥ ४ ॥
सर्वयुद्धांमाजी कुशल तें सैन्य । शस्त्रास्त्रनिपुण औशीनर ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्राच्यदेशास्थित । करिती समयुद्ध गजयोद्धे ॥ ६ ॥

४४४

यवन, कांबोज तेंवी वीर शौरी । बाहुयुद्धामाजी निष्णात ते ॥ १ ॥

१ एक शस्त्र

दाक्षिणात्य खड्ग घेऊनि लढती । प्रायः रीत ऐसी घेई ध्यानीं ॥२॥
सर्वदेशांमाजी वीरांची उत्पत्ति । लक्षणें तयांचीं कथितों ऐकें ॥३॥
व्याघ्रसिंहगति-नेत्र तैवी वाणी । पारवे तैं जनीं कुलिंगाक्ष ॥ ४ ॥
वीर ते कंदन करिती शत्रूचें । मृगध्वनि ज्यांतें व्याघ्रनेत्र ॥ ५ ॥
दृष्टि वृषभाची आवेश तयांसी । क्षुद्र घंटाशब्दी कोपिष्ट ते ॥ ६ ॥
मेघध्वनि क्रूरमुद्रा, उग्रतुल्य- । जिव्हा नासिकाग्र वक्र ज्यांचें ॥७॥
वासुदेव म्हणे दूरगामी वीर । करिती निकर शत्रूसवें ॥ ८ ॥

४४५

मार्जारदेही तैं कुबडे विरलकेश । मृदु त्वचा ज्यास चलाख ते ॥
घोरपडीसम नेत्रीं ज्यां झांपड । स्वभावें सदय वीर जाण ॥ २ ॥
ध्वनि, गति ज्यांची राया, अश्वासम । करिती ते जाण कार्यसिद्धि ॥
सुदृढ जयांचा देह कसलेला । स्फुरण त्यांजला रणवाद्यांनीं ॥ ४ ॥
नेत्र ज्यांचे खोल अथवा उथळ । भ्रुकुटीही वक्र नकुलाक्ष जे ॥५॥
शूर ते संग्रामीं देहाची आसक्ति । त्यागूनि लढती महाशौर्यें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मांसहीन दृढ । रणांत आवेश धरिती मोठा ॥ ७ ॥

४४६

विभिन्न जयांचे केशाग्र तेजस्वी । स्थूल हनुवटी पार्श्वभाग ॥ १ ॥
पिंडिका त्या स्थूल विक्राळ वदन । करिती उड्डाण गरुडापरी ॥ २ ॥
सुग्रीव वर्तुलाकार तें मस्तक । विशाल कीं मुख मार्जाराचें ॥ ३ ॥
उग्रस्वर ऐसे जन ते कोपिष्ट । जन भिल्लादिक महाशूर ॥ ४ ॥
धर्म शिष्टाचार त्यागूनि जे रणीं । लढती त्यांलागूनि सन्मानावें ॥५॥
वासुदेव म्हणे नृपाळावरीही । कोपताती पाहीं ऐसे जन ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १०१ वा अध्याय समाप्त

अध्याय १०२ रा

४४७

धर्म म्हणे ताता, विजयलाभाचीं । लक्षणें मजसी निवेदावीं ॥ १ ॥
धर्माप्रति भीष्म कथिती दैवाचा- । कोप वा काळाचा प्रवाह तो ॥
जाणूनियां ज्ञाते योजिती उपाय । नृपानें आश्रय तयां द्यावा ॥ ३ ॥

१ पोटऱ्या

योद्धे वाहनांसी उत्साह ज्या ठाईं । निश्चयेंचि पाहीं विजय तेथें ॥
अनुकूल वायु इंद्रधनुष्येंही । मागोमाग जाती जरी मेघ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सूर्यकिरणेंही । अनुकूल तरी विजयलाभ ॥ ६ ॥

४४८

सुप्रसन्न अग्निकिरण ते ऊर्ध्व । ज्वाला दक्षिणेस धूम्रहीन ॥ १ ॥
आहुतींचा जरी मंगल सुगंध । विजयाचीं स्पष्ट लक्षणें तीं ॥ २ ॥
शंख, दुदुभींचा जेथ येई नाद । वीर युद्धोत्सुक विजय तेथें ॥ ३ ॥
वामपृष्ठभागीं सैन्याच्या हरिणें । अनुकूल जाणें धर्मराजा ॥ ४ ॥
हंस क्रौंचादींचा सुमंगल शब्द । उत्साह तें स्पष्ट विजयचिन्ह ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे परस्पर मित्र । शुचि शुश्रूषक विजयी होती ॥ ६ ॥

४४९

शब्दस्पर्शगंध उत्साहकारक । वीर धैर्ययुक्त विजयी होती ॥ १ ॥
प्रवेशूनि काक सव्यभागीं ज्याच्या । प्रवेश इच्छितां वामभागीं ॥
लाभप्रद होई विजयेच्छूप्रति । सिद्धि पृष्ठभागीं असतां काक ॥३॥
वासुदेव म्हणे अग्रभागीं काक । कार्याचा निषेध सुचवी वीरा ॥४॥

४५०

प्रचंडही सेना संरक्षूनि धर्मा । प्रवर्तावें रणा टळतां साम ॥ १ ॥
संग्रामविजय जाणावा निकृष्ट । लाभे साहजिक अथवा दैवें ॥ २ ॥
मृगसमूह कीं ओघ उदकाचा । भग्न सैन्या, तैसा वेग बहु ॥ ३ ॥
एकाही मृगानें करितां पलायन । जेंवी त्या मागून पळती सर्व ॥४॥
तैसी निष्कारण सेना पावे भय । विजयनिश्चय नसे तेणें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सुलक्षणी वीर । अल्पही अपूर्व विजय घेती ॥ ६ ॥

४५१

अन्य उपायचि नसेल बा, जरी । प्रवर्तावें तरी संग्रामासी ॥ १ ॥
साम, भेद, दान विफल हे होतां । अंत्यचि युद्धाचा मार्ग असे ॥२॥
संग्रामें शूरही पावताती कंप । युद्ध सकळांस त्रस्त करी ॥ ३ ॥
क्रौर्य संमिश्रित उपाय सामाचा । आचरावा साचा वारंवार ॥ ४ ॥
पीड्यमान शत्रु प्रवर्ते सामासी । भेदार्थ हेरांसी संयोजावें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शत्रूहूनि श्रेष्ठ । नृपासवें इष्ट करणें साम ॥ ६ ॥

४५२

दुर्जनातें क्षमा दावूं नये कदा । क्षमा अक्षमेचा परिसें मार्ग ॥ १ ॥
संत्रस्त करूनि होतां तो जर्जर । क्षमितां साचार योग्य होई ॥ २ ॥
परितापावीण वांकवितां काष्ठ । घेई पूर्वरूप तत्काळचि ॥ ३ ॥
धर्मा, शंबराचें मत हें न ज्ञाते । स्वीकारिती, रुचे क्षमाचि त्यां ॥४॥
दुर्वर्तनी पुत्रांसम क्रोधनाश । टाळूनि वैऱ्यास निग्रहावें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मृदुत्वें अवमान । उग्रपणें जन करिती द्वेष ॥ ६ ॥

४५३

प्रियचि बोलावें करितां प्रहार । आघातेंही थोर वदती मृदु ॥ १ ॥
दावावी पुढती करुणाही दुष्टा । रूदनही श्रेष्ठा समयीं योग्य ॥ २ ॥
हाय हाय काय करावें सैनिक । ऐकती न वच समरीं कांहीं ॥ ३ ॥
ऐशा शूराप्रति वधिलें जयांनीं । अनिष्ट तयांनीं केलें मम ॥ ४ ॥
उद्गार यापरी काढावे बाहेरी । सन्मान्याचा परी करणें मान ॥ ५ ॥
तात्पर्य सामाची भूमिका सर्वदा । लोकप्रियतेचा अचुक मार्ग ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐशामार्गें नृप । साधी परहित सामानेंचि ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १०२ रा अध्याय समाप्त

अध्याय १०३ रा

४५४

प्रबलपक्ष जो मृदु तीव्र राजा । व्यवहार कैसा करणें त्यासी ॥ १ ॥
कथावें तें ताता, ऐसें पुशी धर्म । प्रत्युत्तर भीष्म तया देती ॥ २ ॥
बृहस्पतिप्रति इंद्र हाचि प्रश्न । करितां बुद्धिमान वदला गुरु ॥ ३ ॥
इंद्रा, कलहानें इच्छूं नये जय । अक्षमा अमर्ष बालसेव्य ॥ ४ ॥
वधेच्छा कदापि करूं नये व्यक्त । क्रोध भीति मोद आंवरावे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे राहूनि सावध । दावावा विश्वास वैरियातें ॥ ६ ॥

४५५

गोड बोलावें शत्रूसी । अप्रिय न व्हावें त्यासी ॥ १ ॥
शुष्क कलह वर्जावा । कंठशोषही न व्हावा ॥ २ ॥
पक्ष्यासम करूनि शब्द । तयां गुंतवी लुब्धक ॥ ३ ॥
तेंवी स्ववश करूनि । तयां वधावें चिंतूनि ॥ ४ ॥

निद्रा घेऊं नये स्वस्थ । सदा असावें जागृत ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अग्नि । सान न म्हणावाचि कोणी ॥ ६ ॥

४५६

अनिश्चित यदा वाटेल विजय । लाभद न होय युद्ध तदा ॥ १ ॥
मंत्रवेत्त्यांचेंचि कार्य तयावेळीं । साम दानें व्हावी युक्ति तदा ॥ २ ॥
उपेक्षा अवज्ञा भासवावी जनां । समयीं योजना करणें योग्य ॥ ३ ॥
हेरद्वारा व्हावा सैन्यामाजी भेद । द्वेष असो गुप्त अंतरींचि ॥ ४ ॥
आदि अंत मध्य जाणूनि कार्याचा । भेद, औषधींचा वरणें मार्ग ॥
वासुदेव म्हणे कौशल्यें सामेंचि । वधावें शत्रूसी समय येतां ॥ ६ ॥

४५७

वारंवार इष्ट संधि ते लाभेना । वायां इष्ट क्षणा दवडूं नये ॥ १ ॥
अवेळींच शत्रु चालूनियां येतां । साधावें मित्रत्वा कौशल्यानें ॥ २ ॥
कामक्रोधादींच्या स्वाधीन न होतां । शत्रूच्या छिद्रांचा शोध घ्यावा
मृदुत्व तैं दंड आलस्य अदाक्ष्य । मायावी तो मूढ परम क्षीण ॥४॥
त्यागितां या गोष्टी आक्रमकशक्ति । लाभे शूराप्रति सहजपणें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे गुप्तकार्य लोकीं । करावें एकाकी राहूनियां ॥ ६ ॥

४५८

एकाकी न जरी साधे गुप्त कार्य । अन्याचा विचार घ्यावा तरी ॥१॥
सन्निध जरी न असतील वैरी । अभिचार तरी योग्य मार्ग ॥ २ ॥
प्रत्यक्ष सान्निध्य असतां चतुरंग । सैन्य हाचि मार्ग एक तया ॥ ३ ॥
भेद विनयही प्रसंगीं योजावे । संबंध राखावे खानपानें ॥ ४ ॥
विश्वास तयाचा संपादावा यत्नें । विश्वास ठेवणें योग्य नसे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अवमानित जे । दक्ष या कर्मातें असती सदा ॥ ६ ॥

४५९

विविध ज्या वृत्त ऐशा नृपाळाचें । ऐश्वर्यही असे अस्थिरचि ॥१॥
मित्रामित्र बोध घेऊनि सर्वदा । दक्ष जो तयाचा हेतु साधे ॥ २ ॥
फुटतां धरण जेंवी जलनाश । अनवधानें राज्य नष्ट तेंवी ॥ ३ ॥
बहु वैरीयांसी कदा न एकाकी । लढावें, सामादि योग्य तेथें ॥ ४ ॥

हळु हळु एकएका झोडपूनि । दक्ष व्हावें जनीं अवशिष्टांसी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे समर्थेंही कदा । वैरी अनेकांचा होऊं नये ॥ ६ ॥

४६०

अश्व, गज, रथ, विपुल पदाति । कोश वाणिज्य हीं अंगें सहा ॥१॥
शत्रूहूनि यदा उत्कर्ष आपुला । आव्हान त्या काळा अरिसी द्यावें ॥
स्वयेंचि सर्वदा वैर न करावें । मायायुद्ध व्हावें सर्वकाल ॥ ३ ॥
गुप्तचि राखावें कपट आपुलें । फितुर करावें अधिकाऱ्यांसी ॥ ४ ॥
पुरा बहुतांसी जिंकिलें नृपांनीं । कलह दावूनि वरिवरि ॥ ५ ॥
चातुर्यानें तयां अन्यत्र सेवेसी । ठेवूनि कार्यासी करणें सिद्ध ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भाष्य-कथाभिज्ञ । योजूनियां प्राण घ्यावा मंत्रें ॥ ७ ॥

४६१

इंद्र म्हणे गुरो, लक्षणें दुष्टाचीं । निवेदावीं साचीं मजसी आतां ॥
निवेदिती गुरु परोक्षदुर्गण- । निवेदी, तो जाण दुष्टवृत्ति ॥ २ ॥
सद्गुणांचा नित्य करितो मत्सर । स्तब्धचि इतर स्तवितां होई
दीर्घश्वास तेंवी ओष्ठांचा संदंश । अथवा ग्रीवाभंग लक्षणें हीं ॥४॥
दावूनियां मैत्री परासम वागे । स्वीकारी कार्यातें परि न करी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भेटतां वदेना । कार्यही करीना दुष्टचि तो ॥ ६ ॥

४६२

पंक्तिभोजन तो करीनाचि टाळी । योग्य न याचेळीं पुशितां म्हणे
आसन, शयन, भाषणादि सर्व । क्रिया, दुष्टभाव दाविताती ॥ २ ॥
दुःखें दुःखी, हर्षे हर्षित तो मित्र । वर्ते जो विपरीत दुष्टचि तो ॥३॥
लक्षणें हीं ऐसीं जाणावीं दुष्टाचीं । गुप्त न राहती राखितांही ॥ ४ ॥
बृहस्पति ऐसें निवेदी इंद्रातें । धर्माप्रति भीष्में कथिलें तेंचि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दुष्टां ओळखूनि । वर्तेल तो जनीं सौख्य पावे ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १०३ रा अध्याय समाप्त

अध्याय १०४ था

४६३

कोश दंडहीन अमात्यपीडित । नृपानें सुखार्थ करणें काय ॥ १ ॥
पुशितां धर्मानें क्षेमदर्शीवृत्त । कथी गंगासुत काय ऐका ॥ २ ॥

कालकवृक्षीय मुनींसी नरेंद्र । म्हणे संकटांत मार्ग दावा ॥ ३ ॥
राज्यभ्रष्टा मज निंद्य कर्माहूनि । अन्यमार्ग जनीं निवेदावा ॥ ४ ॥
आधिव्याधिग्रस्ता धर्मज्ञ आधार । सौख्यद केवळ द्रव्य नसे ॥ ५ ॥
द्रव्यचि मानी जो साधन सौख्याचें । कींव येई मातें नराची त्या ॥ ·
स्वप्नासम माझी विपुल संपत्ति । वासुदेव कथी पुढती ऐका ॥ ७ ॥

४६४

विपुल द्रव्याचा त्याग तो दुर्घट । नसतांही तें त्याग न घडे आम्हां
यास्तवचि झालों दीन मी कृपाळा । अन्य सौख्य दावा अर्थाविण
कोसलाधिपातें कालकवृक्षीय । निवेदिती काय परिसा तेंचि ॥ ३ ॥
राजा, हें पूर्वींचि चिंतिताती ज्ञानी । अहं मम जनीं अशाश्वत ॥४॥
आहे ऐसें तुज भासे तें न कांहीं । चिंतनें या पाहीं क्लेशनाश ॥५॥
भूत भविष्यहि घडेचि न कांहीं । अधर्म न होई कळतां ऐसें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐशा तत्वज्ञानें । नित्यानंद वाणे अंतरांत ॥ ७ ॥

४६५

गतकालीन त्या नृपवैभवेंसी । संबंध कांहींचि नसे मम ॥ १ ॥
नसे तें लाभेल असतांही जाईल । व्यर्थचि होईल सकल शोक ॥२॥
पिता, पितामह कोठें तव अद्य । अशाश्वतास्तव व्यर्थ शोक ॥ ३ ॥
अस्तित्व जगाचें अशाश्वत राया । वृद्ध आणि युवा न बघे काळ ॥
विपुलत्वें धनत्याग न घडतां । सोडावी ममता धनाची त्या ॥ ५ ॥
विनष्ट जें किंवा पुढती लाभेल । धन तें सकल नव्हे माझें ॥ ६ ॥
चिंतूनि अलिप्त असती ते ज्ञाते । जाण सौजन्याचें माहेर त्यां ॥७॥
वासुदेव म्हणे बुद्धि पौरुषही । जया त्या न कांहीं न्यून जगीं ॥ ८ ॥

४६६

राव म्हणे मुने, कालगतीनेंचि । राज्य हें मजसी प्राप्त झालें ॥ १ ॥
कालप्रवाहेंचि जाहलें हें नष्ट । तेणेंचि हा शोक, जाणतों मी ॥ २ ॥
मुनि म्हणे राया, ऐसी द्रव्यस्थिति । जाणूनि कदापि न करीं शोक
प्राप्तचि इच्छावें इच्छूं नये अन्य । भोग वर्तमान वस्तूचाचि ॥ ४ ॥
शोक अप्राप्ताचा करूं नये कदा । यदृच्छेंत सदा तुष्ट व्हावें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रयत्नेंचि फल । परी साह्य काल आवश्यक ॥ ६ ॥

४६७

शुद्धांतःकरणा, संपत्तिशून्यत्वें । शोक लव तूतें होऊं नये ॥ १ ॥
दुर्बुद्ध तो नर संपत्तिविनाशें । दोष विधात्यातें लावीतसे ॥ २ ॥
द्रव्यलाभेंही न तयासी संतोष । श्रीमंतांचा लाभ न सहे तया ॥३॥
यास्तवचि तया वारंवार दुःख । अहंमन्य तेच ईर्षायुक्त ॥ ४ ॥
राया, तूं मत्सरी नाहींसि कीं सांगें । ऐश्वर्य पराचें सहन करीं ॥५॥
पराचेंही भाग्य भोगिती कुशल । रुचे निर्मत्सर लक्ष्मीप्रति ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्ञाते जे धार्मिक । सकलही सौख्य त्यजिती स्वयें ॥

४६८

दुर्लभत्व अस्थिरत्वही लक्ष्मीचें । पाहूनि तियेतें त्यजिती अन्य ॥१॥
परी अभिलाषा धरूनि तियेची । व्यर्थांचि करिसी शोक कां तूं ॥२॥
अनिर्वचनीय ज्ञानइच्छा जरी । धरिसी अंतरीं नृपश्रेष्ठा ॥ ३ ॥
अनर्थकारक तरी अर्थइच्छा । त्यागूनि सुखाचा पंथ वरीं ॥ ४ ॥
अर्थेच्छेनें द्रव्य नाशिताती कोणी । द्रव्यचि या जनीं मूढां सौख्य ॥
वासुदेव म्हणे आलस्यें विनाश- । पावतां वैराग्य कोणा येई ॥ ६ ॥

४६९

कुलीन ते पारलौकिक सुखार्थ । त्यागिती ऐहिक सौख्यइच्छा ॥
धनलोभी कोणी धनास्तव प्राण । लेखिताती जाण तुच्छ मूढ ॥ २॥
दन्य अज्ञान तें अवलोकीं त्यांचें । द्रव्यचि तयांतें श्रेष्ठ वाटे ॥३॥
संचय विनाशें, जीवित मरणें । योग वियोगानें पूर्ण होती ॥ ४ ॥
जाणूनि हें सुज्ञ शोक न करिती । होतांही संपत्ति नष्टप्राय ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे द्रव्य पुरुषासी । पुरुष द्रव्यासी नियमें त्यागी ॥ ६ ॥

४७०

इष्टमित्र आप्त होती द्रव्यहीन । आपणासमान ध्यानीं असो ॥ १ ॥
बुद्धिकल्पित हे जाणावी विपत्ति । निग्रहें हा चित्तीं बोध ठसे ॥ २ ॥
असंयत वाणी इंद्रियें तैं मन । यांचें निवारण अशक्यचि ॥ ३ ॥
संयत तीं होती स्वयेंचि निवृत्त । विषयसंसर्ग जाहल्याही ॥ ४ ॥
ज्ञानतृप्त संयमी जो तुझ्यासम । कदा शोकमग्न होत नसे ॥ ५ ॥

जया अल्प इच्छा तेंवी अचापल्य । मृदु आणि दान्त सुनिश्चयी ॥
संरक्षिलें जेणें राया, ब्रह्मचर्य । कथी वासुदेव शोक न त्या ॥७॥

४७१

अविवेकोत्पन्ना वृत्ति ते कापाली । योग्य न कदाही तुजसी राया ॥
दुष्ट पाप्यांसी जे शोभे क्रूरवृत्ति । शोभे न तुजसी नृपश्रेष्ठा ॥ २ ॥
फलमूलाश्रित होईं या वनांत । पाहीं हलदंत हस्ती हर्षें ॥ ३ ॥
आत्मनिग्रहानें दयाभाव धरीं । अक्षोभ अंतरीं तेणें लाभे ॥ ४ ॥
क्षुब्ध महाऱ्हद स्वयेंचि जो शांत । तेंवी आत्मक्रीड सौख्य पावे ॥
संकटीं या अन्य मार्ग न सौख्याचा । दैवप्रतिकूलता जया नृपा ॥
वासुदेव म्हणे नश्वर जें सौख्य । तेंचि मानवास प्रिय वाटे ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १०४ था अध्याय समाप्त

अध्याय १०५ वा

४७२

पौरुषसंपन्न मानिसी तूं जरी । म्हणती मुनि तरी परिसें राया ॥१॥
राज्यप्राप्तीस्तव कथितों उपाय । ऐकूनियां कार्य साधीं निज ॥ २ ॥
राव म्हणे मुने, निर्वेदावा मार्ग । संपादीन राज्य त्वत्कृपेनें ॥ ३ ॥
मुनि म्हणे राया, दंभ, काम, क्रोध । भीति आणि हर्ष जिंकूनियां ॥
प्रणामपूर्वक सेवीं शत्रूप्रति । प्राप्त आदरासी होईं तेथें ॥ ५ ॥
पुढती सन्मित्र संपादूनि यत्नें । साधीं कौशल्यानें भेदमार्ग ॥ ६ ॥
बिल्वभेद जेंवी साधे बिल्वानेंचि । वधीं तैं शत्रूसी शत्रुद्वारा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे संधि अन्यासवें । करूनि साधावें म्हणती कार्य ॥८॥

४७३

दुर्लभ-मोहक, वस्तु, चारु स्त्रिया । वस्त्रें आणि शय्या मूल्यवान ॥
गृहें वाहनें तैं विविध वस्तूंत । रमवावें चित्त अरिचें यत्नें ॥ २ ॥
निषेध उपेक्षा करावी न परी । कदापि न वैरी प्रगट व्हावा ॥ ३ ॥
आनंदें वसावें वैऱ्यांच्या देशांत । मित्र श्वेतकाक करणें तेही ॥ ४ ॥
दुःसाध्य कार्यासी योजीं तयांप्रति । विरोधी जे त्यांसी विघ्नें आणीं॥
वासुदेव म्हणे उपभोगव्यसनें । वैरीयाचीं धनें नष्ट व्हावीं ॥ ६ ॥

१ नांगराच्या दांडीप्रमाणें दांत असलेला.

४७४

याज्ञिकांचीं कामें कथीं तयाप्रति । वृकासम त्यासी भक्षितील ॥ १॥
उपकार तव मानितील मोदें । धर्मानेंही होते कोशहानि ॥ २ ॥
धर्में अधर्में वा कोशनाश होतां । अंकित वैन्याच्या होई नर ॥ ३ ॥
विजय वा स्वर्गमूळ एककोश । करावें शत्रूस कोशहीन ॥ ४ ॥
आनंदाचें मूळ कोशचि गणावा । शत्रूसी कथावा दैवीमार्ग ॥ ५ ॥
कारण केवळ दैवी उपायांनीं । निश्चयें या जनीं नाश होई ॥ ६ ॥
विश्वजित् यज्ञानें करीं सर्वनाश । सज्जनांचे क्लेश पुढती कथीं ॥७॥
वासुदेव म्हणे परंपरा ऐसी । शत्रुविनाशाची कथिती मुनि ॥ ८ ॥

४७५

क्लेशविनाशार्थ धर्मज्ञसंगति । निवेदीं पुढती वैन्याप्रति ॥ १ ॥
थोर थोर दानें महाक्लेश जाती । कथूनि कोशाची हानी करीं ॥ २ ॥
शत्रुविनाशक औषधी योजूनि । संग्रामावांचूनि सेना वधीं ॥ ३ ॥
अन्यही उपाय कथियेले शास्त्रीं । संयमी नरासी शक्य होती ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसे बहुमार्ग । संकटग्रस्तास निवेदिले ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १०५ वा अध्याय समाप्त

अध्याय १०६ वा

४७६

क्षेमदर्शी म्हणे कालकवृक्षीया । मार्ग न कथावा ऐसा मज ॥ १ ॥
अधर्मोपार्जित विपुलहि द्रव्य । वाटतें निषिद्ध मजलागीं ॥ २ ॥
स्वधर्मेंचि मज इच्छा जीविताची । वाट कपटाची रुचेचि ना ॥३॥
ऐकूनि तें मुनि पावे मनीं तोष । ज्ञानें वा सहज योग्यता हे- ॥ ४ ॥
पाहूनि, आनंद पावला चित्तांत । शाश्वत सख्यास जोडूं म्हणे ॥
राज्यभ्रष्ट विपद्ग्रस्तही तूं राजा । मार्ग स्वधर्माचा अवलंबिसी ॥६॥
वासुदेव म्हणे मुनिविदेहासी । आज्ञापीन, ऐसी भाक देती ॥ ७ ॥

४७७

बोलूनियां ऐसें विदेहाधिपासी । पाचारूनि त्यासी वदती मुनि ॥१॥
राया, क्षेमदर्शी शूर आणि ज्ञाता । विशुद्ध चित्ताचा निश्चयेंसी ॥

१ दुष्ट.

यास्तव अमात्यपद देई त्यासी । जय विजयहि अस्थिर ते ॥ ३ ॥
जाणूनियां त्यजीं आक्रमणचिंता । लाभ एकमेकां द्यावा घ्यावा ॥४॥
प्रामुख्यानें भय जाण इंद्रियांचें । जिंकील जो त्यांतें विजयी तोचि ॥
वासुदेव म्हणे उभयकल्याण । इच्छिती सज्जन सर्वकाळ ॥ ६ ॥

४७८

ऐकूनि विदेह वंदूनि मुनींसी । बोले अनुमति घेऊनियां ॥ १ ॥
म्हणे उभयांचें इच्छितां कल्याण । श्रेयाचें वचन मान्य मज ॥ २ ॥
बोलूनि यापरी क्षेमदर्शीप्रति । धर्में सकलांसी जिंकिलें मी ॥ ३ ॥
परी सद्गुणांनीं जिंकिलें तूं मज । सन्मानें वास्तव्य करीं येथें ॥
मंदिरांत माझ्या राहीं आनंदानें । परस्पर प्रेमें हर्ष दोघां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सज्जनाची वाणी । शांतता या जनीं स्थापी ऐसी ॥

४७९

वंदूनि मुनींसी गेले उभयहि । मुनिवचें होई सख्य त्यांचें ॥ १ ॥
क्षेमदर्शीप्रति कन्या विदेहानें । अर्पिली प्रेमानें अत्यादरें ॥ २ ॥
बहुविध रत्नें पात्रें समर्पूनि । रमला स्वधर्मी नृपश्रेष्ठ ॥ ३ ॥
येतील जातील जय-पराजय । सद्गुण ते नित्य परी श्रेष्ठ ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सद्गुणांचें मोल । नित्य जो जाणील तोचि श्रेष्ठ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १०६ वा अध्याय समाप्त

अध्याय १०७ वा

४८०

धर्म म्हणे ताता, वीरांचें वर्तन । करा निवेदन मजसी आतां ॥ १ ॥
उत्कर्ष तयांचा होई कैशारीति । भेद वीरांमाजी कैसा घडे ॥ २ ॥
विजय इच्छिती वीर कैशारीति । कैंवी मित्रप्राप्ति तयां होई ॥ ३ ॥
परस्पर भेदें वीरांचा विनाश । अनेकांत मंत्र न टिके गुप्त ॥ ४ ॥
ऐक्य तयांमाजी संपादावें कैसें । निवेदावें मातें पितामहा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे श्रेष्ठ ऐसे प्रश्न । धर्माविण कोण अन्य करी ॥ ६ ॥

४८१

निवेदिती भीष्म वैराग्यप्रदीप्त । करिती लोभ क्रोध वीरांमाजी ॥ १ ॥
धरितां एकानें लोभ, क्रोध अन्या । पुढती मार्ग नाना विनाशाचे ॥

दानहीनांमाजी भेदाचा संभव । भेदें महाभय सकलांप्रति ॥ ३ ॥
भेदयुक्त वीरां पराभव नित्य । हितकारी ऐक्य वीरां होई ॥ ४ ॥
वैयक्तिक बल शौर्य संघशक्ति । येणें अर्थप्राप्ति होई जगीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे परस्परोत्कर्ष । तेंवी मित्रलाभ संघें घडे ॥ ६ ॥

४८२

संघनेते व्हावे स्थापक धर्माचे । नेतृत्व त्या मार्गें करितां हित ॥ १ ॥
पुत्र-मित्रांचाही करूनि निग्रह । जागृत विनय करितां त्यांचा ॥ २ ॥
विनयी जे त्यांचा होई अंगिकार । उत्कर्ष ते वीर पावताती ॥ ३ ॥
गुप्तहेर कोश तेंवी मंत्रबल । उत्कर्ष सकल लाभे तेणें ॥ ४ ॥
प्राज्ञ शूर महोत्साही स्थिरोद्योगी । ऐशां सन्मानिती भाग्य तयां ॥
द्रव्यवंत, शूर, शास्त्रपारंगत । संकटीं जनांस संरक्षिती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे क्रोध, भेद, भीति । कर्षण वधादि संघदोष ॥ ७ ॥

४८३

सर्वदा वीरांचें ऐक्यचि साधावें । अनर्थ टाळावे निग्रहानें ॥ १ ॥
कुलकलहांसी उपेक्षितां वृद्ध । होई कुलनाश ध्यानीं असो ॥ २ ॥
परस्परभेदें संघशक्तिनाश । जाणूनि ऐक्यास संरक्षावें ॥ ३ ॥
बाह्यभयाहूनि आंतर्भय घोर । समूळ उच्छेद तेणें घडे ॥ ४ ॥
जाति-कुलऐक्यें क्रोध, मोह, लोभ-। विकारें संबंध तुटतां भय ॥ ५ ॥
दानभेदें भेद पावताती वीर । ऐक्याचि आधार वीरां एक ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे लोभादि विकार । जिंकिती त्यां थोर भाग्य लाभे ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १०७ वा अध्याय समाप्त

अध्याय १०८ वा

४८४

युधिष्ठिर म्हणे धर्ममार्ग थोर । शाखाही अपार तयालागीं ॥ १ ॥
यास्तव कथावा सर्वश्रेष्ठ धर्म । जयानें कल्याण इहपर ॥ २ ॥
कथिताती भीष्म माता, पिता, गुरु । सन्मान हा थोरु धर्म बापा ॥
पूजितां तयांसी लाभे यश कीर्ति । धर्माधर्म तेचि कथितील तो ॥
धर्मही अधर्म अनुमतीवीण । तयांच्या हें जाण पुत्रवंता ॥ ५ ॥

आश्रमलोक तें अग्नित्रय तेचि। सेवा नित्य त्यांची करितां श्रेय॥६॥
वासुदेव म्हणे इह, पर, ब्रह्म-। प्राप्ति, तोषवून मातापित्यां ॥ ७ ॥

४८५

सेवितां या तिघां तिन्हीं लोकीं कीर्ति। नावमानी त्यांसी कदाकाळीं
तयांविण सौख्य भोगूं नये कांहीं । न निंदितां पाहीं सेवावें त्यां ॥
अनादर त्यांचा करी त्याचे यत्न। निष्फलचि जाण होती सर्व ॥३॥
इहपर लोक नष्ट होती त्याचे। कल्याण न त्याचें कदाकाळीं॥ ४ ॥
धर्म कर्म सर्व तयांस्तव केलीं। तयांसी अर्पिलीं अत्यानंदें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कथितातो भीष्म। त्रैलोक्याचें ज्ञान तेणें मज ॥ ६ ॥

४८६

धर्मा, आचार्य तो श्रेष्ठ श्रोत्रियासी। दशगुण ऐसी शास्त्रवाणी ॥
आचार्याहूनिही उपाध्याय जाण। श्रेष्ठ दशगुण युधिष्ठिरा ॥ २ ॥
तयाहूनि श्रेष्ठ दशगुण पिता। मातेची श्रेष्ठता काय वर्णू ॥ ३ ॥
पित्याहूनि श्रेष्ठ दशगुण माता। अथवा पृथ्वीच्या दशगुण ॥ ४ ॥
मातेसम गुरु अन्य न जगतीं। वंदितो मातेसी वासुदेव ॥ ५ ॥

४८७

धर्मा, माता, पित्याहूनि। श्रेष्ठ असे गुरु जनीं ॥ १ ॥
अर्पितातो माता पिता। श्रेष्ठ देह मानवाचा ॥ २ ॥
गुरु अजर अमर। करी ब्रह्मचि साचार ॥ ३ ॥
मातापिता अपराधीही। अवध्यचि राजातेंही ॥ ४ ॥
वेदरहस्य कथूनि। करी कृतार्थ जो जनीं ॥ ५ ॥
जाणें तोचि माता-पिता। तेथ व्हावी कृतज्ञता ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे द्रोह। गुरूचा तें पाप घोर ॥ ७ ॥

४८८

काया वाचा मनें सन्निध राहून। गुरूचा सन्मान करिती न जे ॥१॥
भ्रूणहत्येहूनि तया घोर पाप। नसेचि जगांत तैसा पापी ॥ २ ॥
शिष्यासी निःशंक करावें गुरूनें। तैसेंचि शिष्यानें पूजावें त्या ॥३॥
तात्पर्य धर्माची इच्छा जयाप्रति। तेणें या त्रयासी सन्मानावें ॥४॥

सर्व सुखामाजी विभाग तयांचा । जाणील तो साचा भाग्यवंत॥५॥
वासुदेव म्हणे ऐसें गुरुत्रय । सेवील वैभव तया लाभे ॥ ६ ॥

४८९

पित्याच्या संतोषें प्रजापति तुष्ट । अवनी संतुष्ट मातृतोषें ॥ १ ॥
सद्‌गुरुसंतोष पावेल ज्या योगें । अर्चितो त्यामार्गें ब्रह्मचि तो ॥ २ ॥
गुरुपूजनानें देव पितरादि । संतोष पावती सर्वकाळ ॥ ३ ॥
कोण्याही कृतीनें गुरूची अवज्ञा । करूं नये जाणा कदाकाळीं ॥ ४ ॥
माता-पित्याहूनि गुरु श्रेष्ठ जनीं । सन्मानार्ह जनीं त्रय सदा ॥ ५ ॥
मित्र द्रोही तेंवी कृतघ्न स्त्रीवध । नसे प्रायश्चित गुरुद्रोह्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सर्वश्रेष्ठ धर्म । निवेदिती भीष्म ऐसा धर्मा ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १०८ वा अध्याय समाप्त

अध्याय १०९ वा

४९०

पुशी भीष्मांप्रति धर्म । सत्य असत्याचें मर्म ॥ १ ॥
साह्य धर्मासी सत्याचें । अथवा सांगा असत्याचें ॥ २ ॥
भीष्म कथिती सत्यचि । श्रेष्ठ जाणावें या जगीं ॥ ३ ॥
परी दुर्ज्ञात जें जनीं । धर्मा, कथितों घे ध्यानीं ॥ ४ ॥
कदा सत्य तें असत्य । असत्यही होई सत्य ॥ ५ ॥
सत्यासत्याचा निर्णय । न जाणे तो ज्ञाता काय ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्ञाता । जाणेल जो सत्यासत्या ॥ ७ ॥

४९१

अकार्य दारुण अकृतप्रज्ञही । संपादितो पाहीं पुण्य कदा ॥ १ ॥
अंध-बलाकांचें वृत्त घ्यावें ध्यानीं । उलूकही तेंवी गंगातीरीं ॥ २ ॥
क्रिया परिणाम हेतूचे चिंतूनि । पापपुण्य जनीं मानिताती ॥ ३ ॥
निर्णय तयांचा कठिणाचि असे । कार्य सद्धर्माचें भूतोत्कर्ष ॥ ४ ॥
यास्तव उत्कर्ष करी तोचि धर्म । प्रजेचें धारण धर्म करी ॥ ५ ॥
परस्पर पीडा न घडावी कोणा । यास्तवचि धर्मा, निवेदिलें ॥ ६ ॥
यास्तवाचि पीडाविहीन तो धर्म । जाणावें हें मर्म धर्माधर्मीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धर्माचें हें कार्य । निवेदिती आर्य ऐशारीति ॥ ८ ॥

४९२

श्रुति तोचि धर्म म्हणताती कोणी । मान्य तें न कोणी करिती परी
वेदवाक्यें सर्व नव्हती ते विधि । मान्यचि या अर्थी निषेध हा ॥२॥
सत्य तोचि धर्म परी तस्करासी । वदतां धर्मचि असत्यहि ॥ ३ ॥
मिथ्या शपथही घेऊनि त्यावेळीं । संपदा आपुली संरक्षावी ॥ ४ ॥
शक्यता तोंवरी दुष्टासी न धन । द्यावें पीडा जाण ज्ञात्यासी ते ॥५॥
वासुदेव म्हणे परमहितदृष्टि । ठेऊनि धर्माची सिद्धि होई ॥ ६ ॥

४९३

तस्करें लुटितां सामायिक धन । दोषी ठरवून एकासीचि- ॥ १ ॥
साक्षीदार जरी पीडितील कोणा । सत्यही तें जाणा असत्यचि ॥२॥
प्राणसंकटीं वा विवाहसमयीं । असत्यही होई सत्यरूप ॥ ३ ॥
धर्मार्थरक्षण करितां पराचें । वर्तन दुष्ट तें सत्य होई ॥ ४ ॥
वाचादत्त स्वार्थसाधूप्रती कोणी । द्रव्यार्थ लुटूनि नेतां योग्य ॥ ५ ॥
धर्मभ्रष्ट अधर्मोपजीवि दुष्ट । नृपाळा, तो वध्य समजे जनीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अन्यायेंही अर्थ । संपादी तयास वधणें योग्य ॥ ७ ॥

४९४

अर्थसंपादन हाचि हेतु एक । ऐसे दुष्ट नीच निग्रहावे ॥ १ ॥
इहपरनाशें प्रेतचि ते होती । संसर्ग ऐशांसी न घडो कदा ॥ २ ॥
प्राणनाश तयां वाटे धननाश । न रुचे तयांस श्रेष्ठ बोध ॥ ३ ॥
करिती ते जें जें मानिती तो धर्म । वधितां तयां न पाप कोणा ॥४॥
कर्मोचि ते नष्ट दोष न अन्यासी । काक गृध्र होती ऐसे दुष्ट ॥ ५ ॥
तात्पर्य जो जैसें वागेल तयासी । वागूनि तैसेंचि हित साधीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दुर्जनासी दुष्ट । सज्जनासी श्रेष्ठ होणें योग्य ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १०९ वा अध्याय समाप्त

अध्याय ११० वा

४९५

धर्म म्हणे तत्तत्प्रसंगीं मनुष्य । पावताती क्लेश सर्वत्रचि ॥ १ ॥
संकटाविमुक्त होतील ते कैवी । निवेदा ते पाहीं युक्ति मज ॥ २ ॥

संयमानें स्वस्वधर्माचें पालन । एकचि हा भीष्म म्हणती मार्ग ॥३॥
दंभहीन वृत्ति संयमी जयांची । कोणाही न देती प्रत्युत्तर ॥ ४ ॥
पीडितांही पीडा न देती कोणातें । असूनियां दाते याचिती न ॥५॥
वासुदेव म्हणे अतिथिपूजक । संकटविमुक्त ऐसे नर ॥ ६ ॥

४९६

अध्ययनशील मत्सरविहीन । देव जयां जाण मातापिता ॥ १ ॥
वर्ज्य दिवानिद्रा काया वाचा मनें । पापहीन, जाणें सुखी तयां ॥२॥
शासन न व्यर्थ करिती कोणासी । लोभें अर्थप्राप्ति इच्छिती न ॥३॥
धर्ममार्गें भार्यागमनींच रत । संरक्षिती राष्ट्र स्वधर्में जे ॥ ४ ॥
धर्मयुद्धास्तव जे देहीं उदार । प्राणान्तींही धीर सत्यनिष्ठ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे नित्यधर्मरत । संकटविमुक्त ऐसे नर ॥ ६ ॥

४९७

ब्रह्मचर्य विद्याव्रत तपश्चर्या । जयांसी ते आर्या दुःखमुक्त ॥ १ ॥
भय न जयांचें कोणा, जे निर्भय । होती आत्मतुल्य सकलांसी जे ॥
सौजन्यें उत्कर्षें कोणाच्या न पीडा । जयांप्रति कदा तेचि श्रेष्ठ ॥३॥
ग्राम्य गोष्टींतूनि सदा जे निवृत्त । श्रद्धायुक्त शांत श्रवणनिष्ठ ॥ ४ ॥
अमानी मानद, श्राद्धादि सत्कर्में । आचरिती धर्में क्रोधजेते ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मधु, मांस, मद्य । त्यागिती, संकट नसे तयां ॥ ६ ॥

४९८

यात्रार्थ भोजन व्यवाय पुत्रार्थ । वाणी ज्यां सत्यार्थ सौख्य तयां ॥
धर्मा, व्यापक हा कमलनयन । सामर्थ्यसंपन्न लीलाधारी ॥ २ ॥
आश्रय तयाचा करिती जे भक्त । संकटविमुक्त सर्वदा ते ॥ ३ ॥
उपाय हे ऐसे पठतां कथितां । प्रेमें विप्रादिकां विघ्ननाश ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे भीष्मांची हे वाणी । धरील जो ध्यानीं हित त्याचें ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ११० वा अध्याय समाप्त

अध्याय १११ वा

४९९

सौम्य ते असौम्य असौम्य ते सौम्य । भासताती ज्ञान कैसें व्हावें ॥
प्रश्नासी या भीष्म उत्तरार्थ व्याघ्र- । गोमायु संवाद निवेदिती ॥२॥

पुरिकापुरींचा नृपाळ पौरिक । पावला जंबुक योनिकर्मं ॥ ३ ॥
पूर्वस्मरणें तो निर्मांस निःसंग । यम-नियमांत दंग राही ॥ ४ ॥
स्मशान तयाची होती जन्मभूमी । वसे त्याचि स्थानीं आनंदें तो ॥
वासुदेव म्हणे शुचित्व तयाचें । अन्य जंबुकांतें असह्यचि ॥ ६ ॥

५००

गोमायु तयासी म्हणताती ऐसें । शुचित्व न शोभे जंबुकासी ॥ १ ॥
स्मशानीं हे कृति विरुद्ध भासते । अपूं तुजसी तें भक्षीं मांस ॥ २ ॥
शांत मधु शब्दें उत्तर तो देई । निर्णायक नाहीं जन्म माझें ॥ ३ ॥
कुलाचा निश्चय होई आचरणें । कीर्तिप्रद कर्मं इच्छितों मी ॥ ४ ॥
स्मशानीही मज कैंवी समाधान । निवेदितों ध्यान द्यावें आतां ॥५॥
वासुदेव म्हणे सत्कर्ममहति । गोमायू निवेदी परिसा आतां ॥ ६ ॥

५०१

स्वभावचि असे धर्मासी कारण । नव्हेचि आश्रम कारण त्या ॥ १ ॥
ब्रह्महत्या जरी करील आश्रमी । धेनुदान कोणी अनाश्रमी ॥ २ ॥
काय न तें पाप सत्कर्म वा सांगा । व्यर्थ निंद्यमार्गा स्तवितां तुम्हीं
असंतोषाप्रति कारण हे वृत्ति । रुचे न मजसी बांधव हो ॥ ४ ॥
ऐकूनि तें एक म्हणे शूर व्याघ्र । ज्ञात्या, हो अमात्य तूंचि माझा ॥
यथेच्छ विहार करीं मजसंगें । क्रौर्य न आमुचें तुझ्यास्तव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गोमायू विनयें । उत्तर व्याघ्रातें देई ऐका ॥ ७ ॥

५०२

मृगराजा, योग्य अपेक्षा हे तव । शोधिसी अमात्य शुचिर्भूत ॥ १ ॥
अमात्यावांचूनि नृपाचें महत्व । अन्यासी न शक्य संरक्षणें ॥ २ ॥
दुष्ट अमात्यही नृपासी न योग्य । नीतिवेत्ते चांग सहिष्णु जे ॥ ३ ॥
परस्पर आप्त संबंध न ज्यांचा । विजयाची इच्छा सर्वदा ज्यां ॥४॥
निर्लोभी जे दक्ष हितेच्छु विवेकी । ज्ञानी अमात्यांसी सन्मानावें ॥
वासुदेव म्हणे गोमायु व्याघ्रासी । म्हणे न मजसी इच्छा कांहीं ॥

५०३

संतोषचि एक आवडे मजसी । अन्य अमात्यांसी वैर नको ॥ १ ॥
आश्रयभूत मी तया तेजस्व्यांसी । रुचेल हे कैसी स्थिति तयां ॥

कृतात्मा सुदैवी पाप्याही न क्रूर । तेंवी दानशूर उत्साही मी ॥ ३ ॥
दूरदर्शी, कृती, अमोघ क्रियेचा । अल्प संतोषाचा न वरीं मार्ग ॥
सेवा न अद्यापि घडली कोणाची । वर्ततों स्वच्छंदी अरण्यांत ॥ ५ ॥
वनवासी सदा निर्भय निरिच्छ । यदृच्छासंतुष्ट शांतिप्रिय ॥ ६ ॥
राजपीडादोषें रुग्ण जे मरती । संख्या दंडाहांची तितुकी नसे॥ ७ ॥
यास्तव नृपाळा, अमात्य मी व्हावें । इच्छिसी ठरावें तरी सर्व ॥
वासुदेव म्हणे बोलूनि जंबूक । करीतसे स्पष्ट निजहेतु ॥ ९ ॥

५०४

सन्मान तूं माझ्या जनांचा करावा । सद्बोध ऐकावा माझा नित्य ॥
वृत्ति जे कल्पीन तेचि व्हावी स्थिर । अन्यासवें मंत्र न करीन मी ॥
कारण परीक्षा घ्यावया ते मज । कथितील व्यर्थ कांहीं तरी ॥ ३ ॥
एकांतीं एकेका कथीन हिताचें । ज्ञातीस्तव मातें न पुशीं कांहीं ॥४॥
मजसवें होतां विचार न पीडा । इतर अमात्यां द्यावी न तूं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मानूनि तें व्याघ्र । नियोजी अमात्य गोमायूतें ॥ ६ ॥

५०५

पाहूनि तें मंत्री पूर्वनियोजित । होऊनियां क्रुद्ध करिती द्वेष ॥ १ ॥
मधुर भाषणें मोहूनि तयासी । इच्छिती स्वमार्गी साह्य व्हावा ॥२॥
अपहार आतां साध्य नच होई । करिती ते पाहीं यत्न बहु ॥ ३ ॥
गोमायूतें बहु आमिषें दाविती । मोह न तयासी परी होई ॥ ४ ॥
अंतीं कोणी त्याचा इच्छूनियां वध । आचरिला मार्ग एक दुष्ट ॥५॥
मृगराजार्थ जें मांस सिद्ध केलें । मंदिरीं तें नेलें गोमायूच्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे थोरांप्रति दोष । लाविताती नीच निंद्यमार्गें ॥ ७ ॥

५०६

गोमायू कपट जाणूनिही कांहीं । बोललाचि नाहीं सहेतुक ॥ १ ॥
पुढती क्षुधार्त जाहला जैं व्याघ्र । कळलें त्या वृत्त अपहाराचें ॥२॥
तस्कर कोण तो शोधा म्हणे व्याघ्र । गोमायूचें कार्य कथिती दुष्ट ॥
साधूनि ही संधि अमात्य ते स्वार्थी । नृपासी कथिती दांभिक हा ॥
विविध प्रकारें निंदिती तयासी । म्हणती महास्वार्थी व्रतें करी ॥५॥

प्रत्यक्ष प्रमाण मंदिरीं तयाच्या । दाविताती मांसा महादुष्ट ॥ ६ ॥
पाहूनि तें व्याघ्र म्हणे वधा यासी । अविवेकें ऐसी भ्रमते मति ॥७॥
वासुदेव म्हणे संशय ज्ञात्याचा । येतां मार्ग साचा भेट घ्यावी ॥८॥

५०७

ऐकूनि ते आज्ञा म्हणे राजमाता । बाळा निर्णय हा न दिसे योग्य ॥
मत्सर या जनीं होई ज्ञात्यांचाही । उत्कर्ष न होई सहन कोणा ॥२॥
स्पर्धाजन्य दोषें शुचिर्भूतांतेंही । लावितातीं पाहीं अशुचि दोष॥३॥
लोभी निस्पृहाचा, भ्याड ते शूराचा । मूर्ख पंडिताचा करिती द्वेष
दरिद्रि करिती धनिकाचा द्वेष । धार्मिकांचें वैर करिती पापी ॥ ५ ॥
सुरूपाचा द्वेष करिती कुरूप । बाळा, देई चित्त व्यवहारीं या ॥६॥
वासुदेव म्हणे माता कथी व्याघ्रा । कपटजीविका कितिएकांसी ॥

५०८

बाळा, पंडित वा मूर्खही जे दुष्ट । निर्मळाही दोष लावितातीं ॥ १ ॥
बृहस्पतीचेंही दावितील न्यून । गोमायुवर्तन ध्यानीं घेई ॥ २ ॥
देतांही न घेई ऐसा जो निस्पृह । चोरूनियां काय लाभ तया ॥ ३ ॥
असभ्यही सभ्य किंवा विपरीत । भासे तेंचि सत्य नसे जगीं॥ ४ ॥
आकाशासी तळ, दाहक खद्योत । भासतांही सत्य नसे जेंवी ॥५॥
यास्तव निर्णय परीक्षेवांचूनि । कोणाचे ऐकूनि देऊं नये ॥ ६ ॥
सत्ताधीशाप्रति अशक्य न वध । परी क्षमा श्लाघ्य कीर्तिकर ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सत्पात्र दुर्लभ । जाणूनि तत्त्याग न घडो व्यर्थ ॥ ८ ॥

५०९

हितचिंतकाच्या जीवितासी धोका । येऊं नये कदा ध्यानीं असो॥१॥
शुचिष्मंतातेंही शत्रु देती दोष । जाणे न तो नृप नाश पावे ॥ २ ॥
माता ऐसा बोध करी तोंचि कोणी । व्याघ्रासी येऊनि कथी सत्य ॥
ऐकूनि तें व्याघ्र गोमायूसी मुक्त । करी तया भेट प्रेमें देई ॥ ४ ॥
तदा गोमायूतें क्रोध बहु येई । स्वयेंचि तो होई मरणा सिद्ध ॥ ५ ॥
सद्गदकंठें तैं निवारी त्या व्याघ्र । गोमायू तयास वदला ऐका ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मान अवमानही । करूं नये पाहीं अविवेकानें ॥ ७ ॥

५१०

म्हणे गोमायू नृपासी । परीक्षूनियां मजसी ॥ १ ॥
नेमिलेंसी निजकार्या । तैसा ठरावही केला ॥ २ ॥
परी मोडून वचन । केलासी त्वां अपमान ॥ ३ ॥
परस्परांचा विश्वास । आतां नृपाळा अशक्य ॥ ४ ॥
शंकित तूं, मज भय । छिद्रान्वेषी हे मानव ॥ ५ ॥
असंतुष्ट प्रेमशून्य । स्थिति सर्वदा कठीण ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सदा । तोल राखी तोचि ज्ञाता ॥ ७ ॥

५११

प्रीतिभंग होतां सांधणें कठीण । भंगही कठीण जडतां प्रीति ॥ १ ॥
सांधतांही राजा, जाणें भग्नप्रीति । पूर्वीसम न ती प्रीतिरूप ॥ २ ॥
होई स्वार्थयुक्त प्रीति बहुतांची । स्वाभाविक प्रीति दुर्मीळचि ॥३॥
शतांमाजींही न एकहो समर्थ । अथवा निःशंक जन लाभे ॥ ४ ॥
उत्कर्षापकर्ष शुभ वा अशुभ । अकस्मात् प्रसंग न येवोत ॥ ५ ॥
ऐसें घडे तेथें अल्पत्व ज्ञानाचें । ध्यानीं घेई साचें नृपश्रेष्ठा ॥ ६ ।
कथूनियां ऐसें गोमायू वनांत । जाऊनि उपवास करी तेथें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसा स्वर्गीं गेला । अमर जाहला परम बोधें ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १११ वा अध्याय समाप्त

अध्याय ११२ वा

५१२

निवेदिती भीष्म धर्मा, उष्ट्रासम । नृपाचें वर्तन असूं नये ॥ १ ॥
पूर्वीं उष्ट्र एक ब्रह्मदेवाप्रति । शतयोजनें ती ग्रीवा मागे ॥ २ ॥
पाहूनियां तप विरंची तें देई । स्वस्थळासी जाई पुढती ब्रह्मा ॥ ३ ॥
पुढती आलस्यें उष्ट्र एका ठाईं । बैसूनियां राही मोहमग्न ॥ ४ ॥
एकदां आपुली पसरूनि ग्रीवा । चराया लागला उष्ट्र सौख्यें ॥ ५ ॥
इतुक्यांत वारा सुटतां गुहेंत । ठेऊनि मस्तक बसला स्थिर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तया गुहेमाजी । स्वारी जंबुकाची शिरली एक ॥ ७ ॥

५१३

कांतेसवें क्षुधाकुल तो जंबुक । उष्ट्रगीवामांस भक्षूं लागे ॥ १ ॥
उष्ट्राच्या तें येतां संकट ध्यानांत । आंवरूं ग्रीवेस ऐसें चिंती ॥ २ ।
परी जंबुकानें भक्षिलें तयासी । संरक्षणा संधि न देतांचि ॥ ३ ॥
ऐसा तो आलस्यें मृत होई उष्ट्र । उद्योग यास्तव करणें नित्य ॥ ४ ।
धर्मा, बुद्धि हेचि मूळ विजयाचें । निवेदिलें ऐसें मनूनेंही ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे बुद्धिबल श्रेष्ठ । जाणूनि वरिष्ठ करिती कार्ये ॥ ६ ॥

५१४

बुद्धिबळें श्रेष्ठ, बाहुबळें, मध्य । जाणावीं कनिष्ठ जंघाकर्मै ॥ १ ॥
सर्वस्वी आपणांवरी ज्याचा भार । अत्यंत अवर कर्म जाणा ॥ २ ॥
दक्ष जो संयमी स्थिर ज्याचें राज्य । बुद्धीचि आर्तास वांचवील ॥
गुह्यमंत्रश्रोता ज्ञात्याचें ज्या साह्य । विवेकें वैभव स्थिर त्याचें ॥
सहाय्ययुक्तचि रक्षील महीतें । निवेदिती ज्ञाते हेंचि धर्मा ॥५ ॥
वासुदेव म्हणे शास्त्रप्रत्ययानें । वागतां सुखानें यश लाभे ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ११२ वा अध्याय समाप्त

अध्याय ११३ वा

५१५

धर्म म्हणे ताता, प्रबल शत्रूसी । वागावें कैसें ती युक्ति कथीं ॥ १ ॥
भीष्म निवेदिती सागर नद्यांसी । प्रश्न करी तोचि कथितों ऐकें ॥२॥
सरितांनो, वृक्ष आणितां प्रचंड । कदाही न वेत दिसे परी ॥ ३ ॥
लेखितां त्या तुच्छ किंवा कांहीं अन्य । असे त्या कारण कथा मज ॥
गंगा म्हणे सिंधो, तांठ्यानें हे वृक्ष । कदा स्थानत्याग करितीचिना
यास्तव आमुच्या विरुद्ध ते होतां । मार्ग पतनाचा एकचि त्यां ॥६॥
वेग पाहूनियां नम्र होती वेत । यास्तव तयांस पतन नसे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पाहूनि प्रसंग । नम्र होतां भंग नसे कोणा ॥ ८ ॥

५१६

यदा शत्रु बाळिवंत । करूं नयेचि प्रतिबंध ॥ १ ॥
साही प्रथम वेग त्याचा । संरक्षित तोचि साचा ॥ २ ॥

बलाबलाचा विचार । करूनि वेतासम नम्र ॥ ३ ॥
होई जाणावा तो सुज्ञ । अविचारें न रक्षण ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । संकटीं हे थोर युक्ति ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ११३ वा अध्याय समाप्त

अध्याय ११४ वा

५१७

ताता, मूढ कोणी धारिष्ट्यसंपन्न । वरि वरि सौम्य परि क्रूर ॥ १ ॥
असतां सभेंत वदतां अपशब्द । वर्ते ज्ञाता तेथ कैंवीं कथा ॥ २ ॥
कथिती तैं भीष्म शास्त्राचें वचन । करी जो सहन ऐशावेळीं ॥ ३ ॥
पाप त्याचें जाई मस्तकीं अन्याच्या । आक्रोश खलाचा टिटवीसम
जिंकिलेंचि ऐसें मानी जरी मूढ । प्रशंसी निर्लज्ज आपणासी ॥ ५ ॥
उपेक्षाचि ऐशा मूढाची करावी । वनीं काक तैंवी लेखावें त्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे प्रलापें न कांहीं । जनीं कार्य होई ध्यानीं असो ॥ ७ ॥

५१८

केवळ प्रलापें साधे जरी कार्य । वाणीचि अपूर्व सिद्धि तरी ॥ १ ॥
वधही वाणीनें होतां व्यर्थ यत्न । चिंतूनियां मन करणें स्थिर ॥ २ ॥
दुष्कर्मैं तो मातृदोष करी सिद्ध । नाचतां मयूर गुह्य व्यक्त ॥ ३ ॥
अवाच्य अकार्य नसे जया कांहीं । प्रसंग येतांही न वदा त्यासी ॥
मुखावरी स्तुति पृष्ठभागीं निंदा । करील तयाचा नाश जाणा ॥ ५ ॥
श्वानमांसासम वर्जावें तयासी । निंदी जो ज्ञात्यांसी तोचि मूढ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐशाचा प्रतिकार । करणें ते खरक्रीडा जाणा ॥ ७ ॥

५१९

सर्वदा सज्जननिंदा प्रिय ज्यासी । क्रूर श्वान तोचि मत्त गज ॥ १ ॥
उद्धत तो स्वैर असहिष्णु क्रूर । सर्वदा धिक्कार तयाप्रति ॥ २ ॥
निंदितां ऐशानें पावूं नको क्लेश । उच्चनीचयोग, सुजनां निंद्य ॥ ३ ॥
क्रूर तो दुर्जन धूळ तरी फेंकी । स्वकरें वा ताडी क्रोधावेशें ॥ ४ ॥
दांत विचकील भयही दावील । नसे हें नवल त्याचे ठाईं ॥ ५ ॥
समुदायांतही ऐशा दुर्जनानें । निंदितां जो मनें अचल राही ॥ ६ ॥

तया सहिष्णूचें अनहित कदा । न होईचि सर्वदा ध्यानीं असो ॥७॥
वासुदेव म्हणे ऐसा पुण्यवंत । साह्य भगवंत तयाप्रति ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ११४ वा अध्याय समाप्त

अध्याय ११५ वा

५२०

धर्म म्हणे भीष्मा, राज्यकुलादिकां । सौख्य, ऐशा मार्गा निवेदावें ॥
कल्याणकारक त्रिकाळीं, उत्कर्ष । पुत्र-पौत्रादिक पावतील ॥ २ ॥
ऐसा निवेदावा मार्ग मजलागीं । जेणें प्रजा सुखी नियमें होई ॥ ३ ॥
विषयाधीनत्वें दुर्जनत्व येई । प्रतिकूल होई भृत्यवर्ग ॥ ४ ॥
यास्तव सान्निध्य जयांसी ते भृत्य । परीक्षावे तात, कैंवी कथा ॥५॥
संगतीस घ्यावें कोणाप्रति सांगा । सकळां राज्यइच्छा राजकुळीं ॥
वासुदेव म्हणे उत्तर धर्मासी । ऐका काय देती पितामह ॥ ७ ॥

५२१

भारता, एकाकी शासन अशक्य । तेंवी अर्थलाभ रक्षणही ॥ १ ॥
शास्त्रज्ञ त्यापरी अनुभवी भृत्य । हितैषी कुलज स्नेहकर्ते ॥ २ ॥
मंत्रीही तैसेची अंसंहार्य संत । तेंवी मतिप्रद निकटवासी ॥ ३ ॥
समयज्ञ दक्ष व्यसनापूर्वींचि । शोक न करिती गतगोष्टीचा ॥ ४ ॥
ऐशा नृपाळासी राज्यसौख्यलाभ । सम सुख-दुःख सहाय ज्या ॥
वासुदेव म्हणे सत्यनिष्ठ साह्य । जया तोचि होय सुखी राजा ॥ ६ ॥

५२२

प्रजा जयाची न त्रस्त । सदा सन्निकर्षगत ॥ १ ॥
तेंवी क्षुद्रत्वविहीन । सदा सन्मार्गसंपन्न ॥ २ ॥
सर्वकाल तुष्टचित्त । कोशवृद्धि करिती भृत्य ॥ ३ ॥
लोभहीन ते संग्रही । जया धान्याच्या कोठारीं ॥ ४ ॥
शंखलिखितासमान । व्यवहार करिती जन ॥ ५ ॥
ऐशा राज्यामाजी सदा । वैभवासी काय तोटा ॥ ६ ॥

१ लांच घेऊन वश न होणारे.

षड्‌वर्गावलंबी नृप । लोकसंग्रही त्या सौख्य ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शुद्ध । व्यवहार तेंचि सौख्य ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ११५ वा अध्याय समाप्त

अध्याय ११६ वा ५२३

धर्मासी गांगेय श्वानाचा दृष्टांत । देऊनियां बोध करिती ऐका ॥१॥
निर्मनुष्य एका अरण्यांत मुनि । राहिले जाऊनि तपालागीं ॥ २ ॥
सर्व पशु येती तयाच्या सन्निध । कुशल तयास पुसूनि जाती ॥३॥
श्वान मात्र एक सन्निध राहिला । मुनींचि भासला वर्तनें तो ॥ ४ ॥
एकदां त्या स्थानीं येई एक चित्ता । भयविव्हलता श्वानासी तैं ॥
भयाकुल श्वान विनवी मुनीसी । सदय मुनीसी दया येई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अनाठाईं दया । घात तो जाणावा मानवाचा ॥ ७ ॥

५२४

मुनि म्हणे वत्सा, भिऊं नको तूंही । चित्ताचि या ठायीं होई आतां
बोलतां तें मुनि होई चमत्कार। श्वानासी विचित्र रूप आलें ॥ २ ॥
चित्ता तैं विरोध त्यागूंनिया गेला । श्वान मात्र झाला चित्ता स्वयें ॥
ऐसा कांहीं काल जातां एक व्याघ्र । पातला चित्त्यास वधावया ॥
सहवास प्रेमें चित्ता मुनिप्रति । विनवितां त्यासी दया येई ॥ ५ ॥
पुढती चित्त्यासी व्याघ्र करी मुनि । व्याघ्रा त्या पाहूनि व्याघ्र गेला
वासुदेव म्हणे व्याघ्ररूपी श्वान । हिंसेंत रमून वसे तेथें ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ११६ वा अध्याय समाप्त

अध्याय ११७ वा ५२५

पुढती त्या ठाईं उन्मत्त गजेंद्र । येतां होई व्याघ्र भयग्रस्त ॥ १ ॥
पाहूनि तयासी मुनि दयावंत । तत्काळ तयास करिती गज ॥ २ ॥
ऐसे कांहीं दिन लोटतां त्या स्थानीं । गर्जना करूनि सिंह आला ॥
तया गर्जनेनें कंपित तो गज । शरण मुनींस विनयें गेला ॥ ४ ॥
पाहूनि गजासी सिंह करी मुनि । सिंह तें पाहूनि निघूनि जाई॥५ ॥
वासुदेव म्हणे श्वान सिंहरूपें । भक्षी श्वापदांतें काननीं त्या ॥ ६ ॥

५२६

ऐसा कांहीं काळ लोटतां एकदां । संचार शरभाचा होई तेथें ॥ १ ॥
अष्टपाद ऊर्ध्वदृष्टि तो बलाढ्य । इच्छी सिंहवध लीलामात्रें ॥ २ ॥
पाहूनि त्या सिंह धावरे बहुत । मुनि तैं शरभ करिती तया ॥ ३ ॥
अन्य शरभ तैं पाहूनि त्याप्रति । त्यागूनि वनासी पळूनि जाई ॥४॥
मांसपिपासू तो शरभ पुढती । मुनींचेंचि इच्छी मांस मनीं ॥ ५ ॥
जाणूनि तें मुनि बोलले तयासी । स्नेहेंचि तुजसी वाढवीलें ॥ ६ ॥
सिंह शरभादि कुळांचा तुजसी । संबंध कांहींचि नसे मूढा ॥ ७ ॥
कृतघ्ना, ज्या अर्थी इच्छिसी मन्मांस । होई पूर्ववत श्वानचि तूं ॥८॥
वासुदेव म्हणे श्वान तो श्वानचि । होई त्या स्थळासी मुनिशापें ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति॰ राजधर्मपर्वाचा ११७ वा अध्याय समाप्त

अध्याय ११८ वा

५२७

धर्माप्रति भीष्म कथिती यापरी । स्थिति प्राप्त झाली श्वानालागीं ॥
तपोवनांतूनि हांकिलें मुनींनीं । दीनवाणा जनीं भटके व्यर्थ ॥ २ ॥
राजानेंही धर्मा, यास्तव भृत्यांसी । योजावें सेवेसी परीक्षूनि ॥ ३ ॥
सत्य, शौच, तेंवी प्रकृति, आर्जव । श्रुत, वृत्त, कुल, दम, दया ॥४॥
बल, वीर्य, क्षमा, प्रभाव, नम्रता । पाहूनि योग्यता कार्य सांगे ॥५॥
अकुलीनव्याप्त नृपाचा विनाश । कुलीनाचें चित्त अक्षोभ्यचि ॥ ६ ॥
वैभवारूढही अकुलीन नर । करी निंद्याचार तेंवी वैर ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कुलीनता श्रेष्ठ । परी होई भ्रष्ट मोहमग्न ॥ ८ ॥

५२८

कुलवंत सुशिक्षित । ज्ञानविज्ञानमंडित ॥ १ ॥
सहिष्णु तें बलवान । क्षमाशील तें कृतज्ञ ॥ २ ॥
सकल राजधर्मवेत्ता । युद्धशास्त्र व्यूहज्ञाता ॥ ३ ॥
आकर्षक वक्ता शूर । देशकालज्ञ साचार ॥ ४ ॥
ऐसा अमात्य जयासी । सकल वैभव तयासी ॥ ५ ॥
चंद्रप्रकाशासमान । राज्यविस्तार त्या जाण ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्ञाता । गुणिजनांचाचि भोक्ता ॥ ७ ॥

५२९

धर्मा, नृपाळही तैसाचि सद्‌गुणी। असावा हें मनीं प्रजा इच्छी ॥
धीर अमर्षी तैं समर्थी जो तीक्ष्ण। कालपुरुष ज्ञान जयाप्रति ॥ १ ॥
कर्ता, श्रोता, ऊहापोहविशारद। धारणासंयुक्त न्यायदानीं ॥ ३ ॥
प्रियभाषी, दान्त, दक्ष, क्षमाशील। नित्य स्नेहशील निरहंकार ॥४॥
देणें घेणें करी दक्षत्वें जो स्वयें। संकटग्रस्तातें साह्य होई ॥ ५ ॥
कृतकर्मवेत्ता, श्रद्धाळु, सुमुख। प्रजाहितदक्ष, अक्रोधन ॥ ६ ॥
युक्तदंड धर्मरक्षक उदार। राजा चारनेत्र प्रिय होई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सद्‌गुणांची खाण। नृपाळ तो धन्य धन्य जगीं ॥८॥

५३०

योद्धेही असावे सद्‌गुणसंपन्न। काढावे शोधून नृपाळानें ॥ १ ॥
अभ्युदयेच्छूनें दुःख न त्यां द्यावें। संग्रामीं असावे तत्पर ते ॥ २ ॥
कृतज्ञ शास्त्रज्ञ धर्मशास्त्रवेत्ते। गजयुद्धज्ञाते ससैनिक ॥ ३ ॥
कुशल असावे रथसंचारांत। अस्त्रज्ञ धारिष्ट्यसंपन्नही ॥ ४ ॥
प्रजानुरंजक, उद्योगी, मित्राढ्य। उत्थानसमर्थ श्रेष्ठ राजा ॥५॥
सहस्रावधि ज्या अश्वारूढ साह्य। अवनीचें राज्य तया लाभे ॥६॥
वासुदेव म्हणे स्वस्वधर्मनिष्ठ। भोगी तें तें भाग्य अत्यानंदें ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ११८ वा अध्याय समाप्त

अध्याय ११९ वा ५३१

स्वस्वस्थानयोग्य भृत्यासी त्या स्थानीं। योजी तोचि जनीं यश जोडी
श्वानासम भृत्य सोडिती मर्यादा। अयोग्य त्यां देतां उच्चस्थान ॥
शरभस्थानीं तो शरभचि योग्य। तैंवी सिंह व्याघ्र त्या त्या स्थानीं
भृत्यही तैसेचि योजावे नृपानें। नृपा अतिश्रमें यश नसे ॥ ४ ॥
इच्छील जो नृप अलौकिक यश। अकुलीन क्षुद्र वर्जे तया ॥ ५ ॥
सिंहाच्या सान्निध सिंहचि असावा। तैसाचि योजावा दूत नृपें॥६॥
वासुदेव म्हणे श्वान व्याप्त सिंह। सिंहाचे उपभोग कैंवी भोगी ॥७॥

५३२

संगतीसमान फल नृपाळासी । यास्तव संगती योग्य असो ॥ १ ॥
वाणासम स्वामिकार्यदक्ष भृत्य । हितप्रद तेच नृपालागीं ॥ २ ॥
आधार जाणूनि रक्षावें स्वकोश । विपुल धान्य नित्य गुप्त असो ॥
अधिकारी त्याचे असावे सज्जन । संपादीं धनधान्य महायत्नें ॥ ४ ॥
अश्वप्रयोगींही कुशल तूं होईं । ज्ञातिबांधवांही दक्ष असें ॥ ५ ॥
इष्टमित्र पौरजनांसी रक्षावें । काय निवेदावें अन्य कथीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भीष्मोक्त हा बोध । ऐकूनि स्वहितदक्ष व्हावें ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा ११९ वा अध्याय समाप्त

अध्याय १२० वा

५३३

युधिष्ठिरप्रश्नें सन्मान्य संक्षेप । करूनियां श्रेष्ठ कथिती नीति ॥१॥
निवेदिती भीष्म सर्वभूतत्राण । हाचि मुख्य धर्म क्षत्रियांचा ॥२॥
चित्रविचित्र जें पिच्छें मयूराचीं । संरक्षक तैसीं विविध रूपें ॥३॥
तीक्ष्णता, कौटिल्य, निर्भयत्व सत्य । तैसेंच ऋजुत्व ऐसीं रूपें ॥४॥
योग्यवेळीं योग्य घेऊनियां रूप । संपादावें यश नृपाळानें ॥ ५ ॥
स्वल्पही द्रव्याचा नाश न या मार्गें । शिखीसम व्हावें गुप्तमंत्र ॥६॥
अल्प रमणीय शास्त्रपूत वाणी । वासुदेव वर्णी पुढती ऐका ॥ ७ ॥

५३४

उदकप्रवाहासम आपत्तींत । असावें सावध सर्वकाळ ॥ १ ॥
पर्वतोदकासी आश्रय सरिता । आश्रय विप्रांचा तेंवी घ्यावा ॥ २ ॥
द्रव्येच्छूनें व्हावें सर्वदा धार्मिक । दंडहीं उद्यत असो सदा ॥ ३ ॥
परी दंडकर्मीं प्रमाद न व्हावा । कर तो योजावा शक्तीसम ॥ ४ ॥
स्वपक्ष सर्वदा व्हावा शुचिर्भूत । करावें उध्वस्त शत्रुधान्य ॥ ५ ॥
सर्वदा आपुलें न्यून ओळखावें । प्रगट करावे शत्रुदोष ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वन्यपुष्पांसम । निमित्तें हलवून अरिसी यावें ॥ ७ ॥

---

१ शरत्कालीं मोर मूक असतो तसें.

५३५

गुप्तस्थळीं वास करूनि उन्नत । शत्रूचा विनाश करणें योग्य ॥ १ ॥
रजनी माझारी गुप्त जैं मयूर । तैंवी वर्षाकाल घालवावा ॥ २ ॥
अंतःपुरीं तदा व्हावें रममाण । शरीररक्षण नित्य होवो ॥ ३ ॥
आपुलें आपण करावें रक्षण । त्यागावे दुर्जन हेरोक्त जे ॥ ४ ॥
प्रत्यग्र तयांचा घ्यावया स्वयेंचि । न जावें संकटीं ध्यानीं असो ॥
योजितां शत्रूनें विषकन्यादिक । शत्रूसवें नाश करणें त्यांचा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नटादि पसारा । त्यागूनि आसरा द्यावा वीरां ॥ ७ ॥

५३६

प्रशंसार्ह कार्यें घडावीं सर्वदा । संग्रहावी विद्या मधुपासम ॥ १ ॥
आत्मबुद्धिदा, त्या नीतीसी वरावें । इष्ट संकल्पावें कार्य चित्तीं ॥ २ ॥
अन्यासी पुसूनि स्थिर व्हावें तेंचि । ज्ञानें स्थिरबुद्धि प्राप्त होई ॥
सामें संपादावा शत्रूचा विश्वास । नित्य बलाबल ध्यानीं घ्यावें ॥
साधकबाधक करूनि विचार । कार्याचा निर्णय नियोजावा ॥ ५ ॥
गूढबुद्धि, धीर, योग्य तेंचि करी । तोल जातां परी सांवरावें ॥६॥
तप्तलोहही तें उदकीं टाकितां । घेई पूर्वरूपा सुज्ञ तेंवी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विवेकउदक । परितप्ता शांत करीतसे ॥ ८ ॥

५३७

स्वपरार्थ धर्म शास्त्रोक्त जे तैसी । होई कीं न कृति अवलोकावी ॥
सौम्य ज्ञाते शूर स्वकार्यसमर्थ । नियोजावे भृत्य नृपाळानें ॥ २ ॥
वीणेसम तंतु जुळतां स्वरांत । विश्वासार्ह भृत्य समजें मग ॥ ३ ॥
धर्मअविरोधें प्रिय सकलांचें । करावें जनांतें व्हावें प्रिय ॥ ४ ॥
कुल, प्रजा, राष्ट्र, धर्मज्ञ भृत्यांसी । योजावें कार्यासी नृपाळानें ॥५॥
हेरद्वारा व्हावें कार्यावलोकन । वैफल्य येवो न क्रोध मोदां ॥ ६ ॥
कोशवृद्धिज्ञान स्वयेंचि जयासी । स्वयें जो परीक्षी सकल कार्यें ॥७॥
वासुदेव म्हणे निवेदिती भीष्म । नृपासी त्या धन विपुल लाभे ॥८॥

५३८

परिणामकारक निग्रहानुग्रह । रक्षी स्वराष्ट्रास धर्मज्ञ तो ॥ १ ॥

स्वकिरणें सूर्य विश्वातें अवलोकी । तैसी असो दृष्टि नृपाळाची ॥
उत्तम भृत्य वा हेरही जाणावे । निर्णय करावे स्वबुद्धीनें ॥ ३ ॥
यथाकाल स्थिति असावी राजाची । धनवंत ऐसी ख्याति नसो ॥
धेनूसम पृथ्वी दोहावी सर्वदा । संचय मधुपासम व्हावा ॥ ५ ॥
प्रजाकार्थे होतां अवशिष्ट धन । वेंचावें लक्षून धर्मकार्जी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे संग्रह पाहूनि । वेंची तोचि जनीं यश जोडी ॥ ७ ॥

५३९

अल्पचि म्हणूनि अव्हेर न व्हावा । तुच्छ न लेखावा निज शत्रु ॥
आपुली आपण करावी परीक्षा । विश्वास मूढाचा धरूं नये ॥ २ ॥
धृति, दाक्ष्य, धैर्य, संयम, स्वबुद्धि । देह, शौर्य, तेंवी अप्रमाद ३ ॥
अल्प वा बहुत धनवृद्धिकर । साधनें हीं अष्ट ध्यानीं घ्यावीं ॥ ४ ॥
घृतें अग्निवृद्धि, बीजासी अंकुर । अल्पही तें द्रव्य वृद्धि पावे ॥ ५ ॥
बालही समर्थ युवकासमान । वधीलचि जाण प्रमत्तासी ॥ ६ ॥
सुवेळीं तयांचा व्हावा मूलच्छेद । कालज्ञ तो श्रेष्ठ नृपांमाजी ॥७॥
निर्बलही शत्रु म्हणे वासुदेव । हरितो उत्साह धर्मकीर्ति ॥ ८ ॥

५४०

शत्रुहूनि हीन नसावें कदाही । ऐश्वर्यचि पाहीं विजयमूळ ॥ १ ॥
जाणूनि हें, योग्य तरी व्हावा संधि । बलाढ्याही बुद्धि जिंकी रणीं ॥
उत्कर्षाचा बुद्धि करील अपकर्ष । यास्तव प्रशस्त सुविचारचि ॥
धीर निर्दोषहि सकलेच्छापूर्ति । इच्छूनि पात्रींही न करी दान ॥ ४ ॥
अकल्याण तेणें जाणावें तयाचें । प्रेमें वैभवातें वाढवावें ॥ ५ ॥
चिरक्लेशें विद्युत्गतीही वरावी । परी आंवरावी अति हांव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे टाळावा अतिरेक । करूनि विवेक तरी सौख्य ॥ ७ ॥

५४१

विद्या तप धन व्यवसायाधीन । मूळ तया जाण एक बुद्धि ॥ १ ॥
देहवंतासी ते, यास्तव नरानें । प्रचंड यत्नानें युक्त व्हावें ॥ २ ॥
सुविचारी जनां यत्नचि आधार । रक्षावें शरीर सदा नृपें ॥ ३ ॥
इंद्र विष्णु तेंवी सरस्वती जेणें । लाभे त्या देहातें संरक्षावें ॥ ४ ॥

सर्वदा त्यजावा लोभ, न त्या तृप्ति । इच्छी तो पराची लक्ष्मी सदा ॥
सदा सर्वदोष लोभ्याचिया ठाईं। त्याज्यचि तो पाहीं नृपालागीं॥६॥
वासुदेव म्हणे परीक्षा उत्कृष्ट । करितां निकृष्ट, करिती कार्य ॥ ७ ॥

५४२

प्रयत्न शत्रूचे, तैंवी मनोरथ । घालवावे व्यर्थ महायत्नें ॥ १ ॥
धर्मज्ञ ते श्रेष्ठ मंत्री जयाप्रति । समर्थ नृपति कुलीन जो ॥ २ ॥
मांडलिका वश करील तो नित्य । धर्मा, हे संक्षिप्त कथिले धर्म॥३॥
विधियुक्त याचें करितां पालन । पावेल तो स्थान श्रेष्ठलोकीं ॥ ४ ॥
दैवप्राप्त किंवा बलात्कारप्राप्त । अनीतिमूलक वैभव जें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे तया न सद्गति । उत्कृष्ट राज्याची प्राप्तीही न ॥ ६ ॥

५४३

प्रमादविहीन संधिविग्रहादि । जाणूनि शत्रूसी जिंकी रणीं ॥ १ ॥
उपाय शोधूनि कार्यसिद्धिमार्ग । करावे नियुक्त निश्चयानें ॥ २ ॥
कळल्यावांचूनि उपाय, संमति । द्यावी न कदापि कोण्या कार्जी॥३॥
दोषहीनाप्रति मानील जो दोषी । वैभव वा कीर्ति लाभे न त्या ॥४॥
कार्यभार घेई शिरीं तोचि मित्र । राया, प्रशंसार्ह समजें नित्य ॥५॥
ऐसा राजधर्म धरूनियां ध्यानीं । प्रजासंरक्षणीं राहीं रत ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे इच्छित लोकांची । प्राप्ति नृपाळासी राजधर्मं ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १२० वा अध्याय समाप्त

अध्याय १२१ वा

५४४

त्रैलोक्यशासक दंडचि हा ऐसें । निवेदिलें तातें पूर्वी मज ॥ १ ॥
जाणावें तयाचें स्वरूप हे इच्छा । स्थिति आत्मा त्याचा कोण सांगा
गति आदि सर्व निवेदा दंडाचें । उत्तर धर्मातें देती भीष्म ॥ ३ ॥
नीचमार्गें अपहारनिवारण । व्यवहार जाण तोचि धर्मा ॥ ४ ॥
प्रियाप्रियां सम दृष्टीनें सांभाळी । तोचि दंडधारी धर्मरूप ॥ ५ ॥
मनु ब्रह्मदेवें कथियेलें तेंचि । कथिलें तुजसी ब्रह्मवच ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे प्राग्वच व्यवहार । दंड धर्म सर्व एकरूप ॥ ७ ॥

५४५

योग्य दंडें होई त्रिवर्गप्रवृत्ति । देवतारूपचि दंड असे ॥ १ ॥
नीलकमलाचा वर्ण दंडाप्रति । चतुर्दंष्ट्रा त्यासी चार बाहु ॥ २ ॥
अष्ट पाद नेत्र तया असंख्यात । शंकुकर्ण, केश ऊर्ध्व तया ॥ ३ ॥
जटाधर उग्ररूपी तो द्विजिव्ह । सकल शस्त्रधर तोमरादि ॥ ४ ॥
छेदणें भेदणें फाडणें कापणें । ऐसीं रूपें जाणें तयाप्रति ॥ ५ ॥
आसि, विसशन, धर्म, शास्ता, शास्त्र । नामें तीं शंकर आदि दंडा ॥
वासुदेव म्हणे सर्वाधार दंड । विशाल स्वरूप सर्वकाल ॥ ७ ॥

५४६

महापुरुषाची त्या कांता दंडनीति । जगद्धात्री लक्ष्मी आदिनामें ॥१॥
अर्थ अनर्थ तें बलाबल पाप । पुण्य लज्जा तेज पांडित्यादि ॥ २ ॥
सकलही धर्मा, दंडाचेंचि रूप । दंडावीण लोक नष्ट होती ॥ ३ ॥
दंडमर्यादेनें प्रजा नृपाळाची । करी भाग्यवृद्धि आधार तो ॥ ४ ॥
सत्याधिष्ठित त्या धर्मानें धारणा । आश्रय त्या जाणा ब्राह्मणांचा ॥
देवतामय ते यज्ञासी कारण । यज्ञेंचि पर्जन्य तेणें अन्न ॥ ६ ॥
क्षात्रियस्वरूपी दंड या कारणें । वासुदेव म्हणे ध्यान द्यावें ॥ ७ ॥

५४७

सर्व विश्व सनातन । ऐसें दंडाच्या स्वाधीन ॥ १ ॥
सर्वलोकसंरक्षण । तेंवी स्वधर्मस्थापन ॥ २ ॥
परमश्रेष्ठ हें कर्तव्य । क्षत्रियासी एकमेव ॥ ३ ॥
वादी प्रतिवादी ऐसें । अन्यरूप या दंडाचें ॥ ४ ॥
कोणा एकाचें अन्यासी । मान्य व्हावें, रूप त्यासी ॥ ५ ॥
पापवृत्तिनिवारक । व्यवहार हा वेदोक्त ॥ ६ ॥
धर्मसभेमाजी वेद । कथी पापा देहदंड ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कुल । बहिष्कारें रक्षी शील ॥ ८ ॥

५४८

प्रायश्चित्तादिकरूपें दंड वसे । नृपाधीन असे व्यवहार ॥ १ ॥

सकल हें ज्ञात असावें क्षत्रिया । आधार या सर्वां एक वेद ॥ २ ॥
युधिष्ठिरा, ब्रह्मदेवोक्त हा दंड । कल्याणस्वरूप वेदचि हा ॥ ३ ॥
वेद तोचि धर्म, धर्म तो सन्मार्ग । ब्रह्मा व्यवहारास उत्पादक ॥४॥
कथिलें ब्रह्मयानें वचन तें ऐका । बंधु माता-पिता पुरोहित ॥ ५ ॥
अधर्मप्रवृत्त दंडार्ह ते होती । वासुदेव कथी भीष्मवच ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १२१ वा अध्याय समाप्त

अध्याय १२२ वा

५४९

तात पितामह निवेदिती धर्मा । 'वसुहूम' नामा अंगपति ॥ १ ॥
प्रख्यात तेजस्वी होता एक राजा । मुंजपृष्ठदेशा मेरूवरी ॥ २ ॥
कांतेसवें तपें देवतुल्य होई । मांधाता त्या ठाईं एकावेळीं ॥ ३ ॥
येतां सन्मानूनि वदे तो नृपासी । उत्पत्ति दंडाची कथीं मज ॥४॥
वसुहूम बोले प्रजा हे विनयी । दंडानेंचि होई नृपश्रेष्ठा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे उत्पत्ति दंडाची । वसुहूम कथी मांधात्यातें ॥ ६ ॥

५५०

पुरा यज्ञइच्छा होई ब्रह्मयाप्रति । ऋत्विज तयासी न मिळे कोणी ॥
मस्तकींच त्याच्या राहिला तैं गर्भ । सहस्राब्दें शिंक येतां पुत्र- ॥२॥
होई, तो ऋत्विज झाला यज्ञामाजी । कार्य न दंडासी उरलें तेथें ॥
दंड तयावेळीं पावे अंतर्धान । संकर माजून जाई तेणें ॥ ४ ॥
कार्याकार्य भक्ष्याभक्ष्य पेयापेय । ऐसा भेदभाव उरला नाहीं ॥ ५ ॥
फलप्राप्ति मग कैसी होई कोणा । परस्पर जनां हिंसा प्रिय ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भेदभावहीन । मूढ होती विप्र एकमेकां ॥ ७ ॥

५५१

गम्यागम्यभेद स्वकीय परकीय । श्वानाप्रति काय तैसें होई ॥ १ ॥
एकमेक एकमेकांतें लुटिती । दुर्बलां वधिती बलवंत ॥ २ ॥
मर्यादाशून्य ते पाहूनि अवनी । भगवंता पाणी जोडी ब्रह्मा ॥ ३ ॥
चिंतूनि तैं विष्णु निर्मी दंडाप्रति । कन्या दंडनीति तया होई ॥४॥
पुढती विष्णूनें योजिले अधिप । देव राक्षसांस इंद्रादि ते ॥ ५ ॥
यम पितरांसी कुबेर राक्षसां । मेरु तो पर्वतां अधिप होई ॥ ६ ॥

सरितांसी सिंधु उदकां वरुण । प्राणांचा तो जाण अधिप मृत्यु ॥
वासुदेव म्हणे तेजस्वामि अग्नि । शिव रुद्रस्वामी योजियेला ॥ ८ ॥

५५२

वरिष्ठ विप्रांचा, वसुपति अग्नि । अन्य तेजस्वामी होय सूर्य ॥ १ ॥
नक्षत्राधिपत्य आल्हादक चंद्रा । वन्हिपति सूर्या योजियेलें ॥ २ ॥
सर्वप्राणिपति होई कार्तिकेय । तोचि अधिकार कालातेंही ॥ ३ ॥
शस्त्र, शत्रु, यम, कर्म हे अथवा । रोग, अपथ्येहा, यम, कर्म ॥ ४ ॥
ऐशा रूपें मृत्यु अधिपत्या काल । क्षुप तो सकल नियंताचि ॥५॥
वासुदेव म्हणे अधिपतीवीण । व्यवस्था तो भ्रम दुःखदाई ॥६॥

५५३

विरंचीयज्ञ जैं समाप्त जाहला । संतुष्ट जाहला महादेव ॥ १ ॥
संरक्षक दंड तेणें श्रीविष्णूसी । दिधला, मुनीसी विष्णु अर्पी ॥२॥
इंद्र मरीचीतें अर्पितो अंगिरा । भृगूतें दिधला मरीचीनें ॥ ३ ॥
लोकपालांप्रति लाभला पुढती । क्षुपाप्रति देती लोकपाल ॥ ४ ॥
क्षुप मनूप्रति अर्पी तोचि दंड । मनु स्वपुत्रांस अर्पी प्रेमें ॥ ५ ॥
दुष्टनिग्रहाचि दंडाचा उद्देश । नसे तो द्रव्यार्थ ध्यानीं असो ॥६॥
पात्रापात्रन्याय अन्याय बघोनि । विवेकेंचि जनीं दंड व्हावा ॥७॥
वासुदेव म्हणे अल्पापराधार्थे । करणें घोर दंड अन्याय्यचि ॥८॥

५५४

परंपराप्राप्त पुढती तो दंड । संरक्षी जगास स्वसामर्थ्यें ॥ १ ॥
इंद्राहूनि अग्नि त्याहूनि वरुण । प्रजापति, धर्म, व्यवसायही ॥२॥
तयाहूनि तेज त्याहूनि औषधि । पर्वत रसही तयांहूनि ॥ ३ ॥
निर्ऋति नक्षत्रें वेद हयग्रीव । ब्रह्मा तेंवी शिव विश्वेदेव ॥ ४ ॥
ऋषि, सोम, सनातन देव, तेंवी । ब्राह्मण ते पाहीं अधिक दक्ष ॥
धर्मा, यथाक्रम अधिक दक्षता । घेऊनि देवता संरक्षिती ॥ ६ ॥
परी सर्वांहूनि धर्मानुरोधानें । क्षत्रिय दंडानें रक्षी जगा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अधिकार ऐसा । श्रेष्ठ क्षत्रियाचा ध्यानीं येवो ॥८॥

१ अपथ्य करण्याची इच्छा, २ अंगिरा मुनीस, ३ ब्रह्मदेवाचा एक पुत्र.

५५५

लोकीं जागृत या प्रजा । प्रजांस्तव दंड जागा ॥ १ ॥
ब्रह्मयासम दंडतेज । दंड संहारील जग ॥ २ ॥
काल जागृत सर्वदा । तया सर्व लोकसत्ता ॥ ३ ॥
काल देवांहूनि श्रेष्ठ । काल शिवचि प्रत्यक्ष ॥ ४ ॥
लोकसंरक्षणदक्ष । धर्मा, दंडाचें हें वृत्त ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सौख्य । दंडवृत्तें या धर्मास ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १२२ वा अध्याय समाप्त

अध्याय १२३ वा ५५६

धर्म म्हणे ताता, त्रिवर्गसिद्धान्त । ऐकावा हा हेत पूर्ण करा ॥१॥
निवेदिती भीष्म शुद्धात्मे इच्छितां । काल, स्थान, इच्छा अनुकूल जैं
त्रिवर्ग तें सौख्यें नांदे एक्या ठाईं । अर्थमूळ पाहीं धर्म सदा ॥ ३ ॥
अर्थफल काम संकल्प मूळ हे । निःसंकल्पे लाभे मोक्ष जाण ॥ ४ ॥
रक्षणार्थ धर्म, कामानिक अर्थ । इंद्रियसुखार्थ काम ज्याचा ॥ ५ ॥
रजोगुणात्मक जाणोनि त्यागावा । त्रिवर्ग असावा सत्वोद्भूत ॥६॥
वासुदेव म्हणे आत्मज्ञानार्थचि । योजावे कामादि पुरुषार्थ ते॥ ७ ॥

५५७

आसक्ति फलेच्छा त्यागूनि सेवितां । लाभ परमार्थाचा त्रिवर्गानें ॥
धर्माचार व्हावा चित्तविशुध्यर्थ । निष्काम कर्मार्थ अर्थ व्हावा ॥२॥
देहधारणार्थ योजावा तो काम । मोक्षचि तो जाण ऐशा मार्गें ॥ ३॥
कर्मे इच्छापूर्ति निश्चय न जाण । तेणें अन्यकर्म निष्फल तें ॥ ४ ॥
अर्थास्तव धर्म सेवूं नये कदा । कृष्यादिक त्याचा अन्यमार्ग ॥ ५ ॥
हठ, स्वभाव, वा दैवाचि कारण । धर्मासी कथन करिती कोणी॥६॥
अर्थहेतु धर्म धर्मार्थ वा अर्थ । न म्हणें, विपरीत दिसती गोष्टी ॥७॥
वासुदेव म्हणे धर्मार्थाचा ऐसा । संबंध न ज्ञाता मानीतसे ॥ ८ ॥

५५८

धर्मा, आतां ऐकें धर्मादींचे दोष । जाणूनि ते मार्ग वरीं योग्य ॥ १॥

परापकर्षादि फलेच्छा धर्माचा । दोष तो अर्थाचा निगूहंन ॥ २ ॥
प्रीतिविशेषानें सद्धर्माचा त्याग । जाणें महादोष कामाचा हा ॥ ३ ॥
मूल, उद्देश तैं साहित्य कथिलें । पृथग्भाव घ्यावे ध्यानीं आतां ॥४॥
कामंदक-आंगरिष्ठांचा संवाद । कथिती धर्मास परिसा भीष्म ॥५॥
वासुदेव म्हणे कामंदकांप्रति । वंदूनि नृपति प्रश्न करी ॥ ६ ॥

५५९

काम-मोहग्रस्त होऊनियां राजा । पाप आचरितां पुढती दुःखी- ॥
होऊनि, तयांसी होतां पश्चात्ताप । कैंवी पापनाश होई त्याचा ॥२॥
अज्ञानें अधर्मा मानूनि तैं धर्म । वर्ते जरी सुज्ञ तरी कैंवी ॥ ३ ॥
निवारावें तया कथावें तें मातें । वासुदेवा रुचे प्रत्युत्तर ॥ ४ ॥

५६०

मुनि कामंदक आंगरिष्ठाप्रति । प्रत्युत्तर देती परिसा काय ॥ १ ॥
धर्मअर्थत्यागें कामचि जो सेवी । नृपा, त्याचा होई प्रज्ञानाश ॥२॥
प्रज्ञानाशें मोह धर्मार्थनाशक । नास्तिकता वृत्तदोष तेणें ॥ ३ ॥
निग्रहीं न ऐशा दुष्टां जरी राव । गृहीं सर्पभय तैशापरी ॥ ४ ॥
प्रजा ब्राह्मण तैं सज्जन त्या नृपा । सहकार्य कदा न देतीचि ॥ ५ ॥
अस्तित्वचि संशयित त्या नृपाचें । अनुकूल नसे जरी प्रजा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अंतीं ऐसा नृप । होतसे वधार्ह कथिती मुनि ॥७॥

५६१

लोकनिंद्य होतां दुःखद तें जिणें । अथवा तें जाणें मरण राया ॥
ऐसें होतां पापविनाशाचा मार्ग । कथिला शास्त्रांत तोचि ऐकें ॥
वेदविद्या तेंवी विप्रांचा सत्कार । होऊनि उदार वरणें धर्म ॥३॥
सत्कुलीं विवाह, विद्वज्जनसेवा । जप, स्नान, व्हावा सुजनवास ॥
विनयें तयांसी करावें प्रसन्न । ज्ञात्यांचे सद्गुण स्वयें गावे ॥ ५ ॥
ऐशा मार्गें येई जनांत मान्यता । गुरुवचें जातां हाचि लाभ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सत्कर्मचि तारी । कापट्य अंतरीं नसतां लाभ ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १२३ वा अध्याय समाप्त

---

१ सत्पात्रीं दान किंवा भोग न करणें

अध्याय १२४ वा

५६२

ताता, धर्मापूर्वी प्रशंसिती शीला । संशय करावा दूर माझा ॥१॥
कैंवी शीललाभ लक्षणहीं त्याचें । निवेदावें मातें पुण्यवंता ॥२॥
निवेदिती भीष्म पुरा दुर्योधन । ऐश्वर्य पाहून तुमचें श्रेष्ठ ॥ ३ ॥
परितप्त चित्तीं होऊनियां अंधा । वदतां त्या राजा कथी ऐकें ॥ ४ ॥
बाळा, न्यून तुज काय असे सांगें । कृशत्व कां ऐसें पंडुता तें ॥५॥
वासुदेव म्हणे कथी दुर्योधन । पांडवांचें धन दुःखद हें ॥ ६ ॥

५६३

ऐकूनि हें राजा म्हणे तें वैभव । इच्छी तेणें शील संपादावें ॥ १ ॥
शीलें हस्तगत होईल त्रैलोक्य । कांहीं न अप्राप्य शीलवंतां ॥ २ ॥
एक तीन, सप्तदिनींचि हे पृथ्वी । तिघांनीं जिंकिली ध्यानीं असो ॥
प्रथम मांधाता, दुजा जनमेजय । नाभाग तृतीय भाग्यवंत ॥ ४ ॥
शील, दयावंत होते ते तिघेही । स्वयेंचि त्यां पायीं पृथिवी नम्र ॥
वासुदेव म्हणे दुर्योधन पुशी । ताता, शीलप्राप्ति कैंवी घडे ॥ ६ ॥

५६४

दुर्योधनाप्रति कथी धृतराष्ट्र । पुरा कथी शुक्र इंद्रालागीं ॥ १ ॥
सर्वश्रेष्ठ मार्ग जाणितो प्रऱ्हाद । विप्रवेश इंद्र तदा घेई ॥ २ ॥
तया वेशें जाई प्रऱ्हादमंदिरीं । म्हणे बा, निवेदीं श्रेष्ठ ज्ञान ॥ ३ ॥
प्रऱ्हाद म्हणे न वेळ मज विप्रा । भार त्रैलोक्याचा मजवरी ॥ ४ ॥
पुढती विप्रानें पाहूनियां संधि । केला प्रऱ्हादासी प्रश्न ऐका ॥ ५ ॥
धर्मज्ञा, तुजसी त्रैलोक्याचें राज्य । लाभलें तो मार्ग कथीं मज ॥६॥
वासुदेव म्हणे विप्रासी प्रऱ्हाद । कथी तोचि मार्ग ऐका आतां ॥७॥

५६५

विप्रा, संयमी मी वंदितों विप्रांसी । प्रेमें ते मजसी करिती बोध ॥१॥
मोहोळीं माक्षिका सिंचिती जें मधु । तैसा मज बोधु करिती विप्र ॥
विप्रबोध हेंचि अमृत या लोकीं । सर्वश्रेष्ठ हेंचि ज्ञान असे ॥ ३ ॥
विप्रा, गुह्य तुज निवेदिलें, माग । इच्छिसी मनांत तेंचि आतां ॥४॥
विप्र म्हणे मज इच्छा नसे कांहीं । प्रऱ्हाद त्या घेई म्हणे वर ॥ ५ ॥



शील तेथें धर्म, धर्म तेथें सत्य । सत्यानें चरित्र शुद्ध होई ॥
सद्वृत्तेंचि बल, बल तेथें लक्ष्मी । शील ऐसें जनीं सर्वश्रेष्ठ ॥ राजधर्मपर्व अ. १२४

तदा विप्र मागे प्ऱ्हादाचें शील । तथास्तु दयाळ वदला तया ॥६॥
वासुदेव म्हणे हर्षें विप्र जातां । प्ऱ्हादासी चिंता वाटे मनीं ॥ ७ ॥

५६६

असेल हा विप्र कोण हें चिंतितां । पाही दिव्य तेजा तया ठाईं ॥१॥
निज देहांतूनि तेजस्वी तो देह । पाहूनि प्ऱ्हाद वदला तया ॥ २ ॥
कोण रे तूं ऐसें ऐकूनि मी शील । दिधलें उत्तर तया तेणें ॥ ३ ॥
त्यागिलेंसी मज म्हणूनियां जातों । म्हणे त्या सेवितों विप्राप्रति ॥
कथूनियां ऐसें तेज होई गुप्त । इंद्रशरीरांत प्रवेशलें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे इतुक्यांत अन्य । प्रगटलें जाण दिव्य तेज ॥ ६ ॥

५६७

कोण रे तूं ऐसें पुशी त्या प्ऱ्हाद । म्हणे तो समज धर्म मातें ॥ १ ॥
शील तेथें धर्म प्ऱ्हादा, हें जाण । इतुक्यांत अन्य प्रगटे तेज ॥२॥
पुशितां सत्य मी धर्माचा अनुयायी । कथूनि तें होई तेज गुप्त ॥३॥
वृत्त, बल, लक्ष्मी, प्रगटतां ऐसीं । प्रल्हाद लक्ष्मीसी वदला तदा ॥
अधिदेवते तूं कोठें जासी सांग । होता कोण विप्र निवेदीं तें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे लक्ष्मी प्रल्हादातें । निवेदी ऐका तें स्थिरभावें ॥ ६ ॥

५६८

प्ऱ्हादा, इंद्राचि आला विप्ररूपें । घेऊनि शीलातें गेला तव ॥ १ ॥
त्रैलोक्याधिपत्य तुज या शीलानें । कळतां इंद्रानें वरिलें तेंचि ॥२॥
शील तेथें धर्म धर्म तेथें सत्य । सत्यानें चरित्र शुद्ध होई ॥ ३ ॥
सद्‌वृत्तांचि बल, बल तेथें लक्ष्मी । शील ऐसें जनीं सर्वश्रेष्ठ ॥ ४ ॥
बोलूनियां ऐसें लक्ष्मी होई गुप्त । इंद्राच्या देहांत प्रवेशली ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पुशी दुर्योधन । उपाय, लक्षण कथा त्याचें ॥ ६ ॥

५६९

धृतराष्ट्र म्हणे काया-वाचा-मनें । अद्रोहीचि होणें सर्वांभूतीं ॥ १ ॥
अनुग्रह दान हेंचि शील राया । प्रशंसार्ह आर्यां हेंचि वाटे ॥ २ ॥
कल्याण अन्याचें जेणें नच होई । सलज्जता येई कर्मं जया ॥ ३ ॥
सर्वथा तें वर्ज्य जाणूनि त्यजावें । वंद्य तें करावें कर्म जनीं ॥ ४ ॥

संक्षेपें हें शील कथिलें तुजसी । लाभतां संपत्ति शीलावीण ॥ ५ ॥
स्थिर न ते राहे नाशही समूळ । निश्चयें करील ध्यानीं असो ॥ ६ ॥
यास्तव तूं बाळा, शीलवंत होईं । सकलैश्वर्य पायीं लोळे तेणें ॥
वासुदेव म्हणे धर्माप्रति भीष्म । कथिती तूं ज्ञान आचरीं हें ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १२४ वा अध्याय समाप्त

अध्याय १२५ वा ५७०

आशेचें स्वरूप निर्मिली ती कैंवी । ताता, निवेदावी सकल कथा ॥
पितामहा, आशा वाटते दुर्जय । नभाहूनि थोर गमे आशा ॥ २ ॥
करील वर्तन योग्य दुर्योधन । आशा हे धरून होतों मनीं ॥ ३ ॥
आशाभंगासम दुःख नसे जनीं । विनवी जोडूनि करां धर्म ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सुमित्र-ऋषभ- । संवाद त्या तात निवेदिती ॥ ५ ॥

५७१

हैहयकुळींचा सुमित्र नामक । धर्मा, राव एक मृगयेस्तव ॥ १ ॥
जाऊनियां वनीं एका मृगा बाण । सवेग ताडून हर्ष पावे ॥ २ ॥
बाणासवें परी मृग तो पळाला । पाठलाग केला तदा नृपें ॥ ३ ॥
एकाकी नृपाळ पर्वत नद्यांसी । लंघूनि वेगेंसी धांव घेई ॥ ४ ॥
पुढती त्या मृग भासला सान्निध । ताडी बाण एक परी व्यर्थ ॥ ५ ॥
दोन कोश गेला पळूनि तो मृग । नृप पाठलाग करी वेगें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे होतां उपहास । विजयार्थ हट्ट धरी वीर ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १२५ वा अध्याय समाप्त

अध्याय १२६ वा ५७२

हिंडतां हिंडतां एका आश्रमांत । होऊनियां श्रांत राव येई ॥ १ ॥
बहुमान त्याचा केला सन्मुनींनीं । होती तया स्थानीं कुशल प्रश्न ॥
कोण कोठील तूं कासया हिंडसी । पुशितां मुनींसी कथी वृत्त ॥ ३ ॥
आशाभंग म्हणे केला मृगराजें । मरणाहूनि तें दुःख जीवा ॥ ४ ॥
आशाभंगदुःखा नभही तें सान । वाटे मजलागून मुनींद्र हो ॥ ५ ॥

सत्य कीं तें मिथ्या कथावें मजसी । विप्र तपाप्रति जरी न येणें ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि प्रार्थना । नृपाची, मुनींना खेद वाटे ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १२६ वा अध्याय समाप्त

अध्याय १२७ वा ५७३

साश्चर्य सुहास्य बोलले ऋषभ । गेलों मी हिंडत बदरीवनीं ॥ १ ॥
हयग्रीव तेथें करी वेदघोष । पुढती एक कृश दिसला विप्र ॥ २ ॥
उंच तपोधन कृष्णाजिनधारी । 'तनु' नाम त्यासी राजश्रेष्ठा ॥ ३ ॥
सामान्याहूनि तो उंच अष्टगुण । कृशत्व त्याहून नव्हतें कोठें ॥ ४ ॥
हस्त पाद ग्रीवा पाहूनि तयाची । नृपा, मज भीति प्राप्त झाली ॥
सन्मानितां तेणें बैसलों आसनीं । शास्त्रपूतवाणी निवेदी तो ॥ ६ ॥
इतुक्यांत वीरद्युम्न नामें नृप । सपरिवार तेथ प्राप्त झाला ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पुत्रलाभआशा । होती तया नृपा मनीं बहु ॥ ८ ॥

५७४

एकुलता माझा एक । पुत्र भेटेल कां एथ ॥ १ ॥
आशा अंतरीं हे मोठी । करी व्याकुळ मनासी ॥ २ ॥
तदा 'तनु' ध्याननिष्ठ । वदे पाहूनि त्या नृप ॥ ३ ॥
काय दुर्लभ या जनीं । थोर काय आशेहूनि ॥ ४ ॥
ऐकूनियां वदले मुनि । पुत्रा भाग्यहीन मानीं ॥ ५ ॥
पूज्य मुनींचा दारुण । केला तयानें अपमान ॥ ६ ॥
कनककलश न दिला । मागतांही सन्मुनीला ॥ ७ ॥
निराश तैं होतां राव । मुनि दाविती सद्भाव ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मुनि । पुशिता नृपाळालागूनि ॥ ९ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १२७ वा अध्याय समाप्त

अध्याय १२८ वा ५७५

राव म्हणे मुने, वीरद्युम्न नाम । विख्यात मी जाण नृप एक ॥ १ ॥
भूरिद्युम्न माझा पुत्र अल्पवय । शोधितां हे पाय दिसले मज ॥ २ ॥
ऐकूनि तें मुनि मान खालीं घाली । स्मृति तया झाली प्रतिज्ञेची ॥

नृपाळानें एका मागतां त्या कांहीं । दिलें न तें येई मनीं त्याच्या ॥
तदा प्रभृति तो त्यागूनियां आशा । केवळ तपाचा मार्ग वरी ॥ ५ ॥
परी नृप तदा म्हणे आशेसम । कृशता ते जाण कवणा असे ॥ ६ ॥
तैसेंचि दुर्लभ काय या भुवनीं । रंगे कथागानीं वासुदेव ॥ ७ ॥

५७६

ऐकूनि तें मुनि, स्मरण नृपासीं । वाटे द्यावयाचि वदला, वाणी ॥१॥
राजा, आशेसम कृशत्व न कोणा । आशा ज्याची जाणा दुर्लभ तें ॥
आशापूर्तीस्तव प्रार्थिलें नृपांसी । परी नच माझी पुरली आशा ॥३॥
ऐकूनि तें नृप वदला मुनींतें । कृशत्व कोणातें तुम्हांहूनि ॥ ४ ॥
मुनि म्हणे धैर्यसंपन्न याचक । असो वा दुर्लभ नसो किंवा ॥ ५ ॥
परी याचकातें नावमानी जन । दुर्लभचि जाण निश्चय तो ॥ ६ ॥
दावूनि आदर निराश जा करी । मजहूनि भारी कृशत्व त्या ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृतघ्न वा क्रूर । आळशी अपकारकर्ते कृश ॥ ८ ॥

५७७

पुत्रशोधार्थ जी आशा धांव घेई । मजहूनि पाहीं कृश तेचि ॥ १ ॥
संतत्यर्थ स्त्रिया पुत्रास्तव वृद्ध । करिती द्रव्यवंत आशा थोर ॥२॥
यौवनसंपन्न कुमारिकांप्रति । ऐकूनि त्या गोष्टी उपजे आशा ॥ ३ ॥
मजहूनि राया, जाणावी ते कृश । ऐकूनि मुनींस वंदी राव ॥ ४ ॥
अंतःपुरासवें प्रार्थूनियां म्हणे । इच्छितों पुत्राचें दर्शन मी ॥ ५ ॥
मुनिश्रेष्ठा, सर्व वदलांती सत्य । ऐकूनि मुनींस हास्य येई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्याची तया खूण । पटतां प्रसन्न मन होई ॥ ७ ॥

५७८

नृपाळासी पुत्र भेटवी तैं मुनि । तयाचे दावूनि दोष तया ॥ १ ॥
धर्ममय रूप दावूनि तयासी । सदय तेथेंचि हिंडूं लागे ॥ २ ॥
ऋषभ नृपासी कथिती प्रत्यक्ष । पाहिलें, न आस धरीं ऐसी ॥ ३ ॥
कथिताती भीष्म धर्मा, ऐसी आशा । त्यागूनि सुखाचा मार्ग धरीं
संकटीं परासी साह्यकर्ता तूंचि । स्वयेंही संकटीं पुशिसी मार्ग ॥५॥

यास्तव चित्ताचा निवारूनि ताप । कर्तव्यांत दक्ष व्हावें सदा ॥६॥
वासुदेव म्हणे भीष्मोक्त हे वाणी । सेवावी जाणूनि अमृत हें ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १२८ वा अध्याय समाप्त

अध्याय १२९ वा ५७९

धर्म म्हणे ताता, तृप्त मी सर्वदा । वीट न बोधाचा परी येई ॥ १ ॥
अमृतानें तृप्ति न होई कदापि । धर्मश्रवणाची स्थिति तेंवी ॥ २ ॥
कथिती त्या भीष्म गौतम-यमांचा । संवाद पूर्वीचा कथितों ऐकें ॥
पारियात्रगिरिसन्निध गौतम । षष्ठिसहस्राब्द करिती तप ॥ ४ ॥
एकदां त्या स्थानीं पाहूनि यमासी । वंदिती तयासी मुनिश्रेष्ठ ॥ ५ ॥
जोडूनियां कर मुनि म्हणे तया । ऋणमुक्त व्हावा केंवी नर ॥ ६ ॥
तैसाचि दुर्लभ पवित्र तो लोक । लाभेल जनांस केंवी सांगें ॥ ७ ॥
यम म्हणे सत्य धर्मासक्त व्हावें । तप आचरावें तेंवी शौच ॥ ८ ॥
मातापितरांची करूनियां पूजा । अश्वमेध साचा करणें योग्य ॥ ९ ॥
ऐशामार्गें लोक विस्मयकारक । कथी हें यमोक्त वासुदेव ॥ १० ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० राजधर्मपर्वाचा १२९ वा अध्याय समाप्त

अध्याय १३० वा ५८०

धर्म म्हणे ताता, मित्र, द्रव्य, मंत्र । जयाचे विफल दुर्दैवानें ॥ १ ॥
दुर्बलत्वें साम भेदही अशक्य । होतां अन्यमार्ग काय नृपा ॥ २ ॥
ऐशा विपत्तींत दुर्मार्गेंही धन । वेंचावें कीं प्राण जाऊं द्यावा ॥ ३ ॥
कथिती तैं भीष्म रहस्य नीतीचें । पुशिलेंसी मातें युधिष्ठिरा ॥ ४ ॥
पुशिल्यावांचूनि कथितों न कदा । प्रश्नचि हा ऐसा गूढ असे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे उत्तर प्रश्नाचें । देऊनि चित्तातें परिसा आतां ॥ ६ ॥

५८१

धर्मा, सद्धर्माचा निर्णय तो सूक्ष्म । गुरुवचें जाण अथवा शास्त्रें ॥
शास्त्रमार्गें सदाचारनिरत जो । दुर्लभ जनीं तो समजें नर ॥ २ ॥
बुध्याचि दुष्कर्में संपादूनि द्रव्य । लाभेल वैभव ऐसें नसे ॥ ३ ॥
लाभतां वैभव पुढती प्रजेसी । उपकारें सुखी करणें शक्य ॥ ४ ॥

परी न लाभतां उभयांचा नाश । यास्तव दुर्मार्ग चिंत्यचि हा ॥ ५॥
धर्मा, सद्धर्मद विपुल उपाय । म्हणे वासुदेव ऐका तेचि ॥ ६ ॥

५८२

धार्मिकत्वें मज रुचे न हा मार्ग । अंतीं दुःखप्रद निश्चयें हा ॥ १ ॥
सकलही शास्त्रें कथिती, प्रजेसी । दुःख देतां अंतीं नृपनाश ॥ २ ॥
शास्त्रावलोकन जैसें जैसें घडे । तैसें तैसें घडे ज्ञान नरा ॥ ३ ॥
पुढती तयासी उपजे ती गोडी । उपाय अज्ञासी न सुचे कांहीं ॥४॥
परी जया ज्ञान सुचे त्या उपाय । तेणें त्या वैभव प्राप्त होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रस्ताव यापरी । करूनि सुविचारी वदती भीष्म॥६॥

५८३

असूयारहित होऊनि निःशंक । सांगतों तें ऐक युधिष्ठिरा ॥ १ ॥
क्षीण होतां कोश सामर्थ्य विनष्ट । येतांचि दुर्भिक्ष नृपश्रेष्ठा ॥ २ ॥
निर्जल प्रदेशांतूनिही जनांसी । व्हावी जलपूर्ति जैशापरी ॥ ३ ॥
तैसें संकटांत घ्यावें प्रजाधन । पुढती अर्पून तोष द्यावा ॥ ४ ॥
आपत्कालीं गौणधर्म हा सर्वदा । होतसे हिताचा नृपाळासी ॥ ५ ॥
समर्थांचे तेंवी दुर्बलांचे धर्म । नृपा, जाणें अन्य हितप्रद ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे आपत्कालधर्म । सुचविती भीष्म ऐशापरी ॥ ७ ॥

५८४

धर्मा, द्रव्यावीण धर्माचार शक्य । चरितार्थ श्रेष्ठ धर्माहूनि ॥ १ ॥
असूनिही धर्मज्ञान जे दुर्बल । तयां धर्माचार शक्य नसे ॥ २ ॥
सद्धर्मेंही बल लाभे ऐसा मार्ग । नसेचि निश्चित पुण्यवंता ॥ ३ ॥
यास्तवचि आपत्कालीं अधर्मेही । धर्मत्वातें येई म्हणती ज्ञाते ॥ ४॥
न घडे अधर्म तेंवी शत्रुजय । ऐसाचि उपाय स्वीकारावा ॥ ५ ॥
स्वपर धर्माचा परम उद्धार । इच्छिणें विफल विपत्तींत ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सर्वही उपायें । निरामय व्हावें शास्त्र कथी ॥ ७ ॥

५८५

धर्माचार हेंचि धार्मिकां नैपुण्य । बाहूबल जाण क्षत्रियांसी ॥ १ ॥
विप्र तपस्वी ते वर्जूनि वृत्त्यर्थ । अपहार योग्य क्षत्रियातें ॥ २ ॥

अतिक्षीण होतां अयाज्य याजन । अभक्ष्यभक्षण विप्रातें जें ॥ ३ ॥
संकटग्रस्तासी निर्बंध न कांहीं । आपत्कालीं होई निंद्य वंद्य ॥ ४ ॥
विपत्तींत तोचि धर्म युधिष्ठिरा । विनाश टाळावा सकलमार्गें ॥ ५ ॥
राजाचि प्रजेचा होई विनाशक । प्रजासंरक्षक तेंवी तोचि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे आत्यंतिक पीडा । वर्जूनि कोणाचा सांभाळ न ॥ ७ ॥

५८६

धर्मा, काननिवासी । अन्नास्तव अन्या प्रार्थी ॥ १ ॥
काय इतरांची कथा । प्राप्त तया अन्य पीडा ॥ २ ॥
शंखलिखितवृत्तीनें । अशक्यचि नृपाजिणें ॥ ३ ॥
परस्परां व्हावें साह्य । तत्व कथिती हें आर्य ॥ ४ ॥
द्रव्य ओतूनि प्रजेतें । रक्षिताती जेंवी राजे ॥ ५ ॥
तेंवी संकटीं नृपासी । साह्य होतां प्रजा सुखी ॥ ६ ॥
स्वार्थास्तव नृपाळानें । वागूं नये भिन्नभावें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आतां । शंकरोक्त तत्व ऐका ॥ ८ ॥

५८७

क्षीण ज्याचें राष्ट्र जीविका न जेथें । अन्याची, तयातें धिक्कारचि ॥
कोश, सैन्य हेचि आधार राज्याचे । आधार सैन्यातें कोशचि तो ॥
धर्मप्रवृत्तीसी सैन्याचि कारण । आधार तो धर्म सकल सौख्यां ॥
तात्पर्य कोशचि सकलांचें मूळ । वृद्धि सर्वकाळ व्हावी त्याची ॥४॥
परपीडेवीण वृद्धि न कोशाची । कोशावीण कैसी बलइच्छा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कोषसंग्रहार्थ । पीडितां प्रजेस दोष नसे ॥ ६ ॥

५८८

यज्ञामाजी हिंसा कोशार्थ तैं पीडा । रायालागीं कदा दोष न तो ॥
सिद्ध असिद्धहि द्रव्योपाय सर्व । करावा निश्चय तारतम्यें ॥ २ ॥
एखादा व्यवहार यज्ञाचें साधन । यज्ञही साधन यज्ञा होई ॥ ३ ॥
यज्ञार्थ द्रव्याचा उपाय तो अन्य । सकल ते जाण यज्ञोपाय ॥ ४ ॥
अर्थसाधनाची स्थितीही तैसीच । अंतरीं चकित वासुदेव ॥ ५ ॥

५८९

धर्मा, यज्ञयूपछेदनासी आड । येती तेही वृक्ष छेदिताती ॥ १ ॥

छेदितां ते अन्य वृक्षांचाही छेद । परी ते यज्ञार्थ सकल क्षम्य ॥२॥
कोशसंग्रहार्थ विघ्न जें तयांचा । आवश्यक ऐसा नाश होई ॥ ३ ॥
इहपर सौख्य द्रव्यानेंचि प्राप्त । द्रव्यहीन प्रेतरूप तेणें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे यज्ञार्थ उपाय । योजूनियां सर्व द्रव्य जोडा ॥ ५ ॥

५९०

धर्मा, विहितही आपत्कालीं वर्ज्य । तैसेंचि निषिद्ध ग्राह्य ठरे ॥ १॥
जाणूनि हें तारतम्यभाव सदा । ठेवूनि धर्माचा मार्ग इष्ट ॥ २ ॥
आपत्तींत आपद्धर्मेचि तो धर्म । जाणूनि हें मर्म हित साधीं ॥३॥
वासुदेव म्हणे धर्माची सूक्ष्मता । होतां ईशकृपा ध्यानीं येई ॥ ४ ॥

५९१

संग्रही जो तोचि त्यागी नच होई । वनवासें नाहीं धनलाभ ॥ १ ॥
तैसेंचि हें सर्व लाभावें मजसी । इच्छा सकलांची हेचि नित्य ॥२॥
राज्याहूनि अन्य धर्म नसे कांहीं । विपत्काळीं होई अन्यधर्म ॥ ३ ॥
जोडिताती कोणी धन तें दानानें । तैसे कोणी कर्मैं धनवंत ॥ ४ ॥
तपानेंचि कोणी होती द्रव्यवंत । बुद्धीनें वा दक्ष धनिक होती ॥५॥
वासुदेव म्हणे ऐसे हे धनाचे । उपाय सुज्ञातें साह्यकारी ॥ ६ ॥

५९२

द्रव्यहीन तोचि दुर्बल जाणावा । सबल गणावा द्रव्यवंत ॥ १ ॥
सर्वलाभ घडे द्रव्यवंताप्रति । संकटविमुक्ति द्रव्यें होई ॥ २ ॥
धर्म, काम तेंवी इहपरसौख्य । पावे कोशवंत परी धर्मा ॥ ३ ॥
कोशवृद्धि सदा इच्छावी धर्मानें । कदा अधर्मानें इच्छूं नये ॥४॥
वासुदेव म्हणे राजधर्मपर्व । अर्पूं हें अपूर्व ब्रह्मदेवा ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत अभंग-भारतान्तर्गत शांतिपर्वांतील
राजधर्मपर्वाचा १३० वा अध्याय समाप्त.

## राजधर्मपर्व समाप्त

---

शांतिपर्वांतील राजधर्मपर्वाची अभंगसंख्या ५९२

— ॐ नमो भगवते वासुदेवाय —

# अभंग-भारत

( महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ )

## १२ शांतिपर्व

### आपद्धर्मपर्व २

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत ॥ १ ॥

अध्याय १३१ वा अभंग १ ला

नरनारायणां सरस्वती व्यासां । वंदूनि भारता पुढति गाऊं ॥ १ ॥
शांतिपर्वक्षीरसिंधूंतील रत्नें । गुंफूनियां यत्नें हार करूं ॥ २ ॥
प्रथम सर तो तेथ राजधर्म । आतां आपद्धर्म श्रवण करा ॥ ३ ॥
युधिष्ठिर पुशी पितामहांप्रति । क्षीण दीर्घसूत्री शंकाकुल ॥ ४ ॥
बंधुक्षयभयें परित्यक्तयुद्ध । षट्कर्णीही मंत्र झाला ज्याचा ॥ ५ ॥
विभागिलें ज्याचें राज्यही शत्रूंनीं । दैन्यें न सन्मानी मित्रांप्रति ॥६॥
बहु फाटाफूट ज्याच्या अमात्यांत । सैन्यही द्वारांत अरिचें ज्याच्या
दौर्बल्यें व्याकुळ शत्रूनें ज्या केलें । तयानें वर्तावें कैंवी सांगा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सर्व संकटांत । दावितील मार्ग आपद्धर्म ॥ ९ ॥

२

भीष्म निवेदिती धर्मा, जरी वैरी । वास्तव्य न करी निज राष्ट्रीं ॥१॥
धर्म्यद्रव्यार्जनकुशल तैं शुचि । असे तरी संधि करणें योग्य ॥२॥
पूर्वजोपभुक्त घ्यावा मात्र देश । वैरी दुष्ट श्रेष्ठ असतां तेंचि ॥ ३ ॥
प्रसंगीं नगरत्यागही करावा । परी संरक्षावा निजदेह ॥ ४ ॥
संरक्षितां शिर तुराही चढेल । लाभेल सकल पुनरपि ॥ ५ ॥
अंतःपुरास्तव व्हावी पराकाष्ठा । अंतीं तेही आशा सोडावीचि ॥
वासुदेव म्हणे आत्मबलिदान । व्यर्थ अभिमान धरूनि टाळा ॥७॥

३

धर्म म्हणे ताता, अंतरंग क्षुब्ध । जनही पीडित होती जरी ॥ १ ॥
तेंवी द्रव्यक्षय तैसा मंत्रभेद । होतां काय मार्ग निवेदा तें ॥ २ ॥
निवेदिती भीष्म अविलंबें सांधि । अथवा युद्धचि करणें घोर ॥ ३ ॥
अल्पसैनिकही ऐशा समयासी । जय संपादिती ध्यानीं असो ॥ ४ ॥
अनुरक्त इष्ट हृष्ट ते अल्पही । सैनिक विजयी होती नृपा ॥ ५ ॥
तैसेंचि समरमरण स्वर्गद । विजयानें राज्यलाभ घडे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शक्य तरी युद्ध । करणेंचि इष्ट नाशकाळीं ॥ ७ ॥

४

इष्ट तरी व्हावा सौम्यत्व स्वीकार । श्रद्धा परस्पर दावूनियां ॥ १ ॥
प्रगट रीतीनें घेऊनि शपथ । दावावा विश्वास वैऱ्याप्रति ॥ २ ॥
अंतःकलहचि असतां चातुर्यें । सामानें करावें पलायन ॥ ३ ॥
लंघूनि प्रदेश अनुकूल काल । येतांचि स्वबल प्रगटवावें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पाहूनि समय । आपत्तींत कार्य करिती ज्ञाते ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत अभंग-भारतान्तर्गत शांतिपर्वातील
आपद्धर्मपर्वाचा १३१ वा अध्याय समाप्त

अध्याय १३२ वा

५

सर्वलोकहितप्रदधर्मनाश । तेंवी सर्व मार्ग जीविकेचे ॥ १ ॥
आक्रमितां दुष्ट, अशक्य ज्यां त्याग । जीविका विप्रांस ऐशा काय॥

१ निकटचे मंत्री

धर्मप्रश्नासी या उत्तर भीष्मांचें । विज्ञान विप्रातें समर्थीं रक्षी ॥ ३ ॥
सुजनास्तवचि सर्व सर्व जनीं । दुर्जना हरूनि सुजना द्यावें ॥ ४ ॥
ऐसा जो नृपाळ सज्जनांचा त्राता । आपद्धर्मवेत्ता तोचि नृप ॥ ५ ॥
राज्यरक्षणार्थ नृपानें दात्याचें । धन तेंचि माझें म्हणूनि घ्यावें ॥६॥
वासुदेव म्हणे आपत्काळीं ज्ञाता । आपद्धर्में जातां दोष काय ॥ ७ ॥

६

जीविका जयांची सामर्थ्यैंचि घडे । उपाय न रुचे अन्य तयां ॥ १ ॥
आपद्धर्मावीण नसतां उपाय । जोडावें वैभव स्व-परराष्ट्रीं ॥ २ ॥
बुद्धिमंतें धनि असूनि कृपणा । दंडूनियां धना संपादावें ॥ ३ ॥
कदाही विप्राचा करूं नये वध । प्रमाण तयांस मानीं कार्यीं ॥ ४ ॥
ग्रामवासी जन परस्पर निंदा । करिती न त्यांचा वरणें मार्ग ॥ ५ ॥
सत्कार वा नाश तयांचें ऐकून । करूं नये जाण कवणाचाही ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे निंदितां सज्जना । झांकूनियां कर्णा निघूनि जावें ॥७॥

७

निंदा, पैशुन्य हा स्वभाव दुष्टांचा । सद्‌गुणचि नृपा कथिती संत ॥
दमिले[1] जे वृष तयांसम राजा । आधार धुरेचा होवो नित्य ॥ २ ॥
तेणें अन्याचेंही लाभे तया साह्य । श्रेष्ठ हा उपाय साह्यलाभा ॥ ३ ॥
धर्मा, सदाचारयुक्तही सदोष । असतां तयास दंडावेंचि ॥ ४ ॥
नसो दंडमूळ मत्सर वा लोभ । धर्ममात्र एक असो मूळ ॥ ५ ॥
दुर्वृत्त कोणीही असतां दंडार्ह । सर्वश्रेष्ठ वेद प्रमाण या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दंभाचारें अंतीं । पापाची प्रवृत्ति प्रगट होई ॥ ७ ॥

८

वरि वरि दृष्टि असे सामान्यांची । खूण अंतरींची न कळे तयां ॥१॥
आन्विक्षिक्यादि ते अथवा धर्मादि । लक्षूनि जो कथी धर्मज्ञ तो ॥२॥
धर्माश्रयस्थान सर्पपादांसम । शोधणें कठीण धर्मराजा ॥ ३ ॥

१ वजविल्यामुळें शांत झालेले.

रुधिरलिप्त तें विद्ध मृगपद । लक्ष्मी अन्यपद जयापरी ॥ ४ ॥
तैसा धर्मबोध होतसे युक्तीनें । कथिलें प्रेमानें तत्व तुज ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सत्संगें विनीत । राजर्षीचें वृत्त कथिलें ऐसें ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १३२ वा तथा आपद्धर्मपर्वाचा २ रा अ. समाप्त

अध्याय १३३ वा

९

शत्रुराष्ट्रांतूनि संपादावें द्रव्य । सकलवैभवमूळ कोश ॥ १ ॥
सन्मानूनि मान्यां पालनेंचि धन । जोडावें हा धर्म ईश्वरोक्त ॥ २ ॥
केवळ शुचित्वें अथवा क्रौर्यानें । जोडूं नये जाणें धन कदा ॥ ३ ॥
मध्यम मार्गानें वाढवावा कोश । तेंवी दुर्बलास कोश लाभे ॥ ४ ॥
कोशहीना बल बलहीना कोश । कदाही न लभ्य ध्यानीं असो ॥५॥
सामर्थ्यविहीना राज्यलाभ नसे । राज्याविण कैसें स्थिर भाग्य ॥
उच्चपदस्थांसी लक्ष्मीचा विनाश । तेंचि मरणदुःख मूर्तिमंत ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कोश, बल, मित्र । वाढवावे नित्य नृपाळानें ॥ ८ ॥

१०

धनहीन नृपा सन्मानीना कोणी । द्रव्यानेंचि जनीं मानिती त्या ॥१॥
पापही तयाचें झांकिते संपत्ति । अवयव झांकी वस्त्र[1] जेंवी ॥ २ ॥
गुप्तशत्रु ऐसी साधिताती संधी । नृपें यास्तवचि करणें यत्न ॥ ३ ॥
यत्नचि पौरुष मानिताती ज्ञाते । नृपानें कोणातें नमूं नये ॥ ४ ॥
मृगांसवें वास करावा वनांत । साह्य तस्करांस परी न व्हावें ॥५॥
क्रूरकर्मा साह्य तस्करांचें सैन्य । लाभतांही कर्म निंद्यचि तें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अमर्याद ऐसा । तस्करांही राजा अप्रियाचि ॥ ७ ॥

११

यास्तव मर्यादा जनसंतोषार्थ । स्थापाव्या अत्यल्प कार्यातेंही ॥१॥
इहपर भय नसे नास्तिकासी । वाटतां, जनांसी नृपाळा त्या ॥ २ ॥
जनांचा विश्वास प्राप्त नच होई । सर्वदाचि येई शंका जनां ॥ ३ ॥
सज्जनही त्याज्य मर्यादा त्यागितां । मर्यादा पाळितां दस्युग्राह्य ॥४॥

१ दाखवी

युद्धाविण वध, परदारामर्ष । हरणें विप्रवित्त, कृतघ्नता ॥ ५ ॥
समूळ विनाश, दारापहरण । दस्यूंचें हें कर्म सुधारावें ॥ ६ ॥
सुजनांही नित्य दावूनि विश्वास । करिती विनाश दुष्ट दस्यु ॥ ७ ॥
न करावा नाश समूळ दस्यूंनीं । मानावें न जनीं क्रौर्या शौर्य ॥ ८ ॥
आपणासमचि वागती इतर । तत्व निरंतर ध्यानीं घ्यावें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे सद्वर्तनें राव । जोडील अपूर्व यश लोकीं ॥ १० ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १३३ वा तथा आपद्धर्मपर्वाचा ३ रा अ. समाप्त

अध्याय १३४ वा

१२

धर्म अर्थ दोन्हीं ज्ञात्यांचे या जनीं । सफल ते मानीं सर्वकाळ ॥१॥
तयांमाजी होऊं नये व्यवधान । धर्मफल जाण परोक्ष तें ॥ २ ॥
आपत्तींत तेणें केवळ धर्मेचि । पाहूनियां शक्ति गमवूं नये ॥ ३ ॥
धर्माधर्म दोन्हीं परोक्ष फलद । प्रत्यक्ष सामर्थ्य संपादावें ॥ ४ ॥
सामर्थ्यवंतचि संपादील सेना । अधीन हें जाणा जग त्याच्या ॥ ५ ॥
अनाढ्य जो तोचि जाणावा पातकी । अल्प धन लोकीं उच्छिष्टचि ॥
वासुदेव म्हणे बलाढ्यासी कोणी । अपाय या जनीं न करी भयें ॥

१३

धर्म बल दोन्हीं अधिकारस्थित । असतां तें नष्ट महाभय ॥ १ ॥
परी धर्माहूनि बलचि वरिष्ठ । बळेंचि धर्मास स्थैर्य येई ॥ २ ॥
किंबहुना भूमि आधार तरूंची । आधार धर्मासी तेंवी बल ॥ ३ ॥
अधीन वायूच्या जैसा असे धूम । तैसा बळाधीन धर्म असे ॥ ४ ॥
वृक्षावरी जेंवी लतेची न सत्ता । बलापुढें तैसा धर्म दीन ॥ ५ ॥
भोगवंताधीन जयापरी सौख्य । धर्म तैं अंकित बलाढ्याच्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बळी तोचि शुचि । असाध्य तयासी नसे कांहीं ॥

१४

दुराचारी बलहीनाचें रक्षण । न होईचि जन निंदिती त्या ॥ १ ॥
निंद्य जीवन तें मरणचि लोकीं । छिद्रें हृदयासी पाडी निंद्य ॥ २ ॥
ऐशावेळीं वेद-विप्रसेवा योग्य । प्रसन्न ज्ञात्यांस करूनि घ्यावें ॥ ३ ॥
औदार्य मार्दव सत्कुळीं विवाह । वर्णावे गुणांस आपुल्याचि ॥ ४ ॥

थोरांचें स्तवन, करूनि सत्कर्में । विप्र क्षत्रमनें तोषवावीं ॥ ५ ॥
दुर्लक्षूनि लोकनिंदेसी सत्कर्म । आचरितां जन गुण गाती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सत्कर्में दुष्कर्म । होऊनियां क्षीण पुण्य लाभे ॥ ७ ॥

इतिश्रीवासुदेवकृत शांति० अ. १३४वा तथा आपद्धर्मपर्वाचा ४ था अ.समाप्त

अध्याय १३५ वा

१५

क्षत्रियापासूनि निषादकन्येस । कायव्य नामक पुत्र झाला ॥ १ ॥
क्षत्रियधर्मातें पाळूनि तो धन्य । जाहला सद्गुण संपादूनि ॥ २ ॥
प्रहारकुशल बुद्धिमंत शूर । बहुश्रुत क्रूर प्रसंगीं तो ॥ ३ ॥
विप्रप्रिय गुरुपूजक तो होता । राजा हो दस्यूंचा म्हणती दस्यु ॥४॥
प्रतिग्रहशून्य विप्रांच्या सदनीं । गुप्तत्वें नेऊनि ठेवी धान्य ॥ ५ ॥
तयाप्रति दस्यू म्हणति सर्वज्ञा । पाळीं तूंचि आम्हां पित्यासम ॥६॥
वासुदेव म्हणे कायव्य तयांसी । वदला जें तेंचि परिसा आतां ॥७॥

१६

परस्त्रीअपहारादिक दस्युगुण । दस्यू हो, त्यागून सुखी व्हावें ॥ १ ॥
सत्कर्मासी विघ्न करूं नये कदा । विप्रांतें सर्वदा संरक्षावें ॥ २ ॥
निंदी वा विनाश इच्छी जो विप्रांचा । तम सूर्यें तैसा नाश पावे ॥
दुष्टदंडणार्थ जाणा राजदंड । शिष्टपीडकांस दंड योग्य ॥ ४ ॥
परपीडेनें जे पावताती वृद्धि । प्रेत कीटकाचि वध्य जाणा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दस्यू धर्ममार्गें । जातील तयांतें सिद्धि लाभे ॥ ६ ॥

१७

दस्यु कायव्यवचनें । नित्य वागेल सत्कर्में ॥ १ ॥
पापकर्मविनिर्मुक्त । होऊनि ते होती आढ्य ॥ २ ॥
सत्कर्में या कायव्यासी । सिद्धि प्राप्त होई मोठी ॥ ३ ॥
चिंती कायव्य चरित्र । वन्यपीडा न तयास ॥ ४ ॥
भीति नसेचि तयासी । दुर्जन वा श्वापदांची ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे हित । करितां अन्याचें, स्वहित ॥ ६ ॥

इतिश्रीवासुदेवकृत शांति० अ. १३५ वा तथा आपद्धर्मपर्वाचा ५ वा अ. समाप्त

अध्याय १३६ वा

१८

कोशवृद्धीस्तव कथिलें ब्रह्मचान । धर्मा, दक्षतेनें ऐकें तेंचि ॥ १ ॥
ब्रह्मस्व देवस्व हरूं नये कदा । दस्यु दुर्जनांचा हरणें अर्थ ॥ २ ॥
धर्मा, जगीं सर्व भोग क्षत्रियांचे । सैन्यही यज्ञीं तें उपयोजावें ॥३॥
अभोग्य औषधि छेदूनि तेणेंचि । अन्न शिजविती ध्यानीं घेईं ॥ ४ ॥
देव पितर वा मनुष्यपोषण- । विहीन, तें धन निरर्थक ॥ ५ ॥
ऐसें निरर्थक धन नृपाळानें । हरितां न जाणें पाप तया ॥ ६ ॥
हरूनि तें धन दुःख जितुक्यांसी । त्याहूनि आधिकांसी सौख्य होई
वासुदेव म्हणे प्रमाण, पावित्र्य । ध्यानीं घेती आर्य प्रतिकर्मी ॥ ८ ॥

१९

हरूनि जो ऐसें धन सज्जनांसी । अर्पी स्वहस्तेंसी धर्मज्ञ तो ॥ १ ॥
यथाशक्य यज्ञ-याग आचरूनि । परलोकसाधनीं दक्ष व्हावें ॥ २ ॥
निर्हेतुक कीटांसम यज्ञहीन । मानव जन्मून व्यर्थ होती ॥ ३ ॥
दंश मक्षिका तैं अंडज ते जैसे । जनही ते तैसे धर्महीन ॥ ४ ॥
रजःकण जेंवी हालवितां क्षीण । तैसा यांचा धर्म क्षीण असे ॥५॥
वासुदेव म्हणे अत्यल्पही धर्म । कृमिकीटप्राण संरक्षक ॥ ६ ॥

इतिश्रीवासुदेवकृत शांति० अ. १३६वा तथा आपद्धर्मपर्वाचा ६ वा अ. समाप्त

अध्याय १३७ वा

२०

पूर्वीचि सावध पुढती वा तोचि । जगीं सौख्य भोगी अदक्ष न ॥१॥
एतद्विषयक कथा घेईं ध्यानीं । म्हणताती पाहीं भीष्म धर्मा ॥ २ ॥
उथळ विपुल मत्स्ययुक्त देशीं । वास्तव्य करिती तीन मत्स्य ॥३॥
दीर्घदर्शी एक समयज्ञ अन्य । दीर्घसूत्री जाण तृतीय मत्स्य ॥ ४ ॥
तलाव धीवर एकदां सच्छिद्र- । करूनि, निर्जल करिती यत्नें ॥ ५ ॥
दीर्घदर्शी तदा जाणूनि संकट । म्हणे हें त्वरित स्थान त्यागूं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दीर्घदर्शी सुज्ञ । पाही तें न अज्ञ पाहूं शके ॥ ७ ॥

२१

दीर्घसूत्री म्हणे त्वरा कासयासी । दावीन मार्गासी अन्य म्हणे ॥ १ ॥

ऐकूनि तें दीर्घदर्शी सोडी स्थान । पुढती दारुण विघ्न येई ॥ २ ॥
धीवरांनीं भिन्न भिन्न मार्गें मत्स्य । वधूनि, तडाग आक्रमिला ॥ ३ ॥
समयज्ञ जालस्थित मत्स्यांमाजी । घुसूनि रज्जूसी धरूनि राहे ॥
बद्ध ते सकल मानूनि धीवर । उदकीं सकळ नेती स्वयें ॥ ५ ॥
प्रक्षाळितां जाई जळीं समयज्ञ । दीर्घसूत्री अज्ञ मरूनि गेला ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दीर्घसूत्री जन । संकट दारुण भोगीताती ॥ ७ ॥

२२

कला काष्ठा दिन काल हा जाणावा । पृथ्वीचि गणावा सकल देश ॥
अदृष्ट तो काळ जाणूनि सावध । राही तोचि दुःख निवारील ॥ २ ॥
सकल पुरुषार्थांमाजी हा सिद्धांत । जाणूनियां दक्ष तोचि ज्ञाता ॥
सद्विचारी यत्नशील देशकाल । प्रयत्नें अनुकूल करूनि घेई ॥ ४ ॥
आनुकूल्यें त्यांच्या होई फलप्राप्ति । वासुदेव चिंती दक्षत्वें हें ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १३७ वा तथा आपद्धर्मपर्वाचा ७ वा अ. समाप्त


अध्याय १३८ वा

२३

धर्म म्हणे ताता, धर्मज्ञही राजा । शत्रुग्रस्त होतां मार्ग काय ॥ १ ॥
संकटांत शत्रु गांजण्यासी सिद्ध । मित्रही विरुद्ध होतां काय ॥ २ ॥
संधि विग्रह वा करावा कोणासी । तुजवीण कथी ऐसा कोण ॥ ३ ॥
निवेदिती भीष्म कार्यानुरोधेंचि । मित्र शत्रु होती, शत्रु मित्र ॥ ४ ॥
परिस्थिति सदा जाणें ती अनित्य । ठेवावा विश्वास तारतम्यें ॥५॥
सर्वदा संधीचि होई हितप्रद । तारतम्य ज्यास तोचि सुखी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मार्जार-मूषक । संवाद धर्मास कथिती भीष्म ॥ ७ ॥

२४

महा वटवृक्ष होता एका वनीं । वसती त्या स्थानीं विविध पक्षी ॥
हिंस्र पशूंनीं तो झाला होता व्याप्त । 'पलित' मूषक वसे तेथें ॥
बिळांत तो वसे, शाखेवरी एक । मार्जार 'लोमश' नामें वसे ॥३॥
प्रतिदिनीं एक चांडाळ त्या स्थानीं । जाल विस्तारूनि प्राणि वधी ॥
पुढती एका दिनीं कूटयंत्रीं बद्ध । जाहला लोमश योगायोगें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पाहूनि पलित । संचार हर्षितचित्तें करी ॥ ६ ॥



शत्रूंत या श्रेष्ठ शत्रु हा मार्जार । रक्षणाचें द्वार तोचि मज ॥
संकटीं तयाच्या साह्य मी होईन । स्वयेंही वांचून चातुर्यानें ॥ आपद्धर्मपर्व अ. १३८

२५

शोधितां तयासी लाभे मांसखंड । कूटयंत्रस्थित हर्षें भक्षी ॥ १ ॥
इतुक्यांत एक 'हरिण' नामक । नकुल मूषकास अवलोकी ॥ २ ॥
दिवांध मूषकशत्रु वृक्षावरी । पाहूनि अंतरीं पलिता भय ॥ ३ ॥
भयविव्हल तो मूषक मनांत । चिंतूनियां मार्ग योजी कांहीं ॥ ४ ॥
म्हणे नीतिमार्गें जाई तया भय । शोधितां उपाय कांहीं नसे ॥ ५ ॥
शत्रूंत या श्रेष्ठ शत्रु हा मार्जार । रक्षणाचें द्वार तोचि मज ॥ ६ ॥
संकटीं तयाच्या साह्य मी होईन । स्वयेंही वांचून चातुर्यानें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे एकमेकां साह्य । संकटीं उपाय हाचि एक ॥ ८ ॥

२६

बलाढ्य परी हा मूढ संकटांत । कथितां त्या हित कार्यसिद्धी ॥ १ ॥
सन्निधही कदा बलाढ्य शत्रूही । आश्रयासी होई योग्य जनीं ॥ २ ॥
शत्रूही पंडित बहु बरा लोकीं । मूढ तो मित्रही अयोग्यचि ॥ ३ ॥
स्वसंरक्षणार्थ मार्जारासी आतां । सन्मार्ग दावितां जीविताशा ॥४॥
चिंतूनियां ऐसें अर्थशास्त्रज्ञाता । मूषक मार्जारा कुशल पुशी ॥ ५ ॥
म्हणे मित्रा, तव इच्छितों कल्याण । सर्वांचें कल्याण व्हावें सदा ॥
वासुदेव म्हणे सचिंत मार्जार । मूषकोक्ति धीर देई तया ॥ ७ ॥

२७

मार्जारा संकटीं मार्ग एक असे । हित उभयांचें साधे जेणें ॥ १ ॥
दुष्कर तो असे, परी विवेकानें । आचरितां जाणें स्वहितलाभ ॥२॥
पाही तो दुर्बुद्धि उलूक मजसी । क्रूर त्याची दृष्टी भक्षणार्थ ॥ ३ ॥
सप्तपदें होई मैत्री सज्जनांची । पंडित तूं होसी मित्र माझा ॥ ४ ॥
यास्तव होईन साह्य मी तुजसी । रक्षीन संकटीं पाशच्छेदें ॥ ५ ॥
परी तूं न माझा करावासी वध । एकमेकां साह्य होऊं ऐसे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मूषक चतुर । नीतियुक्त बोल वदला ऐका ॥ ७ ॥

२८

अग्रभागीं तुझें वास्तव्य मी तळीं । वास्तव्य या स्थळीं बहुकाळ ॥
विश्वास एकाचा अन्यावरी सदा । नसतां अन्याचा उभयां दुःख ॥

याचसाठीं वाढो परस्परप्रेम । संधि हीच जाण उभयांप्रति ॥ ३ ॥
साधावें हें कैंवी निवेदितों ऐक । रक्षूं एकमेक एकमेकां ॥ ४ ॥
नराधारें काष्ठ काष्ठाधारें नर । होऊं परस्पर पार तेवीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि हितोक्ति । मार्जार तयासी वदला ऐका ॥ ६ ॥

२९

जया दंताग्रें प्रतीक्ष्ण । नेत्र वैडूर्यसमान ॥ १ ॥
मार्जार तो मूषकासी । म्हणे स्नेह तूं इच्छिसी ॥ २ ॥
मित्रा, पडलों संकटीं । तुज मोठीच विपत्ति ॥ ३ ॥
जरी जाणसी तूं मार्ग । तरी न लावीं विलंब ॥ ४ ॥
अभिमान गळला माझा । करीं उपकार आतां ॥ ५ ॥
नाहीं विस्मृति होणार । शरण पातलों साचार ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वेळ । कार्य अशक्य घडवील ॥ ७ ॥

३०

चातुर्यें मूषक म्हणे मार्जारासी । न वधीं मजसी जवळीं येतां ॥ १ ॥
उलूक नकुळ वधितील मज । संकटीं या अद्य संरक्षावें ॥ २ ॥
शपथपूर्वक कथितों तुजसी । तव पाशमुक्ति करीन मी ॥ ३ ॥
ऐकूनि मार्जार म्हणे ये सत्वरी । एकचि अंतरीं धीर तव ॥ ४ ॥
उपकारकर्ता प्रथम तो थोर । कैसे उपकार फिटती त्याचे ॥ ५ ॥
विश्वास यापरी संपादूनि दक्ष । मार्जारासन्निध बसला सौख्यें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मातापित्यांसम । मूषक सप्रेम अंकीं बैसे ॥ ७ ॥

३१

नकुल उलूक होऊनि विस्मित । गेले स्वस्थळास निराशेनें ॥ १ ॥
मूषक तैं सावकाश तोडी पाश । मार्जार तयास त्वरा करी ॥ २ ॥
मार्जारासी तदा बोलला, मूषक । कालज्ञ मी धाक न धरीं मनीं ॥ ३ ॥
शस्त्रयुक्त व्याध येतां तो सन्निध । तोडीन हे पाश न करीं चिंता ॥
तेणें उभयांचें होईल कल्याण । गांठूं निजस्थान आनंदानें ॥ ५ ॥
ऐसें नच होतां विघ्न उभयांसी । यास्तव त्वच्चित्तीं शंका नको ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे चातुर्यानें नर । पावतो आधार शत्रूचाही ॥ ७ ॥

३२

मार्जार मूषका म्हणे कालक्षेप । करिसी कां सांग मित्रकार्यी ॥ १ ॥
नव्हेचि कीं ऐसें प्रेमाचें लक्षण । सत्वरि त्वत्प्राण वांचविले ॥ २ ॥
विसरूनि पूर्व वैर करीं कार्य । संपलेंचि वय अथवा माझें ॥ ३ ॥
पूर्वी जें अज्ञानें घडलें तें क्षमीं । प्रसन्न होऊनि रक्षीं मज ॥ ४ ॥
ऐकूनि मूषक म्हणे हे चतुरा । जाणितों स्वकार्या उभयहि ॥ ५ ॥
नैमित्तिक मित्रापासूनि सावध । राहणें उचित सर्पासम ॥ ६ ॥
कार्यानुरोधेंचि शत्रुत्व मित्रत्व । स्वयें शत्रुमित्र नसे कोणी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे गजाचे गजासी । कारण बंधासी अरण्यांत ॥ ८ ॥

३३

स्वकार्यनिबद्ध अन्य कार्यी बद्ध । होतसे मनुज नियमाचि हा ॥ १ ॥
कार्य होतां कोणी न बघे कोणासी । ज्ञाता कार्यपूर्ति न करी तेणें ॥
उलूकभयेंचि होतासी तूं स्वस्थ । जातांचि तो, मज करिसी त्वरा ॥
एकचि सन्मित्रा, उरला आतां पाश । छेदीन सहज समयींचि तो ॥
संकटग्रस्तांचा संवाद यापरी । होतां होतां झाली सुप्रभात ॥ ५ ॥
इतुक्यांत आला क्रूर व्याध तेथें । सभोंवतीं होते श्वान त्याच्या ॥
वासुदेव म्हणे इष्टानिष्ट क्षण । न टळेचि जाण योग्य वेळीं ॥ ७ ॥

३४

चतुर मूषकें जाणूनि ती वेळ । छेदिला तत्काळ जालतंतु ॥ १ ॥
मार्जार-मूषक तत्क्षणीं पळाले । लपूनि बैसले निजस्थानीं ॥ २ ॥
निराश होऊनि आंवरूनि जाल । व्याध निजस्थळ गांठी दुःखें ॥३॥
ऐसा मुक्त होतां अशिष्ट मार्जार । बिलद्वारावर झेंप घेई ॥ ४ ॥
म्हणे मित्रा, मज भेट दे सत्वरी । येई माझ्या घरीं आनंदानें ॥ ५ ॥
जीवदान मज दिधलें जयानें । तयाच्या सन्मानें तोषेन मी ॥ ६ ॥
बुद्धिमंता, होई अमात्य तूं माझा । लवही न शंका धरीं मनीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे चतुर मूषक । देई प्रत्युत्तर तेंचि ऐका ॥ ८ ॥

३५

पलित मूषक म्हणे मार्जारासी । परीक्षा मित्राची कठिण असे ॥१॥

शत्रु मित्रासम वागताती कोणी । मित्रचि वा कोणी होती शत्रु ॥
विकारवशां त्यां सामाचें न भान । स्वयंभू कोणी न शत्रुमित्र ॥ ३ ॥
कार्यानुरोधेंचि शत्रुत्व मित्रत्व । कोणी नित्य मित्र शत्रूही न ॥ ४ ॥
सर्वदा विश्वास नसो कोणावरी । मित्र होतां वैरी सर्वनाश ॥ ५ ॥
माता पितरेंही त्यागिती पुत्रातें । स्वार्थ सकलांतें प्रिय होई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मूषक मार्जारा । कथी बोधधारा सुधामय ॥ ७ ॥

३६

पुरा पातलासी सदनीं तूं माझ्या । आसक्तीनें तदा नव्हतें भान ॥१॥
तेणें कूटयंत्रीं जाहलें पतन । विकारें चित्त न स्थिर राहे ॥ २ ॥
निष्कारण प्रेम नसेचि कोणाचें । बंधन स्वार्थाचें सकलांमाजीं ॥३॥
क्रोध प्रेमही ते करिताती आप्त । हाचि एक भेद आप्तप्रेमीं ॥ ४ ॥
दानें भाषणें वा सत्कर्मेंही कोणी । करिताती जनीं प्रेम जाणें ॥ ५ ॥
सकारण स्नेह संपतां कारण । संपे हा नियम कथिती ज्ञाते ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे व्यवहारीं स्वार्थ । एकचि निमित्त स्नेहाप्रति ॥ ७ ॥

३७

मार्जारा, कारण संपतांही प्रेम । करिसी तैं मन साशंकित ॥ १ ॥
स्नेहकारणही पालटे कालानें । रहस्य हें जाणे सुज्ञ तोचि ॥ २ ॥
परस्परां साह्य जाहलों आपण । वांचविले प्राण उभयांनीं ॥ ३ ॥
निमित्त संपतां दुर्बलावरी कां । तव बलवंताचा लोभ ऐसा ॥ ४ ॥
भक्षणावांचूनि उपयोग माझा । तुजसी न आतां स्पष्टचि हें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे समसमां संधि । योग्य इतरांसी कार्यार्थाचि ॥ ६ ॥

३८

मित्रा, जरी माझें इच्छिसी कल्याण । तरी जा निघून सदनीं सुखें ॥
भक्षकांचें प्रेम सहज भक्ष्यावरी । जाणूनि अंतरीं भय वाटे ॥ २ ॥
दुरूनही तुज पाहूनि मजसी । वाटे बहु भीति जातों आतां ॥ ३ ॥
कृतज्ञता जरी असेल अंतरीं । तरी राखीं मैत्री सत्यभावें ॥ ४ ॥
दिसे जरी शांत स्वभाव निर्दय । सर्वदा संशय घ्यावा त्याचा ॥५॥
कार्य जरी तव स्वार्थाविण अन्य । करावें कथन तरी मज ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे निर्भीड वर्तन । करिती सज्जन दुर्जनासी ॥ ७ ॥

३९

मार्जारा, मी तुज सर्वही देईन । परी वांचवीन प्राण माझे ॥ १ ॥
कारण ऐश्वर्य लाभे पुनरपि । असतां सुस्थिति स्वदेहातें ॥ २ ॥
अंतरीं जयाच्या शत्रूचा निर्धार । निश्चय अचल सदा त्याचा ॥ ३ ॥
ऐकूनि मार्जार म्हणे मित्रा, तव । संशय हा योग्य निःसंशय ॥ ४ ॥
परी कृतज्ञ मी तैसाचि धर्मज्ञ । दोष मजसी न देई ऐसा ॥ ५ ॥
ऐशा अविश्वासें परिवारासह । त्यागीन हा देह परम दुःखें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कृतज्ञ आपण । म्हणती दुर्जन स्वमुखेंचि ॥ ७ ॥

४०

चतुर मूषक म्हणे तैं मार्जारा । लौकिक ऐकिला तुझा बहु ॥ १ ॥
तुजवरी बहु करितों मी प्रेम । परी विश्वास न तुझ्यावरी ॥ २ ॥
अपार धनेंही शत्रूचा विश्वास । धरूं नये हेंच कथिती शुक्र ॥ ३ ॥
दुर्बल सबल एका कार्यी व्यग्र । असतां मैत्रीस योग्य होती ॥ ४ ॥
परी कार्य होतां दुर्बलें विश्वास । ठेवितां विनाश होई त्याचा ॥ ५ ॥
दुर्बलही अविश्वासें संरक्षित । विश्वासें विनाश सबलांचाही ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दुर्बलाचें बल । दक्षता सकल कार्यी हेंचि ॥ ७ ॥

४१

ऐकूनि मूषकवाणी तो मार्जार । स्थान तें सत्वर त्यजूनि गेला ॥ १ ॥
मूषकही अन्य बिळामाजी जाई । चातुर्यें तो होई ऐसा मुक्त ॥ २ ॥
धर्मा, दुर्बलेंही समर्थासी संधि । करूनि हितासी चुकूं नये ॥ ३ ॥
निर्भयापरीच वागावें संकटीं । दक्ष जो तयासी बहु मार्ग ॥ ४ ॥
निर्भयता तेवीं विश्वास दावावा । सत्याचा धरावा मार्ग सदा ॥ ५ ॥
धर्मा, विप्रांप्रति रक्षावें सर्वदा । मार्ग कल्याणाचा दाविती ते ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्माप्रति भीष्म । निवेदिती ज्ञान ऐशापरी ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १३८ वा तथा आपद्धर्मपर्वाचा ८ वा अ. समाप्त

## अध्याय १३९ वा

४२

धर्म म्हणे ताता, विश्वासावांचून । व्यवहार कठिण जनांमाजी ॥ १ ॥
भीष्म धर्माप्रति कथिती संवाद । ऐका बोधप्रद तोचि आतां ॥ २ ॥

कांपिल्य नगरीं ब्रह्मदत्त राजा । 'पूजनी' नामका पक्षिणीतें ॥ ३ ॥
सांभाळी, तियेसी येती पक्षिभाषा । प्रसवली एका पुत्राप्रति ॥ ४ ॥
त्याचवेळीं पुत्र राजातेंही होई । कृतज्ञ जाणावी पक्षिणी ते ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पक्षिणी ते दोन । पुत्रांतें आणून अर्पी फळें ॥ ६ ॥

४३

बल तेजोवृद्धि होई त्या फळांनीं । पुष्टि तीं भक्षूनि राजपुत्रा ॥१॥
एकदां तो पाही पक्षिणीच्या पिला । करी बाललीला सहज कांहीं ॥
परी लीलेनें त्या होई घोरकर्म । पिलाचा त्या प्राण निघूनि गेला ॥
पक्षिणीसी वृत्त कळतां ते दुःखी । प्रेम क्षत्रियांसी म्हणे नसे ॥ ४ ॥
नित्य अपकार करूनि अन्याचें । सांत्वन नित्य ते करिती व्यर्थ ॥५॥
कृतघ्न पोराचा घ्यावा म्हणे सूड । चिंतूनियां नेत्र फोडी त्याचे ॥६॥
वासुदेव म्हणे दुःखदप्रसंगीं । जनीं चित्तशांति कठिण असे ॥ ७ ॥

४४

पूजनी उडोनि आकाशांत बोले । कदाही न टळे कर्मफल ॥ १ ॥
पौत्र प्रपौत्र वा भोगितोचि फल । कदाही निष्फल नसे कर्म ॥ २ ॥
ऐकुनि तें राव म्हणे पूजनीसी । जाहली कर्मांची फिटंफाट ॥ ३ ॥
आतां सुखें माझ्या मंदिरीं तूं राहें । ते कथी ज्ञात्या हें नसे मान्य ॥
कदाही न योग्य साम वैऱ्यासवें । विश्वासें त्या पावे मूढ नाश ॥५॥
वासुदेव म्हणे वैरभावनाश । समूळ कदाच होत नसे ॥ ६ ॥

४५

पुत्र-पौत्रांचा विनाश । वैरभावें होई साच ॥ १ ॥
जाहलें न तैसें जरी । सद्गति न वैरें तरी ॥ २ ॥
नसो विश्वास दुष्टांचा । सर्वत्रचि असो शंका ॥ ३ ॥
माता-पितरें ते श्रेष्ठ । जनीं बांधव हें स्पष्ट ॥ ४ ॥
कांता मूळ वार्धक्यासी । पुत्र बीजभूत लोकीं ॥ ५ ॥
बंधु शत्रूचि ते स्पष्ट । स्वार्थापुरेसेचि मित्र ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कोणी । कोणाचाही नसे जनीं ॥ ७ ॥

४६

अपकारकर्ता सन्मानीही जरी । विश्वास अंतरीं न बसे त्याचा ॥१॥
त्यागाचि तयाचा इष्ट सात्विकासी । वैरें या त्यागचि नृपा योग्य ॥२॥
राव म्हणे अये, पूजनी हें कृत्य । दोषार्ह न मज ऋणमुक्ति ॥ ३ ॥
यास्तव न जाईं, बोले तैं पूजनी । करितां शिक्षा जनीं वैर होई ॥४॥
जयासी जो करी शिक्षा ते उभय । अंतरीं स्वभाव जाणिताती ॥५॥
राव म्हणे फल जयाचें त्या लाभे । सख्यैंचि तयांचें वैर नासे ॥६॥
पक्षिणी तैं बोले निर्मूल न वैर । होई थोर थोर फंसले तेणें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्वपक्षस्थापना । करिताती नाना यत्नें जीव ॥ ८ ॥

४७

ब्रह्मदत्त राव म्हणे हे पूजनी । सख्य होई जनीं श्वपच-श्वानां ॥ १ ॥
भक्ष्यभक्षकही सहवासें ऐसे । पावती सख्यातें अनुभव हा ॥ २ ॥
पूजनी निवेदी कारणें वैराचीं । स्त्री, गृह, जाति, वाणी, गुन्हा ॥ ३ ॥
वैरेंही दात्याचा करूं नये वध । बलाबल मात्र ध्यानीं घ्यावें ॥ ४ ॥
काष्ठामाजी अग्नि वसे गुप्तरूपें । तैसेंचि वैर हें समजें जनीं ॥ ५ ॥
कोण्याही उपायें वैराग्नि न शमे । नाश जैं एकातें शमे तदा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे यापरी पक्षिणी । नृपाळसदनीं न वसें म्हणे ॥ ७ ॥

४८

पुजनीतें म्हणे राव । कालाचा हा खेळ सर्व ॥ १ ॥
जन्म-मृत्यूही नरासी । येई एकाचि समयासी ॥ २ ॥
प्रवृत्त तो करी काल । परिणाम भोगी जीव ॥ ३ ॥
बांधी अनेकांसी एक । कालचि हा जाणें स्पष्ट ॥ ४ ॥
करूं परस्परां क्षमा । वास करीं तूं या स्थाना ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे काल । सर्व कर्ता म्हणे राव ॥ ६ ॥

४९

पूजनी नृपासी म्हणे काल जरी । कारण कां तरी वैर होई ॥ १ ॥
पाप-पुण्यासीही न उरे कारण । यदि कालाधीन सकल क्रिया ॥ २ ॥
तात्पर्य वैराचें निर्मूलन कदा । न होईचि राजा, ध्यानीं असो ॥ ३ ॥

राव म्हणे नसे अविश्वासें सौख्य । अविश्वास एक मृत्यूचि तो ॥
पक्षिणी तैं म्हणे विरुद्ध क्रियेचें । फलही नरातें तैसें लाभे ॥ ५ ॥
अनुभव ऐसा प्रत्यहीं या जनीं । उद्योगीं पाहोनि रमती ज्ञाते ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे उद्योगेंचि दैव । दैवेंचि उद्योग सफल होई ॥ ७ ॥

५०

राया, प्रयत्नावांचूनि । दैव विफलचि जनीं ॥ १ ॥
करूनिही सर्वत्याग । जगीं साधावें स्वहित ॥ २ ॥
विद्या, शौर्य तैं दक्षता । शक्ति, धैर्य या पंचका ॥ ३ ॥
म्हणती नैसर्गिक मित्र । होचि जीविका ज्ञात्यांस ॥ ४ ॥
गृह-दारादिक लाभ । जनीं होतसे सर्वत्र ॥ ५ ॥
सदा सर्वत्र ज्ञात्यासी । वाण नसे आनंदासी ॥ ६ ॥
कोणी भय त्या दाविना । दावितांही तो कांपेना ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ज्ञाता । अभिवृद्धि पावे सदा ॥ ८ ॥

५१

गृहदारासक्त तेंवी बुद्धिमंद । विषयलंपट क्षीण होती ॥ १ ॥
बुद्धिभ्रष्ट कोणी गृह भूमि देश । मानूनियां निज कष्टताती ॥ २ ॥
व्याधि दुर्भिक्षादि येतां स्वदेशही । त्यागूनि जो जाई तोचि सुखी ॥
नित्य बहुमान वसावें त्या स्थानीं । अथवा त्यागूनि जावें सौख्यें ॥
पत्नी, पुत्र, राजा, मित्र तेंवी देश । दुष्ट होतां त्याग करणें योग्य ॥
प्रियभाषिणी ते पत्नी, तोचि पुत्र । जयामुळें सौख्य पित्यालागीं ॥
विश्वासार्ह तोचि सन्मित्र जाणावा । जीविका ज्या ठाया तोचि देश ॥
बलात्कार कोणी न करी कोणासी । शासनें ज्या तेंचि राज्य म्हणा ॥
वासुदेव म्हणे दारिद्र्याचें भय । नसे तोचि स्नेह हितप्रद ॥ ९ ॥

५२

माता, पिता, गुरु, पालक, कुबेर । अग्नि, यम सर्व नृप एक ॥ १ ॥
स्वधर्मं जो प्रजाविश्वास संपादी । तोचि राव जगीं हितकर्ता ॥ २ ॥
बलवंताप्राति विरोध न इष्ट । करितां विरोध सौख्यनाश ॥ ३ ॥
निवेदिती भीष्म बोलूनियां ऐसें । पक्षिणी स्थान तें त्यजूनि गेली ॥

वासुदेव म्हणे संवाद हा श्रेष्ठ । जाणे तो वरिष्ठ नीतिज्ञाता ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ.१३९ वा तथा आपद्धर्मपर्वाचा ९ वा अ. समाप्त

अध्याय १४० वा

५३

युगक्षयें धर्म क्षीण होतां ताता । कैसी दस्युपीडा निवारावी ॥ १ ।
निवेदिती भीष्म राव शत्रुंजय । भरद्वाज काय वदले तेंचि ॥ २ ॥
सौवीरपती तो भारद्वाजांप्रति । म्हणे अप्राप्ताची प्राप्ति कैंवी ॥ ३ ॥
प्राप्ताची संवृद्धि तेंवी तत्पालन । उपयोगज्ञान द्यावें मुने ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे निर्णयज्ञ मुनि । मधुरवचनीं कथिती ऐका ॥ ५ ॥

५४

दंडोद्युक्त सदा नृपानें असावें । मूळचि शोधावें परपक्षाचें ॥ १ ॥
सहाय्यक सर्व करावे स्वाधीन । योजावें साधन योग्य तेंचि ॥ २ ॥
वाणीमाजी मात्र नम्रता असावी । तीक्ष्ण धार यावी हृदयासी ॥३॥
उभयहितार्थ सामही करावा । विश्वास नसावा परी तेथें ॥ ४ ॥
कार्योत्तर व्हावें तत्काळ विभिन्न । मधुर भाषण त्यजूं नये ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सर्प वेश्मासम । व्हावें सावधान अरिसी सदा ॥ ६॥

५५

शक्यतों शत्रूचा व्हावा तिरस्कार । खेद कार्योत्तर प्रदर्शावा ॥ १ ॥
भावी लाभ नित्य दावावा मूढासी । दावावा ज्ञात्यासी साक्षात् लाभ
वंदन तैं अश्रुप्रमार्जन तैंही । करावें समयीं कल्याणार्थ ॥ ३ ॥
प्रसंगीं शत्रूसी स्कंधींही वहावें । परी आपटावें समय येतां ॥ ४ ॥
क्षणभरी तरी प्रज्वाळावी ज्योत । धुमसणें व्यर्थ दीर्घकाल ॥ ५ ॥
कृतघ्नाचा कदा संबंध नसावा । अपूर्ण राखावा कार्यभाग ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कार्य पूर्ण होतां । अवमान साचा करिती मूढ ॥ ७ ॥

५६

कोकिल, वराह, मेरु, शून्यग्रह । नट तेंवी भक्त अनुसरावे ॥ १ ॥
परस्पर पुष्टि शत्रुनिर्मूलन । मेरूउल्लंघन कठिण जेंवी ॥ २ ॥
शून्यगृहीं धन बहुरूपी नट । आराध्यउत्कर्ष भक्त इच्छी ॥ ३ ॥
सद्गुण हे सदा स्वीकारावे नृपें । कुशल शत्रूचें पुसणें नित्य ॥ ४॥

आळशी क्लीब तैं अभिमानयुक्त । लोकरंष भीत कालाधीन ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐशा दुर्बलांची । कदां हेतुसिद्धि घडेचिना ॥ ६ ॥

५७

कूर्मांगासमान रक्षावीं निजांगें । छिद्रांसी रक्षावें दक्षतेनें ॥ १ ॥
अर्थ ध्यानीं बक, पराक्रमीं सिंह । विनाशनीं वृक, घातें शर ॥ २ ॥
ऐसें नृपाळानें असावें सर्वदा । मद्य द्यूत स्त्रिया उपयोजाव्या ॥ ३ ॥
आसक्ति न बहु योग्य तयां ठाईं । चाप तृणाचेंही समयीं योग्य ॥
मृगासम निद्रा सावध असावी । अंधत्व समयीं स्वीकारावें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे बधिरत्व तेंही । स्वहितार्थ पाहीं स्वीकारावें ॥ ६ ॥

५८

योग्य देश काल पाहूनि विक्रम । चातुर्येंचि जाण आचरावा ॥ १ ॥
आक्रमितां सैन्य निग्रही न तोचि । खेचरीसमचि नष्ट होई ॥ २ ॥
सफल न जरी जाहला उद्योग । सफलता भास करणें योग्य ॥ ३ ॥
सफलता येतां पीडूं नये कोणी । सावध या कामीं असणें सदा ॥
प्रसंगीं नृपानें दाखवावी आशा । दावावीं त्या वचा पुढती विघ्नें ॥
सहेतुक तया दावावीं कारणें । आपद्धर्म म्हणे वासुदेव ॥ ६ ॥

५९

जोंवरी न भय भीतवद्वर्तावें । येतां निवारावें निर्भयत्वें ॥ १ ॥
कल्याणाचें मूळ जाणावीं संकटें । निवारी जो त्यातें यशस्वी तो ॥
अनागतभय पूर्वींचि जाणावें । येतां निवारावें चातुर्यानें ॥ ३ ॥
निवारितांही तें दक्षचि असावें । उन्मत्त न व्हावें विजयोन्मादें ॥४॥
उपस्थित त्याग अनागतचिंता । कदा बुद्धिमंता रुचेचिना ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विश्वास शत्रूचा । वृक्षाग्रींची निद्रा तेंवी घोर ॥ ६ ॥

६०

मृदु दारुण वा आचरूनि कर्म । निवारावें दैन्य सद्धर्मार्थ ॥ १ ॥
शत्रू जे शत्रूचे असावे ते ज्ञात । हेरही ते गुप्त ओळखावे ॥ २ ॥
गुप्तचि राखावें आपुल्या हेरांसी । जावे शत्रुराष्ट्रीं नास्तिक ते ॥ ३ ॥

१ लोकापवादास भिणारा. २ गरोदर खेचरी प्रसूतिसमयीं मरते.

उपवनें पाणपोया धर्मशाळा । पानगृहें, वेश्या, तीर्थें, सभा ॥ ४ ॥
ऐशास्थानीं दुष्ट धर्मविध्वंसक । शोधूनि तयांस निग्रहावें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दुष्टांचा विनाश । करणें हें इष्ट नृपालागीं ॥ ६ ॥

६१

अश्रद्धेयावरी विश्वास नसावा । कोठेंचि नसावा अतिविश्वास ॥
परीक्षेवांचूनि ठेवितां विश्वास । भय मानवांस प्राप्त होई ॥ २ ॥
बहुत विश्वास दावावा शत्रूसी । साधूनियां संधि करणें घात ॥ ३ ॥
विश्वासार्होचीही मनीं घ्यावी शंका । संशय खळाचा घ्यावा सदा
विश्वासें जें प्राप्त विघ्नें त्या विनाश । दावूनि विश्वास वध्य शत्रु
वासुदेव म्हणे गुरुपुत्र मित्र । जाणावा दंडार्ह विघ्नकारी ॥ ६ ॥

६२

सन्मानावा शत्रु परी फलफूल । यत्नाचें सकळ उच्छेदावें ॥ १ ॥
हिंसेविण मत्स्यघातकी न सुखी । लाभे तैं संपत्ति नृपाळातें ॥ २ ॥
सहज मित्र वा शत्रूही न कोणी । सामर्थ्ये या जनीं मूळ तया ॥३॥
शत्रूवरी कदा करूं नये दया । वधचि दुष्टाचा योग्य असे ॥ ४ ॥
लोकानुरंजन सर्वदा साधावें । तेंवी निग्रहावें तयां यत्नें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे नृपाळानें सदाँ । संतोष जनांचा संपादावा ॥ ६ ॥

६३

आघाताचे पूर्वी आघात समयीं । आघात केल्याही वदणें प्रिय ॥१॥
छेदूनियां शिर रोदनही व्हावें । आव्हानही द्यावें मृदुशब्दें ॥ २ ॥
शुष्कवैर कदा न घडो कोणासी । व्यर्थ आयुष्याची हानी तेणें ॥३॥
शृंगभक्षणानें होई दंतभंग । तेंवी रसास्वाद लाभेचिना ॥ ४ ॥
परस्पर बाधा तेंवी बलाबल । जाणूनि घ्या फल पुरुषार्थाचें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कौशल्यें मर्यादा । पाळील तयाचा जन्म सार्थ ॥ ६ ॥

६४

ऋण, अग्नि, शत्रु, शेष न राखावा । निर्मूल करावा व्याधि यत्नें ॥१॥
इष्ट कार्यसिद्धि व्हावी योग्य मार्गें । सावध असावें सर्वकाळ ॥ २ ॥

जननाश, मार्गछेद, गृहनाश । करूनि अरिराष्ट्र विध्वंसावें ॥ ३ ॥
गृध्रदृष्टि, बकस्थैर्य, श्वाननिद्रा । विक्रम असावा सिंहासम ॥ ४ ॥
साशंक सर्वदा व्हावें काकासम । भुजंगासमान आचरावें ॥ ५ ॥
नमावें शूरासी भीरूमाजी भेद । लोभ्याप्रति वश करणें द्रव्यें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे समानासी युद्ध । करूनि स्वहित सिद्ध होई ॥ ७ ॥

६५

बहुजनांचिया नेत्यामाजी भेद । होई तरी नित्य संरक्षावें ॥ १ ॥
मित्रांमाजी भेद पाडी जरी वैरी । संरक्षावें तरी तयांप्रति ॥ २ ॥
अमात्यही भेदांतूनि संरक्षावे । होऊं नच द्यावें ऐक्य त्यांचें ॥ ३ ॥
मृदुतीक्ष्णही न असावें नृपानें । जाणूनियां व्हावें समयापरी ॥ ४ ॥
सौम्यमार्गें भयप्रदही वैऱ्यासी । जिंकिती ते पाहीं तीक्ष्ण खरे ॥५॥
वासुदेव म्हणे ज्ञात्यांचा विरोध । मानूनियां सौख्य मानी मूढ ॥६॥

६६

ज्ञानीयाचे बाहु दिसती त्याहूनि । प्रदीर्घ या जनीं असती नित्य ॥१॥
असूनि ते दूर पीडिती वैऱ्यासी । दुर्लंघ्य प्रवाहीं तरूं नये ॥ २ ॥
पुनरपि ज्याचें संभवे हरण । पदार्थहरणवर्ज्यचि ते ॥ ३ ॥
अशक्य जयांचें निर्मूलन ऐसें । खनन वृक्षाचें व्यर्थ असे ॥ ४ ॥
शिरच्छेद ज्याचा अशक्य तयातें । करिती न ज्ञाते शस्त्राघात ॥ ५ ॥
राया, आपत्काळीं मार्ग हे वरावे । पापद जाणावे अन्य वेळीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सुवीराधिपातें । वैभव या मार्गें प्राप्त झालें ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १४० वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. १० समाप्त

अध्याय १४१ वा

६७

धर्म म्हणे ताता, हीनत्वासी धर्म । येई अतिक्रम करितां जनीं ॥ १ ॥
अधर्मचि धर्म, धर्म तो अधर्म । मर्यादा संपूर्ण नष्ट तेणें ॥ २ ॥
धर्मनिश्चयाचा पडतां संदेह । शत्रु तैं नृपाळ देतां पीडा ॥ ३ ॥
आधारभूतचि निपजतां अन्न । प्रतिबद्ध कर्म होतां विघ्नें ॥ ४ ॥
काम लोभ मोहें सकलांसी भय । विश्वास सकळ उडूनि जातां ॥५॥
परस्पर वध पावतां कपटें । वंचनाचि स्वार्थें करितां सर्व ॥ ६ ॥

प्रदीप्तचि जणु होतां सर्व देश । अनावृष्टि भेद सर्वठाईं ॥ ७ ॥
जीविकेचे मार्ग होतां दस्युग्रस्त । सदय विप्रांस मार्ग काय ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे आपत्काळीं ऐशा । सन्मार्ग नृपाचा पुशी धर्म ॥ ९ ॥

६८

निवेदिती भीष्म धर्मा, योगक्षेम । वृष्टि, व्याधि जाण मरण, भय ॥
सकलांसी एक राजाचि कारण । युगकर्ता जाण राजा एक ॥ २ ॥
निश्चय हा परी प्रजादोषकारी । काळ येतां वरी मार्ग सुज्ञ ॥ ३ ॥
निवेदितो तोचि, ज्ञानाचा आश्रय । करूनियां श्रेय संपादावें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पुरातन एक । कथिती संवाद भीष्म धर्मा ॥ ५ ॥

६९

त्रेता-द्वापारांच्या संधीमाजी जाण । पडलें अवर्षण एक घोर ॥ १ ॥
वृद्धिंगत तदा होती बहु प्रजा । प्रलयचि साचा भासे लोकां ॥ २ ॥
बृहस्पति वक्री कुलक्षणी चंद्र । धुकेंही न तेथ मेघ कैंचे ॥ ३ ॥
जलाशय नद्या सर्व होती शुष्क । स्वाहा स्वधाकार नष्ट होती ॥४॥
सभा, प्रपा, यज्ञ अध्ययन, कृषि । गोरक्षण आदि सकल नष्ट ॥५॥
क्रयविक्रय ते उत्सवही नष्ट । घोर हाहाःकार सर्वठायीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे परब्रह्म अन्न । व्यर्थ अन्नाविण सर्व कांहीं ॥ ७ ॥

७०

झालीं नगरें ओसाड । ग्रामें पावलीं तीं दग्ध ॥ १ ॥
पिसाळले हिंस्रपशु । प्रजादुःख काय कथूं ॥ २ ॥
धेनु, महिषी नष्ट होती । लोक परस्परां भीती ॥ ३ ॥
वध जाहला विप्रांचा । नाश सर्व औषधींचा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे भूमि । गेली स्मशान होऊनि ॥ ५ ॥

७१

भयंकर ऐसा काळ प्राप्त झाला । विलयासी गेला सकळ धर्म ॥ १ ॥
ऋषीही आपुले नियम सोडूनि । हिंडती अवनी अन्नास्तव ॥ २ ॥
एकदां महर्षिश्रेष्ठ विश्वामित्र । होई क्षुधाक्रांत भ्रमतां मही ॥ ३ ॥
पुत्रकलत्रांचा त्याग एकास्थानीं । करूनियां, अग्नि त्यजूनि जाई ॥

भक्ष्याभक्ष्य दोन्ही लेखूनि समान । चांडाळसदन अवलोकिलें ॥५॥
वासुदेव म्हणे श्वपच तो वनीं । नित्य हिंसाकर्मी रमला ऐसा ॥ ६॥

७२

छिन्नघटखंड अयुत चर्मखंड । सर्वत्र उदंड मृतपशु ॥ १ ॥
पशुमस्तकांच्या नरोट्या सर्वत्र । तेंवी प्रेतवस्त्रराशी होत्या ॥ २ ॥
निर्माल्य पुष्पांनीं शृंगारिलीं गृहें । सर्पकांति चिन्हें तयांवरी ॥ ३ ॥
कुक्कुट-गर्दभनाद तें कोंदला । कटुशब्दें झाला घोर नाद ॥ ४ ॥
लोहघंटाध्वनि श्वानसमुदाय । म्हणे वासुदेव तयास्थानीं ॥ ५ ॥

७३

क्षुधाकुल मुनि अन्नार्थ त्या स्थानीं । भिक्षाही मागूनि श्रांत झाला ॥
फल मूल अन्न मांसही न मिळे । व्याकुळ जाहले प्राण तदा ॥ २ ॥
चांडाळसदनीं पडतां तो अंतीं । दिसलें तयासी श्वानमांस ॥ ३ ॥
म्हणे आपत्काळीं चौर्यही करूनि । प्राणसंरक्षणीं दोष नसे ॥ ४ ॥
त्यांतही विप्रातें अवश्य विहित । प्रथम निकृष्टग्रहण[1] योग्य ॥ ५ ॥
लाभे न तें तरी समानग्रहण[2] । तेंही लाभतां न प्रयत्नानें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अंतीं धार्मिकाचें । हरितां धन नसे दोष विप्रा ॥ ७ ॥

७४

चिंतूनियां ऐसें त्याचि स्थळीं मुनि । मिथ्याचि वरूनि पडला निद्रा
अंतीं सर्व लोक पाहूनि निद्रिस्थ । प्रवेशे गृहांत चांडाळाच्या ॥२ ॥
चाहूल ती येतां 'मांसरज्जु कोण । हालवी तत्प्राण घेईन मी' ॥३॥
अंत्यज यापरी वदतां कंपित । कथी विश्वामित्र निज नाम ॥ ४ ॥
ऐकूनि चांडाळ उठूनि त्या वंदी । म्हणे या प्रसंगीं काय हेतु ॥ ५ ॥
विश्वामित्र तदा म्हणे मी क्षुधित । प्राणरक्षणार्थ मांसइच्छा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे क्षुधाक्रांत मुनि । म्हणे रक्षितों मी प्राण माझे ॥ ७ ॥

७५

क्षुधाचि हें पाप घडवी चांडाळा । याचितां लाभला नाहीं ग्रास ॥
सर्वभोजी अग्नीसम मी ब्राह्मण । जाणूनि हें कर्म आचरितों ॥ २ ॥

१ निकृष्ट जातीच्या पुरुषाकडून द्रव्य घेणें, २ समान जातीयाकडून द्रव्य घेणें

ऐकूनि चांडाळ म्हणे ऐका धर्म । श्रेष्ठ कांहीं अन्य मार्ग योजा ॥३॥
शृगालाहूनिही श्वानमांस निंद्य । त्यांतही हे निंद्य जंघा असे ॥ ४ ॥
चांडाळसदनीं ऐसी निंद्य वस्तु । चोरणें हा हेतु त्याज्य तुम्हां ॥५॥
धर्मसंकर हा येणें तपोहानी । तुम्हीं महामुनि ध्यानीं आणा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे चांडाळ मुनीतें । रक्षावया कैसें वदला ऐका ॥ ७ ॥

७६

मुनि म्हणे अन्य मार्ग नसे मज । आपत्कालीं दोष नसे कांहीं ॥ १ ॥
रक्षावें सकळां क्षत्रियांचा धर्म । अभक्ष्यदोष न समयीं विप्रा ॥ २ ॥
मरणाहूनि हें जीवितचि श्रेष्ठ । विद्या, तपें पाप नाशीन हें ॥ ३ ॥
श्वपच तैं म्हणे आयुर्बलवृद्धि । कदाही नसेचि श्वानमांसें ॥ ४ ॥
पंचनख तेचि भक्ष्य तुम्हांप्रति । शास्त्रमर्यादा ही ध्यानीं असो ॥५॥
मुनि म्हणे अन्यमांसलाभ मज । न घडे राक्षस पचवी मुनी ॥ ६ ॥
चांडाळ तें म्हणे निंद्यचि हें वाटे । योग्य तरी याचें ग्रहण करा ॥७॥
वासुदेव म्हणे धर्मसंरक्षण । करिती झटून चांडाळही ॥ ८ ॥

७७

विश्वामित्र म्हणे शिष्टांचें वर्तन । निर्णय तो मान्य धार्मिकांसी ॥१॥
श्वपच निवेदी असज्जनक्रिया । नव्हे मुनिराया, धर्म कदा ॥ २ ॥
मुनि म्हणे ऋषि करिती न पाप । पशुभावें मृग-श्वान सम ॥ ३ ॥
येरु म्हणे विप्रहितार्थ अगस्ति- । कर्म आणा चित्तीं धर्मचि तो ॥४॥
नाना प्रयत्नांनीं रक्षावे ब्राह्मण । अगस्तीचें कर्म त्याचि न्यायें ॥५ ॥
वासुदेव म्हणे संवाद हा श्रेष्ठ । जाणूनि सुपंथ वरणें जनीं ॥ ६ ॥

७८

चांडाळ निवेदी मुने, इहलोकीं । धर्मज्ञ त्यागिती प्राणातेंही ॥ १ ॥
अभक्ष्यभक्षण वर्जिती ते परी । संतोष अंतरीं होई त्यांच्या ॥ २ ॥
यास्तव प्राणार्थ भक्षूनि अभक्ष्य । मुने धर्मभ्रष्ट होऊं नये ॥ ३ ॥
मरणचि तरी येवो अभक्ष्यानें । चांडाळासी म्हणे मुनिश्रेष्ठ ॥ ५ ॥
परी उपवासी जीवनें धर्माचा- । लोप तैं ज्ञानाचा नाश होई ॥५ ॥
पापाचि हें तरी नाशीन सत्कर्में । रक्षूनि देहातें संकटीं या ॥ ६ ॥
ज्ञाता मी तरी हें पुण्यचि होईल । अज्ञानें लागेल पाप जरी ॥ ७ ॥

अज्ञानें लागेल पाप तरी तपें । नाशीन पापातें तपस्वी मी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे विपत्कालीं देह । रक्षावा हा भाव कौशिकाचा ॥९॥

७९

श्वपच म्हणे मी चांडाळ तुम्हासी । निंदूनि दोषासी पात्र झालों ॥
परी तुम्हांहस्तें न होवो हें पाप । हेतु अंतरांत हाचि माझ्या ॥ २ ॥
विश्वामित्र तदा बोले सरोवरीं । आक्रोश दर्दुरीं मांडितांही ॥ ३ ॥
प्राशितीच जल धेनु आनंदानें । दोष न त्या कर्में तेंवी एथ ॥ ४ ॥
धर्मोपदेशाचा नसे अधिकार । तुजसी साचार स्वस्थ वैसें ॥ ५ ॥
मित्रभावें म्हणे चांडाळ कथितो । कदाही न घडो लोभें पाप ॥ ६॥
वासुदेव म्हणे मुनि श्वानजंघा । सोड म्हणे आतां धर्मज्ञ मी ॥ ७ ॥

८०

चांडाळ तैं म्हणे देतां घेतां पाप । यास्तव हें कृत्य न रुचे मज॥१॥
मुनि म्हणे प्रश्न जीवन वा मृत्यु । हेंचि कथावें तूं चिंतूनियां ॥ २ ॥
येरु म्हणे कुलाचारत्यागें पाप । काय तें सर्वांस ज्ञात होई ॥ ३ ॥
यास्तव श्वमांस भक्षील जो त्यातें । दोषयुक्त ऐसें कृत्यचि न ॥४॥
विश्वामित्र म्हणे केवळ प्राणार्थ । असतांही दोष करणें कृत्य ॥ ५ ॥
बोले तैं श्वपच त्यागितां प्रामाण्य । दोष लवही न कवण्या कर्मी ॥
वासुदेव म्हणे यापरी विचार । धर्मार्थ चांडाळ विप्रांचाही ॥ ७ ॥

८१

मुनि म्हणे महादोष न या कर्मीं । पाप निवारूनि पुढती पुण्य ॥१ ॥
श्वपच तैं म्हणे आधींच अभक्ष्य । जंघास्थानदोष तेंवी बहु ॥ २ ॥
दोष लवहीन येवो मजप्रति । दोष हा कर्त्यासी आवश्यक ॥ ३ ॥
बोलूनियां ऐसें स्वस्थ तो श्वपच । घेऊनि जंघेस गेला मुनि ॥ ४ ॥
पुढती मुनीनें दैवपितृकर्म । करितां पर्जन्य वर्षी इंद्र ॥ ५ ॥
आस्वादही तदा न चाखितां मुनि । रमला स्वधर्मी पुढती सौख्यें ॥
ऐसी तारतम्यें टाळावी आपत्ती । वांचतां पुढती पुण्य घडे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीष्म धर्माप्रति । कथिती सद्बुद्धि स्वीकारावी ॥८॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १४१ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ.११ समाप्त

अध्याय १४२ वा

८२

धर्म म्हणे ताता, अविश्वासार्हेचि । थोरांची हे कृति वाटे मज ॥१॥
मोह पावूनियां खेद वाटे मज । शैथिल्य धर्मास येई माझ्या ॥ २ ॥
नीचकर्म काय दस्यूचें याहूनि । शंका बहु मनिं बळ पावे ॥ ३ ॥
कथिती तें भीष्म ज्ञात्याची हे सीमा । आपत्काळीं जनां मार्ग दावी
बहुमार्गें ज्ञान संपादावें नृपें । बहुविध असे धर्ममार्ग ॥ ५ ॥
अध्ययनकाळीं ज्ञान हें लाभतां । शास्त्रबलयुक्ता तया सौख्य ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गूढ आपद्धर्म । घ्यावा संपादून महायत्नें ॥ ७ ॥

८३

आपत्काळीं कर अधिक जो घेई । दोष न त्या देई सुज्ञ कदा ॥ १ ॥
सत्य मिथ्या ऐसे प्रकार ज्ञानाचे । सज्जनमान्य जें तेंचि ज्ञान ॥ २ ॥
मूढ नीतिशास्त्रा देती अप्रामाण्य । शास्त्राचें वचन दावूनियां ॥ ३ ॥
अर्थशास्त्राहूनि धर्मशास्त्र श्रेष्ठ । कथिती सिद्धांत अस्थानींचि ॥४॥
विद्या कीर्ति काम जीविका जयांसी । जाणे पापराशी तयांप्रति॥५॥
वासुदेव म्हणे अप्रौढ बुद्धि ते । सिद्धांत न त्यांतें कळती कदा ॥६॥

८४

शास्त्रपाटव न पूर्वग्रहदुष्ट । लाविती जे दोष शास्त्राप्रति ॥ १ ॥
अनाधिकारी ते करिती शास्त्रचौर्य । सर्वज्ञ चतुर म्हणती मीचि॥२॥
बाणासम त्यांची वाणी लक्ष्यवेधी । ते विद्याव्यापारी राक्षसचि॥३॥
सज्जनांचाही जो दांभिक आचार । तयाचा न स्पर्श घडो धर्मा ॥
केवळ शास्त्रें वा केवळ बुद्धीनें । अशक्य जाणणें धर्मतत्व ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे बुद्धि आणि शास्त्र । बृहस्पतिमत साह्य दोघां ॥ ६ ॥

८५

युक्तिसिद्धही तें वचन शास्त्राचें । आपुल्याचि मतें उल्लंघिती ॥ १ ॥
लोकहितार्थचि तस्कर वधावे । ज्ञात्यांचें हें घ्यावें मत ध्यानीं ॥ २॥
मतभेद ऐसे ज्ञात्यांचेही होती । चालवावी मति तेथ स्वयें ॥ ३ ॥
क्रोध, शास्त्रभ्रांति अथवा अज्ञान । सुज्ञाचें, सुजाण संगें जाई ॥४॥
ज्ञात्यांच्या सभेंत बोलतां ज्ञात्यांचे । नष्ट होती साचे सकल दोष ॥

श्रुतिसंमत तो तर्क तें वचन । प्रशंसार्ह जाण निश्चयानें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे केवळ वचन । तर्कही प्रमाण केवळ न ॥ ७ ॥

८६

संशयोच्छेदक ज्ञान तेंचि सत्य । धर्मा, जन्म तुज क्रूरकर्मा ॥ १ ॥
अज अश्व तेंवी क्षत्रिय ब्रह्मयानें । निर्मिले, वधानें उद्धारार्थ ॥ २ ॥
अवध्यांचा वध वधार्हरक्षण । पातकेंचि जाण उभय हीं ॥ ३ ॥
धर्ममर्यादा हे दस्यु उल्लंघिती । मर्यादा पाळिती तेचि ज्ञाते ॥ ४ ॥
तीक्ष्णपणें प्रजा रक्षावी स्वधर्मी । श्रेष्ठ हाचि जनीं राजधर्म ॥ ५ ॥
ऐसें नच होतां वृकासम प्रजा । भक्षी एकमेकां मूढस्वार्थें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बकासम जेथ । तस्कर तो नृप अधम जाणा ॥ ७ ॥

८७

धर्मा, यास्तव तूं वेदशास्त्र ज्ञाते । मंत्री कुलीन ते योजूनियां- ॥ १ ॥
पालन पृथ्वीचें करीं, सामादिक । जाणे न जो भेद षंढचि तो ॥ २ ॥
उग्र सौम्य तारतम्यें होऊनियां । कठोर पाळावा स्वधर्मचि ॥ ३ ॥
क्षत्रियांचा ऐसा धर्म कष्टप्रद । निग्रहावे दुष्ट सुजनांस्तव ॥ ४ ॥
आपत्कालीं हेंचि शुक्रोक्तवचन । करील कल्याण नृपाळाचें ॥ ५ ॥
देवतांचि मानीं धर्मा, ब्राह्मणांसी । रुष्ट ते विषाचि, तुष्ट सुधा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे आत्यंतिक प्रेमें । धर्माप्रति भीष्में कथिला बोध ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १४२ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. १२ समाप्त

अध्याय १४३ वा

८८

धर्म म्हणे ताता, हे शास्त्रनिष्णाता । रक्षी शरणागता पुण्य त्याचें ॥
कथावें मजसी, भीष्म त्या कथिती । कथा कपोताची परिसावी ते
मुचकुंदाप्रति कथिली भार्गवें । पापनाश पावे श्रवणें ऐसी ॥ ३ ॥
साक्षात् मृत्युरूप होता एक व्याध । कृष्णवर्ण रक्तनेत्र त्याचे ॥ ४ ॥
आप्त मित्रही त्या नव्हताचि कोणी । क्रूरता जाणूनि त्यागिलें त्या ॥
वासुदेव म्हणे आत्मघातक्याचा । त्यागचि सर्वदा सुजनां योग्य ॥ ६ ॥

८९

क्रूर दुष्टांचें त्या भय सर्पासम । व्याध हरी प्राण पशुपक्ष्यांचे ॥ १ ॥

जीविका तयाची बहुदिन ऐसी । भार्येवीण त्यासी नसे कोणी ॥ २ ॥
एकदां तो वनीं असतां प्रचंड । सुटला तो वात, गगनीं मेघ ॥ ३ ॥
नौकाच्छन्न सिंधुसम भासे नभ । पर्जन्य क्षणांत वर्षी इंद्र ॥ ४ ॥
जलमय तदा जाहली धरणी । शीतबाधा वनीं व्याधाप्रति ॥ ५ ॥
थंडीनें व्याकुळ होऊनियां गेला । आसरा तयाला न दिसे कोठें ॥
वासुदेव म्हणे पशुपक्षी त्रस्त । होतें भयग्रस्त सकल वनीं ॥ ७ ॥

९०

अचेतनासम व्याध । झाला सोसेन त्या शीत ॥ १ ॥
एक कपोती तयासी । दिसली कांकडत होती ॥ २ ॥
पडली होती भूमीवरी । व्याधें पाहूनि सत्वरी ॥ ३ ॥
देई पंजरीं फेंकून । दुःख अन्याचें तया न ॥ ४ ॥
जीव पापासक्त ऐसा । संकटींही करी पापा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे नीच । करी सदा घोर कृत्य ॥ ६ ॥

९१

इतुक्यांत पुष्पफलाकीर्ण एक । दिसे महावृक्ष व्याधाप्रति ॥ १ ॥
अनेक पक्ष्यांचा आधार तो होता । भासला तो लोकां साधूसम ॥२॥
तारका गगनीं चमकूं लागल्या । उमलल्या कळ्या लक्षावधि ॥ ३ ॥
चंद्रविकासी तीं कमळें फुललीं । सरोवरामाजी तैसें नभ ॥ ४ ॥
जाणूनियां रात्र जाहली बहुत । वास्तव्यचि व्याध करण्या सिद्ध ॥
वनदेवतांसी प्रार्थूनियां पर्णें । अंथरूनि केलें शयन सौख्यें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दुष्टासीही कोणी । नसावा या जनीं दुष्ट वाटे ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १४३ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. १३ समाप्त

अध्याय १४४ वा

९२

वृक्षावरी तया कपोतवास्तव्य । होतें बहुकाळ सपरिवार ॥ १ ॥
प्रातःकाळीं अद्य कांता चरावया । गेली ते न राया, फिरूनि आली
सायंकाळीं तिज आठवूनि पक्षी । म्हणे काय स्थिति प्रिये तव ॥ ३ ॥
सुखरूप जनीं असेल कीं प्रिया । हाय हाय दैवा सदन ओस ॥ ४ ॥
पुत्र-पौत्र स्नुषा सेवकयुक्तही । स्मशानींचि, गृहीं भार्येवीण ॥ ५ ॥

गृह तें न गृह गृहिणीचि गृह । कांतेवीण होय व्यर्थ जिणें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सुव्रता ती धन्य । पतीआधीं अन्न भक्षीचिना ॥ ७ ॥

९३

आसन शयन स्नान शय्यात्याग । मजसी आनंद तेंचि करी ॥ १ ॥
सुखदुःखें माझ्या होई सुखीदुःखी । जातां मी परदेशीं दीन होई ॥२॥
क्रुद्धही मी होतां बोले प्रिय शब्द । मीचि तिज एकमात्र गति ॥३॥
पतिप्रियकाजीं रत ती सर्वदा । ऐसी पतिव्रता कांता मम ॥ ४ ॥
भार्या जया ऐसी संसारीं तो धन्य । क्षुधित मी क्षीण श्रांत जाणें ॥
सुशील निश्चयी भक्ति-कीर्तिवंत । प्रेम करी नित्य मजवरी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मूर्तिमंत भाग्य । कांता गृहस्थास पुण्यवती ॥ ७ ॥

९४

पतिव्रता कांता लाभे जयाप्रति । काननीं तो भोगी स्वर्गसौख्य ॥१॥
तिजवांचूनियां राजमंदिरही । अरण्याचि होई तयालागीं ॥ २ ॥
धर्म-अर्थ-कामां साह्य एक सती । विश्वासार्ह तेचि त्यजितां गृह ॥३॥
निराधाराप्रति भार्याचि संपत्ति । औषध रोग्यासी तेंचि एक ॥ ४ ॥
भार्याचि आधार बंधु सहाय्यक । धर्ममार्गीं एक भार्या असे ॥ ५ ॥
मधुरभाषणी भार्या न ज्या साध्वी । तयानें धरावी वनिची वाट ॥
वासुदेव म्हणे यापरी कपोत । भार्येचें महत्त्व प्रतिपादी ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १४४ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. १४ समाप्त

अध्याय १४५ वा

९५

हृदयविदारक ऐसे । ऐके विलाप पतीचे ॥ १ ॥
पंजरस्थ ती कपोती । प्रेमें वदे आपणासी ॥ २ ॥
अहो माझें थोर भाग्य । वर्णी पतिदेव मज ॥ ३ ॥
तोषवी न पतिप्रति । समजूं नये स्त्री तिजसी ॥ ४ ॥
पतिसंतोषें स्त्रियांस । सकल देवता संतुष्ट ॥ ५ ॥
देवब्राह्मणां समक्ष । लाभ ज्याचा तें दैवत ॥ ६ ॥
करी तया असंतुष्ट । पुष्पलता ते वणव्यांत ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । कथी कपोती चित्तातें ॥ ८ ॥



निवेदिती भीष्म पश्चात्तापें व्याध । म्हणे मी निर्बुद्ध दुष्ट क्रूर ॥
उपकारकर्त्या भक्षूनि पातक । लागेल हें नित्य मजलागीं ॥ आपद्धर्मपर्व अ. १४७

९६

विलाप पतीचा व्याधपंजरस्था। ऐकूनि कपोता वदली भार्या ॥१॥
पतिदेवा, गोष्ट कथितें श्रेयाची। व्याध हा अतिथि सदनीं आला ॥
शीत-क्षुधेनें हा जाहला व्याकुळ। करावा सत्कार प्रेमें याचा ॥ ३॥
लोकमाता धेनु, विप्र, शरणागत। वधी त्या पातक सारखेंचि ॥४॥
गृहस्थधर्में जो वागे त्या सद्गति। लाभेल तुम्हासी अन्य कांता ॥५॥
देहासक्तित्यागें रक्षीं शरणागत। सद्भावें तुम्हांस असती पुत्र ॥ ६॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें। वदन पतीचें पाही प्रेमें ॥ ७॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १४५ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. १५ समाप्त

अध्याय १४६ वा

९७

आनंदाश्रुपूर्ण लोचनें स्त्रियेसी। कपोत अवलोकी भाषणें त्या ॥ १॥
पुढती सत्कार करूनि व्याधाचा। म्हणे काय इच्छा निवेदावी ॥२॥
सदनीं शत्रूही पातल्या सन्मान। करावा हा धर्म गृहस्थाचा ॥ ३॥
छेदार्थही कोणी पातल्या जवळी। छाया तयावरी करी वृक्ष ॥ ४॥
पंचमहायज्ञ न करी त्या दुःख। सेवा कांहीं मज निवेदावी ॥ ५॥
वासुदेव म्हणे ऐकूनि तें व्याध। शीतबाधा मज होई म्हणे ॥ ६॥

९८

ऐकूनि कपोत पर्णं अंथरूनि। निखारे आणूनि अग्नि करी ॥ १॥
तोषूनि तैं व्याध म्हणे अर्पी अन्न। क्षुधाकुल प्राण शांत करीं ॥२॥
ऐकूनि कपोत पावे मनीं दुःख। कैंवी अतिथीस तोष देऊं ॥ ३॥
नित्य संपादूनि करितों भक्षण। संग्रहीं न कण एक माझ्या ॥ ४॥
चिंती मनीं परी म्हणे थोर पुण्य। अतिथिपूजन करितां देवा ॥ ५॥
अग्निप्रदक्षिणा पुढती घाली तीन। म्हणे तुष्ट मन होवो याचें ॥ ६॥
बोलूनि आनंदें जाळिलें देहासी। व्याधाच्या चित्तासी खेद बहु ॥७॥
वासुदेव म्हणे अंतर्मुख व्याध। करितो विलाप ऐका काय ॥ ८॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १४६ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. १६ समाप्त

अध्याय १४७ वा

९९

निवेदिती भीष्म पश्चात्तापें व्याध। म्हणे मी निर्बुद्ध दुष्ट, क्रूर ॥ १॥

उपकारकर्त्या भक्षूनि पातक । लागेल हें नित्य मजलागीं ॥ २ ॥
प्रतारणा हाचि व्यवसाय माझा । विश्वास कोणाचा मजवरी न ॥३॥
घातक्यासी मज धिक्कारूनि बोध । करी हा कपोत निश्चयानें ॥ ४ ॥
पुत्र-दारात्याग करूनि मी आतां । साधीन परलोका निश्चयानें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे उत्कट तो त्याग । पाहूनियां व्याध द्रवला मनीं ॥ ६ ॥

१००

प्राणही अर्पूनि अतिथिपूजन । करावें हा धर्म कळला मज ॥ १ ॥
आतां मी धर्मचि संपादीन यत्नें । बोलूनियां ऐसें उठला व्याध ॥२॥
मोडूनियां यष्टि त्यागिली सळई । जाल, पंजरही त्यागियेला ॥ ३ ॥
कपोतस्त्रियेसी करूनियां मुक्त । गेला काननांत निघूनि व्याध ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सत्कर्माची रुचि । जडतां त्रैलोक्यीं गोड काय ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १४७ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. १७ समाप्त

अध्याय १४८ वा

१०१

कथिताती भीष्म पुढती कपोती । आठवूनि पती शोक करी ॥ १ ॥
म्हणे पतिदेवा, अप्रिय जें मज । केलेंति न कृत्य कदाकाळीं ॥ २ ॥
पुत्रवतीही ते विधवा दुःखीचि । सौख्य मजप्रति दिधलें बहु ॥ ३ ॥
पर्वतशिखरीं वनीं तैं वृक्षाग्रीं । हर्षलें अंतरीं तुझ्यासवें ॥ ४ ॥
अपरिमिताचा दाता एक पति । इतर ते देती परिमित ॥ ५ ॥
जाणूनि हें कोण पूजीना पतीसी । पतीसम लोकीं सौख्य नसे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पतीसम धनी । वदली पक्षिणी नसे कोणी ॥ ७ ॥

१०२

सर्वस्व वेंचूनि रक्षी जो पत्नीतें । त्यावीण तियेतें कोण असे ॥ १ ॥
नाथ, आतां मज नको हें जीवित । पतीविण व्यर्थ प्राण माझे ॥ २ ॥
विलाप यापरी करूनि कपोति । सौख्यें अग्नीमाजी प्रवेशली ॥ ३ ॥
आश्चर्य त्यावेळीं वैभवसंपन्न । विमानस्थ जाण पाही पति ॥ ४ ॥
तया विमानीं ती बैसे आनंदानें । पाही पुण्यस्थानें पतीसवें ॥ ५ ॥
पुढती सुखानें राहिलीं स्वर्गात । वासुदेवचित्त हर्ष पावे ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १४८ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. १८ समाप्त

अध्याय १४९ वा

१०३

धर्मांप्रति भीष्म कथिती तो व्याध । पाही विमानस्थ पक्ष्यांप्रति ॥१॥
तेचिं गति लाभो आपणा म्हणूनि । तपालागीं वनीं निघूनि गेला
ममत्व त्यागूनि हिमाचलीं जाई । सत्कर्माचा घेई ध्यास एक ॥ ३ ॥
सरोवरें रम्यस्थानेंही न बघे । कंटकीं तयाचें शरीर छिन्न ॥ ४ ॥
दावानलामाजी गवसे पुढती । आनंदें त्यामाजी शिरला व्याध ॥५॥
ऐसें सर्व पाप विनष्ट होऊन । व्याध उद्धरून गेला स्वर्गीं ॥ ६ ॥
धर्मा, शरणार्थीरक्षणें कपोत । जाहला कृतार्थ ऐशापरी ॥ ७ ॥
वृत्त हें ऐकतां होई स्वर्गप्राप्ति । वासुदेव चित्तीं संतोषला ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १४९ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. १९ समाप्त

अध्याय १५० वा

१०४

धर्म म्हणे ताता, अबुद्धिपूर्वक । कृतपाप नष्ट कैंवी होई ॥ १ ॥
निवेदिती भीष्म पुरा एक राव । नाम जनमेजय तयाप्रति ॥ २ ॥
अबुद्धिपूर्वक ब्रह्महत्यादोषें । गेला अरण्यातें निघूनि राव ॥ ३ ॥
शौनककुळींच्या इंद्रोत मुनीतें । भेटूनि पदांतें धरिलें घट्ट ॥ ४ ॥
पातकी हा एथ कासयासी आला । बोलले त्या काळा मुनिश्रेष्ठ ॥५॥
वासुदेव म्हणे मुनि तयाप्रति । म्हणती स्पर्शिसी कां रे मज ॥ ६ ॥

१०५

मूढा, प्रेतचि तूं वससी आनंदें । लोटिलें पितरांतें नरकामाजी ॥१॥
पूजितां जयांसी आयुष्कीर्तिलाभ । विप्रांचा त्या द्वेष करिती नित्य
शाश्वत वा अशाश्वत काल तुज । मूढा, ऊर्ध्वपाद अधःशिर ॥ ३ ॥
नरकीं पतन पावसील जेथें । गृध्र सर्वांगातें छेदितील ॥ ४ ॥
'परलोक नाहीं' म्हणसी जें त्याची । येईल प्रचीति यमलोकीं ॥५॥
वासुदेव म्हणे निर्भर्त्सना ऐसी । केली त्या नृपाची मुनिश्रेष्ठें ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १५० वा तथा आपद्धर्मपर्वाचा २० अ. समाप्त

अध्याय १५१ वा

१०६

निवेदिती भीष्म मुनीच्या धिक्कारें । राव गहिंवरे अंतरांत ॥ १ ॥
म्हणे निर्भर्त्सना निंदा धिःकारासी । योग्य मी तुम्हांसी प्रार्थीतसें ॥
दुष्कृतीनें मज होई पश्चात्ताप । मज अन्नोदक न रुचे तेंही ॥ ३ ॥
नाशही कुळाचा होवो परी दोष । न येवो कुळास हेचि इच्छा ॥४॥
संरक्षा मजसी प्रार्थितों चरणीं । बहु मम मनीं विप्रप्रेम ॥ ५ ॥
पुलिंदादि देशांसम यज्ञहीन । पावती पतन नरकामाजी ॥ ६ ॥
पुत्रालागीं पिता रक्षी तैं मजसी । सांभाळावें हेंचि मागतसें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे इंद्रोत नृपासी । प्रत्युत्तर देई तेंचि ऐका ॥ ८ ॥

१०७

राया, क्रुद्ध विप्र अयोग्यही कर्म । करील हें जाण अंतरांत ॥ १ ॥
यास्तवचि ज्ञाता कदा नच कोपे । जनांस्तव त्यातें दुःख होई ॥ २ ॥
पर्वतस्थ पाही वस्तु भूमिस्थित । ज्ञात्यासी तैं जग बुद्धिबळें ॥ ३ ॥
प्राचीन सज्जनीं प्रेम न जयाचें । धिःकृत जयातें करिती तेही ॥ ४ ॥
तया नरा ज्ञान न लाभे कदापि । श्रेष्ठता विप्रांची जाणसी तूं ॥ ५ ॥
यास्तव धर्मानें वागें तयांसवें । शरण रिघावें तयांसीच ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि नृपाळ । जोडूनियां कर वदला ऐका ॥ ७ ॥

१०८

मुने, पश्चात्तापें जाहलों मी दग्ध । सेवितों तुम्हांस तारा मज ॥ १ ॥
मुनि म्हणे दंभ, अभिमान, तांठा । त्यागूनियां विप्रां सेवीं भावें ॥
भीति दैन्य लोभरहित मी तुज । करीतसें शिष्य, हितास्तव ॥ ३ ॥
ब्रह्मघ्नासी ऐसा संबंध पाहूनि । निंदितील जनीं अज्ञ[1] मज ॥ ४ ॥
ज्ञानी मात्र तत्त्व जाणती एथींचें । निश्चयें विप्रांतें शरण जाई ॥ ५ ॥
ब्राह्मणांसी वैर न करीं कदापि । प्रतिज्ञा तूं ऐसी करीं राजा ॥ ६ ॥
ऐकूनि तें राव काया वाचा मनें । न करीन म्हणे विप्रद्वेष ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे मुनि रायाप्रति । हिताचा दाविती मार्ग ऐका ॥ ८ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १५१ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. २१ समाप्त

---

१ वृद्ध.

अध्याय १५२ वा

१०९

मुनि म्हणे ज्ञाता, तुष्ट मी समर्थ। धर्मबोध तुज करितों अद्य ॥ १ ॥
आवृतचित्त तूं कथितों यास्तव । कठोर आचार पूर्वी तव ॥ २ ॥
परी आतां भक्ष्य-भोज्यत्यागें तप। करूनि चकित केलें जगा ॥ ३ ॥
समर्थाचें दान दीनकृततप। आश्चर्यकारक नव्हेचि हें ॥ ४ ॥
अविवेक हेंचि दैन्याचें कारण। फलप्राप्ति जाण विवेकानें ॥ ५ ॥
यज्ञ, दान, दया, वेद, सत्य, तप। जें सुआचरित पावनही ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पुण्यक्षेत्रीं यांसी। सेवील तयासी न शिवे पाप ॥७॥

११०

ययातिगाथा ते निवेदिती मुनि। तपस्वी या जनीं व्हावें नरें ॥ १ ॥
कुरुक्षेत्राहूनि सरस्वतीतीर। तयाहूनि थोर अन्यक्षेत्रें ॥ २ ॥
तीर्थांत पवित्र पृथूदक तीर्थ। स्नानपानें मुक्त मरणांतूनि ॥ ३ ॥
पुष्करादि मानसान्त सर्व तीर्थें। करितां लयातें पाप जाई ॥ ४ ॥
तीर्थ अध्ययन स्नानाहूनि दान। संन्यास त्याहून श्रेष्ठ असे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सत्यवानगाथा। निवेदिती आतां मुनिश्रेष्ठ ॥ ६ ॥

१११

बालकासी पाप-पुण्यही न जेंवी। स्वाभाविक तेंवी न कुणा दुःख ॥१॥
मग सौख्य तरी येईल कोठूनि। ज्ञात्यासी न जनीं संगबाधा ॥ २ ॥
इतरां संसर्गें घडे पाप-पुण्य। सुखदुःख जाण प्राप्त तेणें ॥ ३ ॥
यास्तव दोहोंची होतांचि निवृत्ति। श्रेयस्कर जगीं प्राणत्याग ॥ ४ ॥
राजा जो सामर्थ्यसंपन्न तेजस्वी। शक्य तया होई धर्माचार ॥ ५ ॥
आत्मसदृशाचि मानूनि विप्रांतें। कदाही तयातें न वधीं राया ॥ ६ ॥
नित्य कार्यासक्त होऊनियां, मोक्ष। संपादीं, सद्बोध वासुदेवा ॥७॥

११२

हिम अग्नि यमासम शांत क्रूर। विवेकी वा नर त्रिविध ऐसे ॥ १ ॥
उन्मूलक कोणी नांगरासमान। कोणी वज्रासम घात करी ॥ २ ॥
विद्वत्ता विप्रत्व असूनि जो दुष्ट। तयाचा संबंध नसो कदा ॥ ३ ॥

१ कोणतीहि गोष्ट अंतरांत गुप्त ठेवूं शकणारा.

पश्चात्तापें नाश प्रथम पापाचा । नाश द्वितीयाचा निश्चयानें ॥ ४ ॥
धर्माचारनिश्चयानें तें तृतीय । पावतें विलय पाप राया ॥ ५ ॥
शुचिर्भूतपणें तीर्थाटन होतां । बहुत पापांचा नाश होई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अभ्युदयेच्छूनें । नित्य शुभकर्मे आचरावीं ॥ ७ ॥

११३

आचरावें तेंचि लाभतें नरातें । सुगंधाच्या संगें गंध येई ॥ १ ॥
दुर्गंधसंगानें लाभतो दुर्गंध । तपें पापमुक्त होई नर ॥ २ ॥
एक अब्द अग्निसेवेनें नराचें । लोकापवादाचें पाप नासे ॥ ३ ॥
भ्रूणहत्यादोष नासे अब्दत्रयें । प्रभासादि तीर्थें करितां किंवा ॥ ४ ॥
प्राण्याचा ज्या वध झाला त्या प्राण्यांसी । सोडवितां मुक्ति पापांतूनि ॥
वासुदेव म्हणे अघमर्षणानें । करितां त्रिस्नानें दोष जाती ॥ ६ ॥

११४

राया, सर्व देव एकदां गुरूसी । पुशिती योग्याची स्थिति काय ॥१॥
पाप-पुण्यबाधा होई कीं न तया । पापनाश व्हावा कैंवी कथा ॥ २ ॥
गुरु म्हणे पाप अबुद्धिपूर्वक । घडतां, सहेतुक पुण्य व्हावें ॥ ३ ॥
तेणें, क्षारें जेंवी वस्त्र शुद्ध होई । तैसें पाप जाई विलयाप्रति ॥ ४ ॥
जाणूनि विनाश इच्छितो कल्याण । पापद वर्तन घडलें जरी ॥ ५ ॥
सज्जनांचे दोष झांकितां प्रयत्नें । तेंवी सद्वर्तनें पापनाश ॥ ६ ॥
अश्वमेधयज्ञें राव पापमुक्त । जाहला शौनक वचनामृतें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीष्मोक्त ही कथा । सप्रेम ऐकतां पापनाश ॥ ८ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १५२ वा तथा आपद्धर्मपर्वचा अ. २२ समाप्त

अध्याय १५३ वा

११५

धर्म म्हणे ताता, मृतसंजीवन । केलें निवेदन काय कोणी ॥ १ ॥
निवेदिती भीष्म गृध्र-जंबुकांचा । संवाद पूर्वींचा कथितों ऐकें ॥ २ ॥
महाकष्टें एका विप्रा होई पुत्र । बालपणीं त्यास मृत्यु येई ॥ ३ ॥
स्मशानीं तयासी नेऊनियां लोक । करिती तैं शोक बाळास्तव ॥४॥
सोडूनि तयांसी जाववेना तयां । गृध्र तैं त्या ठाया येई एक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे गृध्राची त्या वाणी । ऐकूनियां ध्यानीं बोध घ्यावा ॥



निवेदिती भीष्म गृध्र-जंबुकांचा । संवाद पूर्वीचा कथितो ऐकें ॥
महाकष्टें एक । विप्रा होई पुत्र । बालपणीं त्यास मृत्यु येई ॥ आपद्धर्मपर्व अ १५३

११६

गृध्र म्हणे त्वरा करोनि याप्रति । सोडूनि गृहासी जावें तुम्ही ॥ १ ॥
संबंध न राहे चिरकाल एथ । संयोग-वियोग क्रम एथें ॥ २ ॥
यथाक्रम होई सकलांचा नाश । जंबुकादिव्याप्त स्थान सोडा ॥ ३ ॥
प्रिय वा अप्रिय एकदां जो मृत । पुनरपि त्यास जीव न ये ॥ ४ ॥
अस्ताचळीं आतां जाईल गभस्ती । त्वरित गृहासी जावें तुम्हीं ॥५॥
वासुदेव म्हणे ऐकूनि ते शब्द । बालकार्थे शोक करिती जन ॥ ६ ॥

११७

पुत्रमरणें ते सकळ निराश । पुनर्भेटआस नुरली तयां ॥ १ ॥
अंतीं नाइलाजें सोडूनि बाळासी । सिद्ध ते गृहासी जाण्या होती ॥
जंबुक इतुक्यामाजी कृष्णवर्ण । येई बिळांतून तयास्थानीं ॥ ३ ॥
म्हणे हे मानव निर्दय बहुत । त्यागूनि बाळास जाती केंवी ॥ ४ ॥
जनांसी तो म्हणे मूढ हो, कां जातां । निराशेची आशा क्षणीं होई ॥
जाहलाही नाहीं अद्यापि सूर्यास्त । त्यागूनि भयास बैसा एथें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे जंबूकाची वाणी । येईलही क्षणीं प्राण यातें ॥ ७ ॥

११८

केवळ मधुर भाषणेंही ज्याच्या । येई प्रसन्नता तुम्हांलागीं ॥ १ ॥
तया बालकासी त्यागूनियां जातां । कां रे निर्दयता वरितां ऐसी ॥
पशुपक्ष्यांतेंहि बहु पुत्रप्रेम । पुत्रार्थ दारुण कष्ट घेती ॥ ३ ॥
इहपर लाभ नसतांही कांहीं । संरक्षिती पाहीं संततीत ॥४ ॥
वंशाचा तुमच्या आधार जो तया । काय त्यागूनियां जातां ऐसे ॥
बसाल या स्थानीं तरी कांहीं आशा । जातांचि वैऱ्यांचा हेतु साधे ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि ते शब्द । जनरक्षणार्थ फिरूनि येती ॥ ७ ॥

११९

पाहूनि तें गृध्र म्हणे हाय हाय । अज्ञान हें काय मानवांचें ॥ १ ॥
पंचभूतांनींही त्यागिलें जयासी । कां रे चिंता त्याची करितां ऐसी ॥
आपुलीच चिंता वाहूनियां तप । करा कां रे व्यर्थ विलाप हा ॥ ३ ॥
दुर्दैवेंचि तुम्हां देऊनियां शोक । एकाकी बालक निघूनि गेला ॥४॥

द्रव्यदारादिक सकळ तपानें । लाभतें या ज्ञानें तप करा ॥ ५ ॥
कर्मासम पिता पुत्र आप्तजन । वद्ध पापपुण्य करी तयां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गृध्र चातुर्यानें । आकर्षितो मनें मानवांचीं ॥ ७ ॥

१२०

प्रयत्नपूर्वक करा धर्माचार । अधार्मिक नर होऊं नका ॥ १ ॥
योग्यवेळीं सेवा देवांब्राह्मणांतें । त्यागूनि प्रयत्नें शोक दैन्य ॥ २ ॥
कर्मासम प्राणी भोग भोगी जनीं । स्मशानीं त्यजूनि जाती आप्त ॥
सधन निर्धन सुज्ञ वा अजाण । प्राणी कर्मासम मृत्यु पावे ॥ ४ ॥
शोकानें न दया येई कालाप्रति । नित्य समदृष्टि असे काल ॥ ५ ॥
जनरहाटीही आणूनियां ध्यानीं । जा आतां सदनीं व्यर्थ शोक ॥६॥
वासुदेव म्हणे ऐकूनि हे वाचा । बोध्र जंबुकाचा ऐका काय ॥ ७ ॥

१२१

अल्पबुद्धि तुम्हां बोध करी गृध्र । प्रेमासी शैथिल्य तुमच्या येणें ॥
पुत्रविहीन त्या सदनीं तुम्हांसी । सौख्य काय चित्तीं आणा ध्यानीं
वत्साविण धेनुसमचि अशांत । व्हाल सदनांत शिरतां क्षणीं ॥ ३ ॥
प्रयत्न नरानें सोडूं नये कदा । दैवानुरूप त्या फल येई ॥ ४ ॥
उदरीं रक्षिलें पाळिलें पोशिलें । केंवी त्या त्यागिलें स्मशानीं या ॥
अस्तमानवरी तरी बसा एथें । दैवें जीव यातें येईलही ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गृध्राचें उत्तर । होऊनियां स्थिर ऐका आतां ॥ ७ ॥

१२२

सहस्र वर्षांचें वय असे मज । अद्यापि न मृत उठलें कोणी ॥ १ ॥
गर्भांताचि कोणी, कोणी बालपणीं । तारुण्यांत कोणी मरूनि जाती ॥
स्थावर जंगम पशुपक्षी तेही । विनाश कदाही न चुके कोणा ॥ ३ ॥
पत्नी-पुत्रादिक वियोगें कित्येक । प्रतिदिनीं लोक शोकमग्न ॥ ४ ॥
स्मशानांतूनि या आजवरी किती । त्यागूनि आप्तांसी गेले गृहीं ॥५॥
काष्ठतुल्य प्रेत पाहूनियां दुःख । होई द्विगुणित मानवाचें ॥ ६ ॥
यास्तव जनहो, त्यागा आतां यातें । फंसवी चित्तातें आशा व्यर्थ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां जन । स्थान तें सोडून म्हणती जाऊं ॥८॥

१२३

जंबूक तें म्हणे कोमल शरीर । बहु अलंकारयुक्त बाळ ॥ १ ॥
त्यागूनियां केंवी निर्दयत्वें जातां । पिंडदानकर्त्या वालकासी ॥२॥
त्यागितां याप्रति आंवरेल शोक । ऐसें तों नाहींचि, उलट वृद्धि ॥
शंबुकें वधितां विप्राचा कुमार । उठला साचार प्रसिद्ध हें ॥ ४ ॥
मृत बालकासी राजश्रेष्ठ श्वेतें । उठविलें तैसें शक्य असे ॥ ५ ॥
सिद्ध, मुनि कोणी देवता भेटेल । वालका उठवील जाऊं नका ॥६॥
ऐकूनि तें जन वालका घेऊन । शोक आरंभून आक्रंदती ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पाहूनियां शोक । बोले तयां गृध्र परिसा काय ॥८॥

१२४

घेऊनियां बाळ गेला यमराज । कैसा हा जिवंत होई तरी ॥ १ ॥
शत जंबुक हे शतवर्षें यदि । प्रयत्न करिती तरी व्यर्थ ॥ २ ॥
ब्रह्मा विष्णुआदि देवचि येतील । तरी हा उठेल मृत बाळ ॥ ३ ॥
नाहींतरी अश्रुपूरहीं वाहतां । सुस्कारे सोडितां काय लाभ ॥ ४ ॥
जंबुक हा तेंवी मी वा तुम्ही आप्त । भोगितों प्रारब्ध कर्मासम ॥५॥
परद्रव्य परद्रोह परपीडा । त्यागणें सर्वदा परस्त्रीतें ॥ ६ ॥
असत्य अधर्म त्यागूनियां सत्य । शास्त्र दया न्याय्यकर्म तेंवी ॥७॥
ऋजुत्वादि गुण आचरावे सदा । शोक या मृताचा करूनि काय ॥
वासुदेव म्हणे शोकाकुल जन । ऐकूनि वचन उठते झाले ॥ ९ ॥

१२५

पाहूनियां म्हणे जंबुक तयांसी । भयप्रद अति मृत्युलोक ॥ १ ॥
अल्पायुष्य तेंवी वियोग या ठाईं । विपुलत्व पाहीं असत्यासी ॥२॥
अप्रिय भाषण प्रलाप सर्वत्र । तेंवी शोक दुःख भरलें असे ॥ ३ ॥
पाहूनि हें मज न रुचे हा लोक । धिक्कार बाळास त्यजूनि जातां ॥
क्रूर हो, गृध्राचें ऐकूनि भाषण । बाळासी त्यागून केंवी जातां ॥५॥
दुःखामागें सुख सुखामागें दुःख । नित्य हा सिद्धांत ध्यानीं असो ॥
तेजस्वी हा बाळ जिवंतचि असे । त्यागूनियां यातें जाऊं नका ॥
वासुदेव म्हणे स्वार्थांध जंबूक । करी द्विधाचित्त मधुर शब्दें ॥

१२६

गृध्र म्हणे प्रेतव्याप्त हें अरण्य । संचार दारुण राक्षसांचा ॥ १ ॥
घूकध्वनि नभ दणाणूनि सोडी । गर्द वनराजी किर्र नाद ॥ २ ॥
त्यागूनियां प्रेत क्रिया करा आतां । अस्ता सूर्य जातां कठिण वेळ ॥
जंबुकस्त्रियांचा नाद हा भयद । ससाणे कर्कश ओरडती ॥ ४ ॥
नील धूम्र वृक्ष रंगूनियां जाती । देवता नाचती क्षुधाकुल ॥ ५ ॥
वनप्रदेश हा मूर्तिमंत क्रौर्य । विविध विक्राळ प्राणी येथें ॥ ६ ॥
यास्तव बाळाची करा आतां क्रिया । पावाल अथवा नाश सर्व ॥
वासुदेव म्हणे जंबुक निवारी । सूर्यास्त तोंवरी बसा म्हणे ॥ ८ ॥

१२७

निवेदिती भीष्म कार्यपटु दोघे । संदेहीं जनांतें पाडिताती ॥ १ ॥
इतुक्यांत येती शंकर त्या स्थानीं । प्रेरणा भवानी करी तयां ॥२॥
वर मागा ऐसें म्हणतां त्यां जन । बालकाचे प्राण मागताती ॥ ३ ॥
हर्षित तैं शिव शतायु करिती । बाळासी भाग्याची वेळ येई ॥ ४ ॥
गृध्र जंबुकांही क्षुधानिवारक । देती आशीर्वाद शिवसांब ॥ ५ ॥
अंतीं शंकरांसी सर्वांनीं वंदिलें । अदृश्य जाहले महादेव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे उत्साहनिश्चय । ईश्वरानुग्रह सिद्धिप्रद ॥ ७ ॥

१२८

ईश्वरी प्रसादें सौख्य सकळांसी । होतां पुत्रप्राप्ति सकलां सौख्य ॥
हर्षित चित्तानें बालका घेऊनि । सदनीं येऊनि हर्षिन्नले ॥ २ ॥
धर्मा, सकलांसी कथियेलें वृत्त । ऐकतां हें चित्त शुद्ध होई ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे पूर्वइतिहास । ऐकूनि संदेह दूर होती ॥ ४ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १५३ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. २३ समाप्त

अध्याय १५४ वा

१२९

पितामहाप्रति प्रश्न करी धर्म । समीपस्थ जाण वळी शत्रु ॥ १ ॥
अवमानें होई जरी कोपाविष्ट । वर्तावें हे तात, कैंवी सांगें ॥ २ ॥
कथिती तैं भीष्म शाल्मली-वायूचा । संवाद पूर्वींचा कथितों ऐकें ॥
हिमालयावरी शाल्मली विशाल । सकलां आधार वनामाजी ॥ ४ ॥

पशुपक्षी वणिक्‌सार्थ वनौकस । नित्य आश्रयार्थ येती त्याच्या ॥
वासुदेव म्हणे एकदां नारद । बोलले तरूस काय ऐका ॥ ६ ॥

१३०

शालमले, तुजसी पाहूनि आनंद । वाटतो मनांत नित्य मज ॥ १ ॥
शाखाशिखरांचा वायु करी भेद । मित्रत्वें तो तुज रक्षी वाटे ॥ २ ॥
फुलतां तूं पक्षी गाती गोड गीतें । गजही क्रीडेतें येती बहु ॥ ३ ॥
मेरूसमचि तूं असती आश्रय । वैभव अपूर्व असे तव ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे शालमीतरूसी । स्तवूनियां ऋषि वदती ऐका ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १५४ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. २४ समाप्त

अध्याय १५५ वा १३१

वृक्षश्रेष्ठा, नम्रभावें तूं वायूसी । नित्य सन्मानिसी मित्रभावें ॥ १ ॥
तुझाचि मी ऐसें कथिसी त्याप्रति । यास्तवचि रक्षी वायु तुज ॥२॥
गृह, वृक्ष तेंवी पर्वतशिखर । राहोंनेदी स्थिर वायु कदा ॥ ३ ॥
यास्तव शालमले, सुखी तूं सर्वदा । वृक्ष तैं नारदा वदला काय ॥
सखा बंधु सुहृत् वायु नसे कोणी । स्वसामर्थ्य वनीं धीर माझा ॥
अष्टादशांशही बलाचा न मम । वायूप्रति जाण मुनिश्रेष्ठा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नारदासी वृक्ष । मजपुढें तुच्छ वायु म्हणे ॥ ७ ॥

१३२

मुनि म्हणे वृक्षा, योग्य न हें मत । वायूहूनि श्रेष्ठ नसे कोणी ॥ १ ॥
क्षुद्रपणें तया अवमानितोसी । वाटे ही दुर्बुद्धि तुजसी झाली ॥ २ ॥
मूढा, तव बुद्धि कोप आणी मज । कथितों वायूस स्वयेंचि हें ॥३॥
चंदन वा शाल देवदारु आदि । नित्य सन्मानिती वायूलागीं ॥ ४ ॥
मोहमग्ना, वृत्त कथितों वायूसी । वासुदेव कथी पुढती ऐका ॥५॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ.१५५ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. २५ समाप्त

अध्याय १५६ वा १३३

पुढती नारदें कथिलें वायूसी । वायु शालमलीसी वदला तदा ॥ १ ॥
सृष्ट्यारंभीं ब्रह्मा विश्रांति पावला । यास्तव तुजला रक्षिलें म्यां ॥
सामर्थ्याचा व्यर्थ अभिमान तुज । दावीन सहज लीला आतां ॥३॥

ऐकूनि शाल्मली म्हणे वलाहूनि । बुद्धीचि या जनीं श्रेष्ठ बापा ॥४॥
वायु म्हणे बल दावितों उद्यांचि । शाल्मली तैं चिंती मनामाजी ॥
बलवंत वायु सत्यचि हें परी । बुद्धि आतां खरी साह्य मज ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गर्विष्ठ तो वृक्ष । आपुला विनाश चिंती स्वयें ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १५६ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. २६ समाप्त

अध्याय १५७ वा १३४

निश्चय करूनि उपशाखा शाखा । त्यागूनि विनाशा करूनि घेई ॥
इतुक्यांत वायु पातला क्रोधानें । पाहूनियां म्हणे शाल्मलीतें ॥ २ ॥
स्वयेंचि विनाश पावलासी मूढा । प्रभाव हा माझा मानिलासी ॥
ऐकूनि शाल्मली पावे पश्चात्ताप । परिणाम हाच मूढजनां ॥ ४ ॥
ज्ञाते सावकाश साधिती स्ववैर । तृणांत संचार अग्नीचा जैं ॥ ५ ॥
बुद्धिमंतें क्षमा करावी सर्वदा । बाल मूढ अंधा श्रेष्ठातेंही ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पितामह धर्मा । म्हणती करीं प्रश्नां शंका जरी ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकत शांति० अ. १५७ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. २७ समाप्त

अध्याय १५८ वा १३५

ताता, अधिष्ठान कथावें पापाचें । पापप्रवृत्तीचें मूळ कथीं ॥ १ ॥
निवेदिती भीष्म पापमूळ लोभ । लोभें कामक्रोध उन्मादही ॥ २ ॥
पराधीनता तैं लज्जा त्याग चिंता । धर्मक्षय एका लोभें होई ॥ ३ ॥
इंद्रियवेग तैं निंदा वाणिवेग । सर्व पापां एक लोभ मूळ ॥ ४ ॥
स्वभावोल्लंघन न घडे कदापि । क्षीणत्व लोभासी येईचिना ॥ ५ ॥
सरिताप्रवाहें पूर्ण न सागर । लोभासी न पार तेंवी कदा ॥ ६ ॥
स्वरूप जयाचें न कळे देवांसी । जिंकावें तयांसी शमदमें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे निंदा, द्रोह, दंभ । एकमेव लोभ कारण त्या ॥ ८ ॥

१३६

शास्त्रज्ञ संशयछेत्तेही या लोभें । भोगिती क्लेशांतें परोपरी ॥ १ ॥
आसक्तीनें शिष्टाचारही त्यागिती । तृणाच्छन्न होती कूप क्रूर ॥२॥
मधुरभाषणें पांघरूनि धर्म । स्थापिती नूतन पंथ स्वार्थें ॥ ३ ॥
हेतुवादें नष्ट करिती सत्पंथ । धर्ममिषें लूट करिती जनीं ॥ ४ ॥

आपुलेंचि प्रस्थ माजविती लोकीं । मर्यादा पूर्वींची उल्लंघूनि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे लोभी ते असभ्य । जाणावे स्वार्थांध धर्महीन ॥ ६ ॥

१३७

धर्मा, आतां ऐकें शिष्टांचीं लक्षणें । सर्वदा सत्कर्मैं निर्भय जे ॥ १ ॥
परलोक पुनर्जन्माचें न भय । त्याज्य प्रियाप्रिय सकलांचें ज्यां ॥२॥
आधार त्यां सत्य सुख दुःख सम । दाते याचना न रुचे तयां ॥३॥
दयावंत, देव, पितर, अतिथि । सेवा नित्य त्यांसी घडे प्रेमें ॥ ४ ॥
उपकाररत धर्माचे पालक । सर्वभूतहित दक्ष वीर ॥ ५ ॥
सर्वस्व अर्पण करिती जे सौख्यें । तयांसीच ज्ञाते म्हणती शिष्ट ॥
वासुदेव म्हणे कदाही विचलित । न होतींचि शिष्ट धर्मपंथीं ॥ ७ ॥

१३८

चांचल्य कदाही नसे शिष्टांप्रति । पूर्वाचार्यकृति आदर्श त्यां ॥ १ ॥
कदाही न क्रौर्य ठाउकें तयांसी । होती माहेराचि अहिंसेचें ॥ २ ॥
सज्जनमान्य ते कामक्रोधहीन । तैंवी अहं-मम शिवती न ज्यां ॥ ३ ॥
सुव्रत मर्यादापालनीं जे स्थिर । ईषणा न मूळ सत्कर्मासी ॥ ४ ॥
कर्तव्यबुद्धीनें आचरिती कर्म । धर्मा, त्यां सेवून हित साधीं ॥ ५ ॥
इंद्रियनिग्रही पाखंडविहीन । धर्मास्तव प्राण तुच्छचि त्यां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शिष्ट क्रियावंत । केवळ प्रलाप अशिष्टाचे ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १५८ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. २८ समाप्त

अध्याय १५९ वा १३९

धर्म म्हणे ताता, अज्ञानस्वरूप । निरूपावें मज हेचि इच्छा ॥ १ ॥
प्रवृत्ति, वास्तव्य, वृद्धि-क्षयादिक । कथावें समस्त अज्ञानाचें ॥२॥
निवेदिती भीष्म राग द्वेष मोह । असूयादि सर्व लोभमूळ ॥ ३ ॥
अज्ञान तैं लोभ धर्मा, एकरूप । लोभें होई पुष्ट अज्ञानही ॥ ४ ॥
दुःख मोह ताप अवस्था अज्ञानें । कारण त्या जाणें काल असे ॥५॥
अज्ञानें काळाच्या उपजतो लोभ । जनकादि श्रेष्ठ, लोभत्यागें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भीष्म धर्माप्रति । लोभाचि कथिती सर्व मूळ ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १५९वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. २९ समाप्त

अध्याय १६० वा

१४०

स्वाध्यायनिरत धर्मकामाप्रति । श्रेयस्कर तेंचि ताता, कथीं ॥ १ ॥
बहुशाखा जया धर्माप्रति ताता । तयांचें निवेदा मूळ मज ॥ २ ॥
निवेदिती भीष्म दमचि आधार । धर्मासी साचार ध्यानीं धरीं ॥३॥
प्रामुख्यें विप्रासी दम श्रेष्ठधर्म । तेजोवृद्धि जाण दमें होई ॥ ४ ॥
दमासम दुजा धर्म नसे धर्मा । इहपर जनां तारक तो ॥ ५ ॥
सुखनिद्रा तेंवी प्रसन्नता दान्ता । अदान्त सर्वदा दुःख भोगी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे चारही आश्रमीं । श्रेष्ठव्रत ध्यानीं घेई दम ॥ ७ ॥

१४१

ऐकें लक्षणें दमाचीं । क्षमा अहिंसा तैं धृति ॥ १ ॥
सत्य आर्जव समता । दाक्ष्य मार्दव रुजुता ॥ २ ॥
अकार्पण्य तैं संतोष । असंरंभ प्रियवादित्व ॥ ३ ॥
अनसूया अचापल्य । अमात्सर्य इंद्रियजय ॥ ४ ॥
गुरुपूजा भूतदया । म्हणती दम या समुदाया ॥ ५ ॥
द्वैतभावना सकल । त्यागीतसे दमनशील ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दमें । ग्राम्यवृत्ति जाती यत्नें ॥ ७ ॥

१४२

निंदास्तुति ग्राम्यवृत्तित्यागें मोक्ष । सकलांचा मित्र सदाचारी ॥१॥
निःसंग जो सदा प्रसन्नान्तरात्मा । इहपर जाणा सौख्य तया ॥ २॥
अन्यापासूनि न भय जयाप्रति । जयाचें कोणासी भय नसे ॥ ३ ॥
भोगें कर्मक्षय करी, न वाढवी । समदृष्टि ठेवी भूतमात्रीं ॥ ४ ॥
गगनीं पक्ष्यांची उदकीं मत्स्यांची । दिसेनाचि गति तेंवी दमी ॥५॥
क्षमावंता तया दुर्बल लेखिती । दोष हा एकचि दमनशीला ॥ ६ ॥
धर्मा, सत्यदृष्ट्या नसेचि हा दोष । लाभतो एकान्त दमें जनीं ॥७॥
दमहीना दमवंतातेंही वन । धर्मा, व्यर्थ जाण दमाचि वन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दमचि तो मोक्ष । निवेदिती स्पष्ट भीष्म धर्मा ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १६० वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. ३० समाप्त

अध्याय १६१ वा १४३

निवेदिती भीष्म धर्मा, तप श्रेष्ठ । तपेंचि सामर्थ्य ब्रह्मदेवा ॥ १ ॥
सिद्ध योगी ज्ञानी तपेंचि कृतार्थ । तपानेंचि सिद्ध सर्व क्रिया ॥ २ ॥
दुष्प्राप्यही प्राप्य तपानेंचि एका । पंच महापापां तपें नाश ॥ ३ ॥
बहुविध तपामाजी उपोषण । फलदायी जाण धर्मराजा ॥ ४ ॥
सर्व सामर्थ्यांचें मूळ एक तप । देवत्वही प्राप्त तपें होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आचरूनि तप । जोडील भगवंत तोचि धन्य ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १६१ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. ३१ समाप्त

अध्याय १६२ वा १४४

धर्म म्हणे ताता, सत्याचा महिमा । देव-ऋषिजनां वाटे बहु ॥ १ ॥
निवेदावें मज कथिती तैं भीष्म । सर्ववर्णांसम एक सत्य ॥ २ ॥
सत्यलोपें वर्णसंकर न इष्ट । सनातन एक धर्म सत्य ॥ ३ ॥
धर्म, तप, योग सर्वाधार सत्य । प्राप्तीचा मी मार्ग कथितों त्याच्या
सत्य, समत्व तैं दम, अमात्सर्य । क्षमा, ऱ्ही, आर्यत्व तैशापरी ॥
धृति, त्याग तेंवी तितिक्षा ते दया । तेंवी ते अनसूया अहिंसाही ॥
त्रयोदशविध धर्मा, ऐसें सत्य । परी एकविध जाणें तया ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्वरूप सत्याचें । सर्व सद्गुणातें आश्रय तो ॥ ८ ॥

१४५

सर्वधर्मअविरोधें । सत्य साधका लाभतें ॥ १ ॥
इष्टानिष्ट शत्रुमित्र । सम लेखणें समत्व ॥ २ ॥
इच्छा द्वेष कामक्रोध- । क्षयें लाभतें तें साच ॥ ३ ॥
नान्यस्पृहा तेंवी धैर्य । नित्य अभय गांभीर्य ॥ ४ ॥
सर्व क्लेशहारी दम । लाभे जया होई ज्ञान ॥ ५ ॥
दानधर्मीं जो संयम । अमात्सर्य तेंचि जाण ॥ ६ ॥
सत्यें लाभे अमात्सर्य । बोध घेई वासुदेव ॥ ७ ॥

१४६

क्षमा अक्षमेचें फल प्रियाप्रिय । सोसणें जे सर्व तेचि क्षमा ॥ १ ॥
सत्यवचनें हे क्षमा बाणे अंगीं । सर्वदा वीरासी भूषण तें ॥ २ ॥

वाणी, मन, नित्य राखूनियां शांत । लोकहितदक्ष सर्वकाळ ॥ ३ ॥
राहणें उत्साहें तेचि ऱ्ही जाणावी । स्वधर्मं ते घ्यावी करूनि प्राप्त ॥
धर्मार्थास्तव जें अप्रिय साहणें । तितिक्षा जाणणें तेचि शान्ति ॥५॥
लोकसंग्रहार्थ जोडावी ते शौर्यें । संपादावी धैर्यें अनसूयाही ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पराचे सद्‌गुण । दोषाचि ते जाण असूयका ॥ ७ ॥

१४७

विषय त स्नेह त्यागणें तो त्याग । रागद्वेष नष्ट होतां लाभे ॥ १ ॥
निर्विकारी तैंवी विरागी नरानें । साधावें प्रयत्नें लोकहित ॥ २ ॥
आर्यता सज्जन म्हणती तया कर्मा । आर्यता ते जाणा सकलाधार ॥
सुखदुःखीं सदा निर्विकार व्हावें । धृतीचें जाणावें लक्षण तें ॥ ४ ॥
अभ्युदयेच्छूनें व्हावें धृतिमंत । जें क्षमाशीलत्व तेचि दया ॥ ५ ॥
हर्ष, भय, क्रोधनाशें दयाप्राप्ति । अद्रोह भूतांसी अहिंसा ते ॥ ६ ॥
काया-वाचा मनें अहिंसा तैं दान । अनुग्रह जाण श्रेष्ठधर्म ॥ ७ ॥
श्रेष्ठधर्म सत्य असत्य तें पाप । यज्ञाहूनि श्रेष्ठ सत्य जनीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे त्रयोदश ऐसे । प्रकार सत्याचे सत्य एक ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १६२ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. ३२ समाप्त

अध्याय १६३ वा

१४८

धर्म म्हणे ताता, क्रोधादि उत्पत्ति । निवेदीं मजसी कृपावंता ॥ १ ॥
निवेदिती भीष्म त्रयोदश योद्धे । दक्ष सर्वदा ते क्रोधादिक ॥ २ ॥
अदक्षासी सदा पीडिती ते दक्ष । निवेदितों ऐक वृत्त त्याचें ॥ ३ ॥
लोभ मूळ क्रोध वाढे परदोषें । क्षमेनें तयाचें शमन होई ॥ ४ ॥
संकल्पें कामाची होतसे उत्पत्ति । सेवनेंचि वृद्धि तयाप्रति ॥ ५ ॥
विषयनिवृत्त होई यदा ज्ञाता । विनाश कामाचा तदा होई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कामासी जिंकितां । मानवजन्माचा सफल हेतु ॥ ७ ॥

१४९

लोभें किंवा क्रोधें सद्‌गुण पराचे । न दिसतां ठाके असूया ते ॥ १ ॥
परदोषदृष्ट्या पावते ते वृद्धि । दया असूयेसी निवारक ॥ २ ॥

अथवा विषयवैराग्यें वा ज्ञानें । असूयेचा जाणें मूलच्छेद ॥ ३ ॥
अज्ञानेंचि मोह विपरीतदर्शी । पापें पापवृद्धि हरिती संत ॥ ४ ॥
विरुद्ध दृष्टीनें अभ्यासितां शास्त्र । लौकिककर्मांत चित्त रमे ॥ ५ ॥
तत्वज्ञानें रुचि पालटे त्या कर्मीं । अलौकिक कर्मीं उपजे प्रेम ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे हरिकृपेवीण । सत्कर्माचें प्रेम नुपजे कोणा ॥ ७ ॥

१५०

प्रियवियोगानें शोकाची उत्पत्ति । व्यर्थत्व बोधेंचि नाश त्याचा ॥
क्रोध-लोभाभ्यासें परासुता येई । कार्याधीन होई तेणें नर ॥ २ ॥
सर्वभूतदया विषयविरागें । मुक्तता नरातें प्राप्त होई ॥ ३ ॥
अहितसेवेनें किंवा सत्यत्यागें । मात्सर्य, सत्संगें नाश त्याचा ॥ ४ ॥
कुल, ज्ञान, किंवा ऐश्वर्याचा मद । ज्ञानेंचि तो नष्ट होई धर्मा ॥ ५ ॥
ईर्षा ते कामें वा परापमानार्थ । सर्वत्राहं बोध होतां नासे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विकारें दौर्बल्य । तत्त्व हें जाणील तोचि भला ॥ ७ ॥

१५१

लोकबाह्य भोगें, असंमत वाक्यें । निंदा, निरीक्षणें नाश पावे ॥ १ ॥
बलवंत वैरी जाणितां असूया । पावे ते विलया कारुण्यानें ॥ २ ॥
दैन्यावलोकनें कृपेचा उद्भव । धर्मनिष्ठा लय करी तिचा ॥ ३ ॥
अज्ञानेंचि भय, नष्ट तें ज्ञानानें । सर्व हे शांतीनें दोष जाती ॥ ४ ॥
त्रयोदश ऐसे दोष कौरवांचे । सत्संगें बाधा हे तुज न धर्मा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संतांची संगति । एकचि हे युक्ति सकल सौख्या ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १६३ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. ३३ समाप्त

अध्याय १६४ वा

१५२

धर्म म्हणे ताता, ज्ञात्यांच्या सहवासें । अनृशंसतेचें ज्ञान मज ॥ १ ॥
कूप कंटकाग्निसम नृशंसही । त्याज्यचि ते पाहीं सज्जनांसी ॥ २ ॥
क्रूर तो निर्दय इहपर क्लेश । देईल, जयास संग त्याचा ॥ ३ ॥
ताता, यास्तवचि लक्षणें क्रूराचीं । निवेदा मजसी कृपालुत्वें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां भीष्म । नृशंसाचे धर्म कथिती धर्मा ॥ ५ ॥

१५३

वासना विधित्सा[१] निंद्यचि जयाची । निंदक निंद्यही सर्वदा जो ॥१॥
दैववंचित मी जाणूनिही ऐसें । नीचकर्म रुचे जया नित्य ॥ २ ॥
अल्पदान तेंही कथी वारंवार । वंचक जो क्रूर घात करी ॥ ३ ॥
क्षुद्र, शठ, स्वार्थी, अभिमानी, सक्त । प्रलापी साशंक कृपण बहु ॥
वरि वरी करी त्यागाची प्रशंसा । द्वेष्टा आश्रमांचा दुराचारी ॥५॥
हिंसक, गुणांची पारख न ज्यातें । विवेक न ज्यातें मिथ्याभाषी ॥
वासुदेव म्हणे धार्मिका पापिष्ट । मानीतसे मूढ नृशंसक ॥ ७ ॥

१५४

अहंमन्या नसे कोणाचा विश्वास । दोषचि जो नित्य प्रगट करी ॥
समान दोषीही असूनि स्वार्थानें । पीडा आनंदानें इतरां देई ॥ २ ॥
उपकारकातें मानितो वंचित । मानी पश्चात्ताप प्रत्युपकारें ॥ ३ ॥
समुदायामाजी बैसून एकाकी । भोज्य पदार्थांसी सेवी सौख्यें ॥ ४ ॥
निर्दय तो क्रूर नृशंस जाणावा । संग न करावा कदा त्याचा ॥ ५ ॥
अर्पूनि विप्रांसी आप्तांसवें भक्षी । इहपर त्यासी सौख्य लाभे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भगवानव्यास । कथिती धर्मास श्रेष्ठ बोध ॥ ७ ॥

इतिश्रीवासुदेवकृत शांति० अ. १६४ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. ३४ समाप्त

अध्याय १६५ वा

१५५

निवेदिती भीष्म धर्मा, धर्मरत । विप्रासी यज्ञार्थ द्रव्य द्यावें ॥ १ ॥
अपहार ज्याचा जाहला वा कोणी । नित्य अध्ययनीं रत तया ॥२॥
धर्मसिध्यर्थेचि भिक्षा द्यावी सौख्यें । नृपाळें पाप्यांतें लुटूनिही ॥
उपोषित विप्रा करूनि अपहार । अर्पितां आहार दोष नसे ॥ ४ ॥
कर्म तें नृपासी कथावें स्वयेंचि । नृपाळें तयासी दंडूं नये ॥ ५ ॥
क्षत्रियदोषानें उपवास विप्रा । यास्तव सत्पात्रा साह्य व्हावें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विप्रांचा सांभाळ । करोत नृपाळ पुत्रांसम ॥ ७ ॥

१५६

आपत्कालास्तव कथिला जो विधि । करी नित्य तोचि दोष तया ॥

१ कर्म करण्याची इच्छा

तया दुर्बुद्धीतें परलोकीं सौख्य । न लाभे हें नित्य ध्यानीं असो ॥
चरितार्थास्तव ब्राह्मण मी ऐसें । कथूं नये कोठें सद्विप्रानें ॥ ३ ॥
नृपाहूनि श्रेष्ठ विप्राचेंचि तेज । कर्ता शास्ता विप्र ब्रह्माचि तो ॥४॥
अपमान त्याचा कदा न करावा । स्वधर्मेंचि व्हावा निजोद्धार ॥ ५॥
श्रद्धा संयमानें आचरावें पुण्य । दक्षिणाविहीन न घडो यज्ञ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे न्यूनदक्षिणेचा । यज्ञ सर्वस्वाचा नाश करी ॥ ७ ॥

१५७

त्याज्यस्त्रीसंग वा शूद्रांचा सहवास । सेविती उदक एका कूपीं ॥
पातकी ते विप्र तपावीण शुद्धि । कदा न पावती धर्मराजा ॥ २ ॥
थट्टा, समागम, गुरुजनकार्य । विवाह जीवितरक्षणार्थ ॥ ३ ॥
अनृत भाषणें दोष नच लागे । मर्म अनृताचें ध्यानीं असो ॥ ४ ॥
निकृष्टापासूनि विद्या न शिकावी । दुर्लभता ध्यावी परी ध्यानीं ॥५॥
वासुदेव म्हणे दुष्कुलीं स्त्रीरत्न । गणावें त्याज्य न तारतम्यें ॥ ६ ॥

१५८

गोविप्ररक्षण संकरप्रसंग । आत्मरक्षणार्थ वैश्या शस्त्र ॥ १ ॥
ब्रह्महत्या सुरा, गुरुस्त्रीसेवन । तैसेंचि सुवर्णस्तेय धर्मा ॥ २ ॥
विप्रद्रव्याचा तैं अपहार ऐसीं । महापातकें हीं प्राणहारी ॥ ३ ॥
देहान्तचि तयां प्रायश्चित्त एक । अपवाद यास नसे कोठें ॥ ४ ॥
स्वच्छंदविहारी, मद्यपि, विप्रस्त्री । सेवी जो तयासी त्वरित नाश ॥
योनिसंबंधानें सत्वरि पातित्य । पंचपातक्यांस निवृत्ति न ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे प्रायश्चित्तें दोष । जाती परी पाप न घडो पुनः ॥ ७ ॥

१५९

श्रेष्ठही पतित होतां व्हावा त्याग । कदा न संसर्ग व्हावा त्यांचा ॥
चोरालागीं चोर म्हणतां तेंचि पाप । दोष द्विगुणित मिथ्यारोपें ॥२॥
संभोग इच्छितां विवाहाचे पूर्वीं । तृतीयांश घ्यावी ब्रह्महत्या ॥ ३ ॥
कन्येचा त्या भोग घेई जो तयातें । अवशिष्ट लागे ब्रह्महत्या ॥ ४ ॥
गालिप्रदान वा ताडन विप्रासी । करी जो तयासी बहु पाप ॥ ५ ॥
शतवर्षें प्रेतभाव तो पावतो । पुढती कंठितो नरकवास ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे रुधिरें विप्राच्या । असंख्य वर्षांचा नरकवास ॥ ७ ॥

१६०

संग्राममरणें भ्रूणहत्यानाश । जाई मद्यदोष तप्तमद्यें ॥ १ ॥
तप्त लोहस्त्री ते गुर्वंगनादोषा । विप्रास्तव किंवा प्राण द्यावा ॥ २ ॥
एक तप ब्रह्मचर्य तेंवी तप । ब्रह्महत्यादोष नष्ट करी ॥ ३ ॥
गर्भिणीवधाचें द्विगुणित पाप । शूद्रवधादिक न घडो कर्म ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पातकविमुक्ति । होई तपानेंचि ध्यानीं असो ॥ ५ ॥

१६१

अनिच्छेनें जरी कीटकादि नाश । तरी होई शुद्ध पश्चात्तापें ॥ १ ॥
गोवधावांचूनि उपपातक तें । अब्दप्रायश्चित्तें नष्ट होई ॥ २ ॥
माता पितरांचा करील जो त्याग । जाणावा पतित पातकी तो ॥३॥
अन्नवस्त्रमात्र दुराचारिणीतें । इतर न व्हावे व्यवहार ॥ ४ ॥
ऐसेंही करूनि दोष नच जातां । व्हावी श्वानभक्ष्या पापिणी ते ॥५॥
पति पत्नीतें वा पत्नीही पतीतें । त्यागितां तयांतें सम दोष ॥ ६ ॥
कोणाही जीवाचा न घडावा नाश । घडतां प्रायश्चित्त आवश्यक ॥
मद्यपिमुखाचें अवघ्राण होतां । उपोषणें ज्ञाता शुद्ध होई ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पश्चात्ताप जरी । प्रायश्चित्त तरी दोष नाशी ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १६५वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. ३५ समाप्त

अध्याय १६६ वा

१६२

धर्म भीष्मांचा हा चालतां संवाद । वदला नकुल भीष्मांप्रति ॥ १ ॥
साधूनियां संधि प्रश्न करी भीष्मां । खड्गवृत्त आम्हां कथन करा ॥
आयुधांत धनु श्रेष्ठ परी खड्ग । प्रसंगीं रक्षक वीरा होई ॥ ३ ॥
यास्तवचि ताता, कथीं खड्गोत्पत्ति । आचार्यही कथीं विद्येचा या ॥
ऐकूनियां भीष्म जाहले हर्षित । ऐकें बाळा, वृत्त म्हणती प्रेमें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐका खड्गवृत्त । प्राचीन वृत्तांत मोदकारी ॥ ६ ॥

१६३

नकुला, ब्रह्म्यानें निर्मिली जैं सृष्टि । तया मरीच्यादि पुत्र तदा ॥१॥
वेदोक्त कथिला धर्मही तयांसी । त्यापरी वागती देव ऋषि ॥ २ ॥
क्रोधलोभव्याप्त परी दानवांनीं । उन्मत्त होऊनि त्यजिला धर्म ॥ ३ ॥

केवळ दंडें ते पीडिती लोकांसी । वृत्त विरंचीसी कथिती ऋषि ॥
ऐकूनि तें वृत्त दीर्घकाल जातां । यज्ञ करी मोठा ब्रह्मा एक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे तया यज्ञामाजी । घडली कथा ती कथिती भीष्म ॥

१६४

तारकापुंजीं तो उगवे जैं चंद्र । तैसा येई एक पुरुष कुंडीं ॥ १ ॥
अग्नींतूनि दिव्यपुरुष तो येतां । कोसळती उल्का भूमीवरी ॥ २ ॥
देवादिकांप्राति बोलला तैं ब्रह्मा । वीर ' खड्गनामा ' निर्मियेला ॥
ऐकूनि तें खड्ग जाहला अदृश्य । तीक्ष्ण धारयुक्त खड्ग होई ॥४॥
ब्रह्मा म्हणे येणें लोकसंरक्षण । दैत्यानिर्दलन सहज होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । ब्रह्मा तैं रुद्रातें अर्पी खड्ग ॥ ६ ॥

१६५

लाभतांचि खड्ग रुद्र झाला उग्र । विशाल शरीर चतुर्भुज ॥ १ ॥
मुखांतूनि ज्वाला निघती तयाच्या । पाहूनि त्या दैत्यां स्फूर्ति येई ॥
चर्मखड्गधारी शिवासवें दैत्य । आरंभिती युद्ध क्रूरपणें ॥ ३ ॥
त्रिनेत्र त्या वेळीं आरंभी संहार । निर्दाळिले थोर थोर दैत्य ॥ ४ ॥
अंतीं अवशिष्ट पळूनियां गेले । रुधिरें रंगलें भूमीतल ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संहार करून । रुद्र झाला सौम्य शिवरूप ॥ ६ ॥

१६६

पुढती शिवासी देवांनीं पूजिलें । रुद्रें खड्ग दिलें विष्णूप्राति ॥ १ ॥
मरीचीतें विष्णु ऋषींतें मरीचि । ऋषि इंद्राप्रति अर्पिती तें ॥ २ ॥
लोकपालां इंद्र मनूसी ते देती । क्रमानें पुढती इक्ष्वाकूतें ॥ ३ ॥
पुढती तें लाभे भरद्वाजाप्रति । कृपासी पुढती दिधलें तेणें ॥ ४ ॥
नकुळा, कृपानें अर्पिलें तें तुज । कृत्तिका नक्षत्र खड्गाचें या ॥ ५ ॥
आचार्य त्या रुद्र म्हणे वासुदेव । ऐका भीष्म काय कथिती पुढें ॥६॥

१६७

असि, विसशन, खड्ग, तीक्ष्णधार । दुरासद, थोर विजयही तें ॥
श्रीगर्भ तेंवी धर्मपाल ऐसीं । नामें हीं खड्गाचीं विजयप्रद ॥ २ ॥
माद्रीसुता, खड्ग आयुधांत श्रेष्ठ । कर्ता महेश्वर पुराणीं हें ॥ ३ ॥
पृथूनें निर्मिलें धनुष्य प्रथम । भूमीचें दोहन केलें तेणें ॥ ४ ॥

सर्व धान्यरूपी दोहूनियां दुग्ध। पाळिलें पृथ्वीस धर्ममार्गें ॥ ५ ॥
वीरांनीं खड्गाचें करावें पूजन। वृत्त हें ऐकून पुण्य लाभे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे खड्गाचें हें वृत्त। ऐकूनि आनंद वीरांप्रति ॥ ७ ॥
इतिश्रीवासुदेवकृत शांति० अ. १६६ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. ३६ समाप्त

अध्याय १६७ वा १६८

कथूनि हें वृत्त स्तब्ध होतां भीष्म। वंदूनियां धर्म सदनीं गेला ॥१॥
विदुरासवें तो बोले बांधवांसी। धर्मादिकांमाजी कोण श्रेष्ठ ॥ २ ॥
धर्मातें स्मरूनि बोले तैं विदुर। अर्थशास्त्रसार जाणता जो ॥ ३ ॥
बाहुश्रुत्य[1] तप, त्याग, श्रद्धा, यज्ञ। क्षमा तैं संयम सत्य, दया ॥ ४ ॥
भावशुद्धि ऐसें वैभव धर्माचें। स्वीकारीं तूं त्यातें अत्यादरें ॥ ५ ॥
धर्मा, धर्मार्थांचें मूळ जाणें हेंचि। स्वीकारिलें तेंचि मीही मोदें ॥
वासुदेव म्हणे महत्त्व धर्माचें। ऐका विदुर जें कथी धर्मा ॥ ७ ॥

१६९

धर्मानेंचि धर्मा, उद्धरले ऋषि। सकलां सद्गति धर्मानेंचि ॥ १ ॥
अभ्युदय झाला देवांचाही धर्में। अर्थलाभ जाणें स्वधर्मेंचि ॥ २ ॥
धर्मा, श्रेष्ठ धर्म अर्थ तो मध्यम। निकृष्ट तो काम म्हणती ज्ञाते ॥
यास्तव निग्रहें धर्मासी प्राधान्य। देऊनि वर्तन असों द्यावें ॥ ४ ॥
इच्छी आपणांसी इतरांतें तेंचि। वर्तावें ज्ञात्याची रीत ऐसी ॥५॥
वासुदेव म्हणे सारभूतवाणी। वदला ऐकूनि पार्थ ऐका ॥ ६ ॥

१७०

राया, कर्मभूमि जाणूनियां वार्ता। गोरक्ष्य वाणिज्या कृष्यादि तैं ॥
कला कौशल्यादि प्रशस्त या ठाईं। क्रियारूप पाहीं अर्थचि हा ॥
अर्थाविण धर्म कामा न अस्तित्व। ऐसें श्रुतिवाक्य सुविख्यात ॥
अर्थ ज्याचा धर्मकामांत नियुक्त। ब्रह्मचासम वंद्य होई तोचि ॥ ४ ॥
विविध रूपांनीं जपी तापसीही। इच्छिताती पाहीं अर्थ लोकीं ॥
अर्थज्ञान तोचि प्रकाश जाणावा। अज्ञान गणावा अंधकार ॥ ६ ॥

[1] बहुश्रुतपणा

सेवकां संपन्न करूनि, शत्रूसी । दंडी जनीं तोचि अर्थवंत ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आस्तिक नास्तिक । इच्छिताती एक अर्थमात्र ॥ ८॥

१७१

पार्थाचें भाषण होतां धर्मार्थज्ञ । माद्रीचे नंदन वदती ऐका ॥ १ ॥
आसनीं-शयनीं चालतांही मार्गी । अर्थद उद्योगीं रत व्हावें ॥ २ ॥
सकलांसी प्रिय परी जो दुर्लभ । होतां अर्थलाभ इच्छापूर्ति ॥ ३ ॥
प्रत्यक्षानुभव ऐसा सकलांसी । संबद्ध धर्मासी तोचि अर्थ ॥ ४ ॥
अर्थसंबद्ध जो तोचि राया, धर्म । उभय हे मान्य आम्हांप्रति ॥ ५ ॥
अर्थहीना काम, धर्महीना अर्थ । कदाही न प्राप्त राजश्रेष्ठा ॥ ६ ॥
यास्तव धर्मानें संपादूनि अर्थ । पुढती कामार्थ यत्न व्हावा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे माद्रीसुतवाणी । धर्मार्थचि जनीं सौख्यदाई ॥ ८ ॥

१७२

भीम म्हणे राया, कामाविण अर्थ । धर्मही कोणास रुचेचिना ॥ १ ॥
किंबहुना कामशून्या न कांहींचि । इच्छा, यास्तवाचि काम श्रेष्ठ ॥२॥
योग तपही तें नसे कामाविण । अध्ययन दान सकल कामें ॥ ३ ॥
स्वस्वकर्मी रत करी जनां काम । सागरलंघन कामानेंचि ॥ ४ ॥
बहुविध कामें व्यापिलें हें विश्व । कामहीन जीव नसे कोणी ॥ ५ ॥
नव्हता नसे तैं होणारही नाहीं । निष्काम न पाहीं कोणी नर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नवनीतासम । कथीतसे भीम कामसार ॥ ७ ॥

१७३

पेंडीहूनि तैल तक्राहूनि घृत । पुष्पफल श्रेष्ठ काष्ठाहूनि ॥ १ ॥
धर्मार्थाहूनि तैं श्रेष्ठ राया, काम । पुष्पामाजीं जाण मधु जेंवी ॥ २ ॥
धर्मअर्थां मूळ कामचि जाणावा । कामचि अथवा धर्म, अर्थ ॥ ३ ॥
कामाविण अर्थें लाभे न मिष्टान्न । त्रिवर्गात काम श्रेष्ठ असे ॥ ४ ॥
रममाण होई यास्तव स्त्रियांशीं । व्हावी समदृष्टि त्रिवर्गात ॥ ५ ॥
धर्मार्थ केवळ सेवी तो मध्यम । त्रिवर्गी जो सम उत्तम तो ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे आग्रहें स्वमत । प्रस्थापि बलवंत भीम तदा ॥ ७ ॥

१७४

चिंतूनि तें धर्म म्हणे सिद्धांतज्ञ । ज्ञात्यांचें वचन ऐकियेलें ॥ १ ॥
आंता कथितों मी तेंही ऐका प्रेमें । जो कोणी न रमे पाप-पुण्यीं॥२॥
तैसी त्रिवर्गाची आसक्ति न जया । लेशही न तया उरला दोष ॥३॥
सुवर्ण-मृत्तिका लेखितो तो सम । कर्मबंधांतून मुक्तचि तो ॥४॥
सकलही प्राणी जन्मादिसंयुक्त । ज्ञान होतां मोक्ष प्रशंसिती ॥ ५ ॥
मोक्षज्ञान आम्हां जाहलेंचि नाहीं । ब्रह्मा म्हणे नाहीं मोक्ष सक्ता[1] ॥
वासुदेव म्हणे अंतिम सिद्धान्त । ऐकवी बंधूस धर्मराज ॥ ७ ॥

१७५

मोक्षमार्गीं रत होताती सज्जन । प्रियाप्रिय जाण वर्ज्य तयां ॥ १ ॥
राग-द्वेष ऐसे वर्जावे सर्वदा । मार्ग त्या कामाचा नसे तेंवी ॥ २ ॥
नियुक्त मी जैसा आचरितों तेंचि । प्रेरक दैवचि सकल जीवां ॥ ३ ॥
बलवंत एक दैवाचि जाणावें । योजिलें जें दैवें तेंचि घडे ॥ ४ ॥
बहुप्रयत्नेंही अलभ्य न लाभे । लभ्य जें तें लाभे यत्नाविण ॥ ५ ॥
त्रिवर्गशून्यही अधिकारवंत । गुप्तज्ञानें मुक्त होत असे ॥ ६ ॥
ऐकूनि संतुष्ट पाहूनि बंधूंसी । प्रशंसा तयांची करी धर्म ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पुढती भीष्मासी । जाऊनि पुशिती ज्ञान ज्ञाते ॥ ८॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १६७ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. ३७ समाप्त

अध्याय१६८ वा

१७६

कुरुकुलप्रेमवर्धन भीष्मासी । अत्यादरें पुशी धर्मराज ॥ १ ॥
ताता, सौम्य तेंवी आनंददायक । होती कोण नित्य वदा मज ॥२॥
सुहृज्जनां द्रव्य आप्तही न लाभे । सुहृद् ऐसे श्रोते दुर्लभचि ॥ ३ ॥
उत्तम मित्रही दुर्लभ या जनीं । वाटे, विवरूनि कथन करा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां भीष्म । कथिती जें ज्ञान ऐका तेंचि ॥ ५ ॥

१७७

अयोग्य मैत्रीसी कोण तें ऐकावें । सर्वदा ठेवावें ध्यानीं धर्मा ॥ १ ॥
लोभी क्रूर धर्मद्वेष्टा जो निंदक । दुराचारी शठ संशयी जो ॥ २ ॥

१ आसक्ताला

क्षुद्र दीर्घसूत्री गुरुदारगामी । उत्शृंखल कामी लोकनिंद्य ॥ ३ ॥
प्रतिज्ञाभंजक अविवेकी दुष्ट । सदा असंतुष्ट मित्रद्रोही ॥ ४ ॥
तेजोभंगकारी अवधानशून्य । कार्यसेवी, हीन, कृतघ्न जो ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मद्यपि कोपिष्ट । छिद्रान्वेषी मित्र असूं नये ॥ ६ ॥

१७८

धर्मा, मित्र व्हावा कुलीन जो ज्ञाता । अनुभवी सदा यत्नशील ॥१॥
रूप गुणवंत लोभ-क्रोधहीन । सर्वज्ञ कृतज्ञ मधुरभाषी ॥ २ ॥
जितेंद्रिय दोषशून्य तैं विख्यात । सर्वदा संतुष्ट सदाचारी ॥ ३ ॥
सुटतांही मैत्री द्वेष न ज्या मनीं । संकटें सोसूनि मित्रा रक्षी ॥ ४ ॥
ऊर्णावस्त्राचा न रंग जाई कदा । तैसेंचि सर्वदा प्रेम ज्याचें ॥ ५ ॥
शास्त्र-प्रारब्धही प्रमाण जयासी । उदार जो त्यागी विश्वासार्ह ॥६॥
प्रसंगीं जयाचें प्रगटे सामर्थ्य । सुस्वभावी योग्य मैत्रीसी तो ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृतघ्न घातकी । त्याज्यचि मैत्रीसी सर्वकाळ ॥ ८ ॥

१७९

मित्रद्रोही तेंवी कृतघ्नाचें वृत्त । निवेदिती स्पष्ट भीष्म धर्मा ॥ १ ॥
मध्यदेशामाजी पूर्वी विप्र एक । वेदज्ञान त्यास नव्हतें कांहीं ॥ २ ॥
भिक्षामिषें एका ग्रामीं तो प्रवेशे । तेथें एक वसे धनिक कोणी ॥३॥
अनार्य तो परी विप्रप्रेमी ज्ञाता । मागे तया भिक्षा मूढ विप्र ॥४॥
वास्तव्यासी गृह जीविका वर्षाची । लाभली त्या दासी गतभर्तृका ॥
वासुदेव म्हणे अनार्यदत्त त्या । दानें विप्रचित्ता मोद बहु ॥ ६ ॥

१८०

शबराच्या ग्रामीं शबरसान्निध्य । पावूनियां सौख्य मानी विप्र ॥ १ ॥
हिंसाकर्मी रत होऊनियां गेला । अनार्यचि झाला शबर अन्य ॥ २ ॥
ऐसे दिन बहु लोटतां एकदां । अन्य एक आला विप्र तेथें ॥ ३ ॥
वेदज्ञ तो शुचिर्भूत मिताहारी । आश्रयार्थ करी शोध बहु ॥ ४ ॥
शूद्रान्न तयासी त्याज्य या कारणें । विप्रद्वारीं प्रेमें प्राप्त झाला ॥
वासुदेव म्हणे मृतपक्षीस्कंधीं । घेऊनि गृहासी येई विप्र ॥ ६ ॥

१८१

पाहूनि अनार्यासम त्या विप्रासी । ज्ञात्या ब्राह्मणासी किळस येई ॥

इतुक्यांत तया ओळखूनि म्हणे । गौतमा, मोहानें करिसी काय ॥२॥
ग्रामस्थ मी तव बालमित्र कां रे । त्यागिसी आपुलें श्रेष्ठ कर्म ॥३॥
आठवीं आपुले पूर्वज ते ज्ञाते । कलंक कुळातें कैंवी होसी ॥ ४ ॥
इंद्रियदमन, दया, शील, ज्ञान । स्मरूनि तें स्थान त्यागावें हें ॥५॥
वासुदेव म्हणे ऐकूनि गौतम । लाजूनि वचन वदला ऐका ॥ ६ ॥

१८२

द्विजश्रेष्ठा निर्धन मी वेदहीन । झालों द्रव्यहीन दुर्दैवानें ॥ १ ॥
धनार्थ या स्थानीं राहिलों सुखानें । असो, त्वद्दर्शनें धन्य झालों ॥
आतां एक रात्र राहूं याचि स्थानीं । जाऊं हें त्यजूनि उदयीक ॥
ऐकूनि तें विप्रा येऊनियां दया । राहिला त्या ठाया मित्रास्तव ॥
परी स्पर्शला न कोण्या पदार्थासी । अन्नउदकासी घेईचिना ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सुसंस्कृत जन । अभक्ष्य भक्षण कैंवी करी ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १६८ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. ३८ समाप्त

अध्याय १६९ वा

१८३

अन्यदिनीं प्रात:काळीं तो पुण्यात्मा । सोडूनि त्या स्थाना निघूनि गेला
गौतमही सिंधुतीरीं जावयासी । निघाला त्या मार्गी मिळती जन ॥
वाणिज ते होते सागरविहारी । जात होते तीरीं सागराच्या ॥ ३ ॥
तयांसवें जाई गौतम तो मार्गी । उध्वस्त हत्तींनीं केलें तयां ॥ ४ ॥
पुढती गौतम चालतां एकाकी । वटवृक्ष त्यासी दिसला रम्य ॥५॥
शाखा-प्रतिशाखा बहुत तयाच्या । घनगर्द छाया छत्रासम ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सडा चंदनाचा । पाहूनियां विप्रा हर्ष वाटे ॥ ७ ॥

१८४

देवमंदिरासमान । विप्रा वाटलें तें स्थान ॥ १ ॥
हर्षे छायेंत बैसतां । येती वायूच्या झुळुका ॥ २ ॥
अति विश्रांती पावून । विप्र होई निद्रामग्न ॥ ३ ॥
होतां संध्याकाळ तेथें । जाई भास्कर अस्तातें ॥ ४ ॥
तदा ब्रह्मदेवमित्र । बक कश्यपाचा पुत्र ॥ ५ ॥

नांडीजंघ ‘ राजधर्मा ’ । नामें विख्यात तो जनां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे जनीं । नव्हता तयासम कोणी ॥ ७ ॥

१८५

देवकन्यापुत्र ज्ञाता तो संपन्न । अलंकारपूर्ण दीप्तिमंत ॥ १ ॥
पाहूनि तो पक्षी गौतमा आनंद । आशेनें वधार्थ पाहूं लागे ॥ २ ॥
इतुक्यांत पक्षी म्हणे त्या विप्रासी । सिद्ध मी सेवेसी अतिथींच्या ॥
वास आतां करा एथेंचि सुखानें । पूजीन हर्षानें प्रातःकाळीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे प्रारब्धाची लीला । विप्रातें लाभला संग ऐसा ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १६९ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. ३९ समाप्त

अध्याय १७० वा

१८६

ऐकूनि ते शब्द विस्मित तो विप्र । पाहूनि तयास वदला पक्षी ॥१॥
म्हणे विप्रश्रेष्ठा, पौत्र मी दक्षाचा । करितों स्वागता हर्षं तव ॥ २ ॥
बोलूनि विप्रासी आसन पुष्पांचें । अर्पूनियां, मोठे दिधले मत्स्य ॥
शीतवारणार्थ चेतविला वन्हि । आपुल्या पंखांनीं वारा घाली ॥४॥
पुढती विप्रासी पक्षी पुशी गोत्र । निवेदी तैं विप्र गौतमचि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पुढती पल्लव- । शय्येवरी विप्र निद्रा करी ॥ ६ ॥

१८७

शय्येवरूनीच पुशी तया बक । कां रे या स्थळास प्राप्त होसी ॥ १ ॥
गौतम तयासी म्हणे मी दरिद्रि । धनार्थ सागरीं जातों यत्नें ॥ २ ॥
ऐकोनियां धीर देई तया बक । होशील कृतार्थ धीर धरीं ॥ ३ ॥
चतुर्विध द्रव्यप्राप्ति गुरु कथी । परंपरा, दुजी दैवयोगें ॥ ४ ॥
तृतीय तें इच्छायुक्त प्रयत्नानें । तैंवी मित्रप्रेमें चतुर्थ तें ॥ ५ ॥
एकमेक आतां झालों आम्हीं मित्र । प्रयत्न त्वदर्थ करणें प्राप्त ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । बक त्या विप्रातें मार्ग दावी ॥ ७ ॥

१८८

म्हणे विप्रा, तीन योजनें या मार्गें । जाईं तेथ असे मित्र माझा ॥१॥
राक्षसाधिप तो नामें विरूपाक्ष । मम नाम त्यास कथितां कार्य ॥२॥

१ मूळ नांव

ऐकूनियां विप्र आनंदें निघाला । बक अर्पी फळां मधुर तया ॥ ३ ॥
पुढती तो रम्य वनांतूनि जाई । ' मेरुव्रज ' पाही नगर रम्य ॥ ४ ॥
तट द्वारें बहु बुरुज तयासी । वृत्त राक्षसासी कळलें यदा ॥ ५ ॥
तदा पाठवूनि दूत तो विप्रासी । निज मंदिरासी आणा म्हणे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दूतांसवें हर्षें । विप्र राक्षसातें मिळण्या जाई ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १७० वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. ४० समाप्त

अध्याय १७१ वा १८९

निवेदिती भीष्म पुढती तो विप्र । भेटे राक्षसास जाऊनियां ॥ १ ॥
राक्षसप्रश्नें त्या कथी सत्य वृत्त । चिंती तें मनांत विरूपाक्ष ॥ २ ॥
ऐशा जातिमात्र ब्राह्मणासी साह्य । होऊनियां काय पुण्य मज ॥ ३ ॥
मित्रानें याप्रति धाडिलें या स्थानीं । मित्रास्तवचि मी साह्य यातें ॥
अद्य हा कार्तिकी पौर्णिमेचा दिन । सहस्र भोजन ब्राह्मणांचें ॥ ५ ॥
तयांसवें हाही करील भोजन । अतिथि जाणून द्रव्य द्यावें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे इतुक्यांत विप्र । पातले सहस्र तयास्थानीं ॥ ७ ॥

१९०

पाहूनि विप्रांसी सविधि स्वागत । करी विरूपाक्ष अत्यादरें ॥ १ ॥
आषाढी तैं माघी पौर्णिमेसी नित्य । राक्षस विप्रांस तोष देई ॥ २ ॥
तेंवी कार्तिकीसी रत्नें पात्रें अर्पी । रत्नांचिया राशी दक्षिणाही ॥ ३ ॥
ऐसा तो राक्षस तोषवी विप्रांसी । अद्यही तैसेंचि करी दान ॥ ४ ॥
यथेप्सित तें तें लुटूनियां धन । आनंद पावून जाती विप्र ॥ ५ ॥
राक्षसराज त्यां देई संरक्षण । पीडा पावोत न म्हणूनि मार्गीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गौतमही ऐसा । पावूनियां तोषा निघूनि गेला ॥ ७ ॥

१९१

अपार सुवर्ण घेऊनियां विप्र । गांठी वटवृक्ष महाकष्टें ॥ १ ॥
स्वागत तयाचें करी बकराज । भोजन तयास घाली मोदें ॥ २ ॥
विश्रांति घेऊनि विप्र चिंती मनीं । झालों कृतार्थ मी द्रव्यलाभें ॥
परी मार्गीं जातां पाथेय न कांहीं । वधितां या होई कार्य बका ॥४॥

तेणें आवश्यक पाथेय लाभेल । संतुष्ट होईल मांसें मन ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कृतघ्नासी हाय । नसेचि अकार्य लवही जनीं ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १७१ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. ४१ समाप्त

अध्याय १७२ वा

१९२

निवेदिती भीष्म तयारात्रीं बक । विप्राच्या सन्निध शयन करी ॥१॥
सन्निधचि वन्ही चेतविला होता । विप्रा शीतबाधा न होवो कीं ॥२॥
ऐशा त्या समईं एक दग्ध काष्ठ । घेऊनि बकास वधिलें दुष्टें ॥ ३ ॥
पंख, केश, त्याचे काढूनि भाजिला । मार्गे आक्रमिला ससुवर्ण ॥४॥
इकडे बकाची स्मृति विरूपाक्षा । म्हणे निजपुत्रा संशयानें ॥ ५ ॥
कां रे मित्र माझा भेटला न अद्य । करील कीं घात विप्र वाटे ॥६॥
सत्वरी जाऊनि शोध घेई त्याचा । संशय विप्राचा मज बहु ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राक्षसआज्ञेनें । लंघूनियां वनें गेला पुत्र ॥ ८ ॥

१९३

जातां वटाखालीं पाही बकअस्थि । धांवूनि विप्रासी धरितां दैत्य ॥
बकमांस तदा गवसे त्याप्रति । बांधूनि विप्रासी सदनीं नेती ॥ २ ॥
मित्रनाशवृत्तें आक्रंदती दैत्य । म्हणे विरूपाक्ष 'वधा विप्रा' ॥३॥
दुष्टाचें या मांस भक्षावें सर्वांनीं । परी भय मनीं सकलां वाटे ॥४॥
राक्षसाधिपातें विनविती दूत । प्रत्यक्ष हें पाप भक्षूं कैंवी ॥ ५ ॥
शबरांसी द्यावें मांस याचें राया । मान्य विरूपाक्षा जाहलें तें ॥६॥
वासुदेव म्हणे पुढती राक्षस । वधूनि विप्रास करिती खंडें ॥ ७ ॥

१९४

भरूनि तें मांस शबरांतें देती । परी न भक्षिती तेही तया ॥ १ ॥
मांसभक्षकही कृतघ्नाचें मांस । भक्षिती न साच ध्यानीं घेईं ॥ २ ॥
पंच महापापां प्रायश्चित्त असे । परी कृतघ्नातें निष्कृति न ॥ ३ ॥
भक्षिती न तया कृमींही नृपाळा । ऐकूनि धर्माला खेद वाटे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे कृतघ्नाचा संग । न घडो जगांत वैऱ्यातेंही ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १७२ वा तथा आपद्धर्मपर्वाचा अ. ४२ समाप्त

अध्याय १७३ वा

१९५

धर्मा, विरूपाक्षें रचूनियां चिता । मांडिला बकाचा अंत्यविधि ॥
दहन तयाचें जाहलें त्या वेळीं । आकाशांत आली कामधेनु ॥ २ ॥
चितेवरी तिच्या वदनींचा फेंस । गळतां बकास जीव येई ॥ ३ ॥
तत्काळ तें बक उड्डाण करूनि । भेटला जाऊनि विरूपाक्षा ॥ ४ ॥
इतुक्यांत इंद्र येऊनि त्या स्थानीं । वदला जे वाणी ऐका तेंचि ॥५॥
वासुदेव म्हणे जें जें घडे तें तें । जीवाच्या कर्माचें फल जाणा ॥

१९६

इंद्र म्हणे बक ब्रह्मसभेमाजी । न जातां तयासी शापी ब्रह्मा ॥ १ ॥
शापें त्याचि वध जाहला बकाचा । देई सजीवता ब्रह्माचि त्या ॥२॥
ऐकूनियां बक वंदूनि इंद्रातें । म्हणे गौतमातें सजीव करीं ॥ ३ ॥
बकास्तव इंद्रें केलें त्या जिवंत । भेटला त्या बक अत्यानंदें ॥ ४ ॥
द्रव्यासवें विप्रा पोंचवी गृहासी । भेटला ब्रह्मघ्नासी बक प्रेमें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे गौतम स्वगृहीं । रममाण होई दासीसवें ॥ ६ ॥

१९७

कृतघ्नासी शाप देवतागणांचा । जाईल नरका कृतघ्न हा ॥ १ ॥
धर्मा, आख्यान हें पूर्वी मजप्रति । नारद कथिती कथिलें तेंचि ॥२॥
कृतघ्नासी यश, वास्तव्य वा सौख्य । नसेचि हें नित्य ध्यानीं असो ॥
कृतघ्नातें नसे निष्कृति पापाची । कृतघ्नता ऐसी न घडो कोणा ॥
मित्रद्रोहें घोर नरकाची प्राप्ति । सर्वसुखप्राप्ति सन्मित्रेंचि ॥ ५ ॥
यास्तव सत्कार करावा मित्राचा । त्याग कृतघ्नाचा सकलां इष्ट ॥
धर्मा, काय आतां निवेदावें कथीं । ऐकूनि धर्मासी तोष बहु ॥ ७ ॥
वैशंपायन जें जनमेजयासी । निवेदी अभंगीं ग्रथिलें तेंचि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे आपद्धर्मपर्व । अर्पितों अपूर्व गोविंदातें ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत अभंग–भारतान्तर्गत शांतिपर्वांतील अ. १७३ वा तथा आपद्धर्मपर्वाचा ४३ वा अध्याय समाप्त.

## आपद्धर्मपर्व समाप्त

शांतिपर्वांतील आपद्धर्मपर्वाची अभंगसंख्या १९७

— ॐ नमो भगवते वासुदेवाय —

# अभंग-भारत

( महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ )

## १२ शांतिपर्व

### मोक्षधर्मपर्व ३

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत ॥ १ ॥

अध्याय १७४ वा अभंग १ ला

नर-नारायण तेंवी नरोत्तम । चित्कलाही जाण सरस्वती ॥ १ ॥
वंदूनियां भावें तेंवी व्यासांप्रति आरंभूं पुढती मोक्षधर्म ॥ २ ॥
भवबंधच्छेद होईल या ज्ञानें । बदरीनारायणें कृपा केली ॥ ३ ॥
चरणासन्निध वैसोनि तयाच्या । स्फूर्ति देई तैसा रचितों ग्रंथ ॥४॥
नव्हे नव्हे एथ अक्षरही माझें । तयाच्या करींचें बाहुलें मी ॥ ५ ॥
अस्थिर, अशांत, दुःखाकुल जन । पाहूनियां मन खिन्न होई ॥ ६ ॥
तयां सदाचारें लाभो शांतिसौख्य । यास्तव व्यासोक्त कथिला बोध
वासुदेव म्हणे ऐका मोक्षधर्म । पर्व हें संपूर्ण ज्ञानरूप ॥ ८ ॥

---

१ या मोक्षधर्मपर्वाचे अभंग श्रीक्षेत्र बदरीनारायण येथें झाले आहेत.

२

सर्वोपयोगी जो मोक्षरूपी धर्म । भीष्मांप्रति धर्म कथा म्हणे ॥ १ ॥
धर्मांप्रति भीष्म म्हणती अदृष्ट । प्रवृत्ति धर्मास फल बापा ॥ २ ॥
प्रत्यक्षचि फल निवृत्तिधर्माचें । तत्काळ पालटे सकल क्रिया ॥ ३ ॥
बहुविध राया, मार्ग या धर्माचे । विफल ते नसे क्रिया कांहीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे धर्म हा अल्पही । आचरितां होई चित्तशुद्धि ॥ ५ ॥

३

जैसा जैसा हा व्यवहार । वाटूं लागेल निःसार ॥ १ ॥
तैसी तैसी चित्तामाजीं । बिंबूं लागेल विरक्ति ॥ २ ॥
स्वर्गादिही ते निःसार । व्हावें मोक्षमार्गीं स्थिर ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे मोक्ष । शब्द जाणावा सापेक्ष ॥ ४ ॥

४

धन, दारा, पिता-पुत्र । नष्ट होतां न संत्रस्त ॥ १ ॥
पितामहा, ऐसी बुद्धि । सांगा प्रेमें मजप्रति ॥ २ ॥
कथिती भीष्म दुःखरूप । अवघें जाणितां हें जग ॥ ३ ॥
ताता, शोक दूर होई । कथितों वृत्त ध्यानीं घेई ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे कथा । पुरातन ऐका आतां ॥ ५ ॥

५

सेनजित राजा पुत्रशोकमग्न । असतां, ब्राह्मण मित्र त्याचा ॥ १ ॥
येऊनियां म्हणे मोह हा मोहांत । राया, हें ध्यानांत न येई कीं ॥ २ ॥
तैसाचि तूं शोच्य असूनि कोणाचा । करितोसि ऐसा शोक मित्रा ॥
तुझ्यास्तवही जे शोक करिताती । तेही जाणारचि पुत्रासम ॥ ४ ॥
शोक-मोहमग्न यास्तव न होईं । सुटकेचा कांहीं यत्न करीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मार्ग पुशी राव । जेणें शोक-मोह न करी बाधा ॥ ६ ॥

६

विप्र म्हणे राया, उत्तम, मध्यम । निकृष्टही जाण कर्मासक्त ॥ १ ॥
तेणेंचि तयांसी शोक-मोह ग्रासी । संबंध मजसी देहाचा न ॥ २ ॥
अथवा हे सर्व अवनीचि माझी । सर्वात्मत्वें तैसी इतरांचीही ॥ ३ ॥

निरंतर ऐसा अंतरीं विवेक । मज हर्ष, शोक नसे तेणें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐका विप्रवाणी । धरील जो ध्यानीं कृतार्थ तो ॥५॥

७

सागरांत जेंवी काष्ठाप्रति काष्ठ । भेटे वा वियोग क्षणीं पावे ॥ १ ॥
तैसाचि प्राण्यांचा जगीं समागम । पुत्र-पौत्र जाण बांधवादि ॥ २ ॥
वियोग तयांचा निश्चयें जाणोनि । धरूं नये मनीं लवही स्नेह ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे क्रियारूप बोल । जयाचे होतील ईश्वर तो ॥ ४ ॥

८

अगोचर स्थानाहूनि प्राप्त झाला । पुनरपि गेला अगोचरीं ॥ १ ॥
कल्पनामय तूं राया, पुत्रासवें । ज्ञान ज्ञेय व्हावें कैसें कोणा ॥ २ ॥
पिता-पुत्र सर्व चित्स्वरूपें एक । व्यर्थचि हा शोक जाण बापा ॥३॥
विषयलाभेंही घडेनाचि तृप्ति । तेणें दुःखप्राप्ति तयायोगें ॥ ४ ॥
दुःखनाशें सुख सुखानेंचि दुःख । एकामागें एक चक्र त्यांचें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सुखी तोचि दुःखी । दुःखी तोचि सुखी अनित्य तीं ॥

९

सुखदुःखाश्रयस्थान । राया, शरीर हें जाण ॥ १ ॥
फल कर्मानुरोधानें । भोगी याचि शरीरानें ॥ २ ॥
सहज हे स्थूल सूक्ष्म । देह, भ्रमती बहु जन्म ॥ ३ ॥
मोक्षकालीं उभयतांचा । नाश एकदांचि साचा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । स्थूल सूक्ष्मांची हे गांठी ॥ ५ ॥

१०

विविध स्नेहपाशबद्ध होऊनियां । सुखार्थचि वायां करिती यत्न ॥१॥
सिकतासेतूसम निष्फल ते यत्न । परिणामीं दारुण क्लेश होती ॥२॥
स्नेहास्तव तीळ घाण्यांत सांपडे । जीव तैं बापुडे संसारीं या ॥३॥
परिवारास्तव आचरितो पाप । क्लेश एकलाच अंतीं भोगी ॥ ४ ॥
पंकरुद्ध वृद्धगजासम जन । पुत्र-दाराकीर्ण शोकमग्न ॥ ५ ॥
पुत्र-वित्तनाशें दावाग्नीसमान । अटळ दुःख जाण मानवासी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अभ्युदयादिक । तेंवी सुख-दुःख दैवाधीन ॥ ७ ॥

११

असो नसो कोणी सुहृत्, शत्रु, मित्र । प्रज्ञाहीन थोर बुद्धीचा वा ॥
दैवाचि कारण दैवचि कारण । सुख-दुःख जाण दैवाधीन ॥ २ ॥
मित्र ते समर्थ न होती सौख्यासी । अमित्र दुःखासी कारण न ॥३॥
बुद्धियोगें द्रव्यलाभेचि न ऐसें । द्रव्यें सौख्य लाभे ऐसेंही न ॥४॥
ज्ञानें धनलाभ अज्ञानें दारिद्र्य । ऐसा हा विचार सत्य नसे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सुखादि उपभोग । लाभती तो मार्ग जाणे ज्ञाता ॥६॥

१२

बुद्धिमंत शूर मूढ । कवि भ्याड अथवा जड ॥ १ ॥
दुर्वल वा वलवंत । दैवें शोधी त्यासी सौख्य ॥ २ ॥
तेणें सुखार्थ प्रयत्न । निष्फलचि राया, जाण ॥ ३ ॥
वत्स, गोप, स्वामी चोर । धनी धेनूचे हे सर्व ॥ ४ ॥
परी दुग्धलाभ ज्यासी । धेनु जाणावी तयाची ॥ ५ ॥
उपभोग्याचा उपभोग । दैवाधीन हा सिद्धान्त ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे यत्न । अधिक लाभार्थ तो शीण ॥ ७ ॥

१३

मूढाहूनि मूढ ज्ञात्याहूनि ज्ञाते । भोगिती सौख्यातें मध्यस्थ न॥१॥
सुषुप्ति, समाधि सुखरूप दोन्ही । जागृतीचि जनीं द्वंद्वात्मक ॥ २ ॥
परी जे विवेकी द्वंद्वातीत योगी । अनर्थ तयांसी बाधतीना ॥ ३ ॥
स्त्री-पुत्रलाभानें अज्ञासी आनंद । घडतां वियोग शोक तयां ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सुख-दुःख हर्ष । शोकादि अज्ञांस सर्वकाल ॥ ५ ॥

१४

नित्य हर्षमग्न मूढ देवांसम । विवेकविहीन गर्वयुक्त ॥ १ ॥
कामक्रोधासक्त होती भ्रष्टमति । निश्चयेंसी अंतीं दुःख तयां ॥ २ ॥
जाणूनि शाश्वत सुखार्थ प्रयत्न । उत्साह धरून करणें योग्य ॥ ३ ॥
उत्साहेंचि विद्या तेंवी आणिमादिक । लाभ आळशास[1] नसे त्यांचा॥
सुखदुःखप्रिय अप्रियही जाण । न होतां अधीन उपभोगावें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ज्ञात्याचा व्यवहार । जाणील तो नर सौख्य भोगी ॥

१ आळशी.

१५

भयस्थानें शतावधि । सहस्रावधि शोकाचीं ॥ १ ॥
मूढालागीं प्रतिदिनीं । सदा निर्भयचि ज्ञानी ॥ २ ॥
ज्ञानें सहज विवेकी । शास्त्राभ्यासनिष्ठ जो कीं ॥ ३ ॥
निर्दोष जो मानी शास्त्र । शान्त-दान्ता न शिवे शोक ॥ ४ ॥
ऐसें जाणूनियां चित्त । संरक्षी जो भाग्यवंत ॥ ५ ॥
लय उत्पत्ति विश्वाची । जाणे शोक न शिवे त्यासी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । जाणा अधिकार ज्ञात्याचा ॥ ७ ॥

१६

निमित्त शोकासी अथवा तापद । जें देई आयास अथवा दुःख ॥१॥
एकांग[1] तें जरी असतां त्यजावें । ममत्वेंचि पावे दुःख जीव ॥ २ ॥
ज्या ज्या विषयाचा त्याग घडतसे । वंधन सुखाचें तोचि करी ॥३॥
विषयाभिलाषी विषयासवें नष्ट । होई महाकष्ट भोगूनियां ॥ ४ ॥
इहलोकींचें जें सर्व कामसौख्य । अथवा जें सौख्य स्वर्गीचेंही ॥५॥
तृष्णाक्षय सौख्याचा न तो लेशही । अनुभव घेई वासुदेव ॥ ६ ॥

१७

वैराग्यें निर्वाह घडेल वा कैसा । ऐसी ही आशंका निरर्थक ॥ १ ॥
शुभाशुभ जें जें पूर्वजन्मार्जित । अवश्य तें प्राप्त प्राज्ञ मूढां ॥ २ ॥
प्रियाप्रिय सुखदुःखप्राप्ति ऐसी । निर्धारें या सुखी अनासक्त ॥ ३ ॥
सर्व कामनांचा किळसचि यावा । कामचि जाणावा ' मृत्यु ' लोकीं
विकृत कामना तोचि जनीं क्रोध । वासुदेवा बोध सौख्यद हा ॥५॥

१८

आंवरी आपुले अवयव कूर्म । तैसा निर्वासन होईल जो ॥ १ ॥
इंद्रियगोचर स्वस्वरूपप्राप्ति । तया निश्चयेंसी होत असे ॥ २ ॥
निर्भय जो, ज्याचें भयही न कोणा । इच्छा-द्वेषहीना ब्रह्मलाभ ॥३॥
स्वप्न-व्यवहार-सत्ता, शोकानंद । भयाभयत्याग जया घडे ॥ ४ ॥
प्रिय-अप्रियही नसे जया कांहीं । प्रशान्तात्मा होई तोचि ज्ञाता ॥५॥
वासुदेव म्हणे कायावाचामनें । अनहित चिंतणें न घडे तया ॥ ६ ॥

१ एक अवयव

१९

न घडे त्याग दुर्जनांसी । अंत जिचा न प्राणान्तीं ॥ १ ॥
प्राणांतिकचि जो रोग । आशेचा त्या घडतां त्याग ॥ २ ॥
निश्चयेंसी सौख्यलाभ । पिंगलेची गाथा चांग ॥ ३ ॥
संकटींही पिंगलेसी । प्राप्ति जाहली धर्माची ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे आतां । ऐका पिंगलेची गाथा ॥ ५ ॥

२०

सांकेतिक स्थानीं पिंगला ते वेश्या । जातांही प्रियाचा न घडे लाभ ॥
दुःखव्याकुल ती शांतीसी अवलंबी । निज चित्ता बोधी निर्धारेंसी ॥
विकारवश मी निर्विकार शान्त । कांत समीपस्थ आच्छादिला ॥३॥
अविद्यास्तंभीं हें नवद्वारयुक्त । मंदिर, त्वरित विद्यावळें ॥ ४ ॥
आच्छादितां इष्ट परमात्मलाभें । कोण मज भेदें निवडूं शके ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वासना संपतां । आनंदरूपता सहज घडे ॥ ६ ॥

२१

आतां आत्मज्ञानें झालें पूर्णकाम । वंची ऐसा कोण धूर्त मज ॥ १ ॥
जाहला उच्छेद अज्ञाननिद्रेचा । नित्य जागृतीचा घडला लाभ ॥२॥
पूर्वसुकृतें वा दैवें अनर्थही । होई अर्थदाई कदाकाळीं ॥ ३ ॥
त्याचि स्थितीमाजी भाग्यानें मी आजी । नित्यानंदें राजी होऊनि ठेलें॥
स्वैर न राहिलीं इंद्रियें हीं आतां । आशात्यागें निद्रा सुखें येई ॥५॥
नैराश्यचि जनीं आत्यंतिक सौख्य । पिंगलेचें वाक्य सत्य सत्य ॥
सुखनिद्रा ऐसी लाभली तियेला । सेनजित झाला निःसंदेह ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विप्राची हे वाणी । कथिली भीष्मांनीं धर्माप्रति ॥८॥

इतिश्री वासुदेवकृत अभंग-भारतान्तर्गत शांतिपर्वांतील अ. १७४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा १ ला अध्याय समाप्त.

अध्याय १७५ वा

२२

क्षणक्षणा काल जातसे निघूनि । श्रेयस्कर जनीं काय सांगा ॥ १ ॥
ऐसा प्रश्न धर्म करी भीष्मांप्रति । ऐका जें धर्मासी कथिती भीष्म ॥

स्वाध्यायनिरत एका विप्राप्रति । 'मेधावी' मेधावी पुत्र होता ॥
लोकतत्त्ववेत्ता मोक्षधर्मज्ञही । पित्यालागीं पाहीं वदला पुत्र ॥ ४ ॥
क्षणक्षणा क्षीण होतां हें आयुष्य । श्रेयस्कर तेंच कथा, कर्म ॥५॥
वासुदेव म्हणे पिता कथी बाळा । यथाक्रम गेला तोचि धन्य ॥६॥

२३

बाळ म्हणे ताता, आघात हे घोर । घेरा सभोंवार पडला पहा ॥
नित्य अमोघांचा होतां हा वर्षाव । धीरासम काय वदसी ताता ॥
विप्र म्हणे कैंचे आघात, घेरिलें- । कोणी तें न कळे, वर्षे काय ॥३॥
पुत्र म्हणे ताता, मृत्युचे आघात । घेरिलें नरास जरेनें या ॥ ४ ॥
अहोरात्री किती विफल या जाती । 'अमोघा' तयांसी म्हणती ज्ञाते
वासुदेव म्हणे क्षणोक्षणीं काळ । येई हा जवळ सावधान ॥ ६ ॥

२४

अल्पोदकीं दीर्घ मत्स्य । मृत्यु पावणार सत्य ॥ १ ॥
तैसें अत्यल्प आयुष्य । जाणूनियां कोणा सौख्य ॥ २ ॥
अनवाप्त कामातेंही । निर्दयत्वें मृत्यु नेई ॥ ३ ॥
अपेक्षितांही मेषीतें । वृक ओढितो मेषातें ॥ ४ ॥
तैसी मृत्यूची हे झेंप । नाहीं दयेचा त्या लेश ॥ ५ ॥
कठोरता मूर्तिमंत । मृत्यु म्हणे वासुदेव ॥ ६ ॥

२५

नका नका वेंचूं काळ । घाला निश्चयें पडेल ॥ १ ॥
पंथ श्रेयाचा या क्षणीं । धैर्यें आक्रमा हो झणीं ॥ २ ॥
कार्य न होतांही पूर्ण । मृत्यु नेईल बांधून ॥ ३ ॥
उद्यांचें तें करा आज । पुढचें आधीं होवो काज ॥ ४ ॥
मृत्यूचा या पडतां घाला । सवड न मिळे कोणाला ॥ ५ ॥
मृत्यु येईल या क्षणीं । ऐसें सांगूं न शके कोणी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नित्य । सिद्ध असावें मरणास ॥ ७ ॥

---

१ मेधावी–बुद्धीमान, आणि नांवही तेंच.

२६

यौवनींच नर धार्मिक असावा । विश्वास नसावा मृत्यूवरी ॥ १ ॥
धर्माचारें कीर्ति लाभे इहलोकीं । सौख्य परलोकीं धर्में घडे ॥ २ ॥
मोहाच्या संचारें योग्यायोग्यकर्में । पोषितो अधर्में परिवारासी ॥३॥
परिवारासक्त ऐशा अज्ञाप्रति । मृत्यु हरिणाप्रति व्याघ्र जैसा ॥ ४ ॥
हें झालें, हें आतां घेईन पुढती । घेतलें जें हातीं पूर्ण होतां ॥ ५ ॥
ऐशा आशामग्ना ग्रासितो कृतांत । कृषि वाणिज्यार्थ न पाहीचि ॥६॥
वासुदेव म्हणे दुर्बलां बलाढ्यां । ज्ञात्यां अकृतार्थां नेई मृत्यु ॥ ७ ॥

२७

ताता, मृत्युजरा व्याध्यादि अनेक । दुःखें या देहास पीडिताती ॥१॥
ऐसें असोनियां स्वस्थ कां बैसलां । जन्मतांचि जरा मृत्यु मागें॥२॥
ग्रासिलें हें विश्व ताता, या दोघांनीं। वसतां मोद ग्रामीं तोचि मृत्यु
वनदेवतांचें स्थान कथी वेद । यास्तव वनांत वास घडो ॥ ४ ॥
ग्रामवासानंद रज्जूचि तो दृढ । छेदी पुण्यवंत इतर बद्ध ॥ ५ ॥
काया वाचा मनें हिंसा न जयासी । व्याघ्र तस्कराची बाधा न त्यां ॥
वासुदेव म्हणे दुष्कर्मीं जो रत । वनामाजी वास न रुचे तया ॥७॥

२८

मृत्यूचें त्या जराव्याधीरूपी सैन्य । येतां ऐसा कोण अडवील त्या ॥
योगधर्ममात्र अडवील तया । योममार्ग जया अमर तोचि ॥ २ ॥
ज्ञानावलंबनें जीव शिवैक्यार्थ । सद्‌गुरुवेदान्त सेवा व्हावी ॥ ३ ॥
इंद्रियजयादि सन्मार्गेंचि मृत्यु । टळेल न हेतु अन्य असो ॥ ४ ॥
अमरत्वा किंवा जन्म-मरणासी । कारण देहचि निश्चयें हा ॥ ५ ॥
विषयाधीनातें मृत्यु तो जाणावा । पावे अमरत्वा विषयत्यागें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मेधावी बालक । मार्ग ऐसा सत्य दावीतसे ॥ ७ ॥

२९

म्हणून मी हिंसा-काम-क्रोधहीन । योगाभ्यासीं मन लावियेलें ॥ १ ॥
सम दुःख सुखी होऊनि लीलेनें । त्यागितों मृत्यूतें अमरासम ॥२॥
शांतियज्ञ, ब्रह्मचिंतन, प्रणव- । जप, चित्तलय बिंदूमाजी ॥ ३ ॥
स्नान, शौच, गुरुशुश्रूषादि कर्म । उदगयनीं धर्म पाळीन हे ॥ ४ ॥

अनित्य सौख्यद हिंसामय यज्ञ । मजसम कोण आचरील ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पिशाचासमान । वारंवार जन्म ऐशा कर्मे ॥ ६ ॥

३०

ब्रह्मार्पणा ज्याची वाणी तेंवी मन । तपादि सत्कर्म ब्रह्मार्पण ॥ १ ॥
विश्वव्यापी परब्रह्म तोचि होई । अधिकार नाहीं येरालागीं ॥ २ ॥
विद्येसम दृष्टि सत्यासम तप । रागासम दुःख अन्य नसे ॥ ३ ॥
त्यागासम सौख्य अन्य नसे लोकीं । आत्मा विश्वव्यापी मीही तोचि
उद्धारार्थ मज कासया संतति । वासुदेव कथी विप्रवाक्य ॥ ५ ॥

३१

एकता, समता तेंवी सत्यनिष्ठा । शील, सरलता, हिंसात्याग ॥ १ ॥
अंतीं सर्वसंगपरित्याग जाणा । याहूनि ब्राह्मणा वित्त नसे ॥ २ ॥
ताता, निश्चयेंसी मृत्यु जरी तुज । दाराद्रव्यभोग करिती काय ॥३॥
पिता पितामहादिक कोठें गेले । चिंतूनि पाहिलें पाहिजेचि ॥ ४ ॥
हृदयमंदिरीं प्रवेशूनि पाहीं । ताता, शोध घेई परमात्म्याचा ॥ ५ ॥
भीष्म म्हणे धर्मा, पुत्राची हे वाणी । विप्र तो ऐकूनि तैसा वागे ॥
तूंही त्याचपरी ठेवीं आचरण । वासुदेव धन्य बोधामृतें ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १७५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. २ रा समाप्त

अध्याय १७६ वा ३२

पितामहाप्रति प्रश्न करी धर्म । शास्त्रानुवर्तन करितील जे ॥ १ ॥
निर्धन अथवा सधनही कोणी । सुखदुःख जनीं कैसें तयां ॥ २ ॥
शांतिनिष्ठ मुक्त शंपाकाची वाणी । कथिली भीष्मांनीं तेचि ऐका ॥
कुदारा, कुवस्त्र बुभुक्षापीडित । वदे शांत विप्र बोधवाणी ॥ ४ ॥
जन्मादारभ्याचि सुखदुःखारंभ । दैव एक मार्ग स्थिर करी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दैवाधीन सुख । ज्ञाता हर्षशोक न मानीचि ॥ ६ ॥

३३

वासनांचा त्याग करूनि श्रेयाचा । मार्ग योग्य कैसा वरिसी न तूं ॥
गांगेया, कोणाच्या स्वाधीन न चित्त । विचारें ध्यानांत घेई बापा ॥

विचरसी यदा अकिंचन, भीष्मा । लाभेल बा तेव्हां सुखास्वाद ॥३॥
अकिंचनालागीं सुखें निद्रा येई । सुखानेंचि होई जागृत तो ॥ ४ ॥
सुख, पथ्य, शिव अनामय नित्य । आकिंचन्य सत्य सत्य भीष्मा ॥
वासुदेव म्हणे निर्वैर हा मार्ग । कामुका दुर्लभ, सुलभ ज्ञात्या ॥ ६ ॥

३४

शुचिर्भूत निष्कांचन जो विरक्त । त्रैलोक्यांत श्रेष्ठ तोचि एक ॥ १ ॥
आकिंचन्य राज्य तुलोनि पाहतां । पावलें श्रेष्ठता आकिंचन्य ॥ २ ॥
द्रव्यामुळें भय बहुत रायासी । निर्भय तो सुखी अकिंचन ॥ ३ ॥
कामसंचारी तो मोकळ्याही रानीं । उशाशीं घेऊनि बाहु झोंपे ॥४॥
वासुदेव म्हणे देवही तयाची । प्रशंसा करिती अत्यानंदें ॥ ५ ॥


३५

धनवंताचिया चित्तीं । क्रोध-लोभाची वसती ॥ १ ॥
तेणें त्याची बुद्धि नष्ट । दृष्टि वक्र म्लान वक्त्र ॥ २ ॥
कपाळासी नित्य आंठ्या । क्रूर वर्तन त्या दुष्टा ॥ ३ ॥
क्रोधें खाई दंत ओष्ठ । करी भाषण निष्ठुर ॥ ४ ॥
जरी पृथ्वीचें तो दान । इच्छितां त्या भेटे कोण ॥ ५ ॥
अति सहवास लक्ष्मीचा । घडतां, मोहित अज्ञाता ॥ ६ ॥
वायु शरन्मेघा जेंवी । हरिते लक्ष्मी बुद्धि तेंवी ॥ ७ ॥
मानी माझें श्रेष्ठ सर्व । मूढ, म्हणे वासुदेव ॥ ८ ॥

३६

निजरूप धन कुलाच्या अभिमानें । चित्त प्रमादानें धुंद होई ॥ १ ॥
विषयांध ऐसा पावे धनक्षय । पुढती अन्याय न्याय मानी ॥ २ ॥
ऐसा अमर्याद होतां दंड भोगी । तैसे बहु अंगीं जडती रोग ॥३॥
यास्तव ईषणा त्यागूनियां यत्नें । प्रतिकार ज्ञानें होवो यांचा ॥४॥
सर्वत्यागावीण सौख्य न वा ज्ञान । निर्भय शयन सर्वत्यागें ॥ ५ ॥
यास्तव गांगेया, करीं सर्वत्याग । धर्मा, हें शंपाक वदला मज ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सर्वत्याग श्रेष्ठ । कथिती धर्मास पितामह ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १७६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ३ रा समाप्त



तत्काळ तें उग्र उठूनि धांवला । फांसाचि लागला वृषभांलागीं ॥
वासुदेव म्हणे पाहूनि तें मंकी । वदला विवेकी काय ऐका ॥ मोक्षधर्मपर्व अ. १७७

अध्याय १७७ वा

३७

धनेच्छेनें यत्न करितांही लाभ । न होतां आनंद कैसा लाभे ॥१॥
धर्म म्हणे सांगा पितामहा, तेंचि । धनाशासक्तासी मार्ग·काय ॥२॥
भीष्म धर्माप्रति कथिती पंचमार्ग । ऐका स्वस्थचित्त होऊनियां ॥३॥
लाभालाभांसम, द्रव्यार्थ न यत्न । वैराग्य, वचन सत्य ज्याचें ॥४॥
कामेच्छा न जया तोचि सुखी नर । वासुदेव थोर वचन सांगे ॥

३८

शांतीचा हा मार्ग निश्चयें वृद्धांचा । स्वर्ग धर्म तैसा मोक्ष हाचि ॥१॥
पुरा हेंचि मंकी वैराग्यसंपन्न । वदला भाषण ऐक धर्मा ॥ २ ॥
द्रव्यार्थ प्रयत्न करूनि मंकीनें । अवशिष्ट धनें वृषभ दोन ॥ ३ ॥
घेऊनियां, जुंपी जोखडासी एका । पुढती उद्योगा प्रवर्तला ॥४॥
अचानक वेगें धांवले ते बैल । मार्गीमाजी उष्ट्र बसला होता ॥५॥
दोहींकडे त्याच्या वृषभ ते आले । ग्रीवेसी भिडलें जोखडही ॥६॥
तत्काळ तें उष्ट्र उठूनि धांवला । फांसचि लागला वृषभांलागीं ॥७॥
वासुदेव म्हणे पाहूनि तें मंकी । वदला विवेकी काय ऐका ॥ ८ ॥

३९

आत्मविश्वासेंही चतुर, दक्ष नरें । कदा इच्छूं नये ऐसें धन ॥ १ ॥
दैवयोगें कैसें विघ्न हें पातलें । गतप्राण झाले वृषभ दोन्ही ॥ २ ॥
विरोधूनि दैवा आग्रह धरितां । कदाही न हाता येई यश ॥ ३ ॥
तात्पर्य सुखाशा एका विरक्तासी । आठवे शुकाची वाणी मज ॥४॥
सर्व कार्यपूर्तीहूनि कामत्याग । वाटे मज चांग निश्चयेंसी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जनकसदना । त्यागूनि जातांना वदला शुक ॥ ६ ॥

४०

द्रव्यसंपादनादिक जी प्रवृत्ति । कदा न समाप्ति तिजलागीं ॥ १ ॥
जीविताची तेंवी शरीराची आशा । मंदाची सर्वदा वृद्धि पावे ॥ २ ॥
यास्तव हे मना, होवूनि निवृत्त । राहूनि विरक्त शांति पावें ॥ ३ ॥
वारंवार तुझे विफल प्रयत्न । होतांही न मन विरागी हें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐशापरी मंकी । बोधी स्वमनासी वैराग्यानें ॥५॥

४१

अभिलाषी मना, नाश जरी माझा । इच्छिसी न, शब्दा ऐकें माझ्या
आनंदित जरि मजमुळें होसी । संबंध लोभासी न करीं माझा ॥ २ ॥
मूढा, वारंवार धन संग्रहीत । होतां तें विनष्ट इच्छिसी कां ॥ ३ ॥
हाय तुझ्या झालों हातींचें खेळणें । दास्य कां न येणें ऐशा नरा ॥४॥
आजवरी जनीं पूर्वापार कोणी । वासना जिंकूनि गेला नाहीं ॥ ५ ॥
यास्तव त्यजूनि सर्वही आरंभ । होऊनि प्रबुद्ध जागृत मी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वासनांचा अंत । ज्याच्या तो अनंत स्वयें जाणा ॥७॥

४२

विषयवासने, सत्य तूं कठोर । भासे मज वज्रहृदय तव ॥ १ ॥
शत अनर्थेंही भग्न तें न होई । जाणें तुज पाहीं हेतूंसह ॥ २ ॥
प्रीतीस्तव तुझ्या भोगितों मी दुःख । मूळ तुझें स्पष्ट कळलें मज ॥
संकल्पापासूनि असे त्वदुत्पत्ति । आतां संकल्पचि त्यागीन मी ॥४॥
निर्मूल तूं तेणें होऊनि जाशील । वासुदेव बोल हृदयीं धरी ॥ ५ ॥

४३

द्रव्याभिलाषा हे नव्हे सौख्यदाई । द्रव्यलाभें होई चिंता बहु ॥ १ ॥
नाश जरी होई त्या प्राप्त द्रव्याचा । मृत्यूसम दुःखा भोगी नर ॥२॥
प्रयत्नेंही लाभ होईल न ऐसें । देहार्पणेंही तें न मिळे धन ॥ ३ ॥
लाभेंही न तृप्ति, वाढे धनइच्छा । गंगोदकें तृषा अधिक जेंवी ॥ ४ ॥
ऐसिया तृष्णेनें जाणतों मी नाश । वासने, तूं त्याग करीं माझा ॥५॥
वासुदेव म्हणे वासनेचा त्याग । इच्छिती, सत्संग घडे जयां ॥ ६ ॥

४४

देहस्थित जो हा भूतसमुदाय । राहो, किंवा जावो, इच्छेसम ॥ १ ॥
काम लोभानुग विकार हो माझें । लवही प्रेम नसे तुम्हांवरी ॥ २ ॥
सत्वगुणाचा मी आश्रय करीन । सकळ त्यागून वासनांसी ॥ ३ ॥
सकलही भूतां अंतरीं पाहून । योगावलंबन करितों आतां ॥ ४ ॥
श्रवण-मनन करितों एकचित्तें । लीन अंतरातें करितों ब्रह्मीं ॥ ५ ॥
त्यागूनियां रागद्वेष अनासक्त । होऊनि लोकांत संचरतों ॥ ६ ॥

वासने, या योगें पुनरपि मज । देसील न दुःख ऐसें कदा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वासनेचा वींट । जयासी, अनंत प्राप्त तया ॥ ८ ॥

४५

वासने, प्रवृत्ति वाढवीसी नित्य । यास्तव शेवट हाचि मार्ग ॥ १ ॥
आशा शोक श्रम तुजमुळें जाण । दुःख सर्वोत्तम द्रव्यनाशें ॥ २ ॥
सर्वदा सर्वत्र त्याचा अवमान । यास्तव धनहीन अतिदुःखी ॥ ३ ॥
द्रव्यवंताचेंही सौख्य दुःखग्रस्त । तस्कर तयास करिती पीडा ॥४॥
विविध दंडाचे तयाप्रति क्लेश । नित्यचि उद्वेग तयालागीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मंकी स्वानुभवें । कथितो तें घ्यावें नित्य घ्यानीं ॥६॥

४६

द्रव्यलोभ अति कष्टप्रद ऐसें । दीर्घकालें मातें ज्ञात झालें ॥ १ ॥
वासने, तूं ज्याचा आश्रय करिसी । पाठीसी लागसी तयाच्याचि ॥
तत्वज्ञानशून्या मूढा असंतोष । अग्नीसम भक्ष्य न पुरे तुज ॥ ३ ॥
सुलभ दुर्लभ कांहीं न जाणसी । इच्छिसी मजसी दुःखमग्न ॥ ४ ॥
परी आतां तुज प्रवेश न एथें । सहज द्रव्यनाशें वैराग्यही ॥ ५ ॥
निवृत्त मी आतां विषयांपासूनि । वासुदेव वाणी कथितो तेचि ॥ ६

४७

आजवरी दुःखें साहिलीं अनेक । अज्ञानें, न मज ज्ञान झालें ॥ १ ॥
द्रव्यनाशें आजि पावलों विरक्ति । अवयवशांति आजि झाली ॥ २ ॥
सुखनिद्रा आतां घेईन मी आजि । वासने, तुझाही करितों त्याग ॥
मनोवेग सर्व त्यागिले वासने । आतां मजयोगें सुख न तुज ॥ ४ ॥
धिक्कारही आतां साहीन सुखानें । दुष्टांही प्रेमानें वागवीन ॥ ५ ॥
यदृच्छालाभानें संतोष पावेन । नित्य शम दम जागवूनि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वासनेचा वैरी । तोचि जनीं वरी सद्गुण हे ॥७॥

४८

शत्रूचि तूं माझा विषयवासने । कदा न इच्छिणें मान आतां ॥ १ ॥
निर्वेद, निवृत्ति, तृप्ति, शांति, दम । सत्य क्षमा जाण भूतदया ॥२॥
वारिलीं, यालागीं आतां काम, लोभ । आशा, दैन्य त्याग करोत हे ॥

बेभान मी आतां न होई कदापि । वासनाहीनासी सदा सौख्य ॥४॥
वासनायुक्त तो सर्वदाचि दुःखी । वासुदेव चिंती सिद्धांत हा ॥ ५॥

४९

रज तोचि काम यास्तव रजाचा । त्यागचि सर्वदा हितप्रद ॥ १ ॥
दुःख, निर्लज्जता तेंवी असमाधान । काम-क्रोधें जाण जन्म यांसी ॥
ग्रीष्मकाळीं शीतऱ्हदासम ब्रह्म- । मार्ग, आक्रमून चाललों मी ॥३॥
कर्मसंन्यास मी करितों यास्तव । सौख्य घेई धांव मजकडे ॥ ४ ॥
इहपरसौख्या वैराग्यसौख्याची । तुलना नसेचि कदाकाळीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सौख्यवैराग्याचें । परमानंदाचें द्वार जाणा ॥ ६ ॥

५०

पंचकोशात्मक शरीर हें जाण । सानंद[1] ज्या नाम समाधि तो ॥ १ ॥
महत्तत्व जया संज्ञा तोचि काम । या सर्वा जिंकून पुढती गेलों॥२॥
ब्रह्मपुरीं आतां करितों प्रवेश । नृपासम सौख्य तेणें मज ॥ ३ ॥
ब्रह्मपुर तेंचि अविनाशी सौख्य । ऐसा मंकी मोक्षरूप झाला ॥ ४ ॥
वासनेच्या त्यागें केला मूलच्छेद । तेणें परमानंद पावला तो ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसी हे वासना । प्रभो नारायणा नष्ट करीं ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १७७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.४था समाप्त

अध्याय १७८ वा

५१

भीष्म पितामह बोलती धर्मासी । मिथिलाधिपाची परिसें वाणी ॥१॥
ऐसेंच जनकनृपाळ बोलला । परिसें या काला इतिहास तो ॥ २ ॥
देशकाल वस्तुपरिच्छेदशून्य । शुद्ध परब्रह्म धन माझें ॥ ३ ॥
अलिप्त मी आतां संसारापासूनि । नसे लाभ-हानि कांहीं मज ॥ ४ ॥
मिथिलानगरी होतांही प्रदीप्त । लवही न खेद मजलागीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसाचि बोध्याचा । उपदेश आतां श्रवण करा ॥ ६ ॥

५२

वैराग्यसंपन्न शास्त्रतत्वज्ञाता । शांत तृप्त बोध्या नहुष पुशी ॥ १ ॥
मुने, शांतिलाभ कैसा तुम्हांप्रति । निवेदा मजसी तोचि मार्ग ॥२ ॥

१ सानंद नांवाचा सबीज समाधि

मुनि म्हणे नित्य ज्ञात्यांचें वचन । पाळितों, कदा न उपदेशितों ॥
गुरुषट्क माझें कथितों घे ध्यानीं । वेश्या ख्यात जनीं पिंगला ते ॥
कुरर, सर्प, भृंग तेंवी इषुकार । कुमारी हे थोर ज्ञानदाते ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विवेचन याचें । भीष्म कथिती तें परिसा आतां ॥

५३

महाबलवती आशा ते डाकिनी । नैराश्यचि जनीं परम सुख ॥ १ ॥
यास्तव आशेची करितां निराशा । लाभे सुखनिद्रा पिंगलेसी ॥ २ ॥
कुररसंज्ञक पक्ष्याच्या चोंचींत । पाहूनियां मांस सकल पक्षी ॥ ३ ॥
अंगावरी त्याच्या धांवूनियां येतां । त्यागूनियां मांसा कुरर मुक्त ॥
अन्य सदनींचि नित्य वसे सर्प । व्यर्थ गृहारंभ दुःखकारी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पुढती ऐकावें । विचारें ठसावें चित्तीं ज्ञान ॥ ६ ॥

५४

भ्रमरासमान भैक्ष्यावलंबनें । मुनि अद्रोहानें वसती सौख्यें ॥ १ ॥
एकाग्र होऊनि एक इषुकार । रमतां साचार निजकर्मी ॥ २ ॥
राव सपरिवार जातांही जवळूनि । कळलें न कांहीं तयालागीं ॥ ३ ॥
एकाग्रता ऐसी लाभेल जयासी । तया भगवत्प्राप्ति सहज घडे ॥४॥
कंकणांचा नाद न व्हावा म्हणूनि । एक तें राखूनि, कन्या तुष्ट ॥५॥
तैसा मी एकाकी विचरतों जगीं । तेणें कलहाची भीति नसे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विरागी ज्ञात्यांचा । भिन्नचि हा ऐसा मार्ग लोकीं॥७॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १७८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ५वा समाप्त

अध्याय १७९ वा ५५

कोण्या वृत्तें ताता, वृत्तज्ञा वागतां । शोक, मुक्ति हाता येई सांगा ॥
काय आचरितां लाभते सद्गति । धर्म भीष्मांप्रति सांगा म्हणे ॥२॥
धर्मासी गांगेय तदा निवेदिती । आजगरवृत्ति विप्र एक ॥ ३ ॥
स्थिरचित्त व्याधिशून्य वंद्य ज्ञात्या । पाहूनि प्रल्हादा मोद झाला ॥४॥
बुद्धिमंत राव बोले तें विप्रासी । वासुदेव कथी ऐका तेंचि ॥ ५ ॥

५६

स्वस्थ, दंभहीन, दयावंत, दान्त । कर्मेच्छारहित सत्यवादी ॥ १ ॥
समदृष्टीचा तूं प्रगल्भ मेधावी । विचरसी कैंवी बालासम ॥ २ ॥

इच्छिसी न लाभ, अलाभ न खेद । इष्ट न अनिष्ट नित्य तृप्त ॥ ३ ॥
कामादि वेगांनीं व्याकुळ न होसी । तयांचें मूळचि नसे तुज ॥ ४ ॥
धर्म-अर्थकामीं नसेचि आसक्ति । तेंवी इंद्रियार्थीं लक्ष नसे ॥ ५ ॥
ऐसा साक्षिरूप विचरसी मुक्त । श्रेयस्कर वृत्त-शास्त्र, सांगें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे लौकिकालौकिक- । ज्ञाता, विप्र बोध करी ऐका ॥७॥

५७

सौम्य अर्थपूर्ण वाणी ते विप्राची । उत्पत्ति-स्थितीसी कारण ब्रह्म ॥
यास्तव उत्पत्ति विनाशें न मज । राया, हर्षशोक पीडा देती ॥ २ ॥
स्वरूप सत्तेनें सर्वही प्रवृत्ति । तोष यास्तवचि स्वरूपज्ञानें ॥ ३ ॥
ब्रह्मलोकावाप्ति होतांही न सौख्य । जरी स्वस्वरूपबोध नसे ॥ ४ ॥
वियोगेंचि घडे संयोगाचा अंत । नाशचि शेवट संचयाचा ॥ ५ ॥
यास्तवचि मज चिंता न तयांची । वासुदेव कथी पुढती ऐका ॥६॥

५८

गुणयुक्त सर्वभूतें नाशवान । उत्पत्ति, निधन कळतां मुक्ति ॥ १ ॥
सागर भू नभीं संचार जयांसी । निश्चयें तयांसी मरण असे ॥ २ ॥
सानथोरांही त्या नक्षत्रां पतन । जाणूनियां ब्रह्मनिष्ठ व्हावें ॥ ३ ॥
कृतकृत्य ऐसें होऊनि ज्ञात्यानें । वरावी सुखानें गाढनिद्रा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ज्ञात्यांचा हा बोध । ऐकतां आनंद, कठिण क्रिया ॥

५९

भक्षितों लाभतां यथास्थित अन्न । सौख्यें कितिकदिन उपवास॥१॥
पक्वान्नेंही कदा वाढिताती कोणी । कण्याही सेवूनि कदा हर्ष ॥ २ ॥
कदा मंचकींही करितों शयन । भूमीतल जाण कदा शय्या ॥ ३ ॥
प्रासाद कीं कदा लाभे पर्णकुटी । ताग जवसाचीं वस्त्रें कदा ॥ ४ ॥
मूल्यवान वस्त्रें पांघरितों कदा । धर्म्य सहजप्राप्त उपभोगितों ॥ ५ ॥
दुर्लभ वस्तूचा न धरीं हव्यास । ऐकूनीच हर्ष वासुदेवा ॥ ६ ॥

६०

अचल, मृत्युशोकहीन । विद्वज्जनांसी जें मान्य ॥ १ ॥
निरुपम शिव, शुचि । मान्य नसे तें मूढांसी ॥ २ ॥

१ अंतःकरण.

म्हणूनि वागेना तो तैसा । वंद्य मार्ग हा ज्ञात्यांचा ॥ ३ ॥
आचरितों ऐसें व्रत । आजगर नाम ज्यास ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे शुचिं । ऐशामार्गें जे जे जाती ॥ ५ ॥

६१

अचल निश्चयें धर्म न सोडितां- । घालूनि मर्यादा संसारासी ॥ १ ॥
पूर्वापर सर्व करूनि विचार । विगत लोभ, मोह, भय, दोषं ॥ २ ॥
भक्ष्य, भोज्य, पेय तेंवी देशकाल । दैवचि केवल मर्यादा त्यां ॥ ३ ॥
विषयलोलुपां न घडे हें कदा । ज्ञात्याचिया चित्ता सौख्यदायी ॥४॥
हें मिळो, हें मिळो, ऐसी जयां तृष्णा । अयशें जयांना खेद बहु ॥५॥
ऐसीयांसी तत्वदृष्ट्या अवलोकूनि । आजगर मनीं धरिलें व्रत ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसें महाव्रत । पाळील तो संत निश्चयेंसी ॥ ७ ॥

६२

श्रेष्ठही अनेक द्रव्यार्थ ते दीन । अनार्यां सेवून याचिताती ॥ १ ॥
पाहूनि वैराग्य रुचलें मजप्रति । निग्रहेंचि शांति वरिली चित्तीं ॥२॥
सुख-दुःख, द्रव्यलाभ वा अलाभ । संतोषासंतोष मरण, आयु ॥३॥
दैवाधीन सर्व जाणूनि हें स्पष्ट । आजगरव्रत आचरितों ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अजगर कैसा । वागता तें आतां कथितो विप्र ॥ ५ ॥

६३

नाचरितां कांहीं अजगराप्रति । सहज लाभती सकल वस्तु ॥ १ ॥
पाहूनि हें भय, राग, मोह, दर्प[1] । त्यागूनि प्रशांतचित्त झालों ॥ २ ॥
धृति, मति, बुद्धिसमन्वितचित्तें । या पुण्यव्रतातें स्वीकारिलें ॥६॥
अनियत माझें आसन शयन । परी सत्य दम नियमव्रत ॥ ४ ॥
शुचिता हा माझा सहज स्वभाव । योगजही फल त्यजिलें सर्व॥५॥
वासुदेव म्हणे ऐसा नित्यानंद । जयासी हें व्रत तोचि भोगी ॥ ६ ॥

६४

आत्मपराङ्मुख आशायुक्त मत्त । जाहलें हें चित्त विषयाधीन ॥१॥
यास्तव परिणामी दुःखद हें आतां । जाणूनि विवेका अवलंबूनि॥२॥
निग्रहें चित्ताचा ब्रह्मीं होवो लय । व्रत हें यास्तव आचरिलें ॥ ३ ॥

१ क्रोधांधता किंवा रागद्वेष

कर्तृत्व भोक्तृत्व हृदयाचे धर्म । तेंवी वाणी मन निरोधूनि ॥ ४ ॥
प्रिय तेंवी सौख्य दुर्लभ अनित्य । जाणूनि हें व्रत स्वीकारिलें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्वस्वमतें ज्ञाते । गाती या वृत्तातें बहुविध ॥ ६ ॥

६५

प्रत्यक्षादि सिद्ध जग हा प्रपात । कारण नाशास निश्चयानें ॥ १ ॥
आत्मभिन्न यासी मानिताती अज्ञ । परी ब्रह्माहून भिन्न न हें ॥ २ ॥
निश्चयें या भय, लोभ, मोह, क्रोध । त्यागूनि आनंद पावलों मी ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे आजगरवृत्त । कथिती धर्मास भीष्म ऐसें ॥ ४ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १७९वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ६ वा समाप्त

अध्याय १८० वा

६६

पितामहा, स्वास्थ्य बांधवें वा कर्में । द्रव्यें किंवा ज्ञानें सांगा मज ॥
भीष्मपितामह कथिती धर्मातें । ज्ञानचि स्वास्थ्याचें मूळ जाणें ॥ २ ॥
श्रेष्ठ लाभ, ज्ञान, तेंचि स्वर्ग, मोक्ष । सज्जनांचें मत निश्चयें हें ॥ ३ ॥
नष्टैश्वर्य होतां ज्ञानेंचि बलीसी । धर्मा, इष्टप्राप्ति घडली सुखें ॥ ४ ॥
प्रऱ्हाद, नमुचि, मंकिआदि जन । ज्ञानेंचि वा, धन्य जनीं झाले ॥ ५ ॥
यास्तव न श्रेष्ठ ज्ञानाहूनि कांहीं । ऐकूनियां घेई कथितों वृत्त ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे इंद्र-कश्यपांचा । संवाद सुखाचा ऐका आतां ॥ ७ ॥

६७

काश्यप नामक तपस्वी पुत्रास । धनिक वैश्यें त्रास दिधला बहु ॥ १
रथाघातें मार्गीं पाडिलें तयासी । तपस्वी विप्रासी खेद झाला ॥ २ ॥
खेदानें तो प्राण द्यावयासी सज्ज । झाला म्हणे व्यर्थ जन्म माझा ॥
मज निर्धनाचें व्यर्थचि आयुष्य । चिंतूनि मार्गांत मरण बैसे ॥ ४ ॥
शृगालरूपें तें येऊनियां इंद्र । वदला वासुदेव तेंचि सांगे ॥ ५ ॥

६८

सर्व प्राणिमात्र सर्व प्रयत्नेंसी । जन्म इच्छिताती मानवाचा ॥ १ ॥
मनुष्यत्वाहूनि विप्रत्व तें श्रेष्ठ । विप्रही श्रोत्रिय काश्यपा, तूं ॥ २ ॥
दुर्लभ हा लाभ विप्रा तुजप्रति । मूढत्वें प्राणासी गमवूं नको ॥ ३ ॥

१ तुटका कडा

लाभ हा केवळ जाणें अभिमान। धनासी कदा न संबंधचि ॥ ४ ॥
अभिलाष कदा कोणाच्या धनाचा। न करीं हे वाचा श्रुतीची सत्य
वासुदेव म्हणे ईशोपनिषदीं। कथिलें प्रारंभीं हेंचि जाणा ॥ ६ ॥

६९

तोषदायक त्वद्रूप। विप्रा, न करीं अविवेक ॥ १ ॥
विप्रा, हस्त जयांलागीं। कृतार्थ ते जीव जगीं ॥ २ ॥
जैसें इच्छिसी तूं धन। हस्तेच्छा तैं मजलागून ॥ ३ ॥
जनीं हस्तलाभावीण। लाभ नसेचि वा, अन्य ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे कैसें। ऐका महत्त्व करांचें ॥ ५ ॥

७०

कंटकउद्धार करिताती हस्त। निवारिती दंशकरित्या जीवां ॥ १ ॥
दशांगुलीयुक्त जयांप्रति हस्त। रक्षण तयांस करितां येई ॥ २ ॥
अन्नवस्त्र सुखशयन तयांसी। निर्वात स्थळासी पावती ते ॥ ३ ॥
वृषभारोहण अथवा स्यंदन। वाहनें हीं जाण हस्तवंतां ॥ ४ ॥
स्वकरें तयांसी विविध वस्तुलाभ। नाना यत्नें जग करिती वश ॥
वासुदेव म्हणे हा हस्त महिमा। जाणितां न कोणा दैन्यबाधा ॥ ६ ॥

७१

हस्त, जिव्हा शक्तिहीन जीव लोकीं। नित्य भोगिताती दुःखें बहु ॥
तैसा तूं न विप्रा, सुदैव हें मानीं। कृमिकीटयोनि नसे तुज ॥ २ ॥
याचि लाभें सदा असावा संतोष। त्याहूनि तूं श्रेष्ठ विप्र बापा ॥ ३ ॥
यास्तव सर्वदा संतुष्ट असावें। काय हें कथावें लागे तुज ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे शृगाल यापरी। बोध परोपरी करी विप्रा ॥ ५ ॥

७२

काश्यपा, सर्वांगीं पाहें माझ्या कृमि। मुक्त मी यांतूनि कैसा होऊं ॥
अवस्था ही माझी असूनियां ऐसी। या देहत्यागाची मज न इच्छा ॥
कारण याहूनि क्षुद्रदेहवास। न घडो मनांत हेंचि माझ्या ॥ ३ ॥
याही योनीहूनि बहुत पापयोनि। सर्वदा हें ध्यानीं येई माझ्या ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे हीन दीन कोणी। चिंतितां स्वमनीं सौख्यलाभ ॥ ५ ॥

७३

सर्वदा सौख्यांत जाणें देवादिक । नित्य पश्वादिक दुःखामाजी ॥१॥
परी नित्य सौख्य नसे कोणाप्रति । धनिक इच्छिती राज्यलाभ॥२॥
देवत्व इंद्रत्व पुढती हे इच्छा । इंद्रपद विप्रा, न मिळे तुज ॥ ३ ॥
सद्भाग्यें तें तुज लाभतांही पाहीं । होणारचि नाहीं परी तोष ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सर्वदा हे ध्यानीं । शृगालाची वाणी असों द्यावी ॥५॥

७४

प्रियलाभें तृप्ति न घडे जीवाची । नव्हे तृष्णाशांति जललाभें ॥१॥
समिधांनीं अग्नि जैवी वृद्धि पावे । तृष्णेचें जाणावें रूप तैसें ॥२॥
शोकासवें हर्ष वसे तुझ्या ठाईं । सुख-दुःख पाहीं तैशारीती ॥ ३ ॥
मग दुःख-शोकें विषाद कां व्हावा । छेद तयां द्यावा सौख्य हर्षें ॥
वासना, कर्मांचें मूल बुद्धींद्रियें । कोंडितां तीं पाहें पक्षासम ॥ ५ ॥
मग वासनेची लवही न भीति । नसे अस्तित्वचि तिजसी मग ॥६॥
वासुदेव म्हणे अस्तित्वावांचूनि । कोणाचेंही जनीं नसे भय ॥ ७ ॥

७५

नसे अस्तित्व जयासी । नाश कैसा तयाप्रति ॥ १ ॥
मग कैचें नाशभय । कोण छेदी द्वितीय शिर ॥ २ ॥
अथवा तृतीय कराचा । नाश केंवी तो नसतां ॥ ३ ॥
नच होतां रसज्ञान । होई वासना कोठून ॥ ४ ॥
वस्तुश्रवण स्पर्शानें । वासना वा अवलोकनें ॥ ५ ॥
मद्य, लट्वाकाचें मांस । कदा आठवे न तुज ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे लोकीं । रुचि तयाचीच स्मृति ॥ ७ ॥

७६

स्पर्श, प्राशन तैं दर्शनाचा त्याग । श्रेयस्कर मार्ग यास्तवचि ॥ १ ।
हस्त-बल-धनवंतही मानव । पावती दास्यत्व मनुजा करीं ॥ २ ॥
वारंवार वध बंधनादि दुःखें । भोगूनिहीं सौख्यें करिती क्रीडा ॥३
बाहुबलयुक्त कोणी विद्यावंत । दिसती सुदुर्वृत्त दुराचारी ॥ ४ ॥

…:४ एक डुमळ पक्षा.

सद्वृत्तीही तयां रुचे ते तथापि । कर्मासम गति पावताती ॥ ५ ॥
हीनजातिही न करितो प्राणत्याग । तत्तज्जातिलाभ आवडे त्यां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे माया हे प्रभूची । पहा अतर्क्यचि खेळ करी ॥ ७ ॥

७७

अर्धांगपीडित विप्रा, तुले थोटे । पाहूनियां, तुझें भाग्य मानीं ॥ १ ॥
निरातङ्क निरामय निष्कलंक । विप्रदेह तुज प्राप्त झाला ॥ २ ॥
यास्तव विप्रर्षे, ऊठ सद्धर्मार्थ । ऐसा आत्मघात करूं नको ॥ ३ ॥
श्रद्धायुक्त जरी ऐकसी मद्वाक्य । पावसी वेदोक्त फल तरी ॥ ४ ॥
स्वाध्यायाग्निसेवा इंद्रियदमन । करूनि तैं दान न करीं स्पर्धा ॥५॥
सद्धर्मशीलांसी कदाही न शोक । कोणाचें अशुभ चिंतितीना ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शुभकार्यइच्छा । स्वभाव ज्ञात्यांचा फलही तैसें ॥७॥

७८

शुभ तिथी शुभ मुहूर्तीं ज्या जन्म । इच्छिती ते दान-यज्ञादिक ॥१॥
अशुभ मुहूर्तीं जन्म जयांप्रति । जन्मक्रिया त्यांची आसुराचि ॥ २ ॥
पंडितमन्य मी होतों पूर्वजन्मीं । वेदासी निंदूनि छळिले ज्ञाते ॥ ३ ॥
तर्ककर्कश मी संशयी नास्तिक । कटु तेंवी वक्र वदलों नित्य ॥ ४ ॥
हेतुवादेंचि मी जिंकियेल्या सभा । अहंमन्य मोठा असूनि मूर्ख ॥५॥
वासुदेव म्हणे शृगालत्व तेणें । लाभलें हें म्हणे शृगाल तो ॥ ६ ॥

७९

दीर्घकालें तरी मनुष्यत्व मज । लाभेल कां सांग विप्रश्रेष्ठा ॥ १ ॥
मनुष्यत्वलाभें सर्वदा संतुष्ट । यज्ञदानरत राहीन मी ॥ २ ॥
अप्रमत्त, त्याज्यत्यागिता, तपस्वी । होईन निगर्वी ज्ञेयज्ञाता ॥ ३ ॥
ऐकूनि काश्यप सत्वरी उठला । विस्मयें बोलला शृगालासी ॥ ४ ॥
कुशल तूं ज्ञाता नव्हसी शृगाल । जाणिलें तूं इंद्र दिव्यज्ञानें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे इंद्रासी पूजूनि । अनुज्ञा घेऊनि विप्र गेला ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १८०वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ७ वा समाप्त

अध्याय १८१ वा

८०

धर्म म्हणे दान यज्ञ शुश्रूषेचें । तैसेंचि तपाचें फल सांगा ॥ १ ॥
पितामह म्हणे अनर्थसंयुक्त । बुद्धि ते पापांत सौख्य मानी ॥ २ ॥

तेणें पापकर्मैं लाभे पापलोक । भोगितो असंख्य दुःखें तेथें ॥ ३ ॥
दुर्भिक्ष क्लेश तैं वारंवार भीति । जन्ममरणाची न टळे वारी ॥ ४ ॥
संयमी श्रद्धालु पुण्यकर्मीं रत । जन ते धनाढ्य होती कर्मैं ॥ ५ ॥
उत्सवेंसी तयां उत्सव तैं स्वर्ग- । स्वर्गामार्गे शुभकर्मैं लाभे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे श्रद्धालु जे दान्त । तयांसी प्रत्यक्ष फल ऐसें ॥ ७ ॥

८१

स्वयेंचि नास्तिक सर्पचोरादिक । ऐशा संकटांत पतन पावे ॥ १ ॥
प्रतिकारशक्ति नसेचि तयासी । बद्धासम, ऐसी विटंबना ॥ २ ॥
देवातिथि साधुप्रिय जे उदार । योग्यांचाचि थोर लोक तयां ॥ ३ ॥
धान्यामाजी फोल, पक्षांत मशक । तैसे ते मनुष्य धर्महीन ॥ ४ ॥
वेगेंही धांवतां पूर्वजन्मार्जित । कर्म तैं नरास न सोडीचि ॥ ५ ॥
झोंपतां तें झोंपे तिष्ठतांही तिष्ठे । छायेसम वागे सन्निध तें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अटळ हें कर्म । जीवाच्या मागून सदा राहे ॥ ७ ॥

८२

स्वेच्छेनेंचि जें जें कर्म पुराकृत । जीव एकाकीच भोगी तें तें ॥ १ ॥
कर्मफलठेवा दैवसंरक्षित । ऐशा जीवां काल नित्य ओढी ॥ २ ॥
अप्रेरित पुष्प-फलासम कर्म । पुर्वार्जित जाण देई फल ॥ ३ ॥
मानावमान तैं उत्कर्षापकर्ष । लाभे कर्मार्जित लाभ-हानि ॥ ४ ॥
कर्मक्षयें तत्तत्फलाचाही क्षय । सांगे वासुदेव भीष्मवाक्य ॥ ५ ॥

८३

जन्म पावूनियां पूर्वार्जितासम । सुखदुःखें जाण भोगणेंचि ॥ १ ॥
बाल, युवा, वृद्ध तत्तत्कालीं जें जें । आचरी तदा तें प्राप्त होई ॥ २ ॥
बहुधेनूंमाजी वत्स मातेप्रति । कर्म तैं कर्त्यासी अचुक शोधी ॥ ३ ॥
शुद्ध होई जैसें वस्त्र प्रक्षालनें । पापी तैं सत्कर्मैं दोषमुक्त ॥ ४ ॥
विषयत्याग हा करी उपवास । अपार तयास सौख्य लाभे ॥ ५ ॥
दीर्घ तपश्चर्या तपोवनीं ज्यांची । तया शुद्धात्म्यांची इच्छापूर्ति ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे स्वधर्मैं विशुद्ध । होऊनियां बद्ध मुक्त होती ॥ ७ ॥

८४

जैसे शकुंत नभांत । मत्स्य जैसे उदकांत ॥ १ ॥
वसती कोठें तें कळेना । गति ज्ञात्यांची तैं जाणा ॥ २ ॥
पुरे आतां अमर्यादा । वदूं कासया आक्षेपां ॥ ३ ॥
सत्कर्मेंचि प्रज्ञालाभ । आचरूं तें साधूं हित ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे धर्म । जाणे फल कर्मासम ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १८१वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ८ वा समाप्त

अध्याय १८२ वा

८५

धर्म म्हणे विश्व स्थावरजंगम । निर्मितसे कोण लीन कोठें ॥ १ ॥
सागर, गगन, मेघ, गिरि, भूमि । तेंवी वायु अग्नियुक्त लोक- ॥ २ ॥
निर्मिला, हा कोणी तैसेचि हे प्राणी । वर्णभेद जनीं सांगा कैंवी ॥३॥
शौचाशौच तेंवी धर्माधर्मविधि । जीव असे कैंवी कोठें जाई ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे महत्त्वाचे प्रश्न । ऐकूनियां भीष्म कथिती ऐका ॥ ५ ॥

८६

याचि विषयींचा ऐकें इतिहास । पुशितां भृगूस भरद्वाज ॥ १ ॥
शास्त्रतुल्य तया दिलें जें उत्तर । सनातन थोर तेंचि ऐकें ॥ २ ॥
कैलासशिखरीं भृगूंसी हा प्रश्न । करितां वचन वदले ऐका ॥ ३ ॥
अनिर्वचनीय अज्ञानापासूनि । मनाचा या मानीं जन्म बापा ॥ ४ ॥
प्रतिबिंब तेथें पडे चैतन्याचें । ' मानस ' तयातें म्हणती ज्ञाते ॥
आदि अंतशून्य आद्य हा 'मानस' । एक तो अभेद्य अजरामर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे क्षय-वृद्धिहीन । मानसापासून पुढती विश्व ॥ ७ ॥

८७

मानसापासूनि जाणा महत्तत्व । पुढती अहंकार पुढती तम ॥ १ ॥
वायु, अग्नि, जल, भूमि यथाक्रम । तेजोमय पद्म पुढती झालें ॥ २ ॥
तया पद्मांतूनि प्रगटला ब्रह्मा । अहंकार संज्ञा अहंभावें ॥ ३ ॥
स्थूल आकाशादि तयाचें शरीर । अस्थि गिरिवर तयाप्रति ॥ ४ ॥
मेद-मांस त्याचें जाणावी हे भूमि । सिंधुरक्त मानीं उदर नभ ॥ ५ ॥
निश्वास तो वायु, तेज, अग्नि, शिरा । नद्या सूर्यचंद्रां नयन जाणें ॥

चरण हे भूमि, नभ, उर्ध्व शिर- । दिशा बाहू थोर ऐसा ब्रह्मा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अज्ञेय अचिंत्य । ब्रह्मयाचें हें रूप सर्वव्यापी ॥ ८ ॥

८८

ब्रह्मा तोचि विष्णु अनंतही तोचि । आत्मा हा भूतांसी विश्वरूप ॥
तथापि पुण्यात्मे तेचि या जाणती । निर्मी अहंवृत्ति सृजनास्तव ॥
ऐसी त्या पासूनि विश्वाची उत्पत्ति । कथियेलीं ऐसी प्रश्नोत्तरें ॥३॥
वासुदेव म्हणे भृगूच्या वचनें । निःसंकोच मनें पुढती प्रश्न ॥ ४ ॥

८९

भरद्वाज म्हणे मुनिश्रेष्ठा, नभ । भूमि वाय्वादिक तत्व कथा ॥ १ ॥
तैसेचि परिणाम निवेदूनि त्यांचे । करा संशयातें दूर माझ्या ॥ २ ॥
भृगु म्हणे नभ अनंत अपार । सिद्ध तैं निर्जर वसती तेथें ॥ ३ ॥
नानालोकाश्रय अंत नसे यासी । पुढती अदृश्यचि चंद्रसूर्य ॥ ४ ॥
अग्नितुल्य तेथें वसती देवता । तयांही नभाचा अंत नसे ॥ ५ ॥
उंच उंच जातां देवतांनीं व्याप्त । परी हें अनंत नभ जाणें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नसे ज्या परिमाण । कोण निवेदन त्याचें करी ॥ ७ ॥

९०

सागरान्त भूमि पुढती अंधार । पुनरपि जल पुढती अग्नि ॥ १ ॥
पातालान्तीं जल पुढती पन्नग । पुढती पुनर्नभ पुनर्जल ॥ २ ॥
ऐसें हें प्रमाण अवगत आम्हां । दुर्ज्ञेय देवांना अंत याचा ॥ ३ ॥
रूपस्पर्शहीन आकाश अनंत । वाय्वाग्नि उदक अनंतचि ॥ ४ ॥
अतत्वदर्शी त्यां मानिताती भिन्न । अगम्य परिमाण कोण सांगे ॥५॥
वासुदेव म्हणे अनंतासी कांहीं । परिमाण नाही जगामाजी ॥ ६ ॥

९१

निद्रा प्रलयीं हें पावतसे क्षय । सत्य केंवी होय जागृतींत ॥ १ ॥
आदि अंतींही ज्या अस्तित्वचि नसे । मध्यकालींही तें असे केंवी ॥
यास्तव ज्ञानीही सृष्टीचें स्वरूप । जाणील हें शक्य नसे कदा ॥ ३ ॥
असो, त्या पद्मेंसी प्रभु मूर्तिमान । ब्रह्मा तो सर्वज्ञ प्रगट झाला ॥४॥
भरद्वाज म्हणे उत्पादक पद्म । श्रेष्ठ ब्रह्मयाहून सहजचि तें ॥ ५ ॥
भृगु म्हणे जाणें ब्रह्मा तो 'मानस' । आसन तयास पृथ्वी पद्म ॥६॥

मेरु ते कर्णिका वसूनि त्यामाजी । ब्रह्मा या विश्वासी निर्मीतसे ॥७॥
वासुदेव म्हणे अतर्क्य हे माया । म्हणूनि माधवा शरण जावें ॥ ८ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १८२ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ९ वा समाप्त

अध्याय १८३ वा ९२

भरद्वाज म्हणे कंवी रची सृष्टि । ब्रह्मा मजलागीं निवेदा तें ॥ १ ॥
भृगु म्हणे केली संकल्पेंचि सृष्टि । रक्षणार्थ कल्पी उदक आधीं ॥२॥
यास्तव उदक प्राण हा भूतांचा । वृद्धिंगत प्रजा तेणें होई ॥ ३ ॥
वियोगें तयाच्या नाश सकलांसी । विकार भूम्यादि उदकाचे हे ॥४॥
वासुदेव म्हणे जल घनीभूत । पृथिवी पर्वत तेंचि जाणा ॥ ५ ॥

९३

भरद्वाज म्हणे वायु अग्नि नीर- । उत्पत्तीचा थोर संशयाचि ॥ १ ॥
भृगु म्हणे पुरा याचि संदेहानें । शत संवत्सरें बसले ऋषि ॥ २ ॥
भक्षूनियां वायु होऊनि ध्यानस्थ । वाणी तदा स्पष्ट ऐकूं आली ॥
शून्य स्तब्ध पूर्वी अनंत आकाश । नव्हते चंद्रार्क नव्हता वायु ॥४॥
तमांत जैं तम तैसें होई जल । वेगें त्या अनिल वाहूं लागे ॥ ५ ॥
संघर्षें तयांच्या प्रगट तें तेज । फेंकी वायूसंवे उदका नभीं ॥ ६ ॥
वायुसंयोगें तें तेजाचि घनत्व । पावतां भूमित्व तया येई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे रस, गंध, प्राणि । सर्वांसी अवनी आधार हे ॥ ८ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १८३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १० समाप्त

अध्याय १८४ वा ९४

भरद्वाज म्हणे सकलही लोक । पंचभूतव्याप्त ब्रह्माकृत ॥ १ ॥
लक्षावधि भूतें निर्मिलीं ब्रह्मयानें । भूतत्व कशानें पांचांसचि ॥ २ ॥
स्वप्नींचें बाधित होई जागृतींत । परी स्वप्नीं स्पष्ट दिसती भूतें ॥३॥
भृगु म्हणे महाशब्दें अपरिमित । ऐसा असे अर्थ, 'अबाध्य' न ॥
उत्पत्तिशाली जें तया भूत संज्ञा । संख्या जागृत्स्वप्ना भिन्न नसे ॥

१ अग्नि ( वायूच्या सहाय्यानें )

सकल शरीरें पंचभूतात्मक । अवकाश तेंच नभ तेथ ॥ ६॥
क्रिया, तोचि वायु, उष्णता तो अग्नि । द्रवजल, भूमी, काठिण्य तें
वासुदेव म्हणे श्रोत्र, स्पर्श, दृष्टि । रसना घ्राणादि पंचभूतें ॥ ८ ॥

९५

भरद्वाज म्हणे भृगो, वृक्षांमाजी । या पंचभूतांची व्याप्ति नसे ॥ १ ॥
चेष्टा उष्णताही न दिसे वृक्षांत । केवळ घनत्व प्रगट दिसे ॥ २ ॥
शब्द स्पर्श रस ज्ञान न तयांसी । भूतात्मकता ती सिद्ध नसे ॥ ३ ॥
म्हणती भृगु वृक्ष, पुष्पफलाकीर्ण । होती यावरून गगनसिद्धि ॥४॥
वासुदेव म्हणे शब्द स्पर्शज्ञान । दाविती करून सिद्ध ऐका ॥ ५ ॥

९६

म्लानत्व वृक्षांसी येई उष्णतेनें । गळती स्पर्शानें पुष्पें फळें ॥ १ ॥
वायु, अग्नि, वीज, निर्घोष ऐकूनि । पुष्पें फळें रानीं त्यजिती वृक्ष ॥
शब्दज्ञान त्यांचें येणें होई सिद्ध । वेष्टूनि वृक्षास वल्ली चढे ॥ ३ ॥
दृष्टिवीण मार्ग आक्रमील कैसा । दृष्टि हा तेजाचा गुण सिद्ध ॥ ४ ॥
इष्टानिष्ट गंधें विविध धूपें वा । येई निरोगिता पुष्प फलां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे घ्राणेंद्रिय ऐसें । सकल वृक्षांचें सिद्ध होई ॥ ६ ॥

९७

प्राशिती मुळांनीं म्हणूनि पादप । रोगी-रोगमुक्त रसनेनें ते ॥ १ ॥
कमलनालेंसी उदकाकर्षण । तैसें जलपान पादपांचें ॥ २ ॥
सुखदुःखज्ञान, छेदितां ही वृद्धि । तेणें जीवसिद्धि पादपांची ॥ ३ ॥
आकर्षित जल पचूनि स्निग्धता । येवूनियां वृक्षां वृद्धि होई ॥ ४ ॥
जंगमींही ऐसीं पंचमहाभूतें । विविध स्वरूपें वर्तताती ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भूतव्यवहारें । सक्रिय शरीरें दिसती सर्व ॥ ६ ॥

९८

अस्थि, मज्जा, स्नायु तैंवी त्वचा मांस । द्रव्यें हीं पार्थिव कठिण देहीं
तेज, क्रोध, चक्षु, उष्मा तैं जठराग्नि । पंचविध अग्नि देहामाजी॥२॥
श्रवण, घ्राण, मुख, हृदय तैं कोष्ठ । ऐसें पंचविध शरीरीं नभ ॥३॥
श्लेष्मा, पित्त, घर्म वसा तैंवी रक्त । जलज पदार्थ शरीरीं ऐसे ॥४॥
क्रिया करी प्राण बल तोचि व्यान । अधोमार्गी जाण अपान तो ॥

समान हृदयीं नित्य करी वास । करी श्वासोच्छ्वास उदान तो ॥
उरः कंठस्पर्शें प्राणी वदे भाषा । वासुदेव ऐसा वायु कथी ॥ ७ ॥

९९

भूमि घ्राणरूपें देई गंधज्ञान । जल रसज्ञान रसनेनें त्या ॥ १ ॥
रूपज्ञान अर्पी तेज चक्षुरूपें । वायु चर्मरूपें स्पर्शज्ञान ॥ २ ॥
श्रोत्ररूपी नभ शब्दज्ञाना हेतु । ऐसे शरीराआंतु पंचगुण ॥ ३ ॥
तयांमाजी गंध इष्टानिष्टरूप । मधुर कटु देख निर्हारी तें ॥ ४ ॥
मिश्र तो संहत स्निग्ध रूक्ष जाणा । विशद भौम माना गंध ऐसे ॥
शब्द स्पर्श रूप रस हे जलाचे । वासुदेव साचे कथितो गुण ॥ ६ ॥

१००

मधुराम्ल लवण कटु कषायतिक्त । ऐसे हे षड्रस कथिती ज्ञाते ॥ १ ॥
जलमय रस जाणावा निश्चय । रूप शब्द स्पर्श त्रिगुण तेजीं ॥ २ ॥
षोडश[1] प्रकार जाणावे तेजाचे । द्वादश[2] स्पर्शाचे भेद जाणा ॥ ३ ॥
षड्ज, ऋषभादि सप्तविध शब्द । स्पर्शासवें बोध घडे त्याचा ॥ ४ ॥
स्पर्श प्रतिबंधें न घडे शब्दज्ञान । प्राणादिपोषण त्वगादींचें ॥ ५ ॥
वायु अग्नि जल प्रमुख हे त्रयी । जागरूक राही व्यापी प्राणां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे हें मूळ कारण । शरीराचें जाण कथिती भृगु ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १८४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ११ समाप्त

अध्याय १८५ वा

१०१

भृगूलागीं पुशी भरद्वाजमुनि । कैसें अभिमानी होई तेज ॥ १ ॥
शरीरसंचारी वायु हा तैसाचि । स्थलभेदें केंवी घडवी क्रिया ॥ २ ॥
भृगु म्हणे मुने, मूर्धास्थित अग्नि । शरीरालागूनि प्रतिपाळी तो ॥
मूर्धा अग्नि दोन्हींमाजी वसे प्राण । आत्मा तो चैतन्य जीव जाणा ॥

---

१ ऱ्हस्व, दीर्घ, स्थूल, चतुष्कोण, वर्तुल, शुक्ल, कृष्ण, रक्त, पीत, कृष्णरक्त, कठीण, तुळतुळीत, चिकट, पंकिल, मृदु, कठोर.

२ उष्ण, शीत, सुखकर, दुःखकर, स्निग्ध, विशद, मृदु, खरखरीत, रुक्ष, लघु, गुरु व गुरुतर.

ब्रह्मरूपचि तो उपाधिभेदानें। बुध्यादिक जाणे विषयही तो ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चालक हा प्राण । करी भिन्नभिन्न कार्यें देहीं ॥ ६ ॥

१०२

जीवित्वलाभें तो होऊनि समान। आचरी स्वकर्म त्या त्या स्थानीं ॥
मूत्र पुरीषांचा धारक अपान। वल, क्रिया, कर्म उदानचि ॥ २ ॥
सर्व शरीर तें संधिसंधिमाजी। व्यापितो तयासी म्हणती व्यान ॥
समान प्रेरित उदरस्थ अग्नि। दोषादि परिणामी मग्न असे ॥ ४ ॥
प्राणापानें होई जठराग्नि दीप्त। नाभिदेशीं स्थित पचवी अन्न ॥ ५ ॥
एकद्वारमुख अन्यद्वार गुद । नलिका ऐसी व्याप्त देहामाजी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अवांतर स्रोत। याचि नलिकेस फुटती देहीं ॥ ७ ॥

१०३

तया स्रोतांतूनि संचरतो प्राण। जठराग्नि जाण सर्वे त्याच्या ॥ १ ॥
पाचक जो उष्मा तोचि जठराग्नि। शरीर व्यापूनि वास करी ॥ २ ॥
अग्निवेगें प्राण जाऊनि गुदान्तीं। परतूनि अग्नीसी गति देई ॥ ३ ॥
आमाशय ऊर्ध्व अपर पक्वाशय। नाभिदेशीं सर्व वसती प्राण ॥ ४॥
हृदयापासूनि सर्वत्र ते जाती। प्राणाज्ञा पाळिती सर्व नाड्या ॥५॥
अन्नरस ऐसा त्या त्या स्थळीं जाई। भृगुवच गाई वासुदेव ॥ ६ ॥

१०४

जितश्रम, धीर समद्रष्टे योगी। सषुम्नेच्या मार्गीं रमती सुखें ॥ १ ॥
सहस्रदलीं ते जाऊनि ठाकती। योगबळें त्यांसी कृतार्थता ॥ २ ॥
ऐसा सर्व कार्यां प्राण हा निमित्त । यास्तव विरोध कथिला त्याचा
प्राणनिरोधें या पाकपात्रीं अग्नि। तैसा जठराग्नि दीप्त सदा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे प्राणनिरोधक। जाणा ब्रह्म तेंच ज्ञानबळें ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १८५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १२ समाप्त

अध्याय १८६ वा

१०५

भरद्वाज म्हणे जरी हा वायूचि। जीवितक्रियेसी मूळ असे ॥ १ ॥
भिन्नरूपें तरी जीवाची कल्पना। वाटतसे मना निरर्थक ॥ २ ॥
पचवितो जरी अग्नीचि अन्नातें। जीवकल्पना ते व्यर्थ वाटे ॥ ३ ॥
व्यक्तही न कदा होई जीव कोणा। अनिल तैं उष्मा नष्ट होई ॥ ४ ॥

संबंधी तो जरी असेल वायूचा । अनुभव तैसा कां न येई ॥ ५ ॥
संयोगचि जरी तयाचा प्राणासी । तुटतां अभिव्यक्ति कां न होई ॥
वासुदेव म्हणे न होईचि सिद्धि । म्हणती जीवाची भरद्वाज ॥ ७ ॥

१०६

ब्रह्माचाचि अंश मानावा तो जरी । बिंदु जैं सागरीं लीन होई ॥१ ॥
अग्निमाजी दीप अथवा जैं लुप्त । तैसेंचि जीवत्व म्हणणें प्राप्त ॥२॥
परी पंचभूतीं व्यवहार होतां । कासया जीवाचा व्यर्थ व्याप ॥ ३ ॥
शरीरसंघात हेंचि त्याचें रूप । आकाशादि नष्ट होतां नासे ॥ ४ ॥
विभक्त हीं भूतें होतां या जीवासी । क्रिया काय कैसी घडे सांगा ॥
वासुदेव म्हणे भूतांचा संघात । म्हणती भरद्वाज जीव तोचि ॥ ६ ॥

१०७

गोप्रदान मरणोत्तर । करी कोणाचा उद्धार ॥ १ ॥
धेनूसवें देता घेता । नष्ट होई दिसतें लोकां ॥ २ ॥
पुढती समागम त्यांसी । कैसा नसतां ते कोणीचि ॥ ३ ॥
जयां भक्षिलें पक्ष्यांनीं । अथवा ग्रासी जयां अग्नि ॥ ४ ॥
ज्यांसी पर्वतपतन । कैसें तयां संजीवन ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे देह । पूर्वपक्षीं तोचि जीव ॥ ६ ॥

१०८

मुळांत छेदितां न वाढेचि वृक्ष । बीजें अन्य वृक्ष वाढतसे ॥ १ ॥
मृतासी न तेंही, मग पुनर्जन्म । तयासी कोठून प्राप्त होई ॥ २ ॥
छेदितांही वृक्ष वाढे पक्क बीज । मृता रक्त, रेत कोठें असे ॥ ३ ॥
बीजानें वृक्षासी होतसे उत्पत्ति । नाशचि मृतासी उत्पत्ति न ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसी हे आशंका । स्वस्थचित्तें ऐका समाधान ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १८६ वा तथा मोक्षधर्मपर्वांचा अ. १३ समाप्त

अध्याय १८७ वा

१०९

भृगुमुनि तदा भरद्वाजांप्राति । जीव, दान, कृति म्हणती नित्य ॥१॥
चेतन पदार्थ अन्यदेहीं जाई । देह जरी होई नष्ट एथें ॥ २ ॥

१ बीज

समिधा जरी दग्ध होतां अग्नि जैसा । जीवही हा तैसा नित्य असे ॥
भरद्वाज म्हणे नष्टचि तो अग्नि । व्यक्तत्वें न कोणी पाही तया ॥४॥
भृगु म्हणे लीन होई तो आकाशीं । नसे अभिव्यक्ति निराश्रिता ॥५॥
वासुदेव म्हणे सूक्ष्मरूप जीव । होई अगोचर इंद्रियांसी ॥ ६ ॥

११०

प्राणधारक तो विज्ञानस्वरूप । जीवचि आधार तया प्राणा ॥ १ ॥
प्राणाचा या लोप तोचि जगीं नाश । पुढती हें शरीर भूमीमय ॥२॥
प्राण तो नभांत अग्नि वायूमाजी । होती मूळरूपीं प्रविष्ट ते ॥ ३ ॥
अग्न्यादि तें त्रय एकरूप होई । जलभूमि जाई भूमीमाजी ॥ ४ ॥
नभ तेथें वायु वायु तेथें अग्नि । अमूर्त ते तिन्हीं, शरिरीं व्यक्त ॥५॥
वासुदेव म्हणे पुनरपि परि । भरद्वाज करी प्रश्न ऐका ॥ ६ ॥

१११

मुनिश्रेष्ठा, पंचभूतात्मक देह । किं लक्षण जीव सांगा मज ॥ १ ॥
विषयांतरत पंचेंद्रिययुक्त । मेद स्नायु रक्त मांसमय ॥ २ ॥
ऐशा या शरीरीं कवण्यारूपें जीव । करितो वास्तव्य निवेदा तें ॥]
भेदितां शरीर गवसे न जीव । दुःखांचा अनुभव देहासीचि ॥ ४ ॥
व्यग्रचित्ताप्रति न घडे श्रवण । असूनीही कान जीव व्यर्थ ॥ ५ ॥
पाहूनि न पाहे मनावीण नेत्र । म्हणे वासुदेव पुढती ऐका ॥ ६ ॥

११२

सकल इंद्रियें व्यर्थ निद्रिस्थाचीं । मनःसंयुक्तचि ज्ञानद तीं ॥ १ ॥
तात्पर्य मनचि सकल कार्य करी । जीवासी शरीरीं कार्य काय ॥२॥
हर्ष, क्रोध, शोक उद्वेग तैं इच्छा । कोणाप्रति सांगा द्वेषादिक ॥३॥
भृगु म्हणे तदा विषय, इंद्रियें । तैसेंचि हें पाहें मनही जड ॥ ४ ॥
शरीरधारक आत्मा अद्वितीय । द्रष्टा तो वास्तव्य शरिरीं करी ॥
तयावीण मन इंद्रियेंही व्यर्थ । सुषुप्तींत स्पष्ट अनुभव हा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मन बुद्ध्यादिक । अवर, वरिष्ठ आत्मा जाण ॥ ७ ॥

११३

अग्नीसवें रूप, स्पर्श नष्ट होतां । त्यागूनियां आत्मा जाई तदा ॥१॥
स्थूल देह ऐसा नष्ट होतां पाहीं । सूक्ष्मदेह राही भूतात्मक ॥ २ ॥

तेथ अभिव्यक्त तोचि जीव जाणा । सृष्टिकर्ता ब्रह्मा हाचि असे ॥३॥
सोपाधिका तया म्हणताती जीव । आत्मा सदाशिव निरुपाधिक ॥
सर्व लोकांचें जो मूर्तिमंत सौख्य । अरविंदस्थित बिंदु जैसा ॥५॥
स्थूल सूक्ष्म देहीं जयासी वास्तव्य । म्हणे वासुदेव जीव तोचि ॥६॥

११४

सर्व लोकांचें जो सुख । म्हणती क्षेत्रज्ञ तयास ॥ १ ॥
सत्व, रज आणि तम । जीवसंबंधीं हे गुण ॥ २ ॥
देह इंद्रियें तैं मन । साधनें हीं सचैतन्य ॥ ३ ॥
उपभोग देती जीवा । स्वयें आपण करूनि क्रिया ॥ ४ ॥
सप्त भुवनांचा स्वामी । ऐसा पराधीन मानीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । लीला अगाध प्रभूची ॥ ६ ॥

११५

ऐसा जीवाचा न नाश । देह धरितांही असंख्य ॥ १ ॥
नाश त्याचा म्हणती अज्ञ । जातां देहासी त्यजून ॥ २ ॥
ऐसा अज्ञानें आवृत । परमात्मा देहस्थित ॥ ३ ॥
तत्वाभ्यासी महाज्ञाते । जाणिताती त्या श्रेष्ठातें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे जनीं । ज्ञानाविण व्यर्थ प्राणी ॥ ५ ॥

११६

सात्विकान्नें शुचिर्भूत राहूनियां । योगाभ्यासीं जया सौख्य वाटे ॥
पूर्वापर रात्रीं यत्न करी ऐसा । त्याचि सत्पुरुषा साक्षात्कार ॥ २ ॥
अंतर्मुखवृत्ति शुभाशुभत्याग । जया तोचि मुक्त आत्मनिष्ठ ॥ ३ ॥
प्रगटूनि चित्तीं तळपे अग्नीसम । तयासीच जन म्हणती जीव ॥ ४ ॥
तया पासूनीचि जाहलें हें विश्व । येई हा अनुभव आत्मज्ञानें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे व्यर्थ अनुमान । ज्ञानावीण शीण कुतर्कैसी ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १८७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १४ समाप्त

अध्याय १८८ वा

११७

भृगु म्हणे विप्र प्रथम निर्मिले । अधिपति केलें ब्रह्मयानें त्यां ॥ १ ॥
स्वतेजें ब्रह्मयानें निर्मिलें म्हणोनि । तयांसी सूर्याग्निसम दीप्ति ॥ २ ॥

स्वर्गास्तव त्यांच्या सत्य धर्म तप । अविनाशी वेदक्रिया शौच ॥३॥
निर्मूनि पुढती देवगंधर्वादि । नाग मानवांसी निर्मियेलें ॥ ४ ॥
ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य शूद्र तेंवी । गुणानुरूपचि वर्ण तयां ॥ ५ ॥
शुभ्रवर्ण विप्र, आरक्त क्षत्रिय । पीतवर्ण वैश्य, शूद्र कृष्ण ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भरद्वाजप्रश्न । देऊनियां ध्यान ऐका आतां ॥ ७ ॥

११८

वर्णभेदा जरी वर्णचि कारण । तरी हे संकीर्ण सकल लोक ॥ १ ॥
सर्व वर्णांमाजी शुभ्र, रक्त, पीत । यास्तव न सिद्ध वर्णभेद ॥ २ ॥
कामक्रोधभय क्षुधा शोक चिंता । समचि समस्तां, भेद कैंवी ॥३॥
घर्म, मूत्र, मल, कफ, पित्त, रक्त । समचि कां भेद सांगा मग ॥
स्थावर जंगम विविध वर्णांचे । वर्णभेद त्यांतें नसेचि कीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे व्यवहार पाहूनि । करिती शंका मुनि सकलांस्तव ॥

११९

भृगु निवेदिती ब्राह्मणचि सर्व । कर्मभेदास्तव परी वर्ण ॥ १ ॥
काम-भोगप्रिय, साहसी कोपिष्ट । स्वधर्मविमुख क्षत्रिय ते ॥ २ ॥
विप्रधर्मत्यागें कृषि गोरक्षादि । स्वीकारिलें, तेचि पुढती वैश्य ॥३॥
तमोगुणें हिंसा अनृतप्रिय लुब्ध । सर्व कर्मासक्त शूद्र तेचि ॥ ४ ॥
भिन्नवर्ण ऐसे पावतांही तयां । वर्णोचित क्रिया विहित असे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जीव लोभासक्त । त्यागूनि धर्मास पतन पावे ॥ ६ ॥

१२०

जयांस्तव वेद रचिले ब्रह्मयानें । पतित अधर्मे तेचि झाले ॥ १ ॥
अज्ञाननिमग्न जाहले लोभानें । ब्राह्मण तपानें ज्ञाननिष्ठ ॥ २ ॥
आत्मबोध हाचि जाणूनि पुरुषार्थ । आत्मबोधनिष्ठ असती विप्र ॥
गौण विप्र जयां नसे आत्मज्ञान । जाती भिन्न भिन्न असती त्यांच्या ॥
पिशाच्च, राक्षस, प्रेत म्लेच्छादिक । वर्तती स्वच्छंद शास्त्रहीन ॥
वासुदेव म्हणे शुद्ध ते शुद्धचि । अशुद्धा शुद्धाची काय सर ॥ ६ ॥

१२१

वैदिक संस्कारें सिद्धान्तानुसारी । शुद्ध वंशधारी जन्मजात ॥ १ ॥
तपस्येनें मुनि निर्मिती तयांसी । ब्रह्माचि तयांसी मूळ जाणा ॥ २ ॥

मानसी प्रजा हे तया विधात्याची । योगासक्त वेदीं श्रद्धायुक्त ॥ ३ ॥
अव्यय, अक्षय, आपकर्षशून्य । प्रजा तेचि धन्य वासुदेवा ॥ ४ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १८८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १५ समाप्त

अध्याय १८९ वा

१२२

भरद्वाज म्हणे स्पष्टपणें मज । विप्रादिक भेद निवेदावा ॥ १ ॥
भृगु म्हणे जातकर्मादि संस्कार । षट्कर्मी साचार चित्त ज्यांचें ॥२॥
शौचाचारयुक्त वेदाध्ययनरत । विप्र भुक्तशेषअन्नसेवी ॥ ३ ॥
गुरुनिष्ठ, व्रती, सत्यपरायण । निश्चयें ब्राह्मण म्हणती तया ॥ ४ ॥
सत्य, दान, दया, अद्रोह तैं घृणा । लज्जा, तप जाणा जया ठाई ॥५॥
वासुदेव म्हणे विप्र तो जाणावा । आदर्श मानवां तोचि जगीं ॥ ६ ॥

१२३

क्षत्र नाम हिंसा, तदर्थ जें कर्म । जयां युद्धासम स्वाध्याय तैं ॥ १ ॥
विप्रांप्रति दान आदान करांचें । क्रिया हे ज्यां रुचे क्षत्रिय ते ॥ २ ॥
शुचिर्भूत वेदाध्ययनसंपन्न । कृषि-गोरक्षण वाणिज्यही ॥ ३ ॥
द्रव्यसंपादनीं प्रेम जयाप्रति । वैश्य त्या बोलती ज्ञानवंत ॥ ४ ॥
सर्वभक्षी, सर्वकर्ता, अनाचार । वेदहीन शूद्र अशुचि सदा ॥ ५ ॥
सकळ हीं चिन्हें जाणावीं सामान्य । असतील जाण नसती कोठें ॥
वासुदेव म्हणे शूद्र तो न शूद्र । विप्रही न विप्र कदा दिसे ॥ ७ ॥

१२४

लोभ, क्रोध, तेंवी इंद्रियें सर्वदा । जिंकूनि ज्ञानाचा ध्यास घ्यावा ॥
लोभादिक सदा अकल्याणकारी । विप्र त्या निवारी महायत्नें ॥ २ ॥
क्रोधें सर्वदा ते रक्षावी संपदा । मत्सरेंसी तपा संरक्षावें ॥ ३ ॥
मानावमानेंसी विद्या संरक्षावी । प्रमत्त न व्हावी बुद्धि कदा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे त्यागी अनासक्त । तोचि बुद्धिमंत तोचि त्यागी ॥५॥

१२५

विप्रें हिंसा ते त्यजावी । सकलांसवें मैत्री व्हावी ॥ १ ॥
बंधकारी परिग्रह । त्यजूनि व्हावें जितेंद्रिय ॥ २ ॥
इहपर न उरे भीति । रमावें त्या ब्रह्मपदीं ॥ ३ ॥

दुर्लभ त्या पदास्तव । आचरावें सदा तप ॥ ४ ॥
सदा करावें मनन । विषयविरक्ति धरून ॥ ५ ॥
व्यक्ताव्यक्तज्ञान व्हावें । चिंतिलें हें वासुदेवें ॥ ६ ॥

१२६

परब्रह्म अतींद्रिय अगोचर । विश्वासेंचि स्थिर व्हावें मन ॥ १ ॥
प्राणांत तें लीन करूनि प्राणही । परब्रह्मीं पाहीं लीन व्हावें ॥ २ ॥
वैराग्यावांचूनि नव्हे ब्रह्मप्राप्ति । विषयविरक्ति वैराग्य तें ॥ ३ ॥
यास्तव विषयाचिंतन त्यजावें । विप्रें सहज व्हावें मुक्त ऐसें ॥ ४ ॥
शुचिर्भूत सदाचारसमन्वित । सदय तो स्पष्ट विप्र जाणा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे लक्षणें विप्राचीं । जाणूनि यत्नेंचि अभ्यासावीं ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १८९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १६ समाप्त

अध्याय १९० वा

१२७

भृगु म्हणे वेद तैसाचि स्वधर्म । मोक्षाचें साधन मुख्य जाणा ॥ १ ॥
उत्पत्ति स्थिति तैं स्वर्गही या योगें । वेदबाह्य मार्गें घोरतम ॥ २ ॥
तमोव्याप्तां नसे ओळख सत्वाची । सत्वें देवत्वाची प्राप्ति घडे ॥ ३ ॥
तिर्यग्योनि प्राप्त होई तमोगुणें । तेंवी रजोगुणें मनुष्यत्व ॥ ४ ॥
तयांतही सत्यानृत धर्माधर्म । सुखदुःख तम प्रकाशही ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जनीं ऐशा वृत्ति । ऐका जे तयांची फलश्रुति ॥ ६ ॥

१२८

सत्य तोचि धर्म, धर्म तो प्रकाश । प्रकाशचि सौख्य म्हणती ज्ञाते ॥
अनृत अधर्म, अधर्म तो तम । तम तेंचि सुज्ञ म्हणती दुःख ॥ २ ॥
एतद्विषयीं जें कथिलें तें ऐका । व्यवहार ज्ञात्यांचा मोहहीन ॥ ३ ॥
शारीरिक किंवा मानसिक दुःखें । क्षणिक वा सौख्यें मोह न त्यां ॥
ऐहिक सुख तें अनित्य जाणूनि । दुःखविमोक्षणीं यत्न व्हावा ॥ ५ ॥
राहुग्रस्त चंद्रा जैसा न प्रकाश । नसे अज्ञान्यास तेंवी सुख ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्ञान तेंचि सौख्य । अज्ञान तें दुःख स्पष्ट दिसे ॥७॥

१२९

शारीर मानस द्विविध हें सुख । इहपरलोक सुखार्थचि ॥ १ ॥
सुखाहूनि फल नसे त्रिवर्गाचें । आत्मगुण यातें म्हणती कोणी ॥२॥
सुखार्थचि धर्मअर्थादिक क्रिया । सुखार्थचि व्हावा यत्न जनीं ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे शाश्वतसुखार्थ । प्रेमें धर्ममार्ग आचरावा ॥ ४ ॥

१३०

भरद्वाज म्हणे सुखाचें नित्यत्व । मान्य न आम्हांस सकारण ॥ १ ॥
इच्छिती न योगी सौख्याचा या लेश। इच्छितां जें त्यांस सहज प्राप्त
ब्रह्माही सुखाची बाळगी न क्षाति । नित्य तपामाजी रमूनि जाई ॥
एकाकी विषय त्यागूनियां राहे । ऐसें आमुच्या ये कानावरी ॥ ४ ॥
साक्षात् शंकरानें जाळिला मदन । सुखार्थ न यत्न करिती ज्ञाते ॥
जनापवादही सदाचारें सुख । दुराचारें दुःख लाभतसे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सुखाचें स्वरूप । करूनि विपरीत प्रश्न असे ॥ ७ ॥

१३१

भृगु म्हणे आतां कथितों तें ऐकें । अधर्माच्या मार्गें अज्ञ जाती ॥१॥
क्रोधलोभादिकीं होऊनियां व्याप्त । इहपर सौख्य न पावती ॥ २ ॥
त्रिविध तापांनीं पोळूनियां जाती । केवळ सौख्यचि स्वर्गी असे ॥
सौख्यदायी वायु सर्वत्र सुगंध । क्षुधा तृषा तेथ जराही न ॥ ४ ॥
पातकाची बाधा नसेचि त्या ठाईं । द्वंद्वमय पाहीं मृत्युलोक ॥ ५ ॥
नरकलोकीं तें दुःखचि केवळ । कथितो वासुदेव पुढती ऐका ॥ ६ ॥

१३२

केवळ दुःख वा सुखदुःखद्वंद्व । स्वर्गीचेंही सौख्य अनित्यचि ॥ १ ॥
सुखदुःखातीत केवळ जें सौख्य । नसे तें स्वर्गात भरद्वाजा ॥ २ ॥
केवळ पुण्याचें फल लाभे तेथें । परी त्या पुण्यातें क्षय असे ॥ ३ ॥
केवळ सुख तें ब्रह्मज्ञानें मात्र । यत्न अहोरात्र तदर्थचि- ॥ ४ ॥
व्हावा, वैषयिक सुख जरी तुच्छ । ब्रह्मयानें स्त्री-पुरुष निर्मियेले ॥५॥
स्वकर्मानुरोधें तत्तत्साधनांचा । आश्रय नराचा स्वभाव हा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे स्वधर्मानुष्ठानें । निर्लेप पावणें सौख्य लोकीं ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १९० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १७ समाप्त

१ नैयायीक.

अध्याय १९१ वा

१३३

दान धर्म हुत सुतप्त कीं तप । स्वाध्यायाचें मज फल सांगा ॥ १ ॥
भृगु म्हणे हुतें पापाचा विनाश । स्वाध्यायें चित्तास शांति लाभे ॥२॥
दानें सौख्यप्राप्ति तपानें तो स्वर्ग । दान तें द्विविध इहपरद ॥ ३ ॥
परत्रार्थ दान दत्त जें सज्जनां । इहार्थचि जाणा कुदत्त जें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे दान तैसें फल । वृक्षासम फूल, गंध जाणा ॥ ५ ॥

१३४

कोणाचा जाणावा कैसा धर्माचार । लक्षण साचार धर्माचें कीं ॥१॥
धर्माचे प्रकार मज निवेदावे । संदेह फेडावे गुरो, मम ॥ २ ॥
भृगु म्हणे ज्ञाते जे धर्मनिरत । तयांसीच स्वर्ग इतरां मोह ॥ ३ ॥
भरद्वाज म्हणे आश्रम जे चार । तयांचे आचार कथा मज ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे वर्णाश्रमधर्म । करिती पावन मानवांसी ॥ ५ ॥

१३५

भृगु म्हणे पूर्वीं लोकहितकर्ता । कथितो विधाता आश्रमधर्म ॥ १ ॥
गुरुगृहीं वास ब्रह्मचर्याश्रम । धर्माचें रक्षण आश्रमधर्मीं ॥ २ ॥
शुचित्व संस्कार नियम तैं व्रतें । ध्यान सूर्याग्नींचें संध्याकाळीं ॥ ३ ॥
निद्रा-तंद्रात्यागें गुरूसी वंदन । स्वाध्यायेंचि मन शुद्ध व्हावें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे स्नान तें त्रिकाल । अग्नि-गुरुपायसेवा नित्य ॥ ५ ॥

१३६

भिक्षा मागूनियां नित्य । निवेदावी श्रीगुरूस ॥ १ ॥
आज्ञापालनीं उत्सुक । असों द्यावें सदा चित्त ॥ २ ॥
गुरुप्रसादें जें लाभे । अभ्यासावें तें प्रमोदें ॥ ३ ॥
गुरुप्रसादें ज्या ज्ञान । लाभे तया स्वर्ग जाण ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । महिमा प्रथम आश्रमाचा ॥ ५ ॥

१३७

द्वितीय आश्रम गार्हस्थ्य जाणावा । आचार ऐकावा गृहस्थाचा ॥
समावृत्त सदाचारी सहधर्माचें । लाभावें जयांतें फल वाटे ॥ २ ॥
तया भाग्यवंतांस्तव हा आश्रम । धर्म, अर्थ, काम, प्राप्त येणें ॥ ३ ॥

अनिंद्य कृतींनें संपादावें धन । विद्या अध्यापन याजनादि ॥ ४ ॥
रत्नखनी किंवा देवताप्रसाद । धनाचे हे मार्ग वंद्य लोकीं ॥ ५ ॥
ऐशा मार्गें वास घडो या आश्रमीं । मूळ हेंचि जनीं सर्वाश्रमा ॥६॥
वासुदेव म्हणे ब्रह्मचारी यति । गृहस्थचि त्यांची उपजीविका ॥७॥

१३८

सज्जन जे प्रायः पथ्यान्न सेविती । अध्ययनीं प्रीति तीर्थाटन ॥ १ ॥
वंदावें तयांसी, निर्मत्सर शब्दें । बोलूनि, आनंदें सन्मानावें ॥ २ ॥
आसन, भोजन शय्या अर्पूनियां । विन्मुख न तयां करणें कदा ॥३ ॥
निराश अतिथि पुण्य घेऊनियां । पाप अर्पूनियां जाई सुखें ॥ ४ ॥
यज्ञें देवां, श्राद्धें पितरांसी तृप्ति । विद्याभ्यासें ऋषि हर्षताती ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अपत्योत्पादनें । संतुष्ट तो जाणे प्रजापति ॥ ६ ॥

१३९

श्रवणमधुर बोलावें वचन । कठोर भाषण करूं नये ॥ १ ॥
अभिमान दंभ पीडा तिरस्कार । निंद्यचि साचार हिंसा क्रोध ॥२॥
सत्यावलंबन सर्व आश्रमींचें । तपचि हें साचें ध्यानीं धरीं ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे सामान्य धर्म हे । महत्व त्या राहे असामान्य ॥ ४ ॥

१४०

वस्त्र अभ्यंगादि उपभोगक्षम । गायन वादन नृत्यादिक ॥ १ ॥
ऐकूं पाहूं शके गृहस्थ सुखानें । भक्ष्य भोज्य प्रेमें चाखूं शके ॥ २ ॥
इष्ट विहारें तो पावेल संतोष । काम धर्म अर्थ सेवो सुखें ॥ ३ ॥
पुढती तयासी लाभते सद्गति । जो उंछवृत्तीसी स्वीकारील ॥ ४ ॥
धार्मिक तो कामबाधाविवर्जित । वासुदेव स्वर्ग म्हणे तया ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १९१ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १८ समाप्त

अध्याय १९२ वा

१४१

भृगु म्हणे वानप्रस्थाश्रमी वनीं । वसती ज्या स्थानीं व्याघ्रादिक ॥
धर्मानुरोधानें नदीतीरतीर्थें । संचार जयांतें पुण्यस्थानीं ॥ २ ॥
ग्राम्याहार वस्त्रें उपभोग त्यागिती । विचित्र सेविती कंदमुळें ॥ ३ ॥
भूमीचि ज्यां स्थान वालुकाशयन । वल्कलाच्छादन अजिन किंवा ॥

केश-श्मश्रु-नख-रोमधारी स्नान । नियमित होम अनुष्ठानें ॥ ५ ॥
समिध्कुश सुमसंमार्जनीं तयां । विश्राम त्या ठायां लाभतसे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शीतोष्ण वृष्टीनें । सर्व त्वचा जाणें भग्न त्यांची ॥७॥

१४२

व्रतें अनुष्ठानें शोणित तैं मांस । आटूनियां शुष्क देह त्यांचा ॥ १ ॥
सत्वगुणेंचि त्यां शरीरधारण । इंद्रियसंयम निग्रहेंसी ॥ २ ॥
वह्मर्षिकथित आचार हा त्यांचा । प्रेमें आचरितां दग्ध दोष ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे दुष्प्राप्यही लोक । निश्चयेंसी प्राप्त तृतीयाश्रम ॥ ४ ॥

१४३

आतां चतुर्थाश्रमाचा । ऐका आचार जो साचा ॥ १ ॥
अग्नि धन कांतादिक । करूनि परिवारत्याग ॥ २ ॥
विषयप्रेम झुगारूनि । रमती संन्यासग्रहणीं ॥ ३ ॥
समलोष्टाश्मकांचन । तुच्छ त्रिवर्ग त्यां जाण ॥ ४ ॥
अरिमित्र उदासीनां- । सम, द्वेष त्यां शिवेना ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वास । एका ठाईं न यतीस ॥ ६ ॥

१४४

पर्वत पुलीन देवालयें जाण । वृक्षमूळ स्थान सुखाचें त्यां ॥ १ ॥
नगरीं पंचदिन ग्रामीं दिन एक । करिती निवास भिक्षाभोजी ॥२॥
पवित्र विप्राच्या सदनींचि भिक्षा । संतोषचि चित्ता लाभे तेणें ॥३॥
काम क्रोध लोभ गर्व मोह दैन्य । दंभ अभिमान परनिंदा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे यति हिंसाहीन । ऐसा श्रेष्ठ धर्म आचरी तो ॥ ५ ॥

१४५

भूतमात्रालागीं अभय देऊनि । संचरे जो जनीं विप्रश्रेष्ठ ॥ १ ॥
शरीरीं तयाच्या जाणा अग्निहोत्र । मुखकुंडीं, देख हवन भिक्षा ॥२॥
अग्निचयनाचें फळ तया लाभे । दीप्तिमंत त्यातें ब्रह्मलोक ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्मलोकस्थिति । भृगु वर्णिताती प्रश्नासम ॥ ४ ॥

१४६

भ्रूमध्यस्थान जें महापुण्यदाई । नासिका मूळींचि स्पृहणीय ॥ १ ॥
पापशून्य सत्यसंकल्पस्वरूप । तोचि ब्रह्मलोक पुण्यात्म्यांचा ॥ २ ॥

तयास्थानीं क्लेश लवही न कोणा । सद्‌गुण त्या स्थाना सकल बाधा
समाधीकालीं तो अविनाशी आत्मा । प्रगटूनि ज्ञान्यां सौख्य देई ॥
व्याधि तयांप्रति स्पर्शती न कदा । आत्माभिन्न तयां वस्तूचि न ॥५॥
वासुदेव म्हणे यास्तव स्त्रियादि । बाह्य वस्तु त्यासी बाधतीना ॥६॥

१४७

कामासक्त जैंवी रमे स्त्रियादिकीं । तैसा तो आनंदी ब्रह्मबोधें ॥ १ ॥
भेदाचि न तेथें मग कैंचा बंध । इच्छितां त्या प्राप्त सकल वस्तु ॥२॥
पाहूनिही ऐसें आश्चर्य न तया । स्पर्श न त्या ठाया असत्याचा ॥३॥
संशय लेशाही नसे तयाप्रति । साक्षात्कार त्यासी मूर्तिमंत ॥ ४ ॥
एथूनिही कोणी पावती पतन । परब्रह्मीं लीन होती कोणी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे व्यास नारदादि । नित्य योगमार्गीं रमती प्रेमें ॥ ६ ॥

१४८

आत्मवंचकांचा पुण्यक्षय होई । दुःखलाभ पाहीं तयामुळें ॥ १ ॥
नित्य योगयुक्त सर्वदा ते सुखी । तयांच्या पुण्यासी क्षय नसे ॥२॥
श्रम, भीति, मोह आत्मवंचकांसी । द्रव्यलोभें त्यांसी अधःपात ॥
धर्माधर्ममार्गीं वृत्ति बहुविध । धर्माधर्मज्ञ जो दोष न त्या ॥४॥
दांभिक वंचक क्षीणतप होई । ज्ञानीयाची होई तपोवृद्धि ॥ ५ ॥
धर्माधर्मक्रिया चिंताढ्या या लोकीं । कर्मभूमि हेचि जाणूनियां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कर्म याचि लोकीं । शुभाशुभ जैंवी तैसें फल ॥ ७ ॥

१४९

याचि लोकीं तप करूनि विधाता । तैशाचि देवता सत्कर्मेंचि ॥ १ ॥
याचि लोकीं लाभे ज्ञात्यां ब्रह्मपद । परी योगनिष्ठ व्हावें लागे ॥ २ ॥
विरुद्ध आचारें तिर्यग्योनिलाभ । अथवा अल्पायुष्य प्राप्त होई ॥ ३ ॥
अन्योन्यभक्षण करिती लोभ मोहें । भ्रमण तयांतें निरंतर ॥ ४ ॥
ब्रह्मचारी यतचित्त गुरुभक्त । सगुणाचा बोध तयांप्रति ॥ ५ ॥
संक्षेपें हा धर्म कथिला तुजसी । धर्मा, धर्मज्ञाचि बुद्धिमंत ॥ ६ ॥
भीष्म म्हणे धर्मा, ऐकूनि भृगूंतें । प्रेमें भरद्वाजें वंदियेलें ॥ ७ ॥
उत्पत्तिसंबंधीं कथिला हा बोध । आतां काय तुज निवेदूं मी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ज्ञानाचा सागर । कथी महाधीर पुढती ऐका ॥ ९ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १९२ वा तथा मोक्षधर्मपर्वांचा अ. १९ समाप्त

अध्याय १९३ वा

१५०

धर्म म्हणे ताता, आचारविधीतें । निवेदावें मातें सर्वज्ञ तूं ॥ १ ॥
दुर्मीति दुष्कर्मं साहसप्रिय जे । दुर्जन तयांतें म्हणती ज्ञाते ॥ २ ॥
आचारसंपन्न जाणावे सज्जन । शुभकर्मीं मग्न निरंतर ॥ ३ ॥
राजमार्गीं तेंवी धेनूंच्या समूहीं । मूत्रपुरिषादि वर्ज असो ॥ ४ ॥
मूत्रपुरिषादि होतां व्हावी शुद्धि । निद्रा ते नसावी सूर्योदयीं ॥ ५ ॥
संध्या उपस्थान व्हावें शास्त्राधारें । भोजन करावें मौनव्रतें ॥ ६ ॥
आर्द्र हस्तपादमुखें पूर्वमुखी । सदा अन्न भक्षी न निंदितां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे उत्तरापोशन । घेऊनि भोजन पूर्ण व्हावें ॥ ८ ॥

१५१

आर्द्रपादें नसो शयन कदाही । प्रदक्षिणा व्हावी विप्रादिकां ॥ १ ॥
पंक्तिप्रपंच तो कदा करूं नये । द्विकालचि घ्यावें अन्न सदा ॥ २ ॥
ऋतुकालीं भार्या परस्त्रीवर्जन । कालीं होम ब्रह्मचर्येचि तें ॥ ३ ॥
ब्राह्मणोच्छिष्ट तें अमृत जाणावें । सेवूनि पावावें परमपद ॥ ४ ॥
लोष्टमर्दी तृणच्छेदी नखखादी । नित्योच्छिष्ट वृत्ति चपल ज्याची ॥
दीर्घायुष्य तया न लाभे सर्वदा । वासुदेव बोधा पुढती कथी ॥ ६ ॥

१५२

कदाही न मांस निवृत्तमांसानें । भक्षावें, प्रवृत्तें सकारण ॥ १ ॥
स्वपरदेशींही अतिथिसेवन । थोरांसी वंदन इष्ट सदा ॥ २ ॥
थोरांसी वंदितां वय, कीर्ति, धन । प्राप्त होई जाण निश्चयेंसी ॥ ३ ॥
विवस्त्र परस्त्री, सूर्य उगवता । पाहूं नये कदा ध्यानीं असो ॥ ४ ॥
धर्मअविरोधी एकांतीं मैथुन । संमत तें जाण शिष्टांप्रति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे गुरूचें हृदय-। तीर्थचि प्रत्यक्ष ज्ञात्याप्रति ॥ ६ ॥

१५३

प्रशंसनीयचि शिष्टकृतकर्म । सदा शुद्ध जाण धेनुपुच्छ ॥ १ ॥
बालक स्पर्शही पवित्रचि सदा । कुशल सर्वदा पुसणें आप्तां ॥ २ ॥
प्रातःसायंकाळीं विप्रासी वंदावें । मंगलासी व्हावें सव्य सदा ॥ ३ ॥
विप्रवंदन तें प्रत्यक्ष फलद । तोषवीं विप्रांस यथाशास्त्र ॥ ४ ॥

श्मश्रु शिंक तेंवी भोजनान्तीं विप्रा । वंदितां व्याधिता, आयुर्लाभ ॥
वासुदेव म्हणे मूत्रोत्सर्ग कदा । अभिमुख सूर्याच्या करूं नये ॥ ६ ॥

१५४

आपुली ते विष्ठा पाहूं नये धर्मा । एकशय्याशनां स्त्रीही वर्ज्य ॥ १ ॥
ज्येष्ठांसी त्वंकार जाणावा तो वर्ज्य । दुष्टाचें दुष्टास कळे पाप ॥२॥
ज्ञात्याच्या पुढती लपवितां पाप । होई विनाशास कारण तें ॥ ३ ॥
लपवितांही तें जाणती कीं देव । पापें वाढे पाप धर्में धर्म ॥ ४ ॥
नाठवेचि पाप मोहग्रस्ताप्रति । गांठी तें तयासी योग्यवेळीं ॥५॥
वासुदेव म्हणे आशालब्ध धन । जाणावें कठिण उपभोगासी ॥६॥

१५५

मनःपूर्वकचि आचरावा धर्म । करावें कल्याण सकळांचें ॥ १ ॥
एकाकींचि धर्म सदा आचरावा । धर्मात नसावा सहाय्यक ॥ २ ॥
सहाय्यक तरी करी काय तेथें । वृत्ति ज्याची त्यातें इतरां काय ॥
उत्पत्तिप्रलया धर्मचि कारण । अमृतप्राशन देवां धर्में ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे परलोकीं नित्य । पावताती सौख्य धर्मशील ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १९३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. २० समाप्त

अध्याय १९४ वा १५६

धर्म म्हणे ताता, कथा योगधर्म । सृष्ट्युत्पत्तिज्ञान प्रलय कथा ॥
निवेदिती भीष्म कृतार्थता ज्ञानें । येई तें प्रेमानें कथितों आतां ॥२॥
पंचमहाभूतें कारण विश्वासी । लयही त्यांमाजी पावे विश्व ॥ ३ ॥
कूर्मांगांसम हा जीव निर्मी भूतें । आंवरी तयांतें तोचि स्वयें ॥ ४ ॥
जीवस्वाभिमानें ज्ञान हें त्या नसे । शब्दादि स्वरूपें भूतें देहीं ॥५॥
सहावें तें मन इंद्रियांसमेत । द्वार तें ज्ञानास पुढती बुद्धि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे संकल्प ते मनें । निश्चय बुद्धीनें आत्मा साक्षी ॥ ७ ॥

१५७

साक्षिचैतन्यें या व्यापियेलें सर्व । धर्मा, तदितर त्रिगुणात्मक ॥१॥
गुणमयी हेंचि विश्वमूळ माया । जाणील हें तया बोध ठसे ॥ २ ॥

हळु हळु वाढे विवेक वैराग्य । अंतीं शांतिसौख्य याचि ज्ञानें ॥३॥
बुद्धि याचि गुणें विषय रूपासी । पावे सकलही बुद्धीचि हे ॥ ४ ॥
अस्तित्वें बुद्धीच्या सकलां अस्तित्व । बुद्धीचि यास्तव सर्व मूळ ॥
वासुदेव म्हणे चक्षुद्वारा बुद्धि । रूप अवलोकी पदार्थांचें ॥ ६ ॥

१५८

त्या त्या इंद्रियानें शब्दस्पर्शादिक । अनुभवी देख बुद्धीचि हे ॥ १ ॥
वास्तविक भेद सर्व हा बुद्धीचा । परमात्मसत्ता कारण या ॥ २ ॥
चुंबकसान्निध्यें गति जैं लोहासी । चैतन्यें हे गति इंद्रियां तैं ॥ ३ ॥
सुख दुःख मोह सत्व रज तमें । व्याप्त होतां जाणें बुद्धीप्रति ॥ ४ ॥
नद्यांसी व्यापूनि सागरा अस्तित्व । तैसी त्रिगुणांस व्यापी बुद्धि ॥
वासुदेव म्हणे व्यापूनिही गुणा । सूक्ष्मरूपें आत्मा हृदयीं बुद्धि ॥६॥

१५९

समाधिसुखेंही बुद्धीचा न नाश । होई गुणरूप फिरूनि बुद्धि ॥ १ ॥
सुख-शोक-मोहरूपें ती फिरूनि । प्रगटे या जनीं व्यवहारार्थ ॥ २ ॥
यापरी बुद्धीचें सामर्थ्य घे ध्यानीं । एकाग्र होऊनि पुढती ऐकें ॥३॥
इंद्रियविजय विचार कथितों । इंद्रियां जिंकी जो तोचि ज्ञाता ॥४॥
सत्व रज तमें सुखदुःख मोह । पावतसे जीव एकाएकी ॥ ५ ॥
इच्छा संशयें हें मन होई व्याप्त । जिंकितां तयास सौख्यलाभ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बुद्धि-जीवभेद । न कळेचि तप्त लोहासम ॥ ७ ॥

१६०

अहंकारादिक गुण निर्मी बुद्धि । जीव न निर्मीचि भेद ऐसा ॥ १ ॥
मशकोदुंबर संबंधासमान । बुद्धि जीव जाण एकत्र हे ॥ २ ॥
परी स्वयमेव भेद असे त्यांत । मत्स्यांचा संयोग उदकासी जैं ॥३॥
देहादिकां ज्ञान नसेचि आत्म्याचें । आत्म्याप्रति त्यांचें परी ज्ञान ॥४॥
तादात्म्याचि परी मानीतसे आत्मा । गौरव कृष्णत्वा तेणें मानी ॥५॥
आभासचि परी जाणावा हा साचा । छिद्रांतूनि जैसा प्रगटे दीप ॥
तेंवी मन बुद्धि इंद्रियद्वारानें । पदार्थांतें जाणें जीव जगीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे बुद्धि निर्मी गुण । त्यांचें अवलोकन करी जीव ॥ ८ ॥

१६१

ऐसा हा संबंध जाणावा अनादि । आश्रय कोणासी नसे कोणी ॥१॥
स्वयंप्रभ आत्मा असंग जाणावा । बुद्धि ते अविद्या मिथ्यारूप ॥२॥
घटाछिद्रांसम इंद्रियें जाणावीं । कोंडूनि पहावी आत्मज्योति ॥ ३ ॥
पुढती चिंतितां केवळ ते ज्योति । सकल विश्वासी तोचि आत्मा ॥
इंद्रियनिग्रह तैसाचि संन्यास । होतां आत्मलाभ ऐशापरी ॥ ५ ॥
उदकसंचारी पक्ष्यासम ज्ञाता । लिप्त नच कदा कर्मी होई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे जाणूनियां ऐसें । निर्विकाराचित्तें वास घडो ॥ ७ ॥

१६२

परस्पराध्यास त्यागूनि यापरी । पावतो अंतरीं शांति योगी ॥ १ ॥
उर्णनाभीसम महायोगी ऐसा । निर्मी पंचभूतां सहजपणें ॥ २ ॥
आभासचि ऐसें विश्व हें जाणावें । येई स्वानुभवें प्रत्यय हा ॥ ३ ॥
तादात्म्यभावासी त्यजितांचि सौख्य । निर्मूलचि शोक निश्चयें या ॥
सरितास्नानानें मलिन ते शुद्ध । तैसे ज्ञानसिद्ध शुद्ध होती ॥ ५ ॥
केवळ ज्ञानें न पैलतीरप्राप्ति । ज्ञानमात्रें सिद्धि परी एथें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पाप ताप नाश । केवळ ज्ञानेंच जीवोद्धार ॥ ७ ॥

१६३

धर्म अर्थ काम सौख्यासी त्या क्षय । चिंती तया काय अन्य आशा
सहजाचि त्याच्या पूर्ण होती आशा । पावे आत्मबोधा संयमीचि ॥
ज्ञात्यासी न कदा संसाराची बाधा । अज्ञानाचि बाधा सकल करी ॥
अज्ञाननिवृत्तिमाजी न्यूनाधिक्य । नसेचि, अभेद एक तेथें ॥ ४ ॥
फलेच्छारहित कर्में दोष जाती । परी न ज्ञात्यासी आवश्यक ॥ ५॥
कामक्रोधासक्ता तिरस्कारी ज्ञाता । कारण ते बंधा असती मूळ ॥
धर्मा, आसक्त ते दुःखशोकमग्न । शोकमुक्त जाण ज्ञाते मात्र ॥ ७ ॥
यास्तव तूं धर्मा, उपसनामार्गें । अथवा ज्ञानानें मुक्त होई ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ज्ञानें सद्योमुक्ति । तेंवी क्रममुक्ति उपासकां ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १९४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. २१ समाप्त

अध्याय १९५ वा

१६४

ध्यानयोग आतां चतुर्विध ऐकें । कथितानी ऐसें भीष्म धर्मा ॥ १ ॥
थोरथोरां याचि मार्गें मोक्षप्राप्ति । द्वंद्वें ते सोशिती सत्वगुणें ॥ २ ॥
कामक्रोधहीन पाळिती नियम । विरोध त्यजून करिती वास ॥ ३ ॥
अनुकूल ऐशा स्थानीं ध्येयरूप । व्हावें सर्वत्रांस त्यागूनियां ॥ ४ ॥
काष्ठासम व्हावें स्थिर त्या योगानें । सकल इंद्रियें आंवरूनि ॥ ५ ॥
होतां मनोमय, आंवरावें तेंही । विषय सर्वही निवारूनि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विषयांची इच्छा । क्षोभ इंद्रियांचा करी बहु ॥ ७ ॥

१६५

योगकौशल्यानें इंद्रियांच्या वृत्ति । व्हाव्या मनामाजी लीन यत्नें ॥
पुढती चंचल मन ध्येयरूप । बाह्य विषयांस त्यजूनि होवो ॥ २ ॥
वृत्ति इंद्रियांच्या निरोधूनि मनीं । मनही रोधूनि स्थिर व्हावें ॥३॥
वारंवार जैसी लवतसे वीज । मनही तैसेंच फिरूनि उठे ॥ ४ ॥
सहज चंचल जलपद्मदलीं । चंचलता वरी अधिकचि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मन तैं योग्याचें । पावे चांचल्यातें अधिक ऐसें ॥६॥

१६६.

ऐसें पावतां चांचल्य । वसो अंतरांत धैर्य ॥ १ ॥
त्यागूनियां मत्सरातें । खिन्न न होतांचि चित्तें ॥ २ ॥
निरलस उत्साहानें । ध्यान चालवावें यत्नें ॥ ३ ॥
ऐशा प्रयत्नशीलासी । होई कांहीं ध्यानसिद्धि ॥ ४ ॥
आत्मानात्मबोधें ध्यान । सिद्ध होई तें उत्तम ॥ ५ ॥
मनःकल्पित मूर्तीचें । ध्यान साधे मध्यमातें ॥ ६ ॥
जड मूर्तीचें निकृष्ट । ध्यान घडे निकृष्टास ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । हळु हळु ध्यानसिद्धि ॥ ८ ॥

१६७

त्यजूनि आळस प्रयत्न करावा । आपुला साधावा अंतीं हेतु ॥ १ ॥
धूलिकणासी न आकृति एकाकी । येई परी अंतीं कार्य साधे ॥ २ ॥
तैसी ध्येयमय इंद्रियांची वृत्ति । न होई एकाकी यत्नें साधे ॥ ३ ॥

एकेकावयव चिंतूनियां अंतीं । सकलही मूर्ति करणें स्थिर ॥ ४ ॥
ऐशा मार्गें होई निर्विकल्पध्यान । योगमार्गें शम ऐसा लाभे ॥ ५ ॥
आत्मसंयमेंचि लाभ हा योग्यासी । द्वैत शून्यस्थिति पुढती ऐशी ॥
वासुदेव म्हणे ध्यानयोग ऐसा । ठेवा साधकांचा अलौकिक ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १९५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. २२ समाप्त

अध्याय १९६ वा १६८

धर्म म्हणे ताता, कथिलेंती बहु । गुण केंवी गाऊं तुमचे किती ॥ १ ॥
आतां जपविधि फलही जपाचें । निवेदावें मातें सकल कांहीं ॥ २ ॥
भीष्म तैं कथिती संवाद पूर्वींचा । निवेदीन ताता, पुढती तुज ॥ ३ ॥
वेदान्त वा योग, मोक्षशास्त्रें दोन । साक्षात् वेदान्तीं न कथिला जप
चित्तशुद्धिद्वारा मोक्षद तो होई । सिद्धांत हा पाहीं वेदान्ताचा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आधार योगाचा । जपाचि हा साचा कथिती भीष्म ॥

१६९

शम, दम, सत्य, शुद्धाहार ध्यान । अव्यग्रता जाण एथें लागे ॥ १ ॥
ऐसा हा प्रवृत्तिमार्गरूपी जप । लाभे येणें स्वर्ग पुण्यवंता ॥ २ ॥
गायत्र्यादि जप जपितां मी ईश- । भाव हा 'निवृत्त' जप जाणें ॥ ३ ॥
बाह्यआभ्यंतर विषय त्यागूनि । मनाचा स्वमनीं लय व्हावा ॥ ४ ॥
ईश्वरैक्यभावें लागतां समाधि । स्थान न जपासी तया उरे ॥ ५ ॥
चित्तशुद्धि जपें विचारें संयम । रागद्वेषहीन ब्रह्म होई ॥ ६ ॥
कर्मफलइच्छा न उरे तयासी । फळेंही कर्माचीं नुरती तया ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अहंममभावें । द्वैत चिंतूं नये कदाकाळीं ॥ ८ ॥

१७०

ध्यानतत्पर असावें । ध्येयरूप होऊनि जावें ॥ १ ॥
अंतीं निर्बीज समाधि । पावे ब्रह्मरूपता ती ॥ २ ॥
तया निरिच्छ योग्यासी । नसे जन्ममरणप्राप्ति ॥ ३ ॥
सर्व वासनाक्षयानें । ब्रह्मरूपता त्या बाणे ॥ ४ ॥
ऐसी प्रवृत्ति-निवृत्ति- । मार्गीं श्रेष्ठता जपासी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जप । करितां साधे चित्तैकाग्र्य ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १९६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. २३ समाप्त

अध्याय १९७ वा १७१

धर्मा, जो अपूर्ण अंगें करी जप । तयासी नरकप्राप्त होई ॥ १ ॥
अश्रद्धेनें करी जप जो त्यापरी । आनंद अंतरीं जपें न ज्या ॥ २ ॥
प्रीतीही न जडे जया जपामाजी । नरकाची प्राप्ति तयालागीं ॥ ३ ॥
अहंकारें अवमानी जो परासी । नरकलाभचि तयाप्रति ॥ ४ ॥
सकामासी फलयोग्य लाभे देह । सिद्धीही नरक समजें धर्मा ॥ ५ ॥
अज्ञानें कामना धरी जो तयासी । अविरक्त दृष्टी नरक तया ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सवासन जप । पतन करील सिद्धाचेंही ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १९७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. २४ समाप्त

अध्याय १९८ वा १७२

धर्म म्हणे ताता, कथावे नरक । जापकासी प्राप्त होती तेचि ॥ १ ॥
पितामह कथी लोकपालादिक । देवतांचे भोग नरक तेचि ॥ २ ॥
नश्वर वैभव जाणे तो नरक । शाश्वत तें एक परब्रह्म ॥ ३ ॥
नाशाचें न भय द्वैतही न तेथें । द्वंद्वासी न कोठें स्थान असे ॥ ४ ॥
इष्टानिष्ट तया धर्मा, कांहीं नसे । काल तया धाकें कार्य करी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्म सुखरूप । अन्य अशाश्वत नरक सर्व ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १९८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. २५ समाप्त

अध्याय १९९ वा १७३

धर्म म्हणे ताता, कालादि संवाद । कथावा पूर्वोक्त सदयपणें ॥ १ ॥
कथिती तैं भीष्म साङ्गवेदज्ञाता । कौशिक नांवाचा विप्र एक ॥२॥
हिमगिरीच्या तो पायथ्याशीं तप । चिंतूनि जपार्थ, करी नित्य ॥३ ॥
ऐसीं सहस्राब्दें लोटलीं तयासी । प्रत्यक्ष सावित्री भेटे तया ॥ ४ ॥
संकल्पित जप परी न सोडितां । मौनें करी जपा निष्ठायुक्त ॥ ५ ॥
पूर्ण होतां जप वंदी गायत्रीसी । जपाचीच रुचि मागे तिज ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पुरवीन इच्छा । देवी म्हणे विप्रा सांगसी ते ॥ ७ ॥

१७४

ऐकूनि तें विप्र म्हणे हे देवते । वृद्धि पावो माते, जपइच्छा ॥ १ ॥
एकाग्र हें चित्त होवो सर्वकाळ । होऊनि दयाळ हेंचि देई ॥ २ ॥
ऐकूनियां देवी जाहली प्रसन्न । म्हणे हेतु पूर्ण होवो तव ॥ ३ ॥
विप्रही जपानें पावले नरक । परी ब्रह्मलोक लाभो तुज ॥ ४ ॥
काल मृत्यु यम येऊनि यास्थानीं । विवाद करूनि जातील ते ॥५॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । देवी स्वस्थळातें निघूनि जाई ॥ ६ ॥

१७५

निष्ठायुक्त चित्तें विप्र करी जप । लोटला शताब्द दिव्यकाल ॥ १ ॥
प्रत्यक्ष तैं धर्म येऊनियां म्हणे । सर्व लोक पुण्यें जोडिले त्वां ॥ २ ॥
त्यागूनियां देह जाईं इष्टलोकीं । विप्र म्हणे हाचि रुचतो लोक ॥ ३॥
धर्म म्हणे देह नश्वर हा त्यागीं । काय इच्छा कथीं तुजसी असे ॥
विप्र म्हणे याचि देहें जरी स्वर्ग । लाभे तरी मज लाभावा तो ॥ ५ ॥
नाहींतरी जावें सुखें तूं स्वस्थानीं । रंगे कथागानीं वासुदेव ॥ ६ ॥

१७६

काळ, यम, मृत्यु, तदा येती तेथ । बोलले विप्रास ऐका काय ॥१॥
विप्रा, त्वत्पुण्याचें लाभो तुज फल । त्यागीं हा तत्काल देह आतां ॥
स्वागत करूनि विप्र तयां बोले । कथावें जें आलें कार्य मनीं ॥ ३ ॥
इतुक्यांत राव इक्ष्वाकु पातला । सन्मानी सकलां विप्रश्रेष्ठ ॥ ४ ॥
राव म्हणे तदा राजा मी, तूं विप्र । इष्ट तेंचि माग द्रव्य मज ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां विप्र । बोलला राजास शांतचित्तें ॥ ६ ॥

१७७

राया, प्रवृत्त तैं निवृत्त ते जाण । द्विविध ब्राह्मण असती जनीं ॥१॥
धर्मही यापरी जाणावा द्विविध । इच्छिसी तें माग तूंचि मज ॥२॥
राव म्हणे विप्रा, युद्धाविण देई । ऐसा शब्द नाहीं आम्हां ठावा ॥
विप्र म्हणे राया, स्वधर्मी तूं रत । तैसाचि मी, इष्ट तेंचि करीं ॥४॥
ऐकूनियां राजा जपफळ मागे । विप्र म्हणे मातें युद्ध मागें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वाचिवीर्य विप्रा । करितों वाग्युद्धा राव बोले ॥ ६ ॥

१७८

विप्र म्हणे द्यावें शक्तीसम हेंचि । अद्यापिही माझी इच्छा असे ॥
राव म्हणे देई सर्व पुण्य मातें । विप्र म्हणे तूतें लाभो पुण्य ॥ २ ॥
राव म्हणे नको मज तपफल । कथावें केवळ फल काय ॥ ३ ॥
विप्र म्हणे तुज कालादि हे देव । कथितील फल पुण्याचें या ॥ ४ ॥
राव म्हणे जरी फलाचें न ज्ञान । काय तें लाभून सौख्य मज ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि तें विप्र । वदला जें तेंच ऐका आतां ॥ ६ ॥

१७९

विप्र म्हणे वाक्यप्रमाण दोघांचें । होवो, मागितलें दिधलें तें मी ॥
कदाही न फल इच्छिलें मी याचें । मग फल कैसें निवेदावें ॥ २ ॥
देतों हें कथितां चिंतिलें न कांहीं । तैसेंचि तूं घेई सत्यास्तव ॥ ३ ॥
नाहींतरी तुज असत्याचा दोष । इहपर त्यास नसे नृपा ॥ ४ ॥
अविनाशी परब्रह्म एक सत्य । लक्षावधि तुच्छ पुण्यें तेथें ॥ ५ ॥
शाश्वत तें तप अद्वितीय यज्ञ । ज्ञान निरुपम शास्त्राचें हें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे देता घेता दोघे । धनी असत्याचे त्यजितां शब्द ॥७॥

१८०

राव म्हणे विप्रा, क्षत्रियानें दान । घेऊं नये जाण कदाकाळीं ॥ १ ॥
विप्र कथी नाहीं पाचारिलें तुज । मागूनियां शब्द करिसी मिथ्या ॥
ऐकूनि तें धर्म म्हणे उभयांसी । लाभो वचनपूर्तिपुण्यफल ॥ ३ ॥
राव म्हणे स्वर्ग नको नको मज । इच्छी जरी विप्र लाभो तया ॥४॥
विप्र म्हणे बालपणींचि अज्ञानें । असेल याचिलें कवणा कांहीं ॥ ५ ॥
सांप्रत मी जप करितों वेदाचा । नसे कांहीं इच्छा लोभ नको ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तपःस्वाध्यायचि । कर्म स्वभावेंचि रुचे विप्रा ॥ ७ ॥

१८१

राव म्हणे विप्रा, प्रतिग्रह धर्म्य । भोगूं पुण्यकर्म उभयांनीं ॥ १ ॥
अथवा लाभूंदे माझें फल तुम्हां । येती तों त्या स्थाना पुरुष दोन ॥
मेसूर ते वस्त्रें मलिन तयांचीं । मारियेली मिठी एकमेकां ॥ ३ ॥
एक म्हणे माझें तुजसी न ऋण । अन्य म्हणे धन अपुलें घेई ॥ ४ ॥
अंतीं ते नृपासी पुशिताती मार्ग । दोष उभयांस नसो ऐसा ॥ ५ ॥

विरूप म्हणे, मी देणें गोप्रदान । असत्य हें जाण विकृत म्हणे ॥६॥
वासुदेव म्हणे विरूपासी राव । म्हणे न्यायास्तव कथीं वृत्त ॥ ७॥

१८२

विरूप नृपासी म्हणे विकृतानें । पुण्य धेनुदानें संपादिलें ॥ १ ॥
मागतां विकृतें अर्पिलें तें मज । पुढती धेनूद्वय जोडिलें मी ॥ २ ॥
उंछवृत्ति विप्रा अर्पूनि त्या एक। । पुण्य तें विकृता अर्पीतसें ॥ ३ ॥
परी न तो घेई यास्तवचि वाद । बोले तें विकृत नृपाप्रति ॥ ४ ॥
राया, विरूपानें याचितां मजसी । अर्पिलें मी त्यासी हर्षें पुण्य ॥ ५ ॥
नव्हेचि तें ऋण मग घेऊं कैंवी । वासुदेव गाई पुढती ऐका ॥ ६ ॥

१८३

ऐकूनि तें राव जाहला दिङ्मूढ । म्हणे योग्य मार्ग न सुचे परी॥१॥
थांबा कांहीं काल न्यायास्तव आतां । विप्र म्हणे राजा, ऐकें वाद ॥
मागितलें तुवां तेंचि अर्पीतसें । न घेतां शापातें घेणें प्राप्त ॥ ३ ॥
ऐकूनि तें राजा घेई विप्रपुण्य । पुढती विभागून घेऊं म्हणे ॥ ४ ॥
पाहूनि विरूप बोलला नृपासी । जाणावें आम्हांसी काम-क्रोध ॥५॥
वाद न आमुचा आलों त्वद्‌बोधार्थ । लाभ जापकास इच्छेसम ॥६॥
वासुदेव म्हणे संहिता जपाचें । श्रेष्ठ फल ऐसें कथिती भीष्म ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. १९९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. २६ समाप्त

अध्याय २०० वा

१८४

धर्म म्हणे काय जाहलें पुढती । भीष्म निवेदिती श्रवण करा ॥ १ ॥
विप्रानें कालादि देवां तैं ब्राह्मणां । पूजिलें त्या स्थाना पुढती प्रेमें ॥
पुढती जाहले सिद्ध ते जावया । पातले त्या ठाया सकल लोक ॥३॥
निनादूनि गेलें दिव्य नादें नभ । राव आणि विप्र करिती ध्यान ॥४॥
अंतीं दिव्य ज्योती ब्रह्मयाच्या मुखांत। योगी तैं जापक म्हणती सम
वासुदेव म्हणे जापक तैं योगी । समान कथिती भीष्म धर्मा ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २०० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. २७ समाप्त

अध्याय २०१ वा

१८५

धर्म म्हणे ताता, ज्ञानयोगादींचें । फल, कथा तैसें जीवज्ञान- ॥ १ ॥
कैसें घडे, तेंही निवेदावें मज । कथिती संवाद एक भीष्म ॥ २ ॥
पूर्वी बृहस्पति पुशिती मनूतें । हेंचि, मनु त्यांतें कथी ऐकें ॥ ३ ॥
इष्ट तेंचि सुख अनिष्ट तें दुःख । जाणें कर्ममार्ग इष्टास्तव ॥ ४ ॥
अनिष्टनिवृत्तिपूर्वक इष्टाची । कर्में घडे प्राप्ति ध्यानीं घेई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे इष्टानिष्टत्याग । व्हावयासी मार्ग कथिला ज्ञान ॥ ६ ॥

१८६

वासनासंबद्ध वैदिकही कर्म । त्यागितांचि जाण मुक्ति लाभे ॥ १ ॥
परी सुखार्थ जे आचरिती कर्म । दुःखेंही दारुण प्राप्त तयां ॥ २ ॥
बृहस्पति म्हणे लाभार्थ ज्या कर्म । लाभतां तें जाण फल त्याचें ॥ ३ ॥
मग नरकाची केंवी घडे प्राप्ति । कर्माविण केंवी फळ लाभे ॥ ४ ॥
मनु म्हणे फल अस्थिर तें दुःख । पद तें शाश्वत निरिच्छेनें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अनासक्तकर्म । दावीतसे स्थान शाश्वत जें ॥ ६ ॥

१८७

जोंवरी विवेक उपजला नाहीं । तोंवरी न जाई अज्ञान तें ॥ १ ॥
शुभाशुभ तेणें न कळे बुद्धीसी । दिसतां कंटकादि टाळी नर ॥ २ ॥
सर्प कंटकादि न दिसतां तया । जाऊनि त्या ठाया दुःख भोगी ॥ ३ ॥
ज्ञानाचा महिमा कळे या दृष्टान्तें । लाभे विवेकें तें साधकासी ॥ ४ ॥
सविधि प्रयोग, शास्त्रोक्त तो यज्ञ । दक्षिणान्न दान एकाग्रता ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कर्माची हीं अंगें । पंच तेंवी त्याचें त्रिविधरूप ॥ ६ ॥

१८८

कर्म, कर्मविधि कर्ताही त्रिगुण । फल गुणासम लाभतसे ॥ १ ॥
स्वर्गादिक फल लाभे न या देहीं । ज्ञानफल पाहीं या लोकींचि ॥ २ ॥
काया वाचा मनें त्रिधा घडे कर्म । त्या त्या योगें जाण फल त्याचें ॥
वास्तव मोक्षासी नसे तें कारण । करील तें जाण चित्तशुद्धि ॥ ४ ॥
प्रवाहित मत्स्य अन्यत्रचि जाई । कर्म तेंवी नेई भलत्या मार्गें ॥ ५ ॥
अव्यक्तत्वें ब्रह्म इंद्रियागोचर । गुणलिंगाकार कांहीं न त्या ॥ ६ ॥
प्रधान परमाणु नसे सत्तारूप । शून्यत्वही त्यास नसे परी ॥ ७ ॥

सदसत् स्वरूपी ईश्वरही नसे । संबंधचि नसे मायेचा त्या ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे तया न क्षरण । अक्षर हें नाम तेणें पावे ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २०१ वा तथा मोक्षधर्मपर्वांचा अ. २८ समाप्त

अध्याय २०२ रा १८९

मनु म्हणे सृष्टि आकाशादि क्रमें । होई व्यक्तत्वानें प्रगट लोकीं ॥१॥
उलट क्रमानें पावे ते विलय । लंघूनि आकाश जाती ज्ञाते ॥ २ ॥
अज्ञ ते पावती वारंवार जन्म । सर्वांहूनि भिन्न ब्रह्मभाव ॥ ३ ॥
त्या त्या इंद्रियांसी विषयनिवृत्त । करितांचि बोध शक्य त्याचा ॥
ब्रह्मचि मी ऐसें ज्ञान तया जीवा । साक्षित्वें सकलां कारण तें ॥५॥
स्वभाव हे संज्ञा तयासीच असे । व्यापकत्वें त्यातें म्हणती ईश ॥
व्याप्यत्वें तो जीव म्हणे वासुदेव । कारण तें कार्य एकरूप ॥ ७ ॥

१९०

शुभाशुभ कर्में तत्तद्देहलाभ । आत्म्याचा न बोध इंद्रियांनीं ॥ १ ॥
प्रदीप्त प्रकाशें दूरस्थाचें ज्ञान । दिपती नयन जवळी त्याच्या ॥ २ ॥
वास्तव यथार्थ रूप न तयाचें । दिसे नयनांतें तैसेंच हें ॥ ३ ॥
सत्तावंत जरी भासती अमात्य । नृपासी भिन्नत्व तयाहूनि ॥ ४ ॥
तैसाचि इंद्रियांहूनि आत्मा भिन्न । देहनाशेंही न, नाश त्याचा ॥ ५ ॥
ज्वाला वेगादी ते अग्नि वाय्वादिकां । जेंवी पुनः पुनः, तैसे देह ॥६॥
वासुदेव म्हणे वृक्षच्छेदें अग्नि । न दिसेचि तेंवी देहीं जीव ॥ ७ ॥

१९१

काष्ठमंथनें जैं धूमाग्निदर्शन । तेंवी होतां ज्ञान जीवाप्रति ॥ १ ॥
परब्रह्माचें तें दर्शन बुद्धीचें । एक्या वेळीं होतें बृहस्पते ॥ २ ॥
देहनाशें नाश न घडे आत्म्याचा । स्वप्नीं शरीराचा त्याग पाही ॥३।
अभिमानी परी जागृतींत त्याचा । देह न हा माझा समजे मृता ॥
परी पुनरपि लाभे अन्य देह । देहें न आत्म्यास वृद्धि क्षय ॥ ५ ॥
कर्मसंबंधें तो अन्यदेह पावे । अचल जाणावें रूप त्याचें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तप्त लोह जैसें । सचेतन तैसें शरीर हें ॥ ७ ॥

१९२

पूर्वदेह पंचभूतीं होई लीन । परी लाभे अन्य देह जीवा ॥ १ ॥
बुद्धिसंबंधेंचि येती पुनर्जन्म । जातां भ्रांतिज्ञान स्वरूप कळे ॥ २ ॥
नावस्थासी तीर वाटतें चंचल । आत्म्यांत विकार अज्ञानें तें ॥ ३ ॥
सानही अक्षर उपनेत्रें थोर । बुद्धीनें साकार तेंवी ब्रह्म ॥ ४ ॥
दर्पणें ज्यापरी प्रतिबिंब दिसे । विश्व भासवी ते बुद्धि तेंवी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्मावरी भास । विश्व हा सारांश ध्यानीं घ्यावा ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २०२ रा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. २९ समाप्त

अध्याय २०३ रा

१९३

पूर्वानुभव ते आठवती जीवा । तेणें तो इंद्रियांहूनि भिन्न ॥ १ ॥
जागृत्स्वप्नादींतें आत्मा साक्षिरूप । घेई उपभोग बुद्धि त्यांचा ॥ २ ॥
विषयां न जेंवी इंद्रियांचें ज्ञान । तेंवी इंद्रियां न आत्मबोध ॥ ३ ॥
वेदान्तवाक्योंचि होई आत्मबोध । पुढती वेदान्त तोही नासे ॥ ४ ॥
न दिसे म्हणोनि नसे ऐसें नाहीं । सूक्ष्मत्वें न येई प्रत्ययासी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे हिमालय-चंद्र । न कळतां समग्र, असेचि कीं ॥ ६ ॥

१९४

सामान्य प्रतीति येतांही आत्म्याची । यथार्थ नरासी बोध नसे ॥ १ ॥
लांछन चंद्राचें पाहूनिही बोध । नसे प्रतिबिंब पृथ्वीचें हा ॥ २ ॥
प्रत्ययेंही बोध अभिन्नत्वें नसे । शोकमोह त्याचे मिटतीचिना ॥ ३ ॥
तथापि तें ज्ञान व्यर्थ जात नाहीं । अभिन्नत्वें होई पुढती बोध ॥ ४ ॥
बीजरूपीं वृक्षा नसतां आकार । अस्तित्व साचार असेचि कीं ॥ ५ ॥
प्रत्यक्ष न सिद्ध सूर्यगति जरी । मानिताती परी ज्ञाते चल ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे प्रपंच तो दूरि । ब्रह्मचि जवळी ज्ञात्यालागीं ॥ ७ ॥

१९५

उपायावांचूनि साध्य नसे कांहीं । अज्ञानही जाई उपायेंचि ॥ १ ॥
जलचरां जाळें मृगाप्रति मृग । ज्ञानेंचि तें नाश अज्ञानाचा ॥ २ ॥
सर्पमार्ग जेंवी सर्पासीच कळे । आत्मा तें आकळे ज्ञात्यासीचि ॥ ३ ॥
सूक्ष्मबुद्धीनेंही उपाधि विशिष्ट- । चैतन्यावबोध शुद्धाचा न ॥ ४ ॥

तात्पर्य चैतन्य बुद्धीहूनि भिन्न । बुद्धिनाशेंही न नाश त्याचा ॥ ५ ॥
साधनराहित्यें अमेचा तो चंद्र । न दिसे यास्तव न म्हणा नष्ट ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बुद्धितादात्म्यानें । आत्माभिन्नत्वानें न दिसे तेंवी ॥

१९६

सूर्य मंडळस्थ चंद्र जैं पुढती । येई प्रत्ययासी अन्यदिनीं ॥ १ ॥
तैसा अन्य देहीं जातांचि प्रगटे । व्यक्ताव्यक्तता ते भासमात्र ॥ २ ॥
जन्मवृद्धिक्षय आभास ते तेंवी । क्षयवृद्धि जेंवी चंद्राप्रति ॥ ३ ॥
अंधकाराचा न योगचि चंद्रासी । वियोग तो त्यासी केंवी मग ॥४॥
तैसाचि संयोग-वियोग देहासी । कदाही आत्म्यासी घडेचिना ॥ ५ ॥
राहूची व्यक्तता, चंद्रसूर्ययोगें । तैसा देहयोगें प्रगट आत्मा ॥ ६ ॥
अमेनेंही चंद्रा नक्षत्रांचा योग । तैसा कर्मभोग आत्म्यातेंही ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आभास शाश्वतीं । तदाचि विश्वाची अवस्थिति ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २०३ रा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ३० समाप्त

अध्याय २०४ था

१९७

सुषुप्तिसमयीं आत्मा ज्ञानमय । तैसाचि तो होय मोक्षरूप ॥ १ ॥
इंद्रियविजय अवश्य त्यालागीं । निर्मल उदकीं प्रतिबिंब जैं ॥ २ ॥
तैसेंच इंद्रियें शांतता पावतां । बुद्धि आत्मरूपा पावतसे ॥ ३ ॥
अज्ञानें अविद्या तेणें मनःक्षोभ । इंद्रियें सहज पुढती क्षुब्ध ॥ ४ ॥
तेणें तीं विषयीं रंगतां न तृप्ति । जन्म-मरणप्राप्ति होई तेणें ॥ ५ ॥
पापक्षयें चित्त शांत होतां ज्ञान । सदा हें चिंतन वासुदेवा ॥ ६ ॥

१९८

विषयीं रंगतां इंद्रियें तें दुःख । होतां निर्विषय सुख लाभे ॥ १ ॥
मनाहूनि बुद्धि, बुद्धीहूनि आत्मा । त्याहूनि परमात्मा पलीकडे ॥ २ ॥
तेथूनीच सर्व उत्पत्ति विश्वाची । मन इंद्रियादि सकल जाणा ॥ ३ ॥
देहविषयादि त्यागेंचि कैवल्य । होतां सूर्योदय किरणें जेंवी ॥ ४ ॥
तैसा अंतरात्मा प्रवेशतां देहीं । किरण ते पाहीं इंद्रियज्ञान ॥ ५ ॥
त्यागें विषयांचा सुटे अभिलाष । परी ते संस्कार ज्ञानें जाती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे संस्कार, वासना । अथवा भावना एकरूप ॥ ७ ॥

१९९

मनोमय बुद्धि होतां सत्तामात्र । मन तें ब्रह्मांत लीन होई ॥ १ ॥
इंद्रियराहित्यें विषयराहित्य । अनुमान व्यर्थ जया ठाईं ॥ २ ॥
ऐशा ब्रह्मामाजी लय पावे बुद्धि । प्रक्रिया लयाची ऐकें आतां ॥ ३ ॥
संकल्पित सर्व पदार्थ मनांत । मन तें बुद्धींत, बुद्धि जीवीं ॥ ४ ॥
जीव ब्रह्मामाजी होतसे विलीन । सर्वांचें या ज्ञान एक ब्रह्म ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ज्ञानरूप ब्रह्म । शाश्वत तें जाण ज्ञान एक ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २०४ था तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ३१ समाप्त

अध्याय २०५ वा

२००

शारीर-मानस दुःखें योगा विघ्न । यास्तव चिंतन घडो त्याचें ॥ १ ॥
मानसदुःख तें ज्ञानें नष्ट होई । शारीर तें जाई औषधानें ॥ २ ॥
चिंतनत्यागेंचि दुःखाचा विनाश । ज्ञानाचें सामर्थ्य हेंचि असे ॥ ३ ॥
बालांसम दुःख चिंतूं नये कदा । अनित्य त्या भोगां इच्छूं नये ॥४॥
जानपद[१]दुःखें करूं नये शोक । आचरावा मार्ग गवसे तरी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दुःखप्रतिकार । विवेकानें थोर करिती सदा ॥ ६ ॥

२०१

जीवितामाजी या सुखाहूनि दुःख । निश्चयें अधिक परी तेथें ॥ १ ॥
सुखार्थ विषयीं जडे जरी प्रेम । अनिष्ट-मरण लाभे तरी ॥ २ ॥
सुखदुःखत्यागी तोचि ब्रह्मरूप । नसे शोकलेश तयालागीं ॥ ३ ॥
द्रव्या मागोमाग सदा येई दुःख । रक्षणीं न सौख्य, न श्रमें नाशें[२] ॥
अलंकार जेंवी धर्म सुवर्णाचा । मनही ब्रह्मयाचा तेंवी धर्म ॥ ५ ॥
इंद्रियसंबंधें विषयाकार त्या । प्रारब्धें योगाचा मार्ग लाभे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे योगाविण बुद्धि । रमे न कदापि ब्रह्मानंदीं ॥ ७ ॥

२०२

गिरिशृंगवाही उदकासमान । धांवूनियां मन विषयीं रमे ॥ १ ॥
परी यदा ज्ञान रेखा सुवर्णाची । उमटे निकर्षी तयापरी ॥ २ ॥
बुद्धिवृत्तिमाजी अभिव्यक्त होई । चांचल्य तें जाई विलया सर्व ॥३॥

१ सर्व प्रजेचें, २ नाशानें श्रमूं नकोस.

पाहिलें वा आलें पुढती जें तेंचि । दिसे मनाप्रति न दिसे अन्य॥४॥
यास्तव इंद्रियागोचर वस्तूचा । बोध न मनाचा विषय होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रथम इंद्रियें । झांकुनियां व्हावें संकल्पचि ॥ ६ ॥

२०३

संकल्परूप तें मन बुद्धीमाजी । करावें पुढती लीन यत्नें ॥ १ ॥
केवळ अस्तित्वरूपी एकाग्रता । पुढती लाभतां ब्रह्मलाभ ॥ २ ॥
सुषुप्तींत कार्यासवें त्या तन्मात्रा । पावती विनाशा जैशापरी ॥ ३ ॥
कार्यासवें बुद्धि अहंकाररूप । होतां न दूषित होई गुणें ॥ ४ ॥
ध्यानें तो सात्विक अहंकार जाण । प्रकृतींत लीन होत असे ॥ ५ ॥
पुढती प्रकृति लय पावे ब्रह्मीं । रंगो त्याचि ध्यानीं वासुदेव ॥ ६ ॥

२०४

अव्यक्त प्रकृतिपासूनि ज्या मी मी । अव्यक्ता त्या वर्णी ऐसा कोण ॥
कुंठित त्या स्थानीं वैखरी जाणूनि । निरंतर ध्यानीं मग्न व्हावें ॥२॥
मननें चिंतन शमादि स्वीकार । जातिधर्म थोर आचरावा ॥ ३ ॥
तैसेंचि वेदान्तश्रवण करावें । शुद्धचित्त व्हावें ऐशारीति ॥ ४ ॥
चित्तशुद्धि होतां ब्रह्मबोधइच्छा । करील तयाचा कार्यभाग ॥ ५ ॥
मग अंतर्बाह्य ब्रह्मरूप होई । विलयासी जाई भेद सर्व ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अग्नि इंधनांत । तेंवी सद्बुद्धींत प्रगटे ब्रह्म ॥ ७ ॥

२०५

कारण अज्ञानीं इंद्रियें सकळ । सुषुप्तींत लय पावताती ॥ १ ॥
तुरीयेंत तेंवी उपाधिरहित । चिन्मय आनंदरूप ब्रह्म ॥ २ ॥
अज्ञानें यापरी चिदाभासजीव । अज्ञानाचा क्षय होतां नष्ट ॥ ३ ॥
कर्मप्रवृत्त त्या जीवां लाभे स्वर्ग । विश्व चैतन्यांत मायायोगें ॥ ४ ॥
उत्पत्तीचा ऐसा बीजांकुरन्याय । अव्यक्त तें होय व्यक्त सदा ॥ ५॥
अत्यंत कल्याण होतसे धर्मानें । तैसेंचि अधर्मे अकल्याण ॥ ६ ॥
वासनायुक्ताचा प्रकृतींत लय । विरक्त तो होय ब्रह्मरूप ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्मरूपता हे । योगबळें पावे जीव यत्नें ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २०५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ३२ समाप्त

अध्याय २०६ वा

२०६

निरोधितां चित्त मण्यांमाजी सूत्र । तेंवी जगदीश्वर प्रत्यया ये ॥१॥
सूत्रांत सुवर्ण, प्रवाळ, मौक्तिक । तैसे धेनु, अश्व कर्मासम ॥ २ ॥
जया शरीरानें घडेल जें कर्म । त्याचि देहें जाण भोग त्याचे ॥ ३ ॥
भूमी जरी एक, बीजासम रस । कर्मासम देह तैसे भिन्न ॥ ४ ॥
वस्तुज्ञानें इच्छा, पुढती प्रयत्न । फललाभ जाण क्रिया होतां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे फललाभ कर्में । अहं प्रत्ययानें कर्म घडे ॥ ६ ॥

२०७

अहंप्रत्यय तो जाण जीवरूप । ग्रंथि जो चिज्जड जीव भासे ॥ १ ॥
जीव, देह, अहंकारचतुष्टय । तेंवी कर्मक्षय होतां ज्ञान ॥ २ ॥
ब्रह्माकारवृत्ति होई जें चित्ताची । होतसे तदाचे साक्षात्कार ॥ ३ ॥
सर्वत्र तें परी योग्यांसीच ज्ञात । विषयीं आसक्त जाणती न ॥ ४ ॥
एकाहूनि एक भूतें तीं व्यापक । मन तें व्यापक नभाहूनि ॥ ५ ॥
मनाहूनि बुद्धि बुद्धीहूनि काल । कालाहूनि थोर परब्रह्म ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे आदि-अंतहीन । दुःखातीत जाण ब्रह्म एक ॥ ७ ॥

२०८

व्यापक तें परी लिप्त न गुणांत । होई जो निवृत्त तया कळे ॥ १ ॥
सहजसिद्ध तें नसे यत्नसाध्य । द्वंद्वांचा संपर्क नसे तया ॥ २ ॥
सहज लोलुप असावे त्या जीव । विपरीत भाव परी देवें ॥ ३ ॥
उपायज्ञान त्यां नसे, योगसिद्धि । लाभतांही वृत्ति विषयीं धांवे ॥४॥
नित्य विषयांच्या दर्शनें तीं इच्छा । योग्यातेंही ऐसा प्रवाह हा ॥
ब्रह्माकारवृत्ति होतां ब्रह्मप्राप्ति । योगीही चिंतिती विषय देवें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे प्रयत्नाचें मूळ । कृपाचि केवळ ईश्वराची ॥ ७ ॥

२०९

जागृत्स्वप्नादि हें सर्व मनोमय । येईल प्रत्यय शुद्धाचित्तें ॥ १ ॥
काष्ठस्थ अग्नीतें वायु न चेतवी । आशाबद्धा तेंवी त्यागी ईश ॥२॥
जीवा व्यक्तता ते दाविते सुषुप्ति । व्यक्तता तयाची भासमात्र ॥ ३ ॥
यास्तव जीवत्व मानूं नये नित्य । होईल तो मुक्त निश्चयानें ॥ ४ ॥

पृथ्वीविनाशाची कल्पना न होई । परी ते प्रलयीं नाश पावे ॥५॥
वासुदेव म्हणे अशक्य जें वाटे । सहज तें होतें कृपालेशें ॥ ६ ॥

२१०

वाय्वाघातें वस्तु पडतां प्रवाहीं । हेलकावे खाई उदकामाजी ॥ १ ॥
परी पैलतीरीं वायूचि तियेसी । नेई तेचि गति कर्मे घडे ॥ २ ॥
उदयें किरण व्यापिती भूमीतें । त्रस्त होतां त्यांचें निवारण ॥ ३ ॥
तैसा जीवभाव इंद्रियसंबंधें । अहंकारनाशें ब्रह्मभाव ॥ ४ ॥
अविचल ऐशा ब्रह्मज्ञानें मोक्ष । लागो हाचि ध्यास वासुदेवा ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २०६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ३३ समाप्त

अध्याय २०७ वा

२११

धर्म म्हणे ताता, नारायणरूप । कथावें तात्विक मजलागीं ॥ १ ॥
निवेदिती भीष्म परशुरामादि । ज्ञाते निवेदिती कथितों तेंचि ॥ २ ॥
निर्मूनि तो पृथ्वी राहिला उदकीं । मनासवें निर्मी संकर्षणा ॥ ३ ॥
सर्वाधाराच्या त्या नाभींतूनि ब्रह्मा । तमें होई धर्मा, मधुदैत्य ॥ ४ ॥
घोरकर्म्यासी त्या वधिलें म्हणून । तो मधुसूदन नाम त्याला ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मरीच्यादि सप्त । ब्रह्मयाचे मानस पुढती पुत्र ॥६॥

२१२

मरीचीपुत्र तो कश्यप प्रसिद्ध । दक्ष कन्या त्यास अर्पी तेरा ॥ १ ॥
पुढती दक्षानें आपुल्या कनिष्ठ । अर्पियेल्या दश कन्या धर्मा ॥ २ ॥
वसु विश्वेदेव साध्य तेंवी रुद्र । तैसे मरुत्वत पुत्र धर्मा ॥ ३ ॥
पुनरपि दक्षें सप्तविंशति त्या । कन्या अर्पियेल्या चंद्राप्रति ॥ ४ ॥
पशुपक्षी वृक्ष दक्षकन्यापुत्र । द्वादश आदित्य अदितीलागीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दनु-दितीपुत्रां । जिंकूनि विबुधां रक्षी बहु ॥ ६ ॥

२१३

पुढती विष्णूनें निर्मियेला काल । ब्राह्मण, क्षत्रिय आदि तेंवी ॥ १ ॥
मातृगण रुद्र यम कुबेरादि । निर्मूनि ब्रह्मयासी प्रमुख केलें ॥ २ ॥
यथेच्छ आयुष्य होतें कृतयुगीं । होई तें संतती संकल्पेंचि ॥ ३ ॥

त्रेतायुगीं स्पर्शें संततीचा लाभ । पुढती स्त्री-पुरुष संबंधानें ॥ ४ ॥
सृष्टीचा या सर्वसाक्षी श्रीविष्णूचि । वासुदेव कथी पुढती ऐका ॥

२१४

दक्षिणापथींचे आंध्र, शबर, गुह । चूचुक, पुलिंद, मद्रकही ॥ १ ॥
नरकगामी ते, गांधार किरात । बर्बर कांबोज यौनोत्तरीं ॥ २ ॥
पापी हे हिंडती पृथ्वीवरी दुष्ट । चांडाळसदृश बक, गृध्र ॥ ३ ॥
त्रेतायुगारंभीं प्रजा हे वाढली । युगसंधिकालीं कलह नृपां ॥ ४ ॥
ऐसी निर्मियेली सृष्टि हे विष्णूनें । प्रत्यक्ष कृष्ण हें विष्णुरूप ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे नारदोक्त वृत्त । कथितो धर्मास सदय भीष्म ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २०७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ३४ समाप्त

अध्याय २०८ वा

२१५

धर्म म्हणे ताता, अधिप प्रजेचे । ऋषि तैं दिशांचे कथन करीं ॥ १ ॥
निवेदिती भीष्म मरीच्यादि सप्त । प्राचीनबर्हि तो वेदरूप ॥ २ ॥
प्रचेते त्या दश, दक्ष तयां एक । 'दक्ष' 'क' तयास नामें दोन ॥ ३ ॥
अत्रिपुत्र सोम अर्यमा सपुत्र । संरक्षी लोकांस निज तेजें ॥ ४ ॥
शशबिंदूप्रति पुत्र एक कोटि । वृष्णिकुलोत्पत्ति याचि वंशीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रजापतिवृत्त । संक्षेपें समस्त कथिलें ऐसें ॥ ६ ॥

२१६

कश्यपाचे पुत्र भगादि आदित्य । दस्र तैं नासत्य अश्विनीचे ॥ १ ॥
देवपितर यां लेखियेलें पूर्वी । पुत्र त्वष्टयालागीं विश्वरूप ॥ २ ॥
अनादि ते जाणें एकादश रुद्र । वसु ते प्रसिद्ध कथिले पूर्वी ॥ ३ ॥
शील यौवन तैं सिद्धादि देवता । गण हा पूर्वीचा निवेदिला ॥ ४ ॥
आदित्य क्षत्रिय, मरुत् वैश्य तैसे । कुमार शूद्र ते म्हणती देव ॥ ५ ॥
आंगिरसांलागीं ब्राह्मण गणावें । वासुदेव द्यावें लक्ष म्हणे ॥ ६ ॥

२१७

यवक्रीतादि ते सप्तर्षि पूर्वेसी । जाणें उन्मुचादि दक्षिणेसी ॥ १ ॥
उषंग्वादि ऋषि पश्चिमेसी जाणें । उत्तर दिशेतें आत्रेयादि ॥ २ ॥

१ यौन आदि उत्तरेकडे

स्मरणही यांचें होई कल्याणद । संकीर्तनें पाप नष्ट यांच्या ॥ ३ ॥
दिशांतेंही त्यांच्या वंदितां प्रेमानें । लाभती सुखानें धर्म्य भोग ॥४॥
वासुदेव म्हणे देवता-ऋषींचें । स्मरण नरातें पुण्यदाई ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २०८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ३५ समाप्त

अध्याय २०९ वा २१८

धर्म म्हणे ताता, श्रीकृष्णचरित्र । ऐकावें समग्र हेचि इच्छा ॥ १ ॥
तिर्यग्योनीमाजी कासया अवतार । कथावें तें सर्व मजसी आतां ॥
ऐकूनियां भीष्म मार्कंडेयाश्रमीं । काथिलें मुनींनीं काथिती तेंचि ॥३॥
पूर्वी असुरांनीं गांजिलें देवांसी । बुडाली धरित्री पातकानें ॥ ४ ॥
तदा ब्रह्मदेवा प्रार्थिलें देवांनीं । धीर धरा मनीं म्हणे ब्रह्मा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वराहरूपानें । प्रगटेल म्हणे ब्रह्मा देवां ॥ ६ ॥

२१९

ऐकूनि तें देव संतुष्ट जाहले । वराहें तैं केलें दिव्यकर्म ॥ १ ॥
असुरांवरी तो चालूनियां जातां । प्रतिकार त्यांचा होई बहु ॥ २ ॥
एकत्र होऊनि लढती असुर । चाले नच बळ परी त्यांचें ॥ ३ ॥
गर्जना तैं केली योगाधिपतीनें । कांपले धाकानें देव तदा ॥ ४ ॥
ब्रह्मदेव देई धैर्य तयांप्रति । म्हणे हा विष्णूचि तुमचा त्राता ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे तिर्यग्योनीमाजी । जन्मूनि देवांसी रक्षी विष्णु ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २०९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ३६ समाप्त

अध्याय २१० वा २२०

धर्म म्हणे कथा मोक्षाचा उपाय । गंगेचा तनय कथन करी ॥ १ ॥
ज्ञाता एक शिष्य गुरूतें विचारी । कोठूनि संसारीं आलों सांगा ॥२॥
कारणही त्याचें कथावें मजसी । कारणें एकाचि, भेद कैसा ॥ ३ ॥
सामान्य विशेष धर्म कां कथिले । कासयासी केले भेद ऐसे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि शिष्योक्ति । निवेदी तयासी गुरु ऐका ॥ ५ ॥

२२१

सर्वश्रेष्ठ शिष्या, अध्यात्मविचार । रक्षिला हा थोर वेदांनींचि ॥१॥
विप्र-क्षत्रियांनीं विप्र-क्षत्रियांसी । वैश्यांनीं वैश्यांसी शूद्रें शूद्रां-॥२॥

कथावा हा बोध कल्याणकारक । कालचक्र रूप विष्णूचेंचि ॥३॥
वेदशास्त्रादिक पुनरपि तेंचि । होई युगायुगीं पुनःपुनः ॥ ४ ॥
प्रलयकालीं जे अंतर्हित वेद । प्राप्त सेतिहास ऋषींप्रति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वेदज्ञाता ब्रह्मा । जाणितो वेदांगां बृहस्पति ॥ ६ ॥

२२२

गांधर्वविद्या ते कथिली नारदें । निवेदिलें शुक्रें नीतिशास्त्र ॥ १ ॥
धनुर्विद्याज्ञान भरद्वाजांप्रति । गार्ग्य देवर्षींची कथा जाणे ॥ २ ॥
चिकित्साशास्त्र तें कृष्णात्रेय जाणे । न्यायादिक शास्त्रें रचिती मुनि
युक्ति वेदवाक्य आचारें सगुण । कथियेलें ब्रह्म सकलांसी ॥ ४ ॥
केवळ उपास्यज्ञान तें ऋषींसी । जाणितो विष्णूचि आदितत्व ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भवनिवारक । जाणती औषध श्रेष्ठ ज्ञाते ॥ ६ ॥

२२३

आत्मप्रेरणेनें विश्वाची उत्पत्ति । कारण तयासी धर्माधर्म ॥ १ ॥
विश्वचक्र ऐसें भ्रमतें यापरी । सहस्र ज्यापरी दीप दीपें ॥ २ ॥
तैसीं असंख्यात प्रकृतींचीं कार्यें । नाश अनंतत्वें नाहीं तिज ॥ ३ ॥
अव्यक्त तें महत्तत्व अहंकार । पुढती विकार पंचभूतें ॥ ४ ॥
ऐसी अष्टधा ते प्रकृति जाणावी । मन विषयादि पुढती सोळा ॥५॥
वासुदेव म्हणे शब्द स्पर्शादिक । ज्ञात्यालागीं एक मनचि ते ॥ ६ ॥

२२४

षोडश विकार देवता त्या जाणें । चिंतिती ब्रह्मयातें त्याचि मार्गें ॥
पंचविषय तीं पंचभूतकार्यें । वास्तव्य तयांतें प्राणिमात्रीं ॥ २ ॥
प्रकृतीचा गुण सत्व, त्यांचें मन । उपाधि तो जाण परमात्म्यासी ॥
प्रकृतीसी पर ऐसा परमात्मा । व्यापी सर्व देहां पुरुष तेणें ॥ ४ ॥
प्रकाशरूपाचि सान-थोर दीप । आत्मा ज्ञानरूप सर्वदा तें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे देवता तें द्वार । आत्माचि सकळ क्रियाधार ॥ ६ ॥

२२५

मंथनें प्रगटे अग्नि जैं काष्ठींचा । योगें तें आत्म्याचा साक्षात्कार ॥
अज्ञानें देहाचा संबंध तो नित्य । जल आणि पात्र नदींचें जैं ॥ २ ॥
स्वप्नामाजी जेवीं इंद्रियादि तींच । अन्यदेहीं तोच आत्मा तेंवी ॥३॥

पूर्व देहत्याग, लाभ नूतनाचा । कर्मेंचि तयाच्या होत असे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अन्यदेहलाभ । कैसा घडे ऐक म्हणती गुरु ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २१० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ३७ समाप्त

अध्याय २११ वा २२६

जारज स्वेदज उद्भिज अंडज । देहांचा या लाभ नकळे कैंवी ॥ १ ॥
देहान्तरज्ञाना नसे त्या साधन । अव्यक्तचि जाण म्हणतां मन ॥ २ ॥
नाश उत्पत्ति ते यापरी अव्यक्त । परी व्यक्तरूप जन्मतांचि ॥ ३ ॥
बीजांत अव्यक्त यद्यपि अश्वत्थ । परी तो प्रत्यक्ष व्यक्त होतां ॥ ४ ॥
चुंबकासी लोहस्पर्शें जैं जाऊन । तेंवी पूर्वकर्म देहाप्रति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मिथ्या हें तादात्म्य । ज्ञात्याज्ञात्या सम व्यवहारीं ॥६॥

२२७

ज्ञानैकनिवर्त्य मनोजन्य ऐसें । कळे तादात्म्य तें वासनेनें ॥ १ ॥
जीव स्वरूपासी वासनासंपर्क । होतांचि कर्मास कारण तो ॥ २ ॥
देहतादात्म्य तें दृढ ऐशा मार्गें । कर्में वासना ते तेणें कर्म ॥ ३ ॥
वासनेनें कर्म कर्मानें वासना । चक्र ऐसें जाणा भ्रमण पावे ॥ ४ ॥
अज्ञानकारणीं देहरूपी कार्य । अदृष्टसंयुक्त काल करी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सकळां कारण । जाणा एक कर्म सहेतुक ॥ ६ ॥

२२८

लिंगदेहासवें अन्यदेहीं जीव । जाई परी लिप्त तेणें न तो ॥ १ ॥
वास्तविक नसे संबंध तयांचा । परी तादात्म्याचा ध्यास जीवा ॥२॥
स्वरूप अज्ञान यास्तव तयासी । अज्ञाननिवृत्ति करी वेद ॥ ३ ॥
राजसूयालागीं मूर्धाभिषिक्तत्व[1] । साधका अवश्य तेंवी कर्म ॥ ४ ॥
यज्ञफललाभ परी अन्य देहीं । मुमुक्षूसी तेंवी पुढती त्याग ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दग्धबीजासम । ज्ञानदग्धकर्म नुगवे जन्में ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २११ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ३८ समाप्त

अध्याय २१२ वा २२९

कर्मनिष्ठांप्रति रुचे जेंवी कर्म । एक मात्र ज्ञान ज्ञात्यांसी तैं ॥ १ ॥

१ राजेपणा

वेदज्ञ या जनीं असती दुर्लभ । त्याह्नि दुर्लभ क्रियावंत ॥ २ ॥
निवृत्तिमार्गाचि इच्छिती सज्जन । अनासक्त कर्म इष्ट तयां ॥ ३ ॥
निवृत्तिमार्गाचि मोक्षद जाणावा । लोभादिक गोवा प्रवृत्तीनें ॥ ४ ॥
आटावितांही जैं सलोह कनकीं । प्रकाश न तेंवी मलिन चित्तीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे काम क्रोध लोभ । करिती विनाश विषयसंगें ॥ ६ ॥

२३०

क्रोध हर्ष तेंवी विषाद गुणांचे[1] । परस्परांही ते उत्पादक ॥ १ ॥
गुणकार्यदेहीं वर्ततां हे, दोष । नसेचि कोणास स्वभावत्वें ॥ २ ॥
आसक्तीनें पंचभूतात्मक देहीं । तादात्म्य तें येई मूढांप्रति ॥ ३ ॥
मृण्मय गृहासी मृत्तिकालेपन । आवश्यक जाण रक्षणार्थ ॥ ४ ॥
तैसें पार्थिवासी पार्थिव हें अन्न । रक्षणार्थ जाण आवश्यक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे रोग्यासी औषध । तैसें रक्षणार्थ अन्न द्यावें ॥ ६ ॥

२३१

सत्य शुचिता तैं रुजुत्व वैराग्य । संयम स्वाध्याय शौर्य धैर्य ॥ १ ॥
शांति बुद्धि क्षमा विवेक तैं ज्ञान । गुण हे सामान्य सकलांसी ॥२॥
इच्छील जो शांति अदीनत्वें तेणें । जिंकावीं इंद्रियें महायत्नें ॥ ३ ॥
गुणमोहितांसी जन्म वारंवार । अज्ञानविचार इष्ट तयां ॥ ४ ॥
त्या त्या स्थळीं काळीं तें तें कार्य काल । तेंवी अहंकार घडवी कर्म
वासुदेव म्हणे मोहकारी तम । सत्वें जडे प्रेम रजें दुःख ॥ ६ ॥

२३२

प्रसन्नता, तृप्ति, संशयनिरास । धैर्य, स्मृति सत्ववैशिष्ट्य हें ॥१॥
काम, क्रोध, लोभ, मोह तैं प्रमाद । रजाचें वैशिष्ट्य भीति ग्लानि ॥
निकृष्टाचें प्रेम, विषाद तैं शोक । दर्प, अनार्यत्व तमोगुणें ॥ ३ ॥
उपरोल्लेखित तैसे अन्य दोष । ध्यावें न्यूनाधिक्य नित्य ध्यानीं ॥४॥
वासुदेव म्हणे प्रतिदिनीं ऐसा । अभ्यास साधावा साधकानें ॥ ५ ॥

२३३

धर्म म्हणे दोष जाती जे मनानें । शिथिल बुद्धीनें होती तेंवी ॥ १ ॥
नाशितांही बाधा वारंवार ज्यांची । होई तेही कथीं दोष ताता ॥२॥

१ त्रिगुणांचे

घडतांही ज्यांची बाधा नसे कांहीं । निवेदावे तेही दोष मातें ॥ ३ ॥
हेतुपूर्वकचि बलाबल ज्यांचें । जाणावें, ते मातें कथीं दोष ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे प्रश्न हे चिंतील । साधक होईल सिद्धचि तो ॥ ५ ॥

२३४

निवेदिती भीष्म अज्ञानासमेत । छेदितां हे दोष मुक्ति लाभे ॥ १ ॥
लोहशृंखलेतें लोहशस्त्र छेदी । स्वयेंही नष्टचि होई जेंवी ॥ २ ॥
ध्यान संस्कृत तैं बुद्धि दोषांप्रति । नासूनि स्वयेंही नष्ट होई ॥ ३ ॥
गुणसंगें जीव बंधन पावतो । शुद्धसत्व होतो उपकारक ॥ ४ ॥
रजतमत्याग यास्तव करावा । केवळ वरावा सत्वगुण ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शुद्धसत्व ऐसा । मित्र साधकाचा मोक्षदाता ॥ ६ ॥

२३५

चित्तविशुध्यर्थ यज्ञादिक कर्मैं । निंद्य तीं हिंसेनें म्हणती कोणी ॥१॥
जपादिक मार्गें कथिती ते शुद्धि । परी यज्ञानेंचि वैराग्य तें ॥ २ ॥
शमादिक शुद्धधर्माचें पालन । होतसे म्हणून यज्ञ श्रेष्ठ ॥ ३ ॥
राजस अधर्मैं द्रव्यमात्र इच्छी । लोभ-क्रोधवृद्धि हिंसा तपें ॥ ४ ॥
निद्रा तंद्रा नित्य तामस जनांतें । निर्दोषत्व येतें सात्विकांसी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सत्वें श्रद्धा, विद्या । तेंवी मोक्ष हाता सात्विकांच्या ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २१२ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ३९ समाप्त

अध्याय २१३ वा

२३६

धर्मा, रज तमें विपरीत ज्ञान । मायेनें आच्छन्न ज्ञान होई ॥ १ ॥
तेणें क्रोध, क्रोधें काम, लोभ, मोह । तेणें अहंभाव दृढ होई ॥ २ ॥
अहंकारें क्रिया, कर्मैं स्नेह जाण । स्नेहेंचि दारुण शोक घडे ॥ ३ ॥
पापपुण्यें जन्म-मरणसंभव । मलांत वास्तव्य गर्भामाजी ॥ ४ ॥
जन्म पावतांचि कामक्रोधमग्न । जातसे होऊन पुनरपि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आंवरूनि काम । व्हावें सावधान स्वहितास्तव ॥ ६ ॥

२३७

अनिवार मोह नृपा, हा स्त्रियांचा । जीवासी अविद्या, पुरुषांसी या-॥

१ रजतमरहित केवळ सत्वगुण.

वंधनकारक, जाणूनियां त्याग । स्त्रियांचा. हितार्थ करणें योग्य ॥
भयप्रदरूपें कृत्याचि त्या होती । तत्काळ मोहिती अविवेक्यासी ॥
कार्यभूत आदि शक्ति इंद्रियांची । रजोगुणरूपी स्त्रीरूपी ते ॥ ४ ॥
प्रेमरूपिणी ते प्रेमबीजें विश्व । निर्मूनि अतर्क्य लीला करी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्वदेहोत्पन्नही । कृमी त्याज्य पाहीं तेंवी पुत्र ॥ ६ ॥

२३८

स्वभावें वा कर्मे शुक्र शोणितेंसी । पुत्र, घर्मादिकीं कृमि जेंवीं ॥ १ ॥
समान तयांसी लेखूनि ज्ञात्यानें । पूर्ण विवेकानें उपेक्षावें ॥ २ ॥
सत्व रजामाजी, रज ता तमांत । तम तें अध्यस्त ज्ञानावरी ॥ ३ ॥
बुद्धि अहंकार ओळखावे तमें । कारण देहातें तेचि होती ॥ ४ ॥
सकार्य अज्ञाना जीव अधिष्ठान । भवचक्रा कर्म, काल, मूळ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सूक्ष्मदेहें स्वप्न । वासनेनें जन्म तेंवी जीवा ॥ ६ ॥

२३९

पुढती गर्भात पूर्व संस्कारानें । विषयस्मरणें इंद्रियलाभ ॥ १ ॥
ऐसीं हीं इंद्रियें दुःखद सर्वदा । यास्तवचि सदा दुःखवृद्धि ॥ २ ॥
मरणेंही दुःख वृद्धीचि पावतें । यास्तव दुःखातें निरोधावें ॥ ३ ॥
इंद्रियांची धांव खुंटे निरिच्छेनें । सहजचि तेणें दुःखनाश ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे इंद्रियवियोग । विवेकें ज्या, भोग चुकती त्याचे ॥५॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २१३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ४० समाप्त

अध्याय २१४ वा

२४०

धर्मा, शास्त्रमार्गें शमादि साधितां । श्रेष्ठ गति हाता येई तुझ्या ॥
सर्व प्राण्यांमाजी मानव तो श्रेष्ठ । ज्ञाता विप्रश्रेष्ठ तयांमाजी ॥ २ ॥
अंधासम अज्ञ भोगी मार्गीं क्लेश । यास्तव वरिष्ठ ज्ञाता जगीं ॥ ३ ॥
शास्त्रानुरोधानें इच्छेसम धर्म । वरिती सुजन उद्धारार्थें ॥ ४ ॥
काया वाचा मनः शुद्धि, क्षमा सत्य । इंद्रियविजय ईशस्मृति ॥५॥
ऐशा गुणाविण व्यर्थ सर्व धर्म । म्हणे 'हेंचि' वर्म वासुदेव ॥ ६ ॥

२४१

ब्रह्मसाधक तें ब्रह्मचर्य श्रेष्ठ । वासनासंबंध तेणें तुटे ॥ १ ॥

निर्दोषता त्याची मनोमय स्थिति । केवळ ज्ञानाचि रूप त्याचें ॥ २ ॥
ब्रह्मचर्य ऐसें पाळी जो उत्तम । ब्रह्मलोकीं स्थान तयाप्रति ॥ ३ ॥
मध्यमातें देवलोकीं घडे वास । सुविद्य विप्रत्व अधमालागीं ॥ ४ ॥
ब्रह्मचर्यव्रत अत्यंत कठिण । नित्य रजोगुण निग्रहावा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्त्रियांचें वर्णन । विवस्त्रदर्शन त्याज्य जाणा ॥ ६ ॥

२४२

कृच्छ्र प्रायश्चित्त होतां ते आसक्ति । होतां वीर्यवृद्धि उदकीं जावें ॥
जलावगाहन स्वप्नावस्था होतां । तैसेंचि तें त्रिधा अघमर्षण ॥ २ ॥
आंतडीं ज्यापरी बंधनें देहाचीं । देह तैं आत्म्यासी बंधन हें ॥ ३ ॥
अन्नरसें होई सप्तधातुवृद्धि । तेणें इंद्रियांसी बळ चढे ॥ ४ ॥
हृदयस्थ नाडी मनोवहा नामें । आकर्षी वीर्यातें संकल्पानें ॥ ५ ॥
जननेंद्रियासी नेऊनि पोंचवी । वासुदेव गाई पुढती ऐका ॥ ६ ॥

२४३

मनोवहेच्या सान्निध । शिरा वाहती बहुत ॥ १ ॥
तेज देती त्या नेत्रांसी । सर्व शरीर व्यापिती ॥ २ ॥
घृतदुग्धाच्या मंथनें । वीर्य तेंवी संकल्पानें ॥ ३ ॥
तेणें स्वप्नसंकल्पेंही । वीर्य उत्सर्जन होई ॥ ४ ॥
रस, नाडी, तैं संकल्प । ऐसीं कारणें वीर्यास ॥ ५ ॥
इंद्रदेवता तयासी । तेणें इंद्रिय बोलती ॥ ६ ॥
शुक्र संकराकारण । ज्ञानें मुक्ति याच्या जाण ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वीर्य । ब्रह्मचर्याचा आधार ॥ ८ ॥

२४४

योगबळें जोडे निर्विकल्प स्थिति । सुषुम्नेंत अंतीं न्यावा प्राण ॥ १ ॥
प्रणव जपानें वासनाविनाश । मन ब्रह्मरूप होत असे ॥ २ ॥
मनाचि संसार जाणूनि मनासी । सात्विक कर्मेंचि संयोजावें ॥ ३ ॥
अदृष्टें तारुण्यीं संपादित ज्ञान । वार्धक्यीं मलिन होत असे ॥ ४ ॥
परिपक्व बुद्धि होतां अदृष्टानें । संकल्पनाशानें मनोनाश ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसा दोषहीन । संसारबंधनमुक्त होई ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २१४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ४१ समाप्त

अध्याय २१५ वा

२४५

जन्म-जरादुःखें व्यापिले हे जन । आसक्ति त्यागून मुक्त व्हावें ॥ १ ॥
कायावाचामनें शुद्धता राखावी । सर्वथा त्यजावी अहंकृति ॥ २ ॥
शांतिज्ञानें भिक्षावृत्ति स्वीकारूनि । निरपेक्ष जनीं संचरावें ॥ ३ ॥
भूतदयेनेंही होऊं नये बद्ध । कर्मफल जग ध्यानीं घ्यावें ॥ ४ ॥
शुभाशुभ कर्मा फल नियमानें । यास्तव सत्कर्में नित्य व्हावीं ॥ ५ ॥
अहिंसा सत्य तें सरलत्व क्षमा । दक्षता हीं जनां शुभ कर्में ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐशामार्गें जातां । सर्वदा सुखाचा लाभ घडे ॥ ७ ॥

२४६

ज्ञानें निग्रहावें मन । न घडो अनिष्ट चिंतन ॥ १ ॥
धरूं नये अशुभ इच्छा । यत्नें आंवरोनि चित्ता ॥ २ ॥
प्रयत्नासी येई फळ । अचुक यत्नें मना स्थैर्य ॥ ३ ॥
श्रवणें साधनाची गोडी । लागे, असावें हें चित्तीं ॥ ४ ॥
धर्माची ते गति सूक्ष्म । व्हावें निर्मळ वचन ॥ ५ ॥
सत्य-अहिंसासंयुक्त । तेंही वदावेंचि अल्प ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वाणी । बद्ध न करो बंधनीं ॥ ७ ॥

२४७

वैराग्य वाणल्या निश्चित बुद्धीनें । आपुलें कथावें पापकर्म ॥ १ ॥
अशुभ कर्माचा उच्चारानें नाश । प्रवृत्तीनें दुःख आदि अंतीं ॥ २ ॥
यास्तव इंद्रियनिग्रह करावा । मन वाचा काया आंवरूनि ॥ ३ ॥
चोरूनियां मेषमांस, भयें मार्ग । चुकूनि तस्कर भ्रमती वनीं ॥ ४ ॥
जाणूनि संकट त्यागिती ते मांस । कर्माचा संन्यास तेंवी घडो ॥५॥
वासुदेव म्हणे अंतर्मुखवृत्ति । परिपक्व बुद्धि करूनि तारी ॥ ६ ॥

२४८

निःशंकमनें ज्या निर्व्यापारस्थिति । रमे तो एकांतीं विषयत्यागें ॥१॥
अल्पाहारी तपोनिष्ठ जितेंद्रिय । ज्ञानें क्लेशबीज नष्ट करी ॥ २ ॥
योगमग्न संयमी जो बुद्धिमान । पावे ब्रह्मज्ञान प्रयत्नें तो ॥ ३ ॥
अंतीं ज्ञानजन्य तेही बुद्धिवृत्ति । आंवरावी शांति धरूनि मनीं ॥ ४ ॥

ऐशा साधकासी इंद्रियदेवता । भेटती आनंदा काय तोटा ॥ ५ ॥
तोही सत्वगुण पुढती विलीन । होतां परब्रह्मरूप ज्ञाता ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे योगसाधनीं जे । वृत्ति तेंचि लाभे फल योग्या ॥ ७ ॥

२४९

धान्यकण, पक्कमाष, यवचूर्ण ! सत्तु फळें जाण मुळें तेंवी ॥ १ ॥
अनुकूल देश-कालही चिंतूनि । रमावें साधनीं दक्षतेनें ॥ २ ॥
उपाधिरूपानें ज्ञानासी अज्ञान- । संबंध जाणून ध्यावा मनीं ॥ ३ ॥
अज्ञान तें ऐसें सर्वावस्थांमाजी । नाशी अज्ञानासी ज्ञान एक ॥ ४ ॥
जीव ब्रह्मभेद ऐक्यही ज्या कळे । ब्रह्म त्या आकळे सम शुद्ध ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जरा मृत्यु काल । जिंकी तो अचल ब्रह्म होई ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २१५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ४२ समाप्त

अध्याय २१६ वा

२५०

निर्दोष त्या ब्रह्मस्थितीसी जो इच्छी । त्याज्य तयालागीं प्रथम निद्रा
निद्रेमाजी येई स्मरणावृत्तित्व । रज-तमव्याप्त तेणें होई ॥ २ ॥
यास्तव ज्ञानाची इच्छा जयाप्रति । जागरण त्यासी सदा योग्य ॥ ३ ॥
परब्रह्मीं ज्याचें प्रवेशलें चित्त । जागरण त्यास सर्वकाल ॥ ४ ॥
पुशिताती कोणी स्वप्नीं देहयुक्त । भोगिताती भोग कैसे जीव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रश्नासी या हरि । प्रत्युत्तर करी कथिती तेंचि ॥ ६ ॥

२५१

कुंठित व्यापार श्रांत इंद्रियांचे । होती न मनातें परी स्थैर्य ॥ १ ॥
तीव्र मनोरथ जेंवी जागृतींत । भासती प्रत्यक्ष तैसें स्वप्न ॥ २ ॥
अनेक जन्मींचे संस्कार जागृत । होतां मन रूप तैसें घेई ॥ ३ ॥
सत्वादिक गुणें वात पित्त कफ । होऊनि प्रक्षुब्ध धरिती रूपें ॥ ४ ॥
योगबळेंचि हे स्वप्नवृत्ति नासे । कल्पनाविनाशें स्वप्ननाश ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शुद्ध ज्याचें चित्त । इच्छी आत्मबोध तोचि एक ॥ ६ ॥

२५२

शुद्धचित्तें घडे देवतासान्निध्य । वासनास्वरूप चित्त ध्यानें ॥ १ ॥
तमोगुणनाशें वासनाविनाश । प्रगटे प्रकाश सूर्यासम ॥ २ ॥

अज्ञानउपाधि सुटतां जीवांची । ब्रह्मपद त्यासी प्राप्त होई ॥ ३ ॥
रज-तमोमय असुर जाणावे । देव ते जाणावे सत्वरूपें ॥ ४ ॥
गुणातीत ब्रह्म शुद्धचित्तांप्रति । लाभतें हें चित्तीं असो सदा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विषयनिवृत्ति । साधन एकचि ब्रह्मभावा ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २१६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ४३ समाप्त

अध्याय २१७ वा

२५३

सुषुप्ति स्वप्न तैं सगुण निर्गुण । जाणे न त्या ज्ञान युधिष्ठिरा ॥ १ ॥
दृश्य तोचि मृत्यु आत्मा मृत्युशून्य । प्रवृत्तिकथन केलें वेदें ॥ २ ॥
निवृत्तिमार्गचि जाण ब्रह्मरूप । मननशीलास मोक्ष लाभे ॥ ३ ॥
तत्वविचारार्थ प्रकृति पुरुष । तेंवी जीवबोध आवश्यक ॥ ४ ॥
प्रकृति जीवासी थोरपणें साम्य । अनादि प्रमाण निरपेक्ष ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे साम्य हें दोघांचें । वैशिष्ट्य तयांचें ऐका आतां ॥ ६ ॥

२५४

प्रकृति ते गुणमयी निर्मी जग । जीव तो असंग अविकारी ॥ १ ॥
जीवेश्वराचेंही ऐका आतां साम्य । चिद्रूप ते जाण अलिप्तही ॥ २ ॥
इंद्रियातीत ते, उपाधिभेदानें । तयांमाजी जाणे भेदभास ॥ ३ ॥
दृश्य-द्रष्टृयोगें कर्ता जीव होई । न करीचि कांहीं बुद्धि जड ॥ ४ ॥
अग्निहोत्रादि तीं कथिलीं जीवासी । येई प्रत्ययासी कर्मै जीव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कोण मी इत्यादि । प्रश्न जीवालागीं अविद्येनें ॥ ६ ॥

२५५

उष्णीशधारक[1] त्रिवस्त्रसंयुक्त[2] । स्थूल सूक्ष्मादिक देह तेंवी ॥ १ ॥
परी वस्त्राहूनि देह जेंवी भिन्न । तेंवी आत्मा भिन्न देहाहूनि ॥ २ ॥
जीवप्रकृति तें जीवेश्वर यांचें । साधर्म्य ज्ञान तें वैधर्म्यही ॥ ३ ॥
जाणें जो तयातें स्वरूपनिश्चय । आचरावें तप ज्ञानालागीं ॥ ४ ॥
तपानेंचि व्याप्त जाहलें त्रैलोक्य । कर्मे वाढे सत्व तेंचि तप ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे रज-तमनाशें । तपें सत्व वाढे मोक्षकारी ॥ ६ ॥

१ पागोटें, २ धोतर, उपरणें आणि पागोटें

२५६

ब्रह्मचर्य तें अहिंसा । म्हणती शारीर त्या तपा ॥ १ ॥
वाणी मनाचा निग्रह । तप मानस तें होय ॥ २ ॥
शास्त्रज्ञचि ब्राह्मणाचें । अन्न योग्य तपस्व्यातें ॥ ३ ॥
घ्यावें केवळ अन्नचि । स्पर्शूं नयेचि द्रव्यासी ॥ ४ ॥
काशिवासाचें त्या पुण्य । अथवा राखी जो संयम ॥ ५ ॥
मरण जया काशिक्षेत्रीं । ज्ञान शिव त्या अर्पिती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे योगी । प्रकृतींत लीन अंतीं ॥ ७ ॥

२५७

स्थूल सूक्ष्म तेवीं कारण विमुक्त । तोचि पावे मोक्ष निजपुण्यें ॥ १ ॥
यावज्जीव योगप्रमाद न होतां । तीनही देहांचा संग चुके ॥ २ ॥
ब्रह्मज्ञानें पाप-पुण्य धर्माधर्म । संबंध संपून मोक्ष लाभे ॥ ३ ॥
अनात्माचि आत्मा ऐसी मति ज्यांची । विनाश उत्पत्ति भासे तयां ॥
आसनादि योगें कोणी गुरु शास्त्रें । उपासनामार्गें तरती कोणी ॥५॥
वासुदेव म्हणे ब्रह्मचिंतनेंचि । येई कोणाप्रति सार्थकता ॥ ६ ॥

२५८

श्रुत्युक्तचि कांहीं उपासना जयां । यथाक्रम तयां मोक्षप्राप्ति ॥ १ ॥
यथाज्ञान मार्ग आक्रमी जो त्यासी । ज्ञानानुरूप ती सिद्धि घडे ॥२॥
अबाधित जयां शुद्ध शास्त्रज्ञान । वैराग्यें ते धन्य पुढती होती ॥३॥
आत्मरूप आत्मतृप्त जे विशुद्ध । लीन ते ब्रह्मांत निश्चयानें ॥ ४ ॥
आशातंतुजालीं भ्रमतें हें विश्व । धोट्यांतूनि सूत्र तैसी आशा ॥ ५ ॥
ज्ञानें निवारील आशा तो विमुक्त । वासुदेवा बोध रुचला बहु ॥६॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २१७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ४४ समाप्त

## अध्याय २१८ वा

२५९

धर्म म्हणे ताता, साधनें कोणत्या । जन्म जनकाचा सार्थ झाला ॥१॥
निवेदिती भीष्म जनदेव राजा । मिथिलेंत होता ज्ञाता एक ॥ २ ॥
पंचशिख नामें एक महाज्ञानी । एकदां त्या स्थानीं प्राप्त झाला ॥ ३ ॥
आसुरीचा होता प्रथम हा शिष्य । तेंवी चिरंजीव म्हणती त्यातें

ऊहापोहशक्तिसंपन्न तो पाहीं । कोशज्ञान तेंही उत्कृष्ट त्या ॥ ५ ॥
उपरति शम दम तैं तितिक्षा । समाधान सदा तया ठाईं ॥ ६ ॥
पंचकोश शिखारूप परब्रह्म- । ज्ञानें तया नाम पंचशिख ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे तया पंचशिखा । वंदिती एकदां बहुत मुनि ॥ ८ ॥

२६०

कपिला नामक विप्रस्त्रीच्या ठायीं । जन्मला तो पाहीं कापिलेय ॥१
केवळ मातेच्या दुग्धें तो वाढला । महत्व पावला आत्मज्ञानें ॥ २
पंचशिखवृत्त मार्कंडेयोक्त हें । जनक त्या पाहे अत्यादरें ॥ ३ ॥
जनकासी तेणें निवेदिलें ज्ञान । तेणें तो शरण तयाप्रति ॥ ४ ॥
देहादि पदार्थ आशाश्वत जाणें । ऐसें जनकातें निवेदी तो ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चार्वाकाचें मत । कथी पंचशिख रायालागीं ॥ ६ ॥

२६१

देहचि आत्मा, तो प्रत्यक्ष विनाशी । शरीरनाशचि मोक्ष जाणा ॥ १
देहाहूनि आत्मा भिन्नत्वें पाहणें । मूढता ते म्हणे चार्वाकाची ॥ २
अदृश्य स्वर्गादि आशीर्वाद मात्र । आत्यंतिक सौख्य अर्थ त्याचा ॥
अनुमानेंही न भिन्न आत्मा सिद्ध । हेतूचि न तेथ व्याप्तिबोधा[२] ॥ ४
आप्तवचनही नसे त्या प्रमाण । प्रत्यक्षावांचून मोल न त्या ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आत्मा, ईश, धर्म । नसती प्रमाण चार्वाकातें ॥ ६ ॥

२६२

देहाहूनि भिन्न जीवही नसेचि । भेद स्वभावेंचि वृक्षा जैसे ॥ १ ॥
शाखापर्णादिक तैसेंचि हे भेद । तृणजलें दुग्ध घृत जैसें ॥ २ ॥
कल्क[१] कांहीं काल कांहीं पदार्थांचे । ठेवितां तयांतें मादकत्व ॥ ३ ॥
तैसेंचि चैतन्य मन बुद्धि वीर्यं । जडचि प्रसवे चैतन्यासी ॥ ४ ॥
घर्षणेंचि अग्नि प्रगटे काष्ठांत । तेंवी शरीरांत ज्ञान मनें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे लोहासी चुंबकें । चैतन्य हें तैसें म्हणती देहीं ॥ ६ ॥

२६३

सूर्यकांतावरी सूर्याचे किरण । पडतांचि जाण अग्नि जैसा ॥ १ ॥
तैसा चतुर्भूतसंयोग विशिष्ट । निर्मि तो जगांत देहाप्रति ॥ २ ॥

१ वांटलेला रांधा, २ नियमदर्शक कारणच नाहीं.

अन्य कोणी भोक्ता असावा न ऐसें । अग्नीचि जळातें शोषी जैंवी ॥
निर्मी जळा अग्नि शोषीही त्या तोचि । तैंसेंचि जडासी जड भोगी ॥
वासुदेव म्हणे चार्वाकाचें मत । कथी पंचशिख ऐसें नृपा ॥ ५ ॥

२६४

पंचशिख म्हणे नास्तिकांचें मत । जाणावें असत्य विवेकानें ॥ १ ॥
देहाचेंचि जरी चैतन्य, कां प्रेत । सांगें मग स्पष्ट अचेतन ॥ २ ॥
नास्तिकही देवां करिती नवस । देव ते प्रत्यक्ष दिसती काय ॥ ३ ॥
भूतबाधा जया तयातें मारितां । देहासी न बाधा प्रत्यक्ष हें ॥ ४ ॥
कृतप्रणाश तैं अकृताचा लाभ । दोष हा प्रत्यक्ष केंवी टळे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसें अयुक्तिक । निवेदन स्पष्ट चार्वाकांचें ॥ ६ ॥

२६५

काष्ठापासूनि जो अग्नि तोही जड । कारणस्वरूप कार्य होई ॥ १ ॥
पृथ्वीपासूनि न आकाश उद्भवे । मूर्ताचें जाणावें मूर्त कार्य ॥ २ ॥
जड चेतनासी सादृश्य न कांहीं । कारणत्व नाहीं जडा तेणें ॥ ३ ॥
यापरी चार्वाकमत तें असिद्ध । करूनि विवेक स्थिर व्हावें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सिद्धान्त ज्यापरी । मानावा त्यापरी क्रिया घडे ॥५॥

२६६

राया, ऐकें आतां बौद्धांचें तें मत । अविद्यासंस्कार नाम रूप ॥ १ ॥
विज्ञान षडायतन तैं स्पर्श । वेदना, तो भव, तृष्णा, जाति ॥ २ ॥
उपादान जरा-मरण तैं शोक । परिवेदना दुःख दुर्मनस्था ॥ ३ ॥
पुनर्जन्मासी हीं कारणें जाणावीं । अविद्येच्या क्षेत्रीं कर्मबीज ॥ ४ ॥
तृष्णाजलें देह लाभे पुनःपुनः । संस्काररूपें हा सुषुप्तींत ॥ ५ ॥
ज्ञानदग्धही हा लाभे अविद्येनें । दग्ध होतां ज्ञानें बुद्धिनाश ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बौद्धांचा हा मोक्ष । परी तो क्षणिक बौद्धमतें ॥ ७ ॥

२६७

तात्पर्य बौद्धांसी सर्वही क्षणिक । प्रतिक्षणी देह भिन्न त्यांचा ॥ १ ॥
अन्यक्षणीं-दिनीं ओळखावें कैंवी । अन्याचीं भोगावीं अन्यें फळें ॥२॥
एकाप्रति ज्ञान अन्यासीच मुक्ति । बौद्धांची हे स्थिति ध्यानीं ध्यावी
दान, विद्या, तप, मग कासयासी । होईल प्रवृत्ति कैसी तेथें ॥ ४ ॥

अन्यकर्में अन्या लाभे जरी फल । अनर्थ होईल तरी जनीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मृतही जिवंत । जिवंत तो मृत ऐशा मतें ॥ ६ ॥

२६८

विनाशक्षणींचि अन्य वस्तु तैसी । होतां ही, विपत्ति व्यवहारीं ॥१॥
ठोंचिल्या चेंचिल्या देहें, तैसा देह । घडे हा प्रत्यय व्यवहारीं न ॥
तात्पर्य बौद्धांचें मत अप्रमाण । मुक्तातेंही जन्म मतें त्यांच्या ॥ ३ ॥
क्षणिकत्वादिक धर्म हे जयासी । मानितां तयासी कैंवी जरा ॥ ४ ॥
बुध्यादि संपर्कविहीनचि जरी । मानिला तो तरी कर्ता न तो ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कर्तृत्व भोक्तृत्व । सिद्ध न बौद्धांस करितां येई ॥६॥

२६९

राया, ऐशा भिन्न तर्ककुतर्कांनीं । निश्चय न मनीं वाणे एक ॥ १ ॥
ऐशा भ्रमें बुद्धि कोठें तरी स्थिर । होऊनि विनाश पावे अंतीं ॥ २ ॥
यापरी असत्य-सत्य संमिश्रणें । दुःखाचि पावणें अज्ञानानें ॥ ३ ॥
यास्तव महात जेंवी गजाप्रति । सन्मार्गीं खेंचिती तेंवी वेद ॥ ४ ॥
वेदमार्गें जातां दुःखाची निवृत्ति । मिथ्या मार्गें होती व्यर्थ श्रम ॥५॥
वासुदेव म्हणे वेदज्ञान ऐसें । तारक नरातें निश्चयानें ॥ ६ ॥

२७०

नश्वर हा प्राणि अस्थिर जीवित । आप्त इष्टमित्र काय त्यासी ॥ १ ॥
क्षणांत सकलां त्यागणें त्या प्राप्त । पुनरपि लाभ नसे त्यांचा ॥ २ ॥
पंचमहाभूतें आपुलाले अंश । न्यावया उत्सुक सर्वकाल ॥ ३ ॥
जाणतां हें प्रेम देहावरी कैसें । नश्वर देहा तें सौख्य कैंवी ॥ ४ ॥
यापरी अज्ञान भ्रम प्रतारणा- । रहित वंचना ऐके राव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे होऊनि चकित । विचारी जनक पुढती ऐका ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २१८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ४५ समाप्त

अध्याय २१९ वा

२७१

पंचशिखाप्रति जनकाचा प्रश्न । कथा पुनर्जन्म असे कीं न ॥ १ ॥
स्वर्गमोक्षामाजी सांगा काय भेद । देहाची दोहोंत स्मृति नसे ॥ २ ॥
मरण स्वर्गादि एकचि ते जरी । साधनेंही तरी व्यर्थचि कीं ॥ ३ ॥

अप्सरादि लाभ नसे जरी मोक्षीं । मोक्षार्थ प्रवृत्ति कैंवी मग ॥ ४ ॥
होतांही शाश्वत जरी नसे मोक्ष । तरी काय लाभ मुक्तांप्रति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रश्न जनकाचे । सोडवितां तुटे हृदयग्रंथि ॥ ६ ॥

२७२

रुग्णासम आर्त जनकासी मुनि । उत्तर देऊनि तोषविती ॥ १ ॥
आत्मनाश किंवा शरीरवैशिष्ट्य । कर्माचा उद्देश न दिसे ऐसा ॥२॥
यास्तव शरीरविनाश वा स्वर्ग । नव्हेचि गा मोक्ष नृपश्रेष्ठा ॥ ३ ॥
शरीरनाश वा शरीराची प्राप्ति । सहजचि लोकीं लाभतसे ॥ ४ ॥
देह इंद्रियें तैं मन जरी भिन्न । क्रिया त्यांची जाण परी एक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पंचभूतात्मक । देह त्याचे भेद जारजादि ॥ ६ ॥

२७३

बुद्धि जठराग्नि प्राण ऐसीं तीन । कारणें तीं जाण कर्माप्रति ॥ १ ॥
इंद्रियें तें जाणें सत्वगुण कार्य । उपादान होय चित्तचि त्यां ॥ २ ॥
इंद्रियादिकांच्या आश्रित ते वृत्ति । ग्राह्य त्याज्य तेंवी उपेक्ष्या ते ॥३॥
सुखा, दुःखा तेंवी असुखा अदुःखा । ऐसी ते चतुर्धा ध्रुवरूपा ॥४॥
शब्दस्पर्शादिक पंच, रूपयुक्त- । तैसेचि पदार्थ विषय सहा[1] ॥५॥
वासुदेव म्हणे इंद्रियसंयुक्त । होतां त्यांचा बोध यावज्जीव ॥ ६ ॥

२७४

इंद्रियार्थयोगें विषयांचें ज्ञान । मूळ तेंचि जाण सकळ ज्ञाना ॥ १ ॥
इंद्रियादिकां जे मानिताती आत्मा । नित्य त्या अज्ञान्यां दुःखलाभ ॥
शरीरादिकीं ते तेणें अहंबुद्धि । ममत्व पुढती सहज घडे ॥ ३ ॥
बाध्यत्वें सदोष वस्तु या जाणाव्या । द्वंद्व गणाव्या याचि वस्तु ॥
सम्यग्वध नामें सांख्यशास्त्राविण । त्यांचें निर्मूलन कोण करी ॥५॥
वासुदेव म्हणे सांख्यशास्त्र तेंचि । कथितो रायासी पंचशिख ॥६॥

२७५

मोक्षेच्छु नरांनीं विषयांचा त्याग । तेंवी कर्मत्याग करणें योग्य ॥१॥

---

१ शब्द स्पर्शादि पांच व रूपवान सकल पदार्थ असे हे सहा विषय

सेवूनि विषयां इंद्रियविजय । मानिती ते मूढ मिथ्याभाषी ॥ २ ॥
त्यागाविण शांति न लाभे कोणासी । त्यागार्थ यज्ञादि कथिलीं कर्मे
द्रव्यत्याग तेणें, विषयत्यागार्थ । कथिलीं विविध व्रतें शास्त्रीं ॥४॥
सौख्यत्यागार्थ तें निवेदिलें तप । सर्वत्यागा योग प्रतिपादिला ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सर्वत्याग हेंचि । जाणा परमावधि त्यागाची ते ॥ ६ ॥

२७६

त्यागेंचि नृपाळा, होई दुःखनाश । निवेदितों शास्त्र लक्ष देई ॥ १ ॥
दान प्रतिग्रह जाणावा हस्तानें । गति ते चरणें लाभे जीवा ॥ २ ॥
उत्पत्तिआनंद जननेंद्रियानें । जाणावा गुदानें मलत्याग ॥ ३ ॥
उच्चारी जें शब्द वागिंद्रिय तें । जाणें पंचक हें कर्मेंद्रियें ॥ ४ ॥
श्रोत्रत्वगादि तीं ज्ञानेंद्रियें पंच । मन एकादश इंद्रियें हीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विषय, इंद्रिय । मन, जैं एकत्र तदा बोध ॥ ६ ॥

२७७

पंचत्रिकें ऐसीं गुणयोगें त्रिधा । श्रवणें इष्टाच्या हर्ष वाटे ॥ १ ॥
दर्शनेंचि प्रेम लाभानें आनंद । उपभोगें सौख्य सत्वकार्य ॥ २ ॥
असंतोष ताप शोक असहिष्णुत्व । रजोगुणें देख प्राप्त होती ॥ ३ ॥
अविवेक, मोह, अनवधान निद्रा । कार्यें जाण नृपा, तयाचीं हीं ॥४॥
सकारण तेंवी सहजही यांसी । होतसे उत्पत्ति प्रारब्धानें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे इंद्रियें, विषय । भूतेंही सकळ बुद्धिचि ते ॥ ६ ॥

२७८

यास्तवचि लय पावतां हे बुद्धि । लय सकलांसी जाण बापा ॥ १ ॥
एकाचि समयीं सर्वेंद्रियां ज्ञान । यास्तव व्यापून सकलां बुद्धि ॥२॥
यद्यपि सुषुप्तिकालीं न त्रिपुटि । सुखनिद्रा कथी परी जीव ॥ ३ ॥
यास्तव तदाही आत्म्याचें अस्तित्व । सहजचि सिद्ध होत असे॥४॥
मिथ्या हे त्रिपुटि आत्मा मात्र सत्य । सत्ता ते त्रिविध ऐशापरी ॥
वासुदेव म्हणे व्यवहार स्वप्न । मिथ्याचि तीं जाण आत्मा सत्य ॥

२७९

तमोगुणव्याप्त बुद्धि ते सुषुप्ति । क्षणभरी नाशी आभास हे ॥ १ ॥
देहादि समूहालागीं क्षेत्र संज्ञा । जाणें नृपा, प्राज्ञा अध्यात्मांत ॥२॥

बुधिस्थ ते आत्मप्रतिबिंबसत्ता । क्षेत्रज्ञ या शब्दा पावे तोचि ॥ ३ ॥
तात्पर्य या जगीं सर्वेही आभास । एथ कोण नित्य अनित्यही ॥ ४ ॥
कर्मानुरोधें हे अविद्यामूलक । यास्तव मिथ्यात्व सकळांप्रति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अविद्याचि मिथ्या । परिणाम तियेचा कैंवी सत्य ॥

२८०

सागरीं विलीन होतांचि सरिता । ठाव नामरूपा नसे त्यांच्या ॥ १ ॥
कारणीं विलीन होतां तेंवी बुद्धि । भिन्नत्व तिजसी असे कैंवी ॥ २ ॥
असो, ऐसें ज्ञान जयाप्रति होई । बाधती न पाहीं पाश तया ॥ ३ ॥
सुखदुःखादि तो त्यागूनियां द्वंद्वें । विलीनता पावे ब्रह्मरूपीं ॥ ४ ॥
जीर्णशृंग त्यागी जेंवी रुरुमृग । अथवा तो सर्प कांत जेंवी ॥ ५ ॥
प्रवाहांत वृक्ष पडतां वृक्षस्थ । पक्षी जेंवी त्याग करी त्याचा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे द्वंद्वत्यागें ज्ञाता । तेंवी ब्रह्मरूपा प्राप्त होई ॥ ७ ॥

२८१

पंचशिख म्हणे ऐकें जनदेवा । जनक एकदां वदला तेंचि ॥ १ ॥
एकदां मिथिला झाली अग्निव्याप्त । वदला जनक तयावेळीं ॥ २ ॥
लवहीं न कांहीं माझें या पुरींत । ब्रह्म मूर्तिमंत स्वयेंचि मी ॥ ३ ॥
पंचशिखाची तीं ऐकूनियां वाणी । जनदेव मनीं हृष्ट झाला ॥ ४ ॥
शोकमोहमुक्त जाहला नृपाळ । प्रारब्ध सकळ भोगी हर्षें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चिंतितां हा बोध । सकलही क्लेश हरूनि जाती ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २१९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ४६ समाप्त

अध्याय २२० वा

२८२

धर्म म्हणे ताता, कैसें लाभे सुख । कासयानें दुःख निवेदा तें ॥ १ ॥
तेंवी इष्टलाभें निर्भयताप्राप्ति । कैसी होई तेंही कथन करा ॥ २ ॥
निवेदिती भीष्म दमचि तो श्रेष्ठ । प्रामुख्यें विप्रांस आवश्यक ॥ ३ ॥
क्रिया, सत्य, तपा आधार तो दम । सुखनिद्रा जाण दमनशीला ॥
मिथ्यात्व जगाचें येई प्रत्ययासी । भीति दमहीनाची व्याघ्रासम ॥ ५ ॥
सकळ आश्रमीं दमचि वरिष्ठ । धन्य धन्य दान्त जगामाजी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अदान्ताकारणें । निर्मिला ब्रह्मयानें राजा जाणा ॥ ७ ॥

२८३

राजा, उदारता, अक्षोभ, संतोष । सदा सरलत्व अक्रोधही ॥ १ ॥
अनसूया तेंची निरभिमानिता । श्रद्धालुत्व दया गुरुपूजा ॥ २ ॥
दुष्टभाव ग्राम्यवार्ता तें असत्य । दोषांचा या त्याग जयाप्रति ॥ ३ ॥
निंदास्तुतित्यागें दमाची उत्पत्ति । फलाशा कदापि धरूं नये ॥ ४ ॥
सुजनस्वभाव ठसवावे अंगीं । वीरासम जगीं अभय व्हावें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दुर्जन न दान्त । सज्जन अदान्त नसे कदा ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २२० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ४७ समाप्त

अध्याय २२१ वा

२८४

धर्म म्हणे ताता, दान्त अहिंसक । केंवी यज्ञमार्ग अहिंसका ॥ १ ॥
कथिती त्या भीष्म अवैदिकाविधि । स्वच्छंदें पाळिती पतन तयां ॥
वैदिक कर्मानें स्वर्गलोकलाभ । परी अंतीं त्यास मृत्युलोक ॥ ३ ॥
धर्म म्हणे ताता, उपवास तप । अन्यचि उपवास अथवा कांहीं ॥
निवेदिती भीष्म आत्माभ्यासीं विघ्न । जेणें, तें तप न उपवास ॥५॥
वासुदेव म्हणे भूतमात्रांप्रति । अभयद तेंचि कर्म तप ॥ ६ ॥

२८५

धर्मा, गृहस्थातें उपोषण योग्य । देवतासंतोष, मनन, शौच ॥ १ ॥
ब्रह्मचर्य, निद्रा, मांसाशनत्याग । अमृत विघस भोजन त्या ॥ २ ॥
नित्य उपवास द्विकाळ भोजनें । ऋतौ स्त्रीगमनें ब्रह्मचर्य ॥ ३ ॥
सत्यवक्ता ज्ञानी देवता, पितर । पुजूनि अवशिष्ट मांस भक्षी ॥ ४ ॥
यावांचूनि कदा न भक्षी जो मांस । निर्मांसचि त्यास म्हणती ज्ञाते ॥
शुचिर्भूत दाता दिवानिद्रात्यागी । जागरण त्यासी समजा सदा ॥
भृत्य अतिथींसी वाढूनि जो भक्षी । साक्षात् अमृतचि भक्षितो तो ॥
वासुदेव म्हणे विघसान्न भक्षी । प्रसन्न तयासी सकल देव ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २२१ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ४८ समाप्त

अध्याय २२२ वा

२८६

धर्म म्हणे ताता, शुभाशुभकर्ता । कोण तेंचि आतां निवेदावें ॥ १ ॥

इंद्र-प्रल्हादांचा संवाद तें भीष्म। निवेदिती प्रेमभावें धर्मा ॥ २ ॥
ज्ञाता जो सुजन सर्व हितकर्ता। प्रल्हाद एकदां एकांतस्थ ॥ ३ ॥
पाहूनियां इंद्र पातला त्या ठाईं। योग्यता पहावी हाचि हेतु ॥ ४ ॥
प्रल्हादासी म्हणे रागद्वेषशून्य। दिससी तूं ज्ञान कैसें तुज ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दुःखप्रसंगींही। प्रल्हादा न होई दुःखलेश ॥ ६ ॥

२८७

प्रल्हाद इंद्रासी म्हणे अज्ञानेंचि। अस्वास्थ्य चित्तासी येत असे ॥ १ ॥
भावाभावांचेही उत्पत्ति विनाश। स्वभावेंचि नित्य प्रकृतीनें ॥ २ ॥
प्रवर्तक कोणी नसेचि त्या ठाईं। यास्तव त्या नाहीं कर्ता कोणी ॥
परी अभिमानें कर्तृत्व जीवासी। तेणें सुखदुःखीं पतन तया ॥ ४ ॥
कर्ता जरी आत्मा सर्वत्रचि यश। येणें आवश्यक समर्था त्या ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अनिष्टाचा लाभ। इष्टासी प्रतिबंध जगीं सदा ॥ ६ ॥

२८८

अयत्नेंही कोणा अनिष्टाची प्राप्ति। इष्टवियोगही स्पष्ट दिसे ॥ १ ॥
स्वभावचि तेणें सिद्ध प्रकृतीचा। आत्मा कर्ता ऐसा व्यर्थ भ्रम ॥ २ ॥
सर्वव्यापी आत्मा फंसवूनि सौख्य। फंसूनियां दुःख इच्छील कां ॥
तेणें आत्मज्ञान मोक्षही स्वभावें। मत हें जाणावें स्पष्ट माझें ॥ ४ ॥
अन्नसूचक तो काकशब्द जेंवी। कर्म तें सुचवी स्वभावातें ॥ ५ ॥
ऐसें प्रकृतीच्या कार्याचेंचि ज्ञान। परी आत्मज्ञान नसे जया ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे स्वास्थ्यभंग त्याचा। बोध प्रल्हादाचा ध्यानीं घ्यावा

२८९

प्रकृतीचें सर्व कर्तृत्व जो पाही। गर्व तांठा कैंवी तयालागीं ॥ १ ॥
सकल हें विश्व नश्वर या ज्ञानें। निर्विकार मनें संचरतों ॥ २ ॥
निर्विकार आत्मा ऐसें जया ज्ञान। क्लेश कदाही न तयाप्रति ॥ ३ ॥
प्रकृति विकृतिमाजी रागद्वेष। कदाही न मज देवश्रेष्ठा ॥ ४ ॥
द्वेष्टाही न कोणी वाटे मम जगीं। सदा अंतरंगीं निरिच्छ मी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे इह-पर भोग। इच्छी न प्रल्हाद ज्ञाताज्ञात ॥ ६ ॥

२९०

देवेंद्रा, हें ज्ञान ऋजु सावधासी। काया-वाचाशुद्धि इंद्रियजयें ॥ १ ॥

तेंवी वृद्धसेवा घडे जयांप्रति । ऐसी आत्मप्राप्ति निश्चयें त्या ॥ २ ॥
स्वभावेंचि, इंद्रा, ऐशापरी ज्ञान । शांतीही ते जाण स्वभावेंचि ॥३॥
किंवहुना सर्व विश्वचि स्वभावें । ऐकूनि इंद्रातें नवल वाटे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे प्रकृत्ति स्वभाव । सकल हें कार्य, अचल आत्मा ॥५॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २२२ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ४९ समाप्त

अध्याय २२३ वा २९१

धर्म म्हणे ताता, कालदंडें चूर्ण । होऊनियां दीन विचरे कोण ॥ १ ॥
इंद्र-बळीचा तें संवाद कथितों । पितामह तोचि ऐका आतां ॥ २ ॥
पूर्वी असुरांतें जिंकूनियां इंद्र । शोधूनि बळीस श्रांत झाला ॥ ३ ॥
ब्रह्मदेवाप्रति पुशी तें जाऊनि । अग्नि वायु जनीं कोण बळी ॥ ४ ॥
ब्रह्मा म्हणे प्रश्न नसे हा उचित । पुशितां परी सत्य निवेदावें ॥ ५ ॥
यास्तव कथितों पुष्ट गर्दभ वा । उंट अश्व किंवा बळी झाला ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ओसाडप्रदेशीं । भेटूनि बळीसी पुशी इंद्र ॥ ७ ॥

२९२

इंद्र म्हणे वले, गर्दभ झालासी । कोंडा भक्षितोसी अत्यानंदें ॥ १ ॥
कोठें तें वैभव कोठें ही अवस्था । सर्व सामर्थ्याचा नाश झाला ॥२॥
दुःख तुज येणें होतसे कीं नाहीं । निवेदीं तें पाहीं मजलागीं ॥ ३ ॥
ऐकूनि तें वळी वोलला इंद्रासी । नेई कालगति हरूनि सर्व ॥ ४ ॥
मूल प्रकृतींत विलीन ऐश्वर्य । पाहसील सर्व योग्यवेळीं ॥ ५ ॥
क्षमाशील ज्ञाते सुखदुःखीं सम । क्षुद्रता तुज न शोभे ऐसी ॥ ६ ॥
नष्टबुद्धे तव ऐश्वर्य नासेल । शब्दही नुमटेल तदा तव ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कालाधीन विश्व । जाणूनि उन्मत्त होऊं नये ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २२३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ५० समाप्त

अध्याय २२४ वा २९३

हांसूनि तें इंद्र वोलला बळीतें । फूत्कार तयाचे पाहूनियां ॥ १ ॥
ज्ञातीसवें तदा वैससी वाहनीं । आमुची तैं मनीं नव्हती क्षती ॥२॥
दीनवाणी आतां पातली हे स्थिति । दुःख होई न कीं चित्तीं सांगें॥

वलि म्हणे तदा इंद्रा, हे कालाची। गति न कदापि स्थिर मानीं ॥४॥
यास्तव लवही दुःख नच मातें । नश्वर विश्व हें जाणतों मी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे नश्वरताज्ञानें । तितिक्षा ते वाणे ज्ञानियासी ॥ ६ ॥

२९४

इंद्रा, यास्तवचि गर्दभत्वें दुःख । लवही न मज होई मनीं ॥ १ ॥
दोष न हा माझा कालाची हे गति । योग्य समयीं ती पालटेल ॥२॥
ज्ञात्याप्रति दुःख कदाही न जाणें । अंत निश्चयानें देहासी या ॥ ३ ॥
ज्ञान हें जयांसी नसे तेचि दुःखी । ज्ञानें या सत्वाची वृद्धि होई ॥४॥
वधी जो अन्यातें वध त्याचा कालें । केलेलाचि असे सिद्धांत हा ॥
वासुदेव म्हणे मृतासी मारणें । वधक हें नेणें हेंचि माया ॥ ६ ॥

२९५

कर्ता करविता अन्याचि तो परी । जीव अहंकारी म्हणे मी मी ॥ १ ॥
अज्ञ सुज्ञ किंवा दुर्वल सवल । कुरूप सुरूप अथवा कोणी ॥ २ ॥
भाग्यवंत किंवा दुर्भागी नरातें । ग्रासील निश्चयें समजें काल ॥ ३ ॥
पूर्वशरीर तें ग्रासिलें काळानें । ग्रासील नियमें त्याचि हेंही ॥ ६ ॥
ऐल पैलतीर नसे या कालासी । कोणाही विश्रांति नसे तेथें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कालाचा त्या अंत । न कळे वळीस चिंतितांही ॥६॥

२९६

समक्ष हा माझ्या भक्षी सर्वां काल । कासया विफल गर्व करूं ॥१॥
गर्दभरूपें मी भक्षीतसें कोंडा । पाहूनियां निंदा करिसी माझी ॥ २ ॥
इच्छेसम जरी असतें सामर्थ्य । भयंकर रूप धरितों तरी ॥ ३ ॥
पलायन इंद्रा, करितासी मग । न होई उन्मत्त ऐशा रीति ॥ ४ ॥
सकळही खेळ करीतसे काळ । तयाहूनि बळ नसे कोणा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अनुकूल काल । येतां उच्छृंखल, नाश त्याचा ॥ ६ ॥

२९७

वळि म्हणे इंद्रा, भयें माझ्या त्रस्त । पुरा होई जग जाणसी तूं ॥
वास्तव्यही मम वंदिती ती दिशा। ऐसा धाक माझा पूर्वी होता ॥
उत्कर्षापकर्ष आपुल्या न हातीं । देवेंद्रा, हें चित्तीं वसो तुझ्या ॥३॥
वैभव तें माझें जाहलें विनष्ट । कालाचें तें कृत्य खेद नसे ॥ ४ ॥

काळाचें खेळणें होऊनि रहावें । शास्ता तो जाणावें सकल जगा ॥
वासुदेव म्हणे यशअपयश । मानीतसे मूढ स्वपराक्रमें ॥ ६ ॥

२९८

कुलीन सुंदर विक्रमीही कोणी । कंठितो या जनीं दुःख कदा ॥ १ ॥
अकुलीन दुष्ट दुराचारी मूढ । भोगितो उत्कृष्ट सुख कोणी ॥ २ ॥
सुस्वरूप सुलक्षणी कोणी नारी । भोगिते संसारीं हाल बहु ॥ ३ ॥
कुलक्षणी तेंवी कुरूपही कोणी । बैसते आसनीं वैभवानें ॥ ४ ॥
इंद्रा 'तें सकळ जाणें' भवितव्य । हातीं असे काय तुझ्या माझ्या ॥
वासुदेव म्हणे काळ सूत्रधार । बाहुलीं सकळ सानथोर ॥ ६ ॥

२९९

गर्दभ मी इंद्रा, वैभवीं तूं अद्य । कृत्य हें नाहींच तुझें माझें ॥ १ ॥
चपराक एक देऊनियां तुज । पीडितों सहज वज्रासवें ॥ २ ॥
परी विक्रमाचा काळ न हा माझा । सहनशीलता करणें प्राप्त ॥ ३ ॥
गर्जलों मी पुरा ऐसाचि देवेंद्रा । प्रभाव कालाचा परी ऐसा ॥ ४ ॥
द्वादश आदित्य वृष्टिकर्ता मीचि । दाता हर्ता मीचि होतों पुरा ॥५॥
वासुदेव म्हणे सत्ता न तृणाची । राहिली बळीसी कालचक्रें ॥ ६ ॥

३००

बळि म्हणे इंद्रा, स्वैरपणें काळ । करितो संहार पालनही ॥ १ ॥
वेदवेत्ते हाचि ब्रह्मरूप ऐसें । जाणूनि तयातें उपासिती ॥ २ ॥
अगाध सिंधूचें जळ तेंवी ब्रह्म । कठिण लंघन इंद्रियांचें ॥ ३ ॥
विनाशी तें तेंवी अविनाशी ऐसें । ज्ञापक रूपाचें नसे जरी ॥ ४ ॥
बुद्धिप्रतिबिंबें होई तें ज्ञापक । कल्पित हें विश्व म्हणती ज्ञाते ॥५॥
वासुदेव म्हणे लीन होतां जेथें । पुनर्जन्म नसे तेंचि ब्रह्म ॥ ६ ॥

३०१

विपरीत ज्ञानें भिन्नभिन्न नामें । बोलती आत्म्यातें असतां एक ॥१॥
आत्मा तोचि काल जाणावा देवेंद्रा । संपादीं प्रसादा तयाच्या तूं ॥
सहस्र देवेंद्र होऊनियां गेले । बळ थोर तुझें परी व्यर्थ ॥ ३ ॥
मर्यादा यास्तव त्यागूं नये कदा । अस्थिर संपदा जाणावी हे ॥४॥

झाले गेले किती इंद्र आजवरी । त्यजूनियां दूरी लक्ष्मी जाई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विरोचनपुत्र । देवेंद्रासी बोध करी ऐसा ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २२४ था तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ५१ समाप्त

अध्याय २२५ वा ३०२

धर्मा, ऐसा बोध करी बळी तोंचि । देहांतूनि मूर्ति प्रगटे दिव्य ॥
पाहूनि तियेसी विस्मयचकित । होऊनि त्या इंद्र पुशी कोण ॥ २ ॥
बळी म्हणे कोण न जाणें मी, तूंचि । पुशीं तिजलागीं हवें तरी ॥
पुशितां इंद्रासी म्हणे ती दुःसहा । विधित्सा वा इंद्रा भूति लक्ष्मी ॥
इंद्र म्हणे त्याग करिसी कां याचा । शाश्वत निवासा येसी काय ॥
वासुदेव म्हणे लक्ष्मी इंद्राप्रति । म्हणे मम प्राप्ति कालाधीन ॥ ६ ॥

३०३

इंद्र म्हणे त्याग केला कां बळीचा । शाश्वत निवासा करिसी कैंवी
लक्ष्मी म्हणे सत्य धर्म दान तप । पराक्रम व्रत स्थान माझें ॥ २ ॥
धर्मापासूनियां बळी झाला च्युत । केला ब्रह्मद्वेष येणें बहु ॥ ३ ॥
उच्छिष्ट स्थितींत स्पर्शला घृतासी । काळें नष्ट बुद्धि, यज्ञत्यागी ॥
पूजन माझेंचि करा ऐसें म्हणे । सावधानतेनें रक्षी मज ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रार्थी देवदेव । स्थिर लाभास्तव मार्ग कथीं ॥ ६ ॥

३०४

निवेदी तैं लक्ष्मी एकाकी मजसी । रक्षील या जगीं ऐसा नसे ॥ १ ॥
विभागूनि मज ठेवीं चार ठाईं । इंद्र भाग देई पृथ्वीसी तैं ॥ २ ॥
अन्य भाग जला, अग्नीतेंही अन्य । चतुर्थ सज्जन-विद्वानांसी ॥ ३ ॥
द्रव्यांश भूमीतें पुण्यांश उदका । धर्म तो पावका यज्ञरूपें ॥ ४ ॥
विद्यारूपी अंश दिधला सज्जनां । लक्ष्मीचें हें जाणां नित्यरूप ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे इंद्रा म्हणे लक्ष्मी । स्थिर मी या स्थानीं रक्षीं सुखें

३०५

इंद्र म्हणे होवो शासनासी पात्र । जो करी प्रतिबंध नियमासी या ॥
संवाद दोघांचा ऐकूनि तो बळी । चारही दिशांसी म्हणे सूर्य- ॥ २ ॥
यदा तो तापद, तदा मी तुम्हांसी । जिंकीन हे माझी परिसा वाणी ॥

इंद्र म्हणे तुज वधूं नये ऐसी । आज्ञा ते ब्रह्मयाची पाळीन मी ॥ ४ ॥
जाईं आतां सौख्यें ऐकूनियां दैत्य । दक्षिण दिशेस निघूनि गेला ॥
वासुदेव म्हणे ज्ञाता वळी जातां । देवेंद्रही स्वर्गा निघूनि जाई ॥६॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २२५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ५२ समाप्त

अध्याय २२६ वा

३०६

निवेदिती भीष्म अन्य कथा दीन- । नमुचीतें प्रश्न करी इंद्र ॥ १ ॥
नष्टवैभवा हे नमुचे, तुजसी । लवही न चित्तीं दुःख काय? ॥ २ ॥
नमुचि तैं बोले अनिवार दुःख । करितां शत्रूस सौख्य होई ॥ ३ ॥
तेंवी शोकानें त्या लाभ नसे कांहीं । यास्तव लवही मज न शोक ॥
दिसेल तें सर्व नासेल या जगीं । दुःखें वय लक्ष्मी धर्मनाश ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे यास्तव दुःखाची । वेळ येतां चित्तीं प्रभु ध्यावा ॥६॥

३०७

ज्या ज्या वेळीं चित्त अर्पावें केशवीं । हेतु त्या त्या वेळीं पूर्ण होती
सिद्धान्त हा सत्य घेऊं नये शंका । ईश एक शास्ता विश्वासी या ॥
गर्भामाजीही तो रक्षितो जीवासी । योजितो तो तैंचि वागतों मी ॥
उत्पत्तिप्रलयज्ञान मजप्रति । ज्ञानें मोक्षप्राप्ति जाणतों हें ॥ ४ ॥
परी न संपादीं ज्ञान तें देवेंद्रा । होणें जें ज्या काला तेंचि घडे ॥५॥
वासुदेव म्हणे लाभ हानि जे जे । यदा होणें तें तें न चुके कोणा ॥

३०८

इच्छील विरंची गर्भाशय तोचि । लाभे वास्तव्यासी नसतां इच्छा
व्हावयाचें तेंचि जाहलें हें ज्ञान । जयासी तया न दुःख कदा ॥ २ ॥
कालगतीनेंचि लाभे सुखदुःख । वैरी तो निमित्त होई जरी ॥ ३ ॥
वैऱ्यासी दंडिलें ऐसें मानी मूढ । संकटें कोणास नसती इंद्रा ॥ ४ ॥
आदिअंत त्यांचा जाणती ते योगी । हिमाद्रिसमचि स्थिर होती ॥
वासुदेव म्हणे अन्याय न ज्ञाता । करितां सर्वदा स्थिर राहे ॥ ६ ॥

३०९

उत्कृष्ट यशानें होई न उन्मत्त । संकटींही मूढ न होईचि ॥ १ ॥
तटस्थ राहूनि भोगी सुखदुःख । इंद्रा, नरश्रेष्ठ जाणावा तो ॥ २ ॥

जे जे लाभे स्थिति झेलूनियां ती ती । करावें शत्रूसी विफल धैर्यें ॥
मंत्र शौर्य ज्ञान उद्योगादि व्यर्थ । साधनें अप्राप्यसाधनासी ॥ ४ ॥
मग व्यर्थ शोक कासया करावा । अटळ जाणावा विधिलेख ॥ ५ ॥
योजिलें कालानें जाणें घडे तेथें । प्राप्त न चुकतें सुख-दुःख ॥ ६ ॥
जाणील हें तया नसे मोहबाधा । संकटींही त्याचा क्षोभ नसे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भाग्यवंतासम । सर्वकाळ जाण ज्ञाता शांत ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २२६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ५३ समाप्त

अध्याय २२७ वा

३१०

धर्म म्हणे ताता, निरसूनि शंका । मज सौख्य देतां सदयपणें ॥ १ ॥
राज्य बांधवही जाहल्या विनष्ट । काय सुखप्रद निवेदा तें ॥ २ ॥
निवेदिती भीष्म कोणी धैर्यावीण । साह्य संकटीं न अनाथासी ॥३॥
धैर्यवंतासीच लाभतें आरोग्य । पावतो विनाश शोक त्याचा ॥४॥
सत्ववृत्तीनेंचि जातां क्रियाशक्ति । सामर्थ्य धैर्यही लाभतसे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संवाद पूर्वींचा । निवेदिती ऐका भीष्म काय ॥ ६ ॥

३११

देवदैत्ययुद्धामाजी देवांप्रति । विजयाची प्राप्ति होतां जन ॥ १ ॥
होती धर्मशील सर्व सुखभोक्ते । संचरे आनंदें अवनी इंद्र ॥ २ ॥
गुहेमाजी एका भेटला त्या बळी । होता तो अंतरीं निर्विकार ॥३॥
गर्वें तया इंद्र म्हणे वैरोचना । दैन्यें न यातना कैंवी तुज ॥ ४ ॥
वळि म्हणे इंद्रा, कालगतिज्ञान । जया मूढासी न सुख दुःख त्या ॥
वासुदेव म्हणे महिमा काळाचा । बळी कथी इंद्रा पूर्वीसम ॥ ६ ॥

३१२

पाकशासन तें बोलला वळीसी । जाणीतसें शक्ति काळाची मी ॥
सर्वदा सावध राहूनियां काल । योग्यवेळीं वल दावी मूढा ॥ २ ॥
प्रयत्नेंही गति न टळे काळाची । प्राचीन दंडचि काल नित्य ॥ ३ ॥
व्याजगणना तो करी सावकार । वर्ष मास पळ मापूनियां ॥ ४ ॥
अद्य हें उद्यां तें बोलतां बोलतां । काळमुखीं इंद्रा पडती जन ॥५॥
वासुदेव म्हणे प्रवाहपातित । वृद्धासम मूढ कालाधीन ॥ ६ ॥

३१३

क्षणापूर्वी जया पाहिला तो गेला । म्हणे काळ त्याला ओढी क्षणीं ॥
उत्कर्ष पावतां अंतीं अवनति । आहे आहे तोंचि दिसे नाश ॥ २ ॥
सर्व अशाश्वत येतांही अनुभव । होई न निश्चय मनीं तैसा ॥ ३ ॥
वैरोचना, तव पाहूनियां शांति । येई प्रत्ययासी स्थिर बोध ॥ ४ ॥
फिरतां कालाची गति उन्मादानें । थोरांसी अज्ञानें तुच्छ लेखी॥५॥
वासुदेव म्हणे ईर्षा अभिमान । मोह भय काम अज्ञाप्रति ॥ ६ ॥

३१४

तत्वज्ञ तूं वले, जाणसी कालातें । जाणसी शास्त्रांतें विवेकी तूं ॥१॥
ज्ञात्यांतेंही तेणें होसी स्पृहणीय । जाणूनियां सर्व अलिप्त तूं ॥ २ ॥
वले, निर्वैरता पाहूनियां तव । सोडितों हे तव वरुणपाश ॥ ३ ॥
सासूप्रति सून योजील सेवेतें । मोहें स्वपित्यातें पुत्र तेंवी ॥ ४ ॥
पादधावन जैं विप्रांकरीं शूद्र । आनंदें घेतील वैरोचना ॥ ५ ॥
विप्रकन्यांप्रति तेंवी वरितील । भोग विजातीय स्त्रीसी यदा ॥ ६ ॥
कांस्यपात्रें केर कुपात्रीं जैं बळि । वर्णमर्यादाही सुटती जेव्हां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे तदा एक एक । इंद्र म्हणे पाश शिथिल वले ॥ ८ ॥

३१५

वैरोचना, आतां भय न तुजसी । प्रतीक्षा कालाची करीं सौख्यें ॥१॥
पीडा, रोग कांहीं न होवो तुजसी । सदा राहो शांति चित्तीं तुझ्या ॥
बोलूनियां ऐसें ऐरावतावरी । बैसूनि दैत्यारि स्वर्गी गेला ॥ ३ ॥
चराचरासी तैं जाहला आनंद । वासुदेवा मोद धर्मराज्यीं ॥ ४ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २२७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ५४ समाप्त

अध्याय २२८ वा

३१६

धर्म म्हणे ताता, उत्कर्षापकर्ष । चिन्हें सांगा स्पष्ट मजलागीं ॥ १ ॥
भीष्म म्हणे ताता, असो त्वत्कल्याण । चिन्हें कथीं मन ज्याचें तया ॥
त्रैलोक्यसंचारी नारद एकदां । येती गंगातीरा स्नानालागीं ॥ ३ ॥
देवराज तोंचि पातला त्या स्थानीं । स्नानादि उरकूनि करिती गोष्टी

इतुक्यांत सूर्य उदयासी येई । करीती दोघेही उपस्थान ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे तोंचि सूर्यासम । येई निरुपम तेज एक ॥ ६ ॥

३१७

तेजामाजी तया लक्ष्मीचि प्रत्यक्ष । दिसली तयांस तेजस्विनी ॥१॥
भूषणें तियेचीं नक्षत्रासमान । कमलपत्रासम मुक्तामाला ॥ २ ॥
सन्मानूनि तिज बोलला देवेंद्र । कोण तूं किमर्थ येसी एथें ॥ ३ ॥
देवी म्हणे इंद्रा, मंगलरूपा मी । म्हणती मज लक्ष्मी पद्मा ऐसें ॥४॥
सत्य, धर्म, हींच मजसी वंधनें । त्यगूनि दैत्यांतें आलें एथें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कारण त्यागाचें । तैसेंचि येण्याचें पुशी इंद्र ॥ ६ ॥

३१८

धार्मिक धीर ते आवडती मज । अध्ययनरत होते दैत्य ॥ १ ॥
निर्मल सदनें, स्वाधीन अंगना । नित्य गुरुजनां पूजिती ते ॥ २ ॥
विप्रहितकर्ते संयमी सश्रद्ध । तैंवी सत्यनिष्ठ दानशील ॥ ३ ॥
क्रोधविजयी ते मत्सरविहीन । परिवाररक्षण करिती हर्षें ॥ ४ ॥
परोत्कर्षें खेद पावले न कदा । संग्रह द्रव्याचा, ज्ञातेही ते ॥५॥
वासुदेव म्हणे सौजन्यसंपन्न । करुणरसज्ञान दैत्यां होतें ॥ ६ ॥

३१९

रुजु दृढभक्त निग्रह त्यां मोठा । अनुग्रह त्यांचा तैंवी थोर ॥ १ ॥
सेवक अमात्य संतुष्ट तयांचे । कृतज्ञ ते होते मधुरभाषी ॥ २ ॥
वहुमानकर्ते लज्जाशील ज्ञाते । शुचित्व तयांतें तीर्थप्रेमी ॥ ३ ॥
सूर्योदयोत्तर कदा न त्यां निद्रा । दधिसत्तु थोरां नित्य वर्ज्य ॥ ४ ॥
वेदपाठक ते प्रभातीं घृतांत । निज प्रतिबिंब अवलोकिती ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मंगल वस्तूतें । अवलोकिती ते धर्मरत ॥ ६ ॥

३२०

ब्राह्मणपूजक प्रतिग्रहशून्य । निद्रा तयां जाण अर्धरात्र ॥ १ ॥
कदाही शयन दिवा न तयांसी । दीन-दुर्बलांची दया तयां ॥ २ ॥
संत्रस्तांसी धीर वाटे नित्य त्यांचा । परस्परां पीडा देतींविना ॥३॥
वडिलांची सेवा साह्य सकलांसी । देव पितरातिथि पूजानिष्ठ ॥ ४ ॥

सत्य-तपनिष्ठ एकाकी भोजन । कदाही तयां न इष्ट वाटे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे परस्त्रीगमन । अथवा स्वैरकाम नव्हता त्यांचा ॥ ६ ॥

३२१

उत्साहसंपन्न गर्वहीन मित्र । सर्वदा संतोष दैत्यांमाजी ॥ १ ॥
अनालोचन कीं अप्रेम विषाद । नव्हता अभिलाष तयांलागीं ॥ २ ॥
ऐशा सद्‌गुणांनीं दीर्घकाल होतें । तयांच्या सान्निध्यें हर्षभरें ॥ ३ ॥
पुढती तयांचा फिरतांचि काल । झालें विपरीत सर्व कांहीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे विपरीत तेंही । इंद्रालागीं पाही कथी लक्ष्मी ॥ ५ ॥

३२२

कामक्रोधाधीन अधर्मनिरत । कथितां वृद्ध सभ्य करिती थट्टा ॥१॥
गुणहीनही ते मात्सर्यपीडित । उठती न मत्त वृद्ध येतां ॥ २ ॥
पित्यावरी सत्ता चालविती पुत्र । सेवालाभें तोष तयां होई ॥ ३ ॥
अधर्म्यहि मार्गें द्रव्य संपादितां । आनंद तयांच्या चित्ताप्रति ॥४॥
उच्चस्वरें होई भाषण तयांचें । रजनीमाजी वसे सदनीं अग्नि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अवमानी कांता । पतीसी सर्वदा पुत्र ताता ॥ ६ ॥

३२३

वडिलांचा मान बालकपोषण- । त्यागूनि, निर्होम भोजन त्यां ॥ १ ॥
पाचक न त्यांचे शुचित्वें रांधिती । गुप्त न कदापि भक्ष्य त्यांचें ॥२॥
अस्ताव्यस्त धान्य काक मूषकही । भक्षिती, दूधही उघडें पडे ॥
सर्वत्र दुर्लक्ष तयांच्या स्त्रियांचें । ध्वस्त तट गृहें दुर्लक्षिती ॥ ४ ॥
पशूंलागीं तृण उदक न देती । भक्षिती स्वयेंचि बाळांपुढें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पोष्याची न तृप्ति । करिती कदापि अन्नदानें ॥ ६ ॥

३२४

आपणाचिसाठीं करिती पक्वान्नें । देवपितरांचें त्यजिती कार्य ॥ १ ॥
प्रातःकाळीं घोर निद्रा तयांप्रति । नित्य अहोरात्रीं कलह गृहीं ॥२ ॥
थोरांची सेवा न करिती निकृष्ट । आश्रमीजनांस अवमानिती ॥ ३ ॥
परस्पर द्वेष, धर्मबाह्य लोकीं- । संकर करिती, नुरलें शौच ॥ ४ ॥
ज्ञानी अज्ञान्यांसी लेखिती समान । नित्य दुर्वर्तन करिती दासी ॥५॥
वासुदेव म्हणे स्त्रिया त्या पुरुष । पुरुष स्त्रीवेष घेती सौख्यें ॥ ६ ॥

३२५

संपन्नही नास्तिकत्वें पूर्वदत्त । करिताती जप्त इनामादि ॥ १ ॥
अल्पही स्वार्थानें मित्रकार्यनाश । अपहारप्रिय अवघे होती ॥ २ ॥
उच्चवर्णीयही करिती व्यापार । तपोनिष्ठ शूद्र दिसती बहु ॥ ३ ॥
ब्रह्मचर्याविण अध्ययन होई । ब्रह्मचाऱ्या नाहीं अध्ययन ॥ ४ ॥
गुरुसेवाहीन मित्रचि ते शिष्य । याचिती अन्नार्थ मातापिता ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे महावेदवेत्ते । कृषिकर्मे, वैसे मूढ श्राद्धा ॥ ६ ॥

३२६

कार्यदक्षता ते शिष्याप्रति नसे । गुरूचि तयांचें करिती कार्य ॥ १ ॥
सासूश्वशुरांच्या समक्ष ते स्नुषा । शासन सेवकां करी धैर्यें ॥ २ ॥
पतीसीही आज्ञा करिते तोऱ्यानें । कांपतो धाकानें पिता पुत्रां ॥३॥
संकटग्रस्तही मित्रांतें हांसती । कृतघ्नता ऐसी वाढूं लागे ॥ ४ ॥
गुरुस्त्रीगमन तेंवी दुराचार । अभक्ष्य आहार अमर्यादा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐशा दुर्वर्तनें । असुरांचें गेलें सकल तेज ॥ ६ ॥

३२७

लक्ष्मी म्हणे इंद्रा, त्यागूनि दैत्यांसी । आलें या स्थळासी यास्तव मी ॥
स्वीकारीं तूं मज जया धृति आशा । शांति क्षमा श्रद्धा सन्नतीही ॥
'विजिते' सहित देवता या अष्ट । त्यागूनि दैत्यांस येती एथें ॥३॥
ऐकूनि लक्ष्मीचें वचन देवेंद्र । आनंदें स्वर्गांत निघूनि जाई ॥ ४ ॥
आनंदली तदा सकलही धरा । उत्कर्ष जाहला राज्यामाजी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वृत्त तें ऐकतां । सर्व मनोरथां सिद्धि लाभे ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २२८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ५५ समाप्त

## अध्याय २२९ वा

३२८

धर्म म्हणे ताता, कोणता आचार । स्वभाव साचार तेंवी कैसा ॥
विद्या पौरुषही कथावें कोणतें । जेणें ब्रह्मबोधें कृतार्थता ॥ २ ॥
निवेदिती भीष्म देवल एकदां । प्रश्न जैगीषव्या करिती प्रेमें ॥ ३ ॥
निंदा-स्तुतीनें न हर्ष शोक तुम्हां । पावलांती स्थाना ऐशा केंवी ॥४॥
वासुदेव म्हणे मुनि निःसंशय । वदे जैगीषव्यवाणी ऐका ॥ ५ ॥

३२९

निंदा-स्तुतिकर्ते समान सज्जना । निंदकवचना दुर्लक्षिती ॥ १ ॥
पुण्य ते आपुलें राखिताती गुप्त । कदा प्रतिकार करितीचिना ॥ २ ॥
हळ हळ त्यांच्या चित्तासी न कदा । उचित कर्मांचा न घडे त्याग ॥
गताचा न शोक प्रतिज्ञा न कांहीं । याचक न जाई रिक्तहस्त ॥ ४ ॥
सुफल विद्येचें लाभलें जयांसी । सदा निर्विकारी मन त्यांचें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सर्वदा जे शांत । तयां शत्रु आप्त नसे कोणी ॥ ६ ॥

३३०

ऐशा ज्ञात्यांप्रति सौख्य सर्वकाल । सदा धर्मशील तेही सुखी ॥१॥
अमृतलाभाचा अपमानें तोष । मानिती विरक्त सर्वकाल ॥ २ ॥
तैसाचि सन्मान वाटे तयां विष । अलिप्त सर्वत्र निद्रा-तमां ॥ ३ ॥
अपमानकर्ता पावे योग्यफल । पाळी हे सकल नियम ज्ञाता ॥ ४ ॥
तेणें होई त्याचा सहज उत्कर्ष । अंतीं ब्रह्मपद प्राप्त होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे हिरा तो हिराचि । काय गारगोटी हिरा होई ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २२९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ५६ समाप्त

अध्याय २३० वा

३३१

धर्म म्हणे ताता, प्रिय वंद्य गुणी । सांगा ऐसा जनीं कोण असे॥१॥
कथिती तैं भीष्म उग्रसेना कृष्ण । बोलला वचन तेंचि ऐकें ॥ २ ॥
सत्कर्माहंकार नसे नारदासी । ज्ञानासम त्याची क्रिया नित्य ॥ ३ ॥
असंतोष चापल्य न तयाठाईं । यास्तव तो होई वंद्य जनीं ॥ ४ ॥
दीर्घसूत्रता तैं भयही न तया । वाणी निर्विषया नित्य ज्याची ॥५॥
वासुदेव म्हणे ज्ञाता तो समर्थ । असूनियां नित्य क्षमाशील ॥ ६ ॥

३३२

रुजुत्व सत्य तें तेज ज्ञान कीर्ति । विवेक तयासी सकलांहून ॥ १ ॥
जाति तप तैंवी विनय तयाचा । स्वभावही साचा श्रेष्ठ असे ॥ २ ॥
वास्तव्यें जयाच्या सुख सकलांसी । कष्ट भोजनासी नसती ज्याच्या
सन्मानी सज्जनां बोले नित्य हित । मत्सरें न व्याप्त चित्त ज्याचें ॥४॥

अत्यंत कल्याण करी सकलांचें । लेशही न तेथें पातकाचा ॥ ५ ॥
संकटीं अन्यासी पाहूनि न सौख्य । नारद तो वंद्य वासुदेवा ॥ ६ ॥

३३३

वेदश्रवण तैं आख्यानकथन । करूनियां ज्ञान इच्छी सदा ॥ १ ॥
द्वंद्वसहिष्णु तो नावमानी कोणा । सम सर्वजनां मधुरभाषी ॥ २ ॥
पूर्ण शास्त्रज्ञान कथाही अद्‌भुत । अधाशी न, शठ, दैन्यहीन ॥ ३ ॥
क्रोधी लोभीही न पंडित तो जनीं । गुण हे पाहूनि नमिती तया ॥
अर्थ-कामोद्भव कलह न कदा । जाहला तयाचा कवण्या ठाईं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे निर्दोष अलिप्त । निष्ठावंत भक्त ब्रह्मपुत्र ॥ ६ ॥

३३४

घातुक न कदा, दिसे कार्यमग्न । परी कोठें मन लिप्त नसे ॥ १ ॥
अदीर्घसंशयी प्रवक्ता, यास्तव । त्रिलोकीं नारद वंद्य होई ॥ २ ॥
अभिलाषाशून्य कदा आत्मस्तुति । करी न तो जगीं तेणें मान्य ॥ ३ ॥
सर्व वृत्ति जाणे परी नच निंदी । गति तो जीवाची जाणतसे ॥ ४ ॥
निंदी न कोणासी परी सिद्धांतासी । त्यागी न कदापि कवणास्तव ॥
वासुदेव म्हणे अवंध्य काल तो । आसक्ति ठेवितो समाधीची ॥ ६ ॥

३३५

परिश्रमें जेणें संपादिली विद्या । अनवधानता न कदा तेथें ॥ १ ॥
योजितां सत्कर्मीं, करी निर्भयत्वें । गुह्य न कोणाचें प्रगट करी ॥ २ ॥
द्रव्यलाभें हृष्ट अलाभें वा क्लेश । होती न तयास कदाकाळीं ॥ ३ ॥
स्थिरबुद्धि अनासक्त तो सर्वदा । यास्तव त्रैलोक्या वंद्य होई ॥ ४ ॥
दक्ष शुचिर्भूत सर्वगुणयुक्त । उपकारी नित्य कालवेत्ता- ॥ ५ ॥
ऐशा नरा कोण सन्मानी न लोकीं । वासुदेवा भक्ति नारदाची ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २३०वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ५७ समाप्त

अध्याय २३१ वा

३३६

धर्म म्हणे ताता, आदिअंत जीवां । तैसाचि कथावा गुणधर्म ॥ १ ॥
सृष्टिप्रलय तैं सर्वलोकतत्व । कथावें विस्तृत मज प्रेमें ॥ २ ॥

निवेदिती भीष्म शुकाप्रति व्यास । निवेदितों तेंच कथितों ऐकें ॥
अनादिअनंत सृष्ट्यारंभीं एक । शुका, निर्विकार ब्रह्म होतें ॥ ४ ॥
मीलनोन्मीलन नेत्रांचें निमेष । होतां पंचदश काष्ठा एक ॥ ५ ॥
त्रिंशत्काष्ठा होतां कला ते जाणावी । तितुक्याचि पाहीं कला तेंवी
दशांश अधिक होतां तो मुहूर्त । मुहूर्त त्रिंशत अहोरात्र ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे त्रिंशत् दिन तोचि । मास हे बोलती संज्ञा तया ॥८॥

३३७

द्वादश मास तो संवत्सर एक । दक्षिण उत्तर अयनें त्याचीं ॥ १ ॥
निद्रेस्तव रात्र उद्योगार्थ दिन । निर्मी भगवान सूर्य जगीं ॥ २ ॥
मानवांचा मास तोचि पितरदिन । पक्ष शुक्ल कृष्ण दिवस रात्री ॥
मानवांचें वर्ष दिन तो देवांचा । अयनें तयांच्या अहोरात्री ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे कालगणना हे । निवेदिते झाले व्यास शुका ॥ ५ ॥

३३८

चार सहस्र तीं देववर्षें होतां । कृतयुग संज्ञा तया काला ॥ १ ॥
चार चार शत वर्षें संध्याकाल । कृतयुगकाल इतुका जाणें ॥ २ ॥
चतुर्थांश यांचा न्यून प्रतियुगीं । युगाधार जगीं सकल लोकां ॥३ ॥
ब्रह्मवेत्त्यांसीचि कालाचें या ज्ञान । सत्ययुगीं धर्म चतुष्पाद ॥ ४ ॥
पुढती एकेक पाद होई नष्ट । वय, गुण, रूप तेंवी नष्ट ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे युगानुरोधानें । भिन्नभिन्न जाणें धर्म होती ॥ ६ ॥

३३९

कृतयुगामाजी तपासी प्राधान्य । त्रेतायुगीं ज्ञान पुढती यज्ञ ॥ १ ॥
दानचि केवळ श्रेष्ठ कलीमाजी । चतुर्युगें तेंचि महायुग ॥ २ ॥
सहस्र यापरी महायुगें होतां । दिन विरंचीचा होत असे ॥ ३ ॥
रात्रीचें प्रमाण तितुकेंचि त्याच्या । प्रलय विश्वाचा रात्र्यारंभीं ॥
योगनिद्रामग्न तदा भगवान । रजनी संपूर्ण होतां जागा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पुढती हें विश्व । यथाक्रम रूप पावे पुनः ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २३१ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ५८ समाप्त

अध्याय २३२ वा

३४०

तेजोमय सूक्ष्म वासनास्वरूप । शुका, सृष्टिमूळ महत्तत्व ॥ १ ॥
स्थावर जंगम द्विविध हे सृष्टि । मूळ तें एकचि तिजलागीं ॥ २ ॥
व्यक्त तेंचि होतां संज्ञा तया मन । करी तें आच्छन्न चिन्मयासी ॥
महत्तत्व अहंकार तेंवी पंचभूतें । मूळ यास त्यांचें एक मन ॥ ४ ॥
झांकूनि आत्म्यासी आकाशादि पंच । निर्मी मन एक यथाक्रम॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पुढती तीं पंच । होऊनि एकत्र होती देह ॥ ६ ॥

३४१

होऊनियां एक देहांत राहिलीं । पुरुष हे आली संज्ञा तेणें ॥ १ ॥
स्थूल सुक्ष्म तया देहामाजी आत्मा । प्रवेशे त्या संज्ञा ब्रह्मा ऐसी ॥
स्थिरचराचा तो एकचि निर्माता । पूर्वकर्मार्जितां अर्पीतसे ॥ ३ ॥
कर्मासी कारण उद्योग तें दैव । म्हणती स्वभाव कारण त्या ॥ ४ ॥
सर्वेही एकत्र म्हणताती कोणी । अतर्क्यचि कोणी म्हणती भेद ॥
वासुदेव म्हणे वेदबाह्य ऐसीं । मतें वहु लोकीं असती रूढ ॥ ६ ॥

३४२

पंचभूतांसी या ब्रह्मचि कारण । निवेदिती जाण योगिश्रेष्ठ ॥ १ ॥
शम, दमें योग, योगें ईशलाभ । तपें स्मरे वेद ऋषींप्रति ॥ २ ॥
ईश्वरापासूनि लाभे तो ब्रह्म्यासी । संप्रदायें प्राप्ति इतरां होय ॥ ३ ॥
उच्चारूनि साचें विश्व निर्मी ईश । अध्ययन तप ध्यानादीही ॥ ४ ॥
वेदोक्तकर्में त्या ब्रह्मपदप्राप्ति । कर्मचि भेदासी कारण तें ॥ ५ ॥
कर्मविहीन त्या सुषुप्ति समाधि- । माजी न भेदासी वाव कोठें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे निवेदिती व्यास । भीष्म तें धर्मास कथिती, ऐका॥ ७ ॥

३४३

तत्त्वमस्यादिकीं पूर्ण ज्ञान होतां । भेदभाव साचा नष्ट होई ॥ १ ॥
शाब्द-परबोध व्हावा मोक्षेच्छूसी । परब्रह्मप्राप्ति प्रणवजपें ॥ २ ॥
विहितकर्मैंचि उपासिती तया । क्षत्रियादि विप्रां योग श्रेष्ठ ॥ ३ ॥
युगानुरूप हे पालटती धर्म । ऋतूंमाजी धर्म ऋतूंचे जैं ॥ ४ ॥

पूर्वोक्त कालचि कारण सर्वांसी । आधार विश्वासी काल एक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे निवेदिती व्यास । भीष्म तें धर्मास कथिती ऐका॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २३२ वा तथा मोक्षधर्मपर्वांचा अ. ५९ समाप्त

अध्याय २३३ वा ३४४

विरंचीचा दिन लोटतां आकाशीं । तेजाच्या लोटती सप्त ज्वाला ॥
भूमीवरी तदा तृणही न राही । कठिणता येई भूपृष्ठासी ॥ २ ॥
गंधाची पुढती तन्मात्रा उदक । आकर्षी समग्र पुढती भूमि ॥ ३ ॥
रस तेज वायु आकाश तन्मात्रा । यथाक्रम ऐशा लीन होती ॥ ४ ॥
मनामाजी नभतन्मात्रा विलीन । प्रलय तो जाण ब्राह्म ऐसा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सूत्रात्म प्रलय । निवेदिती पाय मुनिचे ऐका ॥ ६ ॥

३४५

व्यष्टिभूत मन समष्टिमनांत । लीन होई त्यास चंद्र संज्ञा ॥ १ ॥
संकल्पचि त्याचें जाणावें शरीर । संकल्पनिरोध तेंचि ज्ञान ॥ २ ॥
अस्मिमात्र ज्ञान त्वंपदार्थ तोचि । काल संज्ञा त्यासी ध्यानीं असो ॥
ग्रासी तो विज्ञाना बल ग्रासी त्यासी । जीवन्मुक्ति हेचि संज्ञा बला ॥
कालसंज्ञक त्या जीवासी पुढती । ग्रासी जीवन्मुक्ति ज्ञानयोगें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अहंनाममात्र । पुढती अवशिष्ट यावद्देह ॥ ६ ॥

३४६

अकारादि तेचि विश्व तैजसादि । अर्धमात्रा तेचि तुरीय तो ॥ १ ॥
बिंदु, नाद, शक्ति, शान्ता या पुढती। अवस्था कथिती व्यासमुनि ॥
ऐसें हें सकळ प्रलयस्वरूप । अंतीं अवशिष्ट एक ब्रह्म ॥ ३ ॥
कांहीं काळ होतां उपाधि निवृत्ति । सत्य तो नव्हेचि प्रलय बाळा ॥
निःसंशय ऐसें कथियेलें शास्त्र । होती वारंवार प्रलय ऐसे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसे हे प्रलय । कथिले अपूर्व पुढती ऐका ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २३३ वा तथा मोक्षधर्मपर्वांचा अ. ६० समाप्त

अध्याय २३४ वा ३४७

जातकर्मादिक संस्कार विप्राचे । सदक्षिण व्हावे ऐसें शास्त्र ॥ १ ॥
गुरुगृहीं वास करावा ज्ञानार्थ । दक्षिणा गुरूस द्यावी यत्नें ॥ २ ॥

आश्रमस्वीकार व्हावा यथाशास्त्र । किंवा ब्रह्मचर्य नैष्ठिक तें ॥ ३ ॥
संन्यासही किंवा स्वीकारावा सौख्यें । गृहस्थें वसावें पुण्यस्थानीं ॥
विपुल विद्या वा तप यज्ञ दान । कीर्तीचे हे जाण मार्ग विप्रा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे इहलोकीं कीर्ति । तोंवरी वसती पुण्यलोकीं ॥ ६ ॥

३४८

षट्कर्मनिरत असावें विप्रानें । आर्तां तोषवावें इष्ट दानें ॥ १ ॥
नसतांही शक्ति पात्रीं द्यावें दान । दुर्लभही दान द्यावें तया ॥ २ ॥
सत्यसंध, रंतिदेवादि बहुत । जाहले कृतार्थ शिबिआदि ॥ ३ ॥
दान यज्ञ प्रजा याचि मार्गे बहु । उद्धरले जाऊं त्याचि पंथें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सत्कर्मनिरत । तेचि जगीं श्रेष्ठ अमरकीर्ति ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति॰ अ. २३४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ६१ समाप्त

अध्याय २३५ वा

३४९

वेद-वेदांगांचा करावा विचार । धर्मपंथ थोर आक्रमावा ॥ १ ॥
ज्ञानलाभ होचि जरीं कर्मसिद्धि । उल्लंघावी नदी संसाराची ॥ २
मोहकारी काल सदा सज्ज असे । सर्वदा विप्रातें ज्ञात असो ॥ ३
स्वभावप्रवाह वाहतो अखंड । जल अहोरात्ररूपी काल ॥ ४ ॥
भोंवरे तें वर्ष वासना मकर । नौका वेदशास्त्र धर्म दीप ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सत्यवचन हें । तीर या जाणावें प्रवाहासी ॥ ६ ॥

३५०

ब्रह्ममूलक हा प्रवाह भयद । दावी यमलोक सकलांप्रति ॥ १ ॥
धैर्यवंत ज्ञाननौका स्वीकारूनि । आनंदें तरूनि जाती यासी ॥ २ ॥
मोहमग्नाचा न कदापि उद्धार । वासनामकर छळिती तया ॥ ३ ॥
उद्धरेल तोचि जाणावा ब्राह्मण । सद्धर्माचरण उद्धारक ॥ ४ ॥
संसारयुक्त तैं शमदमशील । जातां उद्धरेल सुलभतेनें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संकराकारण । न होई तो धन्य नरोत्तम ॥ ६ ॥

३५१

कर्मश्रद्धायुक्त इंद्रियविजयी । प्राज्ञ, ज्या लवही असूया न ॥ १
धर्मा, धर्मज्ञान विवेकें जयासी । कदा तो संकटीं गोंधळेना ॥२

अप्रमत्त धीर अलिप्त जो सम । कदाही न जाण क्लेश तया ॥ ३॥
अतिप्राचीन हीं ब्राह्मणांचीं कर्मे । धर्मार्थ अधर्मं वागे मूढ ॥४॥
कर्माकर्मज्ञान नसे तयांप्रति । विपरीत बुद्धि तेणें होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्वस्वधर्माचार । करी त्या उद्धार निश्चयानें ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २३५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ६२ समाप्त

अध्याय २३६ वा ३५२

अज्ञातेंही होती तारक पुण्यात्मे । न घडे मूढांतें स्वोद्धारही ॥ १ ॥
रोगादिक दोषनिवृत्त जाहला । जयानें जिंकिला कामशत्रु ॥ २ ॥
स्वीकारावीं तेणें देशादि साधनें । सिद्ध होई जेणें योगमार्ग ॥ ३ ॥
सम शुद्ध मनोल्हादक तो देश । कर्म निद्रादिक मर्यादा ते ॥ ४ ॥
सच्छिष्य जाणावा अनुराग त्याचा । आवश्यक द्रव्यां म्हणती अर्थ ॥
आसनादि अंगें उपाय तो जाण । राग द्वेष जाण अपाय तो ॥ ६ ॥
गुरुवेदवाक्यीं विश्वास, निश्चय । इंद्रियांसी नांव चक्षु एथ ॥ ७ ॥
अहार, विषयवृत्तींचा संयम । संकल्पादि मन, जन्म जरा-॥ ८ ॥
व्याधि दुःखादिक दोषपरीक्षण । दर्शन, साधन वासुदेवा ॥ ९ ॥

३५३

त्यागूनि विषयां व्हावें मनरूप । तयाही बुद्धींत निग्रहावें ॥ १ ॥
सूक्ष्मबुद्धीही ते आत्म्यांत अर्पावी । निश्चयें जाणावी मुक्ति येणें ॥
स्वकर्मत्यागाचा दोष न योग्यासी । बैसे योगरथीं तोचि धन्य ॥३॥
उपरोक्त देशादिक तोचि रथ । विषय ते एथ अश्व जाणें ॥ ४ ॥
सर्वशास्त्रज्ञान प्रतोद रथींचा । पुढती रथाच्या श्रद्धा दंभ ॥ ५ ॥
विषयविराग मागोमाग धांवे । शुचित्वचि पाहें पंथ त्याचा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मुमुक्षु या रथीं । बैसे ईशपदीं प्राप्त होण्या ॥ ७ ॥

३५४

इंद्रियनिग्रह साधूनि धारणा । साधील तो राणा योगियांचा ॥ १ ॥
पंचभूतें अहंकार तें अव्यक्त । धारणेच्या सप्त भूमिका या ॥ २ ॥
चरणापासूनि जानू तेचि पृथ्वी । गुदान्त तें पाहीं जलध्यान ॥ ३ ॥
हृदयापर्यंत अग्नि तें भ्रूमध्य । वायूचें प्रसिद्ध स्थान असे ॥ ४ ॥

मस्तकापर्यंत आकाश जाणावें । अहंकारादि ते प्रसिद्धचि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे त्या त्या ध्यानें तें तें । सामर्थ्य योग्यातें प्राप्त होई ॥

३५५

गुरूपदिष्ट त्या मार्गें योगियासी । जातां नीहारचि प्रथम दिसे ॥ १ ॥
सर्वत्र उदक भासे जलध्यानें । पुढती अग्नीनें अग्निरूप ॥ २ ॥
वायुरूपें अंतरिक्षीं घडे वास । लाभे नीलरूप नभध्यानें ॥ ३ ॥
त्या त्या ध्यानें सिद्धि अपूर्व लाभती । योगियासी शक्ति येई ती ती
वासुदेव म्हणे अव्यक्त चिंतनें । ब्रह्मरूप जाणें महायोगी ॥ ५ ॥

३५६

पंचविंशाति तीं तत्वें सांख्ययोगीं । पंचभूतें तेंवी दशेंद्रियें ॥ १ ॥
रूप रसादिक तन्मात्रा त्या पंच । प्रकृति पुरुष महत्तत्व ॥ २ ॥
अहंकार तेंवी मन हीं, तीं तत्वें । भेद कंवी यांतें काथितों तेंही ॥३॥
उत्पत्ति वृद्धि तैं क्षीणत्व विनाश । जयां तेंचि व्यक्त इतर सूक्ष्म ॥
महदादि व्यक्तसंयुक्त तो जीव । ईश्वर अव्यक्त मायामय ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे उपाधीसमान । जड तैं चेतन उभयही हे ॥ ६ ॥

३५७

जीवेश्वरभेद भासचि केवळ । उपादि आधार तयालागीं ॥ १ ॥
उत्पत्तीचा क्रम जाणूनियां लय । व्हावा हेंचि ध्येय वेदान्ताचें ॥ २ ॥
तेणें भेदशून्य चैतन्याचि उरे । विकारित्व सरे सकल येणें ॥ ३ ॥
कठोर भाषण तेंवी क्रूरकर्म । अनिष्टचिंतन न घडे येणें ॥ ४ ॥
इच्छा वा अनिच्छा न शिवे तयासी । अवशिष्ट त्यासी नसे कांहीं ॥
वासुदेव म्हणे लोभाचा संपर्क । अथवा क्लेशलेश नसे तया ॥ ६ ॥

३५८

निग्रहीत सदा इंद्रियें तयाचीं । वेषभूषा त्यासी न रुचे कदा ॥ १ ॥
आसक्ति कार्याची तया नसे कांहीं । एकाग्र तो होई सर्वकाल ॥ २ ॥
निष्फल तयाची इच्छा न कदापि । भूतमात्रीं मैत्री तयालागीं ॥३॥
मृत्तिका पाषाण सुवर्ण त्या सम । द्वंद्वातीत जाण मुक्त होई ॥४॥
अत्यंत वैराग्यें अणिमादि सिद्धि । तुच्छचि तो लेखी आत्मबोधें ॥
सांख्ययोग ऐसे एकचि जाणावे । वासुदेव भावें चिंती हेंचि ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २३६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ६३ समाप्त

अध्याय २३७ वा

३५९

गुरुशास्त्रोक्त तें परोक्ष ज्ञानचि । संसारसागरीं नौका होई ॥ १ ॥
परोक्षज्ञान तें प्रत्यक्षता पावे । ऐशा मार्गी जावें रमूनियां ॥ २ ॥
प्रश्न तें शुकाचा ज्ञान, बुद्धिवृत्ति । प्रवृत्ति निवृत्ति अथवा अन्य ॥३॥
निवेदिली व्यास अधिष्ठानाविण । स्वभावेंचि अज्ञ म्हणती कार्य ॥
परी मुंजतृणीं अंकुरासमान । देहामाजी सूक्ष्म आत्मा असे ॥५॥
वासुदेव म्हणे निवेदिती व्यास । स्वभाववाद्यास नसे मोक्ष ॥ ६ ॥

३६०

एका कारणाचें अस्तित्व या लोकीं । 'स्वभाव' तयासी बोलताती ॥
अन्यवस्तूंतेंही जनीं या अस्तित्व । बोलती 'परिभाव' तयालागीं ॥
कार्यजनकत्व भिन्न भिन्न जन । मानिताती जाण उभयांप्रति ॥ ३ ॥
आसन वाहन गृह कृषिकर्म । ज्ञानीचि हें कर्म निर्मिताती ॥ ४ ॥
स्वभावेंचि सर्व होतें तरी श्रम । कासयासी कोण घेता व्यर्थ ॥५॥
वासुदेव म्हणे प्रवृत्ति निवृत्ति । करी जगामाजी एक ज्ञान ॥ ६ ॥

३६१

ब्रह्म-मायाबोध बुद्धीनेंचि होई । बुद्धींतचि पाहीं विश्व लीन ॥ १ ॥
असंख्य प्राण्याचे चारचि प्रकार । जारज उद्भिज अंडजादि ॥२॥
स्थावराहूनि त्या जंगमा श्रेष्ठत्व । द्विपाद बहुपाद भेद त्यांत ॥ ३ ॥
द्विपाद त्यांमाजी श्रेष्ठ तेही द्विधा । भूचरां श्रेष्ठता पक्षांहूनि ॥ ४ ॥
उत्तम मध्यम भूचर द्विविध । मध्यमाचि श्रेष्ठ जातिधर्में ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मध्यमही द्विधा । धर्मज्ञ तो दुजा अधर्मज्ञ ॥ ६ ॥

३६२

वेदज्ञाता वेद नेणता हे ऐसे । भेद धर्मज्ञाचे प्रथम श्रेष्ठ ॥ १ ॥
वक्ता, अर्थवक्ता ऐसे त्यांत भेद । वक्ता तो वरिष्ठ प्रचारक ॥ २ ॥
ज्ञाता, अज्ञ ऐसे प्रचारकभेद । तयांमाजी श्रेष्ठ ज्ञाता ज्ञानें ॥ ३ ॥
प्रवृत्ति निवृत्ति धर्माचें ज्या ज्ञान । ज्ञाता तोचि धन्य बाळा, शुका ॥
बुद्धीचा तयाच्या लय होतां ब्रह्मीं । ब्राह्मण तयासी म्हणती ज्ञाते ॥

कर्मतत्वज्ञाते ब्राह्मणचि तेही । ब्रह्मज्ञ ते पाहीं साक्षाद्देव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सर्ववरिष्ठ ते । सकल नियंते स्वप्रकाश ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २३७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ६४ समाप्त

अध्याय २३८ वा ३६३

ज्ञानार्थ कर्म हा सनातन पंथ । कालादिक मुख्य म्हणती कोणी ॥
पौरुष दैव वा स्वभावासी कोणी । कारणत्व जनीं निवेदिती ॥ २ ॥
आहेही नाहींही कारणता तयां । श्रेय समुच्चया म्हणती कोणी ॥
योगीयांच्या मतें एक परब्रह्म । सकलां कारण निश्चयानें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्मबोधाविण । सकलही शीण तात्पर्य हें ॥ ५ ॥

३६४

अन्य युगीं शुका, सकलां संशय । वृत्ति निःसंशय सत्ययुगीं ॥ १ ॥
काम-द्वेषशून्य धर्ममार्गी रत । जन ज्ञाननिष्ठ तयावेळीं ॥ २ ॥
ऐशा ज्ञानियांच्या सर्व इच्छा पूर्ण । केवळ न कर्म उद्धारक ॥ ३ ॥
क्षत्रियादि स्वस्वधर्मे आराधिती । ब्राह्मणा जपचि उद्धारक ॥ ४ ॥
दृढ निष्ठायुक्त स्वाध्यायनिरत । द्विज संज्ञा त्यास ज्ञाते देती ॥५॥
वासुदेव म्हणे भूतमात्रीं प्रेम । तयासी ब्राह्मण म्हणती ज्ञाते ॥ ६ ॥

३६५

वेद यज्ञ वर्ण आश्रमादि पूर्ण । त्रेतारंभीं जाण पुढती भेद ॥ १ ॥
द्वापर-कलींत संकटें बहुत । वैदिकधर्मास अज्ञानानें ॥ २ ॥
चतुर्थ युगान्तीं वेदांचें अस्तित्व । शुका, संशयांत येत असे ॥ ३ ॥
धर्मोच्छेदें धेनु दुग्धहीन होती । सकल औषधि रसहीन ॥ ४ ॥
वर्णाश्रमलोप पालटती भूतें । महात्म्य कालाचें ऐसें असे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कालकर्मादिक । कथिती शुकास ऐसे व्यास ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २३८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ६५ समाप्त

अध्याय २३९ वा ३६६

दुर्लभ ब्रह्माचें ज्ञान कवीं होई । शम दम तोही सिद्ध कवीं ॥ १ ॥
शुकाच्या या प्रश्ना उत्तर व्यासांचें । ऐका शांतचित्तें कल्याणार्थ ॥
विद्या तप दान सर्वसंगत्याग । याविण न बोध कवणा होई ॥ ३ ॥

पांचभौतिक या देहांत देवता । इंद्रादिक ताता, करिती वास ॥ ४ ॥
आभासमात्रचि जाणावा हा देह । सकल हें दृश्य त्रिगुणात्मक ॥
वासुदेव म्हणे अनादि वासना । तेंचि बुद्धि जाणा त्रिविध गुणें ॥६॥

३६७

कला सतरावी कळे हृदयांत । दीपासम शुद्ध चित्तसाह्यें ॥ १ ॥
निर्गुणाचा बोध इंद्रियांसी नसे । व्यापी सकलांतें परी आत्मा ॥ २॥
बोध हा जयां ते श्वान-पंडितांत । पाहताती एकमात्र ब्रह्म ॥ ३ ॥
आत्म्यामाजी सर्व, सर्वव्यापी आत्मा । अभेदें या जीवां पाही ज्ञाता॥
नभामाजी पक्षी जळांत कीं मत्स्य । आक्रमिती मार्ग न दिसेचि तो
तैसाचि ज्ञात्याचा उमगे न मार्ग । जाणें येणें व्यर्थ वासुदेवा ॥ ६ ॥

३६८

सकलांसी जीर्ण करीतसे काल । कालाचाही काल न कळे कोणा ॥
मागें पुढें आंत बाहेरी असूनि । नावलोकी कोणी तया देवा ॥ २ ॥
दर्शन तयाचें जया तोचि मुक्त । मोक्ष न अन्यत्र ध्यानीं असो ॥३ ॥
बाणासम नित्य करितां गमन । कुंठितचि जाण गति तेथ ॥ ४ ॥
स्थूलाहूनि स्थूल सूक्ष्माहूनि सूक्ष्म । सर्वत्र त्या कर्ण नेत्रादिक ॥५॥
वासुदेव म्हणे व्यापी जो ब्रह्मांड । कैंवी त्याचा बोध इंद्रियांसी ॥

३६९

अविनाशी तेंवी विनाशी तें एक । जीवां विनाशित्व अविनाशी तो ॥
निष्क्रिया तयासी संसर्गें हीं क्रिया । परी तो जाणावा भासमात्र ॥
महत्तत्व कर्म अविद्या तन्मात्रें । अहंकारासवें द्वारें नऊ ॥ ३ ॥
उपाधिसंयुक्त होतां तो सक्रिय । भासतो निष्क्रिय असूनि नित्य ॥
अविनाशी तत्व कूटस्थ तें ब्रह्म । जाणे तया जन्म-मरण नसे ॥५ ॥
वासुदेव म्हणे निर्विकार चित्तें । आभास मायेचे अवलोकावे ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २३९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ६६ समाप्त

अध्याय २४० वा

३७०

व्यासमुनि योगविधीतें कथिती । निरोधावी बुद्धि तेंवी ज्ञान ॥ १ ॥
काम क्रोध लोभ भय आणि निद्रा । पंच योगदोषां उच्छेदावें ॥ २ ॥

शांतीनें क्रोधासी संकल्पत्यागानें- । कामासी, जिंकावें धैर्यबळें ॥३॥
अनुशीलनचि विविध वस्तूंचें । जिंकितें निद्रेतें बुद्धियोगें ॥ ४ ॥
उपस्थ उदर जिंकावें धैर्यानें । कंटक टाळावे दृष्टिबळें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मनाचा निग्रह । नेत्र-कर्णजय साधीतसे ॥ ६ ॥

३७१

हृदय वाणीही दुर्वृत्तीपासूनि । जिंकावीं योजूनि सत्कर्मातें ॥ १ ॥
सावधानतेनें निर्भयत्व येई । संतसंगें जाई दंभ लया ॥ २ ॥
निरालस्यें ऐसे योगदोष जाती । देवब्राह्मणांची सेवा व्हावी ॥ ३ ॥
संयमावी वाचा चिंतावें कल्याण । योगियांचें ब्रह्म सत्वोत्कर्ष ॥४॥
वासुदेव म्हणे ईश्वराची इच्छा । कारण या विश्वा होत असे ॥ ५॥

३७२

ईशाचिंतन तैं अध्ययन दान । शुचित्वादि गुण तेजदायी ॥ १ ॥
ऐशा तेजलाभें होई पापनाश । पूर्ण मनोरथ तत्वज्ञानें ॥ २ ॥
यदृच्छालाभानें संतुष्ट जो होई । आहारविहारीं युक्त सदा ॥ ३ ॥
इच्छावें तेणेंचि परब्रह्मपद । पुर्वोत्तर रात्र करणें ध्यान ॥ ४ ॥
निग्रहशून्य जें इंद्रिय तें छिद्र । करीतसे भ्रष्ट बुद्धीप्रति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे व्याध दुष्ट मत्स्या । योगी तेंवी चित्ता प्रथम जिंकी ॥

३७३

कर्ण-नेत्रादिक रोधावे पुढती । निरोधावीं चित्तीं सकलेंद्रियें ॥ १ ॥
त्यागूनि संकल्प बुद्धीमाजी मन । योजूनि चिंतन करणें इष्ट ॥ २ ॥
ऐसें ध्येयमग्न होतां आत्म्यामाजी । स्थिरत्व तयांसी येत असे ॥३॥
अग्निनाशें होई दाहकत्वनाश । मलिनत्वनाश इंद्रियजयें ॥ ४ ॥
पुढती केवळ अस्मितास्वरूप । भासे शुद्धरूप परब्रह्म ॥ ५॥
वासुदेव म्हणे अग्नि जैं निर्धूम । बुद्धीमाजी सूक्ष्म तेंवी आत्मा ॥६॥

३७४

ऐशा योगमार्गीं विघ्नेंही बहुत । येती अस्थिरत्व विक्षेपादि ॥ १ ॥
दिव्य गंधादि तैं अंतर्ज्ञानादिक । योगमार्गें प्राप्त होती सिद्धि ॥ २ ॥
परी अनादर करूनि तयांचा । बुद्धींतचि त्यांचा करणें लय ॥ ३ ॥
बुद्धि कल्पना ते लीन होई तेथें । ध्यान त्रिसंधींतें करणें योग्य ॥४॥

पर्वताशिखरीं अथवा वृक्षातळीं । योगाभ्यास करी तया सिद्धि ॥५॥
वासुदेव म्हणे द्रव्यलोभ्यासम । ईश्वरचिंतन करिती योगी ॥ ६ ॥

३७५

एकाग्रता जेणें साधेल तो मार्ग । सकल विघ्नत्याग करूनि व्हावा ॥
गुहा मंदिर वा निर्जन सदन । सेवूनियां ध्यान करणें योग्य ॥ २ ॥
क्रिया वाचा मनें संबंध त्यजावे । उपेक्षीत जावे विषय सर्व ॥ ३ ॥
इष्ट लाभालाभें समत्व राखावें । निंदितां न व्हावें दुःख कदा ॥ ४ ॥
अनासक्ति सदा संचार वायूचे । गुण हे योग्यातें हितप्रद ॥ ५ ॥
सम स्वस्थ योगाभ्यासनिरतासी । निश्चयें षण्मासीं साक्षात्कार॥६॥
वासुदेव म्हणे थोर भाग्य त्याचें । नित्य योग रुचे जयाप्रति ॥ ७ ॥

३७६

सम लोष्टाश्मकांचन । पूर्ण वैराग्यसंपन्न ॥ १ ॥
द्रव्यार्जनीं पाहे दुःख । कदा नसे मोहग्रस्त ॥ २ ॥
लिंग, जातीचें बंधन । योगमार्गी नसे जाण ॥ ३ ॥
आक्रमील जो या पंथा । लाभ निश्चित तयाचा ॥ ४ ॥
नित्य नूतन जें शुद्ध । निर्विकार स्वयंप्रभ ॥ ५ ॥
परब्रह्म त्यां आकळे । योगमार्गी जे रंगले ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मुक्ति । क्रमें लाभते योग्यांसी ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति अ. २४०वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ६७ वा समाप्त

अध्याय २४१ वा ३७७

शुक म्हणे ताता, कर्म, कर्मत्याग । उभयही मार्ग कथिले वेदीं ॥१॥
भिन्न भिन्न तया मार्गांचें जें फल । कथावें सकल मजलागीं ॥ २ ॥
ऐकूनि कथिती व्यास कर्मे बंध । ज्ञानें लाभे मोक्ष ध्यानीं घेई ॥ ३ ॥
संसारासक्त ते स्तविती कर्मासी । न चुके तयांसी जन्म कदा ॥ ४ ॥
सरितोदकें जे तृप्त ते कूपासी । कदा न स्तविती तैंवी कर्म ॥ ५ ॥
सुखदुःख उत्कर्षापकर्ष कर्मे । समाधान ज्ञानें नित्य लाभे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कर्म ज्ञान दोन्ही । भिन्नचि या जनीं दिसती स्पष्ट ॥

३७८

प्रतिपदेची ते चंद्ररेखा जैंवी । कर्मरूप तेंवी ध्यानीं ध्यावें ॥ १ ॥
व्यक्ति त्याचि कला, कर्माचें तें फल । आत्मा निर्विकार पद्मपत्र॥२॥
जीवकृत कर्में जाणावे ते गुण । कर्ता गुणाविण अन्य न त्यां ॥ ३ ॥
अन्यधर्म तेही गुणांचेचि पाहीं । जीवाप्रति नाहीं गुणकर्म ॥ ४ ॥
विज्ञानमय जो कोश तोचि जीव । चेतनस्वभाव भासतसे ॥ ५ ॥
परमात्मा तया जीवाहूनि पर । वासुदेव स्थिर त्याचिं बोधें ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २४१ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ६८ समाप्त

अध्याय २४२ वा ३७९

शुक म्हणे ताता, ईशकृत सृष्टि । तेथ ती आसक्ति जीवकृत ॥ १ ॥
सदाचारें सुटे आसक्ति यास्तव । कथा सदाचार मजलागीं ॥ २ ॥
निवेदिती व्यास ब्रह्मचर्यव्रत । धर्म हाचि श्रेष्ठ प्रथम असे ॥ ३ ॥
गृहस्थादि धर्म यथाक्रम तेही । आचरूनि घ्यावी यतिदीक्षा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसा यथाक्रम । आचरितां धर्म मोक्ष लाभे ॥ ५ ॥

३८०

शुक म्हणे ताता, आचरावीं कर्में । त्यागावींही ऐसें कथिलें वेदीं ॥ १ ॥
कैसीं तीं प्रमाण मानावीं तें कथा । संशय हा माझा दूर करा ॥ २ ॥
निवेदिती व्यास अभिलाष, द्वेष । त्यागितां कर्मास दोष नसे ॥ ३ ॥
यथाक्रम ऐसीं आचरितां कर्में । पात्रता तयानें ज्ञानाची ये ॥ ४ ॥
चतुराश्रम तीं सोपानें जाणावीं । लंघितां ती होई ब्रह्मप्राप्ति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मार्गी या चालतां । पूज्य होई जगा साधक तो ॥ ६ ॥

३८१

चतुर्थांश वय ब्रह्मचारी व्हावें । सर्वदा असावें निर्मत्सर ॥ १ ॥
गुरुगृहीं वास करावा ज्ञानार्थ । सेवाधर्मरत होऊनियां ॥ २ ॥
सेवूनि गुरूसी संपादावें ज्ञान । सरळ वर्तन ठेऊनियां ॥ ३ ॥
अपशब्द कदा वदूंनये कोणा । सिद्ध संबोधितां सदा व्हावें ॥ ४ ॥
शुचिर्भूत कार्यदक्ष व्हावें सदा । सद्‌गुणसंपदा वाढवावी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रिय तें वदून । तोषवावें मन सद्‌गुरूचें ॥ ६ ॥

३८२

न्याहाळावें गुरूलागीं आदरानें । सेवितां तयानें अन्न घ्यावें ॥ १ ॥
आसन प्राशन शयनादि विधि । सद्गुरूच्या आधीं करूं नये ॥ २ ॥
उत्तान करानें स्पर्शूनियां पाद । वंदावे सादर चरण त्यांचे ॥ ३ ॥
सव्यकरें सव्य, वामकरें वाम- । पादातें स्पर्शून नमन व्हावें ॥ ४ ॥
नम्रभावें पाठ झाला तें कथावें । पुढती ऐकावें कथिती तेंचि ॥५॥
वासुदेव म्हणे त्याज्य विषयांतें । त्यागूनि धर्मातें आचरावें ॥ ६ ॥

३८३

गुरुसान्निध्यांत असावें सर्वदा । तोष यथाशक्त्या द्यावा तया ॥ १ ॥
यथाकालीं अन्य आश्रमस्वीकार । करूनि आचार पाळावा तो ॥
चतुर्थांश ऐसा वेदाध्ययनाचा । काल तो पुण्याचा ध्यानीं घ्यावा ॥
अंतीं अर्पूनियां दक्षिणा गुरूसी । समावर्तनाची आज्ञा घ्यावी ॥ ४ ॥
पुढती ठेऊनि अग्निहोत्र गृहीं । आश्रम तो पाहीं शोभवावा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चतुर्थांश ऐसा । द्वितीयाश्रमाचा काल जाणा ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २४२ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ६९ समाप्त

अध्याय २४३ वा

३८४

द्वितीय भाग तो जाणा आयुष्याचा । गृहस्थधर्माचा काळ असे ॥
कुसुल[1] कुंभ[2] तें अश्वस्तन[3] ऐसी । वृत्ति[4] ते कापोती सर्वश्रेष्ठ ॥ २ ॥
यथाक्रम वृत्ति श्रेष्ठ गृहस्थासी । कोणी याजनादि त्यजिती तीन ॥
वानप्रस्थाश्रमीं दान अध्ययन । प्रणवचिंतन मात्र अंतीं ॥ ४ ॥
गृहस्थें न निद्रा घ्यावी संधिकाळीं । अतिथीची व्हावी सेवा नित्य ॥
वासुदेव म्हणे गृहस्थअन्नांत । दांभिकाचा भाग तोही असे ॥ ६ ॥

३८५

यति ब्रह्मचारी यांसी द्यावें अन्न । विघस अमृतान्न तया इष्ट ॥ १ ॥
केवळ स्वस्त्रीचें सेवन त्या योग्य । सदा निर्मत्सर असणें तेणें ॥२॥
सन्मान्य वडिल ज्ञातिबांधवांसी । तेंवी सेवकांसी तंटूं नये ॥ ३ ॥

---

१ टोपलीभर धान्य बाळगणें, २ घडाभर धान्य, ३ दुसऱ्या दिवसाला शिल्लक न ठेवणें, ४ उंछ.

कलहाभावें तो पावतांही हानि । पुण्यचि घ्या ध्यानीं तयाप्रति ॥
तिरस्कारितांही आप्तस्वकीयांनीं । न व्हावेंचि मनीं खिन्न कदा ॥५॥
वासुदेव म्हणे धर्माचें पालन । करील कल्याण कठिण जरी ॥ ६ ॥

३८६

द्रव्यासक्तचित्तें करूं नये कर्म । जेथ ऐसे जन सुराष्ट्र तें ॥ १ ॥
नित्य उत्कर्षातें पावेल तें राष्ट्र । धार्मिक गृहस्थ वसती जेथें ॥ २ ॥
उद्धरी पितरां ऐसा पुण्यवंत । सद्गति तयास निश्चयानें ॥ ३ ॥
शम-दमशील ऐसे भाग्यवंत । स्वर्गांतही पूज्य सकल देवां ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे वानप्रस्थ तोही । निवेदिती पाहीं व्यास आतां ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २४३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ७० समाप्त

## अध्याय २४४ वा

३८७

गृहस्थधर्मातें लंघूनि पुढती । वानप्रस्थामाजी जाती श्रेष्ठ ॥ १ ॥
अवघाचि देश मानिती आश्रम । योजिती आश्रम पुण्यस्थानीं ॥२॥
वलितपलित होतां वनामाजी । वास्तव्य तयांसी इष्ट असे ॥ ३ ॥
सहाव्या मुहूर्तीं करावें भोजन । यज्ञादिक धर्म गृहस्थाचे ॥ ४ ॥
सद्यःप्रक्षालक, मास, वर्ष एक । संचय द्वादश वर्षांस्तव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐशा चतुर्वृत्ति । वानप्रस्थाप्रति असती इष्ट ॥ ६ ॥

३८८

वर्षाकालीं नभ हेमंतीं उदक । पंचाग्नींचें व्रत हेमंतीं त्यां ॥ १ ॥
दंतोलूखलिक किंवा अश्मकुट्ट । एकदां पक्षांत यंवायु ज्यां ॥ २ ॥
वैखानस कोणी सेविताती कंद । फल मूल पुष्प सेवी कोणी ॥ ३ ॥
शम दम श्रेष्ठ सर्व आश्रमांत । भोगिती हे कष्ट थोर थोर ॥ ४ ॥
अलौकिक सौख्य लाभे तयाप्रति । तारका शोभती नभांत ते ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संन्याशाचें शौर्य । दाविताती धीर अंतीं वंद्य ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २४४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ७१ समाप्त

१ प्रतिदिनीं धान्य संपविणारे. २ कण्हेरी

अध्याय २४५ वा

३८९

सोपानत्रय हें चढूनि जो शुद्ध । आश्रम चतुर्थ घ्यावा तेणें ॥ १ ॥
एकाकी तयानें आचरावा योग । सदा शांत चित्त सर्वत्यागें ॥ २ ॥
अल्पाहार तोही एकदां सेवावा । आश्रम करावा वृक्षमूळीं ॥ ३ ॥
कुचैल, उपेक्षा सर्व भूतमात्रीं । लक्षणें हीं ऐसीं संन्याशाचीं ॥ ४ ॥
कूपमग्न गजासम अपशब्द । वक्त्यासी उलट स्पर्शती न ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सांठवी अंतरीं । दुरुत्तरें सारीं धन्य तोचि ॥ ६ ॥

३९०

ज्ञात्याची कदापि करूं नये निंदा । गुणाचि सर्वदा स्वीकारावे ॥ १ ॥
सर्वत्र एकचि अवलोकी तत्व । विश्व निराकार तया वाटे ॥ २ ॥
ब्रह्मनिष्ठ त्यासी लेखिती विबुध । अन्न, वस्त्र, वास यथेच्छ त्या ॥
जनसमुदाया त्यागी सर्पासम । नरकचि अन्न मिष्ट तया ॥ ४ ॥
कामिनी ते प्रेतरूप जयाप्रति । ब्रह्मनिष्ठ त्यासी म्हणती देव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सुखदुःखादिक । मरण जीवित सम ज्ञात्या ॥ ६ ॥

३९१

प्रतीक्षा सर्वदा करावी कालाची । विशुद्ध राखावीं वाणी मन ॥ १ ॥
अलिप्त असावें सर्व कर्मांमाजी । भय न तयासी जगीं कांहीं ॥ २ ॥
जयाचें न भय, जया भय नाहीं । तोचि एक पाहीं ज्ञानिश्रेष्ठ ॥ ३ ॥
हस्तिपद, योगसिद्धि, सर्वश्रेष्ठ । अहिंसा वरिष्ठ तैसी एक ॥ ४ ॥
स्वानुभवतृप्त निरिच्छ निर्भय । बापुडा त्या काय करिल मृत्यु ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे एकाकी जो शांत । ब्राह्मण तयास म्हणती देव ॥ ६ ॥

३९२

धर्मार्थ जीवित, धर्म आत्मार्थचि । वय सत्कर्मासी ब्राह्मण तो ॥ १ ॥
अभय दक्षिणा भूतमात्रांप्रति । निर्भयता त्यासी तोचि मोक्ष ॥ २ ॥
उकार-मकारज्ञान, जयालागीं । धन्य तोचि योगी प्राणायामें ॥ ३ ॥
कालचक्र तेंवी अज्ञान वारूनि । निर्विकार जनीं संचरे जो ॥ ४ ॥
अनिंद्य जो निंदा करी न कोणाची । ब्रह्मरूपप्राप्ति तया एका ॥ ५ ॥

१ कूपांत पडलेला वनविहारीगज कधींच वर येऊं शकत नाहीं.

अलिप्तत्वें तोचि होई मोक्षरूप । ज्ञाता द्वंद्वातीत सर्वकाळ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे एथेंचि त्या मोक्ष । सर्वदा निःसंग ब्रह्मभावें ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २४५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ७२ समाप्त

अध्याय २४६ वा ३९३

देह इंद्रियें तैं मन हे विकार । जाणावे साचार प्रकृतीचे ॥ १ ॥
जीवासी त्यायोगें कर्तृत्वाभिमान । जड ते, सज्ञान जीव एक ॥ २ ॥
इंद्रियांदिकांसी आंवरूनि जीव । गमनादि कार्य करी तेणें ॥ ३ ॥
संकल्पमूलक विषय ते सूक्ष्म । मन तयाहून सूक्ष्म असे ॥ ४ ॥
मनाहूनि बुद्धि जाणावी ते सूक्ष्म । महत्तत्व सूक्ष्म बुद्धीहूनि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे त्याहूनि अज्ञान । सूक्ष्म तयाहून ज्ञान सूक्ष्म ॥ ६ ॥

३९४

सूक्ष्माहूनि सूक्ष्म ज्ञान तोचि आत्मा । अंतिम ते सीमा एकमेव ॥१॥
तयाहूनि पर कांहींही न बापा । गुप्त वास त्याचा सर्वांठाईं ॥ २ ॥
तेणेंचि तयाचा बोध न सुस्पष्ट । होऊनि एकाग्र जाणती त्या ॥ ३ ॥
ध्यानेंचि तयाचें होतसे दर्शन । ध्येय ध्याता ध्यान लय पावे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसा जो अभ्यास । करी जनीं तोच धन्य होई ॥५॥

३९५

परी इंद्रियांच्या आधीन जो होई । काम क्रोध पाहीं तया नित्य ॥१॥
यास्तव संकल्प त्यागूनि निश्चल । व्हावें सर्वकाळ गिरीसम ॥ २ ॥
चित्तशुद्ध होतां पापपुण्य नासे । गाढनिद्रा त्यातें सहज येई ॥ ३ ॥
निर्वात दीपसा निष्कंप तो होई । तदाचि जाणावी चित्तशुद्धि ॥ ४ ॥
त्रिकाळ ध्यानें त्या होई आत्मबोध । शुद्ध हृदयांत प्रगटे ज्ञान ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे निजपुत्रांस्तव । ऋषींनीं अपूर्व कथिलें असे ॥ ६ ॥

३९६

नव्हे अनुमान किंवा आप्तवाक्य । येईल प्रत्यक्ष अनुभवासी ॥ १ ॥
सत्यधर्माच्या हें आख्यानाचें सार । ऋचा दशसहस्र मंत्रियेल्या ॥२॥
सकल शास्त्राचें करूनि मंथन । 'पुत्रानुशासन' नवनीत हें ॥ ३ ॥

तर्कशास्त्रें बुद्धि दग्धचि जयाची । कथावें न त्यासी कदापि हें ॥ ४ ॥
संयम स्वाध्याय श्रद्धा समचित्त । शिष्यासीच मात्र कथावें हें ॥५॥
वासुदेव म्हणे पृथ्वीहूनि थोर । मुनींनीं हें सार कथिलें शुका ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २४६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ७३ समाप्त

अध्याय २४७ वा

३९७

पुशिताती शुक अध्यात्म कथावें । कैंवी तें जाणावें तेंही कथा ॥१॥
कथिताती व्यास हें पांचभौतिक । रचे खचे विश्व भूतांतचि ॥ २ ॥
अंतकाळीं प्राणी धरिती वासना ॥ आकृति त्या नाना तयांसम ॥३॥
विषय इंद्रिय भूत ऐसें त्रय । पृथिव्यादि सर्व ऐसीं देहीं ॥ ४ ॥
शब्दादिक जैंवी आकशादिकांचे । मन बुद्धिही ते वासनाही ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कूर्म जैंवी अंगां । बुद्धि तैं इंद्रियां ओढी सोडी ॥ ६ ॥

३९८

आपादमस्तक हा मी ऐसें ज्ञान । बुद्धीचेंचि जाण कार्य असे ॥ १ ॥
विषय इंद्रियें बुद्धीचेंचि रूप । इंद्रियें तीं पंच मन, बुद्धि ॥ २ ॥
जीव तो आठवा समुदाय ऐसा । आपुलाल्या काजा करी नित्य ॥३॥
सत्व रज तम चित्ताचे हे गुण । शांति क्षोभ तम कार्य त्यांचें ॥४॥
सकारण किंवा निष्कारणचि ते । उद्भवली ऐसें प्रत्यया ये ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विषयदर्शन । अथवा पूर्वकर्म कारण त्या ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २४७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ७४ समाप्त

अध्याय २४८ वा

३९९

त्रिविध रूप तें अंतःकरणासी । अहंकार बुद्धि मन ऐसें ॥ १ ॥
संकल्प तें मन निश्चय ते बुद्धि । इष्टानिष्ट शोधी अहंकार ॥ २ ॥
मनाहूनि बुद्धि आत्माबुद्धीहूनि-। सूक्ष्म, घेई ध्यानीं विवेकानें ॥ ३ ॥
व्यवहारीं आत्मा बुद्धीचि मानिती । निर्मी विषयांसी स्वरूपीं ते ॥
तदा मन संज्ञा पावतेचि बापा । होई भिन्नरूपा विषयांस्तव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे इंद्रियस्वरूपें । सेवी विषयांतें बुद्धीचि ते ॥ ६ ॥

४००

इंद्रियस्वरूपी बुद्धीचा नियंता । आत्मा, बुद्धि त्रिधा गुणें होई ॥१॥

आनंद, शोक वा मोह तिज तेणें। लंघी त्रिगुणांतें परी बुद्धि ॥ २ ॥
अभिलाष तिज होतां तेंचि मन। इंद्रियें जिंकून जिंकीं तिज ॥ ३ ॥
इंद्रियद्वारा ती सेवितां विषय। संकल्पादि बळ पावतसे ॥ ४ ॥
वासनेसम हे बुद्धीचि विविध। होऊनियां भोग भोगीतसे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसे हे बुद्धीचे। खेळ जाणें त्यातें परमानंद ॥ ६ ॥

४०१

सूर्योदय होतां प्रकाश सर्वत्र। तेंवी शुद्धचित्त होतां ज्ञान ॥ १ ॥
जलचर पक्ष्यां लेप न जलाचा। लेप न तैं मुक्ता संसारींही ॥ २ ॥
अनासक्त चित्तें विषय सेवितां। बंधक ते कदा न होतींचि ॥ ३ ॥
सर्वचि ज्या ब्रह्म कदा त्याचि वृत्ति। विषयीं कदा ती ब्रह्मीं रमे ॥४॥
अद्वैत सर्वत्र ऐसें तयाप्रति। साक्षी विषयांसी आत्मरूप ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे बुध्यादिक सर्व। आत्मा, अनुभव ऐसा ज्ञात्या ॥ ६ ॥

४०२

बुद्धि आणि आत्मा उभयही सूक्ष्म। विषयचिंतन करी बुद्धि ॥ १ ॥
साक्षीचि केवळ आत्मा ऐसा भेद। तयांमाजी स्पष्ट जाणे ज्ञाता ॥
असूनियां भिन्न एकरूप होती। वास्तव भ्रमती मोठमोठे ॥ ३ ॥
मत्स्य आणि जल मशकोदुंबर। किंवा मुंजांकुर एकरूप ॥ ४ ॥
तेंवी भिन्न भिन्न असूनियां दोन्ही। एकत्व पावूनि वसती दोघे ॥५॥
वासुदेव म्हणे याचि ऐक्याभासें। भासती विश्वाचे खेळ सर्व ॥६॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २४८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ७५ समाप्त

अध्याय २४९ वा

४०३

बुद्धिकृत ऐसे विषय उदास। भोगीतसे जीव ऐसें भासे ॥ १ ॥
कार्य हें गुणांचें तत्वज्ञानें नासे। अवशेष नसे कांहीं मग ॥ २ ॥
आत्यंतिक नाश नसे कोणा वाटे। युक्तीनेंचि याचें मर्म जाणें ॥ ३ ॥
आत्मा निर्विकार गुणकार्यें जन्मे। एक मात्र ज्ञानें तुटे बंध ॥ ४ ॥
क्रोध आनंद वा मत्सर त्यागावा। संबंध त्यजावा विषयांचा ॥५॥
वासुदेव म्हणे जळांतही ज्ञाता। स्थळासम क्रीडा करी सौख्यें ॥

४०४

उत्पत्ति संहार वैषम्यादि ऐसें । जाणे जो तयातें शांतिलाभ ॥ १ ॥
ज्ञानें शांति हेंचि सार्थक जन्माचें । प्रामुख्यें विप्रातें आधार हा ॥
पाप पुण्य विनिर्मुक्ति याचि ज्ञानें । अन्य न लक्षणें ज्ञानियाचीं ॥३॥
कृतार्थ निर्भया शाश्वत जे गति । त्याहूनि पुढती नसे कांहीं ॥ ४ ॥
दुःखिताचें दुःख पाहूनियां ज्ञाते । खेळ ते बुद्धीचे जाणताती ॥५॥
अनासक्तकर्में प्रारब्ध क्रियमाण । संचित तें जाण ज्ञानें इष्ट ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अलिप्तचि ज्ञाता । संसारींही जैसा उदकीं सूर्य ॥७॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २४९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ७६ समाप्त

अध्याय २५० वा

४०५

शुक म्हणे ताता, सर्वश्रेष्ठ धर्म । मज निवेदून तृप्त करा ॥ १ ॥
कथिती तें व्यास आंवरावीं बाळें । तैसींचि इंद्रियें हाचि धर्म ॥२॥
आंवरूनि तयां व्हावें ध्येयरूप । तदा सर्व सौख्य चरणीं लोळे ॥३॥
धूमहीन अग्नीसम साक्षात्कार । ध्यानेंचि साचार लाभतसे ॥ ४ ॥
महावृक्ष नेणें पुष्पफलें स्वयें । महत्तत्व ध्यावें तेंवी ध्यानीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे परी साक्षी जीव । जाणितो सकल निश्चयानें ॥ ६ ॥

४०६

ब्रह्माकार वृत्ति तोचि महा दीप । दावीतसे रूप परमात्म्याचें ॥ १ ॥
भवबंधकारी कर्मनाश तेणें । शुका, होई ज्ञानें कृतार्थ तूं ॥ २ ॥
शुका, सर्वव्यापी माया महानदी । प्रवाहीं जीवांसी बुडवी बळें ॥३॥
इंद्रियें मकर, संकल्प तें तीर । तृण लोभ-मोह, सर्प काम ॥ ४ ॥
सत्य तोचि घांट, प्रवाहाची धार । जाणावें असत्य, क्रोध पंक ॥
वासनागजांनीं व्याप्त ही दुर्लंघ्य । संसारसिंधूस भेटे वेगें ॥ ६ ॥
वाणीव्यापार हे आवर्त तियेचे । ज्ञानेंचि तियेतें लंघीं शुका ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे नर पर्वतस्थ । तैसें उच्चपद ज्ञात्यालागीं ॥ ८ ॥

४०७

शुका, श्रद्धावंता कथावें हें ज्ञान । होतां ब्रह्मज्ञान जन्म टळे ॥१॥
कथिलें रहस्य तुज गोपनीय । स्वयें अनुभव घेऊनियां ॥ २ ॥

साधनीं कष्टला तयासीच याचा- । बोध, कल्याणाचा मार्ग दावी ॥
वासुदेव म्हणे पुत्रतुल्य शिष्य । निग्रही गुणवंत पात्र ज्ञाना ॥ ४ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २५० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ७७ समाप्त

अध्याय २५१ वा ४०८

विषयानुरोधें वर्तेनाचि ज्ञाता । कीर्ति, अभिलाषा नसे तया ॥१॥
वेदार्थचि नसे कारण ज्ञानासी । वर्तन ज्ञानासी आवश्यक ॥ २ ॥
अनासक्ति तेंवी दयालुत्व हेंचि । श्रेष्ठत्व विप्रासी जाणें बाळा ॥३॥
इच्छाद्वेषत्यागें पावे ब्रह्मरूप । न इच्छी कोणास क्लेश कदा ॥ ४ ॥
सागरीं सरिता वासना त्यापरी । लीन जयामाजी कृतार्थ तो ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वासनाविमुक्त । भवबंध छेद तयासीच ॥ ६ ॥

४०९

वेदसार सत्य इंद्रियनिग्रह । सत्याचें तें सार पुढती दान ॥ १ ॥
दानसार तप, पुढती वैराग्य । सार त्याचें सौख्य, पुढती स्वर्ग ॥
सगुण ब्रह्म तें पुढती निर्गुण । लाभतां हा क्रम कृतार्थता ॥ ३ ॥
संतोषें साधक पावे चित्तशुद्धि । श्रवणमननादि ज्ञानद तीं ॥ ४ ॥
विषयविरागासम अन्य सौख्य । नसे त्रैलोक्यांत ध्यानीं घेईं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अन्नावीण तृप्ति । द्रव्यावीण तुष्टि बल, ज्ञानें ॥ ६ ॥

४१०

सावधान नित्य इंद्रियें आंवरी । रति आत्म्यावरी तयासीच ॥ १ ॥
आत्म्यावरी ज्याचें जडलेंसे चित्त । वासनाविमुक्त जाहला जो ॥
शुक्लेंदुसमान सुख त्याचें वाढे । जाणें जो जडातें दुःख न त्या ॥
इंद्रियविषय क्रमूनि तो राहे । संसर्ग न पाहे तयालागीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे जन्ममरणाची । बाधा न तयासी कदाकाळीं ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २५१ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ७८ समाप्त

अध्याय २५२ वा ४११

मानावमानादि द्वंद्वयुक्तासीही । इच्छितां कथावी आत्मविद्या ॥ १ ॥
पांचभौतिक हें सकलही कार्य । अविद्याचें सर्व विषय निर्मी ॥२॥

पंचभूतें, कर्म, वासना, अज्ञान । बुद्धीसवें मन प्रतिदेहीं ॥ ३ ॥
एकादश संख्य जीव अतींद्रिय । कर्माचा आश्रय ध्यानीं घ्यावा ॥
संस्कारें तो जरी भासे पापलिप्त । तरी तो निष्पाप सर्वकाळ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसा जया बोध । सकाम कर्मास न करीचि तो ॥६॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २५२ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ७९ समाप्त

अध्याय २५३ वा ४१२

स्थूल शरीरातें त्यागितांही सूक्ष्म । शरीरांत जाण वसे जीव ॥ १ ॥
लिंगदेह स्थूल दृष्टीनें न दिसे । परी योगियांतें प्रत्यक्ष तो ॥ २ ॥
स्वाधीन सर्वदा देह तो ज्ञात्यांचा । संचार तयांचा त्रैलोक्यांत ॥
अनुमानेंही तो कळे अज्ञाप्रति । येई अनुभूति शुद्धसत्वें ॥ ४ ॥
स्थूल सूक्ष्म तेंवी लिंगदेह तेही । बाधती न पाहीं ज्ञानीयातें ॥ ५ ॥
सप्तक षट्क तें प्रकृतीचें ज्ञान । वासुदेव धन्य म्हणे तोचि ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २५३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ८० समाप्त

अध्याय २५४ वा ४१३

हृदयांत एक इच्छारूपी वृक्ष । मोहबीज स्कंध मान क्रोध ॥ १ ॥
कार्येच्छा तें आळें, अज्ञान तें मूळ । प्रमादचि जल तयालागीं ॥ २॥
असूया पालवा, पातक तो चीक । विस्तार त्या मोह-चिंता बहु ॥
शाखा तया शोक, अंकुर ते भीति । अशांतता वेष्टि तयाप्रति ॥ ४ ॥
स्त्रीसंगकामनाबद्ध, लोभग्रस्त । जमूनि एकत्र सेविती त्या ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आंवरूनि पाश । छेदिती वृक्षास तेचि धन्य ॥ ६ ॥

४१४

पुत्र कलत्रादि इच्छूनियां वृक्षा । सेविती तयांचा तेणें नाश ॥ १ ॥
सुज्ञ योग्याभ्यासें समाधीखड्गानें । छेदी या वृक्षातें महा यत्नें ॥

१ इंद्रियें, विषय, मन, बुद्धि, महत्तत्व, अव्यक्त व पुरुष हे सूक्ष्म पदार्थ.
२ सर्वज्ञता, तृप्ति, ज्ञान, स्वतंत्रता, सर्वदा सर्वद्रष्टृत्व आणि अनंतशक्तिमत्व या सहा गुणांनीं युक्त ईश्वर.

यापरी इच्छेची निवृत्ति जो करी । मुक्त तो संसारीं सहज होई ॥
वासुदेव म्हणे विविध कामना । कारण बंधना होती जीवा ॥४॥

४१५

शुका, देहपुरीं स्वामिनी ते बुद्धि । प्रधान तिजसी जाणें मन ॥१॥
अंतःकरण तैं इंद्रियें ते पौर । अहंकार दोष प्रधानाचा ॥ २ ॥
क्रियाफल तेणें पालटूनि जाई । जीविका ते पाहीं इंद्रियांची ॥ ३ ॥
विपरीत रूप पावे तेणें बुद्धि । विनाशचि अंतीं होत असे ॥ ४ ॥
नाशस्मरणें त्या मनालागीं दुःख । बुद्धीतेंही ताप तया दुःखें ॥ ५ ॥
बुद्धिस्थित तेणें आत्म्यातेंही दुःख । सकलांतें दुःख ऐशापरी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसी हे नगरी । दुःखाच्या सागरीं बुडूनि जाई ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २५४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ८१ समाप्त

अध्याय २५५ वा

४१६

धर्माप्रति भीष्म व्यासोक्त बोधासी । प्रेमें निवेदिती, श्रवण करा ॥
स्थिरत्व, गुरुत्व, काठिण्य तैं बंध । गंध, ग्राहकत्व, प्रसवशक्ति ॥
संघात, स्थापना, धारकत्व, पुष्टि । गुण हे पृथ्वीसी स्वाभाविक ॥
शैत्य, रस, क्लेद, द्रवत्व तैं स्नेह । सौम्यता, संघात, रसना, स्राव ॥
पार्थिव द्रव्यांचें पाचकत्व ऐसे । गुण उदकाचे स्वाभाविक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे तेजादि तत्वांचे । गुण व्यासोक्त ते श्रवण करा ॥६॥

४१७

दुर्धर्षत्व, ज्योति, ताप, तेज, पाक । शोक, अनुराग, तीक्ष्णता ते ॥
शीघ्रग्रामित्व तैं सदा ऊर्ध्वभास । तेजाचे हे दश गुण जाणें ॥ २ ॥
अनुष्णाशीतत्व भाषण तैं स्त्यान[1] । स्वातंत्र्य, गमन शीघ्रता ते ॥
उत्सर्ग गमन श्वासोच्छ्वास प्राण । जनन-मरण वायूचे हे ॥ ४ ॥
शब्द, व्यापकता, अवकाश तेंवी । अनाश्रय[2] पाहीं अनालंब[3] ॥ ५ ॥
अव्यक्तत्व अविकारित्व विकार । अकुंठित्व थोर कारणत्व ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दश दश ऐसे । गुण त्या भूतांचे निवेदिले ॥ ७ ॥

१ फुगणें २ कोणाला आश्रय न होणें. ३ कोणाचा आश्रय न घेणें.

४१८

ऊहापोहशक्ति, स्मरण, धैर्य, भ्रम । शुभाशुभ जाण वृत्ति क्षमा ॥१॥
कल्पना चांचल्य गुण हे मनाचे । नवसंख्य ऐसे कथिले शास्त्रीं ॥
उत्साह, संशय, निद्रा, स्थैर्य, ज्ञान । बुद्धीचे हे गुण सुविख्यात ॥
गुण हे सकल बुद्धीचेचि धर्मा । व्यापूनियां आत्मा सकलांप्रति ॥
श्रुतिविरोधी जीं मतें तीं अयुक्त । शुका, ब्रह्मबोध घेईं ध्यानीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ईश्वरोक्त वेद । प्रत्यक्ष तो बोध कथिती व्यास ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २५५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ८२ समाप्त

अध्याय २५६ वा ४१९

धर्म म्हणे ताता, बलाढ्य हे वीर । मृत परस्पर रणीं झाले ॥ १ ॥
मृत संज्ञा कैंवी लाभली यांप्रति । प्राप्त या जगतीं कैंवी मृत्यु ॥ २ ॥
अमरासम तो संहारी जनांसी । किमर्थ मजसी निवेदावें ॥ ३ ॥
निवेदिती भीष्म पुरा अकंपन । नामें एक जाण राजा होता ॥ ४ ॥
हरिनामें त्याचा पुत्र विष्णूसम । शौर्यानें मरून पडला रणीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सांत्वनार्थ वृत्त । कथिती नारद नृपासी त्या ॥ ६ ॥

४२०

प्रजावृद्धि पुरा जाहली बहुत । श्वासही कोणास न घेववे ॥ १ ॥
संहार प्रजेचा इच्छी तदा ब्रह्मा । कारण दिसेना परी तया ॥ २ ॥
अंतीं क्रोधाकुल होतांचि तो अग्नि । त्रैलोक्य जाळूनि भस्म करी ॥
दयाळु शंकर शरण तैं जाती । कर विरंचीसी जोडूनियां ॥ ४ ॥
प्रसन्न तैं ब्रह्मा म्हणे मागें वर । इच्छिसी जें कार्य करीन तें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे लोकहितेच्छेनें । ब्रह्मयातें शिवानें प्रार्थियेलें ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २५६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ८३ समाप्त

अध्याय २५७ वा ४२१

शिव म्हणे प्रभो, प्रजा सर्व दग्ध । करूं नको रोष ऐशापरी ॥ १ ॥
ब्रह्मा म्हणे भार भूमीचा हरावा । हाचि ध्यानीं घ्यावा हेतु मम ॥२॥
शिव म्हणे प्रभो, अन्य मार्ग योजा । परी दाह ऐसा करूं नका ॥३॥

पुनर्जन्म यांसी लाभावा हे इच्छा । देवा, उत्पत्तीचा स्वामी तूंचि ॥
ऐकूनि तें ब्रह्मा शांत करी अग्नि । तदा तयास्थानीं नवल होई ॥५॥
वासुदेव म्हणे कृष्णवर्ण एक । प्रगटली तेथ रम्य नारी ॥ ६ ॥

४२२

रक्तवस्त्रा दिव्य अलंकारवती । दक्षिण दिशेसी जाई नारी ॥ १ ॥
संबोधी तिजसी ब्रह्मा 'मृत्यो' ऐसें । प्रजासंहाराचें कार्य सांगे ॥२॥
ऐकूनि ते वाला दुःखें अश्रु ढाळी । ओंजळींत धरी अश्रु ब्रह्मा ॥३॥
पुनरपि तिज परी कथी तेंचि । वासुदेव कथी पुढती वृत्त ॥ ४ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २५७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ८४ समाप्त

अध्याय २५८ वा

४२३

मृत्यु म्हणे देवा, क्रूर केंवी होऊं । हिंसाकर्मीं राहूं रत केंवी ॥ १ ॥
वंदितें मी तुज प्रसन्न व्हा देवा । निरागस जीवां केंवी वधूं ॥ २ ॥
पुत्र मित्र प्रिय बंधु माता-पिता । शापितील त्यांचा करितां वध ॥
अश्रुप्रवाह तो जाळील मजसी । यास्तव तुजसी शरण आलें ॥ ४ ॥
प्रार्थितें मी तुज घडो न संहार । प्रायश्चित्त घोर असह्य तें ॥ ५ ॥
ब्रह्मा म्हणे तव निर्मिति ज्यास्तव । करावें तें कार्य, चिंतूं नको ॥६॥
वासुदेव म्हणे आज्ञेचें पालन । सर्वश्रेष्ठ गुण कार्यामाजी ॥ ७ ॥

४२४

ऐकूनियां मृत्यु राहियेली स्वस्थ । ब्रह्मा होतां शांत निघूनि गेली ॥
असंख्यात वर्षें भिन्न भिन्न स्थानीं । प्रखर जाऊनि तप करी ॥ २ ॥
परी पुनरपि तेंचि कथी ब्रह्मा । परी न अधर्मा प्रवर्ते ते ॥ ३ ॥
संतोषूनि तदा ब्रह्मा म्हणे तुज । लवही न दोष वधितां प्रजा ॥ ४ ॥
प्रवेशेल धर्म मृत्यो, तुझ्या ठाईं । व्याधिग्रस्त होई तेंवी प्रजा ॥५॥
व्याधींनेंचि नाश ऐसें मानितील । दोष न देतील तुजसी कोणी ॥६॥
वासुदेव म्हणे मृत्यु त्या त्या भूतीं । राहो त्या त्या लिंगीं म्हणे ब्रह्मा

४२५

नाहीं नाहीं ऐसें मृत्यु परी बोले । ब्रह्मयानें कथिलें तदा तिज ॥ १ ॥
मनुष्यादिकांसी वधावें, न देवां । धर्म हा जाणावा तुजलागीं ॥ २ ॥

अश्रुबिंदु तव होतील ते व्याधि । तुझ्यासमक्षचि घेतले ते ॥ ३ ॥
अंतकालीं जीवा काम-क्रोधयुक्त । करीं होंचि तुज कार्य असे ॥ ४ ॥
समत्वें तुजसी अधर्म न, जाणें । धर्मप्राप्त कर्म तुजसी बहु ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मृत्यु शापभयें । रुकार ब्रह्मयातें देई तदा ॥ ६ ॥

४२६

स्वीकारिलें कार्य यापरी मृत्यूनें । अश्रु तेचि जाणें व्याधि होती ॥
वायूसम प्राण, देहासी मरण । जीव पुनर्जन्म पावताती ॥ २ ॥
पुण्यक्षयें मृत्युलोकीं येती देव । मर्त्य तयां नांव ऐसें येई ॥ ३ ॥
पुण्यकर्में तेंवी नरासी देवत्व । तेणें संज्ञा देव, मानवांतें ॥ ४ ॥
तात्पर्य प्राण्यासी न टळेचि जन्म । यास्तव शोक न, करीं राया ॥
पुत्र तुझा राया, जन्मूनियां कोठें । आनंदांत असे कथिती मुनि ॥
वासुदेव म्हणे ऐसें मृत्युवृत्त । कथिती धर्मास पितामह ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २५८ वा तथा मोक्षधर्मपर्वीचा अ. ८५ समाप्त

अध्याय २५९ वा ४२७

धर्म म्हणे ताता, सर्वचि शंकित । धर्माचें स्वरूप कथन करा ॥ १ ॥
उत्पत्ति तयाची इह-परप्राप्ति । किंवा उभयहीं लाभ कथा ॥ २ ॥
निवेदिती भीष्म श्रुति-स्मृति तेंवी । सदाचार पाहीं धर्मचिन्हें ॥ ३ ॥
परोपकारही चतुर्थ लक्षण । मानिती व्युत्क्रम उच्च-नीच ॥ ४ ॥
आलस्यें संन्यास, लौल्येंचि गार्हस्थ्य । ऐसा विपरीत घेती भाव ॥
दोषदृष्टीनें या व्यवहारा विघ्न । हितार्थेचि धर्म योजियेला ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे इहपरलाभ । कथिती धर्मास पितामह ॥ ७ ॥

४२८

धर्म तो अधर्म, अधर्म तो धर्म- । विपत्काळीं, ज्ञान न ज्यां ऐसें ॥ १ ॥
तारतम्य तयां न कळे धर्माचें । पापीही पापातें निंदी कदा ॥ २ ॥
आचारचि मूळ धर्माचें जाणूनि । आचार करूनि मुक्त व्हावें ॥ ३ ॥
आत्मदोष कदा दिसती न कोणा । नित्य आणी ध्याना परदोष ॥ ४ ॥
तस्कर परातें लुटूनियां सौख्य । मानी निजनाश होतां दुःखी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे होतां अपहार । जातसे तस्कर राजद्वारीं ॥ ६ ॥

४२९

धर्मा, सत्य हाचि मानीं श्रेष्ठ धर्म । दुष्ट घोरकर्म करिती सत्यें ॥१॥
परस्परांमाजी पाळूनि शपथा । दुष्ट घोर कृत्या प्रवर्तती ॥ २ ॥
अपहार कदा न घडो, हा धर्म । मानिती दुर्जन दौर्बल्य तें ॥ ३ ॥
दुर्दैवें तयांसी येतांचि दौर्बल्य । रुचे श्रेष्ठ तत्व तेंचि तयां ॥ ४ ॥
दुर्बल बलाढ्य नसे कोणी नित्य । यास्तवचि सत्य वरणें सदा ॥५॥
वासुदेव म्हणे तस्करासी भय । सर्वदा निर्भय पुण्यवंत ॥ ६ ॥

४३०

प्राणिहितास्तव कथियेलें दान । परी धनाढ्य न स्तविती तया ॥१॥
प्रवर्तक याचे वाटे त्यां दरिद्रि । येतां त्यां विपत्ति धर्म रुचे ॥ २ ॥
परस्त्रीलंपटा भार्येचा अपहार । होतां, दुःखभार साहवेना ॥ ३ ॥
तात्पर्य सत्यांचि रुचे आपणासी । वर्तावें परासी त्याचि परी ॥ ४ ॥
जीविताची इच्छा धरी जो तयातें । काय योग्य असे अन्यवध ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे द्यावें जें परासी । तेंचि आपणासी लाभतसे ॥ ६ ॥

४३१

जें जें अधिक तें वांटावें दीनांतें । संग्रह न रुचे अधिक देवां ॥ १ ॥
दया दान धर्में देवतासान्निध्य । लाभे तोचि मार्ग स्वीकारावा ॥२॥
लाभार्थही कदा त्यागूं नये धर्म । प्रिय तोचि धर्म भूतमात्रां ॥ ३ ॥
लोकसंग्राहक सूक्ष्मधर्म ऐसा । योजूनि विधाता तुष्ट झाला ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे भीष्म धर्मांप्रति । कदा कुटिलबुद्धि म्हणती नसो ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २५९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ८६ समाप्त

अध्याय २६० वा

४३२

धर्म म्हणे ताता, प्राणी निजकर्म । भोगी तेथ धर्म काय करी ॥ १ ॥
केवळ वेदेंचि धर्मांचें महत्व । नसतां अनुभव कैंवी ठसे ॥ २ ॥
स्वरूपही त्यांचें स्थिर नसे कांहीं । भिन्न भिन्न होई समयीं धर्म॥३॥
वेदानें न होई विपत्तींचें ज्ञान । विपत्तीसमान धर्म घडे ॥ ४ ॥
यास्तव धर्मांचें स्वरूप न स्थिर । कैंवी सुजनाचार प्रमाण त्या ॥५॥
अन्योन्याश्रयत्व दोष येई तेणें । वासुदेव म्हणे पुढती ऐका ॥ ६ ॥

४३३

वेदवचनही न होई प्रमाण । युगासम धर्म ऱ्हास पावे ॥ १ ॥
वेदांचाही ऱ्हास होई प्रतियुगीं । प्रामाण्य तयांसी कैंवी मग ॥ २ ॥
वेदमूलकचि स्मृतीचें प्रामाण्य । यास्तव तें गौण सिद्ध होई ॥ ३ ॥
प्रमाणाप्रमाण द्विधा वेदवाक्यें । प्रामाण्य विरोधें कैंवी येई ॥ ४ ॥
बलाढ्य दुष्टांच्या वर्तनें धर्माचें । रूप पालटे जें तेंही नासे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धर्माची हे शंका । पीडी बहुलोकां सर्वकाल ॥ ६ ॥

४३४

कळे कांहीं, कांहीं नकळेचि धर्म । अशक्यचि ज्ञान अवशिष्टाचें ॥१॥
क्षुरधारेसम सूक्ष्म त्याचें रूप । तैसाचि पर्वत महत्वानें ॥ २ ॥
गंधर्वनगरीसम वरी वरी । चिंतितांचि परी न उरे कांहीं ॥ ३ ॥
क्षेत्रस्थ उदकासमचि हा नष्ट । सेविती कामुक बहु तया ॥ ४ ॥
सकाम आचार तेचि होती धर्म । करिती कथन संत तेंचि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रलापचि दुष्ट- । मानिती, सदुक्त आचारांतें ॥ ६ ॥

४३५

स्वधर्म त्यागूनि राजधर्माश्रित । झाले कोणी नित्य नसे धर्म ॥ १ ॥
एकाचि आचार एका सुखप्रद । अन्यासी कष्टद होत असे ॥ २ ॥
आचारेंचि कोणी होई बलवंत । पीडी तो अन्यास, स्थिर कोणी ॥
तात्पर्य आचारें स्थिर नसे फल । प्रमाण आचार कैंवी मग ॥ ४ ॥
स्वभावचि मज वाटे धर्ममूळ । शाश्वत आचार तेणें घडे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्पष्टपणें धर्म । भीष्मांप्रति प्रश्न करी ऐसा ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २६० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ८७ समाप्त

अध्याय २६१ वा ४३६

निवेदिती भीष्म पुरा काननांत । जाजलीनामक कोणी विप्र ॥ १ ॥
समुद्रप्रदेशीं केलें तेणें तप । मलिन सर्वांग त्याचें होई ॥ २ ॥
राहूनि जळांत तपोबळें पृथ्वी । मुनि अवलोकी आनंदानें ॥ ३ ॥
पुढती तयासी वाटे मजसम । जगीं कोणीही न अन्य तपी ॥ ४ ॥

१ शेतांतील

राक्षसापिशाचातेंही कथीं ऐसें। बोलती ते त्यातें ऐसें न म्हणे ॥ ५॥
वासुदेव म्हणे 'तुलाधार' एक। बोलले पिशाच तुझ्यासम ॥ ६ ॥

४३७

ऐकूनि जाजलि, तुलाधारभेटी । घ्यावया काशीसी प्राप्त झाला ॥
धर्म म्हणे ताता, जाजलीचें तप। निवेदावें मज कृपावंता ॥ २ ॥
कथिती तैं भीष्म वानप्रस्थधर्मं। जाजली आस्थेनें करी तप ॥ ३ ॥
निरभिमान तो बहु कष्ट करी। वृष्टि घेतां शिरीं भिजल्या जटा ॥४॥
काष्ठासमान तो एकदां निश्चेष्ट। मस्तकीं कुलिंग करिती वास ॥५॥
वासुदेव म्हणे दयाळु तो मुनि। पक्षांसी जाणूनि दुखवीनाचि ॥६॥

४३८

पिलेंही पक्षांनीं घातलीं मस्तकीं। हालला नाहींचि परी मुनि ॥ १ ॥
वाढलीं तीं पिलें परी मुनि स्थिर। करिती संचार वनीं पक्षी ॥२॥
बहुकाळ तेथें राहूनियां अंतीं। स्थान तैं त्यागिती सहज पक्षी ॥३॥
पाहूनियां गर्व होई जाजलीतें। अर्चीं तो सूर्यातें अभिमानें ॥ ४ ॥
अंतीं तो गर्विष्ठ म्हणे मीचि श्रेष्ठ। थोपटूनि दंड वनामाजी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे होतां अभिमान। व्यर्थ जाई पुण्य क्षणमात्रें ॥ ६ ॥

४३९

थोपटितां दंड होई नभोवाणी। काशीक्षेत्रीं ज्ञानी तुलाधार ॥ १ ॥
तयातेंही ऐसा शोभेनाचि गर्व। प्रतिष्ठा ते काय तेथें तव ॥ २ ॥
ऐकूनि जाजली काशीक्षेत्रीं येई। आदरी त्या पाहीं तुलाधार ॥ ३ ॥
अंतर्ज्ञानें वृत्त तयाचें तयासी। सविस्तर कथी तयास्थानीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे कथूनियां वृत्त। म्हणे तुलाधार सेवा सांगा ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २६१ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ८८ समाप्त

अध्याय २६२ वा

४४०

जाजली विचारी तुलाधारा, तुज। होई ज्ञान प्राप्त कैंवी कथीं ॥१ ॥
वैश्यश्रेष्ठ म्हणे अद्रोहें वा अल्प-। द्रोहें हें जीवित धर्म ऐसा ॥ २ ॥
जीविका मी तैसी चालवितों मुने। व्यापार धर्मानें करीतसें ॥ ३ ॥

---

१ चिमण्या

मदिराविक्रय न करीं सर्वथा । क्रीतचि पदार्थां विक्रीतसें ॥ ४ ॥
क्रिया वाचा मनें सर्वांचें कल्याण । इच्छी तो धर्मज्ञ जगन्मित्र ॥५॥
वासुदेव म्हण अनुराध किंवा । विरोध द्वेष वा न रुचे ज्ञात्या ॥६॥

४४१

सम मी सर्वांशीं तुला माझी सम । निंदास्तुति जाण वर्ज्य मज ॥
मेघांसम लोक विचित्र जाणूनि । ढेकुळ-कांचनीं सम असें ॥ २ ॥
अंध बधिर मी ज्ञानें विषयांत । वृद्ध रोगग्रस्त निरिच्छ जें ॥ ३ ॥
निर्भय जो, ज्याचें भय नसे कोणा । रागद्वेषहीना म्हणती ज्ञानी ॥
अभय तो देई सर्व भूतांप्रति । वद्ध न तयासी करी धर्म ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भय ज्याचें जनां । विविध यातना तयाप्रति ॥ ६ ॥

४४२

पुत्र-पौत्रयुक्त अहिंसक पूज्य । मार्ग त्यांचा मज रुचे सदा ॥ १ ॥
सदाचारही जे भ्रांतींत पाडिती । विद्वानही होती मूढ जेथें ॥ २ ॥
यास्तव अयोग्य कृत्यें थोरांचींही । जाणावीं त्याज्याचि शास्त्रबाह्य॥
सदाचारें ज्ञाता शीघ्र मोक्षपात्र । काष्ठाप्रति काष्ठ उदकीं भेटे ॥ ४ ॥
तैसेंचि प्राण्यांचे संबंध जाणावे । वियोगही पाहें अनिच्छेनें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रवाहपतित । मूढ, ज्ञाता नित्य स्थिर राहे ॥ ६ ॥

४४३

अभय धर्मातें साधावें प्रयत्नें । कीर्तीस्तव यातें वरिती कोणी ॥ १॥
ब्रह्मबोधार्थचि आचरिती ज्ञाते । यश दानादींचें फल येणें ॥ २ ॥
सर्पासम ज्याचें भय सकलांसी । कदा न तयासी शांतिलाभ ॥ ३ ॥
अभयद व्यापी सकल विश्वासी । गमन न त्यासी कदा कोठें ॥ ४ ॥
कामनिककर्में अशाश्वत सौख्य । होई ब्रह्मबोध सूक्ष्मधर्में ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्मबोध स्वर्ग । धर्माचें द्विविध फल ऐसें ॥ ६ ॥

४४४

वृषण, मस्तक छेदिती प्राण्यांचें । जाजले, तयांतें दोष न कीं ॥ १ ॥
आदित्यादि देहीं देवता प्राण्यांच्या । कैंवी वध त्यांचा करणें योग्य॥
अज अग्नि, मेष वरुण, तो अश्व- । सूर्यचि, प्रत्यक्ष धेनु पृथ्वी ॥३॥
वत्स तिचा सोम तयासी विकितां । सिद्धि कैंवी ज्ञाता येई सांगें ॥

कृषिजीविका ते वाटे निर्दयाची । नांगरें जीवांची हत्या बहु ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अवध्य वृषभ । धेनूही तैसीच कथिलें शास्त्रीं ॥ ६ ॥

४४५

धेनु तेचि माता, वृष प्रजापति । वधी त्याच्या माथीं तेचि दोष ॥१॥
ऐसें नहुषासी कथूनियां ऋषि । पाप भोगण्यासी सिद्ध झाले ॥ २ ॥
अंतीं एकशतएकसंख्य रोग- । रूपें नृपपाप विभागिलें ॥ ३ ॥
तात्पर्य आचार थोरांचेही दुष्ट । जाणूनियां त्याज्य मानी ज्ञाता ॥
जाणूनियां हेतू आचरावा धर्म । निंद्य आचरण त्याज्य सदा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शत्रुमित्र सम । जया तोचि धर्ममर्मज्ञाता ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २६२ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ८९ समाप्त

अध्याय २६३ वा

४४६

तुलाधाराप्रति जाजली बोलला । निंदिसी धर्माला अयोग्य हें ॥ १ ॥
कृषिकर्मनिंदा करूनियां अन्न । भक्षिसी हें आण ध्यानामाजी ॥ २ ॥
ओषधि पशु हे जीविका नराची । कैंवी तूं निंदिसी यज्ञातेंही ॥ ३ ॥
नास्तिकप्रलाप भासती हे तव । उच्छिन्न हें विश्व येणें होई ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे तुलाधार तदा । सधर्ममर्यादा कथन करी ॥ ५ ॥

४४७

विप्रा, नास्तिक मी नसें यज्ञनिंदा । न करीं सर्वथा ध्यानीं घेईं ॥१॥
यज्ञज्ञाते, यज्ञकर्ते जनीं अल्प । नमन तयांस असो माझें ॥ २ ॥
योग यज्ञत्याग करूनि विप्रांनीं । रुचि क्षत्रयज्ञीं धरिली असे ॥ ३ ॥
अर्थवादें मोह पावूनि असत्य । मानूनियां सत्य रूढ केलें ॥ ४ ॥
हें घ्या हें घ्या ऐसा बहु दानयुक्त । यज्ञ तो प्रशस्त, इतर चौर्य ॥५॥
वासुदेव म्हणे देवतासंतोष । यज्ञ विधियुक्त करितां होई ॥ ६ ॥

४४८

काम्यकर्में संततीही होई तैसी । जियेप्रति रुचि काम्यकर्मीं ॥ १ ॥
लोभ्याप्रति लोभी अनासक्तां तैसा । लाभे पुत्र ऐसा नियम जाणें ॥
यज्ञाहुति सूर्या, सूर्य करी वृष्टि । अन्न प्रजा ऐसी परंपरा ॥ ३ ॥
यज्ञावरी होती निष्ठा पूर्वकाळीं । पिकती तैं साळी न नांगरितां ॥४॥

इच्छामात्रें लता तदा प्रफुल्लित । श्रद्धाहीन दुष्ट अर्थकामी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कुतर्कें वेदांसी । निंदी त्या नरासी नरकप्राप्ति ॥ ६ ॥

४४९

आवश्यक कर्म न करितां पाप । ज्ञान हें विप्रास सर्वकाल ॥ १ ॥
ऋत्विज मंत्रादि परब्रह्मरूप । जाणे तोचि विप्र ध्यानीं असो ॥ २ ॥
कर्माधिकाराचा नसे अभिमान । जाणावा ब्राह्मण सत्यत्वें तो ॥ ३ ॥
वैगुण्ययुक्तही कर्मं तया दोष । नसे ऐसें श्रेष्ठ निवेदिती ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे प्रामुख्यें सद्भाव । मोक्षाचा उपाय म्हणती ज्ञाते ॥

४५०

कर्मभ्रष्ट होतां घ्यावें प्रायश्चित्त । पुरा जन तृप्त मोक्षकाम ॥ १ ॥
निग्रही उदार अमात्सर्ययुक्त । देहात्मविभेदज्ञाते श्रेष्ठ ॥ २ ॥
आत्मयज्ञयोगीं निष्णात ते होते । प्रणवजपातें करिती नित्य ॥ ३ ॥
जाजले, ज्ञात्याच्या भोजनें देवता । पावती संतोषा सर्वकाळ ॥ ४ ॥
नित्य तृप्त ज्ञाते द्रव्ययज्ञावरी । भिस्त कदाकाळीं ठेवितीना ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे लोकानुग्रहार्थ । यज्ञ मानसिक करिती ज्ञाते ॥ ६ ॥

४५१

कामनिक यज्ञा द्रव्य आवश्यक । यज्ञ मानसिक मोक्षप्रद ॥ १ ॥
कर्मं पितृलोक विद्येनेंचि मुक्ति । कर्मं जन्मप्राप्ति, ज्ञाता मुक्त ॥ २ ॥
योगसिद्धांतेंचि गवालंभनादि । पात्रता अन्यासी नसे त्याची ॥ ३ ॥
कर्मसंन्यास तो वास्तवचि श्रेष्ठ । जेणें ब्रह्मनिष्ठ होई ज्ञाता ॥ ४ ॥
निरभिलाषी तो पावे ब्रह्मरूप । वंदी वासुदेव ब्रह्मनिष्ठा ॥ ५ ॥

४५२

जाजली विनवी मानसिक यज्ञ । कोणी कथिला न आम्हांप्रति ॥ १ ॥
ज्ञात्यांचा तो यज्ञ न कळे मूढासी । मूढा सुखप्राप्ति कैंवी घडे ॥ २ ॥
तुलाधार म्हणे दांभिकांचे यज्ञ । व्यर्थचि तो शीण ध्यानीं घेई ॥ ३ ॥
श्रद्धावंताप्रति धेनु करी साह्य । सेवितां धेनूस यज्ञफल ॥ ४ ॥
गोपुच्छीं तर्पण शृंगें अभिषेक । धेनुचरणरज मोक्षदायी ॥ ५ ॥
मानसिकयज्ञीं श्रद्धा हेचि पत्नी । योगी स्वयें निर्मी ब्रह्मलाभा ॥ ६ ॥

यज्ञपशुहिंसा नव्हेचि तें पाप । परी पुरोडाश[1] अधिक योग्य ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे चित्तैकाग्रचतीर्थ- । श्रेष्ठ, अन्य व्यर्थ भ्रमणमात्र ॥८॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २६३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ९० समाप्त

अध्याय २६४ वा ४५३

तुलाधार म्हणे मस्तकीं जे पक्षी । वाढले तयांसी संबोधावें ॥ १ ॥
तेणें धर्मफल कळेल तुजसी । जाजली पक्षांसी बाहे तदा ॥ २ ॥
निवेदिती पक्षी हिंसा तैं अहिंसा । प्रत्यक्ष फलदा इहपर ॥ ३ ॥
विनष्ट ते श्रद्धा होतसे हिंसेनें । हिंसकाचा तेणें नाश होई ॥ ४ ॥
कर्तव्यबुद्धीनें श्रद्धायुक्त यज्ञ । इष्टचि बंधन घडे तेणें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे श्रद्धेचें माहात्म्य । करिती कथन पक्षी ऐका ॥ ६ ॥

४५४

श्रद्धा सूर्यकांतिसत्वाची ते कन्या । पालनपोषणा तेचि करी ॥ १ ॥
श्रद्धेनें पवित्र जन्म जीवा येई । मन वाणी पाहीं बाह्यचि तीं ॥ २ ॥
वाग्वृद्ध मनोवृद्धा श्रद्धा रक्षी । अश्रद्धा न रक्षी वाणी मन ॥ ३ ॥
ब्रह्मगाथा ज्ञाते कथिताती एक । वेदवेत्ता, शुद्ध, श्रद्धा न ज्या ॥४॥
तेंवी जो अशुद्ध, परी श्रद्धायुक्त । सम त्यांचें वित्त यज्ञकर्मीं ॥५॥
ऐकूनि देवोक्ति ब्रह्मा देई दोष । श्रेष्ठ श्रद्धावंत म्हणे बहु ॥ ६ ॥
श्रद्धाहीनासी न पात्रता यज्ञाची । तारक श्रद्धाचि वासुदेवा ॥ ७ ॥

४५५

अश्रद्धाचि पाप श्रद्धा पापनाशी । सर्प जेंवी त्यागी जीर्ण त्वचा ॥
तैसा श्रद्धावंत त्यागी निजपाप । श्रद्धायुक्त त्याग तोचि श्रेष्ठ ॥ २ ॥
रागद्वेषत्यागी श्रद्धालु पवित्र । आचाराशीं कार्य नसे त्याचें ॥ ३ ॥
जैसी ज्याची श्रद्धा तद्रूपता त्यासी । श्रद्धाचि नरासी फलदात्री ॥
यास्तव जाजले, वेदवाक्यीं श्रद्धा । ठेवील तयाचा बंधच्छेद ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे यापरी संवाद । करूनि स्वर्गात गेले दोघे ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २६४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ९१ समाप्त

---

१ जवाच्या पिठाचें हवनीय द्रव्य

अध्याय २६५ वा ४५६

निवेदिती भीष्म धर्मा, विचख्नुही । वदला तें घेई ध्यानीं आतां॥१॥
विचख्नु एकदां गवालंभकालीं । अभयता देई धेनूप्रति ॥ २ ॥
देहचि आत्मा वा भिन्न हा संशय । तेचि हिंसाकार्यदक्ष होती ॥३॥
कवणाही कर्मी करूं नये हिंसा । सिद्धान्त मनूचा ऐशापरी ॥ ४ ॥
परी धूर्त त्याचा करूनि अव्हेर । स्वार्थं हिंसाचार आचरिती ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कल्पनाही ऐसी । मान्य न वेदासी कथिलें एथें ॥ ६ ॥

४५७

मान अज्ञान तें लोभ । कारण या प्रवृत्तीस ॥ १ ॥
प्रेमें भजावें विष्णूसी । साधन त्या अहिंसाचि ॥ २ ॥
धर्म म्हणे पितामहा । कैंवी हिंसात्याग व्हावा ॥ ३ ॥
क्लेश शरीरासी नित्य । काय त्यागावे उद्योग ॥ ४ ॥
निर्वाह न तेणें होई । हिंसा अटळ जाणावी ॥ ५ ॥
निवेदिती भीष्म देह- । रक्षूनियां व्हावें कार्य ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शक्ति । पाहूनीच व्हावी भक्ति ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति अ. २६५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ९२ समाप्त

अध्याय २६६ वा ४५८

धर्म म्हणे ताता, शीघ्र अशीघ्र वा । निर्णय कार्याचा कैंवी घ्यावा ॥१॥
निवेदिती भीष्म आंगिरसकुळीं । नामें चिरकारी विप्र एक ॥ २ ॥
गौतममुनींचा सुपुत्र तो ज्ञाता । निर्णय तयाचा दीर्घकालें ॥ ३ ॥
जागरण, निद्रा घेई चिरकाल । कार्यासी उद्युक्त चिरकालें ॥ ४ ॥
आळशीही कोणी मूढ त्या बोलती । चिरकारी ऐसी संज्ञा तेणें ॥
वासुदेव म्हणे अज्ञान नराचें । विपरीत बोधें पाडी भ्रम ॥ ६ ॥

४५९

एकदां दुष्कर्म कांतेचें जाणून । जाहला गौतम क्रोधाकुल ॥ १ ॥
चिरकारीप्रति मातृवधआज्ञा । करूनियां वना जाई मुनि ॥ २ ॥
चिरकारी तदा बहुत चिंतनें । ठीक, ऐसें म्हणे पित्यालागीं ॥ ३ ॥

पुढती विचार करी चिरकाल । म्हणे व्यामोहित चित्त माझें ॥ ४ ॥
पितृआज्ञा तैंवी मातेचें रक्षण । उभयही धर्म श्रेष्ठ मज ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चिंती चिरकारी । जें जें निजांतरीं ऐकावें तें ॥ ६ ॥

४६०

पराधीनताचि पुत्रत्व यद्यपि । मातृवधें दोषी कैसा होऊं ॥ १ ॥
आधींच स्त्रीजाति तयांतही माता । वधें कैंवी सौख्या पावेन मी ॥२॥
तैसाचि पित्याचा अवमान होतां । लाभेल सुखाचा कैंवी मार्ग ॥४॥
शील, आचार तैं निजकुलकीर्ति । समयीं रक्षावी कैंवी ऐशा ॥ ४ ॥
पिताचि गर्भांत घेई पुनर्जन्म । धर्मार्थेचि जन्म दिधला मज ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पिता-माता दोन्ही । चिरकारी मनीं आणीतसे ॥ ६ ॥

४६१

जातकर्मीचिया समयीं पित्यानें । पाषाणाप्रमाणें अच्छेद्यता ॥ १ ॥
परशूसम तैं शत्रुसंहारित्व । प्राप्त होवो मज चिंतियेलें ॥ २ ॥
उपनयनींही पुत्र मम आत्मा । बोलला वचना ऐशापरी ॥ ३ ॥
पित्याचा गौरव वर्णूं काय अन्य । पालनपोषण तेणें केलें ॥ ४ ॥
गुरूही ज्ञानद पिताचि मजसी । साक्षाद्धर्ममूर्ति पिता मज ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे महत्व पित्याचें । कथीयेलें वेदें याचि रीति ॥ ६ ॥

४६२

पित्यासी पुत्राचें प्रेमचि लाभतें । लाभतें पुत्रातें सर्वस्वचि ॥ १ ॥
यास्तव पित्राज्ञा पाळावी हा धर्म । चिंतूं नये अन्य कदा तेणें ॥२॥
पातकही आज्ञापालनें नासेल । संस्काराचें मूळ पितृदेव ॥ ३ ॥
धर्म, स्वर्ग, तप, पिताचि जाणावा । तोषती देवता पितृतोषें ॥ ४ ॥
पितृवचन तो होई आशीर्वाद । स्तवितां पित्यास पापमुक्ति ॥ ५ ॥
पुष्पफळातेंही त्यागीतसे वृक्ष । परी न पुत्रास त्यागी पिता ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे चिरकारी ऐसें । महत्व पित्याचें कथन करी ॥ ७ ॥

४६३

अरणी अग्नीसी कारण, तैं माता । आधार देहाचा एकमेव ॥ १ ॥
पीडिताचें सुख, अनाथासी नाथ । आईतेंचि हांक मारी दीन ॥ २ ॥
संबोधितां तिज शोकाची निवृत्ति । बाधे न तयासी वार्धक्यही॥३॥

पुत्रपौत्रयुक्त शतवर्षांचाही । वृद्ध, बाल होई मातेपुढें ॥ ४ ॥
समर्थ वा दीन पुष्ट वा कृशही । संरक्षी त्या आई वात्सल्यानें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मातेसम अन्य । करी न रक्षण कोणी जनीं ॥ ६ ॥

४६४

होई मातेचा वियोग । येई वार्धक्य तदाच ॥ १ ॥
सत्य मातृहीना दुःख । दशादिशा शून्य त्यास ॥ २ ॥
परितापतप्तजीवा । नाहीं मातेसम छाया ॥ ३ ॥
मातेसम अन्यगति । नसे, संरक्षक तेचि ॥ ४ ॥
प्रिय एकमेव माता । वासुदेव जोडी हाता ॥ ५ ॥

४६५

उदरीं धारण करी तेणें धात्री । जननी म्हणती जन्मदानें ॥ १ ॥
अंगसंवर्धनें अंबा तिज नाम । वीरां देई जन्म वीरप्रसु ॥ २ ॥
शुश्रूषेकारणें शुश्रु नाम पावे । प्रत्यक्ष ते पाहें निजदेह ॥ ३ ॥
मेंदुहीन शिर जयासी न ऐसा । कोण स्वमातेचा करी वध ॥ ४ ॥
समागमकाळीं पुत्रलाभइच्छा । मातेसीच ऐसा नियम असे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे गोत्र तेंवी पिता । निर्णय मातेचा सत्य तेथें ॥ ६ ॥

४६६

अकृत्रिम प्रेम करी एक माता । यास्तव पुत्राचा तोचि धर्म ॥ १ ॥
योग्यता यापरी मातेची या जनीं । संततीचा स्वामी परी पिता ॥
तात्पर्य मातेचें प्रेम जरी सत्य । परी अधिकार पित्याचाचि ॥ ३ ॥
परस्त्रीगमनआदि दोषहीन । पित्याचें वचन प्रमाणचि ॥ ४ ॥
पोषक तो भर्ता रक्षक तो पति । कर्तव्यत्यक्तासी अधिकार न ॥५॥
वासुदेव म्हणे व्यभिचारदोष । कथी पुरुषांसीच चिरकारी ॥ ६ ॥

४६७

अप्रार्थिता कोणी नसतां पुरुष । व्यभिचारदोष संभवेना ॥ १ ॥
पितृवेषें दुष्ट पातला म्हणोनि । पतीचि मानूनि भ्रमली माता ॥२॥
इंद्रचि पातला पित्याच्या रूपानें । अधर्म तयानें केला असे ॥ ३ ॥
देवतासमूह पित्याचिया ठायीं । नरदेवता ही जननी एक ॥ ४ ॥

तात्पर्य यापरी पित्याहूनि माता । श्रेष्ठ हा शास्त्राचा सुनिर्णय ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसा दीर्घकाल । स्वमनीं विचार करी विप्र ॥ ६ ॥

४६८

ऐसा बहुकाळ लोटतां गौतम । चिंतूनि आश्रम गांठीतसे ॥ १ ॥
मनीं म्हणे दोष नसे हा कांतेचा । तैसाचि इंद्राचा नसे दोष ॥ २ ॥
प्रमाद माझाचि दोषासी कारण । कैसें मज ज्ञान जाहलें न ॥ ३ ॥
पतिदुःखें दुःखी होई स्त्री म्हणोनि । वासिता हे जनीं संज्ञा तिज ॥
पोषणयोग्य ते म्हणूनीच भार्या । वासिता हे भार्या कांता माझी ॥५॥
वासुदेव म्हणे साध्वीच्या वधानें । खिन्नांतःकरणें मुनि येई ॥ ६ ॥

४६९

चिंतूनियां मानी कांतावधें दुःख । अपराधमुक्त करिल कोण ॥ १ ॥
चिरकारी नाम सार्थ जरी होई । तरी तो वांचवी संकटीं या ॥ २ ॥
कल्याण म्हणे हे बाळा चिरकारिका । येवो यथार्थता तव नामा ॥
रक्षण आपणा होवो उभयांचें । सफल होऊंदे तव नाम ॥ ४ ॥
चिरकाल तुज इच्छिलें मातेनें । गर्भांत ठेविलें चिरकाल ॥ ५ ॥
त्वरित कार्यांत संभवे संताप । यास्तव विलंब करिसी कार्यीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे प्रवृत्ति निवृत्ति । चिरकारिकाची विलंबेंचि ॥ ७ ॥

४७०

दुःखी गौतमासी पाहूनियां पुत्र । टाकूनियां शस्त्र चरण वंदी ॥१॥
नम्र पुत्रा तेवी लज्जित कांतेसी । पाहूनि मुनींसी तोष वाटे ॥ २ ॥
सशस्त्र पुत्रासी पाहूनि प्रथम । साचिंताचि मन होतें त्याचें ॥ ३ ॥
परी कांतावध जाहला न ऐसें । पाहूनि मुनींतें मोद झाला ॥ ४ ॥
मस्तकावघ्राण करूनि पुत्राचें । आलिंगूनि त्यातें वदला प्रेमें ॥ ५ ॥
चिरंजीव बाळा होई ऐसें म्हणे । वासुदेव जाणे वर्म त्याचें ॥ ६ ॥

४७१

विलंबेंचि तव बाळा, मज सौख्य । गाथा गाई गोड तदा मुनि ॥१॥
जोडावी तोडावी मैत्री विलंबानें । कष्टें जें साधिलें रक्षावें तें ॥ २ ॥
प्रेम, गर्व, मान, द्रोह, पापकर्म । विलंब तो जाण स्तुतियोग्य ॥ ३ ॥
बंधुजन मित्र स्त्रिया तैं पोष्यांचे । अपराध दंडावे विलंबेंचि ॥ ४ ॥

असो, धर्माप्रति निवेदिती भीष्म । विवेकाचें कर्म सुफल होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चिरकाल कोप । आंवरी न त्यास पश्चात्ताप ॥ ६ ॥

४७२

चिरकाल व्हावी वडिलांची सेवा । धर्म आचरावा चिरकाल ॥ १ ॥
कोण्याही गोष्टीचा चिरशोध घ्यावा । सज्जनांचा व्हावा चिरसंग ॥
विद्वज्जनसेवा व्हावी चिरकाल । राखावा चिरकाल विनय अंगीं ॥ ३ ॥
चिंतूनीच द्यावें नास्तिका उत्तर । सौख्य चिरकाल लाभे तेणें ॥ ४ ॥
दीर्घकाल ऐसा राहिला गौतम । पुत्रासवें पुण्यलोकीं गेला ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चिरकारीकथा । दावी हे सुखाचा मार्ग जनां ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २६६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ९३ समाप्त

अध्याय २६७ वा

४७३

धर्म म्हणे ताता, पीडितां न कोणा । रक्षावें प्रजांना कैंवी कथा ॥ १ ॥
निवेदिती भीष्म संवाद प्राचीन । पुशी सत्यवान द्युमत्सेना ॥ २ ॥
अधर्मत्व धर्मा, अधर्मा धर्मत्व । कदाही न वध, धर्म वाटे ॥ ३ ॥
कथी द्युमत्सेन रक्षितां वध्यातें । बोकाळेल एथें संकरचि ॥ ४ ॥
स्वामित्वचि सर्व विनष्ट होईल । वधाविण कार्य कैंवी कथीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे देऊनियां ध्यान । कथी सत्यवान ऐका तेंचि ॥ ६ ॥

४७४

त्रैवर्णिक व्हावे विप्रांच्या आधीन । धर्माचें बंधन लावूनियां ॥ १ ॥
संकरजातीही तेणें मर्यादित । कळतां अपराध दंड व्हावा ॥ २ ॥
अपराध नीति चिंतूनि दंडावे । वध्य न गणावें तस्करासी ॥ ३ ॥
आश्रितांचा त्याग होई तेथें नाश । येई सुजनत्व सत्संगानें ॥ ४ ॥
अथवा संतति तरी होई सुज्ञ । समूळ नाश न घडो तेणें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भयबंधनादि । अपराधासमचि शिक्षा व्हावी ॥ ६ ॥

४७५

शासनयोग्यचि जाणावा संन्यासी । थोर अपराधासी थोर दंड ॥ १ ॥
तेंवी वारंवार घडतां अपराध । क्षमा नच योग्य हेंही सत्य ॥ २ ॥
द्युमत्सेन म्हणे नियमन जेणें । धर्मचि तो जाणें सत्यवंता ॥ ३ ॥

लंघितां धर्मासी वधार्हा वधावें। तेणेंचि जाणावें लोककार्य ॥ ४ ॥
नियमन होतें पुरा सुलभचि। परी तें सांप्रति कठिण असे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दोष मर्यादित। होते त्या काळांत नियम भिन्न ॥ ६ ॥

४७६

सुजनांसी एक धिक्कारचि दंड। वाग्दंड प्रारंभ पुढती झाला ॥१॥
आवश्यक झाला पुढती द्रव्यदंड। आतां वधदंड आवश्यक ॥ २ ॥
वधदंडाचेंही सांप्रत न भय। दयेसी तस्कर पात्र नसे ॥ ३ ॥
नियंत्रील दुष्टां, पद्में तो स्मशानीं। निर्मील, भजनीं रमवी भूतां[1] ॥४॥
सत्यवान म्हणे जरी तें अशक्य। वधावें यज्ञार्थ तरी तयां ॥ ५ ॥
सद्वर्तनी राव साधील हें कार्य। कथी वासुदेव कथिलें तेंचि ॥ ६ ॥

४७७

गर्वें किंवा मोहें अवमानी नृपा। निग्रह तयाचा आवश्यक ॥ १ ॥
द्युमत्सेनोक्ति हे घ्यावी आतां ध्यानीं। दंडें पापहानी अपराध्याची ॥
वृत्तिनियमनें पापाची निवृत्ति। पुत्रही अपराधी दंडार्हचि ॥ ३ ॥
पातकीही ऐसे नांदती ज्या ठाईं। धर्माचा त्या ठाईं होई ऱ्हास ॥४॥
कलियुगामाजी हिंसाशून्य दंडें। संकर निश्चयें वृद्धि पावे ॥ ५ ॥
शक्ति, वय, काल, चिंतूनियां दंड। व्हावा हेंचि इष्ट कथिती ज्ञाते ॥
वासुदेव म्हणे वधार्हाचा वध। कलीमाजी इष्ट मनूक्ति हे ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २६७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १४ समाप्त

अध्याय २६८ वा

४७८

धर्म म्हणे ताता, गार्हस्थ्ययोगाचें। फल कोण्यामार्गें लाभे सांगा ॥
तैसाचि तयांत श्रेष्ठ कोण सांगा। भीष्म तैं संवादा कथिती एका ॥
पूर्वी नहुषाच्या सदनांत त्वष्टा। येतां धेनुवधा करी नृप ॥ ३ ॥
कपिलानें तदा धेनु ती पाहिली, । 'अहा वेद' झाली वाणी तेथें ॥
धेनुशरीरीं तैं स्युमरश्मि मुनि। बोले प्रवेशूनि कपिलाप्रति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मुनि कपिलासी। बोले वचनासी तेंचि ऐका ॥ ६ ॥

1 पिशाचांस

४७९

कपिला, वेदही निंद्य तुज जरी । अहिंसेतें तरी पुशी कोण ॥ १ ॥
लोभ, इच्छा, ताप, नसे ईश्वरासी । उक्ति जे तयाची तोचि वेद ॥
यास्तव वैषम्य नसे त्या उक्तींत । प्रामाण्य वरिष्ठ तेणें तया ॥ ३ ॥
बोले तैं कपिल निंदीं न मी वेदां । हेतु आश्रमांचा असे एक ॥ ४ ॥
अधिकारभेदें फल मात्र भिन्न । बल श्रेष्ठ हीन असे त्याचें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सकाम निष्काम । कथियेलें कर्म द्विविध वेदें ॥ ६ ॥

४८०

हिंसामय कर्म दिसे जरी श्रेष्ठ । कथावें तें मज कपिल म्हणे ॥ १ ॥
' स्युमरश्मि ' म्हणे स्वर्गकामा यज्ञ । श्रुतीचें वचन ऐसें असे ॥ २ ॥
सर्व प्राण्यांमाजी श्रेष्ठ जो मानव । तयाचाही वध कथिला यज्ञें ॥
आपुला आपणा अशक्यांचि वध । यास्तव यज्ञांत कथिला न तो ॥
सकलही प्राणी इच्छितातीं स्वर्ग । मरणें यज्ञांत स्वर्ग लाभे ॥ ५ ॥
यज्ञाचि आधार लोकस्थितीप्रति । धेनु ते यज्ञासी आधार तो ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे यज्ञाचें साधन । आधार तें जाण यज्ञाप्रति ॥ ७ ॥

४८१

सर्वाधारयज्ञ यज्ञाधार सर्व । प्रणव आधार वेदांप्रति ॥ १ ॥
नमःस्वाहा स्वधा वषट्कारयुक्त । यज्ञ करी त्यास भय नसे ॥ २ ॥
ऋग्वेदादि वेद जाणे तो ब्राह्मण । संदेह सोडून व्हावे यज्ञ ॥ ३ ॥
याजनही तैसें असे आवश्यक । इह-परलोक यज्ञानेंचि ॥ ४ ॥
आत्मज्ञान आणि यज्ञ हे समान । नसे यज्ञावीण इहपर ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसा पूर्वपक्ष । करूनि कपिल कथितीं ऐका ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २६८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ९५ समाप्त

अध्याय २६९ वा

४८२

कथितीं कपिल ब्रह्मांड सकल । कर्माचेंचि फल ब्रह्मनिष्ठां ॥ १ ॥
निर्द्वंद्व ते श्रेष्ठ विकारविहीन । वंदिती कदा न कोणाप्रति ॥ २ ॥
निरभिलाष ते सर्व पापमुक्त । सर्वदाचि शुद्ध सिद्धान्तज्ञ ॥ ३ ॥

रजोगुणहीन ब्रह्मभावमग्न । गृहस्थआश्रम काय तयां ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे शोकहीन ज्ञाते । अचल सदा ते सुखरूप ॥ ५ ॥

४८३

स्युमरश्मि म्हणे ऐसें जरी असे । गार्हस्थ्य तरी तें आवश्यक ॥ १ ॥
सकल आश्रम माना हें गार्हस्थ्य । मूळ सद्धर्मास तेंचि एक ॥ २ ॥
लोक औषधींचें मूळ हा आश्रम । केंवी यज्ञावीण अन्न होई ॥ ३ ॥
मोक्षही यापरी गृहस्थाश्रमेंचि । केवळ त्यागासी स्तविती मूढ ॥४॥
वासुदेव म्हणे ब्राह्मण वेदज्ञ । वेद मूलयज्ञ विश्वाधार ॥ ५ ॥

४८४

जन्मप्रभृतींचि ब्राह्मणांचा मान । मंत्रोक्तचि कर्म सकल त्यांचें ॥ १ ॥
स्वर्गादिक तेंवी वृष्टयादिक तींही । दृश्यादृश्य पाहीं मंत्रमूल ॥ २ ॥
दाह, पुनर्जन्म, तर्पण, श्राद्धादि । क्रिया गोदानादि मंत्राधीन ॥ ३ ॥
शरीरहीनासी याचा काय लाभ । तें देहहीनत्व मोक्ष नव्हे ॥ ४ ॥
मंत्रोक्त जें तेंचि पितरांही मान्य । सकलां कारण मंत्र ऐसे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसें मंत्रबद्ध । सकलही विश्व ध्यानीं असो ॥ ६ ॥

४८५

देवर्षि पितर ऋण सकलांसी । ब्रह्मचर्यें मुक्ति प्रजायज्ञें ॥ १ ॥
मोक्षाचा संबंध तेथ नसे कांहीं । दरिद्रि आळशी म्हणती मोक्ष ॥
वेदाज्ञानें भास सत्याचा हा मोक्ष । पाळी वेदशास्त्र पाप न त्या ॥३॥
पशूसवें स्वर्ग लाभे याज्ञिकासी । वैदिक कर्मेंचि ब्रह्मलाभ ॥ ४ ॥
यज्ञत्याग तेंवी अनादर वेदीं । शाठ्य वा न जगीं उद्धारक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्युमरश्मि ऐसें । वदतां कपिलांचें ऐका मत ॥ ६ ॥

४८६

अग्निहोत्रादि तीं सनातन कर्में । संन्यासेंही जाणें तृप्ति देवां ॥ १ ॥
ब्रह्मसाक्षात्कारें देवां तोषविती । शुचिष्मंत जगीं ब्रह्मज्ञानी ॥ २ ॥
सर्वभूतआत्मा ब्रह्मज्ञाचा मार्ग । कळणें अशक्य देवांतेंही ॥ ३ ॥
बाहु, वाणी तेंवी उदर, उपस्थ । झांकिती आत्म्यास ऐसीं द्वारें ॥४॥
देह इंद्रियें तें मन आणि बुद्धि । मुखें हीं आत्म्याचीं म्हणती ज्ञाते ॥
वासुदेव म्हणे रहस्य हें थोर । कथिती कपिल श्रवण करा ॥ ६ ॥

४८७

विराट सूत्र तैं अंतर्यामी शुद्ध । करी यांचा वोध गुरुवाणी ॥ १ ॥
बाहु, वाणी, आदि नियंताचि व्हावें । द्यूतादि त्यजावें सुज्ञ नरें ॥२॥
अयाज्ययाजन तेंवी अपहार । कोणाही प्रहार करूं नये ॥ ३ ॥
हस्तपाद ऐसे होती नियमित । न घडो आक्रोश प्रलापही ॥ ४ ॥
पैशुन तैं जनवाद नच घडो । सावधता रुचो सत्य मित ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसीया साधनें । वाणीतें जिंकावें कपिलोक्तीनें ॥ ६ ॥

४८८

अलोलुप्त्व, मिताहार साधुसंगें । उदर तें होतें संयमित ॥ १ ॥
ऋतुगमन तैं परस्त्रीवर्जन । भार्याव्रतें यम उपस्थाचा ॥ २ ॥
ऐसीं चार द्वारें जिंकिलीं जयानें । साफल्य या जन्में तयाप्रति ॥३॥
द्वारसंयमन नसे जयाप्रति । विफल तयाचीं सकल कर्में ॥ ४ ॥
सर्वसंगत्यागी बाहूपधान जो । ऐसा विरागी जो तोचि ज्ञाता ॥५॥
वासुदेव म्हणे सुखदुःख द्वंद्वीं । रमे जो एकाकी तोचि धन्य ॥ ६ ॥

४८९

चित्तशुद्धीविण ब्रह्मनिष्ठा ज्ञान । न होईचि जाण कवणाप्रति ॥ १ ॥
तेणेंचि स्वर्गादि रुचती जीवासी । यमनियमादि दिसती त्याज्य ॥२॥
यज्ञरहस्य तें जाणावें दुर्बोध । क्रिया अवघड तयाहूनि ॥ ३ ॥
घडतांही फल नश्वर तयाचें । स्युमरश्मे, ऐसें जाणसी तूं ॥ ४ ॥
स्युमरश्मि म्हणे प्रवृत्ति निवृत्ति- । भिन्न, बोध वेदीं कथिला ऐसा ॥
कथावी ते केंवी कृतार्थता तया । लाभ वासुदेवा बोधाचा या ॥६॥

४९०

कपिला, शरण असें मी तुम्हांसी । शाश्वत सुखासी निवेदावें ॥ १ ॥
कथिती कपिल शास्त्र अवैदिक । अथवा वैदिक शास्त्र असो ॥ २ ॥
मोक्षानुष्ठान जें कथील उत्कृष्ट । साफल्य तयास तदंशत्वें ॥ ३ ॥
शम दम जेणें साधेल त्या शास्त्रें । होई साधकातें आत्मबोध ॥ ४ ॥
वैदिककर्मींही ज्ञानेंविण क्लेश । ज्ञानद तें शास्त्र साधकासी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे द्वैतदृष्टिशून्य । लाभतसे ज्ञान क्वचित्कोणा ॥ ६ ॥

१ केवळ हात उशाला घेऊन निजणारा ( असंग्रही )

४९१

रहस्य शास्त्राचें जाणें शम दम । तर्केंचि त्याविण सकल माजे ॥१॥
शमदमहीन शास्त्रज्ञ ते मूढ । पाडिती भ्रमांत भ्रमिष्ट ते ॥ २ ॥
अज्ञानाधीन ते कामक्रोधयुक्त । होती मदोन्मत्त दंभद्वेषें ॥ ३ ॥
जाणूनि हें ध्यान-धारणा समाधि । पाप-पुण्यमुक्ति अभ्यासितां ॥४॥
वासुदेव म्हणे क्रियेवीण ज्ञान । केवळ तो शीण बंधकारी ॥ ५ ॥

४९२

स्युमरश्मि म्हणे कर्मेचि वरिष्ठ । संन्यास अयोग्य शास्त्रचि हें ॥ १ ॥
योग्य तें जें शास्त्र अयोग्य अशास्त्र । ऐसें कथी वेद स्पष्टपणें ॥२॥
शास्त्रावीण लोकीं प्रवृत्ति न कांहीं । वेदां मान्य नाहीं अशास्त्र तें ॥
केवळ प्रत्यक्ष प्रमाणवाद्यांसी । दिसे इहलोकचि परलोक न ॥ ४ ॥
तयां त्यांचे दोष कदा न कळती । मजसम त्यांसी दुःख तेणें ॥ ५ ॥
इंद्रियार्थयोग सुखदुःखमूळ । निवेदी सकल वासुदेव ॥ ६ ॥

४९३

योग हा सकलां सर्वकाल घडे । बाधा न ज्ञात्यातें परी त्याची ॥१॥
अनुभवहीनां गोडी विषयांची । मुने, कथिलेंती दिव्य ज्ञान ॥ २ ॥
कुटुंबाश्रितासी संन्यास अशक्य । योगी जितेंद्रिय योग्य तेणें ॥ ३ ॥
दानादिक जरी विफल होतील । तरी ते निष्फळ सकल क्रिया ॥४॥
यास्तव व्यापक स्वरूप मोक्षाचें । गुरो, कथा मातें कपिलमुने ॥५॥
वासुदेव म्हणे निःसंशय होणें । ईशकृपेविणें अशक्यचि ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २६९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ९६ समाप्त

अध्याय २७० वा

४९४

सर्वथा प्रमाण सकलांसी वेद । ब्रह्म तें द्विविध कथिती मुनि ॥ १ ॥
निष्णात मानव यदा वेदब्रह्मीं । तदा परब्रह्मीं निष्णात तो ॥ २ ॥
यास्तव प्रथम वेदाज्ञा प्रमाण । संस्कार ते जाण वेदमंत्रें ॥ ३ ॥
ऐसी चित्तशुद्धि होतसे कर्मानें । साक्षादनुभवें सिद्ध होई ॥ ४ ॥
कर्तव्यबुद्धीनें आचरितां कर्म । मोक्षाचें साधन होत असे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जनकादिकांनीं । साधियेली शुद्धि याचि मार्गें ॥ ६ ॥

४९५

रागद्वेषशून्य होऊनियां दान । विनियोग जाण तोचि योग्य ॥ १ ॥
वेदांचें प्रामाण्य क्रियेचें सामर्थ्य । ज्ञानाचा निश्चय जयांप्रति ॥ २ ॥
क्रोध अहंकार असूयारहित । जन्म कर्म शुद्ध विद्याही ज्या ॥ ३ ॥
प्राणिमात्रहिततत्पर जे सदा । स्वकर्म न कदा त्यागिती जे ॥ ४ ॥
राजे, ब्राह्मणही झाले बहु ऐसे । एकमेकां त्यांचें साह्य बहु ॥ ५ ॥
प्रायश्चित्ताचा न प्रसंगचि तयां । वंद्य वासुदेवा सर्वदा ते ॥ ६ ॥

४९६

मनसोक्त क्रिया कदाही न त्यांची । चित्तींही धर्माची हेलना न ॥१॥
बहु मार्गांमाजी उत्तमा वरिती । सर्वदा सत्कृतितत्पर ते ॥ २ ॥
आशीर्वाद बंधना न स्वीकारिती । संकल्पही चित्तीं शास्त्रीयचि ॥३॥
अतिक्लिष्ट तेंही आचरिती कर्म । ठाउका अधर्म नसे तयां ॥ ४ ॥
ऐसे भाग्यवंत ब्रह्मरूप झाले । कृतार्थ ते झाले ऐसे बहु ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कदा आपद्धर्म । प्रसंग जयां न तेचि धन्य ॥ ६ ॥

४९७

वर्णमर्यादा न उल्लंघिल्या कोणी । दौर्बल्याचि जनीं पुढती आलें ॥१॥
ब्रह्मचर्यादी तें जाहले विभाग । आचारितां चांग मोक्षलाभे ॥ २ ॥
यथाधिकार ते आश्रम पाळितां । तेजःस्वरूपता नभीं तयां ॥ ३ ॥
मानवयोनीही लाभतां तयांसी । दुःखसंपर्कही तयां नसे ॥ ४ ॥
श्रद्धा गुरूवरी ठेवूनि जो राही । योगी तोचि होई पूर्ण ऐसा ॥५॥
वासुदेव म्हणे ऐसे न जे विप्र । 'ब्राह्मणक' त्यांस म्हणती ज्ञाते ॥

४९८

शुभाशुभ कर्मं योग्यायोग्य नर । ध्यानीं हें साचार असों द्यावें ॥१॥
श्रुतिमार्गें गेले आजवरी जे जे । हळु हळु त्यांचें चित्त शुद्ध ॥ २ ॥
तत्वमसिबोधें जाहले कृतार्थ । मोकळा हा मार्ग सकळांप्रति ॥ ३ ॥
परी निष्ठावंत श्रवण-मननीं । रंगती ते जनीं विप्र धन्य ॥ ४ ॥
संप्रदायप्राप्त यतिधर्म एथ । जाणें अवश्यक मुनिश्रेष्ठा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मूळ त्या संतोष । प्राण तें वैराग्य, ध्येय मुक्ति ॥६॥

४९९

यतिधर्म ऐसा मोक्षोपकारक । जें ज्याचें सामर्थ्य योग्य तें त्या ॥१॥
यथाशक्यही जो मार्गी या तयाचें । कल्याणाचि साचें निश्चय हा ॥
लंपट परी हा त्यागूनियां मार्ग । होऊनि कुंठित वसती स्थिर ॥ ३ ॥
परी चित्तशुद्ध होऊनि जो शोधी । निश्चयें तयासी ब्रह्मबोध ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे निश्चयानें पंथ । क्रमील तयास फलप्राप्ति ॥ ५ ॥

५००

स्युमरश्मि म्हणे गृहस्थ वा यति । प्रथम कोणासी स्वर्ग सांगा ॥
कपिल बोलती श्रेष्ठचि गार्हस्थ्य । यतीचें महत्व परी बहु ॥ २ ॥
स्युमरश्मि म्हणे कर्म वा संन्यास । अंतीं जरी एक फल देती ॥ ३ ॥
न्यूनाधिक्य मग मानावें कां त्यांत । निवेदा तें मज मुनिश्रेष्ठा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐकावा निर्णय । कथिती कपिल स्पष्ट तोचि ॥ ५ ॥

५०१

स्थूलसूक्ष्म देह शुद्ध करी कर्म । तत्कालचि जाण मुक्ति ज्ञानें ॥१ ॥
चित्तशुद्ध होतां ब्रह्मरसगोडी । लागे साधकासी सत्यत्वानें ॥ २ ॥
दया क्षमा शांति प्रगटे चित्तांत । तदा ब्रह्मपद सुलभ होई ॥ ३ ॥
ऐशा क्रमें मोक्ष लाभतसे कर्मे । कर्म याचि ज्ञानें आचरावें ॥ ४ ॥
शुद्ध संतुष्ट जे ज्ञानैकनिरत । चित्त ज्यांचें शांत सर्वकाल ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे तयांची जे स्थिति । अंतिम ते गति कथिती वेद ॥

५०२

वेद, वेदतत्व, वैदिक तैं कर्म । जाणे तया नाम वेदवेत्ता ॥ १ ॥
केवळ प्रलापी ' वातरेचक ' ते । ज्ञान सकलांचें वेदज्ञासी ॥ २ ॥
वेदांमाजी नसे कांहीं ऐसें नाहीं । वर्तमान भावी भूतही जें ॥ ३ ॥
प्रतीतिकालीं हें असे सर्व विश्व । बाधकालीं नाश होई त्याचा ॥४॥
असे नसे ऐसें रूप त्या वास्तव । सदसत्स्वरूप ऐसें जग ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कार्यकारणींही । एकचि तें पाही विश्व, ज्ञाता ॥ ६ ॥

५०३

दुतोंडें हें विश्व तुच्छचि ज्ञात्यासी । सत्य एक वेदीं कथिलें ब्रह्म ॥
स्वरूप विश्वाचें दावूनियां स्पष्ट । कथी निर्विकल्प त्याग एक ॥२॥

त्यागेंचि प्रत्यक्ष ब्रह्मबोध होई । त्यागाविण कांहीं मार्ग नसे ॥ ३ ॥
मानुषआनंदापासूनियां वेद । कथी ब्रह्मानंद सर्वत्यागें ॥ ४ ॥
अकामहतचि आनंदाधिकारी । व्युत्थानकालींही निरहंकारी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐशा त्या स्थितीसी । संज्ञा बहूतचि कथिल्या वेदें ॥

५०४

ऋत, सत्य तेंवी चराचर आत्मा । ज्ञाता ज्ञेय संज्ञा तयासीच ॥ १ ॥
दुःखरहित तें सुख, शिव, शांत । तुर्य तें अव्यक्त ब्रह्महीं तें ॥ २ ॥
अव्यय व्योमही सनातन ध्रुव । अकृत्रिम शुभ अनामय ॥ ३ ॥
तेज-क्षमा-शांतिअंजनें ज्या दृष्टि । लाभ तयांसीचि ब्रह्माचा त्या ॥
वासुदेव म्हणे ऐसे ब्रह्मवेत्ते । वंद्यचि विश्वातें नमन तयां ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २७० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १७ समाप्त

अध्याय २७१ वा

५०५

धर्म म्हणे ताता, अधिकार मोठा । मज संन्याशाचा कथिला परी ॥
अधिकार जयां संन्यासाचा नसे । त्रिवर्गी तयांतें सेव्य काय ॥ २ ॥
निवेदिती भीष्म कुंडलाधार ज्या । नाम एका मेघा वृत्त त्याचें ॥
पुरा एक दीन विप्र यज्ञकाम । द्रव्यार्थ दारुण तप करी ॥ ४ ॥
भक्तिभावें बहू पूजिल्या देवता । कपर्दीही हाता परी न येई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दरिद्रि ब्राह्मण । द्रव्यार्थ शोधून पाही देव ॥ ६ ॥

५०६

शोधितां त्या मेघ नामें कुंडधार । दिसला विशाल देह ज्याचा ॥ १ ॥
याचकपीडित नव्हता तो कदा । पूजी विप्र मेघा तया श्रेष्ठा ॥ २ ॥
संतुष्ट तैं मेघ बोलला विप्रासी । नसे कृतघ्नासी प्रायश्चित्त ॥ ३ ॥
आशेनें अधर्म, असूयेनें क्रोध । पैशून्यें तो लोभ उपजे जनीं ॥ ४ ॥
निपुत्रिकचि ते जाणे कृतघ्नता । अदृश्यता मेघा वदतां येई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्थिति त्या विप्राची । जाहली जे तेचि कथितों ऐका

५०७

दर्भासनीं रात्रौ निद्रिस्थ विप्रासी । लाभे दिव्यदृष्टि मेघेच्छेनें ॥ १ ॥
मणिभद्रमेघ देवा प्रार्थी ऐसें । दिसलें तयांतें स्वप्नामाजी ॥ २ ॥

म्हणे या विप्रासी सुस्थिति लाभावी । देव म्हणे त्याची इच्छा काय
चिंती तदा मेघ अल्प आयुष्यांत । काय द्रव्यभोग भोगूनियां ॥ ४ ॥
विचार यापरी करूनियां मेघ । म्हणे व्हावा विप्र सुधार्मिक ॥ ५ ॥
रत्नराशीही त्या नसे हितप्रद । वासुदेवा बोध ऐकूनियां ॥ ६ ॥

५०८

मणिभद्र म्हणे देईल जें धर्म । तेंचि घे मागू कष्टूं नको ॥ १ ॥
कुंडधार तदा चिंतूनियां मनीं । धर्मचि मागूनि घेई परी ॥ २ ॥
ऐकूनियां देव जाहले संतुष्ट । झालों आम्हीं तुष्ट म्हणती दोघां ॥३॥
वल्कलें विप्रासी तदा प्राप्त झालीं । विप्र तयावेळीं खेद पावे ॥ ४ ॥
कुंडधारेंही न अर्पूं शके धन । तरी निजधर्म कां त्यजावा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे खडतर तप । करी तदा विप्र वनवासें ॥ ६ ॥

५०९

वायुभक्षणेंही क्षीणता न त्यासी । लाभे दिव्यदृष्टि तया तपें ॥ १ ॥
आत्मविश्वासें त्या वाटलें सामर्थ्य । मानी मनीं सिद्ध निजवाणी ॥
जाणूनियां ऐसें पुनरपि तप । करी, म्हणे राज्य श्रेष्ठ लोकीं ॥ ३ ॥
इच्छामात्रें तेंही देईन मी कोणा । प्रवाह हा जाणा सद्धर्माचा ॥ ४ ॥
कुंडधार तदा प्रगट होऊनि । म्हणे चिंतीं मनीं विप्रश्रेष्ठा ॥ ५ ॥
इच्छिलेंसी राज्य चिंतीं त्याची गति । वासुदेव चित्तीं चिंती तेंचि ॥

५१०

नरकवास तैं पाहिला नृपांचा । कुंडधार तदा म्हणे तया ॥ १ ॥
मुने, भक्तिभावें पूजिलेंसी मज । प्रतारणा मग कैंवी करूं ॥ २ ॥
यास्तवचि द्रव्य तुज न दिधलें । कल्याण चिंतिलें मनीं तव ॥ ३ ॥
धर्मनिष्ठा हाचि लाभ तुज झाला । खेद न मनाला वाटो आतां ॥४॥
आतां दीनांचें तूं हरिसील दैन्य । श्रेष्ठ लाभ हा न काय जगीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जया दूरदृष्टि । अल्पलाभें कष्टी होई न तो ॥ ६ ॥

५११

वंदूनि मेघासी विप्र म्हणे बोध । जाहला न मज क्षमा करीं ॥ १ ॥
कुंडधार तदा क्षमूनि तयासी । गेला स्वस्थळासी अत्यानंदें ॥ २ ॥
सिद्धसंकल्प तो होई तदा विप्र । इच्छागामी श्रेष्ठ तेंवी झाला ॥ ३ ॥

अंतीं परागती लाभली तयासी । श्रेष्ठता धर्माची ऐसी धर्मा ॥ ४ ॥
अर्थकामांसी न धर्माची योग्यता । धर्माची श्रेष्ठता अलौकिक ॥ ५॥
वासुदेव म्हणे सर्वश्रेष्ठ सौख्य । स्वधर्माचारांत कथिती भीष्म ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २७१ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ९८ समाप्त

अध्याय २७२ वा

५१२

युधिष्ठिर म्हणे चित्तशुद्धिप्रद । यज्ञ ते अनेक असती ताता ॥ १ ॥
केवळ धर्मचि लाभेल जयानें । कथावा तो प्रेमें धर्म मज ॥ २ ॥
पुरातन तदा कथिताती वृत्त । उंछवृत्ति एक विप्र होता ॥ ३ ॥
अहिंसक शाकाहारेंचि तो शुद्ध । होई वानप्रस्थ आश्रमी तो ॥ ४ ॥
'सत्य' त्याचें नांव स्त्री 'पुष्पधारिणी' । पशुहिंसा यज्ञीं तिज न रुचे
गलित मयूरपिच्छांचें ती वस्त्र । सेवी, वासुदेव पुढती कथी ॥ ६ ॥

५१३

एकदां सत्याच्या आश्रमी यज्ञांत । सत्यासी पर्णाद मृग भेटे ॥ १ ॥
समीपचि वनीं होता तो धार्मिक । म्हणे नाहीं दोष पशुयज्ञीं ॥ २ ॥
पशुविक्रयाचें बल जरी नसे । होमीं तरी मातें यज्ञामाजी ॥ ३ ॥
प्रत्यक्ष सावित्री प्रगटूनि तदा । म्हणे या मृगाचा पुरवीं हेतु ॥ ४ ॥
मुनि म्हणे माते, मृग माझा मित्र । वसे मत्समीप अवध्य हा ॥ ५ ॥
ऐकूनि सावित्री गेली अग्नीमाजी । मृग पुनरपि विनवी विप्रा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अंतीं त्या मृगानें । दिव्यचक्षुदानें कथिलें विप्रा ॥७ ॥

५१४

पहा म्हणे यज्ञें लाभती जे लोक । अप्सरादि भोग अवलोकीं हे॥१॥
पाहूनि ते विप्र मोहित अंतरीं । होऊनियां धरी मृगइच्छा ॥ २ ॥
साक्षात् धर्मचि तो मृग देहधारी । त्या वनाभीतरी राहियेला ॥३ ॥
मृगवधइच्छा होतांचि विप्रासी । तपश्चर्या त्याची भंग पावे ॥ ४ ॥
धर्मा, यज्ञांग न हिंसा हें जाणावें । श्रेष्ठत्व गणावें अहिंसेचें ॥ ५ ॥
पुनरपि 'सत्यविप्र' पुण्यकर्में । उद्धरला धर्मे कांतेसवें ॥ ६ ॥
तात्पर्य अहिंसायज्ञचि वरिष्ठ । कथी वासुदेव नारदोक्ति ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २७२ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ९९ समाप्त

अध्याय २७३ वा

५१५

धर्म म्हणे ताता, पापी धार्मिकही । विरक्त मुक्तही कैंवी नर ॥ १ ।
निर्वेदिती भीष्म जाणूनिही धर्मा । दार्ढ्यार्थ या प्रश्ना पुशिसी मज ।
रागद्वेषें लोभ मोह ते अंतरीं । जडतां विषयांवरी प्रेम जडे ॥ ३ ॥
पुढती दंभानें आचरी तो धर्म । अन्यायेंचि धन पुढती जोडी ॥ ४ ।
दृढाभ्यासें ऐशा होई तो पातकी । प्रमाणें पापासी पुढती देई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वृत्तीसम वृत्त । बुद्धीसम शास्त्र शोधी नर ॥ ६ ॥

५१६

कृति उक्ति चित्तीं विचारही तेचि । ऐसे स्थिर होती पापलोभें ॥१॥
पाहूनि सज्जन संपर्क टाळिती । दुर्जनसंगती नृपा होई ॥ २ ॥
समानशीलांच्या संगें पापवृद्धि । होऊनियां अंतीं सौख्यनाश ॥३ ॥
वासुदेव म्हणे परंपरा ऐसी । होई पतनासी कारण हे ॥ ४ ॥

५१७

अंगिकारापूर्वी जाणूनियां दोष । नच स्वीकारी जो निंद्य पंथ ॥ १ ॥
परिणामबोधें धरी साधुसंग । सत्संगें अभ्यास सत्कर्माचा ॥ २ ॥
ऐसी सन्मार्गाची अभिरुचि वाढे । धर्मचि या मार्गें प्रिय वाटे ॥ ३॥
जीविकाही त्यासी आवडे सद्धर्में । सदुद्योगीं रमे निर्वाहार्थ ॥ ४ ॥
सद्‌गुणाङ्कुरासी मुळीं घाली पाणी । धर्मात्मा तो जनीं ऐसा होई॥
वासुदेव म्हणे धार्मिकासी मित्र । आवडे धार्मिक सहजपणें ॥ ६ ॥

५१८

सन्मार्गोपार्जित द्रव्य तैं सन्मित्र । लाभतां इहपर सौख्य भोगी ॥
भूमिका हे उच्च लाभेल जयासी । पावेल तो सिद्धि संकल्पांची ॥
धर्मतेजाचें हें चिन्हचि जाणावें । बल न तया हें परी रुचे ॥ ३ ॥
ज्ञानबळें वैयर्थ्यचि विषयांचें । जाणूनि वैराग्यें हर्ष तया ॥ ४ ॥
ऐसा प्रज्ञाचक्षु होतसे विरक्त । शब्द स्पर्श गंध विषयांमाजी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विषयविरागी । त्यागी न धर्मासी निष्कामत्वें ॥ ६ ॥

५१९

स्वर्गादिक सौख्य मानूनियां तुच्छ । सद्धर्मनिरत विरागी जो ॥१॥
मोक्षमार्गीचि तो बद्धपरिकर । हळु हळू सर्व त्याग करी ॥ २ ॥
सर्वसंगत्यागें मूर्तिमंत धर्म । होई तोचि धन्य ब्रह्मरूप ॥ ३ ॥
पापी धार्मिक तैं विरागी वा मुक्त । होई कैंवी तेंच कथिलें असे ॥
जाणूनियां धर्म त्यागूं नये कदा । तरीच मोक्षाचा लाभ घडे ॥५॥
वासुदेव म्हणे नित्य धर्मरत । तयाचें आयुष्य सफल होई ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ.२७३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१००समाप्त

अध्याय २७४ वा

५२०

उपायें ज्या लाभे मोक्ष धार्मिकासी । उपाय मजसी निवेदा तो ॥
ऐकूनियां भीष्म कथिती धर्मातें । उपाय मोक्षातें विविध असे ॥२॥
प्रवृत्ति निवृत्ति अंगें ऐसीं दोन । अवस्था जाणून आचरावीं ॥ ३ ॥
घटपूर्व, घटसिद्ध होतां भिन्न । अवस्था ते जाण तैंवी एथ ॥ ४ ॥
धर्मसाधनार्थ कर्मप्रवीणता । योग्य, तो साधतां निवृत्त ते ॥५॥
वासुदेव म्हणे ज्ञानाकारवृत्ति । होतां न प्रवृत्ति कर्ममार्गी ॥ ६ ॥

५२१

पूर्व-पश्चिम ते मार्ग होती भिन्न । करितां सकाम कर्म जाणें ॥ १ ॥
मोक्षाचा तो मार्ग जाणावा एकचि । क्षमेनें क्रोधासी प्रथम जिंकीं ॥
उच्छेदावा काम संकल्पत्यागानें । जिंकावी ते ध्यानें निद्रा यत्नें ॥३॥
सावधानतेनें असावें निर्भय । व्हावा प्राणजय अनुसंधानें ॥ ४ ॥
इच्छा द्वेष काम त्यागावे ते धैर्यें । संशय अभ्यासें मोह भ्रम ॥ ५ ॥
उपद्रव रोग मिताहारें जाती । विषयनिवृत्ति तत्वबोधें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे लोभ-मोहनाश । संतोषें निश्चित होत असे ॥ ७ ॥

५२२

दयाभावें टळे अधर्म तो जाण । पालनेंचि धर्म वृद्धि पावे ॥ १ ॥
कंटपाशज्ञानें आशेचा विजय । अर्थासक्तिजय संगत्यागें ॥ २ ॥
अनित्यताज्ञानें स्नेहही त्यजावा । आंवरावी क्षुधा वायुजयें ॥ ३ ॥
कळवळा पोटीं येतां गर्व जाई । तृष्णाक्षय होई संतोषानें ॥ ४ ॥

वेदप्रामाण्यें ते वितर्क जिंकावे । आळसा त्यजावें महायत्नें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मौनें वाचाळता । शौर्येंचि भयाचा पराभव ॥ ६ ॥

५२३

वाचा मन व्हावीं स्वाधीन बुद्धीच्या । बुद्धि ते तत्वार्थी शरण जावी
आत्मबोधीं अंतीं लीन व्हावें ज्ञान । केवळ स्फुरण सच्चित्सुख ॥२॥
काम क्रोध लोभ भय स्वप्नत्यागें । अनुभव योगें येई त्याचा ॥ ३ ॥
ध्यान अध्ययन दान सत्य लज्जा । क्षमा तैं रुजुता शुद्धाहार ॥ ४ ॥
शौच संयम हीं साधनें योगाचीं । होई तेजोवृद्धि आचरितां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसा धूतपाप । होतांचि संकल्प सिद्ध होती ॥ ६ ॥

५२४

ऐशा सिद्धसंकल्पासी । होई विज्ञानाची प्राप्ति ॥ १ ॥
मिताहारी विजितेंद्रिय । इच्छीतसे ब्रह्मभाव ॥ २ ॥
निर्मोहत्व असंगित्व । कामक्रोध रहितत्व ॥ ३ ॥
निर्भयता तैं अदैन्य । निरहंकारता ते जाण ॥ ४ ॥
गृहादिकीं अनासक्ति । काया वाचा मनःशुद्धि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । मार्ग निर्मल मोक्षाचा ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २७४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१०१समाप्त

## अध्याय २७५ वा

५२५

देवल-नारद संवाद पूर्वींचा । धर्मा, ऐकें आतां म्हणती भीष्म ॥ १ ॥
ज्ञात्या वयोवृद्ध देवल मुनींतें । नारद आनंदें प्रश्न करी ॥ २ ॥
स्थावर जंगम विश्वाची उत्पत्ति । कथावी मजसी लयही तेंवी ॥३॥
देवल कथिती पूर्वकर्माधीन । काल निर्मी जाण अवघें विश्व ॥ ४ ॥
काल, धी, वासना, भूतेंचि कारण । सृष्टीप्रति जाण ब्रह्मसुता ॥५॥
अभाव अष्टम जाणावें कारण । म्हणे द्यावें ध्यान वासुदेव ॥ ६ ॥

५२६

विनष्ट तो भूतीं लीन होई पाहीं । भौतिकचि पाहीं सकल विश्व ॥
दृश्य द्रष्टा तेंवी दर्शन यापरी । गुणात्मक धरीं ध्यानीं ऐसें ॥ २ ॥
विज्ञानात्म्यालागीं सकल हें ज्ञान । परंपरा जाण कथितो आतां ॥

इंद्रियांहूनि तें चित्त असे श्रेष्ठ । मन बुद्धि श्रेष्ठ पुढती क्रमें ॥ ४ ॥
क्षेत्रज्ञ पुढती श्रेष्ठ असे पाहीं । वासुदेव होई श्रवणीं दंग ॥ ५ ॥

५२७

सामान्य ज्ञान तें इंद्रियांनीं होई । विशेषता पाही मन त्याची ॥ १ ॥
संकल्प पुढती करीतसे मन । बुद्धि करी जाण निश्चयातें ॥ २ ॥
बुद्धिस्थित घेई विज्ञानात्मा बोध । ज्ञानेंद्रियें अष्ट ऐशापरी ॥ ३ ॥
करचरणादि कर्मेंद्रियें जाण । भाषण, भक्षण करी मुख ॥ ४ ॥
श्रमतां इंद्रियें निद्रा घेई प्राणी । रमतसे स्वप्नीं भ्रमतां मन ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संस्कार पूर्वींचे । मनासवें त्यांचे खेळ स्वप्नीं ॥ ६ ॥

५२८

सात्विकाचीं स्वप्नें सुख-ज्ञानमय । राजसाचें होय मिश्रफल॥ १ ॥
तामसही तैंवी गुणात्मक ऐसे । भाव प्रत्यक्ष हे सर्वांप्रति ॥ २ ॥
जागृती ते नासे स्वप्नीं, न स्वप्नींचें । जागृतींत असे अनुभव हा ॥३॥
सुषुप्तींत होई दोहोंचा त्या नाश । उपायें उच्छेद शक्य तैंवी ॥ ४ ॥
आत्यंतिक ऐशा भावांचा जो नाश । नारदा, तो मोक्ष म्हणती ज्ञाते
वासुदेव म्हणे भोक्त्याचा संबंध । नसे त्यां शाश्वत, भासाचि तो ॥

५२९

भिन्नत्वें यापरी नाश त्यांचा शक्य । अथवा आश्रय आत्मा तयां ॥
आत्मवियोगें ते स्वस्थळीं जाताती । द्रष्टा क्षेत्रज्ञचि तयांलागीं ॥२॥
प्रमाणआभास अभावां तो साक्षी । नित्य संविद्रूपी जाणावें त्या ॥
प्राणचि देहाचा आधार हा वाटे । क्षेत्रज्ञचि असे परी मुख्य ॥ ४ ॥
भग्नगृहत्यागें अन्यगृहीं जातीं । तैसे क्षेत्रज्ञासी बहुत देह ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जाणूनि हें ज्ञाते । न देहवियोगें खिन्न होती ॥ ६ ॥

५३०

स्त्रीपुत्रसंबंध मूढां वाटे दृढ । देहही शाश्वत मानिती ते ॥ १ ॥
सत्यत्वें हा जीव अलिप्त सर्वांसी । नित्य अविनाशी सर्वकाल ॥ २ ॥
योगमार्गें त्याचा कर्मदाह होतां । कर्मबंध त्याचा सुटूनि जाई ॥ ३ ॥
ज्ञानक्षणींचि न नष्ट होई देह । भोगूनि प्रारब्ध नाश त्याचा ॥ ४ ॥

संचित तें ज्ञानें भोगेंचि प्रारब्ध । जाहलिया नष्ट जन्म टळे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सांख्यशास्त्रें ऐसें । ज्ञान होतां नासे सकळ भ्रम ॥६॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २७५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१०२ समाप्त

अध्याय २७६ वा ५३१

ताता, द्रव्यार्थेचि वधियेले आप्त । द्रव्य-तृष्णाजय कैंवी होई ॥ १ ॥
मांडव्य-विदेह संवाद त्या भीष्म । एक पुरातन निवेदिती ॥ २ ॥
विदेह बोलला सदा मी आनंदी । ममत्वबुद्धीसी त्यागूनियां ॥ ३ ॥
मिथिला ते अद्य होई जरी दग्ध । दुःख लेशमात्र नसे मज ॥ ४ ॥
समृद्धही अर्थ दुःखाचि ज्ञात्यासी । अल्पही मूढासी गर्वप्रद ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मूढ तो गर्विष्ठ । अल्प धनें श्रेष्ठ होई मनीं ॥ ६ ॥

५३२

तृष्णाक्षयसौख्यें सकलही सौख्य । जाणावें तें तुच्छ त्रैलोक्यींचें ॥
वृषभासवेंचि शृंग वृद्धि पावे । तेंवी द्रव्यासवें वाढे तृष्णा ॥ २ ॥
तात्पर्य ममत्व तेंचि जाणें दुःख । ज्ञाता इच्छालेश न धरी मनीं ॥
सत्कर्मास्तवही व्यर्थ कष्टूं नये । सत्कर्मही व्हावें सहज लाभें ॥ ४ ॥
कामतृप्तिमात्र करूं नये कदा । ध्यानीं या सिद्धान्ता असों द्यावें ॥५॥
वासुदेव म्हणे पापपुण्यातीत । ज्ञाता जीवजातसुख इच्छी ॥ ६ ॥

५३३

सत्य असत्यही शोक वा आनंद । त्यागूनि निर्द्वंद्व होई ज्ञाता ॥ १ ॥
दुर्बुद्धीसी त्याग जियेचा अशक्य । न होई जे वृद्ध वार्धक्यींही ॥२॥
प्राणघातकी ते महाव्याधी तृष्णा । त्यागील तो माना धन्य जगीं ॥
तृष्णाक्षय ज्यासी तोचि एक सुखी । समूळ तृष्णेसी त्यागी ज्ञाता ॥
पूर्णचंद्रासम निर्मल जीवन । तृष्णाक्षयें जाण तोचि सुखी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि मांडव्य । होई कृतकार्य जनकवचें ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २७६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१०३समाप्त

अध्याय २७७ वा ५३४

धर्म म्हणे ताता, काल अमर्याद । अस्थिर जीवित तेणें होई ॥ १ ॥
कैंवी यथाक्रम व्हावी मोक्षप्राप्ति । आश्रमधर्मासी पाळूनियां ॥ २ ॥

पितापुत्रांचा तैं संवाद प्राचीन । निवेदिती भीष्म धर्माप्रति ॥ ३ ॥
मेधावी नामक पुत्र ब्रह्मनिष्ठ । कर्मठ पित्यास वदला ऐकें ॥ ४ ॥
ताता, हें आयुष्य संपतां वेगानें । वर्तावें ज्ञात्यानें कैंवी सांगें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पिता तैं पुत्रासी । आश्रमधर्मेंचि म्हणे मोक्ष ॥ ६ ॥

५३५

पुत्र म्हणे ताता, संकटें सर्वत्र । पाहूनिही स्थिर वसतां कैंवी ॥१॥
पिता म्हणे काय दावितोसी भय । काय अनिवार्य विघ्नें कथीं ॥२॥
पुत्र म्हणे जरा, मृत्यु हे सर्वदा । सर्वत्र पाहतां ताता, तुम्हीं ॥ ३ ॥
क्षणोक्षणीं क्षीण होतसे आयुष्य । अल्पोदकीं मत्स्य तेंवी जीव ॥४॥
न कळतांचि हा मृत्यु सकलांसी । कदा केव्हां ग्रासी कळेचिना ॥
अन्यचि विषयीं रमवूनि चित्ता । मृत्यु देई धोका क्षणार्धांत ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सर्वदा सावध । राही तया यश सर्वकाळ ॥ ७ ॥

५३६

यास्तव उद्यांचें कार्य व्हावें अद्य । व्हावें पूर्वाण्हींच अपराण्हींचें ॥
जाहलें कीं नाहीं कार्य न विचारी । मृत्यु घाला घाली वेळ येतां ॥
ताता, यास्तवचि साधावें कल्याण । व्यर्थ क्षणही न जाऊं देतां ॥
पूर्ववयांतचि साधावा उपाय । तरीच हा होय जन्म सार्थ ॥ ४ ॥
मोहें कार्याकार्य करूनि संसारीं । रंगे अविचारी घात त्याचा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सुप्त मृगा व्याध । भक्षी तेंवी काळ भक्षी नरा ॥ ६॥

५३७

भोगासक्त सदा संग्रही मानव । नित्यचि अतृप्त राही मनीं ॥ १ ॥
ऐशा स्थितीमाजी मेषासी जैं वृक । घालूनियां झेंप नेई मृत्यु ॥ २ ॥
कार्य हें जाहलें करणें हें असे । अपूर्ण हें असे म्हणतां मृत्यु ॥ ३ ॥
कार्यमग्नातेंही क्षणीं नेई मृत्यु । बलाढ्य दुर्बलु न पाहे तो ॥ ४ ॥
ज्ञाता बुद्धिमंत कुशल वा शूर । ऐसाही विचार न करी मृत्यु ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मृत्यु अपरिहार्य । पाहूनिही स्थैर्य कैंवी चित्ता ॥ ६ ॥

५३८

जन्मल्याचे पाठीं जरा-मृत्यु येती । सत्य मात्र त्यांसी जिंकी एक ॥
सत्यामाजी वसे सर्वदा अमृत । जनीं वनीं वास तोचि मृत्यु ॥ २ ॥

जनीं वास्तव्य तो पाशचि ज्ञात्यांसी । इच्छितो पातकी परी तेंचि
जीविकेसी विघ्न आणी न जो कोणा । सदय त्या जना न छळी कोणी
अमृत वा मृत्यु देहींचि या असे । मोहें मृत्यु, सत्यें अमृतलाभ ॥५॥
जाणूनि हें काम-क्रोध-हिंसेप्रति । त्यागूनि सत्याची धरिती कांस ॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । मेधावी तो हांसे मृत्यूप्रति ॥ ७ ॥

५३९

शांतियज्ञ ब्रह्मयज्ञ तो संयम । वनांत राहून करीन मी ॥ १ ॥
वाग्यज्ञ तेंवी मन कर्मयज्ञ । करीन त्यजून हिंसेप्रति ॥ २ ॥
हिंसायज्ञें लाभे स्वर्गादिक फल । मजसी होईल निंद्यचि तो ॥ ३ ॥
पुत्र माझा मीचि होऊनि मजसी । उद्धारीन मीचि आत्मज्ञानें ॥ ४॥
कायावाचामन स्वाधीन जयाच्या । तप त्याग योगा अवलंबी जो ॥
वासुदेव म्हणे एकाकीही तोचि । संपादील जगीं मोक्षश्रीही ॥ ६ ॥

५४०

हितप्रददृष्टि नसे ज्ञानासम । नसे विद्येसम श्रेष्ठ फल ॥ १ ॥
आसक्तीचि जनीं असे श्रेष्ठ दुःख । त्याग सुखरूप एकमेव ॥ २ ॥
एकांत समत्व सत्यता स्थिरत्व । निरुपद्रवित्व ऋजुत्वही ॥ ३ ॥
हळुहळु क्रियाउपरम हेंचि । संपत्ति विप्राची, धन व्यर्थ ॥ ४ ॥
धनदारादिक व्यर्थचि हें ताता । गुहास्थ आत्म्याचा शोध घ्यावा ॥
वासुदेव म्हणे गेले मृत्युपंथें । पूर्वज या वाक्यें विप्रा बोध ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. २७७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १०४ समाप्त

अध्याय २७८ वा

५४१

धर्म म्हणे ताता, धर्म उपासना । मोक्षद त्या ज्ञाना, कर्मा कथीं ॥१॥
निवेदिती भीष्म मोक्षधर्मरत । आहारादि युक्त जयाप्रति ॥ २ ॥
शाश्वत स्थान त्या प्राप्त होई यत्नें । व्हावें लाभालाभें औदासीन्य ॥
प्राप्तविषयींही व्हावें निरपेक्ष । राखावी संन्यस्तवृत्ति सदा ॥ ४ ॥
त्याज्य ते जाणावी सदा निंदास्तुति । हिंसा न कदापि होऊं द्यावी ॥
वासुदेव म्हणे संचार सर्वदा । तेंवी निर्वैरता असों द्यावी ॥ ६ ॥

५४२

निज निर्भर्त्सना सहन करावी । प्रौढी ते नसावी कदा कोठें ॥ १ ॥
निंदितांही सदा कुशल कथावें । क्रोधासी न जावें चिडवितांही ॥
रागद्वेषहीन वसती ग्रामांत । आवश्यक मात्र वरिती भिक्षा ॥ ३ ॥
शेणहि मारितां प्रियचि वदावें । अक्रूरचि व्हावें क्रूरासवें ॥ ४ ॥
भिऊं नये कोणा, बढाई नसावी । भोजनसमयीं नसो भिक्षा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जीवितार्थ मात्र । यती भिक्षापात्र अवलंबिती ॥ ६ ॥

५४३

वस्त्रादिकलाभालाभें व्हावें सम । स्रक्‌चंदनप्रेम असूं नये ॥ १ ॥
सन्मानितां अन्न सेवूं नये कदा । ओसाडचि गृहा करणें वास ॥ २ ॥
हृदयगुहेंत प्रवेशावें तेथें । आत्मस्वरूपातें चिंतूनियां ॥ ३ ॥
जनसंगतीचा व्हावा अनादर । योगाचा स्वीकार घडो नित्य ॥ ४ ॥
समस्थिर एकनिष्ठचि असावें । प्रसन्न राखावें चित्त सदा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पापपुण्यातीत । होऊनि विहित घडतां घडो ॥ ६ ॥

५४४

मौन वैराग्यानें निस्पृह असावें । लाभे तें सेवावें अन्न सौख्यें ॥ १ ॥
लघ्वाहार व्हावें स्वाधीनइंद्रिय । वाणी मनोवेग आंवरावे ॥ २ ॥
हिंसा उदर तैं उपस्थाचा वेग । आंवरावा चांग तपस्व्यानें ॥ ३ ॥
निंदितां लवही मानूं नये क्लेश । स्तवितां हर्षित होऊं नये ॥ ४ ॥
थोर व्हावें मन दमावें तें पूर्ण । आसक्तही मन नसो कोठें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आप्तादि पूर्वींचे । विषय प्रेमाचे नच व्हावे ॥ ६ ॥

५४५

इच्छूनि पदार्थ सेवूं नये कदा । अनिकेत सदा संचरावें ॥ १ ॥
ज्ञात्यांसी वर्तन मोक्षद हें जाण । मूढांप्रति शीण होई येणें ॥ २ ॥
'हारीतें' यापरी कथियेला मार्ग । निश्चयेंचि मोक्ष लाभे जेणें ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे अहिंसक त्यागी । तेजोमय, जगीं ब्रह्म होई ॥ ४ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २७८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १०५ समाप्त

अध्याय २७९ वा

५४६

धर्मे म्हणे ताता, असूनीहि देव । आम्हांप्रति कष्ट ऐशापरी ॥ १ ॥
दुःखमूळ तेणें वाटे सदेहता । केंवी त्या संन्यासा लाभूं आम्हीं ॥२॥
आतुर न होईं निवेदिती भीष्म । सुखदुःख जाण सामर्योद ॥ ३ ॥
जन्ममरणही जाणावे हे सान्त । धर्मा, राज्यैश्वर्य नित्य नसे ॥ ४ ॥
शमादि साधनें व्हाल तुम्हीं मुक्त । कर्मावरी नित्य नसे सत्ता ॥५॥
वासुदेव म्हणे पूर्वपापपुण्य । रागद्वेष तम निर्मी कदा ॥ ६ ॥

५४७

सुज्ञें रागद्वेष सारूनियां दूर । करावा मोक्षार्थ यत्न सदा ॥ १ ॥
कारण हा आत्मा सर्वदा अलिप्त । वायु धूलिव्याप्त तेंवी दुःखी ॥२॥
ज्ञानबळें दूर करील जो तम । तोचि सनातनपद पावे ॥ ३ ॥
अयत्नसाध्य तें होतां यत्नसाध्य । उत्पत्ति-विनाशशील होई ॥ ४ ॥
कंठचामीकरन्यायें त्याची प्राप्ति । लाभे असे तेंचि त्याचि ठाईं ॥५॥
वासुदेव म्हणे यापरी धर्मासी । भीष्म निवेदिती पुढती ऐका ॥ ६ ॥

५४८

धर्मा, भ्रष्टैश्वर्य वृत्रासुराप्रति । शुक्र निवेदिती काय ऐकें ॥ १ ॥
पुशिती त्या शुक्र पराजयदुःख । नसे कीं मनांत सांगें वृत्रा ॥ २ ॥
वृत्र तदा बोले खेळ हा जाणूनि । लवही न मनीं हर्ष शोक ॥ ३ ॥
कालप्रेरणेनें इष्टानिष्टप्राप्ति । कर्मासम गति सकलां लाभे ॥ ४ ॥
पुरातन पंथ क्रमिती हा मूढ । वासुदेव वृत्रवचन कथी ॥ ५ ॥

५४९

ऐकूनि तें शुक्र म्हणती हे सुज्ञा । काय या भाषणा करिसी ऐशा ॥
वृत्र म्हणे मुने, महत्व पावलों–। तपानेंचि, झालों दीन कर्में ॥ २ ॥
इंद्रसाह्यास्तव पातला जैं हरि । पुण्य तें पदरीं दर्शनाचें ॥ ३ ॥
यास्तव कथावी गति ते कर्माची । कोणा ब्रह्मप्राप्ति कथन करा ॥
आधार भूतांसी कोण निवेदावें । ब्रह्मज्ञान व्हावें केंवी कथा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शुक्र तैं वृत्रासी । तत्व निवेदिती तेंचि ऐका ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. २७९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १०६ समाप्त

अध्याय २८० वा ५५०

बाहूमाजी ज्याच्या कवळलें विश्व । तया नमस्कार मोक्षशिरा ॥१॥
माहात्म्य मी त्याचें निवेदितों तुज । बोलती हें शुक्र तोंचि तेथें ॥२॥
पातले कुमार, प्रार्थी तयां शुक्र । विष्णूचें महत्व वृत्रा कथा ॥ ३ ॥
कुमार बोलती वृत्रा, विष्णुरूप । जाणावें हें विश्व अंतर्बाह्य ॥४॥
केवळ संयमें घडे त्याची प्राप्ति । अंतर्बाह्य शुद्धि जयाप्रति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चित्ताचें शोधन । स्वयेंचि करून मुक्त व्हावें ॥ ६ ॥

५५१

सुवर्णकर्ता जैं तापताडनानें । शुद्ध करी सोनें तेंवी चित्त ॥ १ ॥
अभ्यास वैराग्य समाधि साधनीं । रमे जन्मोजन्मीं तोचि शुद्ध ॥२॥
भगीरथयत्नें एकाही जन्मांत । होई चित्त शुद्ध दक्षतेनें ॥ ३ ॥
झाडावी जैं धूळ तत्काल त्यापरी । चित्तमळ हरी साधक तो ॥४॥
दक्षतेनें यत्न परी आवश्यक । वासुदेव बोध पुढती ऐके ॥ ५ ॥

५५२

तिलसर्षपांसी कुसुमांचा गंध । न येईचि अल्प कुसुमें जरी ॥ १ ॥
बहुकाळ बहु कुसुमसंबंध । होतांचि सुगंध तयां येई ॥ २ ॥
वृत्रा, हाचि न्याय जाणावा या ठांई । चित्त शुद्ध होई याचि रीती ॥
जन्मोजन्मीं दोषनाशार्थ प्रयत्न । करील तो धन्य होई अंतीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे विष्णूचि त्रिपुटी । होऊनियां भोगी सकल विश्व ॥

५५३

विष्णूच्याचि एका स्वाधीन हें विश्व । एकचि विविध रूप त्याचें ॥
भिन्नरूपीं एक बोध हा जयासी । तया ब्रह्मप्राप्ति ध्यानीं घेई ॥२॥
निरूपण ऐसें यद्यपि सुलभ । परी अनुभव कठिण बहु ॥ ३ ॥
बहुत योजनें लांब रुंद खोल । कूप ते विशाल बहुत ऐसे ॥ ४ ॥
एकादिनीं एका केशाग्रें एकदां । उदक शिंपितां कूप ऐसे ॥ ५ ॥
संपतील तदा सृष्टीचा विनाश । वासुदेवाचित्त चकित होई ॥६॥

---

१ मोहरी

५५४

तात्पर्य, अनंत काल ऐशापरी । ज्ञानाविण जरी भ्रमतां व्यर्थ ॥ १ ॥
संसारप्रवाहीं कृष्ण, धूम्र, नील । रक्त, पीत, शुभ्र वर्ण सहा ॥ २ ॥
रागद्वेषहीन शुभ्र तो विमल । बहुजन्मफल जाणावें तें ॥ ३ ॥
दिव्यवर्णयोगज्ञानें ते कळती । तेणें कर्मगति ध्यानीं येई ॥ ४ ॥
कर्मसाक्षी कालरूपी जीव ऐसे । वर्ण निर्मीतसे कर्मासम ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे निकृष्ट ते गति । कृष्णवर्णें लोकीं लाभतसे ॥ ६ ॥

५५५

लक्षावधि योनिभोगें कृष्णवर्ण । पालटूनि धूम्रवर्ण येई ॥ १ ॥
पुढती भाग्यानें लाभे ताम्रवर्ण । क्षीण तमोगुण होई जरी ॥ २ ॥
सत्व न्यून जरी होई तरी नील । होऊनि मानवदेहीं येई ॥ ३ ॥
यापरी असंख्य काल तो लोटतां । देवत्वें पीतता येई तया ॥ ४ ॥
दीर्घकाल भोग भोगूनियां तेथें । मानवदेहातें येई पुनः ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शुक्ल, कृष्ण ऐसा । वारंवार साचा कर्में वर्ण ॥ ६ ॥

५५६

रक्त पीत शुक्ल कर्में लाभे वर्ण । वरितां सत्कर्मे बहुत जन्म ॥ १ ॥
ऐसे शुक्लरूपी पुण्यलोकीं जाती । ब्रह्मज्ञातें होती भास्र सर्व ॥ २ ॥
तुर्यावस्थागामी अवस्थातीत तो । मिथ्याचि मानितो सर्व लोकां ॥
जीवन्मुक्ताही त्या प्रारब्ध न चुके । कल्पचि त्या भासे जन्म एक ॥
सुटतां एथूनि पुरेसें वैराग्य । महदादि लोक भोगीतसे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसी क्रममुक्ति । लाभे तयाप्रति महद्भाग्यें ॥ ६ ॥

५५७

योगभ्रष्ट पावे सत्कुलांत जन्म । पुढती यथाक्रम पुण्य भोगी ॥ १ ॥
सप्त लोकांसी तो जिंकूनियां जाई । ब्रह्मलोकीं जाई अंतीं परी ॥२॥
ब्रह्मभाव जरी दृढावेना तरी । मृत्युलोकावरी येई पुनः ॥ ३ ॥
ब्रह्मभाव स्थिर होतां तो कल्पांतीं । पावतसे मुक्ति निश्चयानें ॥ ४ ॥
ब्रह्मज्ञानें मोक्ष एकाचि जन्मांत । शून्यपरिच्छेद स्थान पावे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कैलास, वैकुंठ । परमपदादिक नामें तया ॥ ६ ॥

५५८

स्थूल सूक्ष्मादिक दग्ध ज्याचे देह । ज्ञानें, त्याच्या लय प्रकृतीचा ॥
आत्यंतिक त्याच्या प्रलयाचें रूप । निवेदितों ऐक दैत्यश्रेष्ठा ॥ २ ॥
प्रारब्धावशेष जोंवरी ज्ञात्याचा । तोंवरी जगाचा प्रत्यय त्या ॥ ३ ॥
आभासरूप तो जाणूनि अभ्यास । करूनि तो नित्य मोद पावे ॥ ४ ॥
प्रारब्ध संपतां पावे ब्रह्मरूप । अज्ञाप्रति दुःख भ्रमें होई ॥ ५ ॥
कंठचामीकरन्यायेंचि जीवासी । भ्रांति जगताची अविद्येनें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वृत्राप्रति शुक्र । करिती हा बोध भाग्यें त्याच्या ॥७॥

५५९

वृत्र म्हणे गुरो, ब्रह्मचि शाश्वत । संसार कल्पित कळलें मज ॥ १ ॥
शोक मोह तेणें लवही न चित्ता । आधार या विश्वा महाविष्णु ॥२॥
निवेदिती भीष्म बोलूनियां ऐसें । वृत्र स्वप्राणांतें लीन करी ॥ ३ ॥
धर्म म्हणे मुनि बोधिती जो वृत्रा । कृष्णचि कीं ताता, कथावा तो ॥
वासुदेव म्हणे निवेदिती भीष्म । धर्मा, तो न कृष्ण, महादेव ॥ ५ ॥

५६०

मूलाधिष्ठान तो देव । मायातीत निर्विकार ॥ १ ॥
महादेव म्हणती तया । स्पर्शेंही न तया माया ॥ २ ॥
मायासंपर्कें तयासी । सकल ऐश्वर्याची प्राप्ति ॥ ३ ॥
तया भगवान संज्ञा । तोचि एक कारणात्मा ॥ ४ ॥
तैजसाख्य पुढती तोचि । होई कार्यब्रह्मरूपी ॥ ५ ॥
चतुर्थ हा जाणें कृष्ण । फलरूप याचें स्थान ॥ ६ ॥
निर्मी ब्रह्मांडें अनंत । वासुदेव वंदी त्यास ॥ ७ ॥

५६१

परब्रह्माचा हा जाणें अष्टमांश । अर्ध ब्रह्म, अर्ध प्रथम माया ॥ १ ॥
भगवान तोचि कारणात्मरूप । कार्यरूप तोच अविद्येनें ॥ २ ॥
तदा चतुर्थांश राही ब्रह्मतेज । कार्य वृक्षरूप जाणिजे तें ॥ ३ ॥
पुढती व्यष्टीचा अभिमान होतां । तो परब्रह्माचा अष्टमांश ॥ ४ ॥
ऐशा मानें कृष्ण जाणें अष्टमांश । अवतारही तो अष्टमाचि ॥५॥

चित्तरूचें कृष्ण जाणें पक्क फळ । अपक्क तें जीव युधिष्ठिरा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अष्टमांश परी । जगासी उद्धरी हाचि कृष्ण ॥ ७ ॥

५६२

क्षणभंगुर न आम्हांपरी कृष्ण । सार्थ तेणें नाम अच्युत हें ॥ १ ॥
अष्टमांश तेजें कल्पी त्रैलोक्यासी । जाणा तैजसचि यापूर्वींचा ॥२॥
कल्पांतीं तयाही विनाश जाणावा । शबल जाणावा तत्पूर्वींचा ॥३॥
जलशायी तोचि ब्रह्मीं लीन होई । बलिवंत पाही तिघांमाजी ॥ ४ ॥
परमार्थदृष्ट्या नित्यत्व न तया । पावे तो विलया ब्रह्मीं अंतीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्माही तो जाण । कल्पांतीं विलीन होई ब्रह्मीं ॥ ६ ॥

५६३

अनादि अनंत सकलांचें मूळ । करीतसे खेळ निर्विकार ॥ १ ॥
मायाश्रयें पावे कृष्णादि स्वरूप । उपाधीनें बद्ध परी नसे ॥ २ ॥
विरुद्ध न कदा म्हणूनि अनिरुद्ध । विश्व हें तरंग तयावरी ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे सर्वाधार योग्य । जग हें विचित्र निर्मीतसे ॥ ४ ॥

५६४

धर्म म्हणे ताता, पराभूत वृत्त । ज्ञानें शांतचित्त वाटे होई ॥ १ ॥
शुभगतीचा त्या असेल निश्चय । तेणें चित्तस्थैर्य होई त्याचें ॥ २ ॥
शुक्लवर्णे शुक्ल वर्णांत त्या जन्म । यास्तव न जन्म पुनरपि ॥ ३ ॥
सत्वाधिक्यें पीत, रक्त तो रजानें । नाश विकल्पानें तमें तया ॥ ४ ॥
ताता, आम्ही रक्त कैंवी सद्गतीतें । पावूं मजसी तें कथन करीं ॥५॥
वासुदेव म्हणे नीलाहूनि हीन । पावूं काय जन्म शंका धर्मा ॥ ६ ॥

५६५

निवेदिती भीष्म शुद्ध शुक्लीं जन्म । पावलांती जाण भय न धरीं ॥
व्रतपालनही केलेंती बहुत । आतां तुम्हां वास देवलोकीं ॥ २ ॥
पुढती मानवदेहांत येऊनि । संपादाल योनी निर्जरांची ॥ ३ ॥
तेथूनियां मग व्हाल तुम्ही सिद्ध । न धरीं मनांत लवही शंका ॥४॥
धर्मा, तुम्हीं स्वस्थ निर्मल अंतरीं । नसो लवभरी भय मनीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कृपा नारायण । करील तें जाण शुक्लवर्ण ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २८० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १०७ समाप्त

अध्याय २८१ वा ५६६

धर्म म्हणे ताता, भक्त ऐसा वृत्र । कैंवी तो वधार्ह इंद्राप्रति ॥ १ ॥
निवेदिती भीष्म वृत्र महाकाय । पाहूनियां देव भयभीत ॥ २ ॥
पाहूनि शक्राही निर्भयचि वृत्र । प्रवर्तलें युद्ध पुढती घोर ॥ ३ ॥
वृत्रमायाबळें देवेंद्र मूर्छित । साह्य त्या वसिष्ठ होती तदा ॥ ४ ॥
इंद्राप्रति मुनि बहु स्फूर्ति देती । शिवासी प्रार्थिती अंतीं देव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दुष्टाचेंही बल । कांपवी सबल देवांप्रति ॥ ६ ॥

५६७

शिवाचें तें तेज ज्वररूप घेई । वज्रामाजी जाई महाविष्णु ॥ १ ॥
वसिष्ठादि तदा बोलले शक्रासी । आतां दैत्या वधीं योगबळें ॥ २ ॥
तपोबळें दैत्य बहु बलवंत । ज्वरें संमोहित तोंचि वधीं ॥ ३ ॥
ज्वरग्रस्त दैत्या पाहूनियां देव । पावूनि आनंद स्तविती इंद्रा ॥४॥
वासुदेव म्हणे तेज तें इंद्राचें । असह्य दैत्यांतें होई बहु ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. २८१ वा तथा मोक्षधर्मपर्वांचा अ. १०८ समाप्त

अध्याय २८२ वा ५६८

निवेदिती भीष्म धर्मा, ज्वरग्रस्त । वृत्र बहु त्रस्त होई तदा ॥ १ ॥
अग्निज्वाला मुखीं सर्वांग पांडुर । भासला भेसुर कंप पावे ॥ २ ॥
अशुभलक्षणी घोर त्याची स्मृति । भालुरूपें मुखीं प्रगट होई ॥ ३ ॥
जृंभायुक्त तया दैत्यावरी इंद्र । फेंकितांचि वज्र कार्यसिद्धि ॥ ४ ॥
स्वर्गलोकीं वृत्र जातां ब्रह्महत्या । विक्राळ स्वरूपा प्रगटे तेथें ॥५ ॥
वासुदेव म्हणे भयानें त्या इंद्र । कमलनालांत प्रवेशला ॥ ६ ॥

५६९

दीर्घकालें हत्या तेथेंही पातली । ब्रह्मयासी त्यावेळीं शरण इंद्र ॥१॥
विरंचीनें हत्या वांटिली चौघांत । अग्नि स्त्रिया वृक्ष उदकांप्रति ॥२॥
अयाजक, कुयोगीं जो वृक्षछेत्ता । मस्तकीं तयाच्या ब्रह्महत्या ॥३॥
रजस्वलागामी, जळीं मलमूत्र । त्यागील तयास तोंचि दोष ॥ ४ ॥
विभागूनि ऐसी देतां ब्रह्महत्या । त्यागूनि दैत्येंद्रा निघूनि जाई ॥५॥
वासुदेव म्हणे स्थानें ऐसीं चार । जाणील तो नर दक्ष राही ॥ ६ ॥

५७०

पुढती इंद्रानें केला अश्वमेध । पापविनिर्मुक्त व्हावयासी ॥ १ ॥
वृत्ररुधिरानें जाहले कुक्कुट । यास्तव न वंद्य भक्षिती त्या ॥ २ ॥
कदा न भक्षिती विप्र कुक्कुटातें । धर्मा, त्या विप्रांतें शरण जाई ॥
पुण्यकाळीं वृत्रवृत्त हें विप्रांसी । कथील तयासी दोषमुक्ति ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसा हा वृत्तांत । कथिती धर्मास पितामह ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २८२ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१०९समाप्त

अध्याय २८३ वा

५७१

युधिष्ठिरप्रश्नें भीष्म ज्वरोत्पत्ति । ऐका जे कथिती कथितों तेंचि ॥
ज्योतिष्क नामक मेरूच्या शिखरीं । एकदां अमरीं गमन केलें ॥ २ ॥
पाहूनि तें पुशी पार्वती शंकरा । कासया त्या स्थळा जाती देव ॥३॥
कथिती तैं शिव दक्षयज्ञास्तव । धांव घेती देव तयास्थानीं ॥ ४ ॥
पार्वती तैं पुशी तुम्हीं न कां जातां । अवमान माझा म्हणती शिव ॥
वासुदेव म्हणे हविर्भागयज्ञीं । नव्हता घ्या ध्यानीं शिवासी तैं ॥६॥

५७२

सर्वश्रेष्ठ ऐशा देवा हविर्भाग । नसे तेणें क्रोध पार्वतीसी ॥ १ ॥
पाहूनि शंकर क्रुद्ध होती मनीं । कैलासीं ठेवूनि नंदीप्रति ॥ २ ॥
गणांसवें गेले यज्ञमंडपांत । यज्ञविध्वंसित करिती क्रोधें ॥ ३ ॥
मृगरूपें तदा धावूं लागे यज्ञ । ललाटापासून शिवाच्या तैं ॥ ४ ॥
प्रगटला एक भयप्रद वीर । तोचि महा उग्र ज्वर लोकीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पाहूनि ज्वरासी । हविर्भाग देती देव शिवा ॥ ६ ॥

५७३

विभागिला ज्वर शिवानें तैं जनीं । घेऊनियां ध्यानीं दक्ष व्हावें ॥१॥
मस्तकज्वर तो गजातें जाणावा । शिलाजितु व्हावा पर्वतासी ॥ २ ॥
नीळ ते उदकीं शिखा मयुरासी । सर्पा कांतरूपी ज्वर असे ॥ ३ ॥
नेत्ररोग पिका हिक्का ते शुकातें । प्रत्यक्ष नरातें ज्वररूप ॥ ४ ॥
ईश्वरचि ऐसा जाणावा हा ज्वर । जाणील तो नर सुख पावे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे इतिहास ऐसा । कथिला ज्वराचा धर्माप्रति ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. २८३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.११० समाप्त

अध्याय २८४ वा

५७४

वैशंपायनासी जनमेजय पुशी । कथा ते दक्षाची निवेदावी ॥ १ ॥
तदा ते कथिती हिमालयावरी । दक्ष यज्ञ करी उत्साहानें ॥ २ ॥
देव गंधर्व तैं यक्षराक्षसादि । यज्ञालागीं येती सकल प्राणी ॥ ३ ॥
परी शिव तेथें दिसेना कोणातें । खेद दधीचीतें तदा वाटे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे क्रोधें तैं दधीचि । बोलले दक्षासी तेंचि ऐका ॥ ५ ॥

५७५

अपूज्यांची पूजा पूज्यांचा अवमान । नरघातासम पाप तेणें ॥ १ ॥
आजवरी नाहीं बोललों मी मिथ्या । पुढतीही कदा न वदें तैसें ॥२॥
पहाल आतांचि रुद्रातें या स्थानीं । दक्ष अवमानी रुद्राप्रति ॥ ३ ॥
दाक्षायणि तदा चिंतामग्न होई । उपाय न कांहीं गवसे तिज ॥ ४ ॥
शिव तयावेळीं बोलले तियेसी । सामर्थ्य नेणसी प्रिये माझें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि पार्वती । बोलली शिवासी उपरोधानें ॥ ६ ॥

५७६

स्त्रियांच्या पुढती सामान्यही जन । म्हणती आपण श्रेष्ठ जनीं ॥१॥
ऐकूनियां शिव म्हणती प्रत्यय । दावितों मी काय वदतों त्याचा ॥
बोलूनियां ऐसें महाभूत एक । निर्मिलें प्रत्यक्ष काळासम ॥ ३ ॥
नाश या यज्ञाचा करीं ऐसी आज्ञा । होतांचि त्या स्थाना प्रलय होई
पाहूनियां दक्ष प्रार्थी त्या भूतासी । कोण म्हणे त्यासी निवेदीं तें ॥
वासुदेव म्हणे भद्रकाळी तेंवी । वीरभद्र ऐसीं कथिलीं नामें ॥ ६ ॥

५७७

शिवक्रोधें आम्हां निर्मियेलें दक्षा । शिवाचीच कृपा संपादावी ॥ १ ॥
क्रोधही शिवाचा होई हितप्रद । वरही असंख्य इतर व्यर्थ ॥ २ ॥
ऐकूनियां वीरभद्रवचनासी । साष्टांग शिवासी वंदी दक्ष ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे स्तुति करी दक्ष । देऊनियां लक्ष श्रवण करा ॥ ४ ॥

५७८

शाश्वता ध्रुवा घे नमस्कार माझा । अखिल विश्वाचा स्वामी तूंचि ॥
स्तवनें त्या सांब जाहला संतुष्ट । म्हणे वर माग दक्षा, मज ॥ २ ॥

दक्ष म्हणे यज्ञद्रव्यें जीं नाशिलीं । व्यर्थ तीं न गेलीं पाहिजेत ॥ ३ ॥
तथास्तु तयासी बोलले शंकर । दक्ष अष्टोत्तर नामें गाई ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे नामें तीं संक्षेपें । गाऊनि शिवातें तुष्ट करूं ॥ ५ ॥

५७९

देवशत्रुहंत्या हे देवदेवेशा । नमस्कार माझा घेंई देवा ॥ १ ॥
यज्ञपते, मित्रा, प्रभो हे त्रिनेत्रा । हे विश्वव्यापका नमन घेंई ॥ २ ॥
शंकुकर्णा, कुंभकर्णा, हे गोकर्णा । करितों वंदना भावें तुज ॥ ३ ॥
शतोदरा, शतावर्ता, शतजिव्हा । तपस्व्यांतें सदा वंद्य तूंचि ॥ ४ ॥
भवा, शर्वा, रुद्रा, वरदा, त्रिशीर्षा । शुभ्रा, ऊर्ध्वकेशा, नमन घेंई ॥
धूम्रवर्णा, नीलकंठा हे विरूपा । शिवा, सूर्यरूपा, नमन घेंई ॥ ६ ॥
वृषस्कंधा, धनुर्धरा, अरिंदमा । हे भूतपालना नमन घेंई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे हे जगच्चालका । कैलासनायका नमन घेंई ॥ ८ ॥

५८०

सर्वस्वरूपा त्या शिवा बहुपरी । स्तवूनि अंतरीं तोष देई ॥ १ ॥
दक्षासी तैं शिव बोलले सामीप्य । मज लाभो, तुज तैंवी पुण्य ॥ २ ॥
पाशुपतव्रतपुण्य घडो ऐसें । बोलूनि न दिसे शिव कोणा ॥ ३ ॥
अंतर्हित ऐसे शिवभगवान । स्तवनें या काम पूर्ण होती ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे व्यासोक्त हें ज्ञान । ऐकूनियां धन्य व्हावें जनीं ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २८४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १११ समाप्त

अध्याय २८५ वा ५८१

धर्म म्हणे ताता, आत्मानात्मबोध । कथावें तें शास्त्र कैंवी झालें ॥
निवेदिती भीष्म भूतांचें पंचक । कारण सृष्टीस जाण धर्मा ॥ २ ॥
कूर्मअंगें किंवा सागरतरंग । लीन होती तोच सृष्टिक्रम ॥ ३ ॥
शब्द आकाशाचा, घनता पृथ्वीची । कांति ते तेजाची, वायु प्राण ॥
रस उदकाचे ऐसा हा प्रकार । भूतांचे साचार सकल गुण ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भौतिकपसारा । पूर्वी निवेदिला बहुवार ॥ ६ ॥

५८२

इंद्रियव्यापारचालकभावना । तैसेंचि त्रिगुणां निर्मी ईश ॥ १ ॥
काल तेंवी मन निर्मिलें ईशानें । व्यापिला बुद्धीनें अवघा देह ॥ २ ॥
ज्ञाता सकलांचा आत्मा तो अग्रम । केवळ तो जाण साक्षी असे ॥
गुण काल दैव बुद्धिप्रवर्तक । विषय समस्त सेवी बुद्धि ॥ ४ ॥
इंद्रियें जाणावीं बुद्धीचीं साधनें । इच्छितां तें जाणें मनरूप ॥ ५ ॥
साधनदोषानें बुद्धि दोष पावे । गुणांमागें धांवे सुखदुःखीं ॥ ६ ॥
उफाळला सिंधु लंघी न मर्यादा । तैसीच हे बद्धा विषयीं बुद्धि ॥७॥
वासुदेव म्हणे सुखदुःख मोह । जाणूनि हे भाव अचल व्हावें ॥ ८ ॥

५८३

त्रिगुणांचे खेळ जाणे तो सावध । सर्वदा जागृत तोचि असे ॥ १ ॥
आत्मा बुद्धि दोन्ही सूक्ष्मचि तीं परी । बुद्धि गुणमयी आत्मा शुद्ध ॥
जलमत्स्यांसम वास यां एकत्र । परी आत्मबोध गुणांसी न ॥ ३ ॥
द्रष्टा साक्षी आत्मा सर्वदा अलिप्त । अज्ञानेंचि लिप्त भासतसे ॥ ४ ॥
बुद्धीवरी गुण भासती भ्रमानें । रज्जुसर्पभानें भयद जेंवी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे बुद्धीहूनि पर । आत्मा परात्पर नाम पावे ॥ ६ ॥

५८४

यापरी इंद्रियें बुद्धि आणि आत्मा । जाणे त्या न कोणा शोक मोह ॥
उर्णनाभीसम स्वभावेंचि बुद्धि । प्रसवे गुणांसी तंतु गुण ॥ २ ॥
सूक्ष्मबुद्धीनें हे जड चेतनाची । सोडवूनि ग्रंथि मुक्त व्हावें ॥ ३ ॥
अगाध उदकीं अकुशला क्लेश । तैसे अज्ञ एथ भ्रमती मोहें ॥ ४ ॥
अध्यात्मबळानें ज्ञाननौकायुक्त । दग्धकर्मदोष मुक्त होती ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे निर्दोष तो ज्ञानी । निंदा-स्तुति जनीं न करी कदा ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २८५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ११२ समाप्त

अध्याय २८६ वा ५८५

ताता, अति दुःख तेंवी मृत्युभय- । नाशक, उपाय निवेदावा ॥ १ ॥
ऐकूनियां भीष्म नारद-समंग । कथिती संवाद धर्माप्रति ॥ ३ ॥
बालासम नित्य समाधानी शांत । केंवी तूं नारद पुसती तया ॥ २ ॥

बोले तें समंग भूत-भविष्यादि । जाणूनि मी सुखी सर्वकाळ ॥ ४ ॥
नारदा, या जनीं मूढ अंधासम । चाले योगक्षेम आमुचाही ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मान, धन, वय । प्राक्तनेंचि सर्व जगीं लाभे ॥ ६ ॥

५८६

सहस्री शतीही नांदती सौख्यानें । भक्षूनिही पणं सौख्य कोणा ॥१॥
सुखदुःख जनीं अस्थिर हे भाव । जाणूनियां स्थिर सदा ज्ञाता ॥२॥
पूर्ण समाधानें मत्सर वा आशा । खेदही न कदा तेंवी मज ॥ ३ ॥
शीलावीण शांतिलाभ न कदापि । मंत्र बळ होती व्यर्थ सर्व ॥ ४ ॥
योगावीण ज्ञान, ज्ञानाविण सौख्य । न लाभे हें नित्य ध्यानीं असो
वासुदेव म्हणे सहिष्णुता तेंवी । उपेक्षा दुःखाची हेंचि सौख्य ॥६॥

५८७

इष्टलाभें मोद तेणेंचि उन्माद । उन्मादें नरक अंतीं लाभे ॥ १ ॥
जाणूनियां हर्षशोकही त्यागितों । तेणें स्थिर होतों सदा मनीं ॥ २ ॥
सुखदुःखभाव जाणतों मी परी । खेळचि अंतरीं मानितों ते ॥ ३ ॥
अर्थ-काम-तृष्णा-मोहत्यागें कदा । शोक-मोहबाधा न शिवे मज ॥४॥
नारदा, तपानें तत्व हें जाणिलें । वासुदेव बोले मुनिवाक्य ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २८६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ११३ समाप्त

अध्याय २८७ वा ५८८

धर्म म्हणे अज्ञ संशयी शमादि । जया न तयासी सौख्य केंवी ॥ १ ॥
गुरुपूजा, वृद्धोपासना, श्रवण । उपाय हे भीष्म निवेदिती ॥ २ ॥
गालव एकदां म्हणे नारदासी । मर्यादा शास्त्राची कथा मज ॥ ३ ॥
भिन्नभिन्न मार्गें वाढतो संशय । करावा निश्चय केंवी सांगा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे गालवा नारद । दाविती जो मार्ग तोचि ऐका ॥ ५ ॥

५८९

नारदा, आश्रमधर्म भिन्नभिन्न । अधिकार जाणून कथिले शास्त्रें ॥
विरोधाभास हा जाणूनियां ज्ञाते । प्रेमें स्वकर्मातें आचरिती ॥ २ ॥
सदा पापत्याग पुण्यावरी प्रीति । नित्य दया पोटीं ऋजुभाव ॥ ३ ॥
सर्वभूतहित सत्याचा स्वीकार । नसो अहंकार प्रमादही ॥ ४ ॥

सर्वदा संतोष एकांताभिरुचि । वेद-वेदान्तेंचि हित होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सर्वदा जो युक्त । पावे परमहित तोचि जनीं ॥ ६ ॥

५९०

इच्छूंनये परनिंदेनें स्वोत्कर्ष । सद्गुणें उत्कर्ष संपादावा ॥ १ ॥
जों जों गुणहीन तों तों बहु प्रौढी । थोरां दोष देती मूढ हर्षें ॥ २ ॥
प्रतिकार तयां करितां न कोणी । आपणचि जनीं म्हणती श्रेष्ठ ॥३॥
परनिंदा आत्मस्तुति न करितां । लौकिकासी ज्ञाता चढे जनीं ॥ ४ ॥
बोलल्यावांचूनि पुष्पांचा सुगंध । पसरे जगांत सुजन तेंवी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आत्मप्रशंसेनें । श्रेष्ठता न जाणें मूर्खांप्रति ॥ ६ ॥

५९१

कोंडितां न लपे ज्ञात्याचा प्रकाश । गर्जतांही व्यर्थ प्रलाप ते ॥ १ ॥
शांतपणेंही ते बोलतां सदुक्ति । प्रकाशे जगतीं पात्रतेनें ॥ २ ॥
सूर्यकांताधारें उष्णता सूर्याची । प्रलापें मूर्खांची तेंवी बुद्धि ॥ ३ ॥
यास्तव सज्जन प्रलाप त्यागूनि । ज्ञानांत रंगूनि जाती हर्षें ॥ ४ ॥
ज्ञानाऐसा लाभ नसेचि या जनीं । वासुदेव मनीं चिंती ज्ञान ॥ ५ ॥

५९२

प्रश्नाविण सुज्ञ उत्तर न देई । अन्याय्य प्रश्नाही तिरस्कारी ॥ १ ॥
धार्मिक उदार साधुजनसंग । इच्छावा सौख्यद कल्याणार्थ ॥ २ ॥
वर्णधर्मलोप होई जया ठाई । वसावें न पाहीं कदा तेथें ॥ ३ ॥
संगें गुणदोष जडती सत्वरि । पापें पाप करी पुण्यें पुण्य ॥ ४ ॥
अग्नि जल ज्योत्स्ना संबंधासमान । संगफल जाण तत्काळचि ॥५॥
जीवनार्थ मात्र सेविती जे अन्न । रुचीवरी ध्यान न ठेवितां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे जिंकील जो जिव्हा । दास कां न व्हावा मोक्ष त्याचा

५९३

प्रश्नाविण बोध करी जो शिष्यांसी । ज्ञाते त्या नरासी त्यजूनि जाती
गुरुशिष्य जेथें पाळिती मर्यादा । ऐसें स्थान कदा सोडूं नये ॥ २ ॥
विद्वज्जननिंदा जया ठाईं व्यर्थ । कदापि न तेथ वसे ज्ञाता ॥ ३ ॥
धर्मबंध जेथें उच्छिन्न लोभानें । प्रदीप्त चैल तें स्थान जाणा ॥ ४ ॥

शांत निर्मत्सर निर्भयशा स्थानीं । वसावें ज्ञात्यांनीं संतसंगें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अर्थास्तव धर्म । पाळिती ते जन त्याज्य जाणा ॥६॥

५९४

जीवनार्थ जेथें आचरिती पाप । गृह सर्पयुक्त जाणावें तें ॥ १ ॥
खिळतां खाटेसी शल्य जें होईल । करावा अव्हेर चर्मांचा त्या ॥२॥
राजे, राजदूत समान ज्या ठाईं । एकाकीचि गृहीं विषय सेवी ॥३॥
परिवारचिंता त्यजूनि, तें स्थान । त्यागितात सुज्ञ तत्काळचि ॥४॥
वेदवेत्ते विप्र षट्कर्मनिरत । सन्मानिती जेथ वसणें तेथें ॥५॥
वासुदेव म्हणे स्वाहा स्वधा जेथें । सज्जनासी तेथें वास घडो ॥६॥

५९५

जीवनार्थ विप्रां प्राप्त निंद्य कर्म । जेथ तो त्यजून जावें देश ॥ १ ॥
याचनेवांचूनि प्रेमें जेथ दान । वरावें तें स्थान साधकानें ॥ २ ॥
सज्जनां सत्कार अविनीतां दंड । अत्यानंदें तेथ वसणें योग्य ॥ ३ ॥
विपत्तींत रक्षी धार्मिक नृपाळ । संधि न विफल जाऊं देई ॥ ४ ॥
तात्पर्य साधावें सर्वभूतहित । वदावें बहुत काय आतां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पंथ हा श्रेयाचा । आचरील त्याचा भाग्यकाल ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. २८७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ११४ समाप्त

अध्याय २८८ वा

५९६

ताता, नृपालागीं विषयविरक्ति । होईल ते कैसी निवेदा तें ॥ १ ॥
सगर-अरिष्टनेमींचा संवाद । पितामह श्रेष्ठ निवेदिती ॥ २ ॥
सगरासी मुनि कथिती मोक्षचि । श्रेष्ठ सौख्य लोकीं ध्यानीं असो ॥
जाणूनि आसक्ति नसावी संसारीं । मुक्त योग्यवेळीं व्हावें यत्नें ॥४॥
यदृच्छालाभेंचि असावें संतुष्ट । संग्रहें विनाश ध्यानीं घ्यावा ॥५॥
वासुदेव म्हणे भजवीण कैसें । होईल बाळाचें म्हणूं नये ॥ ६ ॥

५९७

कर्मासम भोग, निश्चय जाणावा । ज्याचा तया ठवा जवळीच ॥१॥
मृत्पिंडासम तूं इतरांची चिंता । वाहसी मूढता ध्यानीं घेईं ॥ २ ॥
समक्षचि तुझ्या मृत्यु नेई आप्तां । जाणूनि स्वहिता सिद्ध होईं ॥३॥

तात्पर्य कोणाचा कोणी न या ठाई । जाणूनियां होई धर्मरत ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अरिष्टनेमीचा । बोध महत्वाचा पुढती ऐका ॥ ५ ॥

५९८

क्षुधा, तृषा, प्राणधर्म । कामक्रोधरूपी मन ॥ १ ॥
जिंकियेलें जेणें येथें । जाणें मुक्तचि तयातें ॥ २ ॥
मद्यपानादि व्यसन । नसे तोहि मुक्त जाण ॥ ३ ॥
नित्य भोजनाची इच्छा । पाहूनि ज्या क्लेश चित्ता ॥ ४ ॥
मुक्तचि तो समजें मनीं । अल्पसंतोषी तो जनीं ॥ ५ ॥
धान्यराशींतूनि माप । एक लाभतां संतोष ॥ ६ ॥
चौसुपी न वाडा इच्छी । सौख्यद ज्या पर्णकुटी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । नर जाणावा भाग्याचा ॥ ८ ॥

५९९

जन्म जरा मृत्यु व्याधि क्षुधाग्रस्त । लोक हे समस्त अवलोकी जो
यदृच्छालाभें तो पावतो संतोष । इतर आशाबद्ध फसती जनीं ॥२॥
भोक्ता भोग्यचि हें विश्व जयाप्रति । जाणावें तयासी मुक्त ऐसें ॥३॥
भूमी पलंगही मानी जो समान । कदान्न पक्वान्न सारिखें ज्या ॥ ४ ॥
ताग तृण तेंवी कौशेय वल्कलें । अथवा कांवळें चर्मही तें ॥ ५ ॥
समान जयासी मुक्त तो जाणावा । वृत्ति वासुदेवा रुचे ऐसी ॥ ६ ॥

६००

पांचभौतिकता जाणूनि विश्वाची । वागे जो तैसाचि मुक्ति तया ॥
सुख दुःख राग द्वेष जया सम । दोषांचें हें स्थान जाणे देह ॥ २ ॥
तारुण्य वार्धक्य घेई नित्य ध्यानीं । मुक्तचि तो जनीं समजें ऐसें ॥
मृत्यु सकलांसी न्यूनता द्रव्याची । वैपुल्य क्लेशांसी जाणील जो ॥
कुटुंबपोषण कार्य हें कष्टाचें । जाणील तयातें मुक्तिलाभ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पोटचीं पोरेंही । ऐकती न कांहीं ध्यानीं असो ॥ ६ ॥

६०१

शास्त्रावलोकनें तेंवी अनुभवें । जाणितो जगाचें स्वरूप जो ॥ १ ॥
मुक्तचि तो नित्य ध्यानीं घेऊनियां । क्लेश हा त्यजावा मनिंचा राया
मग गृहस्थ वा संन्यासी हो सौख्यें । तात्पर्य तयाचें एकचि तें ॥

निवेदिती भीष्म सगर या परी । सद्गुण अंतरीं धरी ऐसे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे मुक्ताचा स्वभाव । विवत्तांच काय न्यून असे ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २८८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ११५ समाप्त

अध्याय २८९ वा                    ६०२

धर्म म्हणे ताता, देवांचा विरोधी । असुरांतें रक्षी कवि नित्य ॥ १ ॥
शुक्र कां तयासी संज्ञा तेही कथीं । रुद्ध कैसी गति स्वर्गी त्याची ॥
निवेदिती भीष्म धर्मा, योगबळें । सर्वस्व हरिलें कुबेराचें ॥ ३ ॥
तदा तो शिवासी रिघाला शरण । क्रुद्ध तें ऐकून भोलासांव ॥ ४ ॥
शुक्र तदा त्याच्या शूलाग्रीं राहिला । शूल वांकविला तदा शिवें ॥
वासुदेव म्हणे शिवानें कवीसी । टाकियेलें मुखीं तयावेळीं ॥ ६ ॥

६०३

तदा प्रभृतीचि शिवाचें पिनाक । जाहलें प्रसिद्ध धनु जगीं ॥ १ ॥
संचार शिवाच्या उदरीं कवीसी । जाहलें पुढती काय ऐकें ॥ २ ॥
पचेना कवी तें पाहूनि शंकर । वहु संवत्सर करिती तप ॥ ३ ॥
लक्षावधि वर्षें उदकांत तप । करूनि संतुष्ट शिव होती ॥ ४ ॥
परी कवीचेंही वाढे तेणें वल । पाहूनि शंकर करिती ध्यान ॥ ॥ ॥
वासुदेव म्हणे प्राण तैं कवीचे । कोंडतां शिवातें शरण येई ॥ ६ ॥

६०४

शिश्नमार्गें जाई म्हणती तया शिव । प्रयत्नें तो मार्ग कवि गांठी ॥
शुक्रसंज्ञा तया लाभली त्या योगें । मार्गही स्वर्गींचे रुद्ध तेणें ॥ २ ॥
तेजोमय शुक्रा पाहूनि शंकर । महाक्रोधाकुल होती तदा ॥ ३ ॥
निवारी तयांसी पार्वती दयेनें । पुत्रत्व शुक्रातें तेणें त्यांचें ॥ ४ ॥
पुढती तयांसी वंदूनियां गेला । शुक्र निजस्थला आनंदानें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भीष्म धर्माप्रति । वृत्तांत कथिती कथिला तोचि ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २८९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ११६ समाप्त

अध्याय २९० वा                    ६०५

धर्म म्हणे ताता, अवीट हा बोध । ऐकूनि आनंद वृद्धि पावे ॥ १ ॥
अमृताचा वीट कदाही न येई । तैसी सुधामयी वाणी तव ॥ २ ॥

यास्तव कल्याण जेणें होई माझें । निवेदावें मातें ऐसें ज्ञान ॥ ३ ॥
पराशराप्रति जनकानें हेंचि । पुशितां जें त्यासी कथिलें ऐकें ॥ ४ ॥
धर्मा, विहिताचें आचरण हाचि । राजमार्ग जगीं कथिती मुनि ॥५॥
वासुदेव म्हणे पराशरगीता । देऊनियां चित्ता ऐका आतां ॥ ६ ॥

६०६

विहितकर्म हा श्रेयस्कर पंथ । नसे ऐसा मार्ग अन्य श्रेष्ठ ॥ १ ॥
सर्व आश्रमांनीं पाळावे स्वधर्म । कंठावें जीवन वर्णधर्में ॥ २ ॥
दान प्रतिग्रह जीवन विप्राचें । करग्रहणें तें क्षत्रियासी ॥ ३ ॥
कृष्यादिकें वैश्यां सेवेनें शूद्रांची । जीविका धर्माची व्यवस्था हे ॥४॥
इच्छेसम परी जीविकेचे मार्ग । स्वीकारिती मूढ अहितकारी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पुण्यपापें उच्च- । नीच, मानवत्व समानत्वें ॥ ६ ॥

६०७

तत्वज्ञानें पाप-पुण्यविनिर्मुक्त । मुक्त तेचि श्रेष्ठ जनीं होती ॥ १ ॥
रौप्य सुवर्णादि मुलाम्यासमान । पापपुण्यें भिन्न दिसती जीव ॥२॥
लता गुल्मबीजें दिसती न ग्रीष्मीं । वर्षाकाळीं तींचि प्रगट होती ॥
पूर्वकर्म तेंवी समयीं प्रगटे । कर्मानेंचि लाभे इष्टानिष्ट ॥ ४ ॥
कृतप्रणाश[१] वा अकृताभ्यागम[२] । दोष पूर्वकर्म न मानितां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सुखदुःखप्राप्ति । कर्मासम लोकीं सिद्धांत हा ॥ ६ ॥

६०८

सिद्धान्त हा राया, चार्वाकां न रुचे । प्रत्यक्ष न दिसे म्हणती कर्म ॥
उच्चनीच जन्म स्वभावेंचि होती । फलकालीं स्मृति कर्माची न ॥
समाधानास्तव कथिलें वेदानें । कर्म कल्पनेनें सत्य न तें ॥ ३ ॥
लोकव्यवहार तेणें सुयंत्रित । स्वभावाचि श्रेष्ठ, कर्म गौण ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे उत्तर चार्वाका । पराशर आतां देती ऐका ॥ ५ ॥

६०९

स्वभाववाद हा राया, चार्वाकाचा । सेतु सिकतेचा ध्यानीं घेई ॥१॥
वाणी मनादींच्या क्रियेचें प्रत्यक्ष । फल लाभे एथ सकलांसी ॥ २ ॥

१ केलेल्या कर्माचें फल न मिळणें. २ न केलेल्या कर्माचें फल भोगावें लागणें.

सुखदुःख वैषम्यासी हें कारण । अन्य प्रमाण न आवश्यक ॥ ३ ॥
उष्णता अग्नीची जेंवी स्वाभाविक । तैसें सुखदुःख चार्वाकासी ॥
अयोग्य हा परी दृष्टान्त या स्थानीं । सुखदुःख क्षणीं पालटे हें ॥५॥
वासुदेव म्हणे स्वभाववाद हा । संदेहांत जीवा पाडीतसे ॥ ६ ॥

६१०

अग्निस्पर्श अद्य, दाह अन्य दिनीं । कर्मफल तेंवी पुढती कैंवी ॥ १॥
चार्वाकासी ऐसी शंका वाटतसे । परी व्यवहारीं हें प्रत्यक्षचि ॥ २ ॥
अद्य कालान्तीं वा न चुकेचि कर्म । समय पाहून फल देई ॥ ३ ॥
सुकृतानें सुख दुष्कृतानें दुःख । खेळ हा अखंड संसारांत ॥ ४ ॥
वायुलहरी तें अस्थिर हे भाव । जाणूनियां स्थैर्य सोडूं नये ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संयम तैं क्षमा । संतोषादि जाणा सुखमूळ ॥ ६ ॥

६११

आगमापायी हीं सुखदुःखें राया । भोग ज्याचे तया अन्यासी न ॥
तत्वज्ञानें ज्ञाता त्यागी पुण्यपाप । भोगी सुखदुःख विषयासक्त ॥२॥
निंद्य जें आपणा वाटे तें त्यजावें । अनासक्त व्हावें अनसूयक ॥ ३ ॥
भ्याड जो क्षत्रिय, अशुचि ब्राह्मण । आकांक्षाविहीन वैश्य जो कीं ॥
शूद्र जो आळशी, शीलहीन ज्ञाता । आचरी दुर्वृत्ता कुलीन जो ॥
सत्यभ्रष्ट विप्र, पापिणी ते नारी । योगीही तो जरी विषयासक्त ॥
केवळ आपणास्तव अन्न रांधी । मूढ ज्या प्रवृत्ति वक्तृत्वाची ॥७॥
वासुदेव म्हणे नृपहीन राष्ट्र । स्नेहहीन राव शोच्यचि ते ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. २९० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ११७ समाप्त

अध्याय २९१ वा ६१२

मानवशरीर हाचि पुण्यरथ । सन्मार्गप्रवृत्त करील जो ॥ १ ॥
इंद्रियाश्व त्याचे आंवरूनि ज्ञानें । शहाणा तो जाणें राया, जनीं ॥२॥
ब्रह्मसाक्षात्कारी सद्गुरूपासूनि । मार्ग तो जाणूनि घ्यावा यत्नें ॥३॥
दुर्लभ या देहीं कृष्ण पीत श्वेत । वर्ण जे पूर्वोक्त श्रेष्ठ त्यांत ॥ ४ ॥
लाभावा तो ऐसी घडो नित्य कृति । पतन पावती तेचि निंद्य ॥५॥
वासुदेव म्हणे नरजन्मीं वर्ण । पालटी न, जन्म त्याचा व्यर्थ ॥ ६ ॥

६१३

अज्ञानकृत तें पाप तपें नासे । भोगणेंचि लागे ज्ञानकृत ॥ १ ॥
यास्तव त्यजावें ऐसें पापकर्म । अनावर जाण मनुजा मोह ॥ २ ॥
वरिवरि लाभ भासे परी अंतीं । लाभेल पापचि ऐसें कर्म ॥ ३ ॥
चांडाळसंबंध टाळी जेंवी ज्ञाता । मार्ग दुष्कर्मांचा तेवीं त्याज्य ॥४॥
वासुदेव म्हणे कृत्या लोकेषणा । मोहित ज्ञात्यांना करी क्षणीं ॥ ५ ॥

६१४

कष्टकारी पापकर्म । केंवी वर्णू ते दुर्गुण ॥ १ ॥
विपरीत दृष्टि होई । चित्त रंगतें विषयीं ॥ २ ॥
वैराग्य न तया बाणे । अनात्माचि आत्मा म्हणे ॥ ३ ॥
योगमार्गींही त्या क्लेश । राया, जाणावे बहुत ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पाप । भोगवितें महाक्लेश ॥ ५ ॥

६१५

जया शुभ्र वस्त्रीं अल्परंगछटा । यत्नें त्या शुभ्रता येत असे ॥ १ ॥
परी भल्लातकरसीं जें रंगलें । शुभ्रत्व पावलें नाहीं कदा ॥ २ ॥
जाणूनि जें पाप करिती तयांची । प्रायश्चित्तें शुद्धि होत नसे ॥ ३ ॥
अज्ञानें परी जो होई पापरत । प्रायश्चित्तें शुद्ध होई तोचि ॥ ४ ॥
मम मत राया, परि असे भिन्न । भोगणेंचि कर्म प्राप्त जनां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पराशरबोध । ध्यानीं घेतां, दोषमुक्ति लाभे ॥ ६ ॥

६१६

अजाणतांही जें घडेल दुष्कर्म । तयाचेंही जाण फल लाभे ॥ १ ॥
कर्मतारतम्यें फलतारतम्य । अज्ञाताचें सौम्य फल होई ॥ २ ॥
सर्वपापमुक्ति जयांची पुराणीं । कथिली ते मानीं अपवाद तो ॥ ३ ॥
पक्वघटीं जल राही, तें अपक्व- । घटनाशें सर्व व्यर्थ जाई ॥ ४ ॥
सामान्यांसी पापबाधा तेंवी होई । असामान्या नाहीं दोष त्याचा ॥
वासुदेव म्हणे सजातीयवृद्धि । होतसे कर्मांची म्हणती मुनि ॥ ६ ॥

६१७

पुण्यपापाचा हा सामान्य विचार । कथिला साचार तुजलागीं ॥ १ ॥
विशेष धर्मही कथीन मी आतां । नृपानें उन्मत्तां नमवावेंचि ॥ २ ॥

पालन, यज्ञही करावे सौख्यानें । त्यजावें आनंदें पुढती राज्य ॥३॥
संयमें काननीं भूतमात्रीं ब्रह्म । पाहूनि सन्मान द्यावा ज्ञात्या ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे संतांसी सेवूनि । विचरावें वनीं आनंदानें ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ.२९१ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.११८समाप्त

अध्याय २९२ वा

६१८

उपकार, दान सर्वही हा स्वार्थ । बांधव प्रत्यक्ष त्यागी बंधु ॥ १ ।
विशिष्टें विशिष्टा अर्पूनियां दान । प्रतिग्रहें धन्य अथवा व्हावें ॥ २ ।
प्रतिग्रहाहूनि दान पुण्यकारी । अर्पितां तें पात्रीं बहु पुण्य ॥ ३ ॥
न्यायसंपादित धनाचेंचि दान । श्रेयस्कर जाण राजश्रेष्ठा ॥ ४ ॥
धर्मास्तवही न कुमार्गे वरणें । न्यायप्राप्तधनें दान द्यावें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे क्षुधार्तातें जळ । दाविणें केवळ पुण्यदायी ॥ ६ ॥

६१९

पत्रफलदानें रंतिदेवा सिद्धि । शैव्यही तैसाचि धन्य झाला ॥ १ ॥
देवता अतिथि पोष्यवर्गाचेंही । पितरांचें तेंवी ऋण नरा ॥ २ ॥
तैसेंचि आपणा आपुलेंचि ऋण । फेडावीं हीं जाण पंचऋणें ॥ ३ ॥
ऋषिऋण वेदाध्ययनें तें फिटे । तोष पितरांतें करितां श्राद्ध ॥ ४ ॥
आदरातिथ्येंचि सामान्यांचा तोष । पंचयज्ञ भूतदया तेंवी ॥ ५ ॥
वेदादि श्रवणमननें अनृणी । होई स्वयें जनीं वासुदेव ॥ ६ ॥

६२०

संस्कारें पुत्रादि ऋणांतूनि मुक्ति । ध्यानेंचि विमुक्ति मुनींप्रति ॥ १ ॥
शुनःशेप, शुक्र, वसिष्ठादि मुनि । द्रव्याविण जनीं धन्य झाले ॥ २ ॥
द्रव्यार्थ यास्तव त्यागूं नये धर्म । अग्नि सविधान पुण्यदायी ॥ ३ ॥
अग्नि, आत्मा, माता, पिता, गुरूप्रति । सेवूनि या जगीं धन्य व्हावें ॥
त्यागूनियां मान व्हावी वृद्धसेवा । ज्ञाता असूनियां निष्काम जो ॥
उपद्व्यापत्यागें अहिंसेंत रत । थोरासी त्या श्रेष्ठ म्हणती जनीं ॥
वासुदेव म्हणे ऐसा सत्कर्माचा । ध्यास ज्या तो साचा मनुज जाण

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. २९२ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. ११९ समाप्त

अध्याय २९३ वा ६२१

राया, त्रैवर्णिकां सेवितां शूद्रानें । श्रेयःप्राप्ति ऐसें शास्त्र असे ॥ १ ॥
अन्य साधनें त्या अनिष्ट जाणावीं । सेवाचि वरावी सज्जनांची ॥२॥
उदयाद्रिस्थित वस्तु जैं झळके । सज्जनसान्निध्यें तैंवी तेज ॥ ३ ॥
शुभ्रवस्त्रसंगें तैसाचि मानव । पावे दिव्यभाव सत्संगानें ॥ ४ ॥
अस्थिरजीवित जाणूनि सद्गुण । संपादावे जाण नृपा, नित्य ॥५॥
वासुदेव म्हणे धर्मासी त्यजूनि । वैभवीं रमूनि हित नसे ॥ ६ ॥

६२२

लुटूनि प्रजेसी करील जो दान । संज्ञाही राजा न तया शोभे ॥ १ ॥
पुरा स्वयंभूनें निर्मिला पर्जन्य । तया आराधून वैश्य सुखी ॥ २ ॥
त्रिवर्गरक्षण क्षात्रियांचा धर्म । वितरावें ज्ञान ब्राह्मणांनीं ॥ ३ ॥
सेवूनि त्रिवर्गा सौख्य शूद्रांप्रति । चातुर्वर्ण्यें ऐसी फलसिद्धि ॥ ४ ॥
स्वस्वधर्मे ऐसी पूज्यता जनांसी । लाभेल, धर्माची व्यवस्था हे ॥
वासुदेव म्हणे मर्यादा त्यागितां । जनांसी भ्रष्टता येत असे ॥ ६ ॥

६२३

निढळ्या घामानें यत्नें संपादूनि । अर्पियेली कोणी कपर्दीही ॥ १ ॥
फल त्या कर्माचें श्रेष्ठचि जाणावें । व्यर्थचि गणावें महादान ॥ २ ॥
अन्यायोपार्जित द्रव्यदानें पाप । दानासम लाभ फळाचाही ॥ ३ ॥
अत्यादरें दान जाऊनि सदनीं । करितां, तें जनीं श्रेष्ठ दान ॥ ४ ॥
याचितां जें दान मध्यम तें जाण । अवमानें दान अधम तें ॥ ५ ॥
संसारसागरीं बुडत्या नरानें । तरावें उपायें बहु यत्नें ॥ ६ ॥
दम ब्राह्मणांचें, विजय वीरांचें । धनचि वैश्यांतें, सेवा शूद्रां ॥ ७ ॥
भूषण या जनीं म्हणे वासुदेव । धर्मचि उपाय सकल सौख्या ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २९३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १२० समाप्त

अध्याय २९४ वा ६२४

अल्पही प्रशस्त धर्म्य तेंचि धन । धर्मार्थ वेंचून महापुण्य ॥ १ ॥
आपत्कालीं विप्रां क्षात्र-वैश्यवृत्ति । स्वीकारितां जगीं पतन नसे ॥
स्वीकारितां शूद्रवृत्ति तो पतित । शूद्रही कुमार्गगामी निंद्य ॥ ३ ॥

वाणिज्य हुन्नर स्वीकारावें शूद्रें । नट नच व्हावें तेणें कदा ॥ ४ ॥
बहुरूपी, चर्म-मद्य-लोहविक्री । निंद्य शूद्रासीही व्यवसाय हे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कुलागतही ते । त्यागील तयातें पुण्यलाभ ॥ ६ ॥

६२५

व्यवसायीं कोणा यशलाभ होतां । चढूनियां तांठा पाप करी ॥ १ ॥
कदा न तयाचें व्हावें अनुगामी । पतन तें ध्यानीं घेऊनियां ॥ २ ॥
शब्ददंडें पुरा, सुज्ञत्व जनांसी । दुर्दैवें पुढती फिरला काळ ॥ ३ ॥
कामक्रोधरूपें दैत्यांचा संचार । होऊनियां नर विराजले ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे दर्प त्यांचा नेता । मागोमाग त्याच्या क्रोध येई ॥ ५ ॥

६२६

क्रोधें लज्जास्पद होऊंलागे कर्म । लज्जाही लोपून मोह उठे ॥ १ ॥
अन्याय्यप्रवृत्ति वाढली तयानें । स्वार्थ मात्स्यन्यायें पुढती टाके ॥
पुढती वाक्‌दंड तुच्छ तयां वाटे । अवमान मदें देवर्षींचा ॥ ३ ॥
विषयसेवन हाचि त्यां पुरुषार्थ । पुढती साहस रुचलें तयां ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे क्रम हा सुस्पष्ट । पतनाची वाट दावी अद्य ॥ ५ ॥

६२७

ऐसी स्थिती येतां इंद्रियदेवता । आत्मरूप शिवा शरण जाती ॥ १ ॥
आत्मशिवें तदा स्थूलसूक्ष्मादिक । देहींच्या दैत्यांस निवारिलें ॥ २ ॥
तदा सर्वजनां लाभे शुद्ध बुद्धि । श्रद्धा वेदशास्त्रीं उपजे तयां ॥ ३ ॥
स्वर्गींही इंद्रातें लाभलें स्वराज्य । भूतळीं क्षत्रिय राव होती ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पुनरपि दैत्य । बुद्धि विपरीत करिती परी ॥ ५ ॥

६२८

होतांही दैत्यांचा विनाश यापरी । नेत्यांच्या अंतरीं शिरले दैत्य ॥
यास्तव आसुरी कर्मे ते वरिती । तयां अनुसरती मूढजन ॥ २ ॥
यास्तव कुलीन नेतेही अग्राह्य । जाणूनि कर्तव्य सोडूं नये ॥ ३ ॥
शुद्ध क्षत्रिय तूं नृपा, धर्मे पाळीं । गुणासी आदरीं दोषत्यागें ॥ ४ ॥
गुणहीनातेंही सद्‌गुणी हे संज्ञा- । आवडे, महिमा गुणांचा हा ॥ ५ ॥
मानवचि एक धर्माचारा पात्र । व्हावा प्राणिमात्र आत्मसम ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वासना, अज्ञान । जातांचि कल्याण मानवाचें ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २९४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १२१ समाप्त

अध्याय २९५ वा

६२९

पराशरमुनि बोलती नृपासी । ऐकें तपोविधि गृहस्थाचा ॥ १ ॥
रजतमवृद्धि होतांचि ममत्व । करी तें आश्रय गृहादींचा ॥ २ ॥
नित्य सान्निध्यें तीं भासतात नित्य । तेणें रागद्वेष सहज होती ॥३॥
आच्छन्नविवेक होऊनियां तेणें । लंपटता बाणे विषयांची ॥ ४ ॥
तेणें कृतार्थता वाटे तया तेचि । ग्राम्य सुखामाजी मोक्ष वाटे ॥५॥
वासुदेव म्हणे विषयसंगती । ऐसी जीवा, अंतीं बंधकारी ॥ ६ ॥

६३०

सर्वश्रेष्ठ सौख्य मानव संपादी । नसेचि हें त्यासी पुढती भान ॥१॥
स्त्रीभृत्यादींचा वाढवी संग्रह । पुढती अधिकाधिक द्रव्य इच्छी ॥
सूक्तासूक्तमार्गें संपादितां द्रव्य । व्यवहारीं त्यास मान लाभे ॥ ३ ॥
अपमानभय तेणें तया वाटे । ऐसें विषयांचें लागे वेड ॥ ४ ॥
काम्य निषिद्धांतें परी जे त्यागिती । ज्ञानसौख्यप्राप्ति तयां होई ॥५॥
वासुदेव म्हणे विषयलंपट । प्रवर्ते तपास कैवी ऐका ॥ ६ ॥

६३१

द्रव्य-परिवार-मानां विघ्न येतां । जडतां दुःखव्यथा त्रस्त होई ॥१॥
संसाराचा वीट येऊनियां शास्त्र । शोधूनि अभ्यास करी त्याचा ॥
तपचि उपाय तेणें ध्यानीं येतां । स्वीकारी तपाचा मार्ग यत्नें ॥ ३ ॥
प्रारंभींच तपःप्रवृत्ति दुर्लभ । सकलांसी एक मार्ग तप ॥ ४ ॥
शान्तदान्ताप्रति तपचि स्वर्गद । विरंचीही तप करी पूर्वी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सकल देवांस । तपानेंचि सौख्य प्राप्त झालें ॥ ६ ॥

६३२

सुखी वा दुःखीही कोणी असो नर । अभ्यासावें शास्त्र तेणें यत्नें ॥
लोभत्याग ऐसा करूनि संतोष । वरितांचि सौख्य तया लाभे ॥२॥
अनभ्यासें नाश ज्यापरी विद्येचा । तैसा विवेकाचा नाश लोभें ॥३॥
न्यायान्याय तेणें न कळे नरासी । यास्तवाचि तपीं रत व्हावें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐशापरी तप । कल्याणसाधक मानवासी ॥ ५ ॥

६३३

इष्ट तेंचि सुख अनिष्ट तें दुःख । तपाधीन देख सकल सौख्य ॥१॥
सकाम तपानें विषयांची प्राप्ति । अपमान अंतीं दुःख तेणें ॥ २ ॥
सुखदुःखहीं तें लाभतां जो धर्म । त्यजीनाचि कर्म कळलें तया ॥
वाणप्रपातसें क्षणिकचि सुख । वियोगें त्या दुःख दीर्घकाल ॥ ४ ॥
जाणूनीही ऐसें न सुटे आसक्ति । तुच्छ ते मोक्षश्री मानूनियां ॥५॥
वासुदेव म्हणे तीव्र दुःख अंतीं । जाणूनि त्यजिती विषय ज्ञाते ॥६॥

६३४

ऐहिकाचा लाभ घडे प्रारब्धानें । यत्नें संपादणें न लगे त्यांसी ॥ १ ॥
धर्मार्थचि यत्न करावा नरानें । धर्मविमुखातें न घडेचि हें ॥ २ ॥
कुलीन तैं मानधन शास्त्रप्रेमी । निरत ते धर्मीं इतरां काय ॥ ३ ॥
ज्ञाते तपाविण वरिती न अन्य । अनासक्तधर्म वरिती ज्ञाते ॥ ४ ॥
आसक्तिरहित गृहस्थ ते श्रेष्ठ । आधार नद्यांस सिंधु जेंवी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे गृहस्थ हा तैसा । आधार समस्तां आश्रमांसी ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति अ.२९५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १२२ समाप्त

अध्याय २९६ वा

६३५

धर्म म्हणे मुने, कृष्ण शुक्लादिक । वर्णांचें आधिक्य न्यूनत्वहि ॥१॥
कैसें घडे सांगा आत्मा तोचि पुत्र । वदतसे वेद या आधारें ॥ २ ॥
निवेदिती मुनि तपासम होई । न्यूनाधिक्य पाहीं गुणांमाजी ॥ ३ ॥
क्षेत्र बीज दोन्ही असतां उत्कृष्ट । होतसे निपज सद्वस्तूची ॥ ४ ॥
न्यूनता यामाजी होतां न्यून गुण । तैसेंचि हे वर्ण न्यूनाधिक्यें ॥५॥
वासुदेव म्हणे वर्णांचे संकर । जातींचा विस्तार तेणें होई ॥ ६ ॥

६३६

राव म्हणे कैंवी भिन्न भिन्न गोत्रें । मुनि श्रेष्ठत्वातें कैंवी गेले ॥ १ ॥
निवेदिती मुनि शुद्धात्म्यांचें क्षेत्र । अवलोकणें इष्ट नसे लोकीं ॥२॥
तपःसामर्थ्यानें आपुली संतति । नेली श्रेष्ठतसी तपस्व्यांनीं ॥ ३ ॥
श्रेष्ठतेसी मूळ संयम तैं तप । वसिष्ठ, कश्यप दृष्टांत या ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे तपाचें महत्व । लोकीं अलौकिक ध्यानीं घ्यावें ॥५॥

६३७

वसिष्ठ, भृगु तैं अंगिरा, कश्यप । पुरा हीं प्रसिद्ध गोत्रें चार ॥ १ ॥
पुढती तपानें गोत्रप्रवर्तक । जाहले वहुत मुनिश्रेष्ठ ॥ २ ॥
राव म्हणे धर्म सामान्य विशिष्ट । कथावे सकृप होऊनियां ॥ ३ ॥
निवेदिती मुनि याजनाध्ययन । प्रतिग्रह जाण विप्रधर्म ॥ ४ ॥
संरक्षण हाचि क्षत्रियांसी धर्म । कृषि-गोरक्षण वैश्यांप्रति ॥ ५ ॥
सेवाचि शूद्रांचा धर्म हा विशेष । निवेदितो स्पष्ट वासुदेव ॥ ६ ॥

६३८

दया सौजन्य ते अहिंसा दक्षता । ते संविभागिता, श्राद्ध, सत्य ॥१॥
आतिथ्य अक्रोध स्वदारनिरति । निर्मत्सरबुद्धि आत्मज्ञान ॥ २ ॥
तितिक्षा तैं शौच ऐसे त्रयोदश । धर्म सकलांस सामान्य हे ॥ ३ ॥
त्रैवर्णिकांप्रति द्विज संज्ञा राया । त्याज्यधर्में तयां पतन होई ॥ ४ ॥
विहितकर्मानें तयांची उन्नति । सामान्य धर्मेंचि शूद्रां लाभ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे थोरांचें वर्तन । आदर्श मानून अनुसरावें ॥ ६ ॥

६३९

मंत्रहीन क्रिया हितप्रद शूद्रां । मार्ग अनुसरावा सज्जनांचा ॥ १ ॥
जाति कर्म दोन्हीं हीनत्वा कारण । यास्तव सत्कर्म आचरावें ॥२॥
जातिहीनातेंही सत्कर्में श्रेष्ठत्व । कुलीनही तुच्छ हीनकर्मैं ॥ ३ ॥
विहिताचरण सत्यपरिपालन । त्यजावें दारुण कर्म नित्य ॥ ४ ॥
अधर्माचारही सर्वदा त्यजावा । धर्म हा पाळावा सकल जनीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सर्वही वर्णांसी । लाभे स्वर्ग ऐसी मर्यादा हे ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २९६ वा तथा मोक्षधर्मपर्वांचा अ. १२३ समाप्त

अध्याय २९७ वा

६४०

सर्व साधनांत मुख्य गुरुसेवा । लाभ याचा घ्यावा सकलांनीं ॥ १ ॥
माता, पिता, स्नेही, गुरु, गुरुपत्नी । सश्रद्धांसी जनीं श्रेयस्कर ॥
परम दैवत पिता मानवांसी । योग्यता पित्याची मातेहूनि ॥ ३ ॥
पित्यासमचि तो गुरु ज्ञानदाता । जाती श्रेष्ठपदा संयमी ते ॥ ४ ॥

१ कोणतीही वस्तु प्रथम दुसऱ्यास देऊन नंतर आपण घेणें.

रणांगणीं ज्याचें पतन तो धन्य । वधकर्ता हीन परी नसो ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पातक्यांच्या हस्तें-। वध, पापचि तें म्हणती सुज्ञ

६४१

आयुष्य संपतां वांचवी न कोणी । धन्वंतरी मी मी म्हणणाराही ॥
असतां आयुष्य काळाचेंही वळ । होतसे निष्फळ सिद्धान्त हा ॥
प्रेमें अन्यनाश करूनि आपणां । वांचवील जाणा तयाप्रति ॥ ३ ॥
निवारावें हाचि एक पुण्यमार्ग । तीर्थामाजी देह विसर्जावा ॥ ४ ॥
सहजमरण येतां तीर्थामाजी । स्वभावेंचि मुक्ति लाभतसे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे देहसमर्पणें । यथाक्रम जाणें मोक्षासी वा ॥ ६ ॥

६४२

देहसमर्पणें शिवगणरूपी । पिशाचदेहासी प्राप्त होई ॥ १ ॥
केवळ प्रारब्ध भोगूनि त्या देहीं । मोक्षाप्रति जाई पुढती जीव ॥२॥
काशीमरणेंही दशजन्म प्राप्ति । पद्मपुराणीं जी निवेदिली ॥ ३ ॥
कारण त्या जन्मा महापातकेंचि । भोगणें प्राप्तचि पूर्वकर्मं ॥ ४ ॥
कर्जबाजारीही होई ऋणमुक्त । तैसा पापमुक्त कर्मभोगें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मरण अन्यत्र । येतां कर्मदेह प्राप्त होई ॥ ६ ॥

६४३

भोगदेहनाशें भ्रमे मेघासम । पुढती घेई अन्य भोगदेह ॥ १ ॥
बहु जन्मद तीं कर्मं कर्मदेहीं । परी भोगदेहीं भोग मात्र ॥ २ ॥
अंतीं वासनांचा त्याग होतां मोक्ष । तीर्थाचें महत्व ऐसें असे ॥ ३॥
तीर्थमरणेंचि केवळ हे स्थिति । अधिकारें मुक्ति कैसी ऐकें ॥ ४ ॥
जंगम, द्विपाद, द्विज प्रज्ञावंत । आत्मबोधयुक्त क्रमें श्रेष्ठ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मान-दर्पहीन । विवेक पावून मुक्त होती ॥ ६ ॥

६४४

जन्मला तयासी निश्चयें मरण । विवेका कारण निश्चय हा ॥ १ ॥
औदासिन्य तेणें होई देह-गेहीं । अनासक्त होई कर्म त्याचें ॥ २ ॥
कैसा मृत्यु येतां गति ते कवण । निवेदितों ध्यान देईं आतां ॥ ३ ॥

उत्तरायणीं ज्या पुण्य नक्षत्रासी । मरण तयासी मोक्षलाभ ॥ ४ ॥
इतरांसी क्लेश न होती जयाचे । सत्कर्मांत वेंचे सर्वकाल ॥ ५ ॥
अपघाती मृत्यु न येई जयांसी । वासुदेव त्यासी म्हणे मोक्ष ॥ ६ ॥

६४५

भेदूनि सूर्यासी जाई पुण्यवंत । मध्यभागीं स्थित मध्यम ते ॥ १ ॥
दुर्जनांसी दुष्कर्में अधोगति । लक्षणें मृत्यूचीं ऐशापरी ॥ २ ॥
स्थल काल ऐसे निवेदिले आतां । मुक्ताची अवस्था निवेदितों ॥३॥
अज्ञानचि एक शत्रु महाघोर । शुश्रूषाचि एक मार्ग तया ॥ ४ ॥
प्रज्ञाबाणें तया करूनियां विद्ध । व्हावें जीवन्मुक्त विहितकर्में ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वर्णाश्रमधर्म । प्रबल साधन प्रज्ञालाभा ॥ ६ ॥

६४६

भोगलोभें आत्मविनाश न होवो । चांडाळही पावो मनुजदेह ॥ १ ॥
आतां लाभ एक मानवशरीरीं । चांडाळही परी मनुज श्रेष्ठ ॥ २ ॥
दुर्लभ मानवदेहीं वेदधर्में । जाई तोचि जाणें मुक्त होई ॥ ३ ॥
मूर्तिमंत दान, वैराग्य होऊनि । क्षेत्रांत सत्कर्मीं रत व्हावें ॥ ४ ॥
सदनीं मरण येतांचि दहन । स्मशानीं नेऊन करणें योग्य ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सद्धर्मपालन । मोक्षासी कारण म्हणती मुनि ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २९७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १२४ समाप्त

अध्याय २९८ वा

६४७

पराशराप्रति जनकाचा प्रश्न । गति, तैं कल्याण नित्य कर्म ॥ १ ॥
तैसेंचि ज्या ठाईं जातां स्थैर्य येई । कृपावंता, तेंही निवेदावें ॥ २ ॥
निवेदिती मुनि कल्याणाचें मूळ । असावें अलिप्त सकल कर्मीं ॥ ३ ॥
श्रेष्ठगतिज्ञान यथाविधि तप । कर्म तें शाश्वत ध्यानीं ध्यावें ॥ ४ ॥
अधर्माचे पाश तोडूनियां धर्म । स्वीकारी जो प्रेम धरूनि मनीं ॥५॥
अभय जो देई सर्वांसी त्या सिद्धि । वासुदेव त्यासी नमन करी ॥६॥

६४८

विषयाचे हाटीं बैसूनि अलिप्त । सुबुद्धि जयास तोचि श्रेष्ठ ॥ १ ॥
विषयसान्निध्य नसतांही लिप्त । दुर्बुद्धि जयास ऐसा नर ॥ २ ॥

पद्मपत्रासम अलिप्त तो ज्ञाता । लिप्त मूढ काष्ठां-जंतूसम ॥ ३ ॥
मोक्षकालीं कर्म पुढती टाकतें । कर्म न ज्ञात्यातें क्लेश देई ॥ ४ ॥
विषयविरागी क्रोधासी जो जिंकी । विषयाचे हाटीं अलिप्त तो ॥५॥
वासुदेव म्हणे तप पुण्यवृद्धि । धर्मसेतु जगीं नियमें करी ॥ ६ ॥

६४९

सूर्यकांत जेंवी घेई सूर्यतेज । तेंवी ब्रह्मभाव समाधीनें ॥ १ ॥
पुष्पसंगें तिल सुगंध पावती । संस्कारें तें वृद्धि सत्वगुण ॥ २ ॥
मोक्षकामी धनमानही न इच्छी । विषयीं ज्या रति बोध न त्या ॥३॥
मत्स्य वडिशातें विषयीं तें जीव । पावतसे नित्य क्लेश जाणा ॥४॥
कर्दळीचा स्तंभ तेंवी हा संसार । अंतीं निराधार ऐसें कळे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भग्न नावेसम । संसार हा जाण आश्रितांसी ॥ ६ ॥

६५०

सद्धर्माची वेळ योजूं नये कोणी । येई न पुसोनि मृत्यु कोणा ॥ १ ॥
अंधासम अज्ञ अभ्यासें विमुक्त । आचरितां योग होई अंतीं ॥ २ ॥
चक्रनेमिक्रमें जन्ममृत्यु येई । इहपर होई सुखी ज्ञानी ॥ ३ ॥
जैसें जैसें कर्म वाढे तैसे क्लेश । संन्यासचि एक हितकारी ॥४॥
कमलदेंठांचा पंक तो सत्वरी । जाई, तेचि परी या मनाची ॥५॥
वासुदेव म्हणे मनाचेंचि साह्य । लाधलीया होय मन लीन ॥ ६ ॥

६५१

इंद्रियसुखाचे यत्न ते परार्थ । मानीतसे मूढ स्वहित व्यर्थ ॥ १ ॥
सुकृतें ज्ञात्यासी लाभे परागति । तिर्यक्-अधोगति इतरांच्या त्या ॥
पक्व घटासम तपोदग्ध देह । भोगूनि विषय अलिप्तचि ॥ ३ ॥
विषयभोगीं त्या ब्रह्मसौख्य नसे । विषयांच्या त्यागें ब्रह्मसौख्य ॥४॥
जन्मांधासमचि शिश्नोदररत । कदा न सन्मार्ग पाहूं शके ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ज्ञान वा कर्माचें । भांडवल जैसें तैसें फल ॥ ६ ॥

६५२

कालप्रधान या जगामाजी मृत्यु । ग्रासी हळु हळु सकलांप्रति ॥१॥
कर्मासम फल लोकीं हा सिद्धान्त । सुप्त वा जागृत असो जीव ॥२॥

१ लाख

सागरोल्लंघन घडे ज्या एकदां । करी न तो इच्छा पुनः तेचि ॥३॥
तैसाचि संसार लंघी जो तयासी । इच्छा संसाराची कदा नसे ॥
जलमग्न नौका रज्जुसाह्यें पार । तैसाचि आधार सन्मनाचा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे नद्या सागरांत । तैंवी प्रकृतींत लीन मन ॥ ६ ॥

६५३

सिकतेचे दुर्ग विषयांचे पाश । आधार जयांस विनष्ट ते ॥ १ ॥
नाम रूप तेचि आत्मधर्म मानी । आवश्यक जनीं शुद्धि तया ॥२॥
आप्त, इष्ट, भार्या, पुत्र, मित्र स्वार्थी । हितकारी जगीं एक त्याग ॥
पाथेय आपणा आपुलेंचि कर्म । आप्त इष्टजन सकल व्यर्थ ॥ ४ ॥
सत्यत्वें पाहतां मोल तें सुवर्णा । निमित्तचि जाणा मुद्रा वरी ॥५॥
वासुदेव म्हणे कर्मेचि उत्कर्ष । बहु सहाय्यक निमित्त ते ॥ ६ ॥

६५४

यत्नावरी मुख्य भिस्त । इच्छी साह्य सौलभ्यार्थ ॥ १ ॥
कदा कोणताही त्याचा । यत्न विफल न साचा ॥ २ ॥
शूर वीर जो शहाणा । एकभावें करी यत्ना ॥ ३ ॥
लक्ष्मी कदा न त्या त्यागी । किरण जेंवीं तैं सूर्यासी ॥ ४ ॥
दीर्घोद्योगी जो आस्तिक । गर्वहीन मार्गी दक्ष ॥ ५ ॥
सर्वदा त्या लाभे यश । वासुदेवा हाचि पंथ ॥ ६ ॥

६५५

वायु काष्ठचूर्ण उडवूनि नेई । कर्माधीन पाहीं तेंवी जीव ॥ १ ॥
पुराकृत शुभाशुभ कर्मासम । लाभे रूप वर्ण जन्म नरा ॥ २ ॥
शुभा-शुभ त्यासी गांठी गर्भातचि । भाग्य दुर्भाग्यही पूर्वकर्मे ॥ ३ ॥
पराशरें बोध जनकासी ऐसा । करितां आनंदा काय तोटा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पराशरगीता । ऐसी कुंतीपुत्रा कथिती भीष्म ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २९८वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१२५ समाप्त

अध्याय २९९ वा ६५६

धर्म म्हणे ताता, ज्ञाते प्रशंसिती । सत्य क्षमा जगीं प्रज्ञा यम ॥१॥
गोष्ट ती आपणा संमत असे कीं । भीष्म त्या कथिती ऐका काय ॥

धर्मा, हंसरूपें एकदां विरंची । भेटतां साध्यांसी पुशिती ते त्यां ॥
पक्षीश्रेष्ठा, आम्हां कथीं मोक्षधर्म । हितप्रद कर्म काय कथीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे साध्यांलागीं हंस । कथितो रहस्य ऐका काय ॥ ५ ॥

६५७

स्वधर्माचरण इंद्रियदमन । यथार्थ भाषण चित्तजय ॥ १ ॥
हर्ष-खेद सदा स्वाधीन असावे । वाक्यही नसावें मर्मभेदी ॥ २ ॥
हीनापासूनि न शास्त्राचें रहस्य । शिकावें हें नित्य ध्यानीं असो ॥ ३ ॥
विव्हल जे अन्या करितील नित्य । बोलूं नये शब्द ऐसे कदा ॥ ४ ॥
अन्याचे वाग्बाण नित्य जो साहील । पुण्य तो हरील त्या दुष्टाचें ॥
वासुदेव म्हणे जिंकील जो क्रोध । तयातें सहज पुण्यलाभ ॥ ६ ॥

६५८

हंस म्हणे नित्य सोशितों मी निंदा । प्रत्यक्ष ताडितां क्षमितोंचि त्या
क्षमा, सत्य, ऋजुभाव तेंवी दया । सद्‌गुण हे आर्यो रुचती नित्य ॥
सत्य तें जाणावें वेदांचें रहस्य । सत्याचें रहस्य दम असे ॥ ३ ॥
दमानेंचि मोक्ष शास्त्रें निवेदिती । आचरी हें तोचि कृतकृत्य ॥ ४ ॥
वाणिवेग तेंवी क्रोध-कामवेग । कार्योत्कंठावेग तेंवी क्षुधा ॥ ५ ॥
जिंकील जो तोचि हंस म्हणे, विप्र । वंदी वासुदेव ऐशा विप्रा ॥ ६ ॥

६५९

क्रोधयुक्ताहूनि क्रोधहीन श्रेष्ठ । जाणावा वरिष्ठ सहनशील ॥ १ ॥
अमानुषाहूनि श्रेष्ठ तो मानुष । अज्ञाहूनि श्रेष्ठ सुज्ञ जगीं ॥ २ ॥
शब्दादि प्रतिकार साही जो सर्वदा । सहवास त्याचा देवां रुचे ॥ ३ ॥
अवमान निंदा नित्य मी साहितों । थोरांसी सेवितों नसतां इच्छा ॥
क्रोध तृष्णाहीन लोभानें न कदा । त्याग सद्धर्माचा करितों तेंवी ॥
वासुदेव म्हणे विषयप्राप्त्यर्थ । विषयांचा ध्यास नसे सुज्ञा ॥ ६ ॥

६६०

हंस म्हणे साध्यां शापितांही कोणी । शाप तयासी मी न देईंचि ॥
कारण दमचि जाणा मोक्षद्वार । कळे हें साचार तोचि धन्य ॥ २ ॥
गुह्याहूनि गुह्य रहस्य हें जनीं । श्रेष्ठ सर्वांहूनि नरदेह ॥ ३ ॥
मेघविनिर्मुक्त चंद्रासम शुद्ध । धैर्यें तोचि मुक्त समयीं होई ॥ ४ ॥

कुलीन ब्रह्मांडस्तंभासम स्थिर । अत्यंत आदर जनां ज्याचा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे देवत्व तयासी । प्राप्त होई जगीं निश्चयानें ॥ ६ ॥

६६१

मत्सरी ते अन्यदोषचि बोलती । गुण न तयांसी दिसती कदा ॥
वाणी, मन ज्याचें ईश्वरसेवेंत । विरागी जो वेद तप इच्छी ॥ २ ॥
सकलही त्याच्या पुरती कामना । अवमानी सुज्ञा नाश त्याचा ॥३॥
क्रोधयुक्तचित्तें करी जो सत्कर्म । पुण्य त्याचें यम हरण करी ॥४॥
उदर उपस्थ हस्त तैंवी वाणी । जिंकिली तो जनीं धर्मवेत्ता ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संसारांत नौका । तैसाचि सत्याचा महिमा जनीं ॥

६६२

सहवास ज्यांचा सेवा कीं जयांची । इच्छा जैं व्हावें, ती स्थिति लाभे
शुभ्रवस्त्रा जैंवी द्यावा तोचि रंग । तैंवी जैसा संग मनुज तैंवी ॥२॥
क्षय-वृद्धिशील जाणूणि विषय । त्यागी तोचि होय ज्ञाता जनीं ॥३॥
रागद्वेषशून्य होई जो अंतरीं । देव तयावरी तुष्ट होती ॥ ४ ॥
शिश्नोदररत कठोर भाषण । परस्वहरण इच्छिती जे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे टाळिती त्यां देव । जाणूनियां भाव दुष्ट त्यांचा ॥६॥

६६३

उच्चाराहूनि तो श्रेष्ठ अनुच्चार । सत्यचि साचार वदणें श्रेष्ठ ॥ १ ॥
धर्मानुकूलचि सत्यही असावें । प्रियही असावें श्रोत्यांप्रति ॥ २ ॥
अज्ञानाच्छादित, मत्सरेंचि भ्रष्ट । लोभचि स्नेहास आड येई ॥ ३ ॥
विषयासक्तीनें अंतरेल स्वर्ग । प्राज्ञासी एकान्त सौख्यदाई ॥ ४ ॥
संमर्दीही मूक प्राज्ञचि जाणावा । सबल गणवा प्राज्ञ जनीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कलह प्राज्ञाचा । कोणासीही कदा होत नसे ॥ ६ ॥

६६४

साध्यप्रश्नें हंस कथी तेंचि ऐका । देवत्व तें विप्रा अध्ययनें ॥ १ ॥
व्रताचरण तें साधुत्व विप्रासी । परनिंदा तेंचि असाधुत्व ॥ २ ॥
मनुष्यत्व त्याचें मृत्यु करी सिद्ध । धरावें हें नित्य यत्नें ध्यानीं ॥३॥
वासुदेव म्हणे हंसगीता ऐसी । चिंतनें नरासी मुक्त करी ॥ ४ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. २९९वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १२६ समाप्त

अध्याय ३०० वा

६६५

युधिष्ठिर म्हणे सांख्य-योगभेद । निवेदावा मज सदयतेनें ॥ १ ॥
निवेदिती भीष्म ईश्वरावांचून । मुक्ति जीवासी न म्हणती योगी ॥
विषयांचें फल जाणूनि वैराग्य । वरी तोचि मुक्त म्हणती सांख्य ॥
शिष्टसंमत हे उभयही मार्ग । आचरी जो त्यास मोक्ष लाभे ॥ ४ ॥
पवित्रता, तप, दया तेंवी व्रत । उभय मार्गांस समानत्वें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पद्धति विभिन्न । परी तें अंतिम साध्य एक ॥ ६ ॥

६६६

धर्म म्हणे जरी सद्गुण ते सम । पद्धति कां भिन्न निवेदा तें ॥ १ ॥
निवेदिती भीष्म राग मोह स्नेह । तेंवी कामक्रोधविजयी योगी- ॥
मुक्त होती त्यांचें तोडूनियां जाल । योगी जे दुर्बल नाश त्यांचा ॥
स्फुलिंग अग्नीचा काष्ठभारें नष्ट । परी तो प्रदीप्त होतां कार्य ॥ ४ ॥
प्रवाहपतित दुर्बलासमान । विषयीं पतन दुर्बलाचें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे गजासम योगी । विरुद्ध प्रवाहीं सिद्धि जोडी ॥ ६ ॥

६६७

रहस्य योगाचें निवेदितों सूक्ष्म । धारणा ते जाण समाधी हीं ॥ १ ॥
गूढ, अंगें दोन जाणावीं योगाचीं । धनुर्धारी लक्षीं वेधी बाण ॥२॥
तैसा योगी चित्त एकाग्र करूनि । ध्यानांत रंगूनि मिळवी मोक्ष ॥
तैलघट शिरीं घेऊनि सोपान । चढणें तें जाण चित्तस्थैर्य- ॥ ४ ॥
करील तयासी सूर्यासम कांति । लाभेल निश्चिती योगबळें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसी हे धारणा । जयासी तो जाणा महायोगी ॥ ६ ॥

६६८

वृत्तिरहित जो पाही आपणासी । निरामय त्यासी स्थान लाभे ॥१ ॥
अहिंसादि महाव्रतें आचरूनि । आधारादि स्थानीं स्थिर होई ॥ २ ॥
शुभाशुभ त्यांचें तत्काळचि नासे । इच्छेसम त्यांतें मुक्ति लाभे ॥
आहार कोणता जिंकावेंही काय । करूनि निश्चय कथितो एकें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे योग्यांचा आहार । निवेदिती वीरश्रेष्ठ भीष्म ॥ ५ ॥

६६९

कण्या निःसत्व वा पेंड । योग्य स्निग्धतारहित ॥ १ ॥
कांजी जोंधळ्याची भक्षी । योगबल लाभे त्यासी ॥ २ ॥
दुग्ध उदकसंयुक्त । प्राशील जो कांहीं मास ॥ ३ ॥
अथवा निर्मांस भोजनें । तया योगसिद्धि जाणें ॥ ४ ॥
काम क्रोध शीत उष्ण । जिंकी कामना दारुण ॥ ५ ॥
निद्रा-तंद्राविरहित । ध्यान-अध्ययनींरत ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । राजमार्ग हा ज्ञात्याचा ॥ ७ ॥

६७०

प्राकृतांसी ऐसा मार्ग हा दुर्गम । जातसे लंघून एखादाचि ॥ १ ॥
भुजंगादि व्याप्त कंटकसंयुक्त । अन्नोदक जेथ लाभेचिना ॥ २ ॥
निबिड अरण्य, पेटला दावाग्नि । व्याप्त तस्करांनीं ऐसा मार्ग ॥ ३ ॥
एकाकी लंघणें कठिणचि जैंवी । योगमार्ग तैंवी दुर्लंघ्य हा ॥ ४ ॥
दोषयुक्त जरी धारणा एथींची । नाव भग्न त्याची सागरांत ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धारणासंसिद्धि । होतां कार्यसिद्धि योगियाची ॥ ६ ॥

६७१

धर्मा, निवेदिलें योगाचें हें सार । बहुत आधार यासी ग्रंथीं ॥ १ ॥
विप्रवृंदामाजी प्रात्यक्षिकें याचीं । ब्रह्मैक्य ते सिद्धि मार्गींची या ॥
सिद्धाप्राति ऐशा ब्रह्मा विष्णुआदि । स्वरूपें देवांचीं प्राप्त होती ॥ ३ ॥
इच्छेसम रूप घेई तो देवांचें । तत्तद्रूपत्यागें क्षणीं मुक्त ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे नारायणरूप । सकळ सामर्थ्ययुक्त योगी ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३०० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १२७समाप्त

अध्याय ३०१ वा

६७२

धर्म म्हणे ताता, आतां सांख्यमार्ग । निवेदावा मज दयाभावें ॥ १ ॥
भीष्म निवेदिती संशय न एथ । मार्ग हा निर्दोष कथितों ऐकें ॥ २ ॥
गुणदोष एथें निवेदिले सर्व । सुखदुःख तत्व कथिलें तैंवी ॥ ३ ॥
आनंद तैं प्रीति उद्वेग प्राकाश्य । तैं पुण्यशीलत्व संतोषही ॥ ४ ॥

श्रद्धालुत्व तेंवी नित्य रुजुभाव । तैसेंचि ऐश्वर्य त्याग सदा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सत्वाचे हे दश । श्रेष्ठ गुण सांख्य जाणिताती ॥ ६ ॥

६७३

आस्तिक्य औदार्य सुखदुःखभोग । भेद तें पौरुष कामक्रोध ॥ १ ॥
मद दर्पद्वेष तेंवी अतिवाद । गुण हे राजस म्हणती सांख्य ॥ २ ॥
तम मोह महामोह तें तामिस्र । प्रमाद आलस्य अंध निद्रा ॥ ३ ॥
अष्टगुण ऐसे तमाचे सांख्यांनीं । पूर्णत्वें जाणूनि निवेदिले ॥ ४ ॥
महत्, अहंकार तन्मात्राही पंच । ऐसे गुण सप्त बुद्धिस्थित ॥ ५ ॥
इंद्रियपंचक तेंवी मन ऐसे । गुण हे मनाचे सांख्य जाणे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पृथिव्यादि पंच । गुण हे नभास म्हणती सांख्य ॥७॥

६७४

संशय निश्चय गर्व तें स्मरण । बुद्धीचे हे गुण कथिले अन्य ॥ १ ॥
अज्ञान, विरोध विपरीत ज्ञान । तमाचे हे धर्म निवेदिले ॥ २ ॥
प्रवृत्ति तें दुःख गुण हे रजाचे । प्रकाश सत्वातें धर्म एक ॥ ३ ॥
प्रकृतीचा लय होतांचि गुणांची । होई काय स्थिति जाणूनि तें ॥४॥
आत्मबोधरत होती जे भाविक । सांख्यशास्त्ररत मुक्तचि ते ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मोक्ष स्वतःसिद्ध । इतर सापेक्ष अवघें विश्व ॥ ६ ॥

६७५

रूपसंबद्ध ते दृष्टि । घ्राणादिकांसी गंधादि ॥ १ ॥
वायु आकाशसंयुक्त । मोह तमाशीं संबद्ध ॥ २ ॥
अर्थसंयुक्त तो लोभ । विष्णु गतीशीं संबद्ध ॥ ३ ॥
परमात्म्यासी युक्त आत्मा । संबद्ध तो नारायणा ॥ ४॥
नारायण मोक्षाश्रित । मोक्षमात्र स्वयंसिद्ध ॥ ५ ॥
निर्विकल्प वस्तु ऐसी । मोक्ष एक स्वावलंबी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भिन्न । विश्व सकल हा भ्रम ॥ ७ ॥

६७६

वासनामय या सृष्टीहूनि भिन्न । यास्तवचि जन करिती दूर ॥ १ ॥
लक्षावधींमाजी एखादा प्रवृत्त । ऐसा हा दुर्धर मोक्षमार्ग ॥ २ ॥
निष्पाप उदास जाणूनि आत्म्यासी । अन्य कांहीं गोष्टी कळणें योग्य

बुद्धि सत्वमय, लिंगदेहबोध । होणें आवश्यक साधकासी ॥ ४ ॥
प्राण, श्रद्धा, नभ, वायु, तेज, जल । पृथ्वी, इंद्रिय, तप, मन, अन्न
वीर्य, मंत्र, कर्म, लोक, नाम, ऐसे । षोडश गुण हे लिंगदेहा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे प्रारब्ध धी वृत्ति । लिंगदेहाप्रति अन्य दोन ॥ ७ ॥

६७७

वासनामय हा प्रपंच सकळ । स्वप्नासम स्थैर्थ नसे तया ॥ १ ॥
निष्पाप असंग आत्मा निर्विकार । निरास सकल आत्मज्ञानें ॥ २ ॥
आकारेल तें तें अस्थिर जाणावें । स्वहित जाणावें सर्वकाल ॥३॥
तामसां जें प्रिय अप्रिय तें संतां । मोक्षाविण सांख्यां सकल तुच्छ॥
चंद्रसूर्य तेही अस्थिर या जनीं । दुर्लभचि मनीं मोक्षइच्छा ॥ ५ ॥
अप्राप्तविषयीं आदर सर्वदा । तोचि प्राप्त होतां तुच्छ वाटे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विषय दुःखद । देह अमंगल प्राण जातां ॥ ७ ॥

६७८

दुष्कर्माचें फल लाभतसे घोर । जाणूनि विचार करिती ज्ञाते ॥ १ ॥
चराचर विश्व हें क्षणभंगुर । मोक्षमार्गी स्थिर ज्ञाते तेणें ॥ २ ॥
धर्म म्हणे देहदोष ते कथावे । भीष्म प्रेमभावें निवेदिती ॥ ३ ॥
काम क्रोध भय निद्रा श्वास ऐसे । दोष हे देहाचे कथिती भीष्म ॥
क्षमेनेंचि क्रोध, असंकल्पें काम । सत्वें निद्रा क्षीण होत असे ॥ ५ ॥
दक्षतेनें भय अल्पाहारें श्वास । जिंकावे हे दोष ऐशापरी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गुणदोष ऐसे । जाणूनि चित्तातें स्थिर करा ॥ ७ ॥

६७९

फेन बुद्बुद कीं चित्रित ते भित्ति । जग हें तैसेंचि भासरूप ॥ १ ॥
परतंत्र होई सत्व-रज-तमें । पंकमग्न जाणें गज जैसा ॥ २ ॥
जाणूनि हें सांख्यज्ञानशस्त्रा दंड । योजूनियां तप स्नेहच्छेत्ते- ॥३॥
भवसागर हा तरूनियां जाती । वासुदेव त्यांसी वंदी प्रेमें ॥ ४ ॥

६८०

भवसागरीं या दुःखरूप जल । द्रोह चिंता शोक तया डोहीं ॥ १ ॥
व्याधि-मृत्यु नक्र, महाभय सर्प । कूर्म तम तेथ, रज मत्स्य ॥ २ ॥
स्नेहपंक जरा, दुर्ग ज्ञानदीप । कर्मचि अथांग खोली त्याची ॥ ३ ॥

सत्य तीर, वेला नियति जयातें । हिंसा ओघ त्यातें प्रेमरत्नें ॥ ४ ॥
हृदयींचे रस त्याचि रत्नखनि । वायु एथ मानीं दुःख ताप ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे तृष्णेचे आवर्त । अस्थि हाचि घाट, कफ फेंस ॥६॥

६८१

मौक्तिकलाभाचें स्थान तेथ दान । प्रवालाचें स्थान रुधिर तेंचि ॥
हास्य, आक्रंदन गर्जना एथींची । विघ्नें सागरींचीं विविध ज्ञानें ॥
रूदन-मल तो क्षार तयास्थानीं । असंग तो मानीं उद्धारक ॥ ३ ॥
पुत्रदारादिक जलूका त्यामाजी । मित्रबांधवादि पत्तनें तीं ॥ ४ ॥
अहिंसा सत्यही मर्यादा तयासी । मृत्यु ते तेथींची महालाट ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वेदांत विराम । दया घट जाण उद्धारक ॥ ६ ॥

६८२

पैलतीर याचें मोक्ष । प्राप्ति ज्याची दुरापास्त ॥ १ ॥
वडवाग्नि तेथ वेश्या । ऐसा समुद्र भारता ॥ २ ॥
ज्ञाननौकायुक्त ज्ञाते । जाती लंघूनियां यातें ॥ ३ ॥
सुनिर्मल आकाशांत । होई तयांचा प्रवेश ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सांख्य । ऐसे आनंदस्वरूप ॥ ५ ॥

६८३

व्योमसंवित्लाभ होई सांख्यांप्रति । लाभे सर्वशक्ति सर्वज्ञता॥ १ ॥
द्वंद्वातीतां ऐसी लाभे श्रेष्ठगति । जेणें पुनरावृत्ति नसे तयां ॥ २ ॥
धर्म म्हणे ताता, एथ शंका एक । निवारूनि मज सौख्य द्यावें ॥ ३॥
सर्वज्ञा मुक्तासी पूर्वजन्मज्ञान । प्राप्तचि असे, न तरी केंवी ॥ ४ ॥
असेल तें तरी अहंकारचि तो । नसतां जडत्व सिद्ध होई ॥ ५ ॥
कारण जाणीवाविहीन तें ज्ञान । जडचि अज्ञान नसे काय ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दुहेरी हा पेंच । उत्तर धर्मास देती भीष्म ॥ ७ ॥

६८४

धर्मा, अवघड प्रश्न जरी तव । तथापि तो न्याय्य निश्चयेंसी ॥ १ ॥
बाह्य वस्तुज्ञाना साधन इंद्रियें । आत्माचि त्या पाहें शक्तिदाता ॥
अंधासीही स्वप्नसृष्टि ते असेचि । नसे जरी दृष्टि शब्द ऐके ॥ ३ ॥
यद्यपि इंद्रियें साधनें ज्ञानाचीं । आत्माचि तथापि ज्ञानरूप ॥ ४ ॥

आत्मसंबंधेंचि इंद्रियां महत्व । सिंधूविण काय फेन करी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे निर्विशेष ज्ञान । आत्माचि चिंतून बोध घ्यावा ॥ ६ ॥

६८५

अहंभावयुक्त पूर्वींचें तें ज्ञान । इंद्रियांवांचून कैंवी घडे ॥ १ ॥
स्वप्नामाजी मात्र नसतां इंद्रियें । सकल हा पाहे स्वसामर्थ्यें ॥ २ ॥
तात्पर्य जडता नसे आत्म्याप्रति । इंद्रियें तयाची करिती सेवा ॥ ३ ॥
समाधींत आत्मा लंघूनि तयांसी । लीन स्वस्वरूपीं होत असे ॥ ४ ॥
प्रारब्धावशेष देह हा जोंवरी । व्युत्थान तोंवरी देहामाजी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संपतां प्रारब्ध । स्वस्वरूपस्थित मुक्त आत्मा ॥ ६ ॥

६८६

धर्मा, सर्वश्रेष्ठ ज्ञान हें सांख्यांचें । आत्मरूप यातें म्हणती वेद ॥
नामरूपातीत निर्विषय ज्ञान । हेंचि मुख्य खूण ज्ञानाची या ॥ २ ॥
सन्मात्र स्थावरीं, जंगमीं सत्‌चित्‌ । ज्ञात्यांत आनंद प्रगट दिसे ॥
परोक्षहि ऐशा ज्ञानें विप्रयोनि । लाभे, परब्रह्मीं पुढती लीन ॥ ४ ॥
अपरोक्ष ज्ञान जया तोचि ब्रह्म । अतिपुरातन सिद्धांत हा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे याचि ज्ञानें हरि । निद्रा वटपत्रीं प्रलयीं घेई ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३०१ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १२८ समाप्त

अध्याय ३०२ रा

६८७

धर्म म्हणे ताता, क्षराक्षरज्ञान । मज निवेदून धन्य करा ॥ १ ॥
कराल-जनक वसिष्ठांचा तदा । संवाद पूर्वींचा कथिती भीष्म ॥ २ ॥
जनकप्रश्नें त्या कथिती वसिष्ठ । अविनाशी तत्व कथितो ऐकें ॥ ३ ॥
नाशिवंत जग कथितों प्रथम । काळाचें प्रमाण ध्यानीं घेईं ॥ ४ ॥
द्वादशसहस्र दैवी संवत्सर । युग तें साचार कथिती ज्ञाते ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसीं चार युगें । चौकडी तयांतें म्हणती जनीं ॥ ६ ॥

६८८

सहस्र चौकड्या कल्प तो म्हणावा । दिन तो जाणावा विरंचीचा ॥
तितुकीच रात्र संपतां ब्रह्मयाची । जागृति शंभूसी येत असे ॥ २ ॥
तयापासूनियां हिरण्यगर्भ तो । पुढती विराट अहंकार ॥ ३ ॥

पुढती जाहली सूक्ष्मस्थूल सृष्टि । विनाश उत्पाति सृष्टीसी त्या ॥
क्षर तें, अक्षर लय क्षरा जेथें । महत्तत्वही तें क्षर जाणा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे क्षराक्षर ऐसें । जाणूनि विष्णूतें ओळखावें ॥ ६ ॥

६८९

चतुर्विंशति तत्वांचा । आधार तो विष्णु साचा ॥ १ ॥
अमूर्तत्वें अधिष्ठाता । विष्णु नसे त्या तत्वांचा ॥ २ ॥
प्रकृतींत चिदात्म्याची । छाया तेणें तिज शक्ति ॥ ३ ॥
प्रकृतीच्या तादात्म्यानें । आत्मा बद्ध अभिमानें ॥ ४ ॥
गुणांसम तया फल । स्वर्ग मृत्यु वा पाताल ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विष्णु । गुरुकृपेनें ओळखूं ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ.३०२ रा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१२९ समाप्त

अध्याय ३०३ रा ६९०

जनकासी मुनि कथिती, या भ्रमें । जीवासी अज्ञानें व्यापियेलें ॥
तेणें त्या भ्रमण सकळ योनींत । असूनि अलिप्त लिप्त होई ॥ २ ॥
मिथ्या ममत्व त्या जन्म-गुण-कर्मीं । अथवा साधनीं रत होई ॥ ३ ॥
अहं मम ऐसे होती बलवान । कल्पना दारुण दुःख देई ॥ ४ ॥
अविनाशी अव्यय तो निर्विकार । पावतो विकार कल्पनेनें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रकृतितादात्म्यें । ऐसीं बहु दुःखें आत्मा मानी ॥६॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३०३ रा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१३०समाप्त

अध्याय ३०४ था ६९१

मूढसंगतीनें मूढता पावूनि । लक्ष कोटी योनि भ्रमतो जीव ॥ १ ॥
दशेंद्रियें मन बुद्धि तैंवी चित्त । कला चतुर्दश अहंकारें ॥ २ ॥
चिच्छायासंयुक्त मूलप्रकृति ते । कला, देई गोते जीवाप्रति ॥३॥
षोडशसंख्य जे कला तोचि सोम । ऐशा चंद्रासम दशा जीवा ॥
अंतिम कला तें पोषण जीवाचें । जड चेतनाचें बिऱ्हाड हें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे असूनि निर्गुण । तादात्म्यें त्रिगुण भासे आत्मा ॥६॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३०४ था तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१३१ समाप्त

अध्याय ३०५ वा

६९२

राव म्हणे मुने, प्रकृतिपुरुष । यांचा हा संबंध जगीं इष्ट ॥ १ ॥
पुरुषावांचूनि गर्भ न स्त्रियांसी । स्त्रीवीण नरासी प्रतिबिंब न ॥२॥
उभयांचे गुण अपत्याचे देहीं । मज्जा स्नायु अस्थि पित्याचे ते ॥
त्वचा मांस रक्त मातेचे या देहीं । ऐसी व्यवस्था ही कथिली शास्त्रीं
पुरुषसंयोगें प्रकृती चेतन । केवळ सौख्य न पुरुषासही ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसा हा संयोग । नित्य कैंवी मोक्ष म्हणे राव ॥ ६ ॥

६९३

मुनि वसिष्ठ तैं बोलले नृपासी । रहस्य नेणसी शास्त्रांचें तूं ॥ १ ॥
शब्दज्ञानमात्र जाणती जे मूढ । वाहती ते व्यर्थ ग्रंथभार ॥ २ ॥
भग्न घटासम बुद्धि ज्या, तयासी । निर्णय कदापि समजेचिना ॥ ३॥
आत्मज्ञानेंही न अभ्यासावांचूनि । ग्रंथ समजूनि देतां येई ॥ ४ ॥
योग्यांप्रति बोध होई जो प्रत्यक्ष । अनुमान तेंच करिती सांख्य ॥
वासुदेव म्हणे सांख्ययोग ऐसे । एकचि जयातें तोचि ज्ञानी ॥ ६ ॥

६९४

राया, प्रकृतीचि सकल हे गुण । पुरुष कारण नसे देहा ॥ १ ॥
गुणमयी सृष्टि पुरुष निर्गुण । गुणचि हे जाण मूळ गुणां ॥ २ ॥
पुरुषवीर्येंचि सप्तधातु होती । दृष्टांत द्रोणादि देह यातें ॥ ३ ॥
प्राकृताचि परी देह उभयांचे । आत्मा भिन्न असे गुणांहूनि ॥ ४ ॥
पुष्प-फलादींनीं ऋतूंचें अनुमान । तैसें तर्कें ज्ञान पुरुषाचें त्या ॥५॥
वासुदेव म्हणे गुणांचा अध्यास । आत्म्यावरी स्पष्ट तादात्म्यानें ॥

६९५

गुणांचेचि गुण जाणूनि रहस्य । करी गुणबोध तोचि मुक्त ॥ १ ॥
गुणातीत ऐसा आत्मा बुद्धीहूनि । पर ऐसें दोन्हीं कथिती शास्त्रें ॥
अहंममत्यागें ज्ञान होई त्याचें । अव्यक्तादि त्यातें कथिती सुज्ञ ॥
अवस्था जन्मादिभयें जे आत्म्यासी । जाणती त्यांसीचि ऐक्यबोध ॥
तात्पर्य ऐक्यासी अक्षर म्हणावें । नानात्व जाणावें क्षर तेंचि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐक्य प्रतिपादी । श्रेष्ठ शास्त्र तेंचि इतर मिथ्या ॥६॥

६९६

कर्तृत्व आत्म्याचें म्हणती जे तेही । साधन बुद्धीचि म्हणती तया ॥
तत्व किंवा जन्य प्रकृतीचि सर्व । तत्वातीत एक परब्रह्म ॥ २ ॥
पंचपंचकांचें ज्ञान तेंचि ब्रह्म । एक सनातन तत्व जगीं ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे षड्विंशतितम । तत्व तेंचि ब्रह्म ऐशापरी ॥ ४ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ.३०५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१३२समाप्त

अध्याय ३०६ वा ६९७

राव म्हणे मुने, बुद्धिमांद्यें मज । क्षराक्षर बोध नाहीं झाला ॥ १ ॥
एकत्व नानात्व विद्या अविद्या ती । अज्ञानी ज्ञानीही निवेदावे ॥ २ ॥
विद्या अविद्या ते सशास्त्र ऐकावी । सांख्य योग तेही सूक्ष्मभेदें ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि वसिष्ठ । निवेदितो स्पष्ट म्हणती ऐका ॥ ४ ॥

६९८

राया, योगियांचा पाया एक ध्यान । ध्याना मन प्राण साधनें तीं ॥
एकाग्र होऊनि किंवा प्राणायामें । ध्यान तें साधावें म्हणती योगी ॥
एक तें निर्गुण अन्य तें सगुण । करितां भोजन ध्यान वर्ज्य ॥ ३ ॥
मूत्र-पुरीषाचा कालही त्या वर्ज्य । अन्य सर्व योग्यकाल ध्याना ॥४॥
कामादिक दुष्ट बाधती न ज्यास । साधक तो योग्य योगमार्गीं ॥५॥
वासुदेव म्हणे विषयविरक्त । मिताहारयुक्त व्हावा योगी ॥ ६ ॥

६९९

आंवरूनि इंद्रियांसी । रजनीच्या आदि-अंतीं ॥ १ ॥
मन ईश्वरांत लीन । करणें तयासी जिंकून ॥ २ ॥
बुद्धिबळें व्हावें स्थिर । जणु पाषाण निश्चल ॥ ३ ॥
स्तंभ अचल कीं दुजा । तुटो संबंध विषयांचा ॥ ४ ॥
निरिच्छही जो निर्मम । निर्विकार काष्ठासम ॥ ५ ॥
दीप निवात स्थळींचा । स्थिर सतेज तो तैसा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे योगी । तोचि जाणावा या जगीं ॥ ७ ॥

---

१ पंचकर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रियें, भूतें, विषय आणि मन, बुद्धि, अहंकार, प्रकृति व चिदात्मा. २ २६ वें.

७००

लिंगदेह जन्म-मरणहीन जो । साक्षात्कार होतो तयासीच ॥ १ ॥
कळावयाचें जें कळतें तें त्यासी । जीवात्म्यासंबंधीं ऐक्यज्ञान ॥२॥
कळानिही अन्या कथणें अशक्य । होई जया तोच पूर्ण ज्ञानी ॥ ३ ॥
निर्धूम जें अग्नि किंवा सूर्यासम । तेजस्वी तो जाण महायोगी ॥४॥
सूक्ष्माहूनि सूक्ष्म श्रेष्ठाहूनि श्रेष्ठ । साक्षात्कारें स्पष्ट बोध त्याचा ॥
वासुदेव म्हणे चित्तदीपे बुद्धि- । साधनें, तयासी ओळखावें ॥ ६ ॥

७०१

ईश्वराहूनिही श्रेष्ठ परमात्मा । लंघूनियां तमा पार असे ॥ १ ॥
संसारतत्वाचा तेणें पूर्ण नाश । निर्मल प्रकाश रूप त्याचें ॥ २ ॥
निरुपाधि लिंगरहित तें असे । योग हाचि असे योगियांचा ॥ ३ ॥
अविनाशी आद्यतत्वाचा प्रत्यय । साधकातें होय याचिमार्गें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सांख्यमार्ग आतां । वसिष्ठोक्त चित्ता शांति देवो ॥

७०२

अव्यक्त प्रकृति सांख्यांसी ते श्रेष्ठ । तेथें महत्तत्व अहंकार ॥ १ ॥
पंचमहाभूतें तेथ ऐसा क्रम । प्रकृति या जाण अष्ट त्यांच्या ॥ २ ॥
मनासवें त्यांचे षोडश विकार । ऐसें सांख्यशास्त्र कथन करी ॥३॥
कार्याचा विलय होई कारणांत । विश्वाचा आत्म्यांत लय होई ॥ ४ ॥
सागरतरंग सागरांत लीन । तैसेंचि हें जाण अवघें विश्व ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रलयीं जो एक । पावे तोचि भेद सृष्ट्यारंभीं ॥ ६ ॥

७०३

एकत्व नानात्वा प्रकृति कारण । भेद ऐसे जाण प्रकृतीचे ॥ १ ॥
एकत्व नानात्व प्रकृतीचि जाण । करी शक्तिदान आत्मा तिज ॥२॥
प्रवर्तक तया यास्तव म्हणती । सर्वत्र आत्माचि भरला एक ॥ ३ ॥
प्रकृति तें क्षेत्र क्षेत्रज्ञ तो आत्मा । पुरुष ही संज्ञा तया योग्य ॥४॥
पुर्यष्टकीं वास तयाचा म्हणूनि । ज्ञान ज्ञेय जनीं वेगळें तें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अव्यक्त तें ज्ञान । म्हणती क्षेत्रज्ञ ज्ञेयमात्र ॥ ६ ॥

७०४

क्षेत्रादि तीं तत्वें तत्वातीत आत्मा । यास्तवाचि संख्या कथिती कोणी

चतुर्विंशति त्या तत्वाहूनि पर । आत्मा हें तात्पर्य ध्यानीं घ्यावें ॥२॥
आदिकारण ते प्रकृति जाणूनि । साक्षात्कार जनीं घेती ज्ञाते ॥ ३ ॥
चतुर्विंशति त्या तत्वांपार जीव । परमात्मा पर तयाहूनि ॥ ४ ॥
ऊहापोह ऐसा कथिला तुजसी । जाणती जे तेचि ब्रह्मरूप ॥५॥
वासुदेव म्हणे भ्रांतासी हें जग । तैसेंचि प्रत्यक्ष ज्ञात्या ब्रह्म ॥ ६ ॥

७०५

सम्यक् निदर्शन ऐसें जयां होई । भ्रमण त्यां नाहीं देहहीनां ॥ १ ॥
सदेह जे ऐसे सत्यसंकल्प ते । समाधिकालीं ते ब्रह्मरूप ॥ २ ॥
नानात्व जयांसी होई आत्म्यामाजी । ज्ञान न तयांसी समजा सत्य ॥
प्रत्यक्षानुभव शास्त्राचा या जयां । सर्वज्ञता तयां प्राप्त होई ॥ ४ ॥
संसारविमुक्त जाणावें तयांसी । आत्मबोध ज्यांसी ऐशापरी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सांख्यांचा सिद्धांत । जाणील तो मुक्त होई ऐसा ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३०६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १३३ समाप्त

अध्याय ३०७ वा ७०६

उत्पत्ति प्रलय जेथ ते अविद्या । अलिप्त सर्वदा विद्या तेचि ॥ १ ॥
अवांतर भेद कथितों ते ऐकें । ज्ञानेंद्रियें मी, हे विद्या एक ॥ २ ॥
बुद्धींद्रियविद्या नाम त्या विद्येसी । विशेष विद्या ती भूतें मी हे ॥
मन मी हा भाव मनोविद्या तेचि । अहंविद्या तेचि मनत्यागें ॥ ४ ॥
बुद्धि प्रकृत्यादि विद्या ऐशा भिन्न । आत्मविद्या जाण सकल श्रेष्ठ ॥
वासुदेव म्हणे बोधरूप आत्मा । प्रमाता त्या संज्ञा सांख्यशास्त्रीं ॥

७०७

क्षराक्षर संज्ञा प्रकृति-जीवांसी । मूळ सकळां जी अक्षर ते ॥ १ ॥
परस्परांविण परस्पर कार्य । न होई अक्षर म्हणूनि दोन्हीं ॥ २ ॥
यदा योगी लय करी प्रकृतीचा । तदा चिदाभासा ठाव नसे ॥ ३ ॥
यास्तव दोघां त्यां क्षरत्वही येई । स्थिति ऐसी पाहीं परस्परां ॥४ ।
प्रकृतिविमुक्त होई यदा जीव । तदा गतकाल आठवे त्या ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मत्स्य उदकासी । मानी एकत्वासी तैसा जीव ॥ ६ ॥

७०८

मत्स्य जेंवी जलें, दारा-पुत्रें जीव । होई परतंत्र सर्वकाल ॥ १ ॥
तेणें जलांतूनि अन्य जळीं मत्स्य । तैसें देहांतर जीवाप्रति ॥ २ ॥
आठवूनि ऐसें पश्चात्ताप होई । आत्मरूपें राही स्थिर तदा ॥ ३ ॥
प्रकृति वयेनें नाडिलें मजसी । आतां सांख्ययोगीं रंगेन मी ॥ ४ ॥
दोष परी काय द्यावा तिजलागीं । भ्रमलों या भेदीं मीचि कैसा ॥
वासुदेव म्हणे निर्द्वंद्व मी आतां । होईन जीवाचा संकल्प हा ॥ ६ ॥

७०९

राया, सांख्य-योग उभय मोक्षद । उभयही श्रेष्ठ उभयांप्रति ॥ १ ॥
अधिकारभेदें उभयां श्रेष्ठता । योग त्वंपदार्थो दावीतसे ॥ २ ॥
तत्पदार्थबोध घडे सांख्यमार्गें । कोणा आगेमागे बोध ऐसा ॥ ३ ॥
प्रधान गौण हे मार्ग तत्तत्काळीं । जैसा अधिकारी तया तैसे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे साह्य एकमेकां । जाणूनि या शास्त्रां अभ्यासावें ॥५॥
इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३०७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १३४ समाप्त

अध्याय ३०८ वा

७१०

वसिष्ठ नृपातें निवेदिती भोग्य । भोक्ता तैं प्रेरक त्रिधा वस्तु ॥ १ ॥
अनुरोधें तया बुद्ध तैं अबुद्ध । गुणविधि भेद कथितो कैसे ॥ २ ॥
परमात्मा बोधरूप तोचि बुद्ध । बोधहीन मूढ अबुद्ध तो ॥ ३ ॥
गुंणप्रभाव तो गुणविधि जाणें । विप्र स्वप्नीं म्हणे रावचि मीं ॥ ४ ॥
विश्व तैजसादि मींचि म्हणे आत्मा । नटलों या भावा न राखीचि ॥
वासुदेव म्हणे ऐसा जो अबुद्ध । भ्रममग्न तोच म्हणती जीव ॥ ६ ॥

७११

अबुद्ध हा जीव अहंममयुक्त । अभिमानप्रेरित होई बहु ॥ १ ॥
घटादिक ज्ञानें बोलती त्या ज्ञानी । जडासी न मानीं ज्ञान कदा ॥२॥
सत्व जरी जड परी न त्या ज्ञान । जीवाचें न भान जडालागीं ॥३॥
चिज्जडग्रंथीचा अभिमानी जीव । तत्वें चतुर्विंश जाणीतसे ॥ ४ ॥
संसर्गें जीवाच्या प्रकृतीसी ज्ञान । भासे परी तें न स्वयें तिज ॥५॥
वासुदेव म्हणे सर्वज्ञ न जीव । तेथ ज्ञातृभाव जडज्ञानें ॥ ६ ॥

१ सत्वादि गुणांचा प्रभाव

७१२

द्रष्टा तो जीवाचा न दिसे तयासी । ब्रह्म सर्वव्यापि द्रष्टृत्व त्या ॥१॥
सूक्ष्मदर्शी तेचि जाणती याप्रति । याचि देहीं मुक्ति तेणें तयां ॥ २ ॥
व्यापकाही त्याचें भान न जीवासी । अहं ममत्वेंचि मूढत्व त्या ॥३॥
गुरूपदेशानें प्रकृतीसी जिंकी । तदाचि तयासी ब्रह्मबोध ॥ ४ ॥
सगुणप्रकृति निर्गुण आपणा । जाणतां बंधना दूर करी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पंचविंशति हीं । तत्वें तयांमाजी जीव एक ॥ ६ ॥

७१३

अहंब्रह्मास्मि ही वृत्ति न जयाची । तो पंचविंशति तत्वां पार ॥ १ ॥
बोध किंवा ब्रह्म राया, तेंचि जाणें । तया जाणें येणें नसे कोठें ॥२॥
नसतां तो बोध जीवासी भ्रमण । नसे अहंभान ज्ञात्याप्रति ॥ ३ ॥
पाप-पुण्यलेश न बाधे तयासी । ऐक्य निर्गुणासी सहज त्याचें ॥४॥
लाजूनि लपवी प्रकृति त्या मुख । विश्व भ्रमात्मक सहज तया ॥५॥
वासुदेव म्हणे त्रिविध वस्तूचा । निर्णय हा ऐसा कथिती मुनि ॥६॥

७१४

मशकोदुंबर किंवा मत्स्यजाल । तैसें हें भिन्नत्व कळतां मोक्ष ॥ १ ॥
चतुर्विंशति या सांख्यतत्वामाजी । तादात्म्य जयासी तोचि जीव ॥
सुटतां तेथूनि ब्रह्मरूप तोचि । संग जैसा त्यासी तैसा घडे ॥ ३ ॥
बुद्धसंगें बुद्ध शुद्धसंगें शुद्ध । स्वतंत्रासी संग घडतां तैसा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे संतांची संगति । धरूनि सद्गति पावे जीव ॥ ५ ॥

७१५

रहस्य हें राया, द्यावें श्रद्धावंता । जलाची योग्यता तान्हेल्यासी ॥१॥
नम्रभावें तत्वबोधार्थ जो येई । तयासी हें होई हितप्रद ॥ २ ॥
निंदापराङ्मुख सदाचाररत । शमदमयुक्त सात्विक जो ॥ ३ ॥
अधिकारी तोचि शास्त्ररहस्याचा । अहंमन्य मूढा बाधक हें ॥ ४ ॥
कुपात्रींचि दान होईल तें राया । कथूं नये तया कदाकाळीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अमृतही दुष्टां । होतसे पापाचा मार्ग जनीं ॥ ६ ॥

७१६

राया, जाहलासी धन्य । ब्रह्मबोध हा ऐकून ॥ १ ॥

आतां गेलें भवभय । जाहलासी निरामय ॥ २ ॥
त्यागीं सकल मोहासी । लीन होईं ब्रह्मरूपीं ॥ ३ ॥
कथिलें जैसें ब्रह्मदेवें । तुज तैसेंचि कथिलें ॥ ४ ॥
निवेदिती भीष्म धर्मा । नारदें हें कथिलें आम्हां ॥ ५ ॥
तेंचि कथिलें तुजसी । आतां नसो भय चित्तीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्ञान । चुकवी जनन-मरण ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३०८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १३५ समाप्त

अध्याय ३०९ वा

७१७

निवेदिती भीष्म जनकवंशीय । वसुमना राव एक्यावेळीं ॥ १ ॥
भृगुकुलोत्पन्न ऋषींप्रति म्हणे । कवण्या कर्में मुने, इहपर ॥ २ ॥
कथिती त्या मुनि नित्य भूतहित । साधावें, न दुःख द्यावें कोणा ॥
सुजनांचा मित्र धर्मचि जाणावा । आश्रय गणावा तोचि तयां ॥ ४ ॥
वासना त्यजूनि निष्काम तूं होईं । केवळ न पाहीं मधुलोभें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे न दिसे प्रपात । मधुररसांत मूढ लुब्ध ॥ ६ ॥

७१८

धर्मास्तव नित्य करावा प्रयत्न । अशक्य सत्कर्म दुर्जनासी ॥ १ ॥
दुःसाध्य कर्महि सज्जनाचें सिद्ध । वनीं कोणी बद्ध, ग्रामी मुक्त ॥२॥
प्रवृत्ति-निवृत्ति गुण-दोषज्ञानें । रमावें तनमनें सत्कर्मांत ॥ ३ ॥
सत्पात्रीं करावें दान न्याय्यधर्में । क्लेश कदा दानें मानूं नये ॥ ४ ॥
उच्चार दानाचा कदा न करावा । सत्पात्र जाणावा कुलवंत ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे एकचि जियेस- । पति, तिचा पुत्र, 'सज्जात' तो ॥

७१९

सज्जात वेदज्ञ षट्कर्मनिरत । जाणावा सत्पात्र तोचि राया ॥ १ ॥
अल्पचि प्रयासें अल्पमल जाई । तैसेंचि तें पाहीं अल्प पाप ॥ २ ॥
रेचक सेवूनि घृत होई इष्ट । तैसें धर्मकृत्य पापहीना ॥ ३ ॥
पापप्रवृत्ति ते सदा निवारावी । सदा स्वीकारावी पुण्यवृत्ति ॥ ४ ॥
सर्वत्र सर्वदा सर्व स्वीकारिती । आदरावीं ऐसी कर्में सदा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्वधर्मासमचि । इतर धर्मांसी आदरावें ॥ ६ ॥

७२०

अधीरा तूं धरीं धैर्य । बुद्धिहीना होई स्थिर ॥ १ ॥
दुःखव्याकुळा हो शांत । मूढा, धरीं संतसंग ॥ २ ॥
संतसंगें तें स्वतेजें । मानवासी श्रेय लाभे ॥ ३ ॥
परी धैर्य आवश्यक । पराकाष्ठेचेंचि तेथ ॥ ४ ॥
'महामिष' धैर्याभावें । स्वर्गच्युत झाला पाहें ॥ ५ ॥
चढला ययाति स्वर्गात । पुण्य सरतां धैर्यवंत ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । म्हणती व्हावें निर्वासन ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३०९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १३६ समाप्त

अध्याय ३१० वा

७२१

धर्म म्हणे ताता, धर्माधर्म पाप । पुण्यविरहित निःसंशय ॥ १ ॥
जन्म-मृत्यूहीन शिव जें अभय । अक्षर अव्यय निर्दोष जें ॥ २ ॥
आयासवर्जित निरंतर तेंचि । कथावें मजसी कृपावंता ॥ ३ ॥
निवेदिती भीष्म संवाद प्राचीन । तुज मी कथीन ऐसें धर्मा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे देवरातप्रति । तत्व निवेदिती याज्ञवल्क्य ॥ ५ ॥

७२२

दैवरातपुत्र जनक देवरात । प्रश्न जे मुनीस करी ऐकें ॥ १ ॥
कतिविध मुने, इंद्रियें कथा तें । भेद प्रकृतीचे निवेदावे ॥ २ ॥
अव्यक्त ब्रह्महि कथावें मजसी । त्याहूनि जगतीं श्रेष्ठ काय ॥ ३ ॥
उत्पत्ति प्रलय कालसंख्याबोध । निवेदावा स्पष्ट मजलागीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे देवरातप्रति । मुनि निवेदिती ऐका काय ॥ ५ ॥

७२३

अष्टतत्वें ते प्रकृति । तत्वें षोडश विकृति ॥ १ ॥
अव्यक्त तें महत्तत्व । तिजा अहंकार देख ॥ २ ॥
पंचभूतांच्या तन्मात्रा । अष्ट प्रकृति जाणाव्या ॥ ३ ॥
दशेंद्रियें ते विषय । पंचदश हे विकार ॥ ४ ॥
संज्ञा 'विशेष' दहांसी । विकारान्तर न त्यांसी ॥ ५ ॥

१ किती प्रकारचीं ? २ पंचभूतोद्भव शब्दादि दहा

बुध्यादिक ज्ञानेंद्रियें । ‘ सविशेष ’ त्यां गणावें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मन । विकार तो अंतिम जाण ॥ ७ ॥

७२४

अव्यक्तापासूनि जाणे महान् आत्मा । सृष्टि ते प्रथमा जाण राया ॥
महत्तत्वाचा तो पुत्र अहंकार । बुद्धि मुख्य तत्व असे एथ ॥ २ ॥
तन्मात्रासर्वेचि मन तें पुढती । भूतांचा पुढती जन्म होई ॥ ३ ॥
रसगंधादिक पंचम ते सृष्टि । षष्ठ ते श्रोत्रादि सृष्टि असे ॥ ४ ॥
कर्मेंद्रियांची ते सप्तम उत्पत्ति । अष्टम प्राणादि सृष्टि असे ॥ ५ ॥
अधोभाग वायु नवम ते सृष्टि । संज्ञा या दोहींसी ‘आर्जवक’ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे याज्ञवल्क्य आतां । कथिती कालसंख्या श्रवण करा

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३१० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १३७समाप्त

अध्याय ३११ वा

७२५

कल्पें दशासहस्र अव्यक्ताचा दिन । रात्रींचें प्रमाण इतुकेंचि ॥ १ ॥
येतां त्या जागृति निर्मी वनस्पति । ब्रह्मयाची उत्पत्ति पुढती होई ॥
स्वर्गमृत्युआदि निर्मी ब्रह्मदेव । सार्धसप्त कल्प दिन त्याचा ॥ ३ ॥
तितुकीच रात्र निवेदिती ज्ञाते । अहंकार त्याचें प्रथमापत्य ॥ ४ ॥
भौतिकाचे पूर्वी चित्तचतुष्टय । पुत्र ब्रह्मदेव निर्मीतसे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सहस्र पंचक- । कल्प, दिन एक अहंकारा ॥ ६ ॥

७२६

विषय-इंद्रियें भूतें तीं जाणावीं । इच्छिताती व्हावी भेट नित्य ॥१॥
त्रिसहस्रकल्प दिन काल त्यांचा । तितुकाचि रात्रीचा काल तया ॥
मनचि इंद्रियद्वारा भोग सेवी । निवृत्त तें होई विराग तैं ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे इंद्रियांचा राजा । मनचि मुनींचा आशय हा ॥ ४ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३११ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १३८ समाप्त

अध्याय ३१२ वा

७२७

भगवान व्यक्त प्रेरणेनें रुद्र । आदित्यरूपें तो जाळी विश्व ॥ १ ॥
कूर्मपृष्ठासम पृथ्वी जलमय । होऊनियां जाय पुढती वेगें ॥ २ ॥

कालाग्नि पुढती शोषूनियां जल । होई ज्वालामय निजतेजें ॥ ३ ॥
सप्तज्वालात्मका तया वायु ग्रासी । नभ त्या पुढती गट्ट करी ॥ ४ ॥
तयालागीं मन तया अहंकार । महदात्मा थोर अहंकारा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शंभु ग्रासी तया । संहार कथिला ऐशापरी ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३१२ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १३९ समाप्त

अध्याय ३१३ वा ७२८

चरण, अध्यात्म गति अधिभूत । तो अधिदैवत विष्णु तेथें ॥ १ ॥
गुद तें अध्यात्म, उत्सर्गाधिभूत । तेंवी अधिदैवत सूर्य जाणें ॥ २ ॥
उपस्थ आनंद तेंवी प्रजापति । हस्त, कर्म त्यांचीं, इंद्रदेव ॥ ३ ॥
वाणी, शब्द, अग्निदैवत मानिती । ऐसीं अध्यात्मादि यथाक्रम ॥४॥
विभूति या ऐशा कथिल्या तुजसी । दीपें दीपज्योति बहुत जेंवी ॥
तैसी हे प्रकृति सहाय्य आत्म्याचें- । घेऊनि, विश्वातें निर्मीतसे ॥
वासुदेव म्हणे सत्व रज तम । प्रकृतीचे गुण विस्तारले ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३१३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १४० समाप्त

अध्याय ३१४ वा ७२९

त्रिगुणप्रकृति व्यापिते जगासी । षड्गुणें ईशासी विविध रूपें ॥१॥
उत्तमादि स्थिति लाभे गुणांसम । योनि भिन्न भिन्न गुणसंकरें ॥२॥
प्रकृतीमाजीही निर्विकार आत्मा । सान्निध्यें चेतना प्रकृतीसी ॥ ३ ॥
राव म्हणे मुने, प्रकृतिपुरुष । अनादि उभय अनंतही ॥ ४ ॥
ऐसें असूनीही भेद कां तयांत । दैवतें देहांत कोण सांगा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मृत्यूचिन्हें तींही । ऐकूनियां घ्यावीं कथिती मुनि ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३१४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १४१ समाप्त

अध्याय ३१५ वा ७३०

मुनि म्हणे राया, प्रकृति सगुण । पुरुष निर्गुण भेद तेणें ॥ १ ॥
पुरुषसान्निध्यावांचूनि प्रकृति । असमर्थ जगीं सकल कार्या ॥ २ ॥
यास्तव मानिती आत्म्यालागीं कर्ता । साक्षी प्रकृतीच्या कार्यासी तो
अभिमानें तया होई सुखदुःख । असूनि निर्लेप निर्विकार ॥ ४ ॥

मशकोदुंबर तेंवी जलमत्स्य । अग्नि आणि कुंड एक नोहे ॥ ५ ॥
तैसाचि प्रकृति-पुरुषांत भेद । ज्ञाता हें सहज ध्यानीं घेई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सांख्यांचें हें तत्व । ऐका आतां योग कथिती मुनि ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३१५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १४२ समाप्त

अध्याय ३१६ वा

७३१

सांख्यासम ज्ञान योगासम शक्ति । नसेचि त्रिलोकीं निश्चय हा ॥१॥
शमादि साधनें शास्त्रीं या सामान्य । मोक्षद हीं जाण उभय शास्त्रें ॥
एकचि हीं दोन्हीं जाणती जे तेचि । ज्ञाते या जगतीं इतर मूढ ॥३॥
इंद्रियें तैं प्राण साधनें योगाचीं । अष्टसिद्धि योगी संपादिती ॥ ४ ॥
अष्टांग तो योग सगुण निर्गुण । प्राण नियमन सगुण तो ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मन निर्व्यापार । करणें तो थोर निर्गुणयोग ॥ ६ ॥

७३२

संधिकालीं योग्य अभ्यास साधावा । यथाक्रम व्हावा लययोग ॥१॥
अंतीं सनातन शुद्ध कूटस्थांत । होऊनियां स्थित शांत व्हावें ॥ २ ॥
समाधान वृत्ति होई तैं योग्याची । निवातस्थळींची ज्योति जेंवी ॥
अविचलता ते विमुक्ताची खूण । भय कंपादि न शस्त्रेंही त्या ॥ ४ ॥
ऐसी एकाग्रत्वें समाधि जयासी । साक्षात्कार त्यासी निश्चयानें ॥५॥
वासुदेव म्हणे ऐसे कृतकृत्य । साधिती जे योग तेचि धन्य ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३१६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १४३ समाप्त

अध्याय ३१७ वा

७३३

राया, हठयोगी पावती जे गति । निवेदितों तेचि मरणद्वारा ॥ १ ॥
पदांतूनि प्राण जातां विष्णुलोक । तेंवी वसुलोक जंघेतूनि ॥ २ ॥
जानुद्वारा जातां साध्यलोकप्राप्ति । गुदद्वारा प्राप्ति सूर्याची त्यां ॥३॥
तत्तदवयवदेवतांचे लोक । प्राण जातां देख त्या त्या मार्गें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे आतां मृत्युचिन्हें । कथिती तें घ्यावें ध्यानीं मुनि ॥

७३४

अरुंधती ध्रुव दिसती न ज्यातें । दीप चंद्र ज्यातें दिसती छिन्न ॥

अन्य नेत्रीं निज बाहुली न दिसे । आयुष्य तयाचें एक वर्ष ॥ २ ॥
बुद्धि तेज ज्याचें क्षय वृद्धि पावे । देव-ब्राह्मणांतें अवमनी जो ॥ ३ ॥
कृष्णवर्ण किंवा पांडुता जयासी । आयुष्य तयासी षण्मासचि ॥ ४ ॥
सूर्य-चंद्राबिंब दिसे छिद्रयुक्त । गाभाऱ्यांत प्रेतगंध जया ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सप्तदिन मात्र । आयुष्य तयास निश्चयानें ॥ ६ ॥

७३५

नासिका-कर्णाचें पतन वा दंत । नेत्रांचा कीं रंग पालटणें ॥ १ ॥
बुद्धिनाश उष्मारहित्य ही खूण । त्याच दिनीं जाण सुचवी मृत्यु ॥
वामनेत्रांतूनि जलाचा प्रवाह । मस्तकीं वा धूर निघणें राया ॥ ३ ॥
तत्काळ मरणसूचक हीं चिन्हें । जाणूनि राहणें सावधान ॥ ४ ॥
विषयत्यागूनि व्हावें चिरंजीव । व्हावें एकजीव परमात्म्यासी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सांख्यशास्त्रवेत्ता । पावे मोक्षपदा आचारें त्या ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ.३१७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१४४ समाप्त

अध्याय ३१८ वा

७३६

प्रकृतिस्थित जें काय तें ऐकावें । आराधिलें भावें सूर्यासी मी ॥ १ ॥
प्रसन्न होऊनि माग म्हणे वर । तया यजुर्वेद मागितला ॥ २ ॥
सूर्यकृपेनें तें देवी सरस्वती । प्रवेशली मुखीं सदयतेनें ॥ ३ ॥
दाह तयावेळीं जाहला अंगाचा । आश्रय जलाचा केला तदा ॥ ४ ॥
कृपेनें सूर्याच्या पुढती झालों शांत । येवो यजुर्वेद वदला सूर्य ॥५॥
वासुदेव म्हणे बोलूनि आदित्य । जाहला अदृश्य मुनि म्हणे ॥ ६ ॥

७३७

पुढती येऊनि सदनीं । रमला शारदेच्या ध्यानीं ॥ १ ॥
देवी जाहली प्रगट । पूजियेलाही आदित्य ॥ २ ॥
शतपथ ब्राह्मणाचा । झाला साक्षात्कार तदा ॥ ३ ॥
आनंदा न उरली सीमा । खिन्न झाला मनीं मामा ॥ ४ ॥
शत शिष्यांसी पढवूनि । प्रमुख झालों जनकयज्ञीं ॥ ५ ॥
कदा जाहलें न तेंचि । ग्रंथकार्य झालें जगीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ईश । नेई सत्कृत्य सिद्धीस ॥ ७ ॥

७३८

ज्ञानें या सत्शिष्य झाले आनंदित । शाखा पंचदश ज्ञानासी या ॥१॥
परंपरा स्थैर्य योजूनियां अंतीं । परमार्थमार्गीं रमलों प्रेमें ॥ २ ॥
पुढती एकदां विश्वावसु येई । प्रश्न बहुत पाहीं करी मज ॥ ३ ॥
विश्वा अविश्व तें काय, म्हणे मज । अश्वा तेंवी अश्व काय म्हणे ॥
मित्र-वरुण तेंवी ज्ञान ज्ञेय पुशी । अज्ञज्ञ कोणासी म्हणती म्हणे ॥
वासुदेव म्हणे 'क' संज्ञा कोणातें । तपा अतपा ते पुशीतसे ॥ ६ ॥

७३९

सूर्यभक्षी कोण तैसा कोण सूर्य । विद्या कथीं मज अविद्याही ॥ १ ॥
वेद्य अवेद्यही निवेदीं तो म्हणे । चलाचलज्ञानें तोष देई ॥ २ ॥
अपूर्व, अक्षय्य, क्षय्यही कथावें । पुशिले गंधर्वें प्रश्न ऐसे ॥ ३ ॥
ऐकूनि ते श्रेष्ठ प्रश्न गंधर्वासी । वदलों अवधि देई मातें ॥ ४ ॥
बोलूनियां ऐसें प्रार्थिलें देवीसी । उत्तरें प्रश्नांचीं सुचलीं तदा ॥५॥
वासुदेव म्हणे नवनीत क्षीरीं । तैसेंच अंतरीं स्फुरे ज्ञान ॥ ६ ॥

७४०

विश्वावसूप्रति उत्तरें पुढती । दिधलीं ऐकें तीं कथितों तुज ॥ १ ॥
विश्वा ते प्रकृति, निर्मी जो विश्वासी । जाणें, अविश्वचि पुरुष साक्षात्
अश्वाअश्वही ते प्रकृति-पुरुष । मित्र वरुण तो याचि अर्थें ॥ ३ ॥
जीव तोचि अज्ञ, ज्ञचि तो ईश्वर । यदा निरुपाधिक ब्रह्म तेंचि ॥४॥
'क' तोचि आनंद तपा अतपाही । प्रकृति जाणावी पुरुष तेंवी ॥५॥
अवेद्य प्रकृति पुरुष तो वेद्य । चल तें अचल याचिअर्थें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अपूर्व अक्षय्य । प्रकृति-पुरुष हाचि भाव ॥ ७ ॥

७४१

गंधर्वा, यदर्थ वेदांची प्रवृत्ति । ज्ञान तें न ज्यांसी श्रम तयां ॥ १ ॥
गर्दभीदुग्धाचें मंथन तें जाण । वेद्यावेद्यज्ञान नसे ज्यांसी ॥ २ ॥
प्रकृतिपुरुष जाणावे यास्तव । चुकेल हा भव त्याचि ज्ञानें ॥ ३ ॥
चिंतूनियां नित्य होई जो निःशंक । जीवशिवां ऐक्य पावेल तो ॥४॥
वासुदेव म्हणे ऐक्यबोधाविण । निरर्थक ज्ञान सकल जगीं ॥ ५ ॥

७४२

विश्वावसु म्हणे याज्ञवल्क्याप्रति । कथिलें पुरा हेंचि परी गूढ ॥१॥
जैगीषव्यादीही निवेदिती हेंचि । प्रभो, तुम्हीं तेंचि निवेदावें ॥ २ ॥
साक्षात् आदित्य तो प्रसन्न आपणा । कथूनियां ज्ञाना तोषवावें ॥३॥
प्रकृतीसी जीव जाणे, न प्रकृति । जडत्वें जीवासी जाणे कदा ॥४॥
जीवात्मा प्रतिबिंब प्रकृतीचे ठाईं । प्रधान संज्ञाही तिज तेणें ॥ ५ ॥
साक्षित्वही त्यागी म्हणे वासुदेव । जीवचि तैं शिव होत असे ॥६॥

७४३

परमात्मबोध जीवासी जैं नसे । स्वयेंचि श्रेष्ठत्वें मिरवी तदा ॥ १ ॥
चतुर्विंशति जीं तत्वें तोचि जीव । ऐसें मानी मूढ मिथ्याज्ञानें ॥२॥
उदकींच मत्स्य परी न उदक । तेंवी प्रकृतींत आत्मा भिन्न ॥ ३ ॥
प्रकृतिस्नेहानें होऊनियां भ्रांत । स्वरूपावबोध न होई त्या ॥ ४ ॥
प्रकृतिपुरुषभेदज्ञान यदा । कृतार्थता तदा जीवाप्रति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चोवीस तत्वें तीं । प्रकृति जीवही पुढती ब्रह्म॥ ६ ॥

७४४

ब्रह्मदृष्ट्या जीव विनाश्यचि पाहीं । ब्रह्मरूपीं नाहीं जीवभाव ॥ १ ॥
अप्रतिबुध्य ते प्रकृति जाणावी । बुध्यमान होई जीव तेणें ॥ २ ॥
परमात्मा तोचि बुद्ध हें कथिलें । पश्यापश्य झाले एकरूप ॥ ३ ॥
पश्य तोचि द्रष्टा अपश्य तें दृश्य । जीवा केवलत्व ऐक्यें त्यांच्या ॥
जीवन्मुक्त ऐसें परमात्मरूप । असूनि सदेह व्यापकचि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जीव शिव तोचि । ऐक्यबोधें त्यासी भेद नसे ॥ ६ ॥

७४५

विश्वावसु ऐसा होऊनि संतुष्ट । सकल लोकांत निवेदी हें ॥ १ ॥
तात्पर्य ज्ञानार्थ सर्वदा झटावें । सत्पात्र जाणावे सर्व एथ ॥ २ ॥
ब्रह्मापासूनीच ब्राह्मण क्षत्रिय । तेंवी वर्ण सर्व ध्यानीं असो ॥ ३ ॥
यास्तव सर्वही मोक्षाचे अधिकारी । जाणूनि अंतरीं करणें यत्न ॥
वासुदेव म्हणे याज्ञवल्क्यउक्ति । ऐकूनि जनकासी तोष वाटे ॥५॥

७४६

धर्माधर्म पापपुण्यही त्यागूनि । केवळ चिंतनीं जनक रमे ॥ १ ॥

निवेदिती भीष्म धर्मा, ब्रह्माहूनि । श्रेष्ठ न जाणूनि अन्य कांहीं ॥२॥
ब्रह्मचिंतनींचि रमें तूं सर्वदा । जया ध्यास ज्याचा प्राप्त तेंचि ॥३॥
ऐसें बहुश्रेष्ठ यज्ञाहूनि ज्ञान । धर्मा, ज्ञानयज्ञ अंगिकारीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे शाश्वत तें ज्ञान । जनकापासून भीष्मा प्राप्त ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३१८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १४५ समाप्त

अध्याय ३१९ वा ७४७

धर्म म्हणे सर्व वैभव जयासी । जरा मृत्यु त्यासी टळती केंवी ॥१॥
निवेदिती भीष्म भिक्षु पंचशिख- । जनक संवाद तदा धर्मा ॥ २ ॥
पंचशिख म्हणे निवृत्तिमार्गानें । जनन-मरणें मुक्त जीव ॥ ३ ॥
कालप्रवाहीं या वाली नसे कोणी । क्षणिकचि जनीं संगती हे ॥ ४ ॥
भार्यापुत्रसंग शाश्वत न कोणा । मेघांसम जाणा संगती हे ॥ ५ ॥
कोण मी कोणाचा कोठें जावयाचें । कांहींचि जीवातें ज्ञात नसे ॥
मग कासयाचा शोक वासुदेवा । सत्कर्मं कंठावा सकल काल ॥७॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३१९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १४६ समाप्त

अध्याय ३२० वा ७४८

धर्म म्हणे ताता, संन्यासावांचूनि । मुक्त कोण जनीं निवेदा तें ॥
स्थूल सूक्ष्म देह त्यागावा हा केवीं । तैसीच वर्णावी मोक्षस्थिति ॥
निवेदिती भीष्म जनककुळांत । पुरा धर्मध्वज नामें राव ॥ ३ ॥
नीति, वेद, मोक्षशास्त्रीं तो प्रवीण । जनीं तया धन्य म्हणती लोक॥
जगत्संचारांत सुलभा भिक्षुकी । ऐके त्याची कीर्ति मोक्षधर्मी ॥५॥
वासुदेव म्हणे भेटावें जनका । चिंतूनि सुलभा ठरवी तैसें ॥ ६ ॥

७४९

झाली लावण्यसंपन्न । योगबळ स्वीकारून ॥ १ ॥
आली विदेहनगरीं । प्रवेशली नृपमंदिरीं ॥ २ ॥
पाहूनियां तिजसी राव । मानी मनांत विस्मय ॥ ३ ॥
हर्षे सन्मानी तियेसी । अर्पी सुग्रास अन्नासी ॥ ४ ॥
बहुत असतां विद्वज्जन । सुलभा करी नृपा प्रश्न ॥ ५ ॥

योगसामर्थ्यें नृपाची । व्यापियेली सर्व बुद्धि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गर्व । होता योगाचा नृपास ॥ ७ ॥

७५०

योगबळें आतां शोधील हे वाणी । अंतरीं जाणूनि सिद्ध राव ॥ १ ॥
पुढती योगानें एकाचि देहांत । जाहला संवाद उभयांचा ॥ २ ॥
कोठें घेतलीस दीक्षा म्हणे राव । काय हेतु तव जासी कोठें ॥ ३ ॥
अध्ययन वय जातही स्वयेंचि । कथावी तेव्हांचि सकलां कळे ॥४॥
राजचिन्हांचा न लोभ मजलागीं । सकल निवेदीं वृत्त तव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे निवेदी जनक । निज मोक्षपंथ अत्यानंदें ॥ ६ ॥

७५१

म्हणे पंचशिख ज्ञानगुरु माझा । संशय न आतां उरला कांहीं ॥१॥
चातुर्मास्य एथें राहिला तो ज्ञाता । महद्भाग्यें माझ्या एकावेळीं ॥२॥
राजनीति सांख्ययोगही तयानें । निवेदिले प्रेमें अत्यानंदें ॥ ३ ॥
तदा प्रभृति मी झालों खरा राजा । न वरितां संन्यासा कृतार्थत्व ॥
ज्ञान वैराग्य तैं योग हीं साधनें । प्राप्त यथाक्रमें तेणें मज ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे साधनें हीं सिद्ध । होती ज्या तो मुक्त याचि देहीं ॥

७५२

असंग मी सदा व्यवहारामाजी । द्वंद्वें न बाधती तेणें मज ॥ १ ॥
सुक्षेत्रींही दग्धबीजा न अंकुर । वासना समग्र तैंवी माझ्या ॥ २ ॥
प्रियाप्रिय तेणें नसे मज कांहीं । सर्वदा विषयीं असूनीही ॥ ३ ॥
चंदन चर्चितां कोणी एका करा । छेदितां दुसरा समचि मज ॥ ४ ॥
मृत्तिका पाषाण अथवा सुवर्ण । सकलही सम मजलागीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे यापरी जनक । निजस्थिति स्पष्ट कथन करी ॥ ६ ॥

७५३

कर्म उपासना ज्ञान कोणा मार्ग । ज्ञाननिष्ठा मात्र कोणा एक ॥ १ ॥
कर्म गौण, ज्ञान प्रधान कोणासी । प्राधान्य कर्मासी म्हणती अन्य ॥
पंचशिख परी निवेदिती मज । शमदमयुक्त यतीचि तो ॥ ३ ॥
वेषें मात्र यति, यति न ते जाण । चिन्हें न प्रधान, वृत्ति मुख्य ॥

आसक्तीचि नित्य बंधासी कारण । चित्तनिर्वासन आवश्यक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अल्पत्व बहुत्व । पदार्थाचें तेथ मूळ नसे ॥ ६ ॥

७५४

आश्रमत्यागानें नसे संगत्याग । चित्त अनासक्त होतां कार्य ॥ १ ॥
आशीर्वाद शाप यतींचें तें बल । निग्रहानुग्रह नृपाळाचें ॥ २ ॥
राज्य वा संन्यास मोक्षा न कारण । आवश्यक ज्ञान तेथ एक ॥३॥
श्रीमंत वा दीन ज्ञानी तोचि मुक्त । व्यवहारबद्ध मुक्तचि मी ॥ ४ ॥
मोक्षशास्त्रशाणीं[1] पाजळिलें शस्त्र । असंग कीं त्याग एतद्रूप ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐशा शस्त्रें राजा । छिन्न राज्यपाशां केलें म्हणे ॥६॥

७५५

पाहूनि तुजसी वाटला आदर । परी नच स्थिर राहिला तो ॥ १ ॥
योगिनी तूं कैसी लावण्यसंपन्न । कृशत्व लव न तव देहीं ॥ २ ॥
दीक्षेच्या विरुद्ध वागसी तूं कैंवी । कासयासी हवी परीक्षा हे ॥३ ॥
क्षत्रिय मी, विप्रकन्या तूं कां ऐसी । हृदयीं वससी माझ्या सांगें ॥
मजसवें कैंवी संगत तूं ऐसी । अधर्में झालीसी न कळे मज ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे योगिनीसी राजा । म्हणे स्वैरिणीचा वरिसी पंथ ॥६॥

७५६

विजयइच्छेनें मांडिलासे वाद । फेंकिसी कटाक्ष सभेवरी ॥ १ ॥
असहिष्णुताचि सिद्ध होई तेणें । अयोग्य करणें सकल तव ॥ २ ॥
असक्त-विरक्तसंयोग तें विष । उभय आसक्त असतां सुधा ॥ ३ ॥
ओळखिलें तुज नसे कांहीं गुप्त । अंतरीं कपट वसे तुझ्या ॥ ४ ॥
राजबल सत्ता, विप्रबल तेज । आकर्षक रूप तरुणीबल ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कापट्यें भेटतां । विनाशचि साचा होत असे ॥ ६ ॥

७५७

यास्तव कथावें वृत्त तव मज । म्हणे योगिनीस राव तदा ॥ १ ॥
ऐकूनि नृपाची निर्भर्त्सनावाणी । बोलली योगिनी मधुर वाक्यें ॥२॥
नृपाळा, शास्त्रोक्त भाषणाचा क्रम । कथितें ऐकून घेई आतां ॥ ३ ॥

१ सहाणेवर

वाणी बुद्धीचे ते अष्टादश दोष । गुण अष्टादश ध्यानीं ध्यावे ॥ ४ ॥
सौक्ष्म्य सांख्यक्रम निर्णय, पंचम- । जाणें प्रयोजन भाषणीं ज्या ॥
भाषण तें राया, बोलली सुलभा । हर्ष वासुदेवा ऐकूनियां ॥ ६ ॥

७५८

संदेहकारक अर्थ तोंचि सौक्ष्म्य । गुणदोष गणन तेंचि सांख्य ॥ १ ॥
गणनें त्या शब्दयोजना तो क्रम । स्थिरप्रतिपादन निर्णय तो ॥ २ ॥
रागद्वेषें वृत्तिचांचल्य वक्त्याचें । प्रयोजन त्यातें म्हणती बुध ॥ ३॥
पदसमूह जो पंचांगसंयुक्त । ज्ञाते तेंचि वाक्य म्हणती राया ॥ ४ ॥
ऐसें मम वाक्य ऐकें आतां नृपा । अर्थपरिपूर्णता जयामाजी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अभिन्नार्थ न्याय्य । संक्षिप्त कोमल वाक्य ऐका ॥६॥

७५९

स्पष्ट श्रेष्ठ मृदु अक्षरसंयुक्त । ग्राम्यजनां सौख्य नसे जेथें ॥ १ ॥
अमंगल ग्राम्य अश्लीलता जेथें । भाषण तें रुचे सामन्यांसी ॥ २ ॥
शास्त्राविरोधी तें आधारसंयुक्त । भाषा न प्राकृत जयामाजी ॥ ३ ॥
न्यून कष्टप्रद अध्याहृत शब्दें । संयुक्त तें नसे वाक्य माझें ॥ ४ ॥
राजा, युक्तिशून्य नसेल तें जाण । कथी तें भाषण वासुदेव ॥ ५ ॥

७६०

काम, क्रोध, भय, लोभ, दैन्य, दर्प । लज्जा कृपा तेथ अभिमान न॥
ऐसें बुद्धिदोषहीन मम वाक्य । राजा, निर्णायक ऐकें आतां ॥ २ ॥
वक्ता, श्रोता, वाक्य सिद्धान्तानुकूल । तदाचि सकल अर्थबोध ॥
दुर्लक्षूनि श्रोत्यां आपुलेंचि कथी । वक्ता अयशस्वी जाणावा तो ॥
दुर्लक्षूनि स्वार्थ तोषवी श्रोत्यासी । भ्रम अंतरासी त्याच्या वाक्यें ॥
उभयार्थवेत्ता तोचि राया वक्ता । वासुदेवचित्ता मोद होई ॥ ६ ॥

७६१

राया, कोण मी हें ऐकें । निवेदितें शांतचित्तें ॥ १ ॥
काष्ठ पांसु आणि जतु । एकत्र जैं जलबिंदु ॥ २ ॥
प्राणिउत्पत्ति तैसीच । भिन्न विषय एकत्र ॥ ३ ॥
पुशितां तयां कोण तुम्हीं । पातलांती कां या स्थानीं ॥ ४ ॥

तरी उत्तर तयांसी । देतां येईना कदापि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जड । कैसे बोलतील शब्द ॥ ६ ॥

७६२

काष्ठक्रीडनकामाजी जत्वादिक । नांदती एकत्र तेंवी देहीं ॥ १ ॥
चिज्जडसंयोग जाहलासे पाहीं । चिदंशें हा जरी प्रश्न तव ॥ २ ॥
तरी जें तुझ्यांत तेंचि माझ्या ठाईं । वर्णवे न पाहीं कवणासी तें ॥
इंद्रियांशें जड अशक्य उत्तर । अथवा सर्वत्र समचि तीं ॥ ४ ॥
संघातासी जरी प्रश्न असे तव । नाहीं अनन्यत्व मत्संघातीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आपुलें आपणा । स्वरूप नयनां न दिसे कदा ॥ ६ ॥

७६३

योजिलें जयां जें तेंचि तयां शक्य । अन्यांचें अशक्य कार्य त्यांसी ॥
केवळ तयांचा संयोगही व्यर्थ । तेंवी परतंत्र्य विषयांच्या तीं ॥ २ ॥
प्रकाशींच रूप पाहूं शके नेत्र । केवळ प्रकाश तोही व्यर्थ ॥ ३ ॥
मनाविण होई त्रिकुटही व्यर्थ । मनही स्वतंत्र नसे राया ॥ ४ ॥
घटबोधार्थ त्या चक्षू आवश्यक । संदेह त्या नित्य तैशापरी ॥ ५ ॥
बुद्धीचें त्या साह्य आवश्यक होई । स्वतंत्र न तेही नृपश्रेष्ठ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सत्वासम बुद्धि । श्रेष्ठ कनिष्ठही संज्ञा पावे ॥ ७ ॥

७६४

अल्पसत्व महासत्व सत्वासम । नृपा, बुद्धिहीन स्वतंत्र ते ॥ १ ॥
सत्वाच्याहीमागें जाणें अहंकार । ममत्वादि भाव जयायोगें ॥ २ ॥
आधार तयासी जाणें हे वासना । अविद्या वासनामूळ असे ॥ ३ ॥
जगद्वृक्षबीज जाणावी अविद्या । सन्निध तियेच्या प्रकृति ते ॥ ४ ॥
द्वंद्वयोग तयां पैलीकडे असे । आधार तयातें काल राया ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे काल तोचि जीव । तोचि कृतादिक वासनेनें ॥ ६ ॥

७६५

जन्म मृत्यु राया, घडे या कालानें । विंशति संख्य हे तेंवी भूतें ॥
वस्तुप्रकाशक सद्भावासद्भाव । धर्माधर्म, शुक्र, बल, तेंही ॥ २ ॥
वासना बीज ते जाणें धर्माधर्म । वासना स्फुरण शुक्रें होई ॥ ३ ॥

---

१ १६ कला, माया, प्रकाश, द्वंद्वं, व काल असे वीस

वासनापूर्त्यर्थ यत्न तेंचि वल । ऐसें हें शरीर त्रिंशत्‌रूप ॥ ४ ॥
अव्यक्त प्रकृति गुणांसी या मूळ । रायातें कपिल म्हणती ऐसें ॥५॥
वासुदेव म्हणे मनें भिन्न भिन्न । जगासी कारणरूप ऐका ॥ ६ ॥

७६६

भूतचतुष्टय परमाणुकारण । चार्वाक कथन करिती ऐसें ॥ १ ॥
कणादानुयायी परमाणु कालादि । कारण जगासी निवेदिती ॥ २ ॥
माया ईश्वर तैं अविद्या जीवांसी । कारण मानिती कोणी ज्ञाते ॥३॥
सिद्धान्ती कथिती प्रकृति कारण । प्रकृतीचे गुण कथिले जे ते ॥४॥
प्रकृतीचि करी मी तूं ऐसा भाव । प्रश्न तेणें तव न्याय्य नसे ॥५॥
वासुदेव म्हणे शुक्र-शोणिताचा । परिणाम साचा सुलभा कथी ॥६॥

७६७

जन्मतांचि होई नाम-रूपप्राप्ति । पुत्र कन्या ऐसी संज्ञा, चिन्हें ॥ १ ॥
बाल्यापासूनियां वार्धक्यापर्यंत । देहांत पालट क्षणोक्षणीं ॥ २ ॥
अत्यंत सुक्ष्मत्वें येई न ध्यानांत । प्रतिक्षणीं नष्ट दीपज्योति ॥ ३ ॥
उत्पत्ति, विनाश होई प्रतिक्षणीं । अखंड तो जनीं परी भासे ॥ ४ ॥
तैसेंचि शरीर क्षणोक्षणीं भिन्न । तेणें तव प्रश्न योग्य नव्हे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आपुलें शरीर । तेंही क्षणभंगुर नसे माझें ॥ ६ ॥

७६८

काष्ठमंथनें जैं अग्निसमुद्भव । तैसेंचि हें विश्व त्रिंशत्तत्वें ॥ १ ॥
आत्मसदृश कां मानिसी न मज । असतां समत्व भेद कां हा ॥ २ ॥
भेदामाजी काय मुक्ताचें लक्षण । पुरुषार्थ मिश्रण प्रतिकर्मीं ॥ ३ ॥
ज्ञान हें न जया आसक्ति तयासी । मुक्तचिन्हें कैसीं तया ठाईं ॥ ४ ॥
यास्तव नृपाळा, मुक्त हा अभिमान । व्यर्थ दे टाकून अंतरींचा ॥५॥
पथ्य न करी त्या औषधानें काय । म्हणे वासुदेव पुढती ऐका ॥६॥

७६९

आत्म्यांत पहावीं दारा पुत्रादिक । मन हें आसक्त जेथ होई ॥ १ ॥
भोग भोजन तें शयनाच्छादन । आसक्तीचे जाण विषय अन्य ॥ २ ॥
राज्यामाजी तुझ्या प्रवेशल्यें केंवी । पृच्छा हे तवही असमंजस ॥

धरणी, नगर, मंदिरांतःपुर । पर्यङ्कही सर्व नसे तव ॥ ४ ॥
तात्पर्य अल्पचि अंश या पृथ्वीचा । सार्वभौम राजा उपभोगी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सर्वही ऐसेंचि । हांव मात्र मोठी मानवातें ॥ ६ ॥

७७०

परतंत्र राजा सकल विषयीं । आज्ञेचेंही नाहीं स्वातंत्र्य त्या ॥ १ ॥
आज्ञेची प्रत्यक्ष क्रिया परतंत्र । कारितील सेवक तेंचि घडे ॥ २ ॥
कामकाजपूर्ण झाल्यावीण तया । लाभेनाचि निद्रा ऐसी स्थिति ॥ ३ ॥
बंदीजन गीतें गातांचि प्रभातीं । उठणें प्राप्तचि कार्यास्तव ॥ ४ ॥
स्नान खान पान यजनादि सर्व । क्रिया परतंत्र नृपाळाच्या ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दानें कोशक्षय । अदानेंही होय अपकीर्ति ॥ ६ ॥

७७१

पारतंत्र्य ऐसें प्रतिक्रियेमाजी । चिंतितां नृपाची मति भ्रष्ट ॥ १ ॥
संशय सर्वत्र राखावा त्या लागे । सर्वदा तयातें असे भय ॥ २ ॥
राजा, गृहधनी राजाचि गृहींचा । निजगृहीं शास्ता स्वातंत्र्यानें ॥ ३ ॥
गृह दारा धन कोशही सामान्य । गृहस्थ नृप न भिन्न ऐसे ॥ ४ ॥
लाभ हानि सुख-दुःखही समान । आधिव्याधि सम उभयांप्रति ॥
वासुदेव म्हणे अधिकचि दुःख । राजातें, गृहस्थ बहु सुखी ॥ ६ ॥

७७२

राजा क्षणिक हा पाण्याचा बुडबुडा । असार पसारा या राज्याचा ॥
त्रिदंड ते जैसे परस्पराधीन । राज्य मंत्र्याधीन तैशापरी ॥ २ ॥
ऐश्वर्याचे ऐसे बहु वांटेकरी । कां मग अंतरीं गर्व व्हावा ॥ ३ ॥
अमर्याद पृथ्वी राजेही बहुत । मीचि राजा व्यर्थ गर्व ऐसा ॥ ४ ॥
शुद्ध राजसत्ता धर्मातें संरक्षी । धर्मेंचि मोक्षश्री हातीं येई ॥ ५ ॥
राजा राज्य दोन्हीं, धर्मेंचि पावन । अश्वमेधपुण्य सुराज्यानें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सुलभेची वाणी । पुढती घ्या ऐकूनि सुधेसम ॥ ७ ॥

७७३

प्रवेशूनि तुझ्या देहीं । झाल्यें म्हणसी मी अन्यायी ॥ १ ॥
परी केलें देहांतर । आसक्ति न देहावर ॥ २ ॥
निजदेहाची हे स्थिति । काय परदेहासक्ति ॥ ३ ॥

श्रवण मननादि ध्यान । अपरोक्ष ब्रह्मज्ञान ॥ ४ ॥
पंचशिखांनीं दाविलें । निःसंगत्व तदा आलें ॥ ५ ॥
ऐसें मानितां छत्रादि । लक्षणांची कां आसक्ति ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐका । स्पष्ट कथी जें सुलभा ॥ ७ ॥

७७४

ऐकूनीही शास्त्र ऐकिलेंचि नाहीं । दंभचि तो पाहीं अथवा तव ॥१॥
अथवा ऐकिलें अन्यचि तें कांहीं । नामरूप पाहीं विकार ते ॥ २ ॥
असूनियां ऐसें नृपा, तूं आसक्त । ललनास्पर्शसौख्य रुचतें तुज ॥
वासनाबद्ध तूं पामरचि ऐसें । स्पष्ट प्रत्ययातें येई तेणें ॥ ४ ॥
सत्वें अंतरांत शिरतां मुक्तासी । पीडा काय त्याची केंवी होई ॥५॥
शून्यहृदयांत राहिलें मी जरी । काय दोष तरी नसतां ज्ञान ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे केवळ मनानें । केला योगिनीनें हृदयीं वास ॥ ७ ॥

७७५

वरें वाईटही राजा । कांहीं मनामाजी तुझ्या ॥ १ ॥
आलें तरी या सभेंत । उच्चारिसी केंवी सांग ॥ २ ॥
सदा जाणती कुलीन । भाषणाचें तारतम्य ॥ ३ ॥
कमलपत्रसा आलिप्त । असतां तुज स्पर्शभास ॥ ४ ॥
कैसा होई ज्ञानवंता । व्यर्थ व्यर्थ बोध तुझा ॥ ५ ॥
अर्धकच्चें ऐसें ज्ञान । तोचि वासुदेवा शीण ॥ ६ ॥

७७६

गार्हस्थ्यही गेलें मोक्ष तो दूरचि । त्रिशंकूची स्थिति झाली तव ॥
ज्ञात्यासी तो केंवी वर्णाचा संकर । प्रकृति पुरुष विभक्तचि ॥ २ ॥
देहात्म्यैक्यभाव संकर तयांसी । जयां आत्मबुद्धि आलिप्त ते ॥ ३ ॥
देहदृष्ट्याही मी क्षत्रियाचि राजा । जाणावें सुलभा नाम माझें ॥ ४ ॥
राजर्षिप्रधानवंशीं मम जन्म । थोर थोर यज्ञ केले तेणें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रत्यक्ष त्या यज्ञीं । देवेंद्र येऊनि हवि घेई ॥ ६ ॥

७७७

योग्य पतिलाभ जाहला न मज । तेणें मोक्षशास्त्र अभ्यासिलें ॥१॥
स्वीकारूनि यतिधर्मासी मी राहें । सर्वदा विचारें बोलतसें ॥ २ ॥

ज्यापरी बोलतें तैसेंचि वागतें । पातलें मी एथें विचारेंचि ॥ ३ ॥
मुक्त तूं कैसा तें पहावें ही इच्छा । पक्षातीत माझा वाद जाणें ॥४॥
सत्कार त्वत्कृत पाहूनि प्रसन्न । जाहलें मी स्थान दिसलें योग्य ॥
संन्यासधर्मे मी एथ एक रात्र । करूनियां वास क्रमीन पंथ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सुलभावचनें । अंतरीं नृपानें वरिली शांति ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ.३२० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१४७समाप्त

अध्याय ३२१ वा

७७८

धर्म म्हणे कैंवी शुकासी वैराग्य । ऐकावा वृत्तांत ऐसें वाटे ॥ १ ॥
व्यक्ताव्यक्त बोध ताता, करा मज । बुद्धीचें स्वरूप तेंही कथा ॥ २ ॥
जन्मविरहित नारायणलीला । ताता, कथन करा प्रेमें मज ॥ ३ ॥
निवेदिती भीष्म शुकालागीं व्यास । म्हणती बुद्‌बुद देह जाण ॥ ४ ॥
वृक्षावरी शुक तैसा जीव देहीं । उडूनि तो जाई नकळे कदा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अळवाचें पाणी । तैसा संग जनीं कथिती व्यास ॥

७७९

बाळा, कामादिक सर्वदा जागृत । कैंवी घेसी झोंप निर्भयत्वें ॥ १ ॥
पाहती ते संधि जाणसी न कैंवी । वय क्षीण होई क्षणोक्षणा ॥ २ ॥
देव-गुरुशोध घ्यावासा न वाटे । तुज अद्यापि हें आश्चर्येंचि ॥ ३ ॥
सांसारिक गोष्टी रुचती नास्तिका । विश्वास न त्याचा पुनर्जन्मीं ॥
धर्मद्रोह्यांचिया अनुयायांतेंही । पीडा अंतीं होई ध्यानीं असो ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ज्ञात्याचा उपदेश । ऐकूनि चित्तास आंवरावें ॥ ६ ॥

७८०

पुढील विचार न करितां कांहीं । उच्छृंखल होई चित्त ज्याचें ॥ १ ॥
कर्मभूमीसी ते जाणती न मूढ । यथाक्रम मोक्ष गांठीं धर्में ॥ २ ॥
कोशाकीटासम गुंतसी तूं कर्मीं । येई नच ध्यानीं परी तुझ्या ॥ ३ ॥
अनिर्बंध पुरासम अमर्याद । वेणूसम तांठ नास्तिक जो ॥ ४ ॥
वाऱ्यासीही त्याच्या जाऊं नये कदा । जाई योगनौकाश्रयें पार ॥५॥
वासुदेव म्हणे जरा-मृत्युग्रस्त । जीव हे समस्त तरती धर्में ॥ ६ ॥

७८१

सर्वकाळ मृत्यु जीवाच्या पाठीशीं । वृक अजाप्रति तैशापरी ॥ १ ॥
लौकिकसौख्यांत लिप्तावरी झेंप । घेई अकस्मात न कळे केव्हां ॥
संसारांधकारीं धर्मदीपज्योति । प्रदीप्त साधकीं करणें नित्य ॥ ३ ॥
बहु योनींमाजी हिंडतां भाग्यानें । लाभतो जीवातें नरजन्म ॥ ४ ॥
सुदुर्लभ जाणें ब्राह्मण्य त्यांतही । वासुदेव घेई लाभ याचा ॥ ५ ॥

७८२

लौकिक सुखार्थ नसे विप्रदेह । तपार्थ असह्य घ्यावे क्लेश ॥ १ ॥
बहुत तपानें ब्राह्मण्य लाभतें । अविश्रांत तेथें घ्यावे श्रम ॥ २ ॥
आयुष्यअश्व हा धांवे क्षणक्षणां । साधावें कल्याणा संतवाक्यें ॥
अधार्मिका क्लेश होती यमलोकीं । धार्मिकासी अंतीं सौख्यलाभ ॥
माता पिता गुरु वडिलांची आज्ञा । पाळी न यातना तयालागीं ॥५॥
वासुदेव म्हणे शुकालागीं व्यास । म्हणती सावध त्वरित होईं ॥ ६ ॥

७८३

चोर, राजाही न लुटूं शके ज्यातें । विद्याधन ऐसें त्वरित जोडीं ॥
स्वकष्टार्जित तें तेणें एकाचेंचि । विभाग त्यामाजी कवणाचा न ॥२॥
अविनाशी धन संपादावें नित्य । परलोकीं साह्य नसे कोणी ॥ ३ ॥
शुभाशुभ कर्मे येतील सांगातीं । रत्नसुवर्णादि एथेंचि तीं ॥ ४ ॥
आत्मा, अग्नि, सूर्य, वायू अहोरात्र । साक्षी त्वत्कर्मास यमादिक ॥
वासुदेव म्हणे करावें जें जेणें । भोगावें तें तेणें नियम ऐसा ॥ ६ ॥

७८४

पंचविंशति वर्षांचें । वय, जाहलेंसे तुझें ॥ १ ॥
धर्मसंचयाचा यत्न । करीं आळस त्यागून ॥ २ ॥
खडबडून होईं जागा । जाण मार्गीं तूं एकटा ॥ ३ ॥
मागेंपुढेंही न कोणी । पुत्रदारादिक जनीं ॥ ४ ॥
साह्य एकमेव धर्म । कठोर जैं होई यम ॥ ५ ॥
धर्मज्ञानें ज्ञान लाभे । जेणें मोक्षमार्ग जोडे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बोध । करितां कृतज्ञा सार्थक ॥ ७ ॥

७८५

एकांतवासचि ज्ञानियासी रुचे । द्रव्य-बांधवांचें काय काम ॥ १ ॥
निश्चयें मरण जरी तुजलागीं । तरी आत्मशोधीं दंग होईं ॥ २ ॥
उद्यांचें तें अद्य आजचें आतांचि । करावें, मृत्यूसी दया नसे ॥ ३ ॥
नास्तिकांचा संग सर्वथा त्यागूनि । स्वहितसाधनीं रत व्हावें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे अलौकिक धैर्यें । निजधर्मीं व्हावें दक्ष सदा ॥ ५ ॥

७८६

निजाश्रमधर्मीं रत होईं सुज्ञ । देहनाशानें न निजनाश ॥ १ ॥
धर्मभ्रष्ट तोचि मूर्ख ऐसें जाणा । धार्मिक शहाणा म्हणती ज्ञाते ॥
अविचल चित्त पुण्यकर्मा तोचि । मृत्यूचें तयासी भय नसे ॥ ३ ॥
असूनि विषयीं नित्य जो अलिप्त । तयासी अशक्य काय जगीं ॥४॥
आजवरी बहु झाले आप्तगोत । माझें न कोणीच मी न त्यांचा ॥५॥
वासुदेव म्हणे धनिकासी आप्त । दरिद्र्यासी तेच मृतासम ॥ ६ ॥

७८७

दारापुत्रांस्तव दुष्टकर्में वरी । क्लेशचि त्यापरी उभय लोकीं ॥ १ ॥
आपुल्याचि कर्में सुखदुःख जीवा । यास्तव वरावा धर्मपंथ ॥ २ ॥
माया-मोहरूप काहिलींत काल । प्राण्यां सर्वकाळ शिजवीतसे ॥३॥
दानेंचि तें धन, शत्रुतापें बल । धर्में वेदशास्त्र कृतार्थ तीं ॥ ४ ॥
दुष्कर्मनिवृत्ति बल न जयासी । मानव तयासी कोण म्हणे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे बोधानें या शुक । गुरुशोधा सिद्ध होत असे ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति अ. ३२१ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १४८ समाप्त

अध्याय ३२२ वा

७८८

दान यज्ञ तप तेंवी गुरुसेवा । महिमा कथावा धर्म म्हणे ॥ १ ॥
निवेदिती भीष्म पापीजनसंग । लाभतां प्रसंग पापाचाचि ॥ २ ॥
दारिद्र्यानें पाप पापानें दारिद्र्य । क्लेशामागें क्लेशपरंपरा ॥ ३ ॥
सुखामागें सुख पुण्यवंताप्रती । स्वर्गामागें त्यासी स्वर्गलाभ ॥ ४ ॥
फोल तें न धान्य झुरळें न पक्षी । तेंवी न पाप्यासी मनुज संज्ञा ॥
वासुदेव म्हणे धांवतांही नर । कर्म न साचार सोडी तया ॥ ६ ॥

७८९

छायेसम कर्म नरामागें जाण । योग्यकाळीं पुण्य-पाप फल ॥ १ ॥
दृश्य प्रेरणा न ऋतूंलागीं जरी । यथाकाल तरी पुष्पें फळें ॥ २ ॥
तेंवी लाभ-हानि मान-अपमान । करी पूर्वकर्म वेळ येतां ॥ ३ ॥
प्रतिपाऊलीं हा नियम जाणावा । नच दुर्लक्षावा कदा कोणी ॥ ४ ॥
बाल्य, तारुण्य वा वार्धक्यावस्थेंत । घडलें तैसेंच तदा लाभे ॥५॥
वासुदेव म्हणे वत्स जैं धेनूस । शोधी खिल्लारांत तैसें कर्म ॥ ६ ॥

७९०

मलिन वस्त्राची शुद्धि जैं उदकें । तैसे उपवासें पापी शुद्ध ॥ १ ॥
दीर्घकाल धर्म आचरितां पुण्य । तेणें सिद्धकाम होई नर ॥ २ ॥
नभामाजीं पक्षी हिंडतां न खूण । मत्स्यमार्गचिन्ह उदकीं नसे ॥३॥
तेंवी पुण्यगति न दिसे कोणासी । निंदितां अन्यासी काय लाभ ॥
दावितां अन्याच्या चुका काय लाभ । ज्ञाता साधी हित आपुलेंचि ॥
वासुदेव म्हणे आत्महितदक्ष । तोचि अन्यहित करूं जाणे ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३२२ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १४९ समाप्त

अध्याय ३२३ वा

७९१

पितामहा, कथीं शुकाची उत्पत्ति । निवेदा मजसी शुकमाता ॥ १ ॥
बालपणीं कैंवी ब्रह्मज्ञ ते झाले । नवलचि झालें जगीं एक ॥ २ ॥
निवेदिती भीष्म कारण या तप । न येई श्रेष्ठत्व वयानेंचि ॥ ३ ॥
मेरूच्या शिखरीं कर्णिकार वनीं । तपश्चर्या मुनि करिती व्यास ॥४॥
सामर्थ्यसंपन्न इच्छिती ते पुत्र । जाहल्या पिंगट जटा तपें ॥ ५ ॥
तपें त्या शंकर जाहले प्रसन्न । वर इच्छेसम दिधला व्यासां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे त्रिलोकीं प्रसिद्ध । ब्रह्मज्ञानी शुक तया वरें ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३२३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१५०समाप्त

अध्याय ३२४ वा

७९२

वरलाभ ऐसा होतां व्यासांप्रति । एकदां मंथिती अरणी मुनि ॥ १ ॥
घृताची त्या स्थानीं पातली अप्सरा । मोहित अंतरा करावया ॥२॥
मोहित मुनींसी पाहूनि ते मैना । होऊनि आश्रमा शोभवी त्या ॥३॥

कामवशं मुनि पावले स्खलन । अनावर काम होतां त्यांचा ॥ ४ ॥
उत्पत्ति त्या रेतें जाहली शुकाची । र लोपें शुक ही संज्ञा तया ॥
वासुदेव म्हणे गंगा तया न्हाणी । अर्पिला देवांनीं अजिनदंड ॥ ६ ॥

७९३

स्थावर-जंगमा आनंद त्या वेळीं । प्रेमें शिवपार्वती करिती मुंज ॥
वेदोपनिषदें जोडिती त्या हात । परी लौकिकार्थ गुरुगृह ॥ २ ॥
बृहस्पति गुरु शुकदेवांप्रति । प्रेमें शिकविती वेदशास्त्रें ॥ ३ ॥
अंतीं अर्पूनियां दक्षिणा गुरूसी । शुक स्वस्थळासी प्राप्त होई ॥ ४ ॥
गृहस्थादि मार्ग न रुचे तयातें । मोक्षधर्म त्यातें प्रिय होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सहजप्रवृत्ति । सात्त्विक, कृपा ती ईश्वराची ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३२४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १५१ समाप्त

अध्याय ३२५ वा ७९४

पुढती व्यासांतें निवेदिती शुक । ताता, ब्रह्मबोध व्हावा मातें ॥ १ ॥
योगादिक शास्त्रें पढवूनि व्यास । जनकाची भेट म्हणती घेई ॥ २ ॥
परी योगमार्गें जाई न त्या स्थानीं । प्रत्यक्ष चालूनि मार्ग जाई ॥ ३ ॥
तयास्थानीं राहीं पाळूनि मर्यादा । दावील मोक्षाचा मार्ग तोचि ॥
ऐकूनि पित्याचें वचन स्फूर्तीनें । मुनि आनंदानें क्रमिती पंथ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वनें, पुरें, मोह- । वारूनि, विदेहपुरीं येती ॥ ६ ॥

७९५

प्रमदावनांत नेई तयां मंत्री । वारांगना योजी सेवेप्रति ॥ १ ॥
आकर्षणें त्यांच्या चळली न बुद्धि । रागद्वेष चित्तीं शिरला नाहीं ॥
संध्यावंदनादि विधि आटोपूनि । प्रहर घेऊनि निद्रा एक ॥ ३ ॥
प्रमदाजनींचि बैसले ध्यानास । ढळलें न चित्त लवही परी ॥ ४ ॥
अंतःपुरीं ऐसी कंठिली रजनी । नत त्यां चरणीं वासुदेव ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३२५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १५२ समाप्त

अध्याय ३२६ वा ७९६

स्त्रियांसवें राव येई अन्यदिनीं । आदरें सन्मानी मुनींप्रति ॥ १ ॥
पुसोनि कुशल कारण भेटीचें । राव सन्मुनींतें पुशीतसे ॥ २ ॥



प्रमदाजनींचि बैसले ध्यानास । ढळलें न चित्त लवही परी ॥
अंतःपुरीं ऐसी कंठिली रजनी । नत त्यां चरणीं वासुदेव ॥ मोक्षधर्मपर्व अ. ३२५

अंतरांचा हेतु कथिती तें शुक । व्हावया निःशंक आलों एथें ॥ ३ ॥
विप्रधर्म मोक्षरहस्य कथावें । तेंवी निवेदावें साध्यनाम ॥ ४ ॥
तप ज्ञान किंवा मोक्षाचें साधन । वासुदेव प्रश्न मुनींचे कथी ॥ ५ ॥

७९७

आश्रमधर्मादि विप्राचीं कर्तव्यें । कथिलीं नृपानें शुकांप्रति ॥ १ ॥
आश्रयावांचूनि होतां कार्यसिद्धि । आवश्यकाचि कीं आश्रय ते ॥२॥
प्रश्न हा शुकांचा ऐकूनियां राव । त्रिविधप्रत्ययमहती कथी ॥ ३ ॥
शास्त्र, गुरु, आत्मप्रत्यय हे तीन । आवश्यक जाण राव म्हणे ॥ ४ ॥
शुद्धात्म्यासी मोक्ष प्रथम आश्रमीं । अशक्य न जनीं मुने, जाण ॥
वासुदेव म्हणे असावें अलिप्त । राहूनि जनांत जनक म्हणे ॥ ६ ॥

७९८

ययातींची गाथा नित्य घ्यावी ध्यानीं । जगीं अंतर्यामी ब्रह्म एक ॥१॥
सर्वांमाजी सम कळे तें योगानें । अरागद्वेषानें प्राप्ति त्याची ॥ २ ॥
अंधकारीं दीप हृदयीं तैं बुद्धि । परब्रह्म शोधीं यश पावे ॥ ३ ॥
शुका, जाणावें तें जाणसी सकळ । अंतरीं संशय बालभावें ॥ ४ ॥
अलोलुप्त्व, साम्यभाव, निर्लोभता । बाणली सर्वथा तव अंगीं ॥५॥
वासुदेव म्हणे मोक्ष आतां भिन्न । तुज राहिला न जनक म्हणे ॥६॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ.३२६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१५३ समाप्त

अध्याय ३२७ वा ७९९

ऐकूनि संशय फिटला शुकाचा । बाह्य विषयांचा सुटला ध्यास ॥१॥
समाधानचित्त होऊनि गगनीं । उड्डाण करूनि म्हणती जावें ॥ २ ॥
हिमालयीं तदा देवसेनापति । खोंची एक शक्ति पृथ्वीवरी ॥ ३ ॥
म्हणे उत्पाटो वा हालवो ही कोणी । मजहूनि जनीं कोण बळी ॥
ऐकूनि गर्वोक्ति विष्णु ती हालवी । प्रल्हादही जाई उत्पाटाया ॥५॥
वासुदेव म्हणे प्रल्हाद मूर्छित । पडला शक्तीस स्पर्शितांचि ॥ ६ ॥

८००

गिरीवरी तया व्यासांचा आश्रम । तयां समाधान शुक येतां ॥ १ ॥
सुमंतु, जैमिनी, पैलही तो जाण । तो वैशंपायन हर्षिन्नला ॥ २ ॥

आनंदित व्यासां प्रार्थिलें तयांनीं । शुकासवें आम्हीं ज्ञानी व्हावें ॥३॥
वेदपारंगत नसो कोणी अन्य । विनंती हे मान्य होवो गुरो ॥ ४ ॥
ऐकूनियां व्यास म्हणती प्रसार । वेदाचा सर्वत्र करा यत्नें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे व्रतस्थचि शिष्य । स्वीकारावा व्यास निवेदिती ॥६॥

८०१

कुलशील गुण असावे शिष्यासी । चारित्र तयासी आवश्यक ॥ १ ॥
अग्र तो ब्राह्मण करूनि चौघांही- । वर्णां, वेदाज्ञा ती निवेदावी ॥२॥
देवस्तवनार्थ वेदांची उत्पत्ति । वेदज्ञ विप्रांसी निंदूं नये ॥ ३ ॥
निंदितां विप्रांतें विजय न कदा । वेदाज्ञा लंघितां अधःपात ॥ ४ ॥
वेदाज्ञा लंघितां गुरुशिष्यद्वेष । नियम हे सर्व ध्यानीं घ्यावे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अध्यापनमार्ग । दाविला शिष्यांस मुनींनीं हा ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३२७वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१५४ समाप्त

अध्याय ३२८ वा

८०२

गुरूक्ति ऐकूनि आनंदले शिष्य । मागती गुरूंस गमनआज्ञा ॥ १ ॥
आज्ञा देती तदा व्यास तयांप्रति । रक्षावें वेदांसी म्हणती यत्नें ॥२॥
वेदांचे विभाग इच्छूनियां शिष्य । वंदूनि गुरूंस त्यजिती स्थान ॥३॥
गृहस्थधर्माचा करूनि स्वीकार । आनंदनिर्भर वसती जनीं ॥ ४ ॥
उत्साहानें केले सकलही यज्ञ । संपादूनि धन सुखी झाले ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चारही ते शिष्य । गृहस्थधर्मांत रमूनि जाती ॥ ६ ॥

८०३

निजाश्रमीं व्यास पुत्रासवें ध्यान- । धारणेंत मन लाविताती ॥ १ ॥
एकदां त्या स्थानीं पातले नारद । म्हणती कां न वेदघोष एथें ॥२॥
वेदध्वनीविण आश्रम हा शून्य । सूर्य प्रभाहीन केंवी झाला ॥ ३ ॥
नारदातें व्यास विनाविती तदा । वियोग शिष्यांचा न सहे मज ॥४॥
यास्तव करावें काय तें कथावें । वासुदेव भावें पुढती कथी ॥ ५ ॥

८०४

कथिती नारद आवृत्ति त्यागणें । वेदज्ञांचा जाणें दोष ऐसा ॥ १ ॥
वृत्तहीन जिणें लांछन तें विप्रा । वाहिक भूमीला दोषरूप ॥ २ ॥

व्यर्थ कुतुहलें चौकशा करणें । दोष हा स्त्रियांतें मलिन करी ॥ ३ ॥
वेदघोष एथें आरंभीं यास्तव । पापनिवारक म्हणती मुनि ॥ ४ ॥
नारदवचनें पुत्रासवें व्यास । नित्य वेदघोष आरंभिती ॥ ५ ॥
एकदां आश्रमीं सुटे अतिवात । वासुदेव वृत्त पुढती कथी ॥ ६ ॥

८०५

अनध्यायकाल जाणूनि तैं मुनि । बैसती आश्रमीं स्वस्थ, शांत ॥१॥
शुक पुशी तदा वायु हा कोठूनि । पातला या स्थानीं सुचवी काय ॥
कथिती तैं व्यास जाणें अंतर्ज्ञानें । सकल साधनें ज्ञात तुज ॥ ३ ॥
देवपितृयान मार्ग ऐसे दोन । वायूचें गमन अंतरिक्षीं ॥ ४ ॥
तेंवी पृथ्वीवरी वायु हा वाहतो । सत्य ते कथितों मार्ग त्याचे ॥५॥
वासुदेव म्हणे भूतें तैं इंद्रियें । समान वायूतें जन्म देती ॥ ६ ॥

८०६

समानापासूनि जाहला उदान । व्यान तो अपान पुढती क्रमें ॥ १ ॥
अपानापासूनि प्राणाची उत्पत्ति । समान मेघांसी गति देई ॥ २ ॥
प्रवह त्या नाम आवह उदान । उदयास्तांकारण हाचि वायु ॥ ३ ॥
उद्वह तो शोषी उदक सिंधूचें । अर्पितो मेघांतें व्यान तोचि ॥ ४ ॥
संव्वह मेघांसी विभागी सर्वत्र । होऊनि तो मेघ वृष्टि करी ॥ ५ ॥
विमानें नभांत वाहतसे हाचि । विवह वृक्षांसी पाडी वेगें ॥ ६ ॥
परिवह नभीं आधार ग्रहांसी । परावह ग्रासी सकल भूतां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सप्तम मोक्षद । अदितीचे पुत्र सप्त वायु ॥ ८ ॥

८०७

शुका, हेचि वायु आधार विश्वासी । वेदनिश्वासचि श्रीविष्णूचे ॥
उच्चस्वरें वेद उच्चारितां पीडा । होई, शुका, जगा सुचवी वायु ॥२॥
अनध्याय तेणें करिताती ज्ञाते । वेदोच्चार ऐसे शक्तियुक्त ॥ ३ ॥
स्तब्ध होतां वायु पुनरपि व्यास । करी मंदघोष म्हणती शुका ॥४॥
बोलूनियां ऐसें आकाशगंगेंत । निघूनि स्नानार्थ जाती व्यास ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वेदाचा महिमा । ऐकूनि हा कोणा नुपजे श्रद्धा ॥६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ.३२८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१५५ समाप्त

अध्याय ३२९ वा

८०८

वेदघोषमग्न पाहूनि शुकातें । नारद आनंदें येती तेथ ॥ १ ॥
पाहूनि तयांसी आनंद शुकातें । पुसूं वेदार्थातें ऐसें इच्छी ॥ २ ॥
अर्घ्यपाद्यें पूजा करूनि मुनींची । शुक तयां प्रार्थी अत्यादरें ॥ ३ ॥
नारद तोषूनि बोलले शुकासी । कथीन इच्छिसी तेंचि शुका ॥ ४ ॥
ऐकूनि हिताचें कथावें मजसी । प्रार्थी नारदासी शुकदेव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे नारद तैं प्रेमें । कथिती आनंदें ऐका तेंचि ॥ ६ ॥

८०९

शुका, कुमारांनीं एकदां ऋषींतें । कथिलें तें ऐकें स्वस्थचित्तें ॥ १ ॥
ज्ञानासम नेत्र, सत्यासम तप । त्यागासम सौख्य अन्य नसे ॥ २ ॥
आसक्तीसारिखें दुःख नसे अन्य । पाप धिक्कारून वरणें पुण्य ॥ ३ ॥
सदाचारप्रीति सद्धर्माचरण । जाणावें कल्याण हेंचि शुका ॥ ४ ॥
दुःखमयदेहीं आसक्त जो राही । सुटका त्या नाहीं दुःखांतूनि ॥ ५ ॥
ऐहिकआसक्ति बुद्धि करी नष्ट । दुःखींचि आसक्त इहपर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे यास्तव आसक्ति- । रहित जो तोचि सौख्य भोगी ॥

८१०

कल्याणेच्छु नरें घोर काम-क्रोध । आंवरावे नित्य बहुत यत्नें ॥ १ ॥
विध्वंसक नित्य जाणावे ते दुष्ट । स्पर्शही ज्ञात्यास न घडो त्यांचा ॥
वैभववंतासी मत्सर नसावा । विद्येनें न यावा मान मनीं ॥ ३ ॥
बुद्धीतें नसावा कदाही प्रमाद । धर्म सर्वश्रेष्ठ दया हाचि ॥ ४ ॥
क्षमा श्रेष्ठशक्ति, आत्मज्ञान श्रेष्ठ । सत्याहूनि श्रेष्ठ नसे कांहीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे हितोक्ति ते मात्र । सत्याहूनि श्रेष्ठ म्हणती ज्ञाते ॥ ६ ॥

८११

हितकर जीवां तेंचि एक सत्य । त्यागी अनासक्त तोचि ज्ञाता ॥ १ ॥
स्वाधीनइंद्रिय सेवी जो विषय । तोचि सुखमय होई स्वयें ॥ २ ॥
अभेदत्वें भूतां पाही एकरूप । तया श्रेयःप्राप्त निश्चयानें ॥ ३ ॥
लोभरहितासी कदाही न शोक । अशक्यही शक्य तपें होई ॥ ४ ॥
असूनि विषयीं राही अनासक्त । प्रिय या एकान्त, तोचि सुखी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वासनाविमुक्त । होई शोकमुक्त सर्वकाळ ॥ ६ ॥

८१२

शुभकर्में देव, मिश्रकर्में नर । तिर्यग्योनीफल अशुभकर्मा ॥ १ ॥
संसारकटाहीं पोळती हे जन । हिताहित भ्रम तुजसी शुका ॥ २ ॥
पंकमग्न गज त्याचि पंकीं नष्ट । पुत्रदारारत नष्ट तेंवी ॥ ३ ॥
पाशबद्ध मत्स्यासम आसक्तांची । दुःखमय स्थिति सर्वकाल ॥ ४ ॥
पाप-पुण्यावीण सर्व राही एथें । मग कासयातें शीण घ्यावे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आपुलें पाथेय । यत्नें संपादील तोचि धन्य ॥ ६ ॥

८१३

दक्षतेनें हांकी नरदेहनौका । तो पैलतटाका गांठीतसे ॥ १ ॥
धर्माधर्म सत्यासत्य सर्व त्यागीं । जेणें त्यागिलेंसी तेंही त्याग ॥ २ ॥
निरिच्छत्वें धर्म निर्लोभें अधर्म । त्यागील तो धन्य जगामाजी ॥ ३ ॥
सत्यासत्यत्याग सद्बुद्धीनें व्हावा । आत्मज्ञानें व्हावा बुद्धित्याग ॥
हळुहळु सर्व जाणावें प्रयत्नें । व्यक्त अव्यक्त हें द्विविध जग ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे इंद्रियागोचर- । व्यक्त अगोचर अव्यक्त तें ॥ ६ ॥

८१४

सरीवरी सरी येतां तृषार्तासी । सौख्य तैं जीवासी संयमानें ॥ १ ॥
सर्वभूतीं आत्मा आत्म्यामाजी भूतें । येई प्रत्ययातें संयमेंचि ॥ २ ॥
ज्ञानें मोह क्लेश जयासी न कदा । संबंध भूतांचा सुखद त्यासी ॥ ३ ॥
ज्ञानप्रकाश ज्या जगरहाटींत । दोष न तयास काहीं दिसे ॥ ४ ॥
स्वस्वकर्में सुखदुःख भोगी जीव । होई तूं विमुक्त शुका, यत्नें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे तप-समाधानें । संपादिली यत्नें बहुतीं सिद्धि ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३२९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १५६ समाप्त

अध्याय ३३० वा   ८१५

हितप्रद शास्त्रश्रवणेंचि चित्त । होऊनियां शुद्ध सौख्य पावे ॥ १ ॥
प्रतिदिनीं शत शोकाचे प्रसंग । भयभीत मूढ जागोजागीं ॥ २ ॥
ज्ञात्यांसी न ऐसा प्रसंग कदापि । निवेदितों युक्ति तुज ऐकें ॥ ३ ॥
आसक्ति ज्या ठाईं चिंतीं त्याचे दोष । विरक्ति चित्तांत उपजे तेणें

शोकविव्हला न धर्म अर्थ कीर्ति । नष्टाचा न लोकीं पुनर्लाभ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कोणाचा संयोग । कोणाचा वियोग खेळचि हा ॥ ६ ॥

८१६

मृताचिया शोकें एका दुःखें अन्य । अनर्थ त्या दोन प्राप्त होती ॥१॥
क्षणभंगुरत्व जाणे त्या न दुःख । अनिवार्य व्यर्थ करणें चिंता ॥ २ ॥
दुःखविस्मृति हें दुःखासी औषध । दुःख वृद्धिंगत करितां चिंता ॥
आधिव्याधिनाश विवेकऔषधें । क्षणिक अवघे योगायोग ॥ ४ ॥
जानपद्दुःख एका अनिवार्य । करावा उपाय शक्य तरी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सुखाहूनि दुःख । संसारीं अधिक निःसंशय ॥ ६ ॥

८१७

विषयीं आसक्त मोहमग्न जीव । कोणाही न प्रिय मृत्यु जनीं ॥ १ ॥
सुखदुःखत्याग करी तोचि मुक्त । मुक्तास्तव दुःख न करी ज्ञाता ॥
संपादन-व्यय-रक्षणींही दुःख । नाशानेंहि दुःख त्या अर्थाच्या ॥ ३ ॥
प्राप्तस्थितीमाजी मूढ असंतुष्ट । सर्वदा संतुष्ट परी ज्ञाता ॥ ४ ॥
उन्नति अवनति संयोग-वियोग । जन्मला त्या नित्य मरण असे ॥
वासुदेव म्हणे तृष्णेसी न अंत । संतोषचिं सौख्य परम जाणा ॥६॥

८१८

क्षणोक्षणीं धांवे आयुष्यप्रवाह । अशाश्वत देह स्थिर काय ॥ १ ॥
प्राण्यांचें स्वरूप अगम्य या लोकीं । जाणूनि परमार्थी रमतां मोद ॥
व्याघ्रासम झेंप घेईल हा काळ । घडावा यास्तव यत्न नित्य ॥ ३ ॥
न कळेचि पूर्वी संयोगाचें दुःख । वियोग जो तीच पूर्वस्थिति ॥ ४ ॥
दमन करावें कामक्रोधारींचें । धैर्यज्ञान त्यातें श्रेष्ठोपाय ॥ ५ ॥
रागद्वेषहीन योगी आत्मक्रीड । जो आत्मसहाय तोचि सुखी ॥६॥
वासुदेव म्हणे कथिलें बहुत । आणी आचारांत तोचि धन्य ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ.३३० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १५७ समाप्त

अध्याय ३३१ वा

८१९

सुखदुःखचक्र न टळे कोणासी । ज्ञानपौरुषादि व्यर्थ तेथें ॥ १ ॥
परी स्वाभाविक करावा प्रयत्न । करितां प्रयत्न नाश टळे ॥ २ ॥

कार्यतृष्णाव्याप्त तेंवी दुःखग्रस्त । विनाशाभिमुख परतंत्र जो ॥ ३ ॥
केवळ प्रयत्नें यशलाभ जरी । अयशस्वी तरी नसता कोणी ॥ ४ ॥
सुजनां अयश दुर्जनांही यश । लाभतें प्रत्यक्ष प्रारब्धानें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अप्रयत्नें लाभ । कोणा भगीरथयत्नेंही न ॥ ६ ॥

८२०

महाप्रयत्नेंही संतति न कोणा । इच्छिती न त्यांना वहु पुत्र ॥ १ ॥
सत्कर्मेंही कोणा कुलांगार पुत्र । सत्कर्म कोणास फलदायी ॥ २ ॥
विसर्जन किंवा धारण गर्भाचें । स्वाधीन तें नसे कवणाच्याही॥ ३ ॥
पंचमहाभूतें विकार पावती । विकार आत्म्यासी परी नसे ॥ ४ ॥
धन्वंतरींही न संपलीया वय । करूनि उपाय सिद्धि पावे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कुशलही वैद्य । एकामागें एक मरूनि जाती ॥ ६ ॥

८२१

दरिद्रि वा पशु-पक्ष्यांसी औषध । देई कोण, रोग परी न तयां ॥ १ ॥
धन, राज्य, तप प्रारब्ध न टाळी । केवळ इच्छाचि सफल नसे ॥
पालखींत कोणी कोणा स्कंधीं नेती । प्रारब्धाची ऐसी विविध गति
द्वंद्वातीत स्थानीं लक्ष ठेवीं नित्य । जेणें सर्वत्याग तेंही त्यागीं ॥ ४ ॥
मुनि याचि ज्ञानें, नर तेही देव । म्हणे वासुदेव पुढती ऐका ॥ ५ ॥

८२२

ऐकूनियां नारदोक्ति । शुक निजमनीं चिंती ॥ १ ॥
गांठूं केंवी परमपद । मार्ग एकचि त्या योग ॥ २ ॥
अर्चिरादिमार्गें लीन । सूर्यामाजी मी होईन ॥ ३ ॥
सर्वभूतवासी ऐसा । पावेन त्या ब्रह्मलोका ॥ ४ ॥
दृढनिश्चय हा ऐसा । शुक निवेदी नारदा ॥ ५ ॥
अनुज्ञा त्या नारदाची । वासुदेवा हर्ष चित्तीं ॥ ६ ॥

८२३

मनोदय ऐसा पित्यालागीं शुक । निवेदितां हर्ष व्यासांप्रति ॥ १ ॥
म्हणती तया बाळा, राहीं एक दिन । पारणें फेडीन अवलोकूनि ॥
स्नेहपाश परी नव्हता शुकासी । मोक्षमार्गा लंघी अत्यानंदें ॥ ३ ॥

त्यागूनियां परी पित्यासी तो जाई । सिद्ध जया ठाई कैलासीं ते ॥
वासुदेव म्हणे आज उद्यां ऐसें । कारणचि नसे कळतां मोक्षा ॥५॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३३१वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १५८ समाप्त

अध्याय ३३२ वा ८२४

कैलासीं निर्जन तृणहीन स्थानीं । बैसला जाऊनि शुकदेव ॥ १ ॥
विधियुक्त मग्न होऊनि ध्यानांत । वासनाविमुक्त चित्त करी ॥ २ ॥
तयावीण तेथें नव्हतेंचि कोणी । मुक्त होतां वनीं हर्ष झाला ॥ ३ ॥
आसक्ति सुटतां एवढा आनंद । आरंभिला योग पुढती यत्नें ॥ ४ ॥
लंघूनियां योगें जाई अंतरिक्षा । निवेदी नारदा स्वानुभव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे इष्ट गति आतां । निश्चयें नारदा म्हणे शुक ॥ ६ ॥

८२५

वंदूनि नारदां वायुरूपें शुक । जाई अंतरिक्ष भेदूनियां ॥ १ ॥
दिव्यरूप त्याचें पाहूनियां सिद्ध । तपस्वी प्रसिद्ध म्हणती कोण ॥
गमननिनादें कोंदले तें नभ । अप्सरासमूह चकित होई ॥ ३ ॥
मलयपर्वतीं पाहूनि शुकासी । अप्सरा स्तविती अत्यादरें ॥ ४ ॥
ऐकूनि तयांची वाणी तयां शुक । म्हणे जरी व्यास बाहतील ॥ ५ ॥
तरी मजसाठीं उत्तर द्या त्यांसी । तथैव बोलती अप्सरा त्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पित्याचें स्मरण । त्याही स्थळीं जाण शुकालागीं ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३३२ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १५९ समाप्त

अध्याय ३३३ वा ८२६

वितर्क विचार आनंद अस्मिता । मोक्षविघ्नें शुका त्यजूनि जाती ॥
तम रज सत्व त्यागिले क्रमानें । जाहला भाग्यानें ब्रह्मरूप ॥ २ ॥
धरणीकंपादि जाहलीं दुश्चिन्हें । दुर्भाग्य जनांचें सुचवावया ॥ ३ ॥
मेरु-हिमाद्रींचीं शिखरें भेदून । पार गेले जाण शुकयोगी ॥ ४ ॥
विद्याधर यक्ष पूजिती तें शुका । उधळिती पुष्पां शुकावरी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मोक्षमार्गी शुक । पाही अलौकिक गंगाजल ॥ ६ ॥

८२७

विवस्त्र अप्सरा पाहिल्या गंगेंत । शुकाची न लाज परी तयां ॥ १ ॥
व्यास त्याचमागें भेटण्यासी शुका । येतां तयां लज्जा वाटे मनीं ॥
शुका, शुका, ऐसें संबोधिती व्यास । हांक तयां विश्व देई स्वयें ॥
विश्वरूपता ते पाहूनि शुकाची । बैसूनि चिंतिती शिखरीं व्यास ॥
लज्जायमान तें पाहिल्या अप्सरा । आसक्ति अंतरा पटली तदा ॥
वासुदेव म्हणे पुत्राचा उत्कर्ष । पाहूनियां व्यास हर्षिन्नले ॥ ६ ॥

८२८

शिवादिक देव पातले त्या ठाया । शिव व्यासदेवां वदले ऐका ॥१॥
पूर्वीं तूं मजसी याचिलासी वर । तैसा तुज पुत्र लाभला हा ॥ २ ॥
व्याकुळ न होईं पुत्रास्तव आतां । शाश्वत कीर्तीचा पुत्र तव ॥ ३ ॥
प्रतिमा पुत्राची पाहसील नित्य । न करावें दुःख सुखी होईं ॥ ४ ॥
ऐकूनि तें व्यास गेले निजस्थानीं । आनंदले मनीं शिवोक्तीनें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चरित्र शुकाचें । ऐके शांतचित्तें तया मोक्ष ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३३३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १६० समाप्त

अध्याय ३३४ वा

८२९

धर्म म्हणे ताता, सर्वाश्रमीयांनीं । मोक्षार्थ साधनीं रमणें कोण्या ॥
देवपितरांसी तोषवावें कैसी । गति विमुक्ताची कथन करा ॥ २ ॥
पतन टाळावें कैसी स्वर्गांतूनि । देवता या जनीं श्रेष्ठ कोण ॥ ३ ॥
सर्व पितरांत श्रेष्ठ कोण सांगा । उभयांत वदा कोण श्रेष्ठ ॥ ४ ॥
उभयांहूनि त्या असे कीं वरिष्ठ । उत्तरें धर्मास देती भीष्म ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे युधिष्ठिरप्रश्न । ऐकूनियां मन तोष पावे ॥ ६ ॥

८३०

निवेदिती भीष्म धर्मा, न तर्कानें । उत्तरें कोणातें शक्य याचीं ॥१॥
ऋषि नारायण-नारद संवाद । कथितों मी तुज ऐकें आतां ॥ २ ॥
नर-नारायण हरि कृष्ण ऐसा । मूर्ती या धर्माच्या उदरीं होती ॥३॥
स्वायंभुव मन्वंतरींचें हें वृत्त । बदरिकाश्रमांत प्रथम द्वय ॥ ४ ॥

त्यांच्याचि कृपेनें नारदांच्या चित्तीं । उपजली भक्ति चरणीं त्यांच्या
सर्वभूतांचे ते पितर तैं देव । म्हणे वासुदेव भजती कोणा ॥ ६ ॥

८३१

यापरी नारद चिंतूनियां मनीं । बदरीआश्रमीं प्राप्त झाले ॥ १ ॥
पाहूनि नारदां नर-नारायण । देती उच्चासन सन्मानूनि ॥ २ ॥
धर्मनिष्ठा त्यांची पाहूनि नारद । पावूनि आनंद करिती प्रश्न ॥ ३ ॥
सर्वाधारा कोण्या देवासी स्तवितां । न कळे हें चित्ता चिंतितांही ॥
नारायण तदा बोलती नारदा । उगम आमुचा प्रकृतींत ॥ ५ ॥
प्रकृतीसी पर ऐसा परमात्मा । उपासना आम्हां परमात्म्याची ॥६॥
वासुदेव म्हणे देव पितरांसी । श्रेष्ठ तो एकचि सनातन ॥ ७ ॥

८३२

लोककल्याणार्थ दाविती मर्यादा । विधियुक्त पूजा करणें योग्य ॥१॥
देव-पितरांतें पूजावें यापरी । अलिप्त संसारीं तोचि मुक्त ॥ २ ॥
क्षेत्रज्ञ चिदात्मा अंतिम ते गति । ओळख तयाची ज्ञानें घडे ॥ ३ ॥
सगुणनिर्गुण एकचि तो असे । जाणूनि तयातें भजतों आम्हीं ॥४॥
सकल आश्रमीं पूजिती यातेंचि । तादात्म्यें तयासी ऐक्य घडे ॥
वासुदेव म्हणे केवळ प्रेमानें । बोध नारायणें मुनिसी केला ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३३४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १६१ समाप्त

अध्याय ३३५ वा

८३३

निवेदिती भीष्म ऐकूनि नारद । प्रेमेंचि प्रभूस प्रश्न करी ॥ १ ॥
अवतारकार्य करीं तूं आपुलें । श्वेतद्वीपीं तूतें पाहीन मी ॥ २ ॥
आद्य प्रकृति जे श्वेतद्वीपीं तव । होऊनि सश्रद्ध पाहीन ते ॥ ३ ॥
गुरुजनांप्रति पूजितों मी नित्य । सकलांचें गुप्त राखितों मी ॥ ४ ॥
हस्त पाद शिश्न उदरा रक्षिलें । समान लेखिले शत्रु-मित्र ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐशा शुद्धाप्रति । मूर्ति श्रीहरीची कां न दिसे ॥ ६ ॥

८३४

नारायणआज्ञा घेऊनि नारद । जाती श्वेतद्वीप लक्षूनियां ॥ १ ॥
प्रथम जाऊनि मेरूगिरीवरी । विश्रांति घेतली अत्यानंदें ॥ २ ॥

क्षीरसागराच्या उत्तर दिशेसी । पातले पुढती श्वेतद्वीपीं ॥ ३ ॥
इंद्रियविहीन पुरुष त्या ठाईं । लवती न पाहीं पक्ष्म त्यांचे ॥ ४ ॥
पापहीन गौरशरीरीं सुगंध । शक्ति अलौकिक योगबळें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे श्वेतद्वीपस्थांचें । वर्णन चित्तातें मोद देई ॥ ६ ॥

८३५

ऐकूनि तें धर्म बोलला भीष्मांसी । जीवन्मुक्तस्थिति भासते ही ॥
श्वेतद्वीपस्थ हे ऐसे कैंवी झाले । वृत्त निवेदावें सकल मज ॥ २॥
सर्व कथासार वृत्त तें सकळ । कथी गंगाबाळ श्रवण करा ॥ ३ ॥
धर्मा, पूर्वकाळीं नामें उपरिचर । धार्मिक नृपाळ एक होता ॥ ४ ॥
पांचरात्रधर्मे पूजी तो हरीसी । ब्रह्मा, ब्राह्मणांसी पुढती पूजी ॥५॥
वासुदेव म्हणे अर्धासन इंद्र । आनंदें तयास अर्पी नित्य ॥ ६ ॥

८३६

सकल वैभव मानूनि हरीचें । पाळी स्वधर्मातें नृपाळ तो ॥ १ ॥
चित्रशिखंडी या नामें सप्त ऋषि । शास्त्र ते निर्मिती 'पंचरात्र' ॥
मरीचि अत्र्यादि नामें ते प्रसिद्ध । प्रकृति त्या सप्त, अष्टम मनु ॥३॥
योजना शब्दांची, अर्थाचें गांभीर्य । सखोल विचार तया ग्रंथीं ॥४॥
वेदमूलक तो ग्रंथ सर्वश्रेष्ठ । पाहूनियां हृष्ट नारायण ॥ ५ ॥
प्रवृत्ति-निवृत्तिमूळ तो होईल । म्हणे वासुदेव वदला हरि ॥ ६ ॥

८३७

तत्त्वद्विषयीं या ग्रंथासी प्रामाण्य । म्हणे नारायण प्राप्त होवो ॥ १ ॥
याचि ग्रंथाधारें मनूचाही धर्म । ग्रंथ हाचि मान्य उशनादिकां ॥२॥
ग्रंथें या प्रसिद्धि लाभेल कुळासी । होईल पुढती ग्रंथनाश ॥ ३ ॥
अंतिम अनुयायी याचा उपरिचर । बोलूनियां स्थळ त्यजी देव ॥
बृहस्पती होती प्रचारक याचे । ग्रंथ हा ज्ञात्यांतें मान्य होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे निर्मूनि हा ग्रंथ । सन्मुनी तपास निघूनि जाती ॥६॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३३५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १६२ समाप्त

अध्याय ३३६ वा ८३८

धर्मा, महाकल्प लोटतां पुढती । पुत्र अंगिरासी होई एक ॥ १ ॥
बृहत्, ब्रह्म, महत् पर्याय शब्द हे । गुण त्या बाळातें सकल होते

बृहस्पति ऐसें नाम तेणें तया । उपरिचरराजा शिष्य त्याचा ॥ ३ ॥
पुढती नृपानें यज्ञ एक केला । देवतांनीं नेला निज भाग ॥ ४ ॥
अदृश्यचि परी आले नारायण । तेणें क्रोधपूर्ण बृहस्पति ॥ ५ ॥
म्हणे हा प्रत्यक्ष न्यावा नारायणें । ऐशा संदेहानें सौख्य काय ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्मासी कारण । निवेदिती भीष्म परिसा आतां ॥७॥

८३९

बृहस्पतीलागीं स्वीकारावी शांति । निवेदूनि ऋषि कथिती वृत्त ॥
प्रत्यक्ष दर्शन घडावें यास्तव । केलें आम्हीं तप पुरा बहु ॥ २ ॥
नभोवाणी तदा ऐकिली प्रत्यक्ष । 'जा श्वेतद्वीपांत कार्य होई' ॥ ३ ॥
ऐकूनि ते शब्द गेला श्वेतद्वीपीं । तेजें तेथ दृष्टि दिपूनि गेली ॥ ४ ॥
पुनरपि केलें बहुतचि तप । तथापि नररूप दिसलें आम्हां ॥ ५ ॥
पुढती स्तवन ऐकिलें प्रभूचें । असंख्यात ज्ञाते करिती प्रेमें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे एकतद्वितादि । वृत्त निवेदिती पुढती ऐका ॥ ७ ॥

८४०

पूजन-स्तवनें तुष्ट नारायण । प्रगट होऊन हर्ष देई ॥ १ ॥
ऐसें अनुमान केलें आम्हीं परी । आमुची न झाली दृष्टि शांत ॥ २ ॥
इतुक्यांत येई दिव्य ध्वनि कर्णी । दुर्लभ या जनीं दर्शन हें ॥ ३ ॥
मुनी हो, पुढती साह्य व्हाल देवां । प्रदेश त्यजावा सौख्यानें हा ॥
शब्द ते ऐकूनि आलों इष्टस्थळीं । तात्पर्य श्रीहरि न दिसे ऐसा ॥
बृहस्पते, तेणें होई न तूं क्रुद्ध । एकतादि वृत्त कथिती ऐसें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे प्रत्यक्ष दर्शन । नसे हें सामान्य पुण्यकार्य ॥ ७ ॥

८४१

बृहस्पति शांत ऐकूनि ते वाणी । देवता पूजूनि अत्यानंदें ॥ १ ॥
पूर्ण केला यज्ञ प्रजेचें पालन । करी पुत्रांसम वसुराज ॥ २ ॥
पुण्यें त्या स्वर्गांत जाई पुण्यवंत । होतां विप्रशाप पतन पावे ॥ ३ ॥
नारायणध्यान परी न सोडिलें । तेणेंचि जोडिलें पुण्यस्थान ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पुढती नृपाळ । मुक्तचि तत्काळ महापुण्यें ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ.३३६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१६३ समाप्त

१ उपरिचर

अध्याय ३३७ वा ८४२

धर्म म्हणे शाप विप्रांचा नृपासी । जाहला कां तोंचि निवेदावें ॥ १ ॥
निवेदिती भीष्म देवऋषींमाजी । हिंसा अहिंसा कीं वाद झाला ॥२॥
पशुवध इष्ट निवेदिती देव । पिष्टपशु योग्य म्हणती ऋषि ॥ ३ ॥
वसुराज ऐके संवाद तयांचा । पक्ष तो देवांचा म्हणे योग्य ॥ ४ ॥
ऐकूनि तें विप्र क्रोधाकुल होती । पतन तुजसी म्हणती होवो ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अधोमुखें वास । पृथ्वी विवरांत म्हणती तुज ॥ ६ ॥

८४३

सदय विप्रांनीं उपरिचरासी । शापसौलभ्याची दिधली शक्ति ॥ १ ॥
वसोर्धारालाभ दिधला यज्ञांत । अंतीं ईशलाभ म्हणती होवो ॥ २ ॥
उपरिचरानें सेवूनि प्रभूसी । पूर्वसामर्थ्यासी संपादिलें ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे वसुराजवृत्त । ऐकूनि प्रारब्ध श्रेष्ठ वाटे ॥ ४ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३३७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १६४ समाप्त

अध्याय ३३८ वा ८४४

पुढती नारद जाती श्वेतद्वीपीं । पूजिलें तयांसी तत्रस्थांनीं ॥ १ ॥
कोण्याही संकटीं अंतरे न ध्यान । मुनि नारायणस्तवनीं रत ॥ २ ॥
देवदेवेशातें माझा नमस्कार । तूंचि विश्वाधार आदिदेव ॥ ३ ॥
हंस महाहंस आखंडलादिक । कृच्छ्र महाकृच्छ्र तूंचि एक ॥ ४ ॥
विश्वमूर्ते, भक्तवत्सला प्रणाम । घेई, तूं शरण्य एक मज ॥ ५ ॥
भक्त मी दर्शन देई मजप्रति । वंदितों तुजसी वारंवार ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे होऊनियां आर्त । मारियेली हांक नारदांनीं ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ ३३८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १६५ समाप्त

अध्याय ३३९ वा ८४५

निवेदिती भीष्म धर्मा, गुह्य सार्थ । नामांनीं नारद स्तवी देवा ॥ १ ॥
दाविलें स्वरूप तदा नारायणें । चंद्राचेंही उणें रूप तेथें ॥ २ ॥
अग्नीसम किंचित्, किंचित् शुकासम । कोठें नीलवर्ण स्फटिक कोठें
श्वेत जातरूप मयूरकंठसा । कोठें श्रीहरीचा वर्ण शोभे ॥ ४ ॥

वैडूर्य-मौक्तिकछटा कोठें कोठें । अलौकिक ऐसें रूप वहु ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सहस्रशीर्षादि । लक्षणें प्रभूचीं, शोभा गूढ ॥ ६ ॥

८४६

प्रणवामागूनि गायत्रीचा जप । तेंवी वेद साङ्ग जपती मुखें ॥ १ ॥
वेदि, कमंडलु, शुभ्रमणि कुश । अजिन दंडकाष्ठ ज्वलित अग्नि ॥
उपानह ऐशा वस्तु करांमाजी । नारद प्रभूसी वंदी भावें ॥ ३ ॥
नारदासी तदा बोलले श्रीहरि । आले आजवरी वहुत एथें ॥ ४ ॥
परी रूप माझें दाविलें तुजसी । भक्तश्रेष्ठ तूंचि जाणूनियां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे बोले भगवान । नारदा, मागून घेई इष्ट ॥ ६ ॥

८४७

म्हणे नारद देवासी । तपश्चर्या सफल माझी ॥ १ ॥
रूप पाहिलें प्रत्यक्ष । त्रैलोक्यीं जें अलौकिक ॥ २ ॥
सनातन तूं विश्वात्मा । विश्वव्यापी नारायणा ॥ ३ ॥
मागूं काय आतां अन्य । देवा, झालों निर्वासन ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे भक्त । ऐसे दर्शनें कृतार्थ ॥ ५ ॥

८४८

देव म्हणे आतां सत्वरी हें स्थान । नारदा, सोडून निघूनि जाईं ॥
मत्स्वरूपीं लीन होण्याची पात्रता । ऐशा श्रेष्ठ भक्तां विघ्न नको ।
गुणातीत निराकार जो निर्गुण । वासुदेव नाम अतर्क्यातें ॥ ३ ॥
शुभाशुभ कर्मं लेप न तयासी । भोगूनि गुणांसी अलिप्त तो ॥ ४ ॥
असूनि निर्गुण निर्मितो जो गुण । भूतमात्र लीन जया ठाईं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वासुदेव नित्य । इतर अनित्य सकल कांहीं ॥ ६ ॥

८४९

पांचभौतिक देहांत । प्रवेशूनि राहे गुप्त ॥ १ ॥
त्याचा प्रवेश तो जन्म । तेणें देहासी चलन ॥ २ ॥
भूतांवीण नसे देह । आत्मसान्निध्येंचि कार्य ॥ ३ ॥
शेष आणि संकर्षण । नामें तयासीच जाण ॥ ४ ॥
सनत्कुमार प्रद्युम्न । सकल विश्वासी कारण ॥ ५ ॥

१ जोडे, खडावा

अनिरुद्ध ईशानही । संज्ञा तयालागीं पाहीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तोचि । असे अहंकाररूपी ॥ ७ ॥

८५०

जीव होतां तया संकर्षण नाम । मनचि प्रद्युम्न संज्ञा पावे ॥ १ ॥
अनिरुद्ध तोचि जाणें अहंकार । नारदा, ईश्वर अथवा तोचि ॥ २ ॥
चराचर क्षराक्षर सर्व मीचि । तत्त्वातीत मीचि सकल साक्षी ॥ ३ ॥
सगुण मी होतों क्षणांत निर्गुण । दर्शन हें जाण माया मम ॥ ४ ॥
जगद्गुरु मीचि सगुणत्वें आतां । बोध निर्गुणाचा तुज न होई ॥५॥
वासुदेव म्हणे अग्र-पृष्ठभागीं । दावी नारदासी हरी देव ॥ ६ ॥

८५१

पुरा विरंचीसी वरद मीं झालों । सेवक जाहलों तेणें त्याचा ॥ १ ॥
देवकार्यास्तव तेणें अवतार । घेणें वारंवार प्राप्त मज ॥ २ ॥
ऐसेंही असूनि जाहलों निवृत्त । निवृत्तीचि श्रेष्ठ सकलधर्मी ॥ ३ ॥
कपिल हिरण्यगर्भ तोही मीचि । योगानंद मीचि योगशास्त्रीं ॥ ४ ॥
संहारीन विश्व योग्य समयासी । राहीन एकाकी विद्यानंदें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे निर्मीन हें विश्व । ज्ञानें ऐसें देव कथिती पुनः ॥६॥

८५२

नारदा, वराह होऊनि पृथ्वीसी । सांवरितों मीचि समय येतां ॥१॥
नारसिंह वामनादि यथाक्रम । होऊनि वधीन दैत्यांप्रति ॥ २ ॥
कलंकीही ऐसा होईन नारदा । निर्मीन मी वेदां शास्त्रातेंही ॥ ३ ॥
नारदा, अनन्यभक्त तूं यास्तव । कथिलें वैभव सकल माझें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पावे अंतर्धान । बोलूनि भगवान ऐशापरी ॥ ५ ॥

८५३

कृतार्थ नारद बदरीवनांत । ऋषीदर्शनार्थ प्राप्त होती ॥ १ ॥
ईश्वरोक्तबोध नारद ब्रह्मयासी । पुढती निवेदी पंचरात्र ॥ २ ॥
धर्म म्हणे काय ब्रह्मयासी हें ज्ञान । नव्हतें म्हणून पुत्र कथी ॥ ३ ॥
निवेदिती भीष्म ब्रह्मसभेमाजी । सभासदांप्रति कथिलें ज्ञान ॥ ४ ॥
नारदोक्त तूंचि पंचरात्रज्ञान । लाभे यथाक्रम ऋषींलागीं ॥ ५ ॥

शंतनूपासूनि लाभलें तें मज। धर्मा, तेंचि तुज निवेदिलें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे रहस्य हें कदा। कथूं नये मूढा कथिती भीष्म ॥७॥

८५४

अमृतासम हें सार सत्कथांचें। गातां कृपा लाभे ईश्वराची ॥ १ ॥
धर्मा, याचिमार्गें आराधीं तूं देवा। कैवल्याचा ठेवा तेणें प्राप्त ॥२॥
वैशंपायनोक्त सकल हे कथा। सौति म्हणे आतां निवेदिली ॥ ३ ॥
व्यासादि सकळ याचि मार्गें जाती। ऋषी हो, या सत्रीं प्राप्त झालां
सनातन नारायणाची प्रार्थना। करूनियां जन्मा सार्थ करा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे परंपराप्राप्त। ज्ञान अभंगांत गुंफिलें हें ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३३९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १६६समाप्त

अध्याय ३४० वा ८५५

शौनक पुशिती सूता, नारायण। कर्ता भोक्ता दोन एक कैंवीं ॥ १ ॥
नारायण जरी प्रवृत्तीचा भोक्ता। निवृत्ति तया कां श्रेष्ठ वाटे ॥ २ ॥
सौते, शंका माझी निवारूनि मज। करावें निःशंक प्रार्थना हे ॥ ३ ॥
सौति तदा कथी जनमेजयासी। वैशंपायनें जी कथिली मति ॥४॥
निवेदितों तेचि ऐकूनि घ्या आतां। प्रश्न नृपाळाचा याचिपरी ॥५॥
अशाश्वत फल असूनि प्रवृत्ति। रुचे देवांप्रति न कळे कां तें ॥६॥
वासुदेव म्हणे देवदेवतांच्या। यज्ञामाजी भोक्ता कोण असे ॥ ७ ॥

८५६

व्यासोक्त उत्तर तो वैशंपायन। देई तें ऐकून तृप्त व्हावें ॥ १ ॥
विरंचीसी विष्णु पुरा निवेदिती। प्रवृत्ति निवृत्ति उभयमार्ग ॥ २ ॥
प्रवृत्ति चालवी चक्र हें विश्वाचें। निवृत्ति मोक्षाचें सदन दावी ॥
कोणी प्रवृत्त्यर्थ निवृत्त्यर्थ कोणी। स्वकर्मे जन्मूनि करिती कार्य ॥
कृतयुगीं धर्म राही चतुष्पाद। एक एक पाद पुढती न्यून ॥ ५ ॥
वेद यज्ञ तप अहिंसा तैं दम। जेथ, तुम्हां स्थान तें त्या युगीं ॥६॥
वासुदेव म्हणे वेद यज्ञादिक। कलियुगीं जेथ धर्म तेथें ॥ ७ ॥

८५७

ऐकूनि तें देव वंदूनियां जाती। प्रभु विरंचीसी भेट देई ॥ १ ॥
अश्वशिररूपें म्हणे हे बालका। तव साह्यकर्ता संकटीं मी ॥ २ ॥

ऐकूनि विरंची तोषूनियां जाई । अदृश्यचि होई अश्वशिर ॥ ३ ॥
कर्ता भोक्ता तोचि प्रवृत्ति निवृत्ति । मार्ग तयाचेचि ऐशापरी ॥ ४ ॥
सर्वकर्त्या तया वंदा प्रेमभावें । सर्व निवेदिलें तुम्हां ज्ञान ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कथूनि यापरी । वेदमंत्रें केली प्रभुस्तुति ॥ ६ ॥

८५८

नमो भगवते जपूनियां मंत्र । ऐकेल हें वृत्त तोचि धन्य ॥ १ ॥
अथवा कथील प्रेमभावें अन्या । तया बाधतीना आधि-व्याधि ॥ २ ॥
बंधनविमुक्ति कामनांची पूर्ति । आयुर्ज्ञानप्राप्ति श्रवणें याच्या ॥ ३ ॥
क्षत्रिय वैश्यांचे पुरतील काम । आनंद भोगून शूद्र सुखी ॥ ४ ॥
वंध्या, पुत्रवती, सर्वकामपूर्ति । कथेनें या सिद्धि पावे नर ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भक्तिभावें गातां । व्यासोक्त ही कथा सौख्यलाभ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३४० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १६७ समाप्त

अध्याय ३४१ वा

८५९

वैशंपायनासी बोले जनमेजय । नामाचें रहस्य कथन करा ॥ १ ॥
नामावली मज निवेदा विष्णूची । शुद्धता वृत्तीसी येवो तेणें ॥ २ ॥
वैशंपायन तें कथिती रायातें । कृष्ण अर्जुनातें कथी पुरा ॥ ३ ॥
निवेदितों तेंचि तुजलागीं ऐकें । महत्व नामाचें शास्त्रोक्त जें ॥ ४ ॥
अर्जुना, सत्वाचे अष्टादश गुण । प्रकृति ते जाण माझी पार्था ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चिद्रूप अमर । प्रकृति साचार ईश्वराची ॥ ६ ॥

८६०

नर-नारायण पूर्वींचे आपण । मानव होऊन प्राप्त झालों ॥ १ ॥
आपशब्द वेदीं शरीरवाचक । नरें तें कल्पित तेणें नारा ॥ २ ॥
नाराचि अयन तेणें नारायण । शरीरींच जाण वास माझा ॥ ३ ॥
भूतांचा निवास तेणें वासुदेव । व्यापकत्वें नांव विष्णु मज ॥ ४ ॥
इंद्रियदमनें स्वर्गादि ज्या योगें । दामोदर ऐसें नाम मातें ॥ ५ ॥

हे १८ गुण—
प्रीतिः प्राकाश्यमुद्रेको लघुता सुखमेव च । अकार्पण्यमसंरंभः संतोषः श्रद्धधानता
क्षमाधृतिरहिंसा च शौचमक्रोधएव च । आर्जवं समता सत्यमनसूया तथैव च ॥

अन्न, वेद, आप, अमृत तो पृश्नि । पृश्निगर्भ जनीं संज्ञा सार्थ ॥६॥
वासुदेव म्हणे पृश्निगर्भनामें । तारिलें त्रितातें कृपामाजी ॥ ७ ॥

८६१

सूर्य चंद्र अग्नि अर्जुना, मत्केश । केशव हें मज नाम तेणें ॥ १ ॥
बृहस्पतिशापें दीर्घतमा अंध । जाहला डोळस याचि नामें ॥ २ ॥
उत्तम नेत्रांचा म्हणूनि गौतम । पुत्रासी त्या नाम पुढती आलें ॥३॥
अग्नि सोमाचीं हे सकलही कर्में । बोलती पुराणें ऐशापरी ॥ ४ ॥
सर्वदेवतांचें मुखचि हा अग्नि । अग्नि सोम जनीं मित्र मित्र ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे माहात्म्य तयांचें । कथी अर्जुनातें पुढती कृष्ण ॥६॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३४१ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १६८ समाप्त

अध्याय ३४२ वा

८६२

पार्थ म्हणे कृष्णा, अग्नि आणि सोम । एकचि उगम कैंवी यांचा ॥
कृष्ण म्हणे पार्था, अग्नि सोमोत्पत्ति । नेत्रांपासूनि ती विरंचीच्या ॥
सोम ते ब्राह्मण अग्नि ते क्षत्रिय । विप्रांचें सामर्थ्य सर्वश्रेष्ठ ॥ ३ ॥
विप्रमुखीं अन्न तेचि अग्नितृप्ति । निर्मी ब्रह्मा सृष्टि याचि भावें ॥४॥
याजनाधिकार केवळ विप्रांसी । इतर द्विजांसी अधिकार न ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ब्राह्मणोक्त यज्ञें । संतोष देवांतें होत असे ॥ ६ ॥

८६३

संतुष्ट देवता धान्यादि अर्पिती । परस्पर ऐसी सुखवृद्धि ॥ १ ॥
ब्राह्मणचि अग्नि यास्तव तयांसी । अर्पूनि अन्नासी तोषवावें ॥ २ ॥
सृष्ट्यारंभीं विप्र निर्मिले प्रथम । अमर ब्राह्मण वेदाभ्यासें ॥ ३ ॥
बुद्धि वाणी कृति श्रद्धा तपश्चर्या । रूपें विप्र विश्वा आधार हे ॥४॥
धर्म सत्यासम, गुरु मातेसम । त्राता विप्रासम अन्य नसे ॥ ५ ॥
वृत्तिहीन विप्र होती ज्या राष्ट्रांत । तेथ अधःपात निश्चयानें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विप्रांचें महत्व । निवेदी केशव पार्थालागीं ॥ ७ ॥

८६४

देवांतेंही विप्र शासिती प्रसंगीं । गौतमें इंद्रासी दिधला शाप ॥ १॥
तैसेंचि च्यवनें दापिलें देवेंद्रा । अश्विनीकुमारां तोषवाया ॥ २ ॥

यज्ञनाशें दक्षें तपश्चर्या केली । त्र्यंबकता आली तेणें शिवा ॥ ३ ॥
त्रिपुरविनाशें जटा फेंकी शुक्र । दंशिती शिवास सर्परूपें ॥ ४ ॥
नीलकंठत्व त्या तेणें प्राप्त होई । जलचर पाहीं गुरुशापें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे देवादिकां ऐसे । बाधले विप्रांचे शाप पूर्वी ॥ ६ ॥

८६५

त्वष्टापुत्र विश्वरूप । होता देवपुरोहित ॥ १ ॥
दैत्यभगिनी त्याची माता । तेणें साह्य त्याचें दैत्यां ॥ २ ॥
तदा हिरण्यकशिपु । नेमी तया पुरोहितु ॥ ३ ॥
वसिष्ठ तैं देती शाप । दैत्या होईल त्वद्वध ॥ ४ ॥
त्याचि शापें नृसिंहानें । वधिलें दैत्यासी क्रोधानें ॥ ५ ॥
विश्वरूप करी तप । पुढती कथी वासुदेव ॥ ६ ॥

८६६

दैत्यहितास्तव विश्वरूप तप । पाहूनि त्या इंद्र मोह पाडी ॥ १ ॥
अप्सरा मोहित करितां तयासी । नष्ट तो इंद्रासी करूं पाहे ॥ २ ॥
विरंचीवचनें इंद्र तैं दधीचि-। प्रख्यात ऋषींसी शरण गेला ॥ ३ ॥
अस्थीनें मुनीच्या निर्मूनियां वज्र । विश्वरूपा इंद्र वधीतसे ॥ ४ ॥
विश्वरूपदेहीं प्रगटला वृत्र । तयाचाही इंद्र वध करी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे परी ब्रह्महत्या । पाहूनि देवेंद्रा भय वाटे ॥ ६ ॥

८६७

कमलनालीं तो लपला जाऊनि । अनर्थ अवनीवरी तदा ॥ १ ॥
अराजक ऐसें पाहूनियां देव । देती इंद्रपद नहुषासी ॥ २ ॥
पुढती एकदां नहुष कामांध । वश इंद्राणीस करूं पाहे ॥ ३ ॥
तदा देवेंद्रासी शोधूनि इंद्राणी । उपाय योजूनि हर्ष पावे ॥ ४ ॥
अंतीं नहुषासी लाभे सर्पयोनी । आणिती स्वस्थानीं इंद्रा देव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्मतेज ऐसें । भोंवलें देवांतें बहुतवेळां ॥ ६ ॥

८६८

त्रिविक्रमपाद आकाशगंगेत । लागे, भरद्वाज क्रुद्ध तदा ॥ १ ॥
ताडितां विष्णूसी श्रीवत्स तें तेंचि । अग्निभृगुशापेंचि सर्व भक्षी ॥

१ आचमनास पाणी घेतलें तें गढूळ पाहून गुरूनें शाप दिला

देवांस्तव अन्न रांधितां अदिति । भिक्षा तिजप्रति मागे बुध ॥ ३ ॥
पुत्रहितास्तव वाढी न ती बुधा । शाप तैं बुधाचा अदितीप्रति ॥४॥
उदर होईल गर्भवती होतां । कठोर तो ऐसा बुधशाप ॥ ५ ॥
अकालींच अंड फोडी तैं अदिति । मार्तंड देवासी तया नांव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे चंद्र दक्षशापें । क्षय-वृद्धि पावे अद्यापीही ॥ ७ ॥

८६९

'स्थूलशिरा' मुनि तपश्चर्यामग्न । वृक्ष त्या फुलून मोहविती ॥ १ ॥
शापी तैं तो वृक्षां समयींच पुष्पें । सकल वृक्षांतें तेणें येती ॥ २॥
वडवामुखाचें तप मेरूवरी । चालतां पाचारी सिंधूसी तो ॥ ३ ॥
आज्ञाभंग तेणें करितां तो क्षोभे । क्षारयुक्त शोभे उदक तेणें ॥ ४ ॥
पार्वतीसी भृगु मागतां हिमाद्रि । अर्पी न तियेसी तयाप्रति ॥ ५ ॥
कारण शिवासी वरिलें तियेनें । भृगु तैं क्रोधानें शाप देई ॥ ६ ॥
कृष्ण म्हणे पार्था, शापें त्या हिमाद्रि । विराजे अद्यापि रत्नहीन ॥
वासुदेव म्हणे अग्निसोमोद्‌भूत । ऐसें विप्रतेज विश्वाधार ॥ ८ ॥

८७०

पार्था, चंद्रसूर्य ईश्वराचे नेत्र । उष्णतासामर्थ्य अर्पिती ते ॥ १ ॥
अग्नि सोमाच्या या सामर्थ्यें मजसी । संज्ञा हृषीकेशी प्राप्त झाली ॥
हरितों हवीतें वर्णही हरित । हरि संज्ञा मज तेणें येई ॥ ३ ॥
सर्वभूतमात्रां शाश्वत निवास । ऋतधाम मज संज्ञा तेणें ॥ ४ ॥
गुप्त स्थानाहूनि आणिली पृथ्वीतें । गोविंद हें मातें तेणें नांव ॥ ५ ॥
निर्मळ शरीरी तोचि शिपिविष्ट । व्यापितो विश्वास रोमहीन ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शिपिविष्टनामें । प्रार्थिलें यास्कानें निरुक्तार्थ ॥ ७ ॥

८७१

जन्मरहितत्वें अज नाम मज । सात्वतही मज म्हणती सत्वें ॥ १ ॥
कृष्णवर्ण लोहें नांगरितों भूमि । वर्णासम जनीं कृष्ण संज्ञा ॥ २ ॥
वि संज्ञा वायूसी पृथ्वी कु संज्ञक । 'ठ' नामें आकाश एक्याठाईं ॥
आणितों म्हणूनि वैकुंठ हे संज्ञा । लाभली अर्जुना, मजप्रति ॥४॥
तादात्म्य ब्रह्मासी तेणें अचलत्व । लाभली अच्युत तेणें संज्ञा ॥ ५॥

अथ तेंचि पृथ्वी अक् तेंचि आकाश । धारण करी तो अधोक्षज ॥६॥
वासुदेव म्हणे घृतार्चियज्ञांत । सेवूनि हव्यास रक्षी जगा ॥ ७ ॥

८७२

कफवातपित्तात्मक त्रिधातु मी । धर्मालागीं जनीं म्हणती वृष ॥१॥
'वृषोत्तम' ज्ञाते म्हणती मजसी । तेंवी वृषाकपि नाम माझें ॥ २ ॥
वराहश्रेष्ठातें कपि संज्ञा पार्था । तेणें सार्थकता नामासी त्या ॥ ३॥
अनादि अनंत अमध्य हीं नामें । पार्था, मज जाणें यथार्थत्वें ॥ ४ ॥
ईश विभु लोकसाक्षी मम नामें । पावित्र्य श्रवणें 'शुचिश्रवा' ॥ ५ ॥
'एकशृंग'ही मी वराहशृंगानें । तीन तैं वशिंडें 'त्रिकुद्' संज्ञा ॥ ६ ॥
निर्मूनि विश्वासी योजिली चित्शक्ति । 'विरंचीस्वरूपी' नाम तेणें ॥
वासुदेव म्हणे आदित्यस्वरूप । कपिल हें सांख्य नाम देती ॥ ८ ॥

८७३

चिंतिती ज्या योगी मीचि तो गणावा । ऋग्वेद अथर्वा मीचि असें ॥
क्रमशास्त्र मीचि दिलें पांचाळासी । गालव पुढती प्रवीण झाला ॥२॥
शिक्षा क्रमांवरी ग्रंथकर्ता तोचि । ब्रह्मदत्ता सिद्धि मत्प्रसादें ॥ ३ ॥
पुरा मीचि झालों नर-नारायण । शिवें दक्षयज्ञ नाशिला तैं ॥ ४ ॥
त्रिशूल शिवाचा बदरीवनांत । नारायणवक्ष भेदी तदा ॥ ५ ॥
मुंजतृणासम केश होते माझे । मुंजकेश ऐसें नाम तेणें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे हुंकारें त्रिशूळ । जाहला निर्बल तयावेळीं ॥ ७ ॥

८७४

शिवाच्या करांत पडला त्रिशूळ । धांवले शंकर तदा क्रोधें ॥ १ ॥
अंगावरी येतां कंठ दावी हरी । संज्ञा तैं लाभली शितिकंठ ॥ २ ॥
अभिमंत्रूनियां नर फेंकी तृण । परशु होऊन तृण जाई ॥ ३ ॥
बाधतां न शिवा खंड होती त्याचे । 'खंडपरशु' हे संज्ञा मज ॥४॥
पार्थ म्हणे तदा विजय कोणासी । लाभला मजसी निवेदावें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कृष्णाचें उत्तर । होऊनियां स्थिर परिसा आतां ॥६॥

८७५

पार्था, तयावेळीं वेळ घोर आली । प्रार्थना मांडिली विरंचीनें ॥ १ ॥
नर-नारायणमाहात्म्य शिवातें । कथितां तयातें शांतिलाभ ॥ २ ॥

शंकर शरण तदा नारायणा । बोले तें वचना नारायण ॥ ३ ॥
शिवा, तुज मज भेद न लवही । शरण जो येई तुज तो माझा ॥४॥
शूलचिन्ह माझ्या वक्षीं तें श्रीवत्स । चिन्हें त्या कंठस्थ श्रीकंठ तूं ॥
पार्था, ऐकूनि हीं उत्तरें शिवासी । भजें, श्रीहरीसी त्याचिपरी ॥६॥
वासुदेव म्हणे प्रभाव प्रभूचा । जाणतां जीवाचा शिव होई ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३४२ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १६९ समाप्त

अध्याय ३४३ वा ८७६

शौनक सौतीसी म्हणे भाग्य मोठें । तेणें नारदातें कृतार्थता ॥ १ ॥
नारायण तया देतसे दर्शन । प्रसन्न होऊन श्वेतद्वीपीं ॥ २ ॥
नर-नारायणदर्शनाची घाई । झाली कां न येई ध्यानीं परी ॥ ३ ॥
सौति म्हणे हाचि प्रश्न जनमेजय । करितां उत्तर तयासी जें ॥४॥
वैशंपायनानें दिलें तेंचि ऐकें । कथी तें संक्षेपें वासुदेव ॥ ५ ॥

८७७

गंधमादनीं त्या बदरीआश्रमीं । प्राप्त होती मुनि आनंदानें ॥ १ ॥
नर-नारायण सन्मानिती तयां । नारदही तयां प्रेमें वंदी ॥ २ ॥
नर-नारायण पुशिती नारदा । येई कृतार्थता दर्शनें कीं ॥ ३ ॥
कथिती नारद सकल तीं चिन्हें । मजलागीं एथें दिसती स्पष्ट ॥४॥
यज्ञभोक्त्या तया प्रभूच्या आज्ञेनें । पातलों मी एथें नारायणा ॥५॥
वासुदेव म्हणे परमात्मचिंतनीं । नारद त्या वनीं वसती सौख्यें ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३४३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १७० समाप्त

अध्याय ३४४ वा ८७८

नारदमुनींसी नर-नारायण । कथिती तूं धन्य द्विजोत्तमा ॥ १ ॥
ब्रह्मदेवातेंही लाभ जो न झाला । लाभ तो तुजला भक्तीमुळें ॥ २ ॥
नारायणाचेचि सकल सद्‌गुण । ज्ञानी अंतीं लीन तयामाजी ॥ ३ ॥
देवकार्यास्तव अवतरे तोचि । तपानें तयासी साह्य आम्हीं ॥ ४ ॥
श्वेतद्वीपीं आम्हीं पाहिलें तुजसी । संकल्प केलासी तदा एक ॥ ५ ॥

सकलही आम्हां ज्ञान हे नारदा । नारायणजपा करी मुनि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मुनि सहस्राब्द । राहिले सानंद तया वनीं ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३४४ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १७१ समाप्त

अध्याय ३४५ वा ८७९

एकदां नारद देवकर्मोत्तर । आराधी पितर प्रेमभावें ॥ १ ॥
तदा नारायण पुशिती नारदा । कवणासी आतां आराधिसी ॥ २ ॥
नारद तैं वदे आज्ञेसम तुझ्या । करीतसें पूजा देवतांची ॥ ३ ॥
पिंडसंज्ञा कैंवी पितरांसी प्राप्त । निवेदीं तें मज नारायणा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे नारायणदेव । पिंडाचें महत्व कथितो ऐका ॥ ५ ॥

८८०

नारदा, वराहें तारिलें भूमीसी । पंक सर्वांगासी तदा त्याच्या ॥ १ ॥
माध्यान्ह समयीं पसरूनि दर्भ । दंष्ट्रा तीन वेळ हालवूनि ॥ २ ॥
मृत्पिंड त्यावरी ठेवीतसे तीन । आपणा अर्पण करी स्वयें ॥ ३ ॥
स्नेहयुक्त तीळ निर्मूनियां प्रोक्षी । पितरांसी अर्पी पिंड ऐसे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे मार्गदर्शनार्थ । बोलला वराह काय ऐका ॥ ५ ॥

८८१

वृषा कपि म्हणे पितृनिर्मितीचा । मनामाजी येतां सत्संकल्प ॥ १ ॥
दंष्ट्रायोगें पिंड पडले हे तीन । दक्षिणेसी जाण पितर तेचि ॥ २ ॥
पिता पितामह प्रपितामह मी । वसेन हे मानीं पिंडांमाजी ॥ ३ ॥
बोलूनियां करी पिंडपूजा देव । जाहला अदृश्य पुढती क्षणीं ॥ ४ ॥
पिंडपूजनाचें मूळ ऐशापरी । पूजा नित्य करी पितरांची जो ॥ ५ ॥
गुरु अतिथी तैं धेनु द्विज पृथ्वी । पूजी मातेपरी सश्रद्ध जो ॥ ६ ॥
विष्णुपूजाचि ते मानावी नारदा । दास श्रीहरीचा वासुदेव ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३४५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १७२ समाप्त

अध्याय ३४६ वा ८८२

वैशंपायनांचें वचन विष्णूचा-। द्वेष जया त्याचा सर्वनाश ॥ १ ॥
आत्म्याचा न द्वेष कदा करी कोणी । सर्वात्मा या जनीं विष्णु एक॥

हरिगीतेमाजी निवेदिला हाचि । सिद्धांत तुजसी जनमेजया ॥ ३ ॥
भूतलावरी हे व्यासभगवान । भारत हें कोण रची अन्य ॥ ४ ॥
राया, संकल्पित यज्ञ करीं आतां । वासुदेव ऐका पुढती सांगे ॥५॥

८८३

सौति शौनकासी म्हणे हें आख्यान । निवेदिती जाण धर्मा भीष्म ॥
असो कर्ता हर्ता सद्बुद्धिदायक । गति असो एक हरि तव ॥ २ ॥
दुर्जनसंहार करूनि भक्तांसी । प्रेमें जो संरक्षी सर्वाधीश ॥ ३ ॥
मोक्षरूपी तया वंदा सकलांनीं । सद्भाव धरूनि अंतरांत ॥ ४ ॥
भक्त योगी सांख्य त्याचि अचलासी । सर्वदा चिंतिती ध्यानीं मनीं
वासुदेव म्हणे सकलांसी सौति । प्रणाम तयांसी करा म्हणे ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३४६ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १७३ समाप्त

अध्याय ३४७ वा

८८४

शौनक पुशिती सौते, हयग्रीव । होवूनि तो काय करी हरी ॥ १ ॥
वैशंपायनोक्त वृत्त कथी सौति । क्रमें लयोत्पत्ति निवेदी तो ॥ २ ॥
तयामाजी विश्व लीन यथाक्रम । अध्यासाचि तम परब्रह्मीं ॥ ३ ॥
प्रधान अव्यय त्रिगुणात्मक हेंचि । आत्मगुणें तेंचि महत्तत्व ॥ ४ ॥
अहंकार होई पुढती, प्रभूची-। इच्छा बलवती ब्रह्मा होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे हरिलीला तेथ । जाहला वृत्तांत ध्यानीं घ्यावा ॥ ६ ॥

८८५

नाभिकमलाच्या दलावरी एका । उदकबिंदूचा खेळ सर्व ॥ १ ॥
दिव्य बिंदु दोन झळकले तेथें । रूप त्यां दैत्यांचें प्राप्त होई ॥ २ ॥
मधु तोचि एक कैटभ दुसरा । त्या वेदतस्करां काय वर्णूं ॥ ३ ॥
घेऊनि ते वेद रसातळीं गेले । अस्वास्थ्य तें आलें ब्रह्मदेवा ॥ ४ ॥
म्हणे तो मन्नेत्र बल कीं सर्वस्व । वेद देई मज ऐसा कोण ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे इतुका मी प्रिय । कोणा आहे काय विनवी ब्रह्मा ॥ ६ ॥

८८६

चिंतनें यापरी स्तवन हरीचें । करावेसें वाटे विरंचीसी ॥ १ ॥
ब्रह्महृदया तो म्हणे मत्पूर्वजा । ओंकारस्वरूपा नमन घेई ॥ २ ॥

भुवनश्रेष्ठा हे सांख्ययोगनिधे । मूळ तूंचि माझें हे अचिंत्या ॥ ३ ॥
मानस-चाक्षुष-वाचिक-मज्जन । तुजमुळें जाण ब्रह्ममूर्ते ॥ ४ ॥
श्रवणज तेंवी नासत्यही माझे । अंडज, पाद्म हे जन्म तूंचि ॥ ५ ॥
देवा, नेत्र माझे वेद द्या आणूनि । वासुदेव ध्यानीं हरिरूप ॥ ६ ॥

८८७

ऐकूनि ते स्तुति देवकार्यास्तव । होई हयग्रीव दयावंत ॥ १ ॥
विशाळ नासिका चंद्रासम कांति । शुभ्रवर्ण ज्यासी अश्वशीर्ष ॥२॥
तारकासंयुक्त नभचि त्या शिर । केश ते प्रखर किरण त्याचे ॥ ३ ॥
आकाशपाताळ शोभती त्या कर्ण । ललाट तें जाण पृथ्वी तया ॥४॥
गंगा सरस्वती श्रोणी तयालागीं । सागर भ्रुकुटी देवासी त्या ॥ ५॥
चंद्रसूर्य नेत्र, संध्या ते नासिका । जिव्हा विद्युल्लता प्रणवस्मृति ॥
पितर ते दंत श्रेष्ठलोक ओष्ठ । ग्रीवा तया देख कालरात्री ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे हयग्रीव ऐसा । रसातळीं शब्दां मधुर करी ॥ ८ ॥

८८८

सामगाननाद कोंदला त्या स्थानीं । येती तैं धांवूनि दैत्य तेथें ॥ १ ॥
चकवूनि तयां वेद नेई हरि । विरंचीच्या करीं अर्पीतसे ॥ २ ॥
करूनि तें कार्य हयग्रीव गुप्त । स्थापी हयशिर सिंधूमाजी ॥ ३ ॥
मधु कैटभ तैं शोधिती अरीतें । शेषशायी त्यांतें दिसला हरी ॥४॥
येतां ते त्यावरी वधी तो तयांसी । संतोष ब्रह्म्यासी पाहूनियां ॥
वेदसंरक्षक हयग्रीव ऐसा । हयग्रीवा ध्यातां वेदप्राप्ति ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सकलकारण । हयग्रीवध्यान करिती ज्ञाते ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३४७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १७४ समाप्त

अध्याय ३४८ वा

८८९

राव म्हणे मुने, निष्काम भक्तीनें । लंघितां क्रमातें ईशलाभ ॥ १ ॥
ऐसा बोध होई वृत्त हें ऐकूनि । निवेदिला कोणी मार्ग ऐसा ॥ २ ॥
मुनि म्हणे राया, धर्म हा सात्वत । ब्रह्मा प्रतिजन्मांत कथी भक्तां ॥

१ नासिकेपासून झालेलें

नारायण स्वयें कथी विरंचीतें । जन्म षट्‌क ऐसे निघूनि गेले ॥ ४ ॥
सप्तम हा पाद्म जन्म विरंचीचा । धर्म सात्वत हा जाणे ब्रह्मा ॥ ५ ॥
कर्ता अकर्ता तो एक नारायण । सात्वत हा धर्म वर्तितां लाभे ॥६॥
वासुदेव म्हणे नारायणकृपा । होतां या धर्माचा लाभ घडे ॥ ७ ॥

८९०

मुनि म्हणे राया, होई कृपादृष्टि । तरीच जागृति जीवा होई ॥ १ ॥
स्वेच्छेनें न भक्ति उपजे अंतरीं । अन्य मार्गा वरी तेणें जीव ॥ २ ॥
इंद्रादिक देव विकारसंयुक्त । गुरूविण बोध न घडे तयां ॥ ३ ॥
उपाधिनिर्मुक्त होई यदा जीव । तदा तो ओंकाररूप पावे ॥ ४ ॥
सर्वधर्म साह्य होती एकमेकां । अंतीं ईशकृपा सात्वतांसी ॥ ५ ॥
सागरचि मूळ सागरचि अंत । सकलोदकांस तैसेंचि हें ॥ ६ ॥
सद्‌बुद्धि-दुर्बुद्धिदाता एक कृष्ण । तयावीण श्रम सकल व्यर्थ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे परंपराप्राप्त । धर्म हा सात्वत कथिला पूर्ण ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३४८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १७५ समाप्त

अध्याय ३४९ वा

८९१

राव म्हणे मुने, सांख्य, योग, त्याग । पांचरात्र मार्ग ऐसे भिन्न॥१॥
परिणाम त्यांचा एक वा विभिन्न । मज निवेदून धन्य करा ॥ २ ॥
मुनि म्हणे व्यास नारायणपुत्र । नारायणचि तो वंदूं तया ॥ ३ ॥
मुने, नारायणपुत्र कैंवी व्यास । निवेदा तें मज राव म्हणे ॥ ४ ॥
मुनि म्हणे श्रांत भारतग्रंथानें । तैसेंचि तपानें असतां व्यास ॥ ५ ॥
सेवा आम्हीं त्यांची केली आनंदानें । पुशिलें प्रेमानें तदा हेंचि ॥६॥
वासुदेव म्हणे व्यासोक्त उत्तर । संक्षेपें साचार कथितों तेंचि ॥७॥

८९२

निवेदिती व्यास पाद्म ब्रह्मयाप्रति । अर्पूनियां बुद्धि नारायण ॥ १ ॥
म्हणे रचीं सृष्टि तुष्ट तैं विरंची । पावे हृषीकेशी अंतर्धान ॥ २ ॥
पुनरपि विष्णु चिंतूनि मानसीं । साह्य विरंचीसी म्हणती होऊं ॥
वराहादि बहु अवताररूपें । रक्षण भक्तांचें करीतसे ॥ ४ ॥
वेदरक्षणार्थ अपांतर मुनि । स्वयेंचि होऊनि राही प्रभु ॥ ५ ॥

व्यासरूपें तोचि पराशरांप्रति । होईल पुढती म्हणे देव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भविष्यकथन । करी नारायण ऐशापरी ॥ ७ ॥

८९३

पूर्ववृत्त ऐसें निवेदिती व्यास । ईशेच्छाचि एक सकला मूळ ॥ १ ॥
राया, सांख्यादिक सर्वही ते धर्म । एक नारायण दाविताती ॥ २ ॥
श्रुति अनुभवें एकचि श्रीहरी । सकल चराचरीं भरूनि उरे ॥ ३ ॥
पांचरात्रादिक मार्ग मात्र भिन्न । साध्य नारायण एक त्यांचें ॥ ४ ॥
वेदपुराणादि कथिती एकाचि । नारायण जगीं भरला एक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संशयनिवृत्ति । होतां लाभे शांति चिरकाल ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३४९ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १७६ समाप्त

अध्याय ३५० वा

८९४

राव जनमेजय वैशंपायनासी । म्हणे कथा लोकीं पुरुष किती ॥ १ ॥
अनेक ते जरी तरी श्रेष्ठ कोण । उत्पत्तीचें स्थान कथा त्यांचें ॥ २ ॥
निवेदिती मुनि भासती अनेक । परी मूळ एक पुरुष असे ॥ ३ ॥
उपाधिभेदानें जैसा नभभेद । तैसाचि हा भेद ध्यानीं घ्यावा ॥ ४ ॥
वंदूनि व्यासांसी कथीन मी तुज । पुरुष तो एक व्यासोक्तचि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वैजंतपर्वतीं । घडलें जें तेंचि श्रवणयोग्य ॥ ६ ॥

८९५

पर्वतीं त्या ब्रह्मा एकांतीं वैसूनि । पाहिला शिवानीं ध्यान करी ॥ १ ॥
शिव त्या विनवी ध्यान हें कोणाचें । विराट पुरुषाचें ब्रह्मा म्हणे ॥
शिव म्हणे बहु, पुरुष निर्मिले । विराटा आणिलें कोणी एथें ॥ ३ ॥
ब्रह्मा म्हणे शिवा, दृश्य ते पुरुष । कासया शास्त्रार्थ तयास्तव ॥ ४ ॥
अनाधिगतार्थ ज्ञापक तें शास्त्र । जीवाचें एकत्व कथी वेद ॥ ५ ॥
तत्वमसी वाक्य प्रसिद्ध वेदाचें । वासुदेव बोधे हर्षित यां ॥ ६ ॥

८९६

अनेकासी मूळ एक तो निर्गुण । विराट कारण सूत्रात्मा वा ॥ १ ॥
अनिरुद्ध प्रद्युम्न तैं संकर्षण । वासुदेव जाण अंतिम तो ॥ २ ॥
एकावरीचि त्या भासती समस्त । पावती एकत्व अंतीं सर्व ॥ ३ ॥

सर्व पुरुष तें कार्य, एक तयां । कारण जाणावा पुरुषोत्तम ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे एकाचे अनेक । भासती पुरुष अज्ञानेंचि ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ ३५० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १७७ समाप्त

अध्याय ३५१ वा

८९७

ब्रह्मदेव म्हणे पुत्रा शिवा कैंवी । शाश्वत तो पाहीं पुरुष ऐकें ॥ १ ॥
चर्मचक्षूंनीं न दृश्य हा कोणासी । ज्ञानगम्य पाहीं म्हणती तया ॥
अशरीरी परी सर्व देहीं वास । तथापि अलिप्त सर्वकर्मीं ॥ ३ ॥
साक्षी तो सर्वांचा सांपडे न कोठें । सर्वक्षेत्रीं असे एकरूप ॥ ४ ॥
क्षेत्रेंही शरीरें कर्मं तींच बीजें । उभय ज्ञान ज्यातें क्षेत्रज्ञ तो ॥ ५ ॥
देहसंबंधें या नसे जाणें येणें । अतर्क्यचि जाणें क्रिया त्याची ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पुरुषाचा बोध । ब्रह्मा शंकरास कथी ऐका ॥ ७ ॥

८९८

श्रुति युक्ति अनुभवें त्याचें ज्ञान । कथितों देऊन लक्ष ऐकें ॥ १ ॥
एकत्व महत्व वसे त्याचि ठाई । महापुरुष ही संज्ञा तया ॥ २ ॥
असूनियां एक बहु भासे अग्नि । एकचि असूनि वायु बहु ॥ ३ ॥
असंग पुरुष तैसाचि हा एक । असूनि अनेक भासतसे ॥ ४ ॥
सागराचे मूळ सर्व उदकांसी । निर्गुणाचि अंतीं तेंवी विश्व ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अहंमम भेद । त्यागितांचि एकरूप जीव ॥ ६ ॥

८९९

परमात्मा तेंवी एकात्मा केवल- । आत्मा सांख्यादिक म्हणती तया ॥
अनिरुद्धादि तें चतुष्ट्य तेंवी । विश्व तैजसादि चतुष्ट्य ॥ २ ॥
विराट सूत्रात्मा अंतर्यामी शुद्ध । ब्रह्म चतुष्ट्य अध्यात्म ते ॥ ३ ॥
गुरुमुखें बोध घेऊनियां यांचा । यथाक्रम साचा लय व्हावा ॥ ४ ॥
धर्मात्मा तो जीव कर्ता भोक्ता तोचि । पुरुष उदकीं पद्मपत्र ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे औपाधिक भेद । पावतसे जीव कर्मभेदें ॥ ६ ॥

९००

परम बोध तो बोद्धा बोधनीय । मंता तो मंतव्य घ्राता घ्रेय ॥ १ ॥
सर्व सर्व तोचि अव्यय शाश्वत । कर्मी घडो बोध एक त्याचा ॥२॥

मजसवें सर्व नटला तो विश्व । भासे तो अबुद्ध भेदरूपें ॥ ३ ॥
वासुदेवरूप परी होई अंतीं । एकत्व हें चित्तीं घेई राया ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पांचरात्रमत । ब्रह्मा शंकरास कथी ऐसें ॥ ५ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ.३५१ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१७८समाप्त

अध्याय ३५२ वा ९०१

धर्म म्हणे आतां आश्रमीयांप्रति । श्रेष्ठ तें मजसी निवेदावें ॥ १ ॥
निवेदिती भीष्म धर्मा, धर्ममार्ग । जाणें बहुविध जगामाजी ॥ २ ॥
जेथें ज्याची भक्ति श्रेष्ठ तो तयासी । कृतार्थता त्यासी त्याचि मार्गें
स्वर्ग मोक्षद ते सकल आश्रम । निश्चय हा जाण आवश्यक ॥ ४ ॥
धर्मा, नारदासी एकदां देवेंद्र । कथावें नवल म्हणे कांहीं ॥ ५ ॥
वायूसम नित्य संचार जयाचा । देवर्षि तो कथा कथी एक ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भीष्मोक्त तें वृत्त । ऐकावें समस्त शांतचित्तें ॥ ७ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३५२ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १७९ समाप्त

अध्याय ३५३ वा ९०२

गंगेच्या दक्षिण तीरावरी एक । महापद्मनामक नगर होतें ॥ १ ॥
अत्रिगोत्री ज्ञाता विप्र तेथ कोणी । नित्य तृप्त मनीं निरामय ॥ २ ॥
कुलशीलवंत पुत्र त्या बहुत । वेद-धर्म-शिष्टमार्गज्ञाता ॥ ३ ॥
श्रेष्ठ मार्ग परी कळेन तयासी । चिंता मानसासी हेचि तया ॥ ४ ॥
भाग्यें एक येई अतिथि त्या ठाई । सन्मानूनि होई विप्र नम्र ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अतिथीसी विप्र । प्रश्न करी एक नम्रभावें ॥ ६ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३५३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१८०समाप्त

अध्याय ३५४ वा ९०३

विप्रा, मज आतां मोक्षाचीच इच्छा । परी मार्ग त्याचा न कळे मज
सात्विक जनही संकटनिमग्न । संन्यासीही दीन हिंडताती ॥ २ ॥
रोग व्याध्यादिक भय विषयांत । नसे अन्नवस्त्र संन्याशातें ॥ ३ ॥
यास्तव करावें काय तें न कळे । अतिथीनें केलें प्रत्युत्तर ॥ ४ ॥

विप्रा, संदेहचि बाधे मजसीही । बहुविध पाहीं मार्ग जनीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वर्णआश्रमादि । धर्में कर्मसिद्धि, कवणा ज्ञानें ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ.३५४वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१८१ समाप्त

अध्याय ३५५ वा ९०४

अतिथि विप्रासी कथी एक वृत्त । नैमिषारण्यांत धर्मचक्र ॥ १ ॥
प्रवर्तलें पुरा प्रथम त्या ठाईं । गोमतीच्या तीरीं नगर 'नाग' ॥ २ ॥
सकल देवांनीं केले तेथ यज्ञ । नाग तेथें पद्म नामें कोणी ॥ ३ ॥
कर्म उपासना ज्ञानांत निमग्न । साम-दानज्ञान सकल तया ॥ ४ ॥
सकलार्थवेत्ता विवेकी निर्वैर । शरण साचार तया जाईं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दावील तो मार्ग । ऐसें कथी विप्र विप्राप्रति ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३५५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १८२ समाप्त

अध्याय ३५६ वा ९०५

ऐकूनि तें वृत्त संतोषला विप्र । म्हणे एक रात्र वसें एथें ॥ १ ॥
मस्तकींचा भार आणिलासी खालीं । श्रांतासी दिधली मृदुशय्या ॥
तृषिता उदक, क्षुधिता भोजन । वार्धक्यांत जाण पुत्रप्राप्ति ॥ ३ ॥
स्मरतांचि जैसी व्हावी मित्रभेटी । तैसा धीर पोटीं वचनें तुझ्या ॥
ऐकूनि तें विप्र राहिला ती रात्र । वर्णिती संन्यासमहत्व तें ॥ ५ ॥
प्रातःकाळीं विप्र कौटुंबियांप्रति । कथूनि नागासी भेटूं म्हणे ॥ ६ ॥
वासुदेव कथी ऐसा पुण्यवंत । भेटला नागास येऊनियां ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३५६वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १८३ समाप्त

अध्याय ३५७ वा ९०६

नागगृहीं विप्र येतां । सन्मानी त्या नागकांता ॥ १ ॥
सूर्यरथ ओढण्यासी । गेला होता नाग स्वर्गीं ॥ २ ॥
कांता निवेदी तें वृत्त । म्हणे राहीं दिन अष्ट ॥ ३ ॥
विप्र गोमतीच्या तीरीं । वसे लोपूनि अंतरीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे श्रेष्ठ । कर्में आचरिती श्रेष्ठ ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति०अ. ३५७ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १८४ समाप्त

अध्याय ३५८ वा  ९०७

गोमतीच्या तीरीं वाळवंटीं विप्र । करी उपवास अत्यानंदें ॥ १ ॥
आप्तगोत सर्व नागाचे त्या ठाईं । येऊनियां पाईं नम्र होती ॥ २ ॥
म्हणती आहार घ्यावा कांहीं तरी । दोष आम्हांवरी येईल हा ॥३॥
आजवरी कांहीं पाप न आम्हांसी । आमुच्या कुळासी दोष नसे ॥
कुळामाजी कोणी अधर्म न केला । दिन हा उदेला सप्तमचि ॥ ५ ॥
विप्र म्हणे नागभेटीस्तव व्रत । आरंभिलें दुःख मानूं नका ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विप्राची ते निष्ठा । पाहूनियां नागां तोष वाटे ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति अ. ३५८ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ १८५ समाप्त

अध्याय ३५९ वा  ९०८

योग्यकाल येतां नाग येई गृहीं । प्रहर्षित होई तदा कांता ॥ १ ॥
नाग म्हणे कांते, देवता अतिथी- । पूजनाचा विधि चुकला न कीं ॥
कांता म्हणे गुरुशुश्रूषा शिष्यासी । धर्म ब्राह्मणांसी वेदाभ्यास ॥
स्वामीआज्ञा हाचि सेवकाचा धर्म । प्रजेचें पालन नृपा इष्ट ॥ ४ ॥
प्राणिसंरक्षण क्षत्रियांचा धर्म । आतिथ्य तें यज्ञ वैश्यां तारी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शुश्रूषा शूद्रांसी । धर्म ते नागाची कांता म्हणे ॥६॥

९०९

सर्वभूतहित धर्म गृहस्थाचा । धर्म इंद्रियांचा संयमाचि ॥ १ ॥
कोण मी कोणाचा पातलों कोठूनि । चिंतावें हें मनीं संन्याशानें ॥
पतिआज्ञा नित्य पाळावी स्त्रियांनीं । पतिबोधें मनीं ठसलें तत्व ॥
धार्मिक आपणासम पति माझे । त्यागीन धर्मातें कैंवी सांगा ॥ ४ ॥
अतिथिसेवेसी सज्ज मी सर्वदा । विप्र एक आला भेटीस्तव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे नागाप्रति वृत्त । विप्राचें समस्त कथी कांता ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३५९वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १८६ समाप्त

अध्याय ३६० वा  ९१०

नाग म्हणे विप्र देव वा तो कोणी । भेटेल या स्थानीं मजसी कोण ॥
नागांचें या भय मानवांसी नित्य । यास्तव मनांत संशय हा ॥ २ ॥

कांता म्हणे भासे देव न तो ऐसें । निःसीम तयाचें परी प्रेम ॥ ३ ॥
चातकासम तो करितो प्रतीक्षा । भेटूनि तयाचा पुरवा हेतु ॥ ४ ॥
नृपा-नृपपुत्रां भेटतां दुःखार्त । तया दुःखमुक्त करणें योग्य ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कांता ते नागाची । धर्मतत्व कथी तेंचि ऐका ॥ ६ ॥

९११

मौनें ज्ञानप्राप्ति, दानें यशलाभ । वक्तृत्वसामर्थ्य सत्यव्रतें ॥ १ ॥
भूमिदानें गति, आश्रमासमान । न्याय्य द्रव्यार्जन करितां श्रेय ॥२॥
परउपकार कल्याणकारक । करी, अधःपात नसे त्याचा ॥ ३ ॥
नाग म्हणे प्रिये, आढ्यता हे माझी । भासे तुजप्रति जातिधर्मे ॥४॥
क्रोधयुक्त नित्य असों आम्हीं सर्प । परी तव बोध रुचला मनीं ॥५॥
अनर्थ या क्रोधें जाहले बहुत । परी शांतचित्त केलेंसी तूं ॥ ६ ॥
तुजसम कांता लाभे जनीं धन्य । जाहलों मी स्थान दावीं मज ॥७॥
वासुदेव म्हणे विप्रहेतु पूर्ण । करावया जाण नाग सिद्ध ॥ ८ ॥

इतिश्री वासुदेवकृत शांति० अ ३६० वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १८७समाप्त

अध्याय ३६१ वा ९१२

विप्रकार्य काय असावें हें मनीं । चिंतीत पुलीनीं गांठी विप्रा ॥ १ ॥
वंदूनि तयासी याचूनियां क्षमा । म्हणे काय आज्ञा निवेदा तें ॥ २ ॥
उपासना एथें करिसी कोणाची । इच्छा अंतरींची निवेदावी ॥ ३ ॥
'धर्मारण्य' माझें नाम म्हणे विप्र । इच्छितों अभीष्ट नागाचें त्या ॥
वेदपारायण त्यास्तव करितों । अंतरीं इच्छितों भेट त्याची ॥ ५ ।
वासुदेव म्हणे ऐकूनियां नाग । म्हणे मी कृतार्थ त्वद्दर्शनें ॥ ६ ॥

९१३

धन्य धन्य विप्रश्रेष्ठा । जगद्वंद्य वर्तनाचा ॥ १ ॥
स्नेहबुद्धि हे अपूर्व । करावें मी प्रिय काय ॥ २ ॥
भेटीस्तव ज्याच्या येसी । जाणावें तो नाग मीचि ॥ ३ ॥
माझ्या भेटीनेंचि साचे । पुरतील हेतु तुझे ॥ ४ ॥
केलें मजसाटीं तप । तेणें जाहलों त्वद्दास ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे द्विज । नागा कथी भाव निज ॥ ६ ॥

९१४

विप्र म्हणे आधीं निवारीं संशय । आगमनकार्य कथिन मग ॥ १ ॥
विषय त्यागूनि संपादावें ब्रह्म । उद्युक्त मी जाण यास्तवचि ॥ २ ॥
परी गृहदारा आसक्ति न सुटे । रमेही न तेथें मन माझें ॥ ३ ॥
यास्तव कोठेंचि चित्तस्थैर्य नाहीं । पातलों या ठाईं मार्गबोधा ॥४॥
वासुदेव म्हणे ऐसी ओढाताण । विश्वाची पाहून खेद वाटे ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३६१वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १८८समाप्त

अध्याय ३६२ वा ९१५

विप्र म्हणे रथ सूर्याचा ओढितां । वदें पाहिलें का नवल कांहीं ॥१॥
नाग म्हणे विप्रा, नवलाचि सर्व । मूर्तिमंत सूर्य नवलरूप ॥ २ ॥
वृक्षांवरी जेंवी पक्ष्यांचा निवास । सूर्यकिरणांत तेंवी सिद्ध ॥ ३ ॥
वायूही आश्रित सूर्यकिरणांचा । आधार विश्वाचा सूर्य एक ॥ ४ ॥
शोषूनि उदका अर्पी हा पर्जन्य । नवल हें जाण सर्व त्याचें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अपूर्व नवल । कथीतसे नाग विप्रा ऐका ॥ ६ ॥

९१६

विप्रा, एकावेळीं भ्रमतां नभांत । सूर्याहूनि तेज दिसलें एक ॥ १ ॥
सन्मुख सूर्याच्या पातलें तें जेव्हां । सन्मानी त्या तेव्हां सूर्यदेव ॥२॥
सव्यहस्तें कर धरिला तयाचा । पाहतां पाहतां नवल झालें ॥ ३ ॥
सूर्यरूपामाजी जाहलें तें लीन । समजे न कोण सूर्य यांत ॥ ४ ॥
सूर्याप्रति प्रश्न केला आम्हीं हाचि । कोण हा तेजस्वी निवेदीं तें ॥५॥
वासुदेव म्हणे उत्तर सूर्याचें । ऐकतां चित्तातें समाधान ॥ ६ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति० अ. ३६२वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ.१८९समाप्त

अध्याय ३६३ वा ९१७

सूर्य म्हणे न तो अग्नि वा असुर । पन्नगही थोर नव्हे कोणी ॥ १ ॥
उंच्छवृत्ति नामें मुनि एक श्रेष्ठ । सत्कर्मैं स्वर्गास प्राप्त झाला ॥ २ ॥
फल-मूलपर्णें भक्षूनि राहिला । वायूचि भक्षिला अंतीं तेणें ॥ ३ ॥
शंकराराधन संतुष्टचित्तानें । वेदपारायणें करी नित्य ॥ ४ ॥
शिलोंच्छवृत्ति तो भूतहितरत । पन्नगहो, श्रेष्ठ प्राणिमात्रीं ॥ ५ ॥

विप्रा, आश्चर्य तें पाहिलें, मानव । असूनि शिलोंच्छव्रतें मुक्त ॥६॥
वासुदेव म्हणे सूर्यस्वरूपता । सदाचारें विप्रा लाभतसे ॥ ७ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति. अ. ३६३ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १९०समाप्त

अध्याय ३६४ वा ९१८

विप्र म्हणे नागा, जाहलों कृतार्थ । कल्याणाचा मार्ग जाणूनियां ॥
जातों आतां कार्य लागतांचि वाहीं । साह्य मम घेई आनंदानें ॥ २ ॥
नाग म्हणे शंका निवारिली आतां । हेतु अंतरींचा कथन करीं ॥३॥
सहजचि कार्य जाहलेंसे जरी । निवेदूनि तरी जावें मज ॥ ४ ॥
परस्परांवरी उभयांचें प्रेम । पांथस्थासमान त्यागूं नको ॥ ५ ॥
निष्पापा, सकल लोक हा तुझाचि । मित्र मी तुजसी काय न्यून ॥
वासुदेव म्हणे नागालागीं विप्र । बोलला साचार ऐका काय ॥ ७ ॥

७१९

नागश्रेष्ठा, सत्य सत्य तूंचि श्रेष्ठ । सूर्यमंडलस्थ पुरुष तूंचि ॥ १ ॥
तोचि मी, त्यापरी तुज मज ऐक्य । सर्व आत्मरूप भूतमात्रें ॥ २ ॥
स्वीकारीन आतां प्रेमें उंच्छवृत्ति । जाहलों या जगीं कृतकृत्य ॥३॥
निरोप दे आतां असो त्वत्कल्याण । संशयनिरसन झालें माझें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे संशयनिरास । होतांचि जीवास शांति लाभे ॥ ५ ॥
इतिश्री वासुदेवकृत शांति. अ. ३६४वा तथा मोक्षधर्मपर्वाचा अ. १९१समाप्त

अध्याय ३६५ वा ७२०

निवेदिती भीष्म धर्मा, तो ब्राह्मण । नागासी भेटून निघून गेला ॥
सक्षौर घेऊनि प्रायश्चित्त तेणें । व्रत निर्धारानें आरंभिलें ॥ २ ॥
च्यवना वंदूनि घेऊनियां दीक्षा । निवेदी स्ववृत्ता तयां विप्र ॥ ३ ॥
परंपराप्राप्त कथा ते मी अद्य । निवेदिली तुज धर्मराजा ॥ ४ ॥
सर्वश्रेष्ठ धर्म हाचि युधिष्ठिरा । सद्गति पावला विप्र तेणें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे उंच्छवृत्ति श्रेष्ठ । शांतिपर्व एथ पूर्ण झालें ॥ ६ ॥

९२१

समाप्त हें शांतिपर्व । हेतु पूर्ण झाले सर्व ॥ १ ॥
सर्व कमना गळाल्या । हरिरूप होऊनि ठेल्या ॥ २ ॥

शोक चिंता न मनातें । होवो प्रारब्धीं असे तें ॥ ३ ॥
गेलों सागर तरूनि । शांतिरूप झालों मनीं ॥ ४ ॥
ज्ञान-अज्ञान संपलें । शुद्ध चैतन्य राहिलें ॥ ५ ॥
निर्विकार झालें मन । अंतर्बाह्य नारायण ॥ ६ ॥
'वासुदेव म्हणे' ऐसें । आतां वदावें तें कैसें ॥ ७ ॥

१२२

अर्पावी हे सेवा कोणाप्रति आतां । सांगा जगन्नाथा कैशापरी ॥१॥
धर्म-भीष्मादिक देवा, तूंचि एक । राजधर्मादिक सकल तूंचि ॥ २ ॥
श्रोते वक्ते सर्व तूंचि भाग्यवंत । आनंदस्वरूप अवघें विश्व ॥ ३ ॥
भूत ऋषि वसु भूमि संवत्सरीं[1] । शुभ सोमवारीं निज वैशाखीं ॥
तिथि द्वादशीतें पर्व हें समाप्त । जाहला कृतार्थ नरदेह ॥ ५ ॥
शांतिलाभ येणें असंख्यात जनां । लवही न मना संशय हा ॥ ६ ॥
वर्णवेन मोद म्हणे वासुदेव । झालों चिरंजीव ज्ञानरूपें ॥ ७ ॥

१२३

शांतिपर्व हेंचि शांतीचें आगर । येणें व्यवहार शांतिरूप ॥ १ ॥
स्वस्वरूपज्ञान, स्वस्थाननिवास । यदृच्छा-संतोष शांति लाभे ॥२॥
प्रारब्धावशेष भोगी आनंदानें । शांतिपर्वज्ञानें जीवन्मुक्ति ॥ ३ ॥
निश्चयें हा मम अंतरीं विश्वास । येई प्रत्ययास अभ्यासानें ॥ ४ ॥
शांतिपर्वगानें वासुदेव शांत । स्वानंदसुखांत मग्न असे ॥ ५ ॥

१२४

पर्वणांची ही पर्वणी । शांतिपर्वाभ्यास जनीं ॥ १ ॥
तीर्थामाजी हेंचि तीर्थ । करी पावनां पवित्र ॥ २ ॥
मंगलाचें हें मंगल । सिद्ध-साधकांचें बल ॥ ३ ॥
अमृत हें अमृताचें । मृत्युलोकीं या विराजे ॥ ४ ॥
सन्मार्गाचा हा सन्मार्ग । प्रकाशील अवघें जग ॥ ५ ॥
गुरूचाही गुरु हेंचि । येईल हें प्रत्ययासी ॥ ६ ॥
भाग्यवंतांचेंही भाग्य । आणील हें उदयास ॥ ७ ॥

---

१ शके १८७५ मध्यें

वद्ध, मुमुक्षु, साधक । येणें सिद्धही कृतार्थ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कोणी । पहा अभ्यास करूनि ॥ ९ ॥

१२५

शांतिपर्व हाचि सागर ज्ञानाचा । पुलीनींही येतां कार्यसिद्धि ॥ १ ॥
वाळवंटीं याच्या खडे तींही रत्नें । राजधर्मज्ञानें प्रत्यय हा ॥ २ ॥
लाभूनि स्वराज्य सुराज्य होईल । सदाचारें स्थैर्य पावेल तें ॥ ३ ॥
आपद्धर्में येती अपवाद ध्यानीं । आपत्काल जनीं सुलभ तेणें ॥ ४ ॥
मोक्षधर्म हाचि तळ या सिंधूचा । तेथ प्रवेशतां पूर्णकाम ॥ ५ ॥
कामधेनु, चिंतामणि, कल्पवृक्ष । लाभती सर्वत्र मोक्षधर्मीं ॥ ६ ॥
नव्हे नव्हे फलश्रुति हे रोचक । येईल प्रत्यक्ष अनुभवा ॥ ७ ॥
समाप्त हें पर्व न होईचि कदा । अभ्यासें पूर्णत्वा नेई स्वयें ॥ ८ ॥
शांतिपर्वाभ्यासें वासुदेव शांत । आनंदीं आनंद भरूनि वाहे ॥ ९ ॥

इतिश्री वासुदेवकृत अभंग-भारतान्तर्गत शांतिपर्वांतील अ. ३६५ वा तथा मोक्षधर्मपर्वाचा १९२ वा अध्याय समाप्त

## मोक्षधर्मपर्व ( शांतिपर्व ) समाप्त

शांतिपर्वांतील मोक्षधर्मपर्वाची अभंगसंख्या १२५

# चतुर्थ खंड समाप्त

या चतुर्थखंडांत आलेल्या एकंदर अभंगांची संख्या १७१४

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

पुढील अनुशासनपर्वाचा आद्यश्लोक —

युधिष्ठिर उवाच—

शमो बहुविधाकारः सूक्ष्म उक्तः पितामह ॥
न च मे हृदये शान्तिरस्ति श्रुत्वेदमीदृशम् ॥ १ ॥

# अभंग–भारत

**( महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ )**

ग्रंथकार–कीर्तनवाचस्पति श्री. **वा. शि. कोल्हटकर**

स्वतंत्र भारताचे सर्व प्रश्न या राष्ट्रीय ग्रंथाच्या अभ्यासानें सुलभ-रीतीनें सुटतील याच महान् तळमळीनें या ग्रंथाचें ग्रंथकारांनीं अध्यायवारीनें 'अभंगमय' रूपांतर केलेलें आहे.

श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य, पं. देवनायक आचार्य, ना. मावळंकर ना. बाळासाहेब खेर, ना. लोकनायक अणे, सरसंघचालक गोळवलकर गुरुजी, श्री. ज. स. करंदीकर, प्राचार्य सोनोपंत दांडेकर इ० अनेक विद्वान् आणि अधिकारी लोकांनीं या कार्याची प्रशंसा केली आहे. लोकनायक अणे म्हणतात:– "हें तुमचें कार्य सुप्रसिद्ध कवि मुक्तेश्वर आणि मोरोपंत यांच्या मालिकेंतील असून त्यानें मराठी वाङ्मयांत एक अत्यंत महत्वाची आणि अमोलिक भर पडणार आहे"

आदि आणि सभा या दोन पर्वांचा खंड १ ला, वन, विराट आणि उद्योग या पर्वांचा खंड २ रा, भीष्मपर्वापासून स्त्रीपर्वापर्यंतच्या ६ पर्वांचा खंड ३ रा आणि संपूर्ण शांतिपर्वाचा हा खंड ४ था, असे ४ खंड प्रसिद्ध झाले असून अनुशासनपर्वापासून पुढील सर्व पर्वें शेवटच्या म्हणजे ५ व्या खंडांत येतील.

असें हें मराठी वाङ्मयांतील अपूर्व, अमोलिक आणि महान्कार्य पुढील वर्षीं मराठी वाचकांच्या संपूर्णपणें हातीं पडेल.

या ग्रंथांतील सुमधुर काव्य, महाभारताचा सिद्धान्तमय बोध आणि ग्रंथकारांचा ग्रंथांत पदोपदीं प्रगट झालेला जिव्हाळा या त्रिवेणी संगमानें या ग्रंथाला प्रयागराजाचें प्रासादिक महत्व प्राप्त झालें आहे.

हा सुलभ आणि प्रासादिक ग्रंथ वाचतांना सामान्य वाचकही निर्मल सरोवरांतील नौकाविहाराप्रमाणें हर्षित व तल्लीन होऊन निश्चयानें सर्व संशयातीत होतो.

मूल्य:— प्रथम खंड ५ रु. पुढील प्रत्येक खंडास ७॥ रु. ट. हं. वेगळें.

पत्ता:— व्यवस्थापक— **धर्मचैतन्य संस्था,** सदाशिव पेठ, पुणें २.

# धर्मचैतन्य शिक्षण

## पुस्तक १ लें व २ रें

लेखक व संपादक – कीर्तनवाचस्पति श्री. वा. शि. कोल्हटकर

वैदिक किंवा हिंदुधर्माचे तेजस्वी आणि तर्कशुद्ध विचार आणि कल्याणकारक आचार यांची पद्धतशीर माहिती मिळाल्यावांचून वैदिक-धर्माची योग्यता ध्यानीं येणार नाहीं. यासाटीं "धर्मचैतन्य संस्थेच्या" अभ्यासक्रमाचीं हीं दोन पुस्तकें अत्यंत परिश्रमानें लिहिण्यांत आलीं आहेत.

पहिल्या पुस्तकांत प्रातःस्मरण, भूपाळ्या, बोधपर गोष्टी, सुभाषितें, दिनचर्या, स्तोत्रें इ. माहिती लहान मुलां-मुलींस समजेल अशा रीतीनें दिलेली आहे. हें पुस्तक मुलांचें अमृतच आहे.

दुसऱ्या पुस्तकांत वेद, शास्त्रें, पुराणें यांचा थोडक्यांत परिचय, वैदिकधर्मांतील तत्त्वज्ञानाचे मूळ सिद्धान्त, वर्णधर्म, आश्रमधर्म, स्त्रीपुरुषादि धर्म, व्यक्तीपासून विश्वापर्यंतचे धर्म, युगधर्म, कांहीं उद्‌बोधक प्रश्नोत्तरें, संत आणि संतवाङ्मय, निवडक सुभाषितें, संस्कृत व प्राकृत स्तोत्रें आणि यावांचून अनेक प्रकारची मनुष्यास बहुश्रुत आणि धर्मप्रवण करणारी माहिती दिलेली आहे.

विद्यार्थ्यांना तर हें पुस्तक मार्गदर्शक होईलच. परंतु प्रत्येक हिंदु स्त्री-पुरुषासहि आपल्या भव्योदात्त धर्माची या पुस्तकानें निश्चित कल्पना येईल. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास हें पुस्तक म्हणजे आपल्या वैदिकधर्माचा आरसाच आहे. आभासात्मक परंतु मोहक पद्धतीनें मांडलेले धर्मविरुद्ध विचार वाचून आणि ऐकून भ्रांत झालेल्या मनःस्थितींत धर्मावर एकमार्गी आक्षेप घेण्यापूर्वीं एकदां हें पुस्तक अवश्य अभ्यासावें.

## पदवी मिळवा

या दोन्ही पुस्तकांचा योग्यरीतीनें अभ्यास करून परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या स्त्री-पुरुषांस त्यांचा सदाचार लक्षांत घेऊन 'धर्मचैतन्य संस्था' पदवी देते.

मूल्य :– पुस्तक पहिलें ८ आणे, पुस्तक २ रें १॥ रुपया. ट. हं. निराळें

पत्ता :– व्यवस्थापक —**धर्मचैतन्य संस्था**, सदाशिव पेठ, पुणें २.

आगामी प्रसिद्ध होणारें वाङ्मय—

# धर्मचैतन्य शिक्षण

पुस्तक तिसरें

लेखक व संपादक—**वासुदेव शिवराम कोल्हटकर**

या पुस्तकांत वैदिकधर्माच्या सर्व अंगोपांगांची थोडक्यांत पण मूलग्राही माहिती देण्यांत येईल. तसेंच धर्मासंबंधींच्या विवाद्य विषयांवर मुद्देसूत प्रकाश पाडला जाऊन सर्वप्रकारच्या नास्तिकमतांचाही परामर्श घेण्यांत येईल.

थोडक्यांत म्हणजे सांप्रतकालीन मतामतांचे हेलकावे खाणाऱ्या मनोवृत्ति जेणेंकरून स्वधर्मनिष्ठेनें सुस्थिर होतील अशीच या पुस्तकाची योजना आंखलेली आहे. शास्त्रीय सिद्धांतांची व्यावहारिक फोड करून या अर्थकामप्रवण जगांतही '**धर्म**' हाच राष्ट्राचा एकमेव तारक उपाय कसा आहे याचें सांगोपांग शास्त्रीय विवेचन सर्वांच्या उपयोगीं पडावें अशी पुस्तकाची भाषा व रचना आहे.

सवडीनुरूप हें पुस्तक लौकरच प्रसिद्ध करण्यांत येईल.

# कीर्तनकला आणि शास्त्र

( कीर्तनावरील अमोल शास्त्रीय ग्रंथ )

ग्रंथकार—कीर्तनवाचस्पति श्री. **वा. शि. कोल्हटकर**

या ग्रंथांत कीर्तनवाचस्पति श्री. कोल्हटकर यांनीं आपल्या ३० वर्षांच्या अनुभवांचें सारसर्वस्व ओतलें आहे. यांत सामान्यतः तीन विभाग पाडले असून प्रत्येक विभागांत ३६ अशीं एकंदर १०८ प्रकरणें येतील. कीर्तनाची केवळ शास्त्रीय दृष्टीनें इतकी परिपूर्ण चिकित्सा असलेला ग्रंथ आजपर्यंत उपलब्ध नाहीं. या ग्रंथाचें महत्त्व शब्दानें वर्णन करण्यापेक्षां ज्याच्या हातीं तो ग्रंथ जाईल तो कोणीही कीर्तनप्रेमी सज्जन आपण होऊनच त्या ग्रंथाची मुक्तकंठानें स्तुति करूं लागेल असा विश्वास आहे.

'अभंग-भागवत' हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर हा कीर्तनावरील ग्रंथ प्रसिद्ध होईल.

व्यवस्थापक—**धर्मचैतन्य संस्था**, सदाशिव पेठ, पुणें २

आगामी प्रसिद्ध होणारें वाङ्मय

# अभंग-भागवत

( श्रीमद्भागवताचें अभंगमय सुबोध रसाळ रूपांतर )

ग्रंथकार— कीर्तनवाचस्पति, अभंगभारतकार,

**वासुदेव शिवराम कोल्हटकर**

श्रीमद्भागवत हा भक्तिशास्त्राचा एकमेव आधारग्रंथ आहे. भक्तिप्रेमांकुरानें अंकुरित न होईल तर हें सर्व भूतल रुक्ष व भयाण भासल्यावांचून रहाणार नाहीं. सर्व धर्मांचा प्राण म्हणजे भक्ति. या विश्वमंडलांतून जर भक्ति वजा केली तर शिल्लक काय राहील हें साक्षात् ब्रह्मदेवासहि सांगणें कठिण आहे. अशी ही विश्वाधारस्वरूपिणी भक्ति श्रीमद्भागवतांत मूर्तिमंत पहावयास सांपडते. इतकेंच नव्हे तर भागवताच्या अभ्यासानें भाग्यवान् भक्तांच्या अंतःकरणांत ती भक्तीची सोज्वल मूर्ति प्रगट होऊन तेथेंच ती निरंतर वास करूं लागते, असें भागवताचें महत्व आहे.

संपूर्ण वाल्मीकी रामायणावरील रसाळ पद्यें, अखिल महाभारताचा अभंगमय आविष्कार आणि इतरहि अनेक ग्रंथांतील उद्बोधक अशीं विविध आख्यानें जी काव्यशक्ति प्रसवली त्याच कीर्तनवाचस्पति श्री. कोल्हटकर यांच्या काव्यशक्तीचें हें भक्तिप्रेमानें ओथंबलेलें मूर्तिमंत रसमय असें सर्वश्रेष्ठ फल आहे.

श्रीमद्भागवताच्या बाराहि स्कंधांतील प्रत्येक अध्यायावर मिळून सुमारें २००० अभंगांत हा ग्रंथ पूर्ण होईल. वाचकांच्या सोईकरितां हें संपूर्ण ‘अभंग–भागवत’ एकाच खंडांत प्रकाशित करण्यांत येणार आहे.

या प्रासादिक ग्रंथाचें महत्व श्रद्धाळु वाचक अनुभवानेंच जाणतील.

व्यवस्थापक—**धर्मचैतन्य संस्था**, सदाशिव पेठ, पुणें २